
स्व. बाळासाहेब रामनाथ शिर्के रचित

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज चरित्र

ग्रंथावर आधारित



# समुद्र भरला आहे

। संपादन/संकलन ।

श्री बजरंग झेंडे महाराज.

(सांगली,मिरज,म्हैसाळ)

श्री वटसावित्री पौर्णिमा, श्री संत कबीर जयंती २०१९


श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज १०० वी पुण्यतिथी महोत्सव
दि. २४/८/२००० ते ३१/८/२०००
मिरज
मिरज

# ।। श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज स्वामी ।।




जन्म रविवार दिनांक ०७/०२/१८३६,
समाधी सोमवार दिनांक २०/०८/१९००




परमपूज्य माईसाहेब शिर्के, कोल्हापूर
यांना कृतज्ञेने अर्पण ...!

## ।। श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज कोल्हापूर ।।




जन्म माघ वद्य पंचमी शके १७५७, रविवार दि. ७ फेब्रुवारी १८३६ (सकाळी ७ वा. ७ मि.)
समाधी- श्रावण वद्य दशमी शके १८२२, सोमवार दि. २० ऑगस्ट १९०० (पहाटे ३ वा. ४५ मि.)

॥ श्री स्वामी समर्थ ॥



मिरज मठीतील श्री स्वामी समर्थांचे तैलचित्र



श्री कुंभार स्वामींचे
भक्ता समवेत छायाचित्र

डावीकडे स्व. वासुदेव दळवी
मागे स्वर्गीय दत्तोबा शिर्के

उजवीकडे स्व. मुरगुडकर
मागे स्वर्गीय कृष्णा लाड

खाली बसलेले डावीकडून स्व. रामनाथ
शिर्के, स्व. फलटणकर



श्री कुंभार स्वामींची,
शिर्के यांच्या घरातील
समाधी, कोल्हापूर




श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधी मंदिर (शिर्के दत्त मंदिर) कोल्हापूर
वैराग्य मठी...!




निजबोध मठी / व्यास मठी, गंगावेश कोल्हापूर

# मनोगत.....!

श्री भगवान दत्तात्रयांचे पाचवे अवतार श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचा जन्म नांदणीला दि. ७/२/१८३६ रोजी आप्पाभट जोशी व अन्नपूर्णादेवी यांच्या पोटी झाला. त्यांनी दि. २०/८/१९०० रोजी पुण्यश्लोक ताराबाई शिर्के यांच्या कोल्हापुरातील कुंभार गल्लीतील घरात समाधी घेतली. या समाधी मंदिरात मी सन १९७४ पासून दर्शनासाठी जावू लागलो. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना सर्व भक्त कुंभार गल्लीतील दत्त महाराज स्वामी या नांवानेच जास्त ओळखतात. सन १९७५ पर्यंत श्री स्वामी महाराजांच्या चरित्र पोथ्या सहज उपलब्ध होत नव्हत्या. त्यामुळे त्यांच्या भव्य/दिव्य जीवनाचा परिचय सहजपणे घडणे अवघड होते. एक पिढी इतिहास निर्माण करून जाते तो इतिहास अलिकडे विसरला जातो आहे. परिणामी भारतीय संस्कृतीचा इतिहासच लुप्त होतो की काय अशी परस्थिती, अवस्था निर्माण झाली आहे. त्यासाठी नव्या पिढीला काहीतरी, कणभर तरी या ग्रंथाच्या माध्यमातून देता आले आणि नव्या पिढीने त्या कणांचा, क्षणांचा, अनुभवांचा स्विकार करावा या अपेक्षेने हा लेखन संकल्प. अस्वस्थ आणि अंधारमय होत चाललेल्या या वातावरणांत एक खापरीची पणती लावण्याचा हा प्रयत्न म्हणून हा लेखन प्रपंच.

''देव आहे रे आणि देव नाही रे'' असे दोन प्रवाह आणि तिसरा प्रवाह काही वेळेला देव आहे आणि काही वेळेला काही प्रसंगी देव नाही असे मला वाटते. भावनांचा मोक्ष, सेवेत, समर्पणात, संगोपनात, भक्तीत, त्यागात, आढळतो. अनंतज्ञान, अनंतसुख, अनंतदर्शन, अनंतसामर्थ्य, यांच्या सर्वांग सुंदर प्रकटीकरणांचे स्वरुप म्हणजे मोक्ष अशी भावना मनी बाळगून हा लेखन प्रपंच केला आहे. स्व. बाळासाहेब ऊर्फ वसंतराव रामनाथ शिर्के यांनी स्व. गणेश मुजूमदार, स्व. गणेश देशपांडे यांच्या पोथ्यांचा तर स्व. गो. द. पत्की यांनी गद्य भाषेत लिहिलेल्या चरित्राचा अभ्यास करुन श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज / श्री कुंभार स्वामी यांच्या जीवनावर श्री श्रीकृष्ण सरस्वती चरित्र ''नावांचा ग्रंथ / पोथी लिहली'' स्व. गणेश नारायण मुजूमदार व स्व. गणेश देशपांडे यांनी श्रीस्वामींचे लिहलेले ओवीबध्द चरित्र हे त्या कालमान परीस्थितीनुसार संस्कृतप्रचुर, सुंदर होते. तर स्व. गो. द. पत्की यांनी लिहिलेले गद्य चरित्र हे छोटेखानी स्वरुपाचे होते. सहज वाचनीय व समजणारे होते. परंतु रोजच्या नित्य वाचनासाठी/साधनेसाठी सहज सोप्या ओवीमध्ये ग्रंथाची / पोथीची पारायणासाठी आवश्यकता होती. ती उणीव स्व. बाळासाहेब शिर्के यांनी स्व. माईसाहेब शिर्केंच्या आशीर्वादाने भरुन काढली. त्यांनी लिहलेल्या ''श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज चरित्र'' या ग्रंथाची / पोथीची रचना ओवीबध्द असून भाषा अतिशय साधी, रसाळ आहे. त्यामुळे ही पोथी / ग्रंथ पारायणासाठी सोपी, समजणेस सहज अशी आहे. श्री स्वामींचा चरित्र ग्रंथ / पोथी स्व. बाळासाहेब शिर्के यांनी १९७० ते १९७३ या काळात लिहून दि. १२/२/१९७३ रोजी श्री दत्त मठीतून प्रकाशित केली. या ग्रंथाचे/पोथीचे श्रीस्वामी भक्तातून फारच स्वागत झाले.

हा ग्रंथ / पोथी मी अधून मधून वाचत असे / पारायण करीत असे. मी सरकारी नोकरीत असल्याने / इतर व्यापामुळे श्री स्वामींच्या पोथीचे पारायण माझ्याकडून नियमितपणे घडून येत नव्हते. सन १९७५ पर्यंत स्व. गणेश नारायण मुजूमदार यांनी लिहिलेल्या ''श्री श्रीकृष्ण विजय'' या ग्रंथाची / पोथीची उपलब्धता नव्हती. यापूर्वी छापलेल्या सर्व पोथ्या / ग्रंथ संपलेले होते. त्यामुळे स्व. मुजूमदार यांनी लिहलेल्या पोथीचे / ग्रंथाचे वाचन मला घडलेले नव्हते. तथापि श्रीस्वामींना समाधी घेऊन शंभर वर्षे (श्रावण वद्य दशमी १९००) झालेने श्री प्रसाद मुजूमदार यांनी स्व. गणेश नारायण मुजूमदार यांनी लिहिलेल्या ''श्री श्रीकृष्ण विजय'' या चरित्र ग्रंथाचे पुर्नमुद्रण करुन श्रीस्वामी चरित्रात मोलाची भर घातली.

स्व. गणेश नारायण मुजूमदार, स्व. गणेश देशपांडे, स्व. गो. द. पत्की, स्व. बाळासाहेब शिर्के यांनी श्रीस्वामी चरित्र / पोथी लिहून श्रीस्वामी भक्त व साहित्य रसिक यांच्यावर अमर्याद उपकारच केले आहेत यात शंका नाही. सदरच्या ग्रंथाची भाषा ओज प्रसाद मार्धुयादी काव्य गुणांनी अलंकृत असून श्री महाराजांचे मूळ चरित्र, त्यांच्या विषयी थोरा मोठ्यांमधून माहिती मिळवून तयार केलेले आहे. सदरचे चरित्र / ग्रंथ हे साधकांना सायुज्य मुक्तीकडे नेणारे आहे यात शंका नाही. तथापि, आता संगणक युग चालू आहे. मनुष्याच्या जीवनाची धावपळ वाढली आहे. या धाकधुकीच्या जीवनात श्री स्वामी सेवा. श्री स्वामी चरित्र पारायण रोजच सर्वांना जमेल असे नाही. संगणक युगात वावरणाऱ्या तरुण पिढीला श्रीस्वामी चरित्र पोथी वगैरे वाचणे अवघडच होवून बसले आहे.

१९७५ सालाच्या अगोदर ओवीबध्द रचना / चरित्र पोथी रचना मराठी वाड:मयातील श्री शारदेची देणगी होती. साहित्याची शोभा होती. तथापि, इंग्रजी भाषेचा वाढता प्रभाव यामुळे पोथी / पुराण / ओवीबध्द रचना साहित्य वाचनातून दूर होत चालले आहे. म्हणून श्रीस्वामींच्या चरित्राची फेरमांडणी करावी असे माझ्या मनात आले. श्रीस्वामींच्या चरणी शब्द, भावना, भक्ती अर्पण करावे असे माझ्या मनात आले. साहित्य लेखनाचा कोणताही गुण माझ्या अंगी पूर्ण नाही याची जाणीव ठेवूनच सदरच्या चरित्र लेखनाचा प्रपंच मी केला आहे. संगणक युगातील सर्वांनाच या चरित्र लेखनाचा लाभ व्हावा. चरित्र सहजपणे, नीट समजावे असा प्रयत्न मी केला आहे. श्रीस्वामी महाराजांचा जीवन काल हा (७/२/१८३६ ते २०/८/१९००) असा आहे. त्यांनी संजीवन समाधी घेवूनही शंभर वर्षे होऊन गेलेली आहेत. श्री स्वामी चरित्र पोथीत ज्यांचा उल्लेख आला, ज्या घटनांचा उल्लेख आला, ज्या तीर्थक्षेत्रांचा / स्थळांचा उल्लेख आला यांचीही माहिती मिळणे / मिळवणे अत्यंत दुरापास्त होते. तथापि, श्री महेश शिर्के, श्री बाळासाहेब नाडकर्णी, श्री प्रसाद मुजूमदार, श्री प्रताप माने, श्री भरत व्यास, कोल्हापूर, श्री किरण माने, सातारा डॉ. बिंदुसार पलंगे, प्राध्यापक श्री वैजनाथ महाजन, श्री व सौ. दिलीप कुलकर्णी(बहुलेकर),सांगली, डॉ. श्री बापूसाहेब पाटील, प्राध्यापक श्री बापू जाधव, श्री सुरेश खाडे म्हैसाळ, श्री जोशी बंधू नांदणी यांच्या स्नेहभावामुळे सर्व काही जुळत गेले. सर्व काही माहिती मिळत गेली. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणेच मला आवडेल.

सदर ''समुद्र भरला आहे'' हे पुस्तक/ग्रंथ लिहणेसाठी मुख्यत: स्व. बाळासाहेब शिर्के, स्व. गणेश नारायण मुजूमदार, स्व. देशपांडे, स्व. गो. द. पत्की या मान्यवरांनी लिहलेल्या पोथ्यांचा / चरित्र लेखन ग्रंथाचा मी आधार घेतलेला आहे. यात मला कसलाच कमीपणा वाटत नाही. उलट त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यातच मला धन्यता वाटत आहे. जे आहे ते त्यांचेच आहे मी त्यांचा केवळ दास आहे. त्यांचेच विचार व शब्द श्री स्वामी भक्ता समोर पुन्हा एकदा ठेवतो आहे.

''समुद्र भरला आहे'' हे पुस्तक/ग्रंथ शब्दरूप करतांना मला अनेकांची मदत झाली आहे. त्या सर्वांचा उल्लेख करुन संकुचितपणा दाखविण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच मला आवडेल.

''समुद्र भरला आहे'' या पुस्तक/ग्रंथ लेखनासाठी अनेक मान्यवर, नामांकित लेखकांच्या पुस्तकांचा/ ग्रंथांचा संदर्भ घेतलेला आहे. या संदर्भ ग्रंथाचा मी त्या त्या लेखात उल्लेख केलेलाच आहे. त्यांच्याही ऋणात मी आहे. महाराजांची छायाचित्रे व समकालीन त्यांच्या भक्तांची छायाचित्रे सहजगत्या मिळतील असे वाटत नव्हते. परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही. अनेक मित्रांच्या, भक्तांच्या सहाय्याने बऱ्याच प्रमाणात हे काम पूर्ण करता आले. तरी काही छायाचित्रे हाती लागलीच नाहीत.ज्यांनी ही छायाचित्रे / मिळवून देण्यात विशेष सहाय्य केले. त्यांचा मी ऋणी आहे. या छायाचित्रांची निवड करणे, स्वच्छता करणे, मांडणी करणे हे काम जिकीरीचे होते. हे काम श्री दत्ता भोकरे यांनी वेळेत केले. तसेच श्री तम्मा शिष्टे, श्री मारुती आलदर यांनी माझ्या लिखाणाचे मुळ टंकलेखन व्यवस्थित करुन दिले याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. छायाचित्रे / माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल मी खालील मित्रांचा / श्री स्वामी भक्तांचा ऋणी आहे. श्री महेश शिर्के, श्री बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, श्री प्रताप माने, श्री प्रसाद मुजूमदार, श्री सुभाष कुलकर्णी, श्री अमित पाटील, श्री विजय करजगार, कोल्हापूर, श्री किरण माने, सातारा, डॉ. श्री शंतनु कुलकर्णी, कराड यांचा मी आभारी आहे. या ग्रंथाच्या छपाईचे काम मा. श्री बाबूराव कोरे व त्यांच्या श्री शिव ऑफसेट, सांगली येथील कर्मचारी श्री आंब्रे, श्री राहुल क्षीरसागर, सौ. तनिषा कोळेकर, श्री दिगंबर सुतार यांनी परिश्रमपूर्वक काम करुन सुबक ग्रंथ तयार करुन दिला याबद्दल त्यांचे मनस्वी आभार.

कालपरत्वे मराठी भाषा बदलत गेली. त्या-त्या काळानुसार भाषेचे स्वरुप बदलले, अनुस्वार, ऱ्हस्व, दीर्घ यातही बदल झाला. त्यानुसार त्या-त्या काळातील भाषा/शब्द या संदर्भ ग्रंथात वापरण्यात आले आहेत. वाचकांनी याची कृपया नोंद घ्यावी. संदर्भिय ग्रंथाचा विषय शंभर वर्षापूर्वीचा आहे. यामुळे या ग्रंथामध्ये काही त्रुटी राहण्याची शक्यता आहे. हे कृपया वाचकांनी समजून घेवून काही मते/संदर्भ असल्यास जरुर कळवावेत ही विनंती.

''समुद्र भरला आहे'' हे श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज ऊर्फ कुंभार स्वामी हे त्यांचे शब्दांकन चरित्र स्व. प. पू. माईसाहेब शिर्के, कोल्हापूर यांच्या चरणी अर्पण करुन त्यांची व श्री स्वामींची कृपा व्हावी अशी विनम्र भावाने प्रार्थना करतो.

**।। श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज की जय ।।**

**श्री झेंडेमहाराज**
सांगली-मिरज-म्हैसाळ

## सदर लेखासाठी खालील संदर्भीय ग्रंथाचा संदर्भ घेणेत आला आहे.

| अ.क्र. | संदर्भ ग्रंथाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १. | तुकाराम महाराज यांची गुरुपरंपरा | **वासुदेव सिताराम बेंद्रे** |
| २. | महाराष्ट्रातील पाच संप्रदाय | **पं. रा. मोकाशी** |
| ३. | दत्त संप्रदायाचा इतिहास | **रा. चिं. ढेरे** |
| ४. | महानुभाव–एक दृष्टिक्षेप | **डॉ. श्री अनिल शेवाळकर** |
| ५. | वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य | **डॉ. श्री शिवाजीराव मोहिते** |

**वरील सर्वांचा मी ऋणी आहे.**

# समुद्र भरला आहे



आदिनाथ गुरु सकळ सिध्दांचा ।
मच्छेंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।
मच्छेंद्राने बोध गोरक्षाशी केला ।
गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।
गहिनीप्रसादें निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवा सार चोजविलें ।।

## श्री दत्त संप्रदायाची व इतर संप्रदायाची माहिती विषयसूची

१) श्री दत्त संप्रदाय – श्री अवधूत संप्रदाय
२) श्री नाथ संप्रदाय
३) श्री वारकरी संप्रदाय
४) श्री समर्थ रामदास संप्रदाय
५) श्री आनंद संप्रदाय
६) श्री चैतन्य संप्रदाय

**।। श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज प्रसन्न ।।**
**।। श्री स्वामी समर्थ प्रसन्न ।।**
**।। श्री शिव चिदंबर स्वामी प्रसन्न ।।**
**।। श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर प्रसन्न ।।**

श्री दत्तात्रय भारतीय संस्कृतीतील प्राचीन देवता आहे. श्री दत्त उपासना ही प्रामुख्याने महाराष्ट्रातच गेली हजार बाराशे वर्षे अव्याहतपणे चालत आलेली आहे. श्री दत्त उपासना ही शैव/ वैष्णव / शाक्त या तिन्ही संप्रदायात दिसून येते. तसेच महानुभवी संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदयामध्ये प्रामुख्याने श्री दत्त उपासना विशेषत्वाने / प्रकर्षाने चालत आलेली आहे. महाराष्ट्रात श्री दत्त संप्रदाय गेली पाच-सहाशे वर्षापासून चालत आलेला असून, हिंदू / मुसलमानांचा यात समावेश दिसून येतो.

श्री दत्तात्रेय देवतेचा उल्लेख पुराणात, महाभारतात आढळून येतो. श्री दत्तात्रेयांचा जन्म अत्रिवंश कुळात ब्रम्हा, विष्णू, महेश यांच्या आशीर्वादाने झालेला असून, याचा उल्लेख मार्कंडेय पुराणात प्रामुख्याने आलेला आहे. अत्रिऋषींनी ऋक्ष पर्वतावर पुत्र प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या केली होती असा उल्लेख ब्रम्ह पुराणात दिसून येतो. परंतु श्री नारदाने केलेल्या अनुसूयेच्या सतीत्वाच्या गौरवामुळे ब्रम्हा - विष्णू - महेश भगवानांच्या पत्नीमध्ये अनुसुयेच्या सतीत्वाबद्दल द्वेष निर्माण झाला. अनुसुयेचे सत्त्व हरण करण्यासाठी देवी लक्ष्मी, पार्वती, सरस्वती नी श्री ब्रम्हा - विष्णू - महेश यांना अत्रिऋषींच्या आश्रमात पाठविले. सत्त्व हरण करणेसाठी आलेल्या भगवान ब्रम्हा, विष्णू , महेश यांनी अनुसूयेला सांगितले की, ''तू विवस्त्र होऊन भोजन वाढीत असशील तर अतिथी म्हणून भोजन करू'' आश्रमात तर अत्रि ऋषी नव्हते. अतिथींनी तर भोजन स्वीकारले पाहिजे अशा दुहेरी संकटात अनुसूया देवी अडकल्या. अतिथींची भोजनाची अट अनुसूया मातेने स्वीकारून श्री अत्रि ऋषिंचे स्मरण करून या तिन्ही अतिथी देवावर तीर्थ शिंपडले. त्याबरोबर हे तिन्ही देव (ब्रम्हा-विष्णू-महेश) लहान बाळे झाली. त्यांना दूध पाजून तृप्त केले.

इकडे आपल्या पतींची वाट पाहून श्री देवी लक्ष्मी / पार्वती / सरस्वती अत्रि ऋषिंच्या आश्रमात आल्या. पाहतात तो आपले पती लहान बाळे झालेली असून, पाळण्यात झोपलेली आहेत. त्यांना ओळखणेही कर्म कठीण आहे. अनुसूयेचे सतीत्व/श्रेष्ठत्व मान्य करून त्या तिन्ही देवी अनुसूयेला शरण गेल्या व आपल्या पतींना / देवांना पूर्ववत रूप देण्याविषयी विनंती केली. तिन्ही देवांच्या भार्यांनी केलेल्या विनंतीला मान देवून अत्रि ऋषिंचे स्मरण करून पुन्हा तीर्थ शिंपडून अनुसूयेने तिन्ही देवांना पुन्हा पूर्वरूप दिले. पूर्वरूप प्राप्त झाल्यावर तिन्ही देवांनी / देवींनी अनुसूयेची प्रशंसा केली / सतीत्त्वाचा उच्च गौरव केला व वर मागणेस सांगितला. यावर अनुसूयेने या तिन्ही देवांना (ब्रम्हा-विष्णू-महेश) आपल्या पोटी अवतार घेणेबाबत वर

मागितला. या वरानेच भगवान ब्रम्हा-विष्णू-महेश यांनी अनुसूया देवीच्या पोटी जन्म घेतला. अवतार श्री दत्त अवतार चरित्राबाबतीत अनेक वेगवेगळ्या कथा पुराणातून दिसून येतात. परंतु वरील कथाच सर्व मान्य झालेली आहे. भगवान दत्तात्रेयांनी भगवान शंकराची आराधना करून ब्रम्हज्ञान प्राप्त केले म्हणून नाथ संप्रदायात श्री दत्तात्रेयांची आराधना मुख्यत: दिसून येते. तसेच भगवान दत्तात्रेयांनी चोवीस गुरू केल्याचे आढळून येते. या चोवीस गुरूकडून वेगवेगळे गुण घेतले असून, या चोवीस गुणातच त्यांना ''जग संपूर्ण गुरू दिसे'' ही भावना निर्माण झालेली दिसून येते. हे चोवीस गुण भगवान दत्तात्रयांनी/अवधूतांनी घेतलेले आहेत. अवधूत हे नाव भगवान दत्तात्रेयांचेच आहे. शांतीब्रम्ह पैठण निवासी संत एकनाथ महाराजांच्या खालिल अभंगातून श्री अवधूताचे दर्शन घडून येते.

**श्री संत एकनाथ महाराजांचा अभंग –**

**जो जो जयाचा घेतला गुण । तो तो म्यां गुरु केला जाण ।**
**गुरुंसी आले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ।।**
**ज्याचा गुण घेतला । तो सहजे गुरुत्वा आला ।**
**ज्याचा गुण त्यागरुप घेतला । तोही गुरु झाला अहितत्यागे ।।**
**तो अवधूत जाण दत्तात्रेया । तेने आलिंगूनी यदुराया ।**
**निजरूपाचा बोधु तया । अनुभवावया दीधला।।**

श्री दत्तात्रेय देवांनी १६ अवतार घेतल्याचे श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांच्या ग्रंथातून दिसून येते. सोळा अवतार पुढीलप्रमाणे – १) योगीराज २) अत्रिवरद ३) दत्तात्रेय ४) कालाग्निशमन ५) योगिजनवल्लभ ६) लिलाविश्वंभर ७) सिद्धराज ८) ज्ञानसागर ९) विश्वंभर १०) मायामुक्त ११) माया युक्त १२) आदिगुरू १३) शिवरूप १४) देवदेव १५) दिगंबर १६) कृष्णशामकमलनयन

वरील अवतार / उपनिषदे, पुराणातून इतर ग्रंथातून प्राचीन काळापासून चालत आलेले दिसून येतात. मात्र दत्त संप्रदायात अत्रिवरद त्रैमुखी श्री दत्तात्रेय – श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नृसिंह सरस्वती, श्री अक्कलकोट स्वामी समर्थ, श्री माणिकप्रभू हे प्रामुख्याने अवतार मानणेत येतात.

श्री भगवान दत्तात्रेय हे योगीराज असून हे जटाजूटधारी, अवधूत, दिगंबर स्वेच्छा विहारी आहेत. ते पांचाळेश्वरी स्नान करतात. तर कोल्हापूरला भिक्षा घेतात तर तुळजापूरला हात धुतात व माहूरला निद्रा घेतात/विश्रांती घेतात असा उल्लेख आढळून येतो. श्री ब्रम्हा, विष्णू-महेश ही त्रिगुणात्मक त्रैमूर्ती अशीच श्री दत्तात्रेयाची ओळख असून, उत्पत्ति-स्थिती-लय तसेच

सत्व-रज-तम यांनी अशी ही श्री दत्तात्रेयाची ओळख आहे. संत एकनाथ महाराजांनी श्री दत्तात्रेयांची आरती ''त्रिगुणात्मक त्रय मूर्ती दत्त हा जाणा'' अशी केली आहे. तर श्री संत तुकाराम महाराजांनी

**तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ।।१।।**
**काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ।।२।।**
**माथा शोभे जटाभार । अंगी विभूति सुंदर ।।३।।**
**शंख चक्र गदा हाती । पायी खडावा गर्जती ।।४।।**
**तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ।।५।।**

असे सुंदर वर्णन अभंगात केले आहे. कांही ठिकाणी एकमुखी दत्तात्रेयाची पूजा-अर्चा दिसून येते. महाभारत, पुराणे, अर्वाचीन उपनिषिदे यातून एकमुखी श्री दत्तात्रेयांचा उल्लेख आढळून येतो.

# स्वयंज्योति

### श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर पुण्यतिथी शताब्दी महोत्सव (२००४-२००५)

## अवधूत संप्रदाय

भारत देश हा अध्यात्माचे माहेरघर आहे. ही गुरूचरणांनी पावन झालेली भूमी आहे. प्राचीन ऋषिमुनी अत्यंत उदारमतवादी होते. त्या काळात प्रत्येक व्यक्तीस धार्मिक व वैचारिक स्वातंत्र्य होते. म्हणून पुरातन वैदिक संप्रदायात अनेक मतभेद दिसून येत होते. यामुळे धर्मस्थापक ऋषिमुनींनी आपापल्या अनुयायांना नित्यनैमित्तिक आचरणाबाबत निर्दिष्टांचे मार्गदर्शन केल्याने, समाजात आचारभिन्नता दिसून आली आणि निरनिराळे पंथ अस्तित्वात आले. असे असून देखील वैदिक धर्माचा अंतिम उद्देश मोक्षप्राप्ती किंवा ब्रम्हात्मैक्य हा एकच होता. विविधतेतून एकता हेच सनातन धर्माचे वैशिष्ट्य आहे.

या जुन्या उदारमतवादामुळे समाजात द्वैत, अद्वैत, विशिष्ट द्वैत, शक्तीपद्धती, शाक्त पंथ, अवधूत पंथ अशा अनेक पंथांचा उदय झाला. या सर्वामध्ये अवधूत संप्रदाय अत्यंत प्राचीन होता. अवधूत संप्रदायाचे आद्यप्रवर्तक श्री दत्तात्रय स्वयंभू. त्यांनी भगवान श्रीरामास त्रिपुरा रहस्य सांगितले. विभक्ती संप्रदायाचा अवधूत संप्रदायाशी जवळचा संबंध आहे. श्रुती शास्त्रांच्याप्रमाणे गुप्तज्ञान स्वानुभवाने सिद्ध करून दत्तात्रयांनी अवधूत मार्गाचा प्रचार केला.

**संप्रदाय म्हणजे काय ? (गुरूमार्ग म्हणजे काय ?)**

सद्‌गुरूने, सन्मार्ग दर्शन केल्याप्रमाणे प्रपंची व परमार्थी ब्रम्हात्मैक्याचा पूर्णानुभव घेऊन निर्लिप्तपणे ब्रम्हनिष्ठेने, स्वत:चे दैनंदिन व्यवहारांत केवळ साक्षीभूत राहून समाजात कोणत्या

प्रकारे वर्तन ठेवावे या संबंधात, त्या त्या संप्रदायाने आपापल्या अनुयायांना केलेले स्वानुभवसिद्ध मार्गदर्शन हाच खरा संप्रदाय.

**अवधूत म्हणजे कोण ?**

**अक्षरत्वाद्वरेण्यत्वाद धूत संसार बंधनात्**
**तत्वमत्स्यादि लक्षीत्वाद् अवधूत इतिर्यते**
**यो विलंग्याश्रमान वर्णान् आत्मन्येन्नेवस्थित: सदा ।**
**अतीवर्णाश्रमी योगी अवधूत: स कथ्यते ।**

भावार्थ : श्वाश्वत, श्रेष्ठ संसार बंधनातून मुक्त, श्रुतिवचनांचे मर्म ज्ञात असलेला, वर्णाश्रम बंधन ओलांडलेला, सतत आत्मनिष्ठ राहून अखंड योग साधलेला जो, असा तो अवधूत.

**अवधूत शब्दाचा तात्विक अर्थ –**

**अवधूत चार अक्षरांचा संयोग आहे.**
**''अ'' आशापाश विनिर्मुक्त आदि मध्यात निर्मल:**
**आनंदे वर्तते नित्यं अकारं तस्य लक्षणम् ।**

अर्थ : आशापाशमुक्त, सर्वत्र निर्मळ, सदोदित आनंदी असे लक्षण असणारा

**''व'' वासना वर्जिता येन वक्तव्यंच निरामयम् वर्तमानेषु वर्तेत वकारस्तस्य लक्षणम् ।**

अर्थ : वासनावर्जित, निरामयवक्तव्य, वर्तमानात वावरणारा (भूतकाळाबद्दल किंचितही विषाद न राखणारा व भविष्यकाळाबद्दल योग मग्न न होणारा) असा व अक्षरांचा संकेत.

**''धू'' धुलि घूसरगात्राणि धूतचित निरामय:**

**धारणा ध्यान निर्मुक्तो धूकारस्तरस्य लक्षणम्**

अर्थ : बहिरंग शुध्दीकडे विशेष लक्ष पुरविलेले नसले तरी अंतरंगाच्या पावित्र्याकडे संपूर्ण लक्ष देणारा, सदा प्रसन्नचित असणारा, ध्यानधारणाविना क्रियांबद्दल निर्लिप्त असणारा असा ध्यान अक्षराचा संकेत.

**''त'' – तत्वचिंता धृतायेन चिन्ताचेष्टा विवर्जित: तमोहंकार निर्मुक्त:**
**''त'' कारस्तस्य लक्षणम्**

अर्थ : चिंता व चेष्टा तसेच तमोगुण – प्रधान अहंकार त्याग केलेला. सदोदित तत्वमसी महावाक्यां विचारात निमग्न असणारा हा ''त'' अक्षराचा संकेत.

**अवधूताची लक्षणे :–**

**रथ्या कर्पट विरचित कंथा । पुण्यापुण्य विवर्जित पंथा**

**शून्यागारे तिष्ठती नग्नो । शुध्द निरंजन समरस मग्न: ।**

**भावार्थ :** रस्त्यात पडलेल्या फाटक्या चिंध्या घेऊन, त्याची झोळी तयार करुन पाप व पुण्याच्या पलिकडील अतिउत्कृष्ट मार्ग अवलंबणारा, दिगंबर होऊन शुध्द निरंजनात (परब्रह्म) तत् स्वरुपाने सामरस्य-सुखात मग्न होऊन आत्यांतिक एकांत स्थानी अशा स्मशानात आनंद विहार करणारी पावनमूर्ती म्हणजेच अवधूत, भक्ति, ज्ञान, वैराग्य हे तिन्ही स्वत:मध्ये समाविष्ट करुन घेऊन, वर्णाश्रम बंधनाला सीमा अल्लंघून, भेदाभेद विरहीत होऊन, आत्मनिष्ठ, गुरुभक्ती संपन्न ब्रम्हात्मैक्य सुस्वादनेने कृतकृत्य होऊन, आपल्या सद्गुरुबद्दल कृतज्ञता राखून सदाकाळी सहजावस्थेत (सुखदु:खविरहीत) विधी निषेध दोन्हीही त्यागून निरंकुश वृत (बालोन्मतपिशाच या अवस्थेत) व्यवस्था करीत असून अव्याहत सदगुरु भजनानंदी निमग्न राहणारा तोच अवधूत होय. सद्गुरुचे निरपेक्ष प्रेमदान, सर्वत्र समदृष्टी, अनन्य शरणागती, वीरवैराग्य, अनिमित बंधूप्रिती, अव्दय गुरुभक्ती, अहंकार-त्याग, सहजसमाधी विधीनिषेध-त्याग आत्मरती, सद्गुरुभजन, जीवन्मुक्ती गुरुप्रेमभोग ही सर्व अवधूत मार्गाची मुक्त लक्षणे आहेत. अद्वैतानुभवसिध्द गुरुप्रेम शुध्द मार्ग अवधूत - गुरुमार्ग होय.

**अवधूत संप्रदाय प्राचीन -**

१) नित्यानित्य वस्तुविवेक (नश्वर संसाराची कल्पना)
२) वैराग्य
३) मुमुक्षूत्व
४) वर्णाश्रम बंधनमुक्त
५) बलहीन व अशक्तांना देखील अधिकार
६) साधनेची आवश्यकता नाही
७) स्त्रियांना प्रवेश नाही
८) बंधमुक्त, योग्य - अयोग्य हे भेद नाहीत
९) अनन्य शरणागती
१०) अनुग्रहप्राप्ती
११) तात्काळ मुक्ती
१२) कर्मकांड वर्ज्य (विधी निषेध त्याग)
१३) गुरुभक्ती,गुरुमंत्र आवश्यक
१४) गुरुसेवेची अपेक्षा नाही
१५) आश्रमवासी नसल्याने भिक्षा जीवन
१६) अरण्यवास

१७) अहंकाराला जागा नाही
१८) प्रारब्धाला किंमत नाही
१९) पूर्वजन्म व पुर्नजन्मावर विश्वास नाही
२०) ब्रम्हनिष्ठा
२१) ब्रम्हप्राप्ती, ब्रम्हानुभव कृतकृत्यता
२२) सद्‌गुरुभजन
२३) जीवनमुक्ती, देहांतमुक्ती अपेक्षित
२४) निरंकुश वृत्ती

**पंतप्रणित अवधूत मार्ग**

१) संसार अशाश्वत - तुच्छ, गुंतणे अयोग्य
२) वैराग्य असले तरी प्रपंचत्याग नको
३) मुमुक्षूत्व
४) वर्णाश्रम बंधने नाहीत
५) बलहीनाला देखील अधिकार
६) साधना करण्याची गरज नाही
७) स्त्रियांना पण प्रवेश
८) बंधमुक्त, योग्य - अयोग्य असे भेद नाहीत
९) अनन्य शरणागती
१०) अनुग्रहप्राप्ती - ऐक्य बोध समरस भाव
११) तात्काळ मुक्ती
१२) कर्मकांड वर्ज्य
१३) गुरुभक्ती, गुरुमंत्र पठण आवश्यक
१४) गुरुला सेवेची अपेक्षा नाही
१५) स्वावलंबन
१६) सहजीवनाची आवश्यकता
१७) अहंकाराला जागा नाही
१८) प्रारब्धाला किंमत नाही

१९) पूर्वजन्मावर विश्वास पण पुर्नजन्म नाही

२०) ब्रम्हनिष्ठा

२१) ब्रम्हप्राप्ती, ब्रम्हानुभव कृतकृत्यता

२२) सदगुरुभजन, सद्गुरु चरणप्रीती

२३) जीवनमुक्ती,

२४) निरंकुश वृत्ती, अखंड शांती

२५) अनियमित  बंधुप्रीती

२६) निरहंकार वृत्ती निजबोध खड्ग अपेक्षित

**अवधूत संप्रदायाचे तत्वज्ञान :**

संप्रदायाचे तत्वज्ञान मुख्यत्वे अद्वैत सिध्दांतावर आधारीत आहे. श्रीपंत महाराजांनी केंव्हाही वेदमर्यादेचे उल्लंघन केलेले नाही. एवढेच नव्हे, तर वेदशास्त्राला नित्कृष्ट मानले नाही. तरीपण शास्त्रापेक्षा स्वानुभवाला महत्त्व दिले आहे.

**अवधूत मार्गीय गुरु :**

१) मोक्ष अपेक्षेने येणाऱ्या कोणाही व्यक्तीस जवळ करणारा. २) येणारा मुमुक्षू खरोखर वैराग्य भावनेने किंवा अंत:करणापासून मोक्ष अपेक्षणारा आहे किंवा कसे याचा ताबडतोब निर्णय घेतो. ३) अनन्य भावनेने शरण आलेल्यास आपलेसे करुन घेणारा ४) शिष्याकडून सेवेची अपेक्षा न करणारा ५) कुल, गोत्र, तरुण, वृध्द, गरीब, श्रीमंत, विद्यावंत किंवा अज्ञानी या कशाचाही भेद न करणारा ६) शिष्यांनी साधना करावी असा आग्रह न धरणारा

अवधूत सदगुरु साक्षात अग्निसारखा परमपावन आहे. आपल्याकडे ज्ञानापेक्षेने आलेली व्यक्ती ही गुरुरुप आहे अशी त्याची भावना असते. त्याच्या दृष्टीने सर्व मुक्त आहेत. ज्याप्रमाणे प्रज्वलित अग्नीमध्ये सुके अगर ओले लाकूड टाकल्यास ते तात्काळ अग्नीरुप होते तसे अनन्य भावनेने गुरुला शरण गेलेली व्यक्ती मुक्त होते.

**विधीनिषेध त्याग**

कोणत्या समाजात आपणास जीवन व्यतीत करावयाचे आहे. त्या समाजाचे नियम आचरणात आणणे, यात मानव गुरफटलेला असतो याला आपण विधी म्हणतो. श्री सदगुरुच्या अनुग्रहप्राप्तीमुळे आपली कर्तृत्वाभिलाषा नाहीशी होते. सर्वत्र सदगुरुला पहात सदैव चरम अवस्थेत, ब्रम्हानंद स्थितीत विधीची आवश्यकता रहात नाही. जे सोडावयाचे आहे, ते अगोदरच सोडल्यामुळे. निषेधाचा प्रश्नच येत नाही. पण हा विधीनिषेध त्यात फक्त प्राप्त पुरुष किंवा कृतकृत्य असणाऱ्यांना लागू पडतो. मात्र इतरांना हा स्मरणात ठेवणे आवश्यक ठरते.

टिपः– श्री संत एकनाथ महाराज, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्यानंतर या अवधूत संप्रदायावर श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांनी विस्तृत लिखाण व प्रसार केल्याचे दिसून येते,

## श्री दत्त संप्रदयातील थोर संत सत्पुरुष/योगी

श्री दत्त सांप्रदायाची ओळख करुन देणारा आद्य ग्रंथ म्हणजे ''श्री गुरु चरित्र.'' या गुरु चरित्राची रचना सरस्वती गंगाधरांनी केली. श्री नृसिंह सरस्वतींचे जे चार प्रमुख शिष्य होते त्या सायंदेवाचे पाचवे वंशज म्हणजे गंगाधर सरस्वती. श्री गुरुचरित्र हा दत्त सांप्रदायाचा वेदच मानला जातो. श्री गुरुचरित्राचे ५१ अध्याय असून, ५२ व्या अध्याय कळस अध्याय आहे. श्रीगुरु चरित्रात प्रामुख्याने श्री दत्तावतार चरित्र, श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांचे चरित्र अवतार, श्री नृसिंह सरस्वती अवतार चरित्र आहे. गुरुभक्ती हे या ग्रंथाचे सार आहे, मुख्य विषय आहे.

**१) श्री श्रीपाद श्रीवल्लभ : –** अनुसुया पोटी अवतार घेतलेल्या भगवान दत्तात्रेयांचा हा मनुष्य रुपातील पहिला अवतार. श्री गुरुचरित्राच्या ५ ते १० या अध्यायात या अवताराची माहिती आहे. श्री श्रीपाद श्रीवल्लभांचा काळ इ.स.१३२० ते १३५० असा आहे. त्यांचे जन्मस्थान पिठापूर होय. श्री आपळराज व सुमता या आपस्तंब शाखेच्या ब्राम्हण दांपत्य पोटी त्यांचा जन्म झाला. वयाच्या सातव्या वर्षी मौजीबंधना पर्यत त्यांचे वेद अध्ययन पूर्ण झाले होते. श्री दत्तात्रेयांच्या/अवधूतांच्या कृपेने श्रीपाद जन्मला हे त्यांच्या आई वडिलांना पूर्ण ज्ञात होते. वयाच्या सोळाव्या वर्षी श्री श्रीपाद श्री वल्लभांनी घर सोडले. बद्रीनाथ/केदारनाथ, काशी, जगन्नाथपूरी अशी अनेक तीर्थक्षेत्रे भ्रमण करुन ते गोकर्ण महाबळेश्वर येथे आले. तीन वर्षे गोकर्ण महाबळेश्वर येथे गुप्त वास करुन ते श्रीशैल्य या तीर्थक्षेत्रावर आले. श्रीशैल्य येथे चार महिने राहून ते कुरवपूर/कुरगड्डी कृष्णाकाठी आले. श्री गुरुचरित्रामध्ये या कुरवपूरचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**कुरवपूर महाक्षेत्र । कृष्णागंगा वाहे नीर ।**
**महिमा सांगता असे अपार । भूमंडळात दुर्लभ ।।**
**श्रीपाद राहिले कुरवपूरी । ख्याती झाली भूमीवरी ।**
**प्रगट महिमा अपरांपरी । सांगता विस्तार असे देखा।।**

**– श्री गुरुचरित्र**

श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज या पुढील अवताराशी संबंधित दोन घटना श्री श्रीपाद श्रीवल्लभ या अवतारात घडलेल्या आहेत. कुरवपूर येथे राहणाऱ्या वेदशास्त्र संपन्न ब्राम्हणाची अंबिका नावाची पत्नी व तिच्या मंदमतीच्या मुलाची कहाणी व श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांची भक्ती भावाने सेवा करणारा, त्यांच्या मठाची झाडलोट करणारा त्यांची छाटी/लंगोटी धुणारा रजक (धोबी) या दोन्ही घटना त्यांच्या पुढील अवतारात घडलेल्या आहेत. श्री श्रीपाद श्रीवल्लभ

हे अवधूत रुपात सर्वत्र संचार करीत. त्यांनी कुरवपूर क्षेत्री अश्विन वद्य १२ (गुरुद्वादशी) निजानंदी गमन केले.

श्री पीठापूर हे काकिनाडा / राजमहेंद्री रेल्वे स्टेशन जवळ आहे. आजही तेथे श्रीपाद आडनाव धारण करणारे श्री श्रीपाद श्रीवल्लभांचे ब्राम्हण वंशज आहेत. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज यांनी भगवान श्री दत्तात्रेयांच्या दृष्टांतानुसार या स्थानाचा शोध इ.स. १९०८ मध्ये लौकिक अर्थाने लावला, त्यांच्या जन्मस्थानी पादुका स्थापन करुन श्री दत्त संप्रदायाचा मार्ग तेथील लोकांना दाखविला.

**२) श्री नरसिंह सरस्वती दत्त महाराज :- (इ.स. १३७८ ते इ.स. १४५८ = ८० वर्षे)**

श्री श्रीपाद श्रीवल्लभांच्या नंतरचा म्हणजे दुसरा अवतार, उत्तर अवतार म्हणजे श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज होय. श्री श्रीपाद श्रीवल्लभ अवतारात श्री कुरवपूर क्षेत्री ज्या अंबिका नावांच्या विप्रस्त्रीला आशिर्वाद दिला होता. तीच विप्रस्त्री ''अंबा भवानी'' या नावाने कारंजा गावी वाजसनेय शाखेच्या ब्राम्हण कुळात जन्मली. कारंजा गावातील माधव नावांच्या शिवभक्त ब्राम्हणाशी अंबा भवानीचा विवाह झाला. विवाहा नंतर ती शनिप्रदोष व्रत करीत राहिली. सोळा वर्षाच्या या व्रताच्या तपानंतर तिच्या उदरी एक दिव्य बालक जन्मास आले. जन्मत:च हे दिव्य बालक ओमकाराचा उच्चार करु लागले. हे दिव्य बालक म्हणजेच श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज होय. त्यांचे जन्म नाव ''शालग्रामदेव'' जरी ठेवणेत आले तरी त्यांचे लौकीक नाव ''नरहरी'' हेच राहिले. गुरुचरित्रात त्यांचे पूर्ण आयुष्यांचे वर्णन पुढील प्रमाणे लहानपणीच वर्णिले आहे.

**कुमर होईल कारणिक पुरुषी । गुरु होईल सकळिका ।।**
**याचा अनुग्रह होईल ज्यासी । तो वंद्य होईल विश्वासी ।**
**याचे वाक्य होईल परीस । चिंतामणी याचे चरण ।।**
**अष्टै सिध्दीयाचे द्वारी । वोळंगत राहतील निरंतरी ।**
**नवनिधी याच्या घरी । राहती ऐक द्विजोत्तमा ।।**
**न होती यासी गृहिणी - सुत । पूज्य होईल त्रिभुवनात ।**
**याचे दर्शनमात्रे पतित । पूनित होतील परियेसी ।।**
**होईल हा अवतार पुरुषी । आम्हा दिसतसे भरंवसी ।**
**संदेह न धरावा मानसी । म्हणोनी करती नमस्कार ।।**

**- श्री गुरुचरित्र**

मौजीबंधना पर्यंत म्हणजे वयाच्या सातव्या वर्षापर्यंत नरहरी न बोलल्याने मुका मुलगा म्हणून

त्यांच्या आई वडिलांना खूप दु:ख झाले. व्रतबंधातील गायत्री मंत्राची दीक्षा मिळताच नरहरी च्या मुखातून वेदवाणी प्रकट होताच त्यांचे आई-वडिल, गुरुजन लोक चकितच झाले. त्यांचे मन आनंद व विस्मयाने भारावून गेले. श्री नरहरी हा अवतारच आहे असे सर्वांना वाटू लागले. नरहरी ने श्रीपाद श्रीवल्लभ या अवतारातील स्मरण आईला म्हणजे अंबा भवानीला करुन देवून वयाच्या आठव्या / नवव्या वर्षी बद्री / केदारकडे प्रस्थान केले. अनेक तीर्थयात्रा करुन ते काशीला विश्वनाथांजवळ स्थिरावले. मनकार्णिका घाटावर त्रिकाळ स्नान, विश्वेश्वरांची आराधना, पूजा अर्चा, साधूसंत, तपस्वींचा सहवास हाच त्यांचा नित्य नियम. या आठ/नऊ वर्षाच्या तेजस्वी बालकाची कीर्ती सर्व काशीत पसरली. शृंगेरी मठातील विद्यारण्य स्वामीच्या परंपरेतील एक यती संन्याशी श्री श्रीकृष्ण सरस्वती नरहरी या बालकाच्या आचरणाने भारावून गेले, स्तंभित होवून गेले व संन्यास धर्माची रक्षा करणेसाठी त्यांनी नरहरीला विचारणा केली.

**लोक अनुग्रहाकारणे । तुम्ही आता संन्यास घेणे ।**
**आम्हा समस्ता उध्दरणे । पूजा घेणे आम्हा करवी ।।**
**या कलीयुगी संन्यास म्हणोन । निंदा करती सकळै जन ।**
**स्थापना करणार कवण । न दिसती भूमीवरी ।।**

**- श्री गुरुचरित्र**

श्री श्रीकृष्ण सरस्वती यती या संन्याशाचे वय त्यावेळी ३०० वर्षाचे होते. त्यांनी नरहरी ला विधीपूर्वक संन्यास दिला व संन्यास दीक्षेनंतरचे नरहरींचे नाव ''श्री नृसिंह सरस्वती'' असे नामकरण केले. काशीत कांही काळ व्यतीत करुन अनेक शिष्यांसह ते बद्री केदारनाथाला गेले. गंगासागर, प्रयाग अनेक तीर्थस्थानावर जावून राहिले. प्रयाग तीर्थ येथे माधव नावांच्या ब्राम्हणाला संन्यास दीक्षा देवून त्याचे नाव माधव सरस्वती ठेवले. या प्रवासातील माधव सरस्वती, बाळकृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती, सिध्द सरस्वती या शिष्यांना घेवून ते दक्षिण भारताकडे वळले. वयाच्या आठव्या / नवव्या वर्षी श्री नृसिंह सरस्वतीनी कारंजा नगरी सोडली होती. वयाच्या तिसाव्या वर्षी ते आपल्या शिष्यांसह कारंजाला परत आले. त्यांचे तेजस्वी संन्यस्त जीवन पाहून त्यांचे आईवडील भारावून गेले. त्यांच्या पुर्नभेटीने आई-वडिलांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांचे चार भाऊ व एक बहिणही आपल्या ज्ञानसंपन्न / तेजसंपन्न थोरल्या भावाच्या सहवासाने भारावून गेली. कारंजातील सर्वजण कुतुहलाने, आनंदाने भारावून गेले. श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज कांही काळ कारंज्याला राहून त्या नगरीचा निरोप घेवून गोदावरी काठी नाशिक त्रंबकेश्वर येथे शिष्यांसह आले. तेथून ते मंजरिका गावी गेले. तेथे माधवारण्य मुनिना आत्मबोध करुन वासर ब्रम्हेश्वरला आले. वासर ब्रम्हेश्वरला त्यांनी कडघंची गावच्या सांयदेव नावाच्या ब्राम्हणाची पोटदुखी बरी केली. त्याला अभय दिले. सायंदेवाने बिदर बादशहाची नोकरी सोडून श्री नृसिंह सरस्वतींचे शिष्यत्व पत्करुन

सेवा पत्करली व पुढील प्रमाणे मागणे मागितले.

**माझे वंशपरंपरी । भक्ती द्यावी निर्धारी ।**
**इहसौख्य पुत्रपौत्री । उपरी द्यावी सद्‌गती ।।**
**ऐसी विनंती करुनी । पुनरपी विनवी करुणावचनी ।**
**सेवा करीतो द्वारयवनी । महाशूर क्रूर असे ।।**
**प्रतिसंवत्सरी ब्राम्हणासी। घात करीतो जीवेसी ।**
**याची कारणे आम्हासी । बोलिवतीसे मज आजी ।।**
**जाता तया जवळी आपण । निश्चये घेईल माझा प्राण ।**
**भेटी जाहलो तुमचे चरण । मरण कैचे आपणांसी ।।**

**– श्री गुरुचरित्र**

सायंदेवाला अभय वचन देवून श्री नृसिंह सरस्वती परळी वैजनाथ येथे झाले. तेथे त्यांना सिध्द सरस्वती लाभला. परळी वैजनाथ येथे ते गुप्तपणे एक वर्ष राहून औदुंबर–भिलवडी येथे आले. तेथे त्यांनी एक चातुर्मास पूर्ण केला. भुवनेश्वरी येथील देवीचे माहात्म्य वाढवून ते कृष्णा–पंचगंगा संगमावरील औरवाड (आमरापूर) गावी आले.

**शिवा भद्रा भोगावती । कुंभा नदी सरस्वती ।**
**पंचगंगा ऐसी ख्याती । महापातक संहारी ।।**
**ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचिया संगा ।।**
**प्रयागाहून असे चांगा । संगमस्थान मनोहर ।।**
**अमरापूर म्हणिजे ग्राम । स्थान असे अनुपम्य ।**
**जैसा प्रयाग संगम । तैसे स्थान मनोहर ।।**
**वृक्ष असे औदुंबरु । प्रत्यक्ष जाणा कल्पतरु ।**
**देव असे अमरेश्वरु । तया संगमा षट्‌कुळी ।।**

**– श्री गुरुचरित्र**

बारा वर्षे या तपोभूमीत श्री नृसिंह सरस्वतींनी तप केले, वास्तव्य केले म्हणून या स्थानाला नृसिंहवाडी हे नाव रुढ झाले. घेवड्याच्या शेंगाचा अध्याय व इतर अध्याय येथेच झाले.

औरवाड – नृसिंहवाडी येथील बारा वर्षांचा वास्तव्यानंतर श्री नृसिंह सरस्वती भीमा – अमरजा संगमावरील कर्नाटकातील गाणगापूर येथे आले. येथेही त्यांनी २३ वर्षे सिध्दजीवन व्यतीत केले.

**ऐसा संगम मनोहरु । तेथे वसती श्रीगुरु ।**
**त्रिमुर्तीचा अवतारु । गौप्य होय कवणापरी ।।**
**सहसा किरणे सूर्यासी । केवी राहे गौप्येसी ।**
**आपोआप प्रकाशी । होय सहज गुण तयाचा ।।**

**– श्री गुरुचरित्र**

रजक/बेदरचा बादशहा, कुमसी गावातील त्रिविक्रम भारती, ब्राम्हणांचे अध:पतन असे अनेक प्रसंग गाणगापूरला घडले. तेवीस वर्षांच्या गाणगापूर येथील वास्तव्यानंतर, श्री नृसिंह सरस्वती, सिध्द सरस्वती, सायंदेव, नंदी कवीश्वर, नरहरी कवीश्वर या चार शिष्यांसह श्री शैल्य शिव तीर्थस्थानी आले. श्रीशैल्य मल्लिकार्जुन येथील पाताळगंगेच्या पात्रात, कर्दळीची पाने, कमळांची पाने, शेवंतीच्या फुलांनी सजवलेल्या आसनावर बसून ते कर्दळी बनाकडे गेले. पाताळगंगेच्या पलिकडे श्री नृसिंह सरस्वती पोहचताच शेवंतीची फुले पाण्याच्या प्रवाहा बरोबर वाहत येवून अलिकडील काठावर उभे असलेल्या त्यांच्या चारी शिष्यांना ती प्रसाद म्हणून मिळाली.

**कन्यागती बृहस्पतीसी। बहुधान्य नाम संवत्सरेसी।**
**सूर्य चाले उत्तर दिगंतेसी । संक्रांती कुंभ परियेसी।**
**शिशिर ऋतु माघमासी । असित पक्ष प्रतिपदेसी ।**
**शुक्रवारी पुण्यदिवशी । श्रीगुरु बैसले निजानंदी।।**

**– श्री गुरुचरित्र**

वरील प्रमाणे नृसिंह सरस्वतींचा अवतार समाप्त झाला.

श्री गुरु नृसिंह सरस्वतींचे सदेह अवतार कार्य हे जवळ जवळ ८० वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर समाप्त झाले. श्री श्रीपाद श्रीवल्लभ व श्री नृसिंह सरस्वती यांच्या अवतार कार्यापूर्वी स्वतंत्र असा दत्त संप्रदाय अस्तित्वात नव्हता. स्वतंत्र श्री दत्त उपासना नव्हती. परंतु यांच्या जन्मानंतर, अवतारा नंतर श्री दत्त उपासना, श्री संप्रदाय पुन्हा जोमाने कार्यरत झाला, अस्तित्वात आला. त्यांनी पीठापूर, कुरवपूर, कारंजा, औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर व इतर स्थानांना आपल्या तपाने / सानिध्याने तीर्थक्षेत्र बनविले. श्री दत्तस्थाने बनविली. ही तीर्थक्षेत्रे त्यांच्या पाऊल खूणा आहेत. अनेकांनी या तीर्थक्षेत्रांना जावून, उपासना करुन श्री गुरु सेवा करुन आपले जीवन सफल केले आहे. तप-साधनेने देवत्व प्राप्त केलेले आहे. समाजाला आचारधर्म उपासना देवून सुख-समृध्दी सत्याचा मार्ग दाखविला आहे. श्री श्रीपाद श्रीवल्लभ व श्री नृसिंह सरस्वती यांच्या अवतार कार्यानंतरही या दत्त संप्रदयात अनेक मनुष्यदेही अवतार जन्मले,

तपोनिधी जन्मले व हा संप्रदाय सर्वार्थाने व्यापक, समृध्द होत गेला आहे. मुख्यत: हा संप्रदाय संपूर्ण महाराष्ट्र, गुजरातचा कांही भाग आंध्र-कर्नाटकचा भाग व्यापून राहिला आहे.

संत एकनाथांचे गुरु श्री जनार्दन स्वामी (इ.स.१५०४ ते १५७५) (दौलताबाद) श्री संत एकनाथ महाराज (इ.स. १५३३ ते १५९९ पैठण) श्री दासोपंत (इ.स. १५५१ ते १६१५ आंबेजोगाई) श्री निरंजन रघुनाथ (इ.स. १७८२ ते १८५५ मिरज) श्री नारायण महाराज जालवणकर (इ.स.१८०७ ते १८६७) श्री माणिकप्रभू (इ.स. १८१७ ते १८६५) (हुमणाबाद) श्री स्वामी समर्थ (इ.स. प्रकट दिन अश्विन शुध्द पंचमी १८५७ ते चैत्र वद्य त्रयोदशी १८७८ - अक्कलकोट) श्री वासुदेवानंद सरस्वती (इ.स. १८५४ ते १९१४ - गरुडेश्वर) श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर (इ.स. १८५७ ते १९०५ - श्री क्षेत्र पंतबाळेकुंद्री) श्री विष्णूदास (इ.स. १८४४ ते १९१७ - श्रीक्षेत्र माहूर) श्री साईबाबा (समाधी दसरा इ.स. १८१८ - शिर्डी) श्री गजानन महाराज (इ.स. प्रकट दिन २३/२/१८७८ ते ऋषिपंचमी १९१० शेगाव) श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज (इ.स. १८३६ ते १९०० - श्री क्षेत्र कोल्हापूर) असे अनेक थोर सत्पुरुष, थोर तपोनिधी श्री साक्षात्कारी सिध्द पुरुष या संप्रदायात होवून गेले. श्री दत्त संप्रदायात मुख्यत: महाराष्ट्रात वाढला, महाराष्ट्र केंद्र राहिले आहे.

## महाराष्ट्रातील इतर मुख्य संप्रदाय व श्री दत्तसंप्रदाय

### (१) नाथ संप्रदाय :-

श्री भगवान दत्तात्रेयाचेच दुसरे नाव अवधूत या अवधूतालाच नाथ संप्रदायात उपास्य देवता मानली आहे. भगवान शंकराइतकेच महत्त्व आहे. नाथ संप्रदायाला जोगी/योगी संप्रदायात म्हटले जाते. नाथ संप्रदायात दत्तात्रेय ही योगसिध्दी प्राप्ती करुन देणारी, सिध्दी प्राप्त करुन देणारी अवधूत अवस्था प्राप्त करुन देणारी देवता समजली जाते, नाथ संप्रदायात भगवान दत्तात्रेय-मच्छिंद्रनाथ-गोरक्ष नाथ यांची वर्णने नाथ संप्रदायाच्या लिखाणातून दिसून येतात. श्रीक्षेत्र गिरनार हे जसे श्री दत्तात्रेय तीर्थक्षेत्र आहे. तसे ते नाथ संप्रदायाचे तीर्थक्षेत्र आहे तर ''अवधूत गीता'' या ग्रंथाला या संप्रदयात अतिशय महत्व आहे. ''अवधूत गीता'' या ग्रंथात अवधूताची सर्व लक्षणे वर्णिली आहेत.

या संप्रदायाचा उगम इतर अनेक संप्रदायांप्रमाणे परमेश्वरांपासून झाला आहे असे दृष्टोत्पत्तीस येते. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेले ब्रम्हानंद आपल्या हठयोग प्रदीपिकेवरील टीकेत (१-५) म्हणतात की, ''आदिनाथ'' किंवा ''शिव'' हेच सर्वप्रथम नाथ असून, ह्या पंथाचे संस्थापक ''शिव'' म्हणजे प्रत्यक्ष शंकरच होत.

आदिनाथ: शिव: सर्वेषां प्रथमो नाथ: । (ततो) नाथसंप्रदा: प्रवृत्त इति नाथसंप्रदायिनो वदन्ती । ''यावरुन या पंथाला'' ''नाथसंप्रदाय'' असे संबोधीले जाते. तथापि वाड:मयात त्याचे

''सिध्दमार्ग'', ''अवधूतमार्ग'' असेही उल्लेख आहेत. या पंथाचे अनुयायी योगमार्गावर जास्त भर देतात यामुळे याला ''योगमार्ग'' असेही नामाभिधान दिलेले आढळते. कांही सांप्रदायिक ग्रंथातून याला ''सिध्दमत'', ''योगबीज'', ''योगसंप्रदाय'', ''अवधूतमत'', ''अवधूतसंप्रदाय'' अशीही नावे दिलेली आढळात आहेत.

संप्रदायातील प्रमुख पुरुष

**१. मत्स्येंद्रनाथ (शतक ९ वे, १० वे)**

मत्स्येंद्रनाथांसंबंधी देखील अनेक आख्यायिका प्रसिध्द आहेत. या आख्यायिकांनी व्याप्त असलेला त्यांच्या जीवनवृत्तांताचा इतिहास पाहून त्यासंबंधी काही निश्चित मते तयार करणे, इतिहासतज्ज्ञांनाही कठीण गेले आहे. मात्र नाथसंप्रदायाचे प्रथम आचार्य, गोरखनाथांचे गुरु, कौलाचाराचे सिध्द पुरुष व नेपाळी परंपरेप्रमाणे अवलोकितेश्वराचे अवतार, इ. त्यांच्या वर्णनासंबंधाने कोणाचे मतभेद असण्याचे कारण नाही. यासंबंधीच्या अनेक आख्यायिकांपैकी एकदोन प्रमुख पुढीलप्रमाणे आहेत.

क्षीरसिंधूच्या परिसरात शंकरांनी पार्वतीस गुह्यज्ञान सांगितले. मत्स्यरुपात वावरणाऱ्या मत्स्येंद्राने तो ''योगोपदेश'' ऐकला व तो ''निश्चलकाय'' झाला. शंकरांनी हे जेंव्हा पाहिले तेंव्हा त्यांनी त्या निश्चलकाय मत्स्यावर पाणी शिंपडून त्यास दिव्य मनुष्यरुप दिले तेंव्हापासून पुढे ''सिध्द मत्स्येंद्रनाथ'' प्रसिध्दीला आले.

२. ''आदिनाथ गुरु सकळ सिध्दांचा । मत्स्येंद्र तयाचा मुख्य शिष्य । मत्स्येंद्रांनी बोध गोरक्षासी केला । गोरक्ष ओळला गहिनीप्रत । गहिनीप्रसादे निवृत्ती दातार । ज्ञानदेवा सार चोजविले ।। ज्ञाने अभंग ; किंवा ''शिवशक्ती निमित्त दाऊन । उपदेशिले निजगुह्यज्ञान ।। निळोबा.

(१) ''कौलज्ञान-निर्णय'' हा ग्रंथ मत्स्येंद्रनाथांनी लिहीला असून या ग्रंथाच्या लिपीवरुन हा ग्रंथ ११ व्या शतकापूर्वी लिहीला गेला आहे, असे सिध्द होते.

मत्स्येंद्रांचा काल हा ९ व्या शतकाचा उतरार्ध किंवा १० व्या शतकाचा पूर्वार्ध असा येतो. महाराष्ट्रातील संतपरंपरे प्रमाणे ज्ञानेश्वरांचे आजे गोविंदपंत यांना गहिनीनाथांचा अनुग्रह व पणजे त्रिंबकपंत यांना गोरक्षनाथांचा अनुग्रह होता.

ज्ञानेश्वरांचा काल इ.स. १२७१ ते १२९६ असा आहे.

**मत्स्येंद्रनाथांची ग्रंथ रचना :-**

नाथसंप्रदायांतील या सर्वप्रथम नाथांच्या नावावर फारच थोडे वाड्:मय उपलब्ध आहे. त्यापैकी ''कौलज्ञाननिर्णय'' नावांचे एक पुस्तक असून, डॉ. बागची यांनी हे पुस्तक व इतर चार पुस्तके मत्स्येंद्रांनी लिहीलेली म्हणून प्रसिध्दीली आहेत.

**जालंधरनाथ**

हे मत्स्येंद्रनाथांचे गुरुबंधू होते. यांचा जन्म पंजाबमध्ये झाला. जालंधर नावावरुन ते जालंधरपीठामध्ये उत्पन्न झाले होते किंवा सिध्द होते. हठ-योगवरुन बंधप्रक्रियेमध्ये एक बंध उपलब्ध आहे. यास ''जालंदरबंध'' असे म्हणतात. तसेच दुसरा एक ''उड्डियानबंध'' म्हणून जो बंध आहे, त्याच्याशीही जालंधरनाथांचा संबंध होता.

**गोरक्षनाथ (१० ते ११ वे शतक)**

मत्स्येंद्रनाथांचे प्रमुख शिष्य ''गोरक्षनाथ'' होते. यांना ज्ञानेश्वरांनी १८ व्या अध्यायात गौरवाने संबोधिले आहे.

**तेणे योगाब्जिनी सरोवरु । विषयविध्वंसैक वीरु ।**
**तिये पदी कां सर्वेश्वरु । अभिषकिले ।। १८.१७५५ ।।**

त्यांनी दिलेल्या परंपरेनुसार म्हणजे मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ-निवृतिनाथ, याप्रमाणे गोरक्षनाथांचा काल बाराव्या शतकाचा मध्य येतो.

गोरक्षनाथांचे गुरुबंधू म्हणून चर्पटीनाथ, रेवानाथ, चौरंगीनाथ ह्यांची नावे आढळतात व त्यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये गहिनीनाथ, नागनाथ, भर्तृनाथ, माणिकनाथ व विलेशयनाथ यांचा आढळ होतो. तसेच ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरक्षांचा उपदेश मिळाला होता.

**गोरक्षनाथांचे ग्रंथ**

डॉ. हजारीप्रसाद व्दिवेदी यांनी एकूण २८ पुस्तकांचे कर्तेपण गोरक्षनाथांकडे दिले आहे. त्यातील अमनस्क, अमरौधशसनम्, गोरक्षपध्दती, गोरक्षसंहिता, सिध्दीसिध्दान्तपध्दती हे संस्कृत ग्रंथ अधिक महत्वपूर्ण आहेत. हिंदीमध्ये डॉ. बडथ्वाल यांनी ''गोरख बानी'' या नावाने जो ग्रंथ प्रसिध्द केला आहे. त्यात ४० हिंदी पुस्तकांचा उल्लेख असून त्यातही ''सबदी'' ''गोरखबोध'' इ. पुस्तके महत्वाची आहेत.

मराठीतही गोरक्षनाथांच्या नावावर काही ग्रंथ आहेत. त्यापैकी ''अमर-नाथ-संवाद'', ''गोरक्षगीता'' हे योगविषयक अनुभवाचे विवरण करणारे ग्रंथ आहेत. यातील ग्रंथाचे, ज्ञानेश्वरीतील व अमृतानुभवातील काही दृष्टांत-प्रमयांशी असणारे साम्य चटकन डोळ्यात भरण्यासारखे आहे. यावरुन हे दोन्ही महापुरुष एकाच पठडीतले असावेत असे वाटू लागते.

**गहिनीनाथ**

हे गोरखनाथांचे शिष्य व निवृत्तीनाथांचे गुरु होत. ज्ञानेश्वरांचे आजे गोविंदपंत व आजी निराबाई यांना गहिनी नाथांचा अनुग्रह होता. यांचा संचार महाराष्ट्रात होता ही गोष्टही निर्विवाद आहे व त्याच्या पुष्ट्यर्थ ब्रम्हगिरी पर्वतावरही गोदावरीच्या उगमाजवळ असणाऱ्या त्यांच्या

मठाचा नामनिर्देश करता येईल. निवृत्तीनाथांची व गहिनीनाथांची भेट ब्रम्हगिरी पर्वताच्या प्रदक्षणेच्या वाटेवर पडली होती व तेथेच निवृत्तीनाथांना अनुग्रह झाला. निवृत्तीनाथांनी आपल्या एका अभंगात गुरुपरंपरा सांगतांना गहिनीनाथांचे वर्णन केले आहे ते असे...

**आदिनाथ उमा बीज प्रगटले । मच्छिंद्रा लाभले सहजस्थिती ।। तेची प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ।। वैराग्ये तापला सप्रेमी निवाला । ठेवा जो लाभला शांतीसुख ।। निर्द्वंद्व नि:संग विचरतां मही। सुखानंद हृदयों स्थिरावला ।। विरक्तीचे पात्र अन्वयाचे सुख देऊनी सम्यक अनन्यता ।। निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण । कुळ हे पावन कृष्णनामे ।।**

## गोरक्षसमकालीन सिध्द :

**चर्पटीनाथ –** यांनी एका गाण्यात बाह्यचारांवर भर देणारे जे इतर संप्रदाय आहेत, त्यांची व्यर्थता सांगितली आहे. ज्या वेळी काळाची छाया मनुष्यावर पडू लागेल त्यावेळी पांढरे किंवा निळे वस्त्र, लांब जटा  किंवा तिलक हे उपयोगी पडणारे नाहीत. कानफाट्यांना ते सांगतात–

**इका सेती पटा इक नीलि पटा, इक तिलक जनेऊ लंबी जटा ।**
**इका फीए इक मानो इक कानिफटा, जब आवैगी कालिघटा ।।**

**चौरंगीनाथ**

हे तिबेटी परंपरेने गोरक्षनाथांचे गुरुबंधू म्हणून मानले गेले आहेत.

''प्राणसंकली'' नावाचे पुस्तक यांनी लिहीले असावे असे मानतात. सावत्र आईने यांचे हात–पाय कापून यास एका विहीरीत टाकून दिले. पंजाबमध्ये प्रसूत असलेल्या दंतकथेप्रमाणे यांची कथा व पूरन भगताची कथा या एकच होत. ज्ञानेश्वर महाराजांनी या ''भग्नावयवी चौरंगीनाथा'' स मत्स्येंद्रनाथ सप्तश्रुंगी गडावर भेटले होते. असा उल्लेख केला आहे (अध्याय १८.१७५३)

**नागार्जुन**

नागार्जुनांच्या बाबतीत निश्चितपणे सांगता येण्यासारख्या गोष्टी म्हणजे (१) नागार्जुन हे रसेश्वर सिध्द होते. (२) गोरखपंथाच्या ''पारसनाची शाखे'' चे प्रवर्तक नागार्जुन होते व (३) पश्चिम भारतात ते राहत होते. त्यांच्यानंतर होऊन गेलेले योगी लोक त्यांना ''नागा अरजंद'' असे म्हणत असत. नाथपंथाच्या बारा आचार्यात यांची गणना आहे.

यावरील तीन सिध्दांपेक्षा आणखी एकवीस मंडळींची नावे गोरक्ष समकालीन म्हणून उपलब्ध आहेत. ती येणेप्रमाणे

१. चामरीनाथ, २. ततिपा, ३. दारिपा, ४. विरुपा, ५. कामरी, ६. कनखल, ७. मेखल, ८. धोबी, ९. अतिती, १०. चंपक, ११. ढेण्टस, १२. चुणकर, १३. भादे, १४. कामरी,

१५. धर्ममापतंग, १६. भद्रवा, १७. सबर, १८. सान्ती, १९. कुमारी, २० सियारी, २१. कमलकगरी.

**नाथपंथातील पोटभेद**

या पंथामध्ये प्रथम योगाचरणावर फार भर दिला जात असे; परंतु कांही कालानंतर योगचरणाऐवजी बाह्यचारांवर भर देणारी मंडळी जास्त आढळू लागली व ह्या आचारानुसार या नाथपंथाला कांही लहान-मोठे फाटे फुटू लागले. यातील प्रमुख कानफाटे, अवधूत, जोगी इत्यादी नामनिर्देश करता येईल.

**१) कानफाटे –** नाथपंथाच्या योगमार्गी ओघाला फुटलेला हा एक फाटा आहे. याची संघटना धर्मनाथांनी १४ व्या शतकामध्ये केली आहे. या उपपंथाचे लोक कान विदीर्ण करुन त्यांत कुंडले घालतात. म्हणून त्यांना ''कानफाटे'' हे नाव मिळाले आहे. ''कानफाटे'' हे नाव तुच्छतादर्शक म्हणून या योगी लोकांना मुसलमानांनी दिले असेही कांही लोकांचे म्हणणे आहे. या लोकांची बाह्याचिन्हे म्हणजे कानातील मुद्रा (कुंडले), शैली, शृंगी, कंथा, झोळी ही आहेत व ते अंगास भस्मही फासतात. त्याचप्रमाणे अन्नग्रहणाच्या वेळी पुंगी वाजवून ते अन्नग्रहण करतात. कानफाटे गोसावी हे ठिकठिकाणी, निरनिराळ्या प्रांतात भिक्षा मागतांना आढळतात. मुंबई व बेळगाव याकडील कानफाटे आणि काठेवाडा व कच्छ यामधील कानफाटे यांच्यात फरक म्हणजे मुंबई-बेळगांवकडील कानफाटे हातात भिक्षेच्या वेळी एक त्रिशूळ घेतात. जे कानफाटे हातात डौर, म्हणजे डमरू बाळगतात; त्यांनी ''डौरी गोसावी'' असे म्हणत. यांच्यामध्ये ''हठयोग-प्रदीपिका'' या ग्रंथास फार महत्व आहे.

ज्ञानेश्वरानंतरच्या संतमंडळीतही या कानफाटे पंथाबद्दल सहानुभूती उरलेली दिसत नाही. तुकारामांनी तर आपल्या परखड बोलीत त्याचा स्पष्टच निषेध केला आहे.

**कान फाडुनिया मुद्रा ते घालिती । नाथ म्हणवितो जगामाजी ।।**
**घालोनिया फेरा मागाती द्रव्यासी । परी शंकरासी नोळखिली ।।**
**पोट भरावया शिकतो उपाय । तुका म्हणे जाय नरकलोका ।।**

सारांश, कानफाटे पंथ हा मूळ शुध्द योगमार्गी नाथपंथास फुटलेला एक फाटा असून, बाह्यचारांवर भर देणारा आहे.

**२) अवधूत –** हा देखील मूळ नाथपंथास फुटलेला दुसरा एक फाटा आहे. या संप्रदायाचे लोक जितकी कमी वस्त्रे वापरता येतील जितकी कमी वापरतात. उघड्या अंगांना माती फासतात व जटा वाढवितात. गोरक्षनाथांना ते आपले गुरु मानतात. ''गोरखबोध'' व ''गोरखनाथकी गोष्टी'' या ग्रंथातून गोरखनाथांना अवधूत हे उपपद लावलेले आढळून येते. '' अवधूत या शब्दाचा अर्थ'' ''जात गोत फेकून दिलेला पुरुष '' असा आहे.

**३) जोगी –** हे लोक हिंदूस्थानात सर्व देशात, प्रदेशात आढळतात. हे लोक मठ करुन राहतात. तर कांही फिरस्तीवर असतात. ते स्वत:ला नाथ म्हणून शिवाचा अवतार जो ''गोरक्षनाथ'' त्याचे आपण वंशज आहोत असे म्हणवतात. जोगी पुरुषांच्या गळ्यात पितळेची, तांब्याची किंवा चांदीची पुंगी असते तिला सिंगी म्हणतात.

**नाथसंप्रदायाची पवित्र स्थाने**

**उत्तरेस नेपाळ –** काश्मिरपासून दक्षिणेस रामेश्वरापर्यंत ही स्थाने व मठ मंदिरे विखुरलेली आहेत. त्यातील त्र्यंबक मठ (नाशिक), पांडुधूनी (मुंबई), बत्तीसशिराळे (सांगली), पैठण (औरंगाबाद), गंभीर मठ (पुणे), वृध्देश्वर (नगर), आळंदीजवळील डुडूळगाव येथील अडबंगनाथ मंदिर (पुणे), केंन्दूर (पुणे) व सासवड जवळील दिवे घाट (पुणे) इ. ठिकाणे या संप्रदायाच्या अस्तित्वाच्या खुणा दर्शविणारी आहेत.

अशा रीतीने उत्तर हिंदुस्थानात उगम पावून दक्षिणेकडे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणादि भागात संचार करुन पुन:श्च उत्तर हिंदुस्थानात स्थिरावलेला हा नाथसंप्रदाय दक्षिणेत का रुजू शकला नाही ? याची प्रमुख एकदोन कारणे सांगता येतील. पहिले म्हणजे या नाथसंप्रदायात बाह्यचारांवर पुढे पुढे भर दिला गेल्यामुळे मूळ शुध्द योगाभ्यासाचा अनुभव व बोध मागे पडून सांप्रदायिकांमध्ये विकृती उत्पन्न झाली आणि दुसरे या पंथाचा प्रवाह दक्षिणेत झुळू झुळू वाहू लागतो तोच त्यास ''वारकरी पंथा''च्या प्रवाहात श्री संत ज्ञानेश्वरांच्यामुळे विलीन व्हावे लागले.

**(२) महानुभवी संप्रदाय :–**

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या आगोदरचा मोठा संप्रदाय. हा संप्रदाय श्री दत्तात्रेयालाच प्रमुख देवता, आराध्य दैवत मानतो. हा संप्रदाय श्री दत्त संप्रदायच आहे. या संप्रदायाची गुरु परंपरा श्री दत्तात्रेय – चांगदेव राऊळ – गुंडम राऊळ – चक्रधर अशी आहे. या महानुभवी संप्रदायाचा श्रीदत्त एकमुखी, चतुर्भुज आहे. श्री दत्तात्रेय नेहमी नाना वेष, रूप धारण करुन सिध्द लोकांना दर्शन देतात, त्यांची वाणी अमृतवर्षिणी आहे. सर्व युगात त्यांचा अखंड संचार चालू आहे. माहूरगड, पांचाळेश्वर, फलटण ही या संप्रदायाची मुख्य तीर्थक्षेत्रे आहेत तर श्री. चक्रधरस्वामींनी लिहलेला ''लिळाचरित्र'' हा मुख्य ग्रंथ आहे.

प्रचीन काळात श्री नाथ संप्रदाय व श्री महानुभव संप्रदायाचे प्राबल्य सर्व भारतभर होते. महानुभव संप्रदाया बरोबरच श्री दत्त संप्रदायाचा प्रसार / प्रचार / श्री दत्त उपासना महानुभव संप्रदायाने भारतभर वाढविली. कांहीच्या मते आयुष्यात काही ना काही गमावल्या नंतर बाकी उरतो तो अनुभव आणि अशा सर्व थोरा मोठ्यांचा मिळून जो महान अनुभव मिळतो तो मिळण्याचा मार्ग महानुभव पंथातून शिकायला मिळतो. तेराव्या शतकात महाराष्ट्र यादवांच्या

राजवटी खाली स्वराज्याचे सुख भोगीत होता. हे राजघराणे धर्म अभिमानी असून, हेमाद्रीसारख्या धर्म पंडितांच्या मार्गदर्शनाने चालणारे होते. नाना प्रकाराची देव-दैवते, व्रतवैकल्ये, मंत्रस्त्रोत्र इत्यादीचा सुकाळ होवून सर्वत्र सकाम भक्तीचे बंड, वारे माजले होते. त्यातच महाराष्ट्रात उदयाला आलेला महानुभव पंथ हा एक हिंदू धर्मांतर्गत संप्रदाय असून त्याचा प्रसार एकेकाळी काबूल - कंदाहार पर्यंत झाला होता. महानुभव पंथ महाराष्ट्रात याच नावाने परिचित असला तरी, त्याला महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग, परमार्ग या नावाने सुध्दा ओळखले जाते. सृष्टीमध्ये परमेश्वराशिवाय दुसरा कोणीच उध्दार करु शकत नाही. हा सिध्दांत या पंथाचा मूळ पाया असून, सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी या पंथाचे संस्थापक आहेत.

महाराष्ट्राचा स्वाभिमान धारण करणारा, मराठी भाषेचा कैवार घेणारा आद्य संप्रदाय म्हणजे हा महानुभव पंथ. मराठी साहित्याचं अपूर्व लेणं या पंथाने साकारले आहे. मराठी भाषेला सर्वतोमुखी, सर्वतोपरी शृंगारित करण्याचे कार्य या पंथाने केले आहे. श्री चक्रधर स्वामींनी महाराष्ट्र भूमीचा केलेला गौरव व मराठीचा धरलेला आग्रह एकमेवाद्वितीय असा आहे. महाराष्ट्राचा भूगोल सांगणारा, मराठीचा इतिहास रचणारा हा पंथ खऱ्या अर्थाने राजधर्म आहे. त्याकाळी लोकव्यवहाराच्या भाषेत कुठलंही ज्ञान उपलब्ध नसणे व ज्ञानाची भाषा संस्कृत असणे ही मुख्य अडचण सर्वसामान्यांना यायची. या सर्व मर्यादा, अतिक्रमण, सर्वसामान्यांना लोकव्यवहाराच्या मराठी भाषेत निर्भीडपणे ज्ञान श्री चक्रधरांनी लोकांना वाटले. स्त्री शूद्रादिंना ज्ञानांची दारे उघडून दिली. संस्कृतच्या प्रचंड दडपणाखाली वावरणाऱ्या ज्ञानाला श्री चक्रधरांनी मराठी भाषेचा लगाम लावला.

महानुभव संप्रदायाचा मूळ ग्रंथ लीळाचरित्र हा मराठी सारस्वताचे अलौकिक लेणे आहे, अनमोल ठेवा आहे. लीळाचरित्र हा मराठी भाषेतील आद्य ग्रंथ आहे. या ग्रंथाला ''सातैरुप चरित्रे'' ''असेही म्हणतात. या चरित्रात श्री चक्रधर स्वामींच्या उत्तरार्ध, पूवार्ध, अज्ञात चरित्र बरोबरच सह्याद्रीच्या लीळा (श्री दत्तात्रय चरित्रे), कापारीच्या लीळा (श्रीकृष्ण चरित्रे), द्वारावतीच्या लीळा (श्री चक्रपाणी चरित्रे), रिध्दपुरच्या लीळा (श्री गोविंदप्रभू चरित्रे) यांचा समावेश आहे. बाराव्या शतकात जीवांच्या उध्दारासाठी रिध्दपूरला जावून, राजवैभवाचा त्याग करुन परमेश्वर अवतार श्री गोविंदप्रभू यांच्याकडून ज्ञानशक्तीचा स्वीकार चक्रधरांनी केला. या पंथातील पंचकृष्ण अवतारापैकी श्री चक्रधर स्वामी पाचवे ईश्वर अवतार होय.

बाराव्या शतकात यादवांची राजवट चालू होती. तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा विचार करता चार्तुवर्ण्याच्या वर्चस्वामुळे समाज आतून खिळखिळा झाला होता. धर्म तत्वज्ञान हे संस्कृत भाषेच्या कडी-कुलूपात बंद होते. अशा परिस्थितीत श्री चक्रधर स्वामींनी या महानुभव पंथाची स्थापना केली. अस्पृशता निवारण, मराठी भाषेचा पुरस्कार, ज्ञानभक्तीने परमेश्वर प्राप्ती. ईश्वरतत्वाची प्रचिती, विषमतेवर प्रहार, शांतीचा संदेश हे मुख्य कार्य श्री चक्रधर

स्वामींनी मुख्यत: जनसामान्यात केले. तसेच सर्व वर्गाकरीता उपदेशाची द्वारे खुली केली. मराठीला धर्म भाषेचे अधिष्ठान मिळवून दिले.

**(३) वारकरी संप्रदाय :–**

श्री संत ज्ञानेश्वरांची गुरु परंपरा श्री नाथ संप्रदायाची जरी असली तरी, श्री संत ज्ञानेश्वरांनी श्री वारकरी संप्रदायाला नवसंजीवनी देवून वारकरी संप्रदाय वाढवून वारकरी संप्रदायाचा गौरव वाढविला. श्री ज्ञानेश्वरांनी रचलेल्या श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभव मधून श्री दत्तात्रेयांचा उल्लेख आढळून येत नाही. परंतु त्यांच्या अभंग गाथेतील एका अभंगावरुन त्यांची श्री दत्तात्रेयावरील उत्कृष्ट श्रध्दा व भक्ती दिसून येते. तो अभंग खालील प्रमाणे

**पैल मेरुच्या शिखरी । एक योगी निराकारी ।**
**मुद्रा लावूनी खेचरी । ब्रम्हपदी बैसला ।।१।।**
**तेणे सांडिली माया । त्यजियली कंथाकाया ।**
**मन गेले विलया। ब्रम्हानंदामाझारी ।।२।।**
**अनुहतध्वनी नाद । तो पावला परमपद ।**
**उन्मनी तुर्या विनोदे । छंदे छंदे डोलतूसे ।।३।।**
**ज्ञान गोदावरीच्या तिरी । स्नान केले पांचाळेश्वरी ।**
**ज्ञानदेवाच्या अंतरी । दत्तात्रेया योगिया ।।४।।**

श्री संत ज्ञानेश्वरांनी श्री नवनाथ संप्रदाय व श्री वारकरी संप्रदाय एकत्र आणला तसा श्री संत ज्ञानेश्वरांच्या नंतर श्री क्षेत्र पैठणचे शांतीब्रम्ह संत श्री एकनाथ महाराजांनी श्री वारकरी संप्रदाय व श्री दत्त संप्रदाय एकत्र आणला. श्री वारकरी संप्रदायाची मुख्य उपास्य देवता जरी श्री विठ्ठल असली तरी श्री दत्त उपासानाही श्री वारकरी संप्रदायाचा हिस्सा बनली आहे.

श्री संत एकनाथ महाराज श्रेष्ठ दत्त उपासक होते. त्यानींच रचलेली ''त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा'' ही आरती श्री दत्त उपासनेत प्रमुख मानली आहे. श्री एकनाथांची गुरु परंपरा ही मुस्लिम धर्माचा अंग असलेल्या सूफी संप्रदायाची आहे. श्री संत एकनाथ महाराज हे श्री वारकरी संप्रदाय व श्री दत्त संप्रदयात आनंदाने नांदले. श्री विठ्ठल देवता व श्री दत्तात्रेय देवता यात त्यांना कांहीच भेद दिसला नाही. श्री संत एकनाथांनी भागवता वर टीका लिहिली, मोठी अभंग रचना केली.

''श्री दत्त महिमा'' ''श्री दत्त मानसपूजा'' ''श्री दत्त जन्मावरील ६७ ओव्यांचे आख्यान'' या रचनेतून त्यांची श्री दत्तभक्ती प्रकर्षाने प्रकटली आहे.

श्री संत एकनाथांच्या नंतर श्री वारकरी संप्रदायातील प्रमुख संत जगद्‌गुरु श्री तुकाराम

महाराजांनी खालील अभंगातून श्री दत्त भक्ती प्रकट केली आहे.

**(१) तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ।।१।।**
**काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ।।२।।**
**माथा शोभे जटाभार । अंगी विभुती सुंदर ।।३।।**
**शंख चक्र गदा हाती । पायी खडावा गर्जती ।।४।।**
**तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ।।५।।**
**(२) नमन माझे गुरुराया । महाराजा दत्तात्रेया ।।१।।**
**तुझी अवधूत मूर्ती । माझ्या जीवाची विश्रांती ।।२।।**
**जीवीचे साकडे । कोण उठविल कोडे ।।३।।**
**अनुसया सुता ।। तुका म्हणे पाव आता ।।४।।**

याशिवाय ''श्री दत्तप्रबोध'' लिहणारे कावडीबोवा, श्री निंबराव दैठणकर, श्री ज्ञानेश्वरांची मानसकन्या विर्दभातील अंध संत श्री गुलाबराव महाराज या वारकरी संप्रदायातील महान संतांनी आपल्या साहित्य रचनेत / अभंगात श्री दत्त भक्ती गायली आहे. श्री तुकाराम महाराजांची गुरु परंपरा ही चैतन्य संप्रदायाची असून, राघव चैतन्य - केशव चैतन्य - बाबाजी चैतन्य - श्री तुकाराम अशी गुरु परंपरा आहे. चैतन्य संप्रदायाची मुख्य उपास्य देवता श्री दत्तात्रय / अवधूत हीच आहे.

मराठी समाजामध्ये, संस्कृतीमध्ये, भाषेमध्ये संत साहित्याला विशेषत: वारकरी संप्रदायाच्या संत साहित्याला विशेष महत्त्व आहे. संत साहित्याने मध्ययुगीन मराठी समाजाला जे विचारबळ व भावनाबळ देण्याचे ऐतिहासिक कार्य केले, ते कार्य या साहित्यामधून आजही होत आहे. मध्ययुगीन काळापासून महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाचे जे योगदान पाहवयास मिळते ते आजही महत्त्वाचे म्हणता येते. वारकरी संप्रदायास जी उंची व खोली प्राप्त झाली आहे तिच्या मागे या संप्रदायामधील संत साहित्याचा वाटा मोठा आहे. महाराष्ट्रातील अन्य संप्रदायाशी तुलना केल्यानंतर ही गोष्ट स्पष्ट होते. वारकरी संप्रदायातून उगम पावलेली वारकरी काव्यपरंपरा सदैव चैतन्याने बहरलेली दिसते. संत जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई आदिंनी आपल्याला विठोबांच्या भावबंधनात अनेक पातळ्यावर बांधून घेतले आहे. वारकरी संप्रदायाच्या आजच्या स्वरुपामागे संत ज्ञानदेवांचे क्रांतीदर्शी, समाजचिंतक, प्रतिभा संपन्न साहित्यिक व आत्मनुभावी श्रेष्ठ संतत्वचे व्यक्तिमत्व उभे आहे. या महाराष्ट्र भूमीत साधुसंताच्या विचारातून अनेक संप्रदाय निर्माण झालेले आहेत. पण विठ्ठल या दैवताचा व वारकरी संप्रदायाचा या भूमीशी व मराठी भाषेशी जसा व जितका दृढत्तम संबंध जुळला गेला तसा इतर संप्रदायामध्ये प्रभावीपणे दिसत नाही. याचे सर्व श्रेय संत श्री ज्ञानेश्वरांना द्यावे लागते. संत नामदेवांच्या समाधीनंतर दोनशे वर्षे

दु:खाच्या सागरात सापडलेल्या समाजास आपल्या रसाळ वाणीने आणि कल्याणकारी चारित्र्याने पुन्हा उभा करणारे शांतीब्रम्ह संत श्री एकनाथ महाराज हे वारकरी संप्रदायातील थोर युगप्रर्वतक संत होते.

''संत'' या संकल्पनेचा पहिला ढसढसीत उच्चार मराठीत संत मुक्ताबाईंच्या ''ताटीचे अभंग '' मधून झालेला दिसतो. संत ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, निळोबा, बहिणाबाई यासारख्या संतांच्या अंगातून संतलक्षणे समोर येतात. श्री पंढरपूर क्षेत्रीचे श्री विठ्ठल हे उपास्य दैवत, नामस्मरण हे साधन, व्यक्तिमत्वाची शुध्दता, गुणसंपन्नता, आत्मोध्दाराबरोबर लोकउध्दाराची आस हीच ती संतलक्षणे होय. ''संत'' ही पदवी अध्यात्म क्षेत्रातील अत्यंत उच्च कोटीची अवस्था दर्शविणारी आहे. तर संत साहित्य / अभंग रचना ही लोकभाषेतून, लोकछंदातून अवतरली. त्यामुळे संत रचनेचा / अभंग रचनेचा प्रभाव व्यापक जन जीवनावर साडे सातशे – आठशे वर्षाहून अधिक काळ टिकला.

संत साहित्याने जनसामान्यांचे जीवन त्यातील दु:खासह स्वीकारले व त्याला उन्नत रुप दिले. म्हणून आजही खेड्यापाड्यात संत साहित्य / अभंग कालच्या इतकेच आजही जिवंत आहेत. किंबहुना ते ''महाराष्ट्र वेद'' आहेत. म्हणूनच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा सर्वात जास्त प्रभाव, व्याप्ती आहे. म्हणून आजही लाखोंच्या संख्येने दिंड्या श्रीक्षेत्र पंढरपूरला जातात. या वारकरी संप्रदायाची / पंथाची महाराष्ट्रात तेराव्या शतकात स्थापना झाली. या वारकरी संप्रदायातील संतांनी मराठी भाषेविषयीचा न्यूनगंड झटकून टाकला. मराठीचा, मराठी भाषेचा, मायबोलीचा गौरव करुन ब्रम्हविद्येचा सुकाळ केला. मराठीची अस्मिता जपतांना, जगवितांना, संस्कृतच्या श्रेष्ठतेचे दडपण आपल्यावर येवू दिले नाही. संस्कृत भाषेचे दडपण झुगारुन दिले व संस्कृत भाषेचे ज्ञान भांडार स्वयंप्रज्ञेने मराठीत आणले. मराठीची निवड केली ती लोकसंवादासाठी.

अहंकार सोडून कर्मे करावीत, इतरांच्या आनंदात आपला आनंद मानावा, समत्वबुध्दी, करुणा, निष्काम भावनेने काम इत्यादी उद्देश त्यांनी आपल्या अभंगातून मराठीतून सोप्या भाषेतून केला. या संतानी जडापेक्षा चैतन्याला अधिक मौल्यवान मानले. मराठी जीवनात सहजपणे अविष्कृत होणारा कृतिशील शक्तीस्त्रोत म्हणून या वारकरी संप्रदायाने भूमीका बजावली आहे. वारकरी संप्रदायाचा भागवत धर्मच स्थायीभाव झाला आहे. म्हणूनच श्रीकृष्ण भगवंताला ''श्री विठ्ठल'' अवतार मानले आहे. श्री संत ज्ञानेश्वरांनी महाभारतातील संपूर्ण कथाभाग वगळून त्याचे जणू सारच असणाऱ्या भगवद् गीतेवर भाष्य केले. म्हणून हा भागवत धर्म आहे. श्री संत ज्ञानेश्वरांनी ''ज्ञानेश्वरी''च्या रुपाने एका नव्या परिपूर्ण जीवन कलेचाच परिचय अवघ्या मानव समाजाला करुन दिला. ज्ञानेश्वरीची निर्मिती म्हणजे ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदाय प्रस्थापनेची सर्वांग परिपूर्ण अशी केलेली जणू पूर्व तयारीच. त्यामुळेच स्वतंत्र तत्वज्ञान सांगण्याचा अभिनिवेश प्रगट न करणारे, गीतेच्या आधारे चालणारे ज्ञानेश्वर खऱ्या

अर्थाने नवीन तत्त्व प्रणाली म्हणजेच नवा जीवन विषयक दृष्टीकोन देवून जातात. भक्तीचा मळा फुलविणारा, वेदप्रामाण्य परंपरा जतन करणारा, संस्कृतीचे संवर्धन करुन भेदाभेद विसरावयास वारकरी संप्रदाय श्री संत ज्ञानेश्वरांनी मुख्यत: चैतन्यमय बनविला. म्हणूनच आज साडे सातशे वर्षानंतरही तो महाराष्ट्र जीवनाचे मुख्य अंग बनून राहिला आहे.

१) प्रतिक - तुळशीमाळ, गोपीचंदन टिळा

२) उपास्य दैवत - श्री विठ्ठल

३) नित्य संध्या - पांडुरंग पूजा, हरिपाठ

४) ग्रंथ पठण - श्री ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, नाथ भागवत

५) जपमंत्र - रामकृष्ण हरि

६) ध्वज - भगवी पताका

७) वाद्ये - टाळ, मृदंग,वीणा

८) तत्वे - सत्य, अहिंसा, सेवा, त्याग, दया, क्षमा, शांती, नैतिकता

९) उपवास - एकादशी व्रत

पंढरीच्या विठ्ठलाची भेट हे वारीच्या अत्युच्च सुखाचे आनंदाचे भरती आणणारे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, गुजरात, मध्यप्रदेश, किंबहुना भारत देशातून येणाऱ्या वाऱ्यांचे, दिंडीचे पंढरी हे केंद्र आहे. पंढरीचा विठ्ठल म्हणजे शैव अन वैष्णवांचा महासमन्वय साधणारा केंद्रबिंदू होय. श्री संत ज्ञानेश्वरांनी आळंदीहून श्री पंढरपूरला पहिली दिंडी नेली. त्यानंतर संत नामदेव, संत तुकाराम व इतर संतांनी ही आषाढी - कार्तिक वारीची परंपरा चालू ठेवली. या दिंडी परंपरेत पुरुषां इतकेच महिलांना स्थान आहे. वारकरी संप्रदाय हा वैष्णव मार्ग आहे. म्हणजे त्यात भगवान विष्णूची पूजा केली जाते.

या संप्रदायात भक्ती सुखासाठी मुक्तीचे सुखही नाकारले आहे. सर्वच संतानी सद्गुरु सेवेचे महात्म्य गायले आहे. म्हणून वारकरी संप्रदाय हा गुरुमार्गच आहे. वारकरी संप्रदाय हा नाथ संप्रदयातूनच निघाला असल्याने तो गुरुमार्ग आहे. चैत्र, आषाढ, कार्तिक, माघ या महिन्यातील वाऱ्यांना जास्त महत्त्व आहे.

समाज उन्नतीसाठी तेराव्या शतकापासून साधू संतांनी जे प्रयत्न केले आहेत. त्यात स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. संत संप्रदायाचे नीती नियम स्त्री संतांनी आत्मसात करुन वारकरी संप्रदायाचा धर्म, विचार धर्म, साधना, उपासना, अध्यात्म, तत्वज्ञान आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे. बहिणाबाईंनी विपुल अभंग रचना केली आहे. खालील अभंगातून त्यांनी वारकरी संप्रदायाची इमारत सिध्द केली आहे.

**संतकृपा झाली इमारत फळा आली**
**ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया**
**नामा तयाचा किंकर तेणे रचिले ते आवार**
**जर्नादन एकनाथ खांब दिला भागवत**
**तुका झालासे कळस भजन करा सावकाश**
**बहेणी म्हणे फडकती ध्वजा निरुपण केले ओजा**

तर खालील अभंगात संत जनाबाईने ईश्वराशी असलेला जिव्हाळा, सेवाभाव व्यक्त केला आहे.

**झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी**
**पाटी घेवूनी डोईवर । नेऊनिया टाकी दूर**
**ऐसा भक्तीसी भुलला । नीच कामे करु लागला**
**जनी म्हणे बा विठ्ठला । काय उतराई होऊ तुला**

संत जनाबाईने पांडुरंगाशी जोडले ते प्रेमभक्तीचे नाते. हीच प्रेमभक्ती वारकरी संप्रदयाच्या विकासाला उपकारक ठरली. खालील अभंगातून आत्यंतिक भावबळावर विठ्ठलाला तिने अंकित करुन घेतले होते असे दिसून येते.

**धरीला पंढरीचा चोर । गळा बांधूनीया दोर**
**हृदय बंदीखाना केला । आत विठ्ठल कोंडीला**
**शब्दे केली जडाजुडी । विठ्ठला पायी घातली बेडी**
**सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला**
**जनी म्हणे बा विठ्ठला । जीवे न सोडी मी तुला**

वारकरी संप्रदायाच्या वाटचालीत निवृत्तीनाथ - ज्ञानदेव यांच्या बरोबरीचे स्थान संत मुक्ताबाईंना मिळाले आहे. संत मुक्ताबाईंच्या अभंगात मातृत्व, वात्सल्य, ममत्व यांच्यासह अध्यात्म दर्शन घडते. समाजाच्या दारुण विद्रोहाला तोंड देण्यास मुक्ताबाईंने पुढाकार घेतला. समाजाने वाळीत टाकले, ब्रम्हवृंदाने तिरस्कार केला, धर्म मार्तंडांनी बहिष्कृत केले. झिडकारले, दारिद्र्याने पाठ सोडली नाही अशा आपत्तीत मुक्ताबाईने आपल्या भावंडांची प्रतिभा ज्योत विझू दिली नाही. ताटी लावून बसलेल्या ज्ञानेश्वरांना तिने लहान असून उपदेश केला. आपल्या भावंडाची जबाबदारी स्वीकारली, धर्म कीर्तनासाठी त्यांना सज्ज केले. पतित, भ्रष्ट म्हणून समाजाने त्यांना अंगाबाहेर लोटले पण ती खचली नाही. ती विव्हळली, आर्त बनली, हिरमुसली पण पुन्हा ती सावध झाली हे खालील अभंगातून दिसून येते.

**तात आणि माय गेलीसे येथून । तेंव्हा आम्ही लहान पांडुरंगा**

**निवृत्ती ज्ञानदेव कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मज लागी ।।**

नाथ सांप्रदायाचा मुक्ताईवर प्रभाव होता आणि संत ज्ञानदेवा प्रमाणे तीही सिध्दावस्थेत पोहचली होती. तिचा अध्यात्मिक अधिकार फार मोठा होता. संत ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर मुक्ताबाई उदास झाली ''मुक्ताबाई उदासी असे फार । आता हे शरीर रक्षू नये।। या मन:स्थितीत मुक्ताााबाईने कांही दिवसांनी समाधी घेतली असे संत नामदेव महाराजांच्या खालील अभंगातून दिसून येते.

**कडाडली वीज निरांजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त जाली ।**

**गर्जत गगन कडाडली वीज । स्वरुपी सहज मिळीयेली ।**

**मावळता दीप ज्योत कोठे होती । सहज सामावली निरंजनी**

अशा प्रकारे थोर संत कवयित्री स्वरुपाकार झाली, गुप्त झाली.

**(४) श्री समर्थ संप्रदाय :–**

श्री समर्थ रामदासांनी श्री दासबोध रचनेसाठी श्री अवधूतगीता व गुरुगीतेचा संदर्भ घेतला आहे. श्री समर्थ रामदास संप्रदयात श्री दत्तात्रयाला गुरुस्वरुप आदर्श सिध्द पुरुष मानले आहे. उपास्य देवता म्हणून मानलेले नाही. श्री समर्थ रामदासांचे शिष्य दिनकरस्वामी तिसगावकर व पट्टशिष्य श्री कल्याण स्वामी यांच्या रचनेत श्री दत्तात्रय यांचे भावपूर्ण वर्णन दिसून येते. उत्कट भक्तीभाव दिसून येतो.

**प्रास्ताविक –**

देवगिरीचा पाडाव झाल्यानंतर यादवांचे राज्य नष्ट झाले व त्याचबरोबरच महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अस्त होऊन पारतंत्र्य झाले व पारतंत्र्याचा काळ १४ व्या शतकाच्या सुरुवातीस सुरु होऊन सुमारे ३०० वर्षे टिकला, या कालांत मुसलमानी राजसत्तेचा जाच जनतेस सोसावा लागला. कित्येक देवालये मोडली; तीर्थस्थाने भ्रष्ट झाली, स्त्रियावर अत्याचार घडले, सोळाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्राचे तीन राजकीय भाग झाले. आदिलशाही, निजामशही व मुघलशाही. सन १६३६ मध्ये निजामशाही नष्ट झाली. कारण मोंगलांच्या राजकीय आक्रमणापुढे ती टिकाव धरु शकली नाही. आदिलशाही व मोंगलाई हे आपले सामर्थ्यानेच महाराष्ट्राचे धनी बनले होते. तत्कालीन धार्मिक व सामाजिक स्थितीचे वर्णन रामदासांनी आपल्या ''परचक्र निरुपण'' या प्रकरणात पुढील प्रमाणे केले आहे.

**पदार्थ मात्र तितुका गेला । नुस्ता देशची उरला ।**

**येणे करीता बहुतांला । कष्ट जाले ।।**

**लोके स्थानभ्रष्ट जाली । कितेक तेथेची मेली ।**
**उरली ते मराया आली । गावावरी ।।**
**माणसा खावया धान्य नाही । अंथरुण तेही नाही ।**
**घर कराया सामग्री नाही । काये करिती ।।**
**कहींच पहाता धड नाही । विचार सुचेना कांही ।।**
**अखंड चिंतेच्या प्रवाही । पडिले लोक ।।**
**प्राणिमात्र झाले दु:खी । पाहता कोन्ही नाही सुखी ।।**
**कठीण काळे वोळखी । धरिनात कोन्ही ।।**

**– परचक्र निरुपण २९ ते ४०**

**समर्थ संप्रदायाचा उगम आणि परंपरा –**

वर वर्णन केलेल्या दु:सह परिस्थितीमध्ये वैदिक वर्णाश्रम धर्माचे पुनरुज्जीवन रामउपासनेच्या अधिष्टानावर करणारा संप्रदाय रामदासस्वामींनी सुरु केला. तो रामदासी संप्रदाय होय. या संप्रदायास ''महाराष्ट्र धर्म'' ''रामदासी संप्रदाय''''दास संप्रदाय'' अथवा ''समर्थ संप्रदाय'' असेही म्हणतात. रामदासस्वामी आपली गुरुपरंपरा एका अभंगात देतात ती खालील प्रमाणे,–

**आदिनारायण सदगुरु आमुचा ।।**
**शिष्य झाला त्याचा महाविष्णू ।।१।।**
**तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस ।**
**तेणे ब्रह्मायास उपदेशीले ।।२।।**
**ब्रम्हदेवे केला उपदेश वसिष्ठा ।**
**तेथे धरा निष्ठा शुध्द भावो ।।३।।**
**वसिष्ठ उपदेशी श्रीरामरामाशी ।**
**रामे रामदासी उपदेशीले ।।४।।**
**उपदेश देवोनी दिधला मारुती ।**
**स्वयें रघुपती निरंवीता ।।५।।**
**निरंवीता तेणे झालो रामदास ।**
**संसारी उदास म्हणोनीया ।।६।।**
**म्हणोनीया आमुचे कुळी कुळदैवत ।**
**राम हनुमंत आत्मरुपी ।।७।।**

**आत्मरुपी झाला रामी रामदास ।**
**केला उपदेश दीनोध्दारा ।।८।।**

यावरुन आदीनारायण – महाविष्णू – हंस – ब्रह्मदेव – वसिष्ठ – राम – रामदास याप्रमाणे परंपरा दिसते.

सन १६७४ मध्ये छ. शिवाजीस राज्याभिषेक झाला व समर्थ सज्जनगडी रहावयास गेले. पुढे तीन वर्षांनी इ.स.१६७८ मध्ये रामदासांचे ज्येष्ठ बंधू यांचे देहावसान झाले. सन १६७८ मध्ये दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या एक म्हणजे छ. शिवाजीने रामदासांना सनद करुन दिली (ती अद्यापही चालू आहे) व दुसरे डोमगांवास रामदासांनी आपला शिष्य कल्याण यास मठ करुन राहण्यास सांगितले. सन १६७९ मध्ये छ. शिवाजी व रामदास यांची शेवटची भेट सज्जनगडावर झाली व पुढे सन १६८० मध्ये छ. शिवाजी महाराजांचा अंत झाला.

शके १६०३ (इ.स. १६८१) मध्ये माघ कृष्ण पंचमीस तंजावराकडून व्यंकोजी राजे यांनी पाठविलेल्या रामाच्या मूर्ती सज्जन गडावर येऊन पोहोचल्या. पुढे समर्थांनी त्या मूर्तींच्या डोळ्यांवरील मेण काढून मूर्तीचे ध्यान पाहिले व समाधान व्यक्त केले. त्याच दिवशी त्या मूर्तीची स्थापना व यथासांग पूजाअर्चा करण्यात आली. आपल्या शिष्यांना बोलावून त्यांनी आज्ञा केली की, ''या व चाफळच्या मूर्तीची पूजाअर्चा करुन संस्थान सांभाळून उपासनामार्ग चालवावा'' पुढे चार दिवसांनीच म्हणजे माघ कृष्ण नवमीस शनिवारी दोन प्रहरी या मूर्तीचे अवलोकन करीत असतानाच समर्थानी आपला देह ठेवला.

जांब ही जन्मभूमी, चाफळ ही कर्मभूमी व सज्जनगड ही समाधीभूमी म्हणून समर्थचरित्राशी निगडित आहे. या तिन्ही मठांचे महंत समर्थ स्वत: होते. याखेरीज कांही प्रमुख मठांची नावे त्यांच्या मूळ मंहतांच्या नांवासह खाली दिली आहेत.

टाकळी मठ व इंदूरबोधन मंहत उध्दव स्वामी (प्रथम शिष्य) तंजावर मठ – भीमस्वामी; डोमगांव मठ – कल्याणस्वामी (समर्थांचे पट्टशिष्य) शिरगांवमठ – दत्तात्रयस्वामी; तिसगांवमठ – दिनकरस्वामी. काही मठांवर स्त्री – शिष्या अधिकारी होत्या. त्या मठात मिरज – मठ – वेणाबाई; राशिवडेमठ – अंबिकाबाई; वाळवेमठ – अंबिकाबाई, अशी नांवे आढळतात.

**रामदासांची ग्रंथरचना –**

रामदासांची ग्रंथरचना विस्तृत आहे. त्यांचा सर्वात महत्वाचा ग्रंथ दासबोध असून, त्याखेरीज पुढील वाङ:मय प्रसिध्द आहे (१) मनोबोध अथवा मनाचे श्लोक, (२) करुणाष्टके, (३) जुना दासबोध, (४) आत्माराम, (५) रामायण (६) ओव्या चवदा शतक, (७) स्फुट ओव्या, (८) स्फुट श्लोक व (१५) भारुडे

रामदासांच्या उपलब्ध असलेल्या २६०० कवितापैकी सुमारे तीन – चतुर्थांश कविता

अध्यात्मपर आहेत; सुमारे चार हजार कविता देवता – आख्यानपर उरलेली कविता आत्मपर भावगीतात्मक आहे. दासबोध व इतर रचना –

दासबोध म्हणजे दासांनी – रामदासांनी – शिष्यांना केलेला बोध आहे. यात स्वतःच रामदासांनी पहिल्या दशकातील समासातील दुसऱ्याच ओवीत दासबोधांत काय सांगितले ते लिहीले आहे.

**ग्रंथा नाम दासबोध । गुरु शिष्यांचा संवाद ।**
**येथे बोलिका विशद । भक्तिमार्ग ।।**

वीस दशकांचा हा दासबोध एकदम तयार झालेला नसून, त्याची रचना क्रमाक्रमाने झाली आहे. पहिल्या आठ दशकांची रचना सन १६५९ च्या सुमारास झाली. उरलेले बारा दशक मधून मधून लिहीले गेले आणि इ.स. १६८० – ८१ मध्ये संपूर्ण चित्र गुंफले गेले. म्हणजे सुमारे २० /२२ वर्षात हा संपूर्ण ग्रंथ तयार झाला आहे.

**दासपंचायतन –**

समर्थांच्या समकालीन आणखी चार मंडळी होती व त्यांचा आणि समर्थांचा स्नेहसंबंध होता. चौघेजण म्हणजे (१) जयरास्वामी वडगांवकर (२) रंगनाथस्वामी निगडीकर (३) केशवस्वामी भागानगरकर व (४) आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर या सर्वांना रामदासांचे श्रेष्ठत्व मान्य होते. म्हणून हे पंचायतन ''समर्थ पंचायतन'' या नावानेही ओळखले जात होते.

**समर्थ संप्रदायाचे कार्य –**

रामदासी संप्रदायाचे रोपटे रामदासस्वामींनी कृष्णेच्या काठी भक्तीच्या मळ्यात लावले. दासबोधाच्या आणि स्फुट काव्याच्या रुपाने त्याला जीवन दिले. आपल्या हयातीतील उत्तरार्धात हे रोपटे जोमाने वाढून त्याचे वृक्षांत झालेले रुपांतर पाहण्याचे भाग्यही त्यांना लाभले.

या वृक्षाला मठ महंताच्या रुपाने फांद्या फुटल्या. शिष्यप्रशिष्यांचा मनोहर पर्णसंभार त्यावर वर्धमान झालेला दिसला व या संप्रदायाच्या शाखा दूर प्रांती पसरुन गर्द छायेखाली रामोपासना हनुमंताच्या साक्षीने प्रकर्षाने होऊ लागली. रामदासांना ७३ वर्षाचे दीर्घायुष्य लाभलेले होते. त्यातील पूर्वार्धाचा तीन तपांचा काल बालपण, तपश्चर्या आणि तीर्थाटन यात त्यांनी घालविला व तीर्थाटनात डोळे आणि कान उघडे ठेवून केलेल्या संचारातील अनुभवांच्या भांडवलावर उत्तरार्धात संप्रदाय स्थापून त्याचा विकास आणि विस्तार केला.

**(५) श्री आनंद संप्रदाय :–**

महाराष्ट्रातील हा एक प्रमुख प्राचीन संप्रदाय असून तो बसव कल्याण येथून सुरु झाला. या संप्रदायातील अख्यानकवी श्रीधर स्वामी नाझरेकर होवून गेले. त्यांची गुरु परंपरा श्री दत्तात्रय – सदानंद – रामानंद – आमलानंद – गंभीरानंद – ब्रम्हानंद – सहजानंद – पूर्णानंद – दत्तानंद –

ब्रम्हानंद – कवी श्रीधर अशी होती. त्यांनी त्यांच्या काव्य रचनेतून व ''श्रीराम विजय'' ग्रंथातून उत्कृष्ट श्री दत्त भक्ती गायली आहे. पूर्णानंद नारायण हे स्वामी सहजानंदाचे शिष्य होते. ते एक महान साधू होते. बसव कल्याणीतील बरीच मुस्लीम मंडळी त्यांची शिष्य होती. त्यातच बेदरचा बादशहा शहा मुंतोजी, बहामनी होय, सहजानंदाच्या या शिष्याचे नाव गुरु परंपरेने ज्ञानसागरानंद होते, मृत्यूंजय स्वामी होते. पूर्णानंद नारायण यांनी लिहीलेल्या ''गुरुगीतेत'' या आनंद संप्रदयातील सर्व गुरुंची गुरु तत्वाची चर्चा दिसून येते. या ''गुरुगीता'' ग्रंथावर मुकुंदराज लिखित ''विवेकसिंधू'' ग्रंथाचा प्रभाव आहे. गुरुगीता व विवेकसिंधू या मधील ओव्यामधून साम्यस्थळे व गुरुस्तुतीच आढळून येते. आनंद संप्रदयातील सत्पुरुषांची विवेकसिंधूवर अत्यंतिक श्रध्दा दिसून येते. आनंद संप्रदयाचे आदीगुरु दत्तात्रेय असल्याने या संप्रदयात गुरुगीतेला असाधारण महत्व आहे. पूर्णानंद नारायण हे संत श्री एकनाथ महाराज यांचे नातजावई आहेत. त्यांचे पुत्र शिवरामस्वामी होय. तर श्री रंगनाथस्वामी निगडीकर, श्री केशवस्वामी भागानगरकर हे शिवराम स्वामींचे गुरुबंधू आहेत.

**गुरुदेव दत्ता, अनंत ब्रम्हांडी तुझी सत्ता ।। धृ.।।**
**विश्वव्यापका विश्वंभरीता, विश्वधीशा विश्वातीता ।**
**प्रमेय–प्रमाता – प्रमाणरहीता, जगद्‌गुरु अवधूता ।।१।।**
**नित्य निरंतर अगमागोचर, परात्परतर सुखदाता ।**
**दीनदयाकर दत्त दिगंबर, सत्यज्ञानानंता ।।२।।**
**नि:संगा निजरंगा सत्वर, धावेधावे आता ।**
**निजात्मदर्शन देवूनी निरसी, दुर्गयममता चिंता ।।३।।**

वरील प्रमाणे भगवान दत्तात्रेयाची स्तुती श्री रंगनाथस्वामी निगडीकरांनी गायली आहे.

**(६) चैतन्य संप्रदाय :–**

वारकरी संप्रदायात कळस झालेले / ठरलेले श्री संत तुकाराम महाराज हे या चैतन्य संप्रदायातील होय. राधव चैतन्य – केशव चैतन्य – बाबाजी चैतन्य – श्री संत तुकाराम अशी ही गुरुपरंपरा आहे. राघव चैतन्य हे श्री दत्त संप्रदायातील आहेत. श्री दत्त उपासनेतील आहेत. अवधूत उपासनेतील आहेत. या चैतन्य संप्रदयातील श्री संत तुकारामसह अनेक संतानी / महात्माने श्री दत्तात्रेय भगवानांची महती आपल्या अभंगातून / पदातून गायली आहे.

**विश्वपट परिधान । करी अनुसूयानंदन ।।**
**दिगंबराचे अंबर । बरवे शोभे चराचर ।।**
**नाना रत्ने वसुंधरा । घेवूनीआली अलंकार ।।**

**लेववीले अंगोअंगी । रंग भरले निजरंगी ।।**

**ज्ञानसागराची शोभा । शिवगुरु अवधूत उभा ।।**

भैरव अवधूतांनी वरील प्रमाणे भगवान श्री दत्तात्रेयांची स्तुती गायली आहे.

श्री राघव चैतन्य हे फार मोठे सिध्द पुरुष होवून गेले. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्यांची कीर्ती जुन्नर, पुणे, बसव कल्याण (कल्याणी) गुलबर्गा भागात बरीच पसरली होती. त्यांचा शिष्यसंप्रदायही बराच मोठा व सर्वधर्मीय होता. त्यांचे आळंद (आळंद - गुंजोटी, जि. गुलबर्गा) येथील समाधीस्थान तर आज जवळ जवळ ४०० - ४५० वर्षे हिंदू - मुस्लीम - जैन - लिंगायत व इतरांनाही जागृत स्थान वाटत आले आहे. सर्व धर्मीयांची त्यांच्यावर श्रध्दा आहे.

श्री राघव चैतन्यांचे शिष्य श्री केशव चैतन्य यांची समाधी ओतूर (जि.पुणे) येथे आहे. तर श्री केशव चैतन्य यांचे शिष्य श्री बाबाजी चैतन्य यांची समाधी मान्यहाळी (जि.गुलबर्गा) येथे आहे.

सिध्द पुरुषांच्या पूर्व चरित्राची माहिती सहसा सहजपणे उपलब्ध होत नाही. ते आपले पूर्व आयुष्य, आपली योग साधना, साधना अज्ञात स्थळी लोकांच्या पासून दूर करीत असतात. ज्यावेळी ते प्रगट होतात, प्रसिध्दीस येतात ते त्यावेळी श्रेष्ठ अवस्थेत पोहचलेले असतात. आत्मनंदात वावरत असतात. त्यामुळे त्यांचे पूर्व आयुष्य त्यांच्या शिष्यांनाही समजून येत नाही. राघव चैतन्यांच्या बाबतीत त्यांचे शिष्य, प्रशिष्य श्री केशव चैतन्य त्यांचे शिष्य श्री बाबाजी चैतन्य हे सर्वच सिध्द पुरुष असल्याने त्यांच्या मुखातून त्यांच्या गुरुविषयी, गुरुपरंपराविषयी पूर्वाश्रमीची माहिती सर्वांना समजणे शक्य नव्हते. श्री संत तुकाराम महाराजांनी आपल्या गुरुच्या नावां बरोबर म्हणजे श्री बाबाजी चैतन्यांच्या बरोबर आपले आजेगुरु श्री केशव चैतन्य व पणजेगुरु श्री राघव चैतन्य यांच्या नावांचा उल्लेख केला आहे. श्री संत तुकारामांनी आपल्या गुरु परंपरेचा उल्लेख जर केला नसता तर श्री राघव चैतन्य, श्री केशव चैतन्य यांचा संपूर्ण महाराष्ट्राला विसर पडला असता.

चैतन्य संप्रदयाचा मुख्य ग्रंथ हा ''चैतन्यलीला'' हा ओवीबध्द ग्रंथ आहे. या ग्रंथात एकंदर २१ अध्याय आहेत. एकंदर ओळींचीसंख्या ३३८१ आहे. हा ग्रंथ कृष्णदासाने लिहला आहे. कृष्णदासाचे पूर्ण नाव कृष्णदास एकनाथ धर्माधिकारी असून तो ऋग्वेदी ब्राम्हण होता. त्याने केशव चैतन्यांच्या समाधीची बरीच सेवा केली. यामुळे श्री केशव चैतन्यांनी त्याला दर्शन देवून उपदेश दिला. कृष्णदासाचा काळ इ.स.१७०० ते १७७८ असावा. श्री केशव चैतन्यांची समाधी ओतूरला आहे. कृष्णदासांनी श्री केशव चैतन्यांच्या समाधीची सेवा बरीच वर्षे केली. ''चैतन्यलीला'' या त्यांच्या ग्रंथाचा काल इ.स. १७५३ ते १७५८ लेखन काल असावा.

उध्दव चिद्घन हा संत तुकारामांच्या समकालीन संत तो चैतन्य परंपरा सांगणारा अभंग सांगतो. ''लतीबशहा मुसलमान । रामदास भक्त पूर्ण । राघव चैतन्य केशव चैतन्य / बाबा चैतन्य तुकोबा ।। वाचे वदे श्रीचिध्दन । झाला निमग्न उध्दव ।। तर बहिणाबाईंच्या गाथेत'' पुढे विश्वंभर शिवरुप सुंदर । तेणे राघवी विचार ठेवीलासे ।। केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य । झालासे प्रसन्न तुकोबासी ।। एकनिष्ठ भाव तुकोबा चरणी । म्हणोनी बहिणी लाधलीसे ।। अशी गुरुपरंपरेचा उल्लेख आहे.

तर संत महिपतीने आपल्या ''भक्ती लिलामृतात'' संत तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा व गुरु उपदेशाची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**राघव चैतन्य भक्त वैष्णव । तयासी शरण चैतन्य केशव ।**

**बाबा चैतन्य माझे नाव । तुकयासी देव बोलले ।। ६३।।**

**केशव चैतन्य राघव चैतन्य । बाबाजी आपुले सांगितले नामभिधान ।**

**रामकृष्णहरी मंत्र जाण । मजकारणे सांगितला ।। ७४।।**

**माघ शुध्द दशमी साचार । सुदिन पाहून गुरुवार ।**

**माझा करुनी अंगिकार । गेले सत्वर सदगुरु ।।७५।।**

राघव चैतन्यांचे मूळ नांव रघुनाथ. ते गुजरात मधील गिरनार पर्वताच्या भागात शौर्यकुळात जन्मले इ.स. १४६० च्या सुमारास त्यांचे वडील मुसलमान आमदनीत पंडित, देशलेखक म्हणून होते. रघुनाथांनी गिरनार पर्वतावर श्री दत्ताची कडक उपासना केली, अनुष्ठान केले. श्री दत्तात्रेयाने रघुनाथाला योग अनुष्ठान करण्यास व जुन्नर जवळील ओतूरच्या डोंगरात जाणेस सांगून योग्य वेळी भगवान व्यासगुरु भेट देवून उपदेश करतील असे सांगितले. ओतूरचे डोंगर व वन त्याकाळी तपोवन म्हणून प्रसिध्द होते. ओतुरी त्यांनी पार्थिव लिंग स्थापन करुन अन्नपाणी वर्ज्य करुन घनघोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होवून व्यासानी त्यांना दर्शन दिले व त्यांचे परंपरेने ''राघव चैतन्य'' नाव ठेवून ''ओम नमो भगवते वासुदेवाय'' हा मंत्र दिला. यानंतर भगवान दत्तात्रेयाने त्यांना दर्शन देवून चतु:श्लोकी भागवताची उपदेश / शिकवण देवून संप्रदाय वाढविण्याचा आदेश दिला. श्री राघव चैतन्य प्रथम दत्तभक्त. नंतर शिवभक्ती करु लागले. शेवटी त्यांनी शिवालयाच्या यात्रा मुख्यत: केल्या. समाधी घेण्यापूर्वी ते आळंदला सोमेश्वराच्या देवळात राहिले. त्यांच्या समाधीजवळ शिवलिंगाचीच स्थापना करण्यात आलेली आहे. त्यांनी इ.स. १५६२ पूर्वी समाधी घेतली असावी. राघव चैतन्यांना मुस्लीम लोक लाडले मशायक म्हणतात. त्यांची समाधी आळंदला दर्ग्यातच आहे. हिंदू – मुस्लिम त्यांची आराधना करतात. श्री केशव चैतन्यांच्या आई वडीलांचे नाव नृसिंह व आनंदी असे होते. श्री नृसिंह निजामशाही शहा तहीरच्या नोकरीत / कारभारी होते. श्री केशव चैतन्यांचे मूळ नाव विश्वनाथ

असून, तिनेवेलीच्या देशपांडे घराण्यात त्यांचा जन्म इ. ए. १५२४ च्या सुमारास झाला. त्यांना लोहगडची किल्लेदारी मिळाली होती. त्यांच्या पत्नीचे नाव गिरीजा. बुऱ्हाण निजामशहा व विजापूर आदीलशहा यांच्या संघर्षात विश्वनाथाला लोहगड सोडून ओतूर (जि. पुणे) येथे यावे लागले. त्यांची राघव चैतन्यांची गाठ पडली. त्यांच्या मनात विरक्तीने संचार केला. श्री राघव चैतन्याकडे संन्यास दीक्षा घेतली. अशा रीतीने विश्वनाथ देशपांडे (मूळ राजश्री घराणे) यांचे संन्यास दीक्षेनंतरचे नामकरण श्री केशव चैतन्य झाले. संन्यास ग्रहणा नंतर एक दोन वर्षे ओतूरात राहून आपले गुरु राघव चैतन्यांच्या बरोबर तीर्थयात्रेला गेले. उत्तर भारत, काशी यात्रा करुन ते श्री राघव चैतन्यांच्या बरोबर इ.स. १५५८ च्या आसपास आळंदला (जि. गुलबर्गा) आले. पुढे वर्षे - दीड वर्षात श्री राघव चैतन्यांनी आळंदला समाधी घेतल्यावर ते इ.स. १५६३ ला ओतूरला परत आले. केशव चैतन्य ओतूरास आल्यावर त्यांचा बराच शिष्य वर्ग तयार झाला. त्यांनी गंगावाटे वर एक मठ बांधला. जवळच कपर्दिकेश्वराचे शिव मंदिर आहे. त्यांनी शके १४९३, प्रजापती संवत्वर वैशाख वद्य द्वादश (रविवार दि,. २०/५/१५७२) रोजी समाधी घेतली.

श्री केशव चैतन्यांच्या शिष्य वर्गात मुख्यत: कर्नाटक आंध्र मधील बरीच मंडळी होती. त्यांची माहिती व गुरु परंपरा संत तुकारामांनी पुढील अभंगात दिली आहे.

**सद्‌गुरु राये कृपा मज केली । परी नाही घडली सेवा काही ।।१।।**
**सांपडविले वाटे जाता गंगास्नाना । मस्तकी तो जागा ठेवीला कर ।।२।।**
**भोजना मगाती तूप पावशेर । पडीला विसर स्वप्नामाजी ।।३।।**
**काय कळे उपजला अंतराय । म्हणोनीया काय त्वरा झाली ।।४।।**
**राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण मालिकेची ।।५।।**
**बाबाजी आपले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ।।६।।**
**माघ शुध्द दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगिकार तुका म्हणे ।।७।।**

वरील अभंगात संत तुकारामानी आपल्या मनाला लागलेली तळमळ व घडलेला प्रसंग सांगितला आहे. गुरु शिष्याची ओळख ही परमेश्वर प्राप्तीसाठी स्वीकारलेली असते. हेच संत तुकारामांनी, या अभंगात सांगून आपल्या गुरुंचे व गुरु परंपरेचे दर्शन करुन दिले आहे. केवळ स्वप्नातील नामनिर्देशनाने श्री संत तुकारामाना बाबाजींची ओळख पटली व त्यांनी त्यांना सदगुरुस्थानी आरुढ केले. संत तुकारामांना स्वप्नातील झालेला गुरु उपदेश इ.स. १६३३ ते १६४३ च्या दरम्यान झाला.

बाबाजींनी गुरु उपदेश दिल्यावर झालेल्या मनस्थितीचे वर्णन संत तुकारामांनी पुढील प्रमाणे केले आहे.

**चौदेहाचे माथा ठेऊनीया हात । उन्मनी साक्षात दाखविली ।।१।।**
**उन्मनीची मुद्रा चेपोनीया दिली । अवघी ते जाली सुनील प्रभा ।।२।।**
**रक्त श्वेत पीत नीळ आणि कृष्ण । रंग उमटती नानापरी ।।३।।**
**रंग टाकोनीया अरंगात गेले । निर्मळ राहिले नीज तेज ।।४।।**
**तया तेजापाशी दृष्टांत साजेना । अरुप जाई ना कोणीकडे ।।५।।**
**कोणीकडे यावे कोणीकडे जावे । त्यातची असावे निरंतर ।।६।।**
**निरंतर म्हणजे अंतर ज्या नाही । सर्वाहूनी तेही तेची असे ।।७।।**
**तेही तेही म्हणता दैत लागू पाहे । अदैतासी काये शब्द बोलू ।।८।।**
**तुका म्हणे हे तो वाचे बोलवे ना । बाबाजीने खुणा सांगितल्या ।।९।।**

बाबाजींचा शिष्य समुदाय सर्व जातीत होता. त्यांचा जीवनाचा बराच काळ आळंद – मान्यहाळ – बसव कल्याण (कल्याणी) गुलबर्गा हा भागात गेला. बाबाजी हे बालब्रम्हचारी होते. त्यांचा जन्म कोणत्या घराण्यात झाला हे माहीत नाही. त्या भागातील प्रमुख शिष्यांमध्ये नरसप्पा, बाबण्णा हे मान्यहाळीचे तर शेख सुलेमानशा राजापुरचे शिष्य आहेत. बाबाजींची समाधी मान्यहळीच्या उत्तरेस बाबाजींचा मठ आहे. या मठालाच नरसाप्पा मठ म्हणतात. मठातील देवाऱ्हात शंख, बाण, पादुका आहेत. मठासमोरच बाबाजींच्या दर्ग्याचे आवार आहे. अशा प्रकारे हिंदू – मुस्लिम समाज बाबाजींना श्रध्देने भजतो. मठा शेजारीच संत एकनाथ महाराजांचे नातू शिवराम स्वामींची समाधी आहे. बाबाजींचा समाधीकाल इ.स.१६४१ ते १६४९ असावा. वर्षातून दोन वेळा उरुस बाबाजींचा भरतो. बाबाजींच्या दर्ग्यात आजही दीपासाठी तूपच वापरले जाते. प्रसादातही तूपच वापरले जाते. संत तुकारामांचा स्वभावात:च प्रथम ओढा योग मार्गाकडे होता व नंतर भक्ती मार्गाकडे ओढा लागला. श्री संत तुकाराम महाराजांच्या मुळे ''श्री चैतन्य'' संप्रदायाची ओळख खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला झाली.



# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय १ ला ॥



**विषयसूची....!**

१) श्री गणेश वंदन
२) श्री दत्त अवतार आख्यायिका

## अध्याय १ ला

या पहिल्या अध्यायात स्व. बाळासाहेबांनी मंगल चरण गायिले असून, सर्वांना वंदन करुन ग्रंथ निर्मितीचा उद्देश कथन केला आहे. सदर मंगल चरणावर कथाकल्पतरु ग्रंथातील ''ईशस्तवन'' ची छाया आहे. गुणातीत सर्वेश्वर सर्व गुणांचा राजा विघ्ननाशक असा जो गणपती, त्या गणपतीला ग्रंथारंभी मी अंत:करणपूर्वक साष्टांग प्रणाम करुन ''हे परात्पर भगवान गणनाथा तू अनादी व अनंत असून, सर्वत्र आहेस. सर्वास कार्यकारण तूच असून कर्ताही तूच आहेस. अशा प्रकारे विघ्नहर्ता श्री गणरायाचे स्तवन करुन श्री सरस्वती, कुलदैवत तुळजा भवानीला माता - पिता - श्री गुरु कृष्ण सरस्वतींना वंदन करुन आशीर्वाद मागितला आहे. वाचक हो आपण ज्ञानवंत व सुशील असून आपल्या ह्रदयात समता आहे. श्रीहरीचे दास आपल्या ह्रदयात कधीही किल्मिष बाळगीत नाहीत. त्यांची ह्रदये आरशा प्रमाणे स्वच्छ असतात. आपणही अशाच निर्मल अंत:करणाने या ग्रंथाचे परिशीलन कराल असा मला भरवसा आहे. निर्मळ पाणी जसे कोणत्याही रंगाचे होते, त्याचप्रमाणे आपणही आपले निर्मळ अंत:करण भक्तीरसाने रंगवून या माझ्या ग्रंथाकडे पहावे अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

भगवंताच्या लीला श्रवणाची उत्सुकता साधारणत: सर्वांना सारखी आहे. त्या लीला गोड आहेत. संस्कृत भाषेत आहेत. अवघड आहेत. संस्कृत भाषा फार थोडे लोक जाणत असल्यामुळे कृष्ण कवींनी हा ग्रंथ (कथा कल्पतरु) प्राकृतात केला. या ग्रंथात वेद, श्रुती, स्मृती, उपनिषदे यातील सार प्राकृतात वर्णन केले आहे. ईश्वर प्राप्त आजे जे व्यास, वाल्मिकी, शुक यांनी महाभारत, रामायण, श्रीमद्‌भागवत व अठरा पुराणे असे वेदतुल्य ग्रंथ संस्कृतात करुन ठेवले आहेत. त्या ग्रंथातील कथा मी प्राकृतात वर्णन करण्याचा प्रयत्न करीत आहे, असे कृष्ण कवी म्हणतो. अशा व्यास, वाल्मिकी, शुक मुनी व कृष्ण कवींना स्व. बाळासाहेबांनी वंदन केले आहे.

तहानेने व्याकुळ असलेल्या गृहस्थास पाण्याची खोल विहीर दिसावी पण पाणी वर काढण्यास जवळ पात्र व दोर असू नये. त्याप्रमाणे प्राकृत हरिभक्तांची स्थिती झाली आहे. अशा प्राकृत जनांसाठी मी पात्र व दोर होवून तो खोल असलेला संस्कृत ज्ञानसागर उपसून वर आणत आहे. हा ज्ञानसिंधू फार विशाल आहे. तो उपसीत असताना जर काही चुकून राहिले तर सह्रदय वाचकवृंदहो मला तुम्ही क्षमा करा. स्वर्ग मृत्यू पाताळाचे तिन्ही ठिकाणच्या लोकांनी कथामृत सेवनाचा प्रयत्न केला आहे आणि असा प्रयत्न आजवर एकसारखा चालत असल्यामुळे भगवंताचे लीलालाघव चरित्र सर्वांना उपलब्ध झाले आहे. श्रीहरीच्या अनंत लीला पाताळात कंबल व अश्वतर यांनी वासुकीला सांगितल्या होत्या, स्वर्गात सुरपतीला बृहदश्वाने सांगितल्या होत्या. त्याच कथा एकदा कैलासात असताना शंकराने पार्वतीला कथन केल्या होत्या. बद्रीकाश्रमी त्या सुतांनी ऋषिंना सांगितल्या होत्या. याप्रमाणे परंपरेने त्या कथा

अनेकांनी अनेकांस सांगितल्या आहेत. राजा जनमेजय वैशंपायन ऋषिस कथा विचारात असून वैशंपायन ऋषी त्या कथा राजा जनमेजयाला सांगत आहेत. त्या कथेतीलच एक द्वापार युगातील श्री दत्तात्रेय अवताराची होय.

श्री अत्रिऋषींनी पुत्र प्राप्तीसाठी ऋक्षाकुल पर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने त्रिभुवन होरपोळू लागले. अत्रिऋषींच्या या घनघोर तपश्चर्येने प्रसन्न होवून ब्रम्हा – विष्णू – महेश हे त्यांच्या समोर प्रकट झाले. ते प्रकट होवून वर माग म्हणताच ''अत्रिऋषींनी'' आपण माझ्या उदरी जन्म घ्यावा हे मागितला. श्री ब्रम्हा – विष्णू – महेश यांनी यावर ''तथास्तु'' म्हणून त्यांच्या पोटी येण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे ब्रम्हदेवापासून सोम (चंद्र), विष्णूपासून दत्त शिवापासून दुर्वास हे तीन पुत्र अनुसुयेच्या पदरी जन्मले. तथापि, द्वापार युगातील नारदाने केलेल्या अनुसुयेच्या सतीत्वाच्या गौरवामुळे श्री ब्रम्हा – विष्णू – महेश यांच्या पत्नींच्या मनात (नांवे – लक्ष्मी, पार्वती, सरस्वती) अनुसये विषयी द्वेष निर्माण झाला. अनुसुयेच्या सत्त्व हरणासाठी त्यांनी आपल्या पतींना अतिथी वेषात अनुसुयेच्या आश्रमात पाठविले. अत्रिऋषी त्यावेळी आश्रमात नव्हते. दोन प्रहरी भिक्षेला आलेल्या अतिथीला कोणत्याही परिस्थितीत भिक्षेशिवाय विन्मुख पाठवायचे नाही असा नियम अत्रिऋषी व अनुसुयेचा होता. श्री ब्रम्हा – विष्णू – महेश अत्रिऋषींच्या आश्रमात भिक्षेसाठी माध्यान्ह काळी आले. अनुसुयेने त्यांना विसाव्याची विनंती केली, आदरातिथ्य केले. तथापि सत्त्वहरणाच्या उद्देशानी आलेल्या श्री ब्रम्हा – विष्णू – महेशांनी तिला सांगितले की, ''तू विवस्त्र होवून भोजन वाढत असशील तरच आम्ही भिक्षा स्वीकारु, भोजन स्वीकारु'' अनुसुया थोडी गडबडून गेली, गोंधळून गेली, परंतु देवांच्या भिक्षेची अट मान्य करुन श्री अत्रिऋषींचे स्मरण करुन तीने त्या तिन्ही देवांवर तीर्थ शिंपले. त्याबरोबर ते तीन्हीही ब्रम्हा – विष्णू – महेश देव लहान बाळे झाली. इकडे स्वर्गात तिन्ही देवांच्या पत्नी देवांची वाट पाहत बसल्या. शेवटी नारदाच्या सांगण्यावरुन पतीदेवांचा शोध घेत त्या अत्रिऋषींच्या आश्रमात आल्या. आपले पतीदेव श्री ब्रम्हा – विष्णू – महेश हे बालरुपाने पाळण्यात झोपले असून, अनुसुया पाळण्याला झोके देत आहे. हे पाहून त्या गहिंवरुन गेल्या. अनुसुयेच्या पतीव्रताचा त्यांनी गौरव केला. स्तुती केली व आपल्या पतीदेवांना बालरुपातून सोडविण्याची विनंती केली. श्री पतीस्मरण करुन तीर्थ शिंपडताच तीन्ही बाळे पुन्हा पूर्ववत देव झाले. तिन्ही देवांचे देवीचे दर्शन अनुसुयेला झाले. तिन्ही देवांना पूर्वरुप प्राप्त झाले तेही गहिंवरुन गेले व त्यांनी अनुसुयेला वर मागण्यास सांगितले. अनुसुयेने ब्रम्हा – विष्णू – महेश या तीन्ही देवांनी तिच्या इच्छेनुसार तिच्या पोटी जन्म घेण्याचे मान्य केले. अशाप्रकारे श्री माता अनुसुया – श्री अत्रिऋषी यांच्या पोटी श्री दत्तात्रयाने जन्म घेवून श्री दत्त परंपरेचे सूत्र चालू राहिले असे पहिल्या अध्यायात स्व. बाळासाहेब सांगतात.

आपले पिता श्री अत्रिऋषींच्या सहवासात गौतमी नदीच्या तीरावर तपश्चर्या करुन श्री

दत्तात्रयांनी ब्रम्हज्ञान प्राप्त केले. दत्तात्रयांनी चोवीस गुरु केल्याचा उल्लेख भागवतात आढळून येतो. पृथ्वी, आकाश, पाणी, अग्नी, सूर्य, पतंग, अजगर, समुद्र, मधमाशी, पिंगळा, कुमारी, मासा, भिंगुरटी, कोळी, बालक वरील चराचराकडून दत्तात्रेयांने गुण घेतले आहेत. म्हणून संत एकनाथ महाराजांनी अभंगात खालील प्रमाणे म्हटले आहे.

**जो जो जयाचा घेतला गुण । तो तो म्यां गुरु केला जान ।**
**गुरुंसी आले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ।।**
**ज्याचा गुण घेतला । तो सहज गुरुत्वा आला ।**
**ज्याचा गुण त्यागरुप घेतला । तोही गुरु झाला अहितत्यागे ।।**
**तो अवधूत जाण दत्तात्रेया । तेणे अलिंगूनी यदुराया ।**
**निजरुपाचा बोध तया । अनुभवावया दीधला ।।**

श्री दत्तात्रय अत्रि-अनुसुयेचा पुत्र. वेदकाळापासून त्यांचे अवतार कार्य चालू राहिले आहे. १) योगीराज २) अत्रिवरद ३) दत्तात्रय ४) कालग्निशमन ५) योगीजन वल्लभ ६) लीलाविश्वंभर ७) सिध्दराज ८) ज्ञानसागर ९) विश्वंभर १०) मायामुक्त ११) मायायुक्त १२) आदीगुरु १३) शिवरुप १४) देवदेव १५) दिगंबर १६) कृष्णशामकमलनयन हे सोळा अवतार झाले तर सहस्त्रार्जुन, कार्तवीर्य, परशुराम, यदू, अर्लक, आयू व प्रल्हाद हे पौराणिक शिष्य झाले.

वेदकालीन अवतारा नंतर श्री श्रीपाद श्रीवल्लभ व श्री नृसिंहसरस्वती हे मानवी देह धारण करणारे, योगमार्गाचा उपदेश करणारे दत्तावतार झाले. त्यांच्यानंतर श्री माणिकप्रभू हुमणाबाद, श्री स्वामी समर्थ अक्कलकोट, श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज (नांदणी / कोल्हापूर) असे परंपरेने अवतार कार्य पहिल्या अध्यायाच्या ओवीत सांगितले आहे.

*****



# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय २ रा ।।



श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी, पीठापूर/कुरवपूर

### विषयसूची....!

१) नृसिंहवाडीस आप्पाभटजींचा
जाणेचा नियम

# अध्याय २ रा

श्री क्षेत्र करवीरच्या पूर्वेस करवीर पासून ४३ कि.मी. शिरोळ पासून ५ कि.मी. श्री नृसिंहवाडी पासून ७ कि.मी. नांदणी नावाचे एक खेडेगाव आहे. या नांदणी गावात भारद्वाज गोत्री आप्पाभट जोशी या नावांचा एक धार्मिक, सदाचार संपन्न ऋगवेदी देशस्थ ब्राम्हण राहत असे. त्याच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णा असून, तीला काशीबाई सुध्दा म्हणत. ती महापतीव्रता असून श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांची आई सुमती/सुमता व श्री नृसिंह सरस्वतींची आई अंबा भवानी यांची प्रतिछायाच होती. आप्पाभट जोशी पत्नीसह सदाचाराने, संतोषाने राहून जी कार्ये ग्रामजोशीपणाने, पौरेहिताने कमाई होई त्यातून अतिथी, अभ्यागतांना अन्नदान करुन, ईश्वर भजनात कालक्रमणा करीत. दर शनिवारी व दर पौर्णिमेला श्री नृसिंहवाडीस श्री दत्त दर्शनाला आप्पाभट जोशी आपल्या भार्येसह जात. घरी जरी धनधान्यादिची समृध्दी असली तरी संतती नसल्यामुळे हे वैभव अन्नपूर्णाबाईला व्यर्थ वाटत होते. सत्पुत्रा शिवाय आपल्याला सद्‌गती नाही म्हणून पुत्रसंतती मागावी अशी विनवणी अन्नपूर्णाबाई आपल्या पतीला नेहमी करीत असे. आपल्या नशिबात असेल तर पुत्रप्राप्ती होईल. संसारातील अशा गोष्टींसाठी श्री नृसिंहवाडीच्या नृसिंह सरस्वतींना म्हणजेच प्रत्यक्ष भगवान दत्तात्रेयाला साकडे घालायला, नवस करायला ते तयार नव्हते. राजास प्रसन्न करुन नश्वर वस्तू मागणे, योग्य नाहीत अशा उपदेशाच्या गोष्टी सांगून अन्नपूर्णाबाईचे समाधान करण्याचा प्रयत्न आप्पाभट करीत असत.

मोठमोठे ऋषिमुनी, ज्ञानी पुरुष हे सुध्दा मायेतून सुटत नाहीत तिथे अन्नपूर्णाबाईची काय कथा? आप्पाभटांनी तिला सांगितलेल्या ज्ञानाच्या, उपदेशाच्या गोष्टी न पटून तिने पुन्हा आप्पा भटांना विनंती केली ''आपल्या स्त्रियांचे पुत्रप्राप्तीचे हेतू पुरविण्यासाठी राजा दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला व संतती मागून घेतली. तसेच सती सुमती/सुमता व अंबा यांनी श्री दत्तात्रयाची आराधना करुन त्यांना प्रसन्न केले. त्यांच्या पदरी ''श्रीपाद'' व ''नरहरी'' या रुपांनी श्री दत्तात्रयानी जन्म घेतला तशी कृपा आपणावर व्हावी. इच्छा परमेश्वररुपी पतीशिवाय कोण पुरविणार? म्हणून आपण पुन्हा एकदा श्री नृसिंहवाडीच्या दत्ताला पुत्रसंतती देण्याविषयी प्रार्थना करावी, विनंती करावी.''

पुढे कांही दिवस गेल्यावर नेहमी प्रमाणे आप्पाभट श्री नृसिंहवाडीस दर्शनाला गेले असताना त्यांना सती अन्नपूर्णेच्या विनंतीची, प्रार्थनेची आठवण झाली व त्यांनी श्री दत्तात्रयाचे दर्शन घेवून विनंती केली. ''देवाधीदेवा, तू कृपासागर असून भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा आहेस. माझ्या भार्येचा हेतू पुरविण्यासाठी तुझ्यासारखा पूज्य असा पुत्र दे'' याप्रमाणे भगवान दत्तात्रयाला प्रार्थना करुन, विनंती करुन, परोपरीने स्तुतीस्त्रोत गाऊन त्यांनी नृसिंहवाडीला मुक्काम केला. रात्री स्वप्नात एक यतीवेषधारी पुरुष स्वप्नात येवून आप्पाभटांना म्हणाला ''हे ब्राम्हणा व्यर्थ चिंता करु नकोस. तुझ्या तपाने, आचरणाने मी प्रसन्न झालो आहे. मीच पुत्ररुपाने तुझ्या घरी

जन्म घेईन'' या स्वप्नाने आप्पा भट जागा होवून नियतीचा विचार करु लागला. दुसऱ्या दिवशी संगमावर स्नान करुन श्री दत्त दर्शन घेवून स्वप्नींचा दृष्टांत भार्येस आतुरतेने सांगणेस नांदणीचा मार्ग चालू लागला. नांदणीला घरी आल्यावर आप्पाभटांनी नृसिंहवाडीत पडलेले स्वप्न अन्नपूर्णाबाईंना कौतुकाने, विस्मयाने सांगितले.

पुढे कांही दिवसानी अन्नपूर्णाबाई गरोदर राहिल्या. पोटी श्री दत्तात्रय येणार या भावनेने आनंदी राहिल्या. आप्पाभटांच्या स्वप्नातील दृष्टांतांनी आनंदीत राहिल्या. आसपासच्या सख्या – शेजारींनी तिची चौकशी करीत ''अन्नपाणी नको, उंच दगडावर बसावे, एकांतात मारुती मंदिरात बसावे. गोर – गरीब संसारात गांजलेल्या लोकांची मुक्तता करावी'' असे अन्नपूर्णा शेजारणींना सांगताच त्या म्हणत ''बाई तू भाग्यवती आहेस. तुझ्या पोटी कोणी तरी तापसी, तपस्वी येणार'' शेजारणींची बोलणी ऐकून अन्नपूर्णाबाईंच्या पोटात आनंद मावत नसे. होता होता चवथा पाचवा महिना पूर्ण होत आला. त्यांना संसार वृथा वाटू लागला. त्या श्री मारुती मंदिरात जावून बसू लागल्या. पुढे नऊ महिने पूर्ण होवून त्या बाळंत झाल्या. तो दिवस म्हणजे – शके १७५७ माघ कृष्ण पंचमी, मकर लग्न, हस्त नक्षत्र, रविवार सूर्योदय (दि.०७/२/१८३६).

आप्पाभटांच्या दृष्टांता प्रमाणे भगवान दत्तात्रयच अन्नपूर्णाबाईंच्या पोटी आल्याने प्रसूतीच्या वेदना झाल्याच नाहीत. उलट अन्नपूर्णा–गौरतनू बालक पाहून त्या आनंदून गेल्या. शेजारणी, मैत्रिणींना त्या मूल आनंदाने दाखवू लागल्या. आप्पाभटजींनी कुलउपाध्यास बोलावून लोकरीती प्रमाणे जातक मांडणेस सांगितले. उपाध्याने मुलाच्या जन्मलग्नावरुन भविष्य जाणले व तो विस्मय चकित झाला. ''हा जन्मलेला मुलगा सामान्य नसून जगाच्या उध्दारासाठी कारणिक पुरुष म्हणून जन्मास आलेला आहे. यास लोक वेडापीसा मानतील परंतु हा सदोदित आत्मानंदी निमग्न राहील. या मुलास विवाह योग नाही. संसारातील तप्त लोकांना, दुःखी लोकांना, मुमुक्षू लोकांना भगवद्‌भजनी लावून त्यांना मुक्त करील'' हे उपाध्याचे / पुरोहिताचे भाषण ऐकून भविष्य ऐकून आप्पाभटांना अतिशय आनंद झाला. श्री नृसिंहवाडीत श्री दत्तात्रयाने स्वप्नात दिलेल्या दृष्टांताचे स्मरण होवून त्यांचे अंतःकरण भरुन आले, कंठ दाटून आला व मनाशी म्हणाले ''संसाराने मोहित होऊन तुम्हाला जन्माला येण्याचा त्रास दिला. क्षमा करा'' बारा दिवसा नंतर सुमूहर्तावर समारंभाने नामकरणविधी होवून मुलाचे नाव ''श्रीकृष्ण'' ठेवण्यात आले. ब्राम्हणांना, गोरगरीबांना भोजन घालून संतुष्ट करणेत आले. श्रीकृष्णांनी जसे यशोदा मातेला मायामोहाने भुलविले त्याचप्रमाणे कृष्ण परमात्मा आपला मुलगा आहे अशी भावना, स्थिती अन्नपूर्णाबाईंची झाली. लहान श्रीकृष्णास पाहणेकरीता गावांतील बरेच स्त्री / पुरुष येत. त्यामुळे त्याला दृष्ट लागू नये म्हणून अन्नपूर्णाबाई त्याला वरचेवर गालबोट लावून लिंबलोण उतरीत असत, मुलास बाधा होवू नये म्हणून कुळस्वामी खंडोबास नवस करीत असत.

श्रीकृष्ण दिवसेंदिवस मोठा होत चालला. पाळण्यात असो की, जमिनीवर असो नेहमी हास्यमुखी, आनंदी असे.  रडणे तर ठाऊकच नाही. तो स्तनपान करीत नसल्याने अन्नपूर्णाबाईंना नेहमी चिंता वाटायची. दुग्धपान न करताही श्रीकृष्णाची अंगकांती तेजस्वी होती. वाढही होती. दुग्धपान करण्याचा अन्नपूर्णाबाईंनी पुष्कळ प्रयत्न केला परंतु तो निष्फळ ठरला होता. वर्षाचे श्रीकृष्ण झाले. उष्टावळीचा कार्यक्रम केला. तरीही अन्नाच्या घासाला श्रीकृष्ण शिवत सुध्दा नसे. श्रीकृष्णाची मंजुळ वाणी ऐकावी, त्याचे बोलणे ऐकावे असे आप्पाभट व अन्नपूर्णाबाईंना वाटे. परंतु तेही व्यर्थ. श्रीकृष्ण बोलत नाही, एक अक्षरही उच्चारत नाही हा बहुतेक मुका / वेडा आहे, वाटून आप्पाभट व अन्नपूर्णाबाई यांना फार दु:ख होई. पुढे श्रीकृष्णाची गती काय? याची काळजी दोघांना लागली. परंतु दुग्धपानाशिवाय अन्नग्रहण करण्याशिवाय श्रीकृष्णाची अंगकांती पाहून त्यांना हा कोणी तरी योगी आपल्या पोटी आल्याचे वाटे.

*****



**श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज नृसिंहवाडी**

(अवतार काल – इ.स.१३७८ ते इ.स.१४५८--८० वर्षे)

# श्री नृसिंहवाडी (नरसोबावाडी)

कुरवपूर येथील ज्या ''अंबिका'' नावांच्या ब्राम्हण स्त्रीला श्री श्रीपाद श्रीवल्लभांनी आशीर्वाद दिला होता, ती स्त्री कारंजे (करंजनगरी) जि. अकोला येथे वाजसनेयी ब्राम्हण कुळात जन्मली या जन्मातील तिचे नाव ''अंबा भवानी'' होय. त्याच कारंज्या गावातील ''माधव'' नांवाच्या ब्राम्हणाशी तिचा विवाह झाला. कुरवपूर येथील गेल्या जन्मातील पूर्व संस्कारामुळे ''अंबा भवानी'' शनी प्रदोष व्रत करु लागली. सोळा वर्षानंतर या शनी प्रदोष व्रतामुळे श्री शंकराच्या कृपेने शके १३०० (इ.सन १३७८) च्या सुमारास तिच्या उदरी एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला. हे बालक म्हणजेच ''श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज'' होय. जन्मतःच या बालकाने ओंमकाराचा उच्चार केला. या बालकाचे नाव ''शालग्रामदेव'' ठेवणेत आले. परंतु रुढ नाव ''नरहरी'' हेच झाले. त्यांच्या कुळाच्या उपाध्येनी या मुलांचे जातक खालील प्रमाणे वर्तविले व बालकाला नमस्कार घातला.

**कुमर होईल कारणिक पुरुषी । गुरु होईल सकळिकां ।।**
**याचा अनुग्रह होईल ज्यासी । तो वंद्य होईल विश्वासी ।।**
**याचे वाक्य होईल परिस । चिंतामणी याचे चरण ।।**
**अष्ट सिध्दी याचे द्वारी । वोळगंत राहतील निरंतरी ।।**
**होईल हा अवतारी पुरुषी । आम्हा दिसतसे भरवंसी ।।**
**न धरावा संदेह मानसी । म्हणोनी करिती नमस्कार ।।**

**– श्री गुरुचरित्र**

नरहरी आई वडीलांच्या सावलीखाली चंद्र – सूर्याप्रमाणे वाढू लागला. तो आता सात–आठ वर्षाचा झाला. परंतु तो बोलत नसल्याने आई–वडील माधव व अंबा भवानीला मोठी चिंता, काळजी लागून राहिली. त्यांना फार दुःख झाले. निदान मुंजीनंतर तर नरहरी बोलेल या विचाराने त्यांनी त्यांची मुंज करण्याचे ठरविले. मुंज/व्रतबंध मोठ्या थाटाने केला. नरहरीला गायत्री मंत्राची दीक्षा मिळाली. तो बटू होऊन आईकडे भिक्षा मागावयास गेला. ही भिक्षा मागतानाच आजपर्यंत मौन स्थितीत असलेल्या, मुका असलेल्या नरहरीच्या मुखातून वेदवाणी प्रकटली, बाहेर पडली, या मोठ्या चमत्काराने दुःखी आई वडिलांना अतिशय आनंद झाला. मुंजीला जमलेल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटले, कौतुक वाटले.

ब्रम्हचारी व्रताचे पालन करुन, वेद अध्ययन करुन, भिक्षाटन करुन तीर्थाटन करण्याचा मनोदय नरहरीने आईला सांगताच ती मूर्च्छितच पडली. मूर्च्छेतून सावध होताच ती नरहरीला म्हणाली ''बाळा, सोळा वर्षे शनी प्रदोष व्रत करुन, शिवाची आराधना करुन त्याच्या कृपेने तू

माझ्या पोटी जन्मलास, सात – आठ वर्षे तू बोलला नाहीस. मुका मुलगा पोटी जन्माला आला म्हणून आम्ही उभयतांनी दु:खात, विचारात दिवस काढले आणि आता बोलू लागल्यावर आम्हाला अतिशय आनंद झाला. आमचे दु:ख दैन्य संपले असे वाटले. परंतु लगेचच तू आम्हांला सोडून जातो म्हणतोस यामुळे आमचा प्राणच नष्ट होणार आहे.'' हे ऐकून नरहरी बाळालाही अतिशय दु:ख झाले. कसेबसे त्याने आई ''अंबा भवानी'' चे सांत्वन केले व तिला पूर्वजन्माचे स्मरण करुन दिले. तिला गेल्या जन्मातील ''श्री श्रीपाद श्रीवल्लभांचे'' दर्शन झाले. तरी, मायामुळे तिने नरहरीला धर्म विहीत आश्रम पालनाची आठवण करुन दिली.

**संवत्सर एक तुझ्या घरी । राहू माते निर्धारी ।।**

**वासना पुरतील तुझ्या जरी । मग निरोप दे मज ।।**

**– श्री गुरुचरित्र**

असे ''आई अंबा भवानी'' ला सांगितले, एक वर्षाच्या कालावधीत कारंज्या नगरीतील सर्व लोकांना नरहरीने आपल्या वागण्याने, बोलण्याने, प्रज्ञेने जणू वेडच लावले. एक वर्षात ''अंबा भवानी'' ला दोन जुळे मुलगे झाले. ही दोन्ही तान्ही बाळे तीन-चार महिन्यांची होताच नरहरीने मातापित्यांचा दु:खद अश्रुंनी निरोप घेतला व भक्तकल्याण, जनकल्याण, धर्मस्थापनेसाठी श्री काशीक्षेत्राकडे प्रस्थान केले. यावेळी त्यांचे वय केवळ ८-९ वर्षाचे होते. मणिकर्णिकाघाटावर स्नान करणे, श्री विश्वेश्वरांचे दर्शन घेणे, भिक्षा मागणे, साधुसंत, तपस्वींच्या सहवासात काळ घालविणे, हा त्यांचा नित्यक्रम झाला. केवळ हे आठ-नऊ वर्षांचे तेजस्वी बालक काशीच्या लोकांच्या कुतुहलाचा विषय झाला.

मणिकर्णिका घाटावर रोज स्नानाला येणाऱ्या शृंगेरी मठातील विद्यारण स्वामींच्या परंपरेतील ३०० वर्षे वयाच्या श्रीकृष्ण सरस्वती या यतीना, योग्याला नरहरी विषयी विस्मय, कौतुक वाटू लागले. त्यांच्यात नरहरीविषयी वात्सल्याची भावना निर्माण झाली. त्यांनी काशीतील सर्व अधिकारी पुरुषांशी चर्चा करुन संगनमताने संन्यास धर्माच्या रक्षणासाठी, प्रतिष्ठेसाठी नरहरीला संन्यास दीक्षा दिली व नरहरी चे संन्यास, दीक्षेनंतरचे नाव ''नरसिंह सरस्वती'' ठेवले. काशीत काही काळ श्रीकृष्ण सरस्वती गुरुंच्या सानिध्यात राहून, ज्ञानदानाचे कार्य करुन अनेक जिज्ञासूना अनेक मुमुक्षांना परमार्थाची वाट दाखवून अनेक मुनींना, साधूंना घेवून श्री नरसिंह सरस्वती बद्रीनाथ, केदारनाथ, तीर्थयात्रा करुन गंगासागर करुन प्रयागच्या तीर्थसंगमावर आले. प्रयागला माधव सरस्वती, बाळकृष्ण सरस्वती, कृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानजोती सरस्वती, सिध्द सरस्वती यांना संन्यास दीक्षा देवून शिष्य बनविले.

प्रयागहून निघून नरसिंह सरस्वती दक्षिणेकडे निघाले. वयाच्या ८-९ व्या वर्षी त्यांनी घर, आपले गाव कारंजे सोडले होते. परत एकदा ते कारंज्याला ३० वर्षांनी परत आले. त्यांच्या

पुर्नदर्शनाने त्यांच्या आई, वडील, भाऊ, बहीण यांना अतिशय आनंद झाला. नरहरींनी जेंव्हा कारंजा सोडून काशीकडे प्रयाण केले, त्यावेळी त्यांना दोन जुळे भाऊ होते. नंतर आई ''अंबा भवानी'' ला दोन पुत्र व एक कन्या (रत्नाई) झाली. एकूण चार भाऊ व एक बहीण ही आता मोठी झाली होती. आपल्या संन्याशी भावाचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व पाहून, परमज्ञान पाहून, तेज-पुंजपणा पाहून सर्व भावंडांना या अपरिचित भावाविषयी विस्मय वाटला, आनंद वाटला. पूज्यभाव त्यांच्यात निर्माण झाला. कारंजाच्या ग्रामस्थांमध्येही त्यांच्या विषयी आदर, पूज्यभाव निर्माण झाला. आपल्या घरच्या लोकांना ग्रामस्थांना अल्प सहवास देवून नरसिंह सरस्वती कारंज्याहून त्र्यंबकेश्वर शिव दर्शन करुन, गोदावरी प्रदक्षणा करुन वासर ब्रह्मेश्वरला आले. तेथे पोटशुळ्या ब्राम्हणाचा उध्दार करुन ते भिलवडी, औदुंबरला (सन १४२२) च्या आसपास आले. औदुंबराच्या घनदाट छायेत एक चार्तुमास काढून (चार महिने) कोल्हापूर येथील एक मंद बुध्दीच्या ब्राम्हणाचा भुवनेश्वरी देवीच्या आज्ञेने उध्दार करुन नरसिंह सरस्वती कृष्णा पंचगंगा संगमावरील ''अमरापूर'' औरवाड या गांवी इ.स. १४२२ आले. या निसर्गरम्य ठिकाणी आल्यावर श्री नृसिंह सरस्वतींचे मन रंगून, आनंदून गेले.

**शिवा भद्रा भोगावती । कुंभी नदी सरस्वती ।।**
**पंचगंगा ऐसी ख्याती । महापातक संहारी ।।**
**ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचीया संगा ।।**
**प्रयागाहूनी असे चांगा । संगमस्थान मनोहर ।।**

**– श्री गुरुचरित्र**

असे हे पंचगंगा संगमस्थान पूर्वीपासून तपोभूमी, तीर्थभूमी निसर्ग सौंदर्याने नटलेली होती. श्री नरसिंह सरस्वतींचे तप:प्रिय मन येथे आनंदाने स्थिरावले, विसावले. बारा वर्षे ते या पवित्र संगम स्थानावर वास करुन राहिले. त्यांच्या या बारा वर्षाच्या तपाने या स्थानाला त्यांच्याच नावाने ''नृसिंहवाडी/नरसोबा वाडी'' ओळखले जाऊ लागले. श्री नरसिंह सरस्वतींचा निवास अलिकडे तिरावर म्हणजे नृसिंहवाडीला तर नदीच्या दुसऱ्या तिरावर / समोर अमरापूर (औरवाड) हे वस्तीचे गाव. श्री नरसिंह सरस्वतींनी नृसिंहवाडीला तपश्चर्या, चिंतन, मनन करावे, अनेक आर्ताची दु:खे दूर करावीत. अनेक जीवांचे कल्याण करावे तर पैलतीरा वरील आमरापूर/ औरवाडला भिक्षेला जावे.


घेवड्याच्या वेलाचा प्रसंग अमरापूर / औरवाडला घडला आहे. ज्या ठिकाणी श्री नरसिंह सरस्वतींनी तपश्चर्या केली त्या ठिकाणी आपल्या मनोहर दिव्य पादुका स्थापन करुन त्यांनी गाणगापूरकडे प्रस्थान केले. श्री नरसिंह सरस्वतींच्या नांवाने नृसिंहवाडी हे तीर्थक्षेत्र निर्माण झाले. त्यांनी सन १४२२ ते १४३४ अशी बारा वर्षे या तपोभूमीत घालविली.

श्रीक्षेत्र गाणगापूर हे भीमा अमरजा या दोन नद्यांचा संगमावरील गाव. येथे त्यांनी दोन तपे म्हणजे २४ वर्षे तपश्चर्या केली. गाणगापूरच्या वास्तव्यात त्यांनी अनेक आर्तांची दु:खे दूर केली. अनेकांना, त्रिविक्रम भारतींना गुरुबोध ज्ञान दिले. स्वधर्माची जागृती केली, बेदरचा बादशहा अल्लाऊद्दीन (दुसरा) याचा उध्दार केला. बेदरहून ते सिंहस्थ यात्रेसाठी कुंभमेळ्याला नाशिक-त्र्यंबकेश्वरला जाऊन परत गाणगापूरला आले. गाणगापूरला येवून येथील लोकांना धर्म उपदेश करुन गाणगापूरला संगमावर कायमपणे निर्गुण रुपाने राहण्याचे आश्वासन देवून श्री शैल्य गमन केले. श्री सिध्द सरस्वती, सायंदेव, नंदी कवीश्वर, नरहरी कवीश्वर यांनी त्यांना कर्दळीच्या पानाच्या आसनावर बसवून जड अंत:करणाने निरोप दिला. तो दिवस म्हणजेच गुरुद्वादशी होय.

श्री नृसिंहवाडीला श्री नरसिंह सरस्वतींच्या पूर्वी श्री रामचंद्र योगी तपस्वी होवून गेले. त्यांच्या कठोर तपश्चर्येचे फल देण्यासाठी श्री नरसिंह सरस्वती या स्थानी आले. श्री नारायण स्वामी, श्री कृष्णानंद सरस्वती, श्री गोपाळस्वामी, श्री मौनी स्वामी, श्री ब्रह्मानंद सरस्वती, श्री गोविंदस्वामी, श्री महादबा पाटील महाराज धुळगांवकर इत्यादी थोर तपस्वींची नृसिंहवाडीला वंदनीय समाधीस्थाने आहेत. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामींनीही बराच काळ या तीर्थक्षेत्रावर वास्तव्य करुन घालविला आहे. तर श्री नृसिंह सरस्वतींनी स्थापन केलेल्या दिव्य मनोहर पादुकांची / मंदिराची पूजा ही आलास गांवच्या बहिरंभटजीच्या घराण्यात वंश परंपरेने चालली आहे.

संदर्भ ग्रंथाचे नाव :- **श्री नृसिंहवाडी माहात्म्य**

संकलन/संपादन :- **प्रा. सौ. नम्रता भट**



**श्री मनोहर दत्त पादुका,नृसिंहवाडी**

# नंदीग्राम

## (श्रीकृष्ण सरस्वतींचे जन्मस्थान-नांदणी)

प्राचीन काळी करवीर प्रांतामध्ये पंचगंगेच्या काठावर वसलेले एक प्रमुख गाव नंदीग्राम या नावाने ओळखले जात होते. सध्या हे गांव नांदणी असे नामाभिधान घेऊन शिरोळ तालुक्यात एका बाजूला वसलेले दिसून येते.

प्राचीन काळापासून चालत आलेली आख्यायिका अशी आहे की, प्रभू श्रीरामचंद्र रावणावर विजय मिळवून बिभीषणाचा राज्याभिषेक करण्यासाठी कांही काळ श्रीलंकेतच थांबले. रावण वध आणि सीतेची मुक्तता या दोन्ही वार्ता मात्र वाऱ्याप्रमाणे अयोध्येत पोहोचल्या होत्या. आणि अधीर मनाने राजकुमार भरत, शत्रुघ्न यांच्यासह प्रभू रामचंद्राला सामोरे येण्यासाठी म्हणून अयोध्या सोडून दक्षिणेकडे निघाले.

राम भेटीच्या आतुरतेमुळे अयोध्येचे राजकुमार आणि सैन्य थोड्या द्रुत गतीने दंडकारण्यात प्रवेश करते झाले. दंडकारण्याचा स्वामी दंडकारण्येश्वर म्हणजे दंडोबा या ठिकाणी हे पोहोचले असता तेथील जागृत ऋषिंनी त्यांना मरीची ऋषींची समाधीची जागा दाखविली.

मरीची आश्रमात म्हणजे सध्याच्या मिरज ग्रामात ते पोहोचले. तेथून निवासीनीचे करवीरपूर नजिक असल्यामुळे ते तिकडे जावयास निघाले. ही वार्ता प्रभू रामचंद्रांना पोहोचली होती. म्हणून त्यांनी हनुमानाला भरतास असेल त्या ठिकाणी थांबण्याचा निरोप देऊन धाडले.

त्यावेळी करवीरपुराकडे निघालेले लोक या नंदीग्रामात पोहोचलेले होते. प्राचीन काळातले राज रस्ते या नंदीग्रामाशेजारुनच जात होते. आजही विजापुरला जाणारा रस्ता या गावाशेजारुनच जातो.

नंदीग्रामामध्ये भरत अयोध्यावासियांच्यासह पोहोचला असता हनुमानही त्या ठिकाणी पोहोचले आणि त्यांनी छद्म वेशात भरताची परीक्षा घेण्याचे ठरविले.

ज्याठिकाणी भरताची भेट झाली ते ठिकाण आजही पाटणकर वाड्याजवळ दिसते.

हनुमानानी भरताला एका सप्ताहाची मुदत दिली होती. तो सप्ताहपावेतो अयोध्येचे राजकुमार या गावी मुक्कामास होते. दररोज ते पंचगंगेच्या पात्रात उभे राहून सूर्यवंशी असल्यामुळे सूर्याला अर्घ्यदान देत होते. एकाच परब्रह्माची राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न ही चार रुपडी असल्यामुळे भरताचे अर्घ्यदानही जाज्वल्यच असावे.

ज्याठिकाणी राजकुमार भरत उभे राहत होते. त्याठिकाणी नदीच्या पात्रात आजही भरतानी रामासह अयोध्येस परत जाताना शिवलिंगाची स्थापना करुन देवालय तयार केले होते आणि त्यांच्या रामप्रभूची भेट झाल्याची आठवण म्हणून त्यांनी रामेश्वर नावाचे शिवलिंग स्थापन

केलेले आहे. भरत स्वत: या स्थानाला अमृतेश्वर असे समजावयाचे. आजही नांदणी ग्रामवासीयात अशी आख्यायिका आणि असा विश्वास आहे की, पंचगंगेच्या या पात्रात हे स्थान वाळू माती यामध्ये दडून गेलेले असून योग्य तो अधिकारी पुरुष आल्यावर ते स्थान पुनरपि दर्शनास खुले होईल. आमच्यामते वैदिक धर्माच्या विरोधात असलेल्या धार्मिकांनी हे मंदिर पाडलेले असावे. मात्र भरताने प्राणप्रतिष्ठीत केलेले राम अमृतेश्वर त्या ठिकाणी नक्कीच सापडेल.

प्राचीन कथा अवलोकीता प्रभूरामचंद्र सप्ताह अवधीत न आलेने चिता रचून प्राणत्याग करण्याच्या तयारीने राजकुमार भरत याच गावी सिध्द झालेले होते आणि इतक्यात प्रभू रामचंद्र आकाश मार्गानी स्थानप्रत पोहोचले. प्रभू रामचंद्रांना प्रथम बसवून भरत, अयोध्यावासी आणि नंदीग्रामातील लोकांनी ज्याठिकाणी श्रीरामांची पाद्यपूजा केली ते ठिकाण भरताने ब्राम्हणांना दान दिले. आणि त्या ठिकाणी ब्राम्हण वस्ती शुध्द भावात उभी राहिली. जणू कांही राम-भरत भेट आणि प्रभूंची पाद्यपूजा झालेली जागा सतत पावित्र्यात रहावी अशी ही जागा करण्यात आलेली असावी.

कालौघात संपूर्ण भारतावरील परधर्मियांच्या आक्रमणाने आणि अत्याचाराने पवित्र स्थळे नष्ट झाली किंवा दुर्लक्षीत बनली. अयोध्येस परत जाताना मात्र प्रभू रामचंद्रांनी चारीभावासह आणि ललिता गौरीचा श्रीविग्रह असलेल्या सीतेसह श्रीकरवीर निवासीनीचे दर्शन घेतले होते. निवासिनी स्वत: ललिता गौरी असल्यामुळे व प्रभू रामचंद्र तिचा प्रणव असल्यामुळे आणि लक्ष्मण त्या दोघांची मर्यादा असल्यामुळे ही तीन तत्वे गर्भागारात होती. भरत आणि शत्रुघ्न बाहेर द्वाराचे रखवालीस होते. त्याची सत्यता पटविण्यासाठी आणि खूण म्हणून महालक्ष्मीच्या मंदिरात आजही भरत आणि शत्रुघ्न पहारेकऱ्यांच्या रुपातच - मूर्तीरुपात ठेवलेले आढळून येतात.

निवासिनीजवळ अध्यात्म रामायणातील सीता लक्ष्मण सह वर्तमान राम शक्तीभावात असल्यामुळे राम भक्त हनुमानही तेथे पोहोचले. भक्तराज रामदास स्वामीही तेथे आले. खुद्द परम रामभक्त सिध्देश्वर महाराजही स्व-स्थान सोडून करवीरात राहण्यास आले. याच गोष्टीची जाणीव असलेले स्वत: श्रीधरस्वामी महाराज याठिकाणी रामजन्म करु लागले. या सर्वच गोष्टीची जाणीव असल्याने स्वत: श्रीकृष्ण सरस्वतीनी स्वामी समर्थांच्या एका हिऱ्याला आणि आपल्या भक्ताला अध्यात्म रामायण सतत चौदा वर्षे भावी काळासाठी याच एका जागी वाचणेची आज्ञा केली. नंदीग्राम मुस्लिम काळामध्ये एक श्रेष्ठ गाव म्हणून मान्य केलेले होते. ब्रिटीश काळामध्ये रेंदाळ संस्थानातील हे एक महत्वपूर्ण गांव होते. त्याच्या पूर्वी कुंतीभोज राजाच्या काळातही अन्य धर्मियांची या गावांवर सतत भक्तीपूर्ण नजर होती. ब्रिटीश कालखंडाच्या उत्तर काळात मात्र शाहू राजांच्या वडीलांनी जयसिंगपुरची स्थापना केल्यानंतर ते गाव वाढीस लागून हळूहळू नंदीग्रामचे महात्म्य कमी होत गेले. अशा या नंदीग्रामच्या आणि पुण्यवान

भूमीच्या दर्शनार्थ मात्र अध्यात्म साधनेतील लोक न चुकता येत होते आणि कांहीही न बोलता हनुमानाचे आणि ग्रामरक्षक भैरवाचे दर्शन घेऊन पूण्यभूमीस नमन करुन निघून जात होते.

करवीर निवासिनीची पुर्नप्रतिष्ठापना करुन परत जात असताना आद्यगुरु शंकराचार्य या ठिकाणी काहीकाळ वास्तव्य करुन ब्राम्हण समाजास सदोपदेश करुन निघून गेले होते. नंतरच्या काळात श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी कृष्णेच्या परिक्रमेच्या वेळी उपनद्यांच्या परिक्रमेत या गावी वेळोवेळी मुक्काम करुन होते आणि जोशी घराण्याचे अन्नग्रहण करुन, ''तुमच्या घरी दत्त भक्त जन्म घेतील, दत्तभक्ती सतत राहील आणि साक्षात दत्तही जन्म घेईल'' असे आशीर्वचन दिलेले होते. कारण त्यावेळी अन्य धर्मियांच्या कडक धोरणामुळे वैदिक परंपरा किंवा हिंदू धर्मातील साधूसंत किंवा योग्याना अन्नभिक्षा देण्यास त्या गांवात बंदी होती.

जोशी कुटुंबीयांनी श्रीपाद श्रीवल्लभांना आदराने घरी बोलावून पाद्यपूजा करुन भोजन भिक्षा दिलेली होती. त्यानंतरच्या काळात नृसिंह सरस्वती वाडीक्षेत्री राहण्यास आले. सध्याची नृसिंहवाडी हे स्थान त्यावेळी जवळ जवळ निर्जन अवस्थेत होते आणि ते स्थान गाणपत्य करवीर प्रांतातील एक प्रमुख केंद्र होते.

याच ठिकाणी साधना करण्याचे नृसिंह सरस्वतींनी ठरवून भिक्षाटनास मात्र पंचक्रोशीत फिरणेचे नियोजन केलेले होते. प्रमुख गावांच्यापैकी नंदीग्राम हे क्षेत्र असल्यामुळे त्यांनी वरचेवर याच स्थानास भेट देऊन भावी काळात साक्षात गुरु दत्तात्रेयांनी जन्म घ्यावा अशी रचना करवून घेतलेली होती.

लेखक :- **श्री. एम. पी. रायबागकर**



श्री मनोहर पादुकांची पूजा,
श्रीक्षेत्र नृसिंहवाडी

# श्री जोशी कुटुंबीय नांदणी यांची माहिती

कोल्हापूर ते विजापूर या जुन्या महामार्गावर नांदणी हे गांव वसलेले आहे. कोल्हापूर संस्थानात अक्कोळ, वडगांव, कोल्हापूर व नांदणी या चार मोठ्या पेठा आहेत. त्यापैकी नांदणी ही प्रसिध्द बाजारपेठ आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी हे गांव शिरोळ पेठ्यात (तालुक्यात) आहे.

**कृष्णातटी अति पूनित शिरोळ पेटा ।**
**तो नांदणी म्हणूनी गांवही धन्य मोठा ।।**
**जोशी कुलात कुलदीपक सौख्यय राशी ।**
**श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयाशी ।।**

नांदणी गांवच्या जोशी कुळातील मूळ पुरुष महादेव भट असून त्यांना तीन अपत्ये, खंडभट, भीमभट, व रामभट होते. मूळ पुरुषापासुन आप्पा भटांची बारावी पिढी आहे. काशीभटांचे वारस बापूभट. बापूभटांचे वारस श्रीपाद भट, आप्पाभट व गुंडोभट. श्रीपाद भटांचे वारस माहिती उपलब्ध नाही.

आप्पाभटांचे वारस वासुभट, मकरंदभट(मल्लंमभट) आणि कृष्णभट. श्री कृष्णभट म्हणजेच हे आपल्या सर्वांचे दत्तगुरु श्रीकृष्ण सरस्वती दत्तमहाराज होय. मकरंदभट (मल्लंमभट) व वासुभट हे श्रीकृष्ण सरस्वतींचे दत्त महाराजाचे दोन भाऊ होय.

गुंडो भटांचे वारस बळवंत, मल्हार, व श्रीपाद होय. श्रीपादांचे वारस प्राध्यापक श्री अशोक व मुकुंद जोशी होय. श्री अशोक जोशी यांना दोन अपत्ये योगेश्वर व ओंकार. श्री मुकुंद जोशी यांना तीन मुली असुन त्यांची नावे पुढीलप्रमाणे मनिषा(दुर्गा), मुग्धा, धनश्री. सर्व मुली विवाहित आहेत. ही दोन घरांणी नांदणीला स्थायिक असून बाकीची नांदणीकर घराणी मुंबई, बेळगांव, पुणे, कुंभोज, सांगली, डिग्रज येथे स्थायिक झालेली आहेत.

मूळ पुरुषापासून आप्पा भटांची बारावी पिढी आहे. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची तेरावी पिढी असून नांदणीत वास्तव्य करणारे प्राध्यापक श्री अशोक जोशी व श्री मुकुंद जोशी यांची सोळावी पिढी आहे. श्री अशोक जोशी व मुकुंद जोशी यांना श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज चुलत पणजोबा लागतात. श्री अशोक जोशी व श्री मुकुंद जोशी यांचे घरी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची नित्य पूजा अर्चा चालू आहे. तसेच त्यांच्या घरी १३ जानेवारी १९७१ साली राजगिरा या धान्यात उमटलेल्या गुरु पादुका आहेत.

उत्तर भारतात जे जे अवतार कार्य झाले त्या सर्वांची रचना निवासिनिच्या इच्छापूर्तीसाठीच होती. निवासिनीच्या इच्छापूर्तीसाठी दक्षिण भारतात अशा घटना तिने घडवून आणल्या त्या

घटना घडविण्यात तिला आनंद वाटायचा. श्री प्रभू रामचंद्र, श्री कृष्ण लीला व परशुरामाचे कार्य हे सर्वच तिच्या इच्छेने व साक्षीने घडलेले आहे. ज्या ठिकाणी हे कार्य घडलेले आहे त्यांना उपक्षेत्रांची मान्यता आहे. अशा एका गावांत म्हणजे नांदणी येथे श्रीराम भरत भेट व भरत – श्री हनुमान भेट अशा लीला निवासिनीसाठीच झालेल्या असून या दिव्य पुरुषांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नांदणी गावांत एक जोशी घराणे असून ते भारव्दाज या नामवंत गोत्रातील आहे.

जोशी घराणे परिस्थितीपेक्षा आत्मानंदातच जास्त असायचे. संसार व परमार्थ दोन्हीही गोष्टी समानच असत. पुरुष विरक्त असून स्त्रिया पतिव्रता आहेत. जोशी घरांण्याचा पुण्य प्रवास सततच चालू आहे. स्वतःच्या प्रवासात नांदणी हे गांव प्रमुख मार्गावर असलेने श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींनी या घराण्यांत भोजन केले. साधारणपणे आप्पाभटांच्या ११–१२ व्या पिढीत असणाऱ्या जोशींना घराण्यातील असा आशीर्वाद दिला कि पुढील काळात तुमच्या घराण्यात जगध्दोरक जन्म घेईल. या पुढील काळात म्हणजे आप्पाभटांच्या पोटी ''श्री दत्तअवतार'' जन्मला. हा श्री दत्तअवतार म्हणजेच श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज होय.

आप्पाभटांचा नित्यक्रम म्हणजे घरची पूजा–अर्चा करून उपजिविकेसाठी भिक्षुकी करणे, दर शनिवारी व दर पौर्णिमेदिवशी नृसिंहवाडीला जाणे, ग्रामजोशी असल्याने त्यांचे कायम वास्तव्य नांदणीतच आसायचे. याशिवाय जांभळी व हरोली ही गावे भिक्षूकेसाठी होती. आप्पाभटांचा व अन्नपूर्णा देवींचा विवाहसोहळा पार पडला. विवाहानंतर तृप्त अंतःकरणाने शुभाशीर्वाद देऊन अन्नपूर्णा देवीकडील वऱ्हाड जांभळी गावी परतले. ते सुध्दा जड अंतःकरणाने. परंतु जोशी कुटुंब पूर्ण संस्कारीक असलेने ते समाधानी होते.

अन्नपूर्णा देवी सासरी आनंदाने रमू लागल्या पति उठण्याच्या अगोदर उठणे, सडासंमार्जन करणे, तुळशी वृंदावनाजवळ सुबक रांगोळी काढणे, तुळशीला प्रदक्षिणा घालणे, व घर आरशाप्रमाणे स्वच्छ ठेवणे, स्वतःची कामे स्वतः करणे हे सर्व बघून सासू सासरे व पति यांना समाधान लाभत होते. आप्पाभटांना पूजेसाठी स्वच्छ घासलेली भांडी, सुगंधी फुले, गंध उगाळून देणे हा घरगुती नित्यक्रम नेहमीच चालू असायचा. बघता बघता संसाराला ४ ते ६ वर्षे झाली. संसार अतिशय सुखाने व आनंदाने चालला होता. आपल्या संचितात जे आहे ते मिळणारच मग देवाकडे मागणी कशासाठी करायची? अशा स्थितप्रज्ञ वृतीने ते राहत असत. आप्पा भटांच्या काया वाचा मने कार्यात अन्नपूर्णा देवी सहभागी होत असत. एखाद्याची इच्छापूर्ती, अतिथी सेवा, पददलितांना आधार, वृद्ध सेवा, रुग्णसेवा, व देखभाल करीत असत. हे करीत असताना भगवंतावरचे चित्त मात्र कायम असायचे. दर पौर्णिमा व दर शनिवारी नृसिंहवाडीला आप्पाभट पायी चालत जात असत. रात्रभर गुरुदत्ताच्या सानिध्यात

राहून पहाटे संगमावर स्नान संध्या आवरुन, प्रदक्षणा घालून, ऐपतीप्रमाणे दानधर्म करून परतीच्या मार्गाने नांदणीला घरी परत येत. एके दिवशी अतिनम्रपणे अन्नपूर्णादेवी आप्पाभटांना म्हणाल्या ''आपल्या घरी मी पूर्ण सुखी आहे. मी पूर्णपणे संसारात संतुष्ट आहे. परंतु पोटी संतती नसल्याने मन विषण्ण होते. नम्रपणे निवेदन करून मला आपणाला दुःखी करायचे नाही. आपणंच माझे परमेश्वर आहात तुमच्या शिवाय मी कोणाकडे दुःख कथन करणार? माझ्या मनीच्या मनोव्यथासाठी आपणंच भगवान श्री दत्तात्रयसमोर प्रार्थना करावी. ते भक्त कैवारी–त्रिपुरारी प्रसन्न होऊन पुत्र देतील. त्याने संसार सुखाचा होईल.'' आप्पा भट आपल्या पत्नीचे बोल ऐकून थोडा वेळ शांत राहिले व म्हणाले ''अपत्य सुख कोणाला नको असते? ते तर प्रत्येकास हवे असते. या गोष्टी विधाताच ठरवित असतो. गुरुकडे साकडे घालून त्यांना संकटात टाकणे म्हणजे स्वार्थच आहे. हे दैवाधीन आहे. त्यासाठी गुरुंना त्रास देणे मला योग्य वाटत नाही.'' यावर अन्नपूर्णादेवी आप्पा भटांना म्हणाल्या ''गुरुंना संकटात टाकणे उचित नाही हे मला पटते. पण आत्मनिवेदन हा सुध्दा एक भक्तीचाच भाग आहे. माझ्या वतीने माझे आत्मनिवेदन श्री गुरुदत्तांना निवेदन करावे म्हणजे स्वार्थाचा प्रश्न निर्माण होणार नाही.'' अन्नपूर्णादेवीचे हे बोलणे आप्पाभटांना पटले.

ते दर पौर्णिमेला व दर शनिवारी नृसिंहवाडीला जातच राहिले. एकदा नृसिंहवाडीला श्री दत्त दर्शनाला गेले असताना आप्पाभट भावावेषात गेले व नकळत त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले की श्री क्षेत्र गाणगापूर मुक्कामी जाऊन गुरु चरित्र सप्ताह करावा हे इष्ट होईल. बहुतेक हा श्रीदत्तगुरुंचा संदेश असावा. एकमेकांचे विचार समजावून घेवून आप्पा भट व अन्नपूर्णादेवी उभयतां श्री गाणगापूरास गेले. सात दिवस अनुष्ठान करून गुरुचरित्र सप्ताह पूर्ण केला व नांदणीला घरी परत आले. पुन्हा नेहमीप्रमाणे आप्पाभट श्री नृसिंहवाडीला श्री दत्तदर्शनाला गेले असता ते मनोमन श्री गुरुदेव दत्तांना म्हणाले ''हे गुरुदेवा दत्तात्रया माझे मन निर्मळ आहे. माझी कांही सुध्दा मागण्याची इच्छा नव्हती. पण पत्नीच्या इच्छेखातर तिला एक पुत्र संतान दे. तू कृपासागर गोविंद असून तू साक्षात कल्पवृक्ष आहेस. मी तुझे स्तवन करण्यास असमर्थ आहे.'' एवढी याचना करून आप्पाभट भोजन करून झोपी गेले. झोपेत असताना त्यांच्याजवळ एक यतीपुरुष आला व म्हणाला ''चिंता करुन नकोस मी तुझ्या घरी स्वतः पुत्र म्हणून जन्म घेईन.'' आप्पाभटांना मागे ११-१२ व्या पिढीच्या दरम्यान श्रीपाद श्री वल्लभ यानी दिलेल्या आशीर्वादाची आठवण झाली व सत्यताही पटली.या स्वप्नाने आप्पा भटांना जाग आली. संगमावर स्नानसंध्या आटपून स्वप्नात झालेल्या दत्त दर्शनाने प्रसन्न चित्त होऊन नृसिंहवाडीतील दत्त दर्शन घेऊन स्वतःच्याच नादात आप्पाभट घरी जाणेस निघाले. श्री दत्त चरणी तल्लीन होऊन कोणाशी ही न बोलता घरी पोहचले. घरी आल्यावर अन्नपूर्णा देवींना वाडीत घडलेला सर्व वृतांत सांगितला. अन्नपूर्णा देवींना मनस्वी आनंद झाला. उभयता दोघेही अपत्य मुखाच्या दर्शनाच्या अपेक्षेने

दत्त चरणी सेवेत मग्न होऊ लागले. हे सात्विक दांपत्य आसक्ती न ठेवता गुरुपूजा, गुरुध्यान व गुरुसेवेच्या कार्यात मग्न असतानांच त्यांना अपत्याच्या येण्याची चाहूल लागली. आप्पाभटांनी श्री गुरुच्या चमत्काराची सत्यता लक्षात घेऊन साक्षात दत्त अवताराला सांभाळण्याचे सामर्थ्य निर्माण व्हावे म्हणून स्वतःस जास्त काळ दत्त भक्तित व्यतित करण्याचे ठरविले.

दिन प्रति दिन उदरी गर्भ वाढतच होता. अन्नपूर्णा देवींच्या आनंदाचे रुपांतर गंभीरपणात होऊ लागले. त्यांच्या मुख कमलावर व सर्वांगावर एक सात्विक तेज वाढू लागले. हळू हळू त्या शांत व गंभीर दिसू लागल्या त्यांची स्थितप्रज्ञ वृत्ती पाहून दैवी अंशच पोटी जन्म घेत आहे अशी खात्री झाली. आपण आई होणार हे ठाऊक असलेली प्रत्येक स्त्री आपले वागणे, आपले रहाणे व आपले खाणे-पिणे यांची जपणूक करीत असते. परंतु अन्नपूर्णा देवीची अवस्था मात्र वेगळीच होती. त्या स्थितप्रज्ञ व अबोल तर कधी स्वतःशीच स्वतः बोलत असत. केव्हाही मध्येच उठून संभ्रम अवस्थेत चालत जाऊन हनुमानाच्या पारावर बसत व हनुमानाशी बोलत असत. याचप्रमाणे श्री दत्तपादुका व इतर देवदेवता यांच्याशी बोलत असत. कांही वेळा त्यांचे वागणे भ्रमिष्ठासारखे वाटायचे. शेजारच्या इतर बायका म्हणत ''बऱ्याच दिवसानंतर ही गरोदर आहे म्हणून ही वेडी झाली की काय?''

आप्पाभट मात्र हे सर्व शांतपणे बघत होते. आप्पाभटांना कळून चुकले होते की पत्नीच्या उदरी असलेला गर्भ तिला असे वागावयास लावतो आहे. तो गर्भच तिला म्हणजे स्वेच्छेने घेऊन जातो व दैवताशी हितगुज करायला लावतो. आप्पाभटजी आपल्या समोर अन्नपूर्णादेवीनां समोर बसवून घेऊन दत्तस्त्रोते व दत्तस्तवने म्हणत असत. त्यावेळी अन्नपूर्णादेवी गंभीरच असत.पण दत्ताच्या आरतीच्या वेळी मात्र गर्भ स्थिर रहायाचा. त्यावेळी अन्नपूर्णादेवी शांत असत. दिवस भरा भरा चालले होते. आप्पाभटांच्या मनात ह्या सर्व गोष्टीचा विचार मनात चालू होता. अकारण मोहात अडकण्यापेक्षा परमेश्वर/श्री दत्तगुरु जे घडवतील तसेच होऊ दे असे म्हणून स्थिर मनाने पहात बसत. नऊमास पूर्ण होताच प्रसुतीसमय जवळ येऊन ठेपला. शेजारील बायका जमल्या. त्या अन्नपूर्णादेवींना एकांतत घेऊन गेल्या एकच वृध्द बाई आत जवळ होती. सुईणीने बालक हातात घेतले व लगेचच खाली ठेवले. ती घाबरून पळत पळत बाहेर आली व थरथरू लागली. सुईणीला ते बालक विचित्र वाटले. शेजारच्या जमलेल्या बायकापैकी एक वृध्दा धाडस करून आत गेली व तिने तेजःपुंज सुडौल व सदृढ बालकास पाहिले. त्या बालकाला उचलून घेण्याचा तिला मोह झाला तिने तेजपुंज बालक ऊचलून घेताच तिला आयुष्यभराचे श्रम एका क्षणांत नाहीसे झाल्याचे वाटले. तिला आत्मानंद प्राप्त झाला व ही वार्ता संपूर्ण गावात पसरली संपूर्ण नांदणी गांव बालकास पाहण्यसाठी धावले. अशा रीतीने श्री श्रीपाद वल्लभांच्या आशीर्वादाने श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा जन्म इ.स. रविवार दि. ७/०२/१८३६ म्हणजेच माघ वद्य पंचमी शके १७५७ रोजी झाला.

सप्रेम भाव धरुनी गुरु वंदनाचा । ऐसा धरी नियम जो सुखी हा त्रिवाचा ।।
राधेय कृष्ण सुतदास दिगंबराचा । सेवेसि तत्पर उभा सुविनीत साचा ।।
दीनार्तनाशक गुरु करवीरवासी । श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ।।

शब्दांकन :- **श्री अशोक श्रीपाद जोशी**
**श्री मुकुंद श्रीपाद जोशी.**
मु.पो.:-नांदणी ता.:-शिरोळ



**श्री हनुमान मूर्ती**
श्री हनुमान मंदिर, नांदणी

## नांदणी गावच्या जोशी कुलातील मूळ पुरुष महादेव भट असून त्यांना तीन अपत्ये खंडभट, भीमभट व रामभट त्यांची वंशावळ पुढील प्रमाणे–

१) **रामभटांचे वारस –** आप्पाभट– कुषभट–महिपतभट – जीवभट– नरहरभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२) **भीमभटांचे वारस –** हरभट– महिपतभट. महिपत भटाना दोन अपत्ये. रामभट व कृष्णभट.

३) **रामभटांचे वारस –** यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

४) **कृष्णभटांचे वारस –** भीमभट– नरसिंहभट व भानभट. भानभटांना दोन अपत्ये हरभट व आण्णाभट.

५) **हरभटांचे वारस –** माणिकभट– बापूभट व चिमाबाई या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६) **आण्णाभटांचे वारस –**कृष्णभट– संखभट व बामणभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

७) **खंडभटांचे वारस –** खंडभटांना दोन अपत्ये. भगवंतभट व रावजीपंत.

८) **रावजीपंताचे वारस –** आण्णाजीपंत– रामजीपंत – लिंगोपंत– रामजीपंत व बाबाजीपंत.

९) **बाबाजीपंताचे वारस –** बाबाजीपंतांना तीन अपत्ये. रामजीपंत, मल्हारपंत व लिंगभट.

१०) **रामजीपंतांचे वारस –** जासोपंत यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

११) **मल्हारपंताचे वारस –** खंडभट व बाबूराव.

१२) **खंडभटाचे वारस –** खंडभटांना दोन अपत्ये. रामभट व आप्पाभट.

१३) **रामभटांचे वारस –** धोंडभट– बामणभट व म्हाळसाबाई यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

१४) **आप्पाभटांचे वारस –** गोपाळभट व बाळंभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

१५) **बाबूरावांचे वारस –** बाबूरावांना पांच अपत्ये. कृष्णपंत– पांडुरंग– गोविंदपंत– बाळाजीपंत व गोपाळपंत.

१६) **कृष्णपंतांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

१७) **पांडुरंगाचे वारस–** राघोपंत या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

१८) **गोविंदपंतांचे वारस–** हरिहर यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

१९) **गोपाळपंताचे वारस–** बाबाजी यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२०) **बाळाजीपंतांचे वारस –** बाळाजीपंतांना चार अपत्ये, नारोपंत– लक्ष्मण– सदाशिवपंत व सखारामपंत.

२१) **नारोपंतांचे वारस –** बाबाजीपंत या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२२) **सदाशिवपंतांचे वारस –** बाळा यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२३) **सखारामपंतांचे वारस –** दाजीपंत या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२४) **लक्ष्मणपंतांचे वारस–** रावजी– बाळा – तात्या व दत्तू यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२५) **लिंगभटाचे वारस –** लिंगभटाना पाच अपत्ये, माधवभट, आप्पाभट, शिवरामभट, रघुनाथभट व काशिनाथभट.

२६) **माधवभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२७) **आप्पाभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२८) **शिवरामभटांचे वारस –** लिंगभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

२९) **रघुनाथभटांचे वारस –** रघुनाथभटांना एकच अपत्य. गोविंदभट.

३०) **गोविंदभटांचे वारस –** गोविंदभटांना तीन अपत्ये. गोपाळभट– नानाभट व रामभट.

३१) **नानाभटांचे वारस –** यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

३२) **गोपाळभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

३३) **रामभटांचे वारस –** रामभट म्हणजे रामचंद्र गोविंद नांदणीकर हे पुण्यात स्थायिक आहेत. रामभटांचे वडिल गोविंदभट हे पटवर्धन सरकार सांगलीकरांचे वैद्य होते. १९२० च्या प्लेगच्या साथीत रोग आटोक्यात आणण्यासाठी गोविंदभटांनी खूप प्रयत्न केले म्हणून सांगलीकर पटवर्धन सरकारांनी गोविंदभटांचा मान लोकमान्य टिळकांच्या हस्ते सत्कार केला होता. या रामभटांना तीन अपत्ये. गोपाळ–गोविंद व महादेव.

३४) **गोपाळभटांचे वारस –** मल्हार – अजित. अजित डॉक्टर असून सध्या ते मुंबईत अंधेरी येथे आपला व्यवसाय करुन स्थायिक आहेत.

३५) **गोविंदभटांचे वारस –** गोविंदभटांना तीन अपत्ये. वसंत- रघुवीर व खंडेराव.

३६) **वसंतरावांचे वारस –** अशोक व मिलिंद हे आपापल्या व्यवसायात मग्न असून पुणे इथे स्थायिक आहेत.

३७) **रघुवीररावांचे वारस –** गजानन व श्रीकांत हे आपापल्या व्यवसायात मग्न असून पुणे इथे स्थायिक आहेत.

३८) **खंडेरावांचे वारस–** विनायक हे आपल्या व्यवसायात मग्न असून सांगली इथे स्थायिक आहेत.

३९) **महादेवरावांचे वारस –** यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

४०) **काशिनाथभटांचे वारस –** बापूभट.

४१) **बापूभटांचे वारस –** बापूभटांना तीन अपत्ये श्रीपादभट, आप्पाभट व गुंडोभट.

४२) **श्रीपादभटांचे वारस –** रघुभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

४३) **आप्पाभटांचे वारस –**वासूभट- मकरंद (मल्लंभट) व कृष्णभट

४४) **वासूभटांचे वारस –** वासूभट म्हणजे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे बंधू

४५) **मकरंदभटांचे वारस –** मकरंदभट म्हणजे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे बंधू.

४६) **कृष्णभटांचे वारस –** कृष्णभट म्हणजे आपले सर्वांचे गुरु म्हणजे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महराज.

४७) **गुंडोभटांचे वारस –** बळवंत- मल्हार व श्रीपाद.

४८) **श्रीपादांचे वारस –** श्रीपादांना दोन अपत्ये. अशोक व मुकुंद.

४९) **अशोकांचे वारस –** अशोकांना दोन अपत्ये. योगेश्वर व ओंकार. अशोक नांदणी मुक्कामी स्थायिक असून योगेश्वर व ओंकार हे नोकरीसाठी पुणे इथे स्थायिक आहेत.

५०) **मुकुंदाचे वारस –** मुकुंद नांदणी मुक्कमी कायम स्थायिक आहेत.

५१) **भगवंतभटांचे वारस –** गंगाधरभट- नरभट -आण्णाभट - मल्हारभट - जनार्दनभट व नरसीभट.

५२) **नरसीभटांचे वारस –** नरसीभटांना पांच अपत्ये. गोपाळभट- रामभट-शामभट - बाळंभट व अनंतभट.

५३) **रामभटांचे वारस –** यापासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

५४) **अनंतभटांचे वारस –** धोंडभट या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

५५) **बाळंभटांचे वारस –** बाळंभटांना दोन अपत्ये. माणिकभट व बाळकोबाभट.

५६) **माणिकभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

५७) **बाळकोबाभटांचे वारस –** बंचमभट- पांडुरंगभट.

५८) **पांडुरंगभटांचे वारस –** पांडुरंगभटांना तीन अपत्ये. दत्तमभट- नागेशभट व मल्हारभट.

५९) **दत्तभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६०) **नागेशभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६१) **मल्हारभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६२) **शामभटांचे वारस –** नरसिंहभट व कळसभट.

६३) **कळसभटांचे वारस –** कळसभटानां चार अपत्ये. बाळंभट, पांडुरगंभट, आण्णाभट व आप्पाभट.

६४) **बाळंभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६५) **पांडुरंगभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६६) **आण्णाभटांचे वारस –** केशव व गंगाबाई या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६७) **आप्पाभटांचे वारस –** आप्पाभटांना दोन अपत्ये. शामभट व नरभट.

६८) **शामभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

६९) **नरभटांचे वारस –** आप्पाभट- विठ्ठलभट.

७०) **विठ्ठलभटांचे वारस –** विठ्ठलभटांना तीन अपत्ये. श्रीकृष्ण, माधव व दत्तात्रय.

७१) **श्रीकृष्णांचे वारस –** विजय हे यड्राव येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

७२) **माधवांचे वारस –** विनायक हे यड्राव येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

७३) **दत्तात्रयांचे वारस –** दत्तात्रय हे यड्राव येथे स्थायिक होते.

७४) **गोपाळभटंचे वारस –** नारायणभट.

७५) **नारायणभटांचे वारस –** नारायणभटांना दोन अपत्ये. मल्हारभट व महिपतभट.

७६) **मल्हारभटांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

७७) **महिपतभटांचे वारस –** महिपतभट उर्फ बाबा महाराजांना एकच अपत्य. रामकृष्ण उर्फ आप्पा.

७८) **रामकृष्णांचे वारस –** रामकृष्णांना दोन अपत्ये. महादेव व गोविंदराव.

७९) **महादेवरावांचे वारस –** महादेवरावांना दोन अपत्ये. नारायण व कृष्णाजी.

८०) **नारायणरावांचे वारस –** नारायणरावांना एकच अपत्य प्रकाश.

८१) **प्रकाशरावांचे वारस –** प्रकाशरावांना दोन अपत्ये. गुरुनाथ व विनोद.

८२) **गुरुनाथांचे वारस –** गुरुनाथ हे पुणे येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

८३) **विनोदांचे वारस –** विनोद हे सांगली येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

८४) **कृष्णाजींचे वारस –** कृष्णाजींना दोन अपत्ये. वसंत व कुमार.

८५) **वसंतांचे वारस–** वसंतांना एकच अपत्य. अवधूत. अवधूत हे कुंभोज ता. हातकणंगले येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

८६) **कुमारांचे वारस –** कुमारांना एकच अपत्य. ऋषिकेश तथा संभाजी. हे सांगली येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

८७) **गोविंदरावांचे वारस –** गोविंदरावांना दोन अपत्ये. रामकृष्ण व दत्तात्रय.

८८) **रामकृष्णांचे वारस –** रामकृष्णांना तीन अपत्ये. अरुण- वरुण व गजानन.

८९) **अरुण यांचे वारस –** अरुण यांना एकच अपत्य अनिल.

९०) **अनिल यांचे वारस –** अमेय मौजे डिग्रज येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

९१) **वरुण यांचे वारस –** वरुण यांना एकच अपत्य. सुनिल हे सांगली येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

९२) **गजानन यांचे वारस –** गजानन याना एकच अपत्य. गिरीश. गिरीश हे पुणे येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

९३) **दत्तात्रयांचे वारस –** दत्तात्रयांना चार अपत्ये. शशिकांत- सुयश- सुधाकर व लक्ष्मण.

९४) **सुयश यांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

९५) **शशिकांत यांचे वारस –** या पासून पुढे माहिती उपलब्ध नाही.

९६) **सुधाकर यांचे वारस –** सुधाकर यांना एकच अपत्य. विजय. विजय हे मौजे डिग्रज येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

९७) **लक्ष्मण यांचे वारस –** लक्ष्मण यांना दोन अपत्ये. अमित व रणजित.

९८) **अमित यांचे वारस –** रणजित यांना एकच अपत्य. पियुष हे पुणे येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

९९) **रणजित यांचे वारस –** रणजित यांना एकच अपत्य. ज्ञानेश हे पुणे येथे स्थायिक असून आपल्या व्यवसायात मग्न असतात.

मूळ पुरुषापासून आप्पाभटांची १२ वी पिढी आहे. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची १३ वी पिढी असून नांदणीत वास्तव्य करणारे श्री अशोक जोशी व श्री मुकुंद जोशी यांची १६ वी पिढी आहे. श्री अशोक जोशी व श्री मुकुंद जोशी यांना श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज चुलत पणजोबा लागतात. श्री अशोक जोशी व श्री मुकुंद जोशी यांचे घरी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची नित्य पूजा अर्चा चालू आहे. त्यांच्या घरी १३ जानेवारी १९७१ साली राजगिरा या धान्यात ऊमटलेल्या पादुका आहेत.

शब्दांकन – **श्री अशोक श्रीपाद जोशी, नांदणी**



श्री गोपूजा

## महाराजांच्या मूळ घराचे मालक

# श्री ऐनापुरे कुटुंब यांची माहिती

१२५६ सालापासून ऐनापुरे घराण्याचा इतिहास आहे. कै. आम्माण्णा ऐनापुरे यांना तीन मुले आप्पाण्णा – बाळीशा – पारिसा. एकत्र कुटुंब असतांना महाराजांच्या मूळ घराण्याचे दोन हिस्से खरेदी केले. तिसरा हिस्सा नंतर खरेदी केला. आप्पाणा–बाळीशा–पारिसा पैकी आप्पाणा यांना मूलबाळ नव्हते. म्हणून त्यांनी बाळीशांचा एक मुलगा भरमू यांस दत्तक घेतले. भरमू यांस दोन मुले. एक आणासो व दुसरा भूपाल

आप्पाण्णा – बाळीशा – पारिसा पैकी बाळीशा यांना तीन मुले पैकी एक भरमू आपल्या काकांना दत्तक गेला. उरले दोन आम्माण्णा व नेमाण्णा पैकी आम्माण्णा यांना तीन मुले. कल्लाप्पा व बंडू. नेमाण्णा यांना एक मुलगा सुरेंद्र व सुरेंद्रला एक मुलगा शीतल.

आप्पाण्णा – बाळीशा – पारिसा पैकी पारिसा यांना एक मुलगा जिन्नप्पा. जिन्नप्पा यांना तीन मुले. महावीर, बाबासो व विद्यासागर.

आज घडीला सर्व ऐनापुरे कुटुंब जरी विभक्त असले तरी महाराजांचे मूळ घरी म्हणजे आप्पा भटांचे घरी सकाळी व सायंकाळी पूजा असते. सर्व ऐनापुरे कुटुंब नातवंडे व परतवंडासह पूर्ण सुखात आहे. फोटो पूजन प्रत्येकाकडे आहे. कोणत्याही प्रकारचा त्रास नाही. सर्व ऐनापुरे कुटुंबाची भरभराट सुरु आहे. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या प्रसादाच्या कार्यक्रमात सहभागी असतात.

शब्दांकन :– **श्री मुकुंद जोशी**, नांदणी



श्रींचे जन्मस्थान, नांदणी ता. शिरोळ



श्री क्षेत्र पीठापूर (आंध्र)



श्री क्षेत्र कुरवपूर (कर्नाटक)

## ।। अध्याय ३ रा ।।




**श्री क्षेत्र मंगसुळी (कर्नाटक)**

### ▪ विषयसूची....!

१) श्रींचे बालपण
२) श्रीकृष्णदेव खंडेरायांच्या दर्शनाला
मंगसुळीला प्रयाण

## अध्याय ३ रा

बघता बघता श्रीकृष्ण सात वर्षांचा झाला. सवंगड्यांना गोळा करुन खेळू लागला. उंच दगडावर बसावे, तेच सिंहासन म्हणावे कोणी भुखेने व्याकुळ असेल त्यास अन्न द्यावे, थंडीने कुडकुडत असेल त्यास वस्त्र द्यावे. साधुवृत्तीने वागावे. सवंगड्यांना म्हणावे ''तुमची दु:खे/ संकटे मी दूर करतो'' याप्रमाणे कारणिक सत्पुरुषा प्रमाणे वागावे. श्रीकृष्णाचे हे वागणे बघून सवंगडी त्याला वेडा म्हणत, हसत, त्रास देत. गांवचे लोक त्यास वेडपिसा म्हणू लागले, अपशब्द बोलून निंदा करु लागले. हे पाहून आप्पाभट व अन्नपूर्णाबाईंना खूप दु:ख होई, मनस्ताप होई. परंतु श्रीकृष्ण नेहमी शांत, आनंदी, प्रसन्न असे.

उपनयन / मौजीबंधन केल्यानंतर श्रीकृष्णाच्या वागण्यात / बोलण्यात बदल होईल, सुधारणा होईल म्हणून वयाच्या आठव्या वर्षी आप्पाभटजींनी त्यांचे मौजीबंधन केले. गायत्री मंत्राचा उच्चार व्यवस्थित करता येत नाही म्हणून पुरोहिताने श्रीकृष्णास जडमती म्हणून वेदपठणास अयोग्य संबोधले. कांही दिवस गेल्यावर एके दिवशी श्रीकृष्ण मातेजवळ गेला व म्हणाला ''माते आपला कुलस्वामी खंडोबा आहे. त्याच्या दर्शनाला मंगसुळीला जाण्याची परवानगी दे'' मुलाचे हे भाषण ऐकून अन्नपूर्णाबाई चकीतही झाल्या व चिंताग्रस्तही झाल्या. त्या श्रीकृष्णास म्हणाल्या ''माझ्या लाडक्या बाळा, तू घर सोडून गेल्यास घर मला ओस वाटून चैन पडणार नाही. त्यातून तू लहान वयाचा कोमल बालक आहेस. वाट चुकल्यास तुला कष्ट फार होतील. म्हणून मंगसुळीला खंडेरायाच्या दर्शनाला जाण्याचा बेत तूर्त तू सोडून दे'' मायलेकराचे बोलणे चालू असताना तेथे अचानक आप्पाभटजी आले व अन्नपूर्णाबाईंना विचारु लागले ''कृष्णा आज काय बोलतोय?'' अन्नपूर्णाबाईंनी श्रीकृष्णाचे मनोगत आप्पाभटजींना सांगितले. त्यावर आप्पाभटजी म्हणाले ''श्रीकृष्णाच्या इच्छेआड येवू नकोस. प्राक्तन देवादिकांना सुटत नाही. प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या पोटी आला आहे त्याला मंगसुळीला जाण्याची परवानगी दे.''

दुसऱ्या दिवशी आई-वडीलांना वंदन करुन श्रीकृष्ण श्री खंडेरायाच्या दर्शनासाठी मंगसुळीची वाट चालू लागले. उन्ह तापत होते. दोनप्रहरची वेळ बेडग गांवातून जातांना एक मोठी विहीर पाहून तिच्या काठावर शिदोरी ठेवून श्रीकृष्ण स्नानासाठी विहीरीत उतरले. इतक्यात एका कुत्र्याने त्यांची शिदोरी पळवून नेली. स्नान करुन श्रीकृष्ण वर काठावर आले. त्यावेळी गांवातील कोणी एक स्त्री पाणी भरण्यासाठी आलेली त्यांनी पाहिले व म्हणाले ''मातोश्री, माझ्या आईने मला वाटेत भूख लागेल म्हणून फराळाचे जिन्नस बांधून दिलेली शिदोरी तू कां घेवून गेलीस? तुलाही मुले बाळे असतील. मला फार भूख लागली आहे.'' श्रीकृष्णाचे हे मंजुळ बोल ऐकून तिला मोठे कौतुक वाटले व ती म्हणाली ''तू कांही काळजी करु नकोस.

मी तुझी भूख शांत करीन. तू माझ्याबरोबर घरी चल'' असे बोलून श्रीकृष्णास घेवून ती घरी गेली. दही व भात कालवून खाण्यासाठी श्रीकृष्णा समोर ठेवला. परंतु श्रीकृष्णांनी तो खाल्ला नाही. मग त्या स्त्रीने श्रीकृष्णास घास भरविला. दही भात भक्षण करुन तृप्त होऊन ''तुला मुलगा होईल'' असा आशीर्वाद देवून श्रीकृष्ण पुढे जाण्यास निघाले. हे ऐकून ती स्त्री आश्चर्यचकीत झाली व हे मूल कोणी तरी सत्पुरुष असावे असे तिला वाटले व म्हणू लागली ''माझे पती बाहेर गेले आहेत, ते येई पर्यंत येथे वास्तव्य कर. ते आल्यानंतर मी तुला पक्वांन्नाचे भोजन देईन मग पुढे निघ''तिच्या विनंतीकडे लक्ष न देता श्रीकृष्ण म्हणाले ''मला मंगसुळीला देव दर्शनाला जाण्याची घाई आहे. राहणेचा विनाकरण आग्रह करु नकोस'' श्रीकृष्णाचे बोलणे ऐकून त्या स्त्रीला फार दुःख झाले. श्रीकृष्णाला बरोबर कांही खाण्याचे पदार्थ दिले व आपल्यावर कृपा असावी अशी विनंती केली. पुढे कांही काळाने श्रीकृष्णाच्या कृपेने त्या स्त्रीला पुत्र प्राप्ती झाली व सुखी झाली.

पायी चालत श्रीकृष्ण मंगसुळीला निघाले. रस्त्यात आरगेच्या लक्ष्मीचे दर्शन घेवून मंगसुळीला मुक्कामी पोहचले. श्री खंडेरायाचे दर्शन घेवून त्यांची स्तुती केली ''तू आमचा कुलस्वामी आहेस. प्रत्यक्ष दर्शन देवून मला कृतकृत्य कर'' अन्नपाणी सोडून लिंबाच्या झाडाखाली श्री खंडेरायाचे ध्यान करीत श्रीकृष्ण मंदिरासमोर बसले. दोन चार दिवस गेले इतक्यात तेथे एक ब्राम्हण आला आणि श्रीकृष्णांना म्हणू लागला ''बाळा तुझे हे निर्वाण व्यर्थ आहे. कलीयुगी देवाने बौध्दरुप धरले आहे. त्यामुळे तुला प्रत्यक्ष दर्शन देणे / मिळणे कठीण आहे. देवाचा प्रसाद घेवून आल्या रस्त्याने परत जा'' ब्राम्हणाचे भाषण ऐकून श्रीकृष्णाला आश्चर्य वाटले. ज्याअर्थी आपल्या मनातील श्री खंडेराय दर्शनाचा हेतू यास समजला त्याअर्थी हा ब्राम्हण सामान्य नसून सर्वज्ञ श्री खंडेरायाच असले पाहिजेत. श्रीकृष्ण देवांनी त्या ब्राम्हणास सांगितले निश्चयाने ''नामदेवाने कपाळ फोडून श्री विठ्ठलाचे दशर्न घेतले तर मीही नामदेवासारखे कपाळमोक्ष करीन, परंतु श्री खंडेरायाचे दर्शन घेईन'' श्रीकृष्णाचा हा निश्चय / निर्धार पाहून ब्राम्हणाने ताबडतोब वेष पालटून नंदीवर बसून पार्वतीसह शंकराने / श्री खंडेरायाने प्रत्यक्ष दर्शन दिले व श्रीकृष्णाच्या मस्तकावर आशीर्वादाचा हात ठेवून म्हणाले ''बाळ, तू माझाच अंश असून, दीनउध्दाराकरीता अवतार घेतला आहेस. अक्कलकोटला नृसिंहभान स्वामी त्रैमूर्तिचा अवतार आहेत. तेथे त्वरीत जा. त्यांना गुरु करुन घे व त्यांच्या आज्ञेने जग उध्दाराचे कार्य कर'' इतके बोलून भगवान शंकर / श्री खंडेराया गुप्त झाले. श्री खंडेरायाचे / श्री शंकराचे दर्शन घेवून श्रीकृष्ण माता पित्यांना भेटण्यासाठी परत नांदणीला निघाले. श्रीकृष्ण श्री खंडेरायाच्या दर्शनाला मंगसुळीला जाऊन बरेच दिवस झाल्याने अन्नपूर्णाबाई घरात काळजी करीत बसल्या होत्या. बाळ लहान असल्याने बाहेर गावी मंगसुळीला गेला असल्याने तिला रुखरुख लागली

होती. चैन नव्हता. शोकाकूल झाली होती. कधी एकदा मूल दृष्टीस पडेल असे तिला झाले होते. प्राण कंठात आला होता. इतक्यात एक दिवस अचानक श्रीकृष्ण घरी परतले. तिच्यापुढे उभे राहिले. अन्नपूर्णाबाईंना अतिशय आनंद झाला. तिचा आनंद गगनात मावेना. त्यास अलिंगन देवून त्याची मुखकांती पाहून कोणीतरी योगी पुरुष आपल्या पोटी आला आहे असे वाटले. मुलाला काळाचे भय नाही. त्याचे संरक्षण देव करणार. किंबहुना दत्तानेच / देवानेच हा प्रत्यक्ष अवतार आपल्या पोटी घेतला आहे असे मानून अन्नपूर्णा बाई आनंदाने राहू लागली.

*****




श्री खंडेराया मूर्ती, मंगसुळी ता. अथणी जि.बेळगांव

# दक्षिणेचा लोकदेव श्री खंडोबा

## महाराष्ट्र– कर्नाटकाचा लोकदेव

महाराष्ट्रात ''खंडोबा'' आणि कर्नाटकात ''मैलार'' या नावाने ओळखला जाणारा हा लोकदेव. कर्नाटक – महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अनुबंधाचे एक प्रकट प्रतीत आहे. ''मल्हारी मार्तंड भैरव'' हे त्याचे संस्कृत नांव. या देवतेची लोकप्रियता एवढी व्यापक आहे की, धनगर, रामोश्यांपासून देशस्थ ब्राम्हणापर्यंत समाजाच्या सर्व थरांत त्याची उपासना प्रचलित आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रदेशात त्याची अनेक प्रतिकस्थाने असून, तेथे यात्रा–उत्सवांच्या निमित्ताने समाजाचे सर्व स्तर गर्दी करीत असतात.

१) ज्याला आपण खंडोबा किंवा मैलार या नावाने ओळखतो, तो शिवाचा मार्तंड भैरवरुपी अवतार आहे. २) मणी आणि मल्ल या दोन दैत्यांनी मणिचूल पर्वतावर धर्मपुत्र सप्तर्षींचा छळ केल्यामुळे त्याला मणी–मल्लांच्या वधासाठी अवतार घ्यावा लागला. ३) अवतार–ग्रहणापूर्वी त्याने आपल्या जटेतून ''घृतमारी'' नामक महामारी निर्माण केली. ४) मार्तंड भैरव चतुर्भूज, डमरु – त्रिशूल – खड्ग – पात्र धारण केलेला, सर्पभूषण, चंद्रकलान्वितमुकूट युक्त, रुंडमाला ल्यायलेला आणि कपाळावर भंडारा चर्चिलेला असा होता. त्याचे वाहन ''नंदी'' हेच होते. त्याच्या बरोबर कुत्रे होते. ५) मणी–मल्लांच्या वधानंतर त्या दैत्यांचा प्राणान्त होते वेळी त्यांना दिलेल्या वरांमुळे त्याच्या चरणाखाली दैत्यशिरे शोभू लागली. त्यास अश्वारुढ रुप प्राप्त झाले आणि ''मल्लारी'' या विशेषणाचा गौरव प्राप्त झाला. ६) मणी–मल्लांच्या वधानंतर सप्तर्षींच्या विनंतीवरुन तो मणीचूल पर्वताच्या सानिध्यात प्रेमपूर या स्थानी म्हाळसेसह लिंगद्वयरुपाने राहू लागला. ७) मार्तंड भैरवाच्या शक्तीचे नांव ''म्हालसा'' किंवा ''गंगा–म्हालसा'' असेच दिले आहे. ८) प्रेमपुरात मार्तंड भैरव म्हाळसेसह प्रकटल्यावर तेथे यात्रेसाठी देव गोळा झाले आणि त्यांनी उत्सवाहसाठी मार्तंड भैरवाची मृण्मय मूर्ती निर्माण केली, तिचे नांव ''मैलार'' म्हणजे प्रथम स्वयंभू लिंगद्वय होते, नंतर मूर्ती तयार झाली ''मैलार'' या गावांचे स्पष्टीकरण ''मल्लारीमहात्म्या'' त दिले आहे.

### खंडोबा : इंद्र

''मल्हारी'' या नावांने महाराष्ट्रात प्रसिध्द असलेला आणि ''मल्लय्य'' या नावाने कर्नाटकात प्रिय असलेला हा देव एकच असला, तरी या उभयप्रदेशांतील त्यांच्या रुपांची घडण काहींशी भिन्न आहे. ''मल्लय्य'' हा ''गिरीश'' रुद्र (मले – डोंगर) आहे, तर ''मल्हारी'' हा इंद्र आहे. ''पुरे आणि पर्वत'' यांविषयी ऋषींना आपुलकी नव्हती. त्याविषयी विरोधच असावा आणि मल्लासूर म्हणजे पर्वतेयांचा नाश करणारा देव म्हणजे तो (मल्हारी) इंद्र असावा असे वाटते. मल्लारीची मुर्ती अश्वरोही असून तिच्या हातात खड्गासारखे आयुध आहे, यावरुन हा देव इंद्र असावा.

**खंडोबा : रवळोबा आणि जोतिबा**

रवळनाथ हा कोकणातील देव खंडोबाशी एकरूप मानला आहे. ''रवळनाथ-रवळदेव-रवळेश्वर'' हे खंडोबाचेच एक नाव असून, त्यांच्या मूर्तीवरुन त्या दोघांचे एकरुपत्व चांगलेच प्रत्ययास येते.

रवळनाथाची स्थाने कोकण, गोमंतक आणि कारवार या भागत अनेक आहेत. रवळनाथाची मूर्ती उभी असते. तिचा डावा पाय किंचित वाकवून पुढे केलेला असतो. तो चतुर्भुज असून त्याच्या चार हातात खड्ग, त्रिशूल, डमरू व पानपात्र या वस्तू असतात. त्याचे वाहन घोडा हे उजव्या बाजूस कोरलेले असते. परंतु प्रत्येक मूर्ती वाहनयुक्त दाखवितात असे नाही. क्वचित एकाद्या ठिकाणी कुत्राही असतो. त्यास मिशाही दाखवितात. तो ब्रम्हचारी आहे. अशी द्विभुज, तर कुठे चर्तुभुज स्वरुपात आढळते. तिच्या चर्तुभुज रुपाची आयुधे रवळनाथाच्या आयुधांप्रमाणेच असतात.

जी स्थिती रवळनाथांची, तीच जोतिबा किंवा केदारनाथाची, कोल्हापूर जवळील जोतिबा हा देव केदारनाथ किंवा केदारलिंग या नावानेही ओळखला जातो. केदाराचे ध्यान असे आहे :

**केयुरणी भूविशूषितैः करयुगै रत्नांकितैः सुन्दरैः ।**
**नानाहारविचित्रपत्रगयुतैः रत्नांकितैः सुन्दरै ।**
**हस्ताभ्यां धृतखड्गपात्रडमरुं शूलं सदा भ्राजितम् ।**
**वातहवानि-दैत्यदर्पदलनं केदारमीशं भजे ।।**

**मल्लारी मार्तंड भैरव : एक रहस्य**

खंडोबाची उपासना कर्नाटकातून महाराष्ट्रात आली, ''मैलार'' हे त्याचे कानडी नाव होय आणि ''मैलार'' व त्याची पत्नी ''मालची'' (म्हाळसा) यांच्या प्रतिष्ठेची प्राचीनता शिलालेखांच्या आधारे निदान अकराव्या शतका इतकी मागे नेता येते. खंडोबाचे उपासक आणि उपासना यांचे स्वरुप पाहता तो मूलत: (आणि अजुनही) समाजाच्या सर्व स्तरांत प्रिय असलेला एक देव आहे, हे उघड आहे.

**खंडोबाची प्रतीके :**

खंडोबाची प्रतीके विविध आहेत. लिंग, तांदळा, मूर्ती, टांक ही प्रतीके आज रुढ असून कापडी मुखवट्याचे एके काळी रूढ असणारे प्रतीक आज आढळत नाही.

**खंडोबाचा परिवार**

खंडोबाच्या परिवारात म्हाळसा, बाणाई, हेगडे प्रधान, घोडा आणि कुत्रा यांचा समावेश होतो. खंडोबाच्या परिवाराचे स्वरुप हे असे आहे. या परिवारातील म्हाळसेला स्वतंत्र व्यक्तिमत्व नव्हे-विभूतिमत्व आहे. म्हणून तिचे स्वरुप पुढील स्वतंत्र प्रकरणात स्पष्ट केले आहे.

**म्हाळसा : नामरहस्य**

महाराष्ट्रात म्हाळसा आणि कर्नाटकात माळव्व या नांवानी लोकप्रिय असलेली ही देवता

माळजदेवी, म्हालजा, मालचिदेवी, मालची, मालाची, मालती, माळवी, म्हालसा, म्हालसिका, महालसा, महालय्या, महालाय इत्यादी, नावांनी उल्लेखली गेली आहे. म्हाळसेची व्युत्पती ''मदालसा–मआलसा–महालसा–म्हालसा–म्हाळसा'' अशी दिली आहे.

म्हाळसेला ''जोगेश्वरी'', ''भैरवी'' अशीही नावे आहेत. म्हाळसा ही मार्तण्ड भैरवाची पत्नी. ''भैरवी'' हे भैरव–पत्नीवाचक स्त्रीलींगी रुप. जोगेश्वरी (योगेश्वरी) महाराष्ट्रात भैरवा बरोबर सर्वत्र आहे.

**म्हाळसेची मंदिरे**

म्हाळसा खंडोबाची पत्नी आज नांदत असली. तरी, मूळची ती स्वतंत्र देवता होती आणि तिने खंडोबाशी नाते जोडल्यानंतरही आपल्या स्वतंत्र ''निवासस्थानाचा त्याग केला नाही व आजही ती एक स्वतंत्र देवता म्हणून अनेक ठिकाणी गाजत आहे. देवीहोसूर येथील अकराव्या शतकात प्रसिध्द असलेले माळजदेवीचे मंदिर आज बनशंकरीचे मंदिर म्हणून ओळखले जाते.'' ''स्थानपोथी''त भोगावती (पैठण), वालसेंग (जि.औरंगाबाद–''वाल सावंगी'') नांदुरा (''अगर नांदरा'' जि.बीड) आणि नेवासे (जि.नगर) या चार स्थानी म्हाळसेची मंदिरे असल्याचे उल्लेख आहेत. बीडजवळ म्हाळसापूर जवळे व टोक्याजवळ म्हाळापूर नामक म्हाळसेचे उपेक्षित स्थान आजही आहे. बीदर विभागात खंडोबाच्या मैलारपूरापासून दोन मैलावर एक म्हाळसापूर आहे. ''महिकावतीच्या बखरीतील म्हाजलापूरची देवी ही म्हाळसाच. म्हालजापुरीच केशवाचार्याने म्हाळसेच्या साक्षीने महाराष्ट्र–धर्म–रक्षणाची स्फूर्तीदायक योजना मांडली. या बखरीत या देवीला ''योगेश्वरी'' म्हटले असून ''श्रीदेवी जगदंबिका महाराष्ट्रधर्मरक्षिका'' असा तिचा गौरव केला आहे.'' सध्या विशेष प्रसिध्द असलेली म्हाळसेची स्थाने म्हणजे नेवासे (जि.नगर) आणि म्हाडदोळ (गोमंतक) ही दोन होत. पैकी नेवासे हे प्राचीन असून म्हाडदोळचे स्थान सतराव्या शतकारंभी निर्माण झाले आहे. गोमंतकातील म्हाळसेचे स्थान पूर्वी वेर्णे या गांवी होते. परंतु सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी हिंदू मंदिराचा विध्वंस सुरु केला. त्यात वेर्णे येथील म्हळसामंदिराचा क्रम पहिला लागला. वेर्णे येथील म्हळसा पुढे म्हाडदोळला स्थलांतरित झाली.

''मल्लारिमहात्म्य'' या संस्कृत ग्रंथाचे एकूण बावीस अध्याय असून, श्लोकसंख्या ९४० आहे. मोरोपंतानी ७७ आर्यात लिहीलेल्या ''मल्लारी–विजया''त मल्लारिमहात्म्या'' तीलच कथा आहे. मैलारदेवाचे मैलार (जि.बळ्ळारी) हे कर्नाटकातील प्रसिध्द स्थान नेमके या दक्षिणी उज्जयिनीच्या वायव्येस आहे.

**मैलार–खंडोबाची प्रतीकस्थाने**

खंडोबाची क्षेत्रे जशी महाराष्ट्रात तशीच कर्नाटकातही अनेक आहेत. जेजुरी, (ता. पुरंदर, जि. पुणे), निमगाव (ता. खेड, जि. पुणे), शेगुड (ता. कर्जत, जि. नगर), सातारे (ता. व जि.

औरंगाबाद), नळदुर्ग (जि. उस्मानाबाद) आणि पाली (जि. सातारा) ही महाराष्ट्रातील सहा प्रसिध्द स्थाने. तसेच नांदेड जवळील माळेगाव, पेठ (ता. वाळवा , जि. सांगली), मल्हारपेठ (जि. सातारा), तिलोरे (मुंबई-गोवे मार्ग), पुण्याजवळील कोंढापूर (पुणे नगर मार्ग), बीड, चांदखेड (ता. मावळ, जि. पुणे), नेवासे (जि. नगर), नागपूर इत्यादी अनेक ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत. कनार्टकात मंगसुळी (बेळगाव), मैलारलिंग (धारवाड), मैलार-देवरगुड्ड (धारवाड), मैलार किंवा मण्मैलार (बळ्ळारी), मैलारपूर (बीदर) ही स्थाने जागती - गाजती आहेत.

वरील स्थानकाशिवाय लैखिक आणि वाङ्‌मयीन उल्लेखांवरुन पुढील स्थानांची नावे कळतात : कौरवदुर्ग (भुवनदुर्ग), पाली (जि. बीड), साडेगाव (जि. औरंगाबाद), सोनई (ता. नेवासे, जि. नगर), कल्लुकोटे (शिरे-तुमकूर, म्हैसूर), अनेगुंदी (विजयनगर), कारीमनी (परसगड-बेळगाव), पेनुगोंडे (अनंतपूर), वेमवरम् (रामचंद्रपुरम्-गोदावरी), कोंडवीड्डु (गुंटूर), पट्टरु (पाटूर), कुबटूर (शिवमोग्ग-म्हैसूर), मैलापूर (मद्रासचा एक भाग), पेदीपाड (ओंगोल-नल्लूर) या स्थानापैकी पाली (बीड) साडेगाव व सोनई या तीन स्थानकाशिवाय बाकीची द्राविड प्रदेशांतील आहेत.

**वाघ्या-मुरळी**

देवीचे जसे गोंधळी आणि भुत्ये हे उपासक, तसेच खंडोबाचे वाघ्यामुरळी. अपत्य प्राप्तीसाठी देवाला नवस करणारे लोक दोन मुले होताच पहिले मूल देवास अर्पण करीत. त्यातील मुलगे वाघ्ये बनत आणि मुली मुरळ्या बनत.

**कुळधर्म-कुळाचार**

खंडोबा हा कुलदेव असल्यामुळे अनेक कुटुंबात देव्हाऱ्यात त्याचा टांक असतो आणि त्यासाठी कुळधर्म साजरा करावा लागतो. चंपाषष्ठीच्या निमित्ताने शु.प्रतिपदेपासून देवीच्या नवरात्राप्रमाणे खंडोबाचे नवरात्र (षड्‌रात्र) सुरु होते आणि षष्ठीच्या दिवशी कुळधर्म होतो. हा कुळधर्म षौषी, माघी, चैत्री, श्रावणी या पौर्णिमांनाही असतो. खंडोबाच्या कुळधर्मासाठी ठोंबरा (जोंधळे शिजवून त्यात दहीमीठ घालून केलेला पदार्थ), कणकेचा रोडगा (जाड भाकरी) वांग्याचे भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ नैवेद्यात असतात. तसेच गव्हाच्या ओंब्या, हुरडा, तीळ व गुळ असे एकत्र कांडून त्याचा दिवा करुन त्यात फुलवात लावतात. त्या दिव्याला ''उंडी'' असे म्हणत. चातुर्मासात कांदा - लसूण वर्ज्य मानणारे लोक चंपाषष्ठीच्या कुळधर्मानंतर त्याचदिवशी देवाच्या नैवेद्यात कांदा-लसणाचा समावेश करुन कांदा-लसूण खाण्यास प्रारंभ करतात.

**कुळधर्माच्या वेळी नैवेद्य समर्पणापूर्वी ''तळी भरण्या'' चा विधी असतो.**

लग्न मुंजीसारख्या संस्कारानंतर देवदर्शनाला जाणे आणि वाघ्या-मुरळ्यांचे जागरण करविणे हाही कुलाचार रुढ आहे. ''जागरण'' म्हणजे पाच ऊसांच्या मखरात प्रतिकात्मक देवस्थापन

करुन वाघ्या-मुरळ्यांचा समूह तुणतुणे, घोळ या वाद्यांच्या साथीने देवाची गाणी गाण्याचा जो कार्यक्रम करतात तो होय.

**भंडार, बेल-दवणा, तेलहंडा व कांदा-वांगे**

खंडोबाच्या उपासनेत भंडाराचे महत्व फार, भंडारा म्हणजे हळदीची पूड, हळद ही सौभ्याग्यभूषण आणि एक बहुगुणी औषधी म्हणून प्रसिध्द आहे. मैलाराच्या उपासनेत रुढ असणाऱ्या भंडाराला पुढे मार्तंड भैरवाच्या सुवर्णकांतीची जोड मिळाली असावी आणि भंडाराचे निराळे समर्थन पुढे आले असावे. सुवर्ण हा दिव्य धातु मानला जातो. खंडोबाला बेल आणि दवणा प्रिय आहे. या दोन्ही वनस्पती शिवसंबंध आहेत. खंडोबा हा शिवावतार ठरल्यामुळे त्या त्यांच्याही उपासनेत रुढ झाल्या. चंपाषष्ठीच्या आदल्या दिवशी एका हंड्यात अनेकांच्या घरातील तेल गोळा करुन, तो हंडा गडावर न्यावयाचा आणि ते तेल समर्पण करावयाचे - त्या तेलाने देवाला अभिषेक घालवयाचा, अशी प्रथा जेजुरीला आहे. चातुर्मासात वर्ज्य असलेली कांदा व वांगे ही शाका - फळे चंपाषष्ठीच्या नैवेद्यात आवर्जून वापरली जातात आणि त्या दिवसांपासून पुन्हा चातुर्मास सुरु होईपर्यंत त्यांचे भक्षण निषिध्द मानीत नाहीत. पण खंडोबाचा कांदा हा प्रिय पदार्थ आहे. खंडोबाला कांद्याचा नैवेद्य दाखवावा लागतो.

**उत्सव आणि यात्रा**

खंडोबाच्या उपासनेतील दिनविशेष म्हणजेच रविवार, सोमवती अमावस्या, चैत्री-श्रावणी-माघी या पौर्णिमा आणि मार्गशीर्ष शुध्द षष्ठी (चंपाषष्ठी) हे होत.

**''येळकोट'' गर्जना**

खंडोबाच्या यात्रेत आणि सर्व उपासनाविधीत ''येळकोट'' ही गर्जना होत असते'', ''खंडेरायाचा येळकोट'', ''सदानंदाचा येळकोट'', ''शिवामल्लारीचा येळकोट'' हा शब्द येळु (सात) आणि कोटी (प्रकार किंवा कोटी ही संख्या) असे दोन शब्द मिळून झाला आहे.

''येळकोट'' प्रमाणेच ''चांगभले'' ही गर्जनाही रुढ आहे. ही गर्जना भैरव, ज्योतिबा यांच्या उपासनेतही आहे.

**क्षेत्र-सुची**

अणदूर (जि.उस्मानाबाद), अनेगुंदी (विजयनगर-तुंगभद्र पलीकडे), कल्लुकोटे (शिरे - तुमकूर - म्हैसूर), कारीमनी (परसगड-बेळगांव) कुबटूर (जि. शिवमोग्ग - म्हैसूर) कोंडबीडू (गुंटूर), कोंढापूर, कौरवदुर्ग, चांदखेड (मावळ-पुणे), जेजुरी (ता. पुरंदर, जि. पुणे), टाकळी खंडेश्वरी (ता. कर्जत, जि. नगर), तिलोरे, देवी-होसूर (ता. हावेरी, जि. धारवड), नळदुर्ग (जि. उस्मानाबाद), नागपूर (विदर्भ), नांदुरा (बीड), निंबगाव (ता. खेड, पुणे), नेवासे (ता. नेवासे, जि. नगर), पट्टरु (पाटूर), पाली (ता. कऱ्हाड, जि. सातारा), पेदिपाडू (ओंगल-नल्लूर), पेनुगोंडे (अनंतपूर), बीड, भोगावती (पैठण), मंगसुळी (ता. अथणी, जि. बेळगांव), मल्हार (विलासपूर-मध्यप्रदेश), मल्हारपेठ (ता.पाटण, जि.सातारा), मालेगाव, मैलार (ता.

हडगल्ली, जि. बळ्ळारी), मैलारपूर (बिदर), मैलार - देवरगुड्ड, मैलारलिंग (धारवाड), म्हाडदोळ (फोंडे महाल - गोमंतक) म्हळसापूर, म्हळसापूर - जवळे, म्हाळापूर, वालसेंग (वाल सावंगी, औरंगाबाद), वेमवरम् (रामचंद्रपुरम - गोदावरी), शेगुड (जि. नगर), साडेगाव (जि. औरंगाबाद), सातारे (जि. औरंगाबाद), सोनई (ता. नेवासे, जि. अंहमदनगर)

संदर्भ ग्रंथाचे नांव : - **दक्षिणेचा लोकदेव खंडोबा**

लेखकाचे नाव :- **रा. चिं. ढेरे**

# मंगसुळी क्षेत्राचे महात्म्य

भारतातील १२ प्रमुख खंडोबा तीर्थक्षेत्रापैकी श्रीक्षेत्र मंगसुळी हे महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे.

मणी आणि मल्ल हे दोन भाऊ बलाढ्य दैत्य होते. त्यापैकी मल्ल दैत्याला मंगसुळी या ठिकाणी फाशी खंडोबाने दिली आहे. फाशी या शब्दाला संस्कृत मध्ये सुळी असे म्हटले जाते. म्हणून या तीर्थक्षेत्राचे नाव पूर्वी इतिहासामध्ये मल्लसुळी आत्ताचे मंगसुळी असे पडले.

खंडोबा देवाचा एक प्रामाणिक भक्त राजा होता. तो खंडोबाची भक्ति उपासना फार करत होता. कांही दिवसांनी दुसऱ्या एका राजाने या भक्त राजाला कैद करुन तुरुंगवासात ठेवले. त्यानंतर त्या राजाने तुरुंगवासात खंडोबा देवाची उपासना केली व खंडोबा त्याच्या भक्तिने त्याच्या स्वप्नात जाऊन राजाला सांगितले एक घोडा तुरुंगवासात येईल. त्यावरती बसून मागे इकडेतिकडे न बघता गप्प बसून ये. त्यानंतर त्या राजाने घोड्यावरती बसून प्रवास सुरु केला. त्यावेळी मल्लसुळी (मंगसुळी) या ठिकाणी पूर्वी घनदाट जंगल होते. या ठिकाणी आल्यानंतर राजाने मागे वळून पाहिले व त्याच ठिकाणी घोडा अदृश्य झाला व त्या ठिकाणी घोड्याच्या पादुका उमटल्या व कांही अंतरावर स्वयंभू लिंग प्रकट झाले व त्यावरती बेल भंडारा होता. त्यानंतर बाजुला म्हाळसा, बानु, गंगा यांचे स्वयंभू रुपात लिंग प्रकट झाले. म्हाळसाच्या लिंगावरती कुंकू होते. हे तीर्थक्षेत्र खंडोबाचे इतिहासामध्ये नमूद असलेले शेवटचे तीर्थक्षेत्र आहे. इथून पुढचा प्रवास हा कुठल्याही ग्रंथामध्ये याचा उल्लेख नाही. त्यामुळे या जागृत तीर्थक्षेत्राला महत्व आहे. खंडोबा व म्हाळसा यांचा विवाह झाला त्यावेळी त्यांची वरात या ठिकाणी काढली आहे. त्यामुळे या ठिकाणी नवीन वधुवर पहिल्यांदा वावर जत्रा म्हणून दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी येतात. या ठिकाणी खंडोबाच्या स्वयंभू लिंगाशेजारी गंगालिंग रुपात अवतरली आहे. तिच्या लिंगातून पाण्याचा लहान पाझर आहे.

मंगसुळी या ठिकाणी वर्षातून दोनवेळा साखळी तुटते. चैत्रशुध्द दशमी आणि विजया दशमी अशी दोन वेळा यात्रा भरते.

शब्दांकन :- **श्री उमेश पुजारी, मंगसुळी**

# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय ४ था ।।




**श्री अंबाबाई कोल्हापूर**

### विषयसूची....!

१) जांभळी गावचे आबाजीपंत कुलकर्णी
२) श्रींचे अक्कलकोटी प्रयाण
३) श्री स्वामी समर्थांचा उपदेश
४) गोविंदाला मुलगा झाला
५) कोल्हापूरला श्री महालक्ष्मी मंदिरात पूर्व बाजूच्या राम मंदिरात मुक्काम

# अध्याय ४ था

कांही काळ लोटल्यावर एके दिवशी जांभळी गांवचे आबाजीपंत कुलकर्णींच्या घरी एक मंगलकार्य ठरले होते. जांभळी गावाचे ग्राम जोशीपण आप्पाभट जोशींच्याकडे होते. लहान कृष्णास घेऊन आप्पाभटजी जांभळीला पौरहितासाठी गेले. मंगल कार्यक्रमानंतर आबाजीपंत कुलकर्णी घरची सर्व मंडळी दोन प्रहरी विश्रांती घेत / बोलत बसली होती. अशा वेळी त्या आबाजीपंत कुलकर्ण्याची वृध्द पाहुणी स्त्री आबाजीपंतांना म्हणाली ''उद्या एकादशी आहे, पुष्कळ लोक पंढरपूरला विठ्ठल दर्शनाला निघाले आहेत. परंतु माझे सगळे आयुष्य संसारमोहपाशात खर्च झाले आहे. अमोलिक मनुष्यदेह प्राप्त होवून सुध्दा विठ्ठल प्राप्ती झाली नाही. विठ्ठल दर्शन झाले नाही. ६० वर्षे फुकटच गेली. तेंव्हा मला पंढरपूरला नेवून विठ्ठल दर्शन घडवा, श्रीविठ्ठल भेटवा.'' यावर आबाजीपंत त्या वृध्देला म्हणाले ''आजीबाई, तुम्ही दुःख वाटून घेऊ नका, शोक करु नका. आषाढ महिन्यात तुम्हाला पंढरपूरला नेवून श्री विठ्ठल दर्शन घडवून आणूया.'' हे आबाजीपंत कुलकर्ण्याचे बोलणे जवळच असलेल्या श्रीकृष्णाने ऐकले व त्या वृध्देस म्हणाला '' आजीबाई तुमचे वय झाले आहे. तुम्हाला आता वृध्दापकाळामुळे पंढरपूरला जाणे जमणार नाही. मी तुम्हाला येथेच पंढरपूरचा प्रसाद देतो'' श्रीकृष्णाचे बोलणे ऐकून सर्वजण हसू लागले. इतक्यात श्रीकृष्णाने हातातून दोन पुड्या काढून आजीबाईंना दिल्या. आजीबाईंना थट्टाच वाटली. परंतु आजीबाईंनी त्या पुड्या उघडून पाहिल्या व सर्व मंडळी चकितच झाली, एका पुडीत बुक्का तर एका पुडीत लाह्या फुटाणे होते. तसेच पंढरपूरहूनही कोणी तेथे आलेले नव्हते. श्रीकृष्णाचे हे अघटीत कृत्य पाहून सर्वजण विस्मयचकीत झाले, त्याच्या बद्दल आदर वाढला व ते सर्वजण त्याला दत्तावतार मानू लागले.

कांही दिवस गेल्यावर श्री खंडेरायाच्या आज्ञेप्रमाणे आपणांस श्री स्वामी समर्थांच्या दर्शनास अक्कलकोटला गेले पाहिजे असे श्रीकृष्णाने आपल्या आईला म्हणजे अन्नपूर्णाबाईंना सांगितले व अक्कलकोटला जाण्याची परवानगी मागितली. श्रीकृष्णाची विनंती ऐकून अन्नपूर्णाबाईंना आपल्यावर आकाशच कोसळत असल्यासारखे वाटले, त्यांचे डोळे पाण्याने भरुन आले व त्या श्रीकृष्णाला म्हणाल्या ''तुझ्या विरहाने आम्हा दोघांचे प्राण निघून जातील. तुझ्याशिवाय आम्हाला कोणी नाही. तू आमचा जीव प्राण आहेस. याकरिता आम्हाला सोडून जाण्याचा तू विचार सोड'' हे ऐकून श्रीकृष्ण आईला म्हणाला ''आई, तू चिंता करु नकोस. माझ्या ठिकाणी लक्ष / भाव ठेवून तुम्ही जीवनाची वाटचाल करावी. तुम्ही जेंव्हा जेंव्हा माझी आठवण काढाल, स्मरण कराल त्या त्या वेळी मी तुमच्या समोर हजर होईन. तुम्हा दोघांनाही अंतिम सद्गती प्राप्त होईल'' आई वडिलांचा आशीर्वाद घेवून श्रीकृष्ण अक्कलकोटला गुरु दर्शनास निघाला. अक्कलकोट गांवाजवळ येताच श्री नृसिंहभान स्वामींनी त्यांना दर्शन दिले व वनांत एकांतवासात घेवून गेले. वनांत एका मोठ्या शिळेवर नृसिंहभानस्वामी बसले. श्रीकृष्णाने त्यांचे चरण दर्शन घेतले, षोडशोपचार मानसपूजा करुन म्हणाले ''तुम्ही प्रत्यक्ष नृसिंह सरस्वतींचा अवतार आहे. तुमची महती वेदही

गाण्यास समर्थ नाहीत. आपल्या केवळ दर्शनाने माझ्या सर्व वासना नष्ट झाल्या आहेत. मी आता धन्य झालो आहे. तुम्हांला शरण आलो आहे. तुमच्या चरणाजवळ मला अखंड वास द्यावा. मला मोक्षाचीही इच्छा राहिली नाही. तुमची चरणसेवा हाच माझा मोक्ष'' श्रीकृष्णाने ही केलेली स्तुती ऐकून श्री नृसिंहभान स्वामींना हसू आले आणि आनंदही झाला व ते म्हणाले ''कृष्णा तू माझा अंश आहेस. तुझा व माझा गुरुशिष्यभाव फक्त लौकिकापुरता आहे. आपल्या उभयतांचा अवतार लोकसंग्रहा करिता आहे. खरे म्हणजे आपण दोघे एकच आहोत. आपले अवतार कार्य सुरु करण्यासाठी तू करवीरास जावे. शरणागतांचा ताप, दु:ख कमी करुन त्यांचा उध्दार करावा'' असा बोध करुन नृसिंहभान स्वामीनी श्रीकृष्णाच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवला. दोघेही आनंदसागरात डुंबून गेले. श्रीकृष्ण समाधी अवस्थेत निमग्न होऊन गेले. काही काळाने श्रीनृसिंहभान स्वामी श्रीकृष्णास घेवून वटवृक्षाखालील मठात आले. मठातील शिष्यांनी गोड पक्वान्नाचे जेवण दिले. पुढे कांही दिवस श्रीकृष्ण श्री नृसिंहभान स्वामींच्या सेवेत राहिले.

एके दिवशी तेथे कुष्ठी ब्राम्हण आला व नृसिंहभान स्वामींना म्हणू लागला ''महाराज, मी तीन महिने गाणगापुरास निराहारी राहून श्री दत्तात्रेयांची आराधना, उपासना केली. त्यांची आज्ञा झाली की, अक्कलकोटला त्रैमूर्तिचा अवतार तुमच्या रुपाने प्रकट झाला आहे. अक्कलकोटला जावून तुमची सेवा करावी म्हणजे कुष्टरोग परिहार होईल. नाहिसा होईल. श्रींची आज्ञा ऐकून मी येथे तुमच्या दर्शनासाठी अक्कलकोटला आलो आहे.'' त्या ब्राह्मणाचे सर्व ऐकून श्री नृसिंहभान स्वामींनी श्रीकृष्णाकडे बोट दाखवून म्हणाले ''श्रीकृष्णा बरोबर तू करवीरास जा, त्यांची सेवा कर म्हणजे तू कुष्ट रोगातून मुक्त होशिल'' यावर तो महारोगी ब्राम्हण स्वामींना म्हणाला व गयावया करु लागला. ''मी आता फार थकलो आहे. गाणगापूरला मी तीन चार महिने आराधना केली आहे. मी आता कंटाळलो आहे. आपल्या कृपेने मला येथेच बरे करा. करवीरला पाठवू नका'' यावर क्रोधीत होवून श्री नृसिंहभान स्वामी त्या ब्राम्हणाला म्हणाले ''तू येथून चालता हो'' यावर भयाने ब्राम्हणाने श्री नृसिंहभानांची क्षमा मागितली. ब्राम्हणास बरोबर घेवून त्याजकडून सेवा करुन घेण्यास श्रीकृष्णास सांगितले. कांही दिवसानंतर करवीरी जाण्यासाठी श्रीकृष्णास निरोप दिला. कुष्टी ब्राम्हणास बरोबर घेवून लोकोध्दारासाठी श्रीकृष्ण करवीरी येणास निघाले.

श्रीकृष्णस्वामी त्या कुष्ठ ब्राम्हणासह एका खेडेगांवात आले व गांवा बाहेरील मंदिरात मुक्कामास राहिले. बरोबर असलेल्या ब्राम्हणाची सत्व परीक्षा घेण्यासाठी त्याला मध्यरात्री पिण्यासाठी दूध मागितले. मध्यरात्रीची वेळ, सर्व लोक निद्रीस्त, आपण तर परस्थ तेंव्हा आता दूध कसे मिळणार असे त्याला वाटू लागले. परंतु श्रीकृष्ण स्वामींची आज्ञा मानून एक भांडे घेवून गांवात दूध मागण्यासाठी तो ब्राम्हण गेला. गांवात सर्वत्र सामसूम होती. एका घरात मात्र दिवा दिसत असून घरांतील मंडळीचा गोंगाट त्याच्या कानावर आला. तेथे जावून पाहतो तर काय त्या घरातील मालकीण तीन दिवस बाळंतपणात अडकली होती. बाळांतपण पूर्व वेदनांनी ती अंथरुणावर तळमळत पडली होती. घरचे सर्व चिंतेत पडले होते. ते ऐकून त्या कुष्ठरोगी

ब्राम्हणाला त्या बाईचा कळवळा आला व तो त्या घरातील पुरुष मंडळींना म्हणाला ''गांवा बाहेरील देवळात माझे गुरु आहेत. त्यांच्या कानावर ही गोष्ट घाला म्हणजे बाई सुखरुप बाळंत होईल.'' आपण कशाकरीता आलो हे सांगून दूध मागून घेवून तो ब्राम्हण त्या बाईच्या मालका बरोबर परत निघाला. उभयता देवळाजवळ येताच श्रीकृष्ण स्वामींनी मोठ्याने हाक मारुन सांगितले की, ''गोविंदा तुझी मंडळी सुखरुप बाळंत झाली असून तुला मुलगा झाला आहे. परत जा'' हे ऐकून गोविंदपंतास आश्चर्य वाटले व मनात म्हणू लागले. ''न माझी ओळख ना पाळख माझे नाव यांना कसे समजले? मंडळी बाळंतपणासाठी आडली आहे हे यांना कसे माहित? हे कोणीतरी सत्पुरुष असावेत या सत्पुरुषाचे दर्शन घेऊन यांना घरी घेऊन जावे.'' स्वामींचे दर्शन घेऊन घरी येण्याविषयी विनंती करू लागले. श्रीकृष्ण स्वामींने गोविंदपंताच्या डोकीवरील रुमाल उलटा सुलटा करीत त्याला म्हणाले ''आमचा कार्यभाग पुरा झाला आहे. आम्ही घरी येणार नाही'' असे म्हणून त्याचा रुमाल त्याच्या अंगावर टाकला व परत घरी जाणेस सांगितले. गोंविदपंत निरूपयाने घरी परतला. कुटुंब सुखरुप बाळंत होऊन मुलगा झाल्याचे पाहून तो आनंदला.

मार्गक्रमण करीत श्री कृष्णस्वामी त्या कुष्टी ब्राम्हणासह करवीरी आले. श्री महालक्ष्मीचे दर्शन घेऊन पूर्वव्दारा नजिकच्या राममंदिरात त्यांनी वस्ती केली. कुष्टी ब्राम्हण रोज मधुकरी मागून श्रीकृष्ण स्वामींना भरवून मगच प्रसाद घेत असे. एके दिवशी संध्याकाळी एक स्त्री रामदर्शनास आली. तिला बऱ्याच दिवसापासून पिशाच्च बाधा होती. पिशाच्च बाधेमुळे ती अत्यंत दुःखी व कृश झालेली होती. तिची व श्रीकृष्ण स्वामींची दृष्टादृष्ट होताच तिला समंधाचा संचार होवून, गरगर डोळे फिरवून ती तेथेच बेशुध्द पडली. आजूबाजूचे सर्व लोक घाबरले व तिच्या तोंडात पाणी घालण्याची खटपट करू लागले. एवढ्यात ती स्त्री मोठ्याने ओरडून म्हणू लागली ''दत्त महाराज मी या स्त्रीचा पूर्वजन्मीचा वैरी आहे. आता तिच्यामुळे मला तुमचे दर्शन झालेले आहे. माझ्या अपराधांची क्षमा करून मला या पिशाच्च योनीतून मुक्त करून माझा उध्दार करा'' त्यावर श्रीकृष्ण स्वामी म्हणाले''या बाईमुळे तुझा उध्दार झालेला आहे. या बाईला सोडून तू आता निजधामाला जा.'' कांही वेळाने ती स्त्री शुध्दीवर आली व खडबडून उठली.

आपण सर्वादेखत अस्ताव्यस्त पडल्याचे पाहून ती घाबरली. जवळच्या बायकांनी तिला घरी पोहचविले व सर्व हकिकत तिच्या नवऱ्याच्या कानावर घातली. आपल्या कुटुंबाची पिशाच्चबाधा श्रीकृष्ण स्वामींनी दूर केल्याचे ऐकून तो श्री स्वामींच्या दर्शनासाठी श्रीराम मंदिरात आला. बारा वर्ष समंधाने आपल्या घराचा सर्वनाश केला. संसार उध्वस्त केला. आपल्यामुळे आपले कुटुंब पिशाच्चमुक्त झाले म्हणून त्याने घरी येण्यासाठी स्वामींना विनंती केली. परंतु श्रीकृष्ण स्वामी कांहीच बोलले नाहीत. सोबत असलेल्या कुष्टी ब्राम्हणाने त्या बाईच्या पतीस सांगितले. ''स्वामी घरी येणार नाहीत. ते जेथे असतील तेथेच तुम्ही दर्शन घेत जा.'' हे ऐकून तो गृहस्थ निरूपाय होवून घरी परतला.

*****

# श्रीस्वामी समर्थ ब्रम्हानंदगुहेत कैवल्य निजानंदी निमग्न जाहले

श्री दत्तात्रेयाचे अवतार म्हणून विख्यात असलेले थोर सत्पुरुष श्री अक्कलकोट स्वामी महाराज यांचा प्रकटदिन चैत्र शुध्द व्दितीयेस् साजरा केला जातो आणि त्यांची पुण्यातिथी चैत्र वद्य त्रयोदशीस साजरी केली जाते.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे ते शके १७६० मध्ये व तेथून मोहळ मार्गे सोलापूरी येवून ते शके १७७९ मध्ये अक्कलकोट येथे आले. तेथे २१ वर्षे त्यांनी वास्तव्य केले. शके १८०० मध्ये त्यांनी वडाखाली देह ठेवला.''श्री गुरुलीलामृत'' ओवीबध्द चरित्रग्रथांत ब्रम्हानिष्ठ वामनबुवा वैद्य यांनी श्रीस्वामी समर्थ हे कैवल्य - निजानंदी निमग्न झाले.'' असे म्हणले आहे. ऐतिहासिक दृष्टीने ही घटना व स्थळ महत्वाचे असल्याने अक्कलकोट येथील श्री वटवृक्षमठात व बुधवार पेठेतील समाधी मठात तसेच अक्कलकोट येथे जे आणखी मठ आहेत. तेथेही श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी महोत्सव अत्यंत उत्सहाने व आनंदाने साजरा केला जातो.''श्री स्वामी समर्थ हे ब्रम्हानंद गुहेत कैवल्य निजानंदी निमग्न झाले''असे जे म्हंटले गेले आहे. त्याचा भावार्थ व अन्वायार्थ इथे विवरून पाहण्याचा प्रयत्न विनम्रपणे केला आहे. श्री गुरुलिलामृत ग्रंथातील पंचावन्नाव्या अध्यायातच त्याविषयीचे विवेचन श्री ब्रम्हनिष्ठ वामनबुवा वैद्य यांनी केले आहे.

**कालनिश्चितीचा अन्वयार्थ -**

श्री स्वामी समर्थांच्या संदर्भात''निजानंदी निमग्न'' हा शब्द का वापरला गेला? त्याचा अन्वयार्थ कोणता? याचा विचार करण्यापूर्वी आयुष्याच्या कालनिश्चिती संदर्भात ज्या घटना घडतात त्याचा निर्देश कोणत्या शब्दाने का आणि कसा केला जातो, याविषयी थोडे चिंतन मनन केल्यावर मग ''निजानंदी निमग्नता''या शब्दातील यथार्थता कळून येते. तुम्ही आम्ही सामान्य माणसे आहोत. जीवाला दोन घटना अपरिहार्य आहेत. एक म्हणजे त्याचा जन्म दुसरी म्हणजे त्याचा मृत्यू ! या दोन घटनांच्या संदर्भातील वेळा म्हणजेच आयुष्याचा कालावधी हा निश्चितपणे ठरलेला असून तो कुणालाही चुकलेला नाही. जीव जन्माला येणे आणि आयुष्य काळ संपताच तो निघून जाणे या दोनच घटना ज्यांच्या संदर्भात घडतात, त्यांच्या संदर्भात जन्म व मृत्यू हे दोनच शब्द वापरले जातात.

परंतु ज्यांनी आयुष्यभराच्या कालावधीत विविध व विशेष अशा कार्यात आपले जीवन झोकून देवून समर्पित करून कर्तृत्व सिध्द केले आहे त्यांच्यासंदर्भात जयंती आणि पुण्यतिथी हे दोन शब्द वापरले जातात. जे अध्यात्मिक क्षेत्रातले असतात, विशेषतः संत, साधु, सद्गुरु, सत्पुरुष, महाराज अशांच्या संदर्भात जयंती वा समाधी सोहळा असे शब्द वापरले जातात. कांही वेळा जयंती आणि महानिर्वाण असेही शब्द योजिले जातात. श्री ज्ञानदेवांनी जिवंतपणी समाधी घेतली आहे. त्यांच्या संदर्भात''संजीवन समाधी सोहळा'' असा शब्दप्रयोग केला जातो. दशावतारातील सत्पुरुषांची फक्त जयंती साजरी केली जाते. उदा. रामनवमी, हनुमान जयंती, गोकुळाष्टमी, परशुरामजयंती, इत्यादी. त्यांची पुण्यातिथी साजरी केली जात नाही. उदा. काही गोष्टी इथे नोंदल्या आहेत. आता

'' प्रकटदिन'' हा यथोचित शब्द अयोनिसंभव अशा अवलिया वा सिध्दपुरुषांच्या संदर्भात वापरला जातो. उदा. शेगांवचे श्रीगजानन महाराज, अक्कलकोटचे स्वामी समर्थ इ. त्यांचा जन्म, बालपण व त्यांचे लौकीक जीवन याविषयी फारशी माहिती मिळत नाही. ते एकदमच जगाला ज्ञात होतात. प्रकटावस्थेतूनच त्यांचे अलौकिक जीवन कळून येते. चमत्कार आणि आनंद या दोन्ही गोष्टी त्यांच्या सहवासातून प्राप्त होतात. त्यांची वाणी खरी होते. त्यांचे शब्द म्हणजे उपदेश वचनेच असतात. स्वप्नदृष्टांत, आदेश, आज्ञा याव्दारेही त्यांचे कार्य चालते.

**ब्रह्मानंदगुहेची निर्मिती :–**

श्री स्वामीसमर्थांनी अवतार समाप्तीची कल्पना एका अलौकीक घटनेद्वारे सर्वांना दिली होती. बुधवार पेठेत एक जंगममठ असून तेथे शिवलिंग आहे. तेथे शके १७९९ मध्ये प्रतिपदेस श्रीस्वामी महाराज शिवलिंगासमीप जाऊन बसले. द्वितीयेस वेगळाच चमत्कार दाखविला. लोकांना तर त्यांचेकडे पाहून नृसिंह अवताराचे दिव्यतेज दिसले. शिवलिंग बाणावर अग्नी लावून स्वामींनी होम (यज्ञ) केला. स्वहस्ते ते आहुती देत होते. शिवलिंगावर यज्ञ केला गेला म्हणून जंगमाने लेखी फिर्याद केली. पण सकाळी येथे येऊन सर्वांनी पाहिले, तर काय? पिंडीवर पूर्वीच्या दिवशीच केलेली पूजा जशीच्या तशी होती. जंगमाला हे कळून येऊन आश्चर्यही वाटले. चरित्रकार सांगतात.

**योगिश्वरे यज्ञरुपे भविष्य । दाखवुनी सुचविले अवतार कृत्य।**
**पूर्ण करुनी राहू । अक्षय निजानंदी येथेची ।।**

त्यावेळी स्वामींचा निजानंदी निमग्न होण्याचा मनोदय प्रकट झालेला दिसून येतो. आपल्या अवतार समाप्ती पूर्वीच त्यांनी बुधवार पेठेत ब्रह्मानंदगुहा तयार करवून घेतली होती. तेथे ते अनेकवेळा जाऊन बसत होते. तेथे त्यांनी महादेव गणपती दत्त यांची स्थापना केली आहे.

आम्ही जे जेऊ ते त्यांना देऊ निरंतर आम्ही ऐक्यभावाने आणि अभिन्नपणे राहू, जर कुणी अनन्यभावाने शरण येऊन प्रार्थना केल्यास त्याचा योगक्षेम चालवू असे अभिवचन दिले.

नामस्मरण किती महत्वाचे आहे? तर स्वत: ते देखील शिवहर शंकर नमामी शंकर शिवशंकर शंभो । हे गिरजापती भवानी शंकर शिवशंकर शंभो ।। असे भजन म्हणत असत. ब्रह्मानंदगुहेला चरित्रकाराने आद्यप्रियस्थान असेही संबंधिले आहे, ते सांगतात की, समर्थांच्या आद्यप्रिय स्थानात एकनिष्ठपणे सेवनी रत तयासी धर्मार्थ काम, मोक्ष, प्राप्त होत चतुर्विध पुरुषार्थ. ते हे गुरुभक्तिरहस्य जे जाणतील त्यांना सगुण-निर्गुणाची प्रचिती येईल, अशी पुष्टी त्यांनी जोडली आहे. ब्रह्मानंदगुहा तथा समाधिमठ येथे आजही भाविकांना श्रीस्वामी समर्थांचा कृपाकटाक्ष आणि वरदहस्त अनुभवाला येतो. तसेच वटवृक्षाखाली त्यांनी दर्शन घेतल्यास मनोकामना पूर्ण होतात.

**निजानंदी निमग्न जाहले :–** श्री स्वामी समर्थ हे ब्रह्मानंदगुहेत अधून मधून जात होतेच.

**शालिवाहन शके अठराशे पूर्णात ।**
**बहुधान्य संवत्सरी चैत्र मासात ।**
**वद्य प्रतिपदेस अक्कलकोटात ।**
**पातले अनंत विश्वेश्वर तीनचार दिसानंतर ।**
**ग्रामात वडाचे झाडाखाली छप्पर ।**
**त्यात स्थित आनंद प्रचुर ।**
**असता ज्वर उद्भवे शरीर ।।**


ही त्यांची स्थिती पाहिल्यानंतर श्रीपादभट आणि अन्य दास साधुसंत तेथे जमले. तुमच्या दर्शनाने आम्ही सुखी होतो. आपण आम्हांला सोडून कुठे चाललात? आम्हास आपल्याबरोबर घेऊन जावे असे ते श्रीसमर्थांना विनवू लागले.

**जेव्हा यतिश्वर बोधिती सर्वासी ।**
**प्रत्यर्थरुप भगवत गीता**
**श्लोकत्रयासी जे जैसे भजती मज परब्रह्मासी ।।**
**त्यासी तैसे भजतो आम्ही ।।**
**अनन्याश्चियंतो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभि युक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।**
**(अ. ९ वा श्लोक २२ वा)**
**इष्टकाळ शुभघटी सत्तावीस वरी पळे होती**
**अठ्ठेचाळीस ऐशा उत्कृष्ट जनकल्याण काल**
**जगन्निवास । प्रसन्न वदन स्थित अभयप्रद होते ।।**
**शुध्द स्वस्तिकासन घालोनी**
**सुगंध पुष्पहार वस्त्रभुषणी ।**
**संपूर्ण जनासी सौख्याशीर्वचनी**
**परमानंदरुपे संतोषविती ।।**
**शुभमंगल सावधान चालले**
**वेद घोष किर्तन भजन श्रीगुरुदेवदत्त**
**स्वामीराजांचा जयजयकार । गर्जती प्रेम सर्वत्र ।।**

पुजारी पूजा आरती करत असतानाच स्वामी समर्थ निजानंदी निमग्न झाले. (अ. ५५, ओवी १७० ते १७४) मग समर्थांच्या आज्ञेप्रमाणे ब्रम्हानंदगुहेत त्यांचा देह ठेवण्यात आला. लौकिक अर्थाने आपण जरी अदृश्य झाले असे वाटत असले तरी ब्रम्हानंदगुहेत राहून

समाधीनंतरही सात दिवसांनी त्यांनी निलेगांवच्या भाऊसाहेब जहागिरदार यांना दर्शन दिले आहे. त्यामुळेच ''ते गेले नाहीतच, अजूनही त्यांचे अस्तित्व भक्तांच्या प्रचितीस येते. हेच, खरे ते आत्मनंदी निमग्न होऊन अद्यापि आद्यप्रिय ब्रम्हानंदगुहेत बसून आहेत ! ब्रम्हानंदी निमग्न होऊन राहणे ही चिरंतन अस्तित्वाची सहज खूण आहे.

संदर्भ :- **सारांश मासिक-मार्च २०१७**
लेखक :- **डॉ.श्री नरेंद्र कुंटे**



श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट

# श्री स्वामी समर्थ अक्कलकोटचे

**।। यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत ।।**
**।। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**
**।। परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।।**
**।। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।**

ज्यावेळी धर्माचा ऱ्हास होऊ लागतो, अधर्माची शीग चढते, साधु-सज्जनांचा छळ होतो. त्यावेळी सज्जनांचे संरक्षण व दृष्टांचे निर्दालन करण्यासाठी, जगाच्या उध्दारासाठी, धर्माला स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी प्रत्यक्ष भगवान भूतलावर अवतरतात. ''संभवामी युगे युगे'' असे अभय देणारी अवतारी पुरुषांची श्रेष्ठ परंपरा भगवान श्रीकृष्णापासून आजपर्यंत अखंड चालत आलेली आहे.

अवतारी पुरुषांना धर्म, जाती, जन्म आणि मृत्यू यांचे बंधन कधीच नसते. श्री स्वामी समर्थ महाराष्ट्रात प्रथम मंगळवेढे या गांवी शके १७६० ते सुमारास प्रगट झाले. त्या भागात त्यांचे वास्तव्य जवळ जवळ बारा वर्षे होते. ते सदैव रानावनात वास्तव्य करुन असत. गांवात क्वचित येत कोणी कांही दिले, इच्छा झाली तरच भक्षण करीत. स्वामी समर्थ (शके १७१२ चे सुमारास) मंगळवेढ्याहून मोहोळ या गांवी आले. मोहोळ येथील पाच - सहा वर्षाच्या वास्तव्यानंतर शके १७७९ मध्ये ते अक्कलकोटला आले. त्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य शके १८०० पर्यंत होते.

महाराष्ट्रात स्वामी समर्थ कोठून आले याबद्दल निश्चितपणे जरी कांही सांगता आले नाही तरी श्री महाराजांनी सांगितल्याप्रमाणे एक सूत्र ध्यानी येते आणि ते म्हणजे श्री दत्तावतार श्रीनृसिंह सरस्वती महाराज गाणगापुराहून निघून कर्दळी वनात गुप्त झाले आणि ते पुढे शके १७६० चे सुमारास महाराष्ट्रात प्रगट झाले.

हिमालयामध्ये गंगानदीचे उत्तरेस असलेल्या अरण्यात एका वृक्षाखाली श्रीनृसिंह सरस्वती ध्यानस्थ बसले असता इतका काळ लोटला की त्यांचे शरीराभोवती वारुळ तयार झाले. वृक्ष तोडतांना एका लाकुडतोड्याचा घाव त्या वारुळावर चुकून बसला, श्री महाराज समाधी सोडून वारुळातून बाहेर आले. त्या कुऱ्हाडीने झालेल्या जखमेचे व्रण त्यांचे मांडीवर दिसत. श्री स्वामी महाराज प्रथम श्री क्षेत्र काशी येथे प्रगट झाले.

एक पारशी गृहस्थाने श्री महाराज यांस एकदा विचारले. ''महाराज आपण कोठून आला?'' श्री महाराजांनी उत्तर दिले ''प्रथम आम्ही कर्दळी वनातून निघालो, कलकत्ता वगैरे शहरे पाहिली बंगालमध्ये कालीमातेचे दर्शन घेतले. गंगा तटाकाने भ्रमण करीत करीत गोदावरी तटाकी आलो. तीरावर स्नान करुन दक्षिण हैदराबादेस आलो. तेथे कांही दिवस राहून व

मंगळवेढ्यास बरेच दिवस राहून पंढरपूर, बेगमपूर, मोहोळमार्गे सोलापूरास आलो व तेथून अक्क्लकोटला आलो व तेथेच राहत आहोत.''

''माझं नांव नृसिंहभान'' असे श्री स्वामी महाराज सांगत. त्याचप्रमाणे आमचा जन्म साडेचारशे वर्षापूर्वी झाला असे म्हणत. श्री नृसिंह सरस्वती महाराज कर्दळी वनात गुप्त झाले ते बहुधान्य नाम संवत्सरातच. अर्थातच श्री स्वामी महाराज आपल्या पूर्वायुष्याचा कोणालाच थांगपता लागू देत नसत. श्री महाराजांना आपण कोण असा प्रश्न केला असता ते म्हणत, ''दत्तनगर, मूळपुरुष वडाचे झाड मूळ झाडाचे मूळ'' एकदा एकाने त्यांना विचारले. ''महाराज आपली जाती काणती?'' श्री महाराजांनी उत्तर दिले. ''आम्ही यजुर्वेदी ब्राम्हण आमचे नाव नृसिंहभान, काश्यप गोत्र व मीन राशी'' श्री महाराजांच्या देहाचे वर्णन शब्दात कसे करावे ? अलौकीक शांती, शरणागत वात्सल्य तसेच यश. श्री औदार्य ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य या षडगुणांचे प्रभुत्व यामुळे श्री स्वामी समर्थ वैकुंठाधीश साक्षात श्रीमहाविष्णूच होते. मंगलमुर्ती गजाननाप्रमाणे मोठे कान व लंबोदर, श्रीरामचंद्राप्रमाणे आजानुबाहू, श्री शंकराप्रमाणे तेजस्वी, श्री हनुमंताप्रमाणे मनोजय व भीमरुपी होते. भगवान गोपालकृष्णाप्रमाणे त्यांच्या बाललीला होत्या. डोळ्यात सूर्य, चंद्राचे तेज होते. श्री महाराज चालू लागले तरी बरोबर चालणाऱ्या भक्तमंडळीस पळावे लागे. श्री महाराजास लंगोटी नेसवावी लागे. पण केंव्हा केंव्हा ती फेकून ते दिगंबर होत.

नित्य प्रात: काळी श्री महाराजांना स्नान घातले जाई. कपाळी केशर कस्तुरीचा गंधाची उटी लावण्यात येई. (श्री महाराजांच्या दर्शनाचा लाभ ज्यांना झाला त्यांना आजही त्या कस्तुरीचा सुगंध अनुभवयास मिळतो.) श्री महाराज नेहमी दोनच आचमने घेत. स्वत:च हाताने ते क्वचित जेवत. लहान मुलाप्रमाणे त्यांना भरवावे लागे. हा कार्यक्रम भक्तमंडळी दर्शनाला येणापूर्वी भल्या पहाटे उरकला जाई.

सारा दिवस दर्शनास इतकी गर्दी होई की श्री महाराजास पाच मिनिटेही सवड मिळत नसे. दर्शनास पारशी, मुलसमान, हिंदू, ख्रिश्चन सर्व धर्माचे लोक येत. त्यात जसे जिज्ञासू असत, तसे आर्तही आढळत. तर कोणी ऐहिक सुख प्राप्त व्हावे ही भावना घेऊन आलेले असत. तर कोणी श्री समर्थांच्या मार्गदर्शनाने परमार्थांच्या सोपानावर पावले टाकण्याची मनिषा बागळून असत. थोडीफार सेवा करुन मानसिक समाधान मिळवावे असे म्हणणारे कांही असत.

सारा देह श्री स्वामी समर्थ चरणी झिजावा या भावनेने उर्वरीत आयुष्य श्री स्वामी चरणी घालविण्याची इच्छा करणारे असत. परमार्थाचे मार्गात अधिकार प्राप्त झालेले पण अहंकाराने अडथळणारेही असत. या सर्वांना ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणे हा कल्पवृक्ष ''जो जे वांछील तो ते लाहो'' हा कृपा प्रसाद प्राप्त करुन देई.

''अवघे विश्वची माझे घर'' अशी श्री स्वामी महाराजांची वृत्ती असे. क्षणात ते मेण्यात बसतील तर मिनीटांनी मेण्यातून उतरुन रानावनातून पायी एकटेच चालू लागतील. एखादेवेळी मऊ शय्येवर विश्रांती घेतील तर एखादेवेळी कंटक शय्येवर पहुडलेले दिसतील. कोणत्याही देशातील भाषेतील दर्शनार्थी आल्यास लहर असल्यास श्री स्वामी समर्थ त्या दर्शनार्थीच्या मातृभाषेत बोलत. श्री स्वामी समर्थ अतिशय आनंदात असले म्हणजे त्यांच्या शरीराचा सुगंध चहुकडे दरवळत असे. दहा निरनिराळ्या देवतांचे उपासक दर्शनास आल्यास त्या उपसकांना श्री स्वामी समर्थ त्यांच्या उपास्य देवतेच्या स्वरुपात दर्शन देत. सान्निध आलेला मनुष्य कोणत्याही विद्येत कितीही पारंगत असला तरी श्री स्वामी दर्शन घेतांना श्री स्वामींचे ज्ञान आपणांहून जास्त आहे असे त्यास वाटे.

भजन, कीर्तनाची व तांबड्या फुलांची त्यांना अतिशय आवड असे. पुरणपोळी, बेसनचे लाडू, भजी, कडबोळी वगैरे पदार्थ त्यांना अत्यंत आवडत. कुत्री व गायीवर त्यांचे फार प्रेम असे. वृक्षाचे एक पानही तोडलेले त्यांना आवडत नसे.

श्री महाराज येणाऱ्या भक्तांचे काम मनात असल्यास झटदिशी करीत, नाहीतर कसोटीचे प्रसंग निर्माण करुन विलंबही लावित. श्री महाराजांचे बोलणे ठाशीव व करारी असे. परमेश्वरांचे सामर्थ्य त्यांचे वाणीत असे. त्यांना निद्रा अशी नव्हतीच. गाई गुरांच्या चाऱ्या पाण्यावर त्यांचे बारकाईने लक्ष असे. त्यांना पावसात हिंडण्याची, निसर्गाशी एकरुप होण्याची स्वाभाविक आवड असे. श्री स्वामी समर्थांच्या महा तेजस्वी मूर्तीकडे पाहिल्यावर चित्तात अत्यंत आदर आणि दरारा उत्पन्न होऊन अतिपरिचीत असलेल्यांनाही यत्किंचित अमर्याद वागण्याचा धीर होत नसे. श्री सोमनाथपासून जगन्नाथपर्यंत तसेच श्री काशिविश्वेश्वरापासून श्री रामेश्वरापर्यंत अगणित स्त्री-पुरुषांना व अबालवृध्दांना या ना त्यानिमित्ताने श्री स्वामी समर्थांनी आपल्याकडे आकर्षित करुन घेतले. त्यांचेवर निरापवाद कृपेचा अमृतवर्षाव केला. सर्व जीवमात्राविषयी त्यांच्या कुसुम कोमल अंत:करणात अमर्याद प्रेम बसत असे. त्यामुळे अंतरी कोणताही हेतू ठेवून कोणी श्री स्वामींच्या दर्शनास गेल्यास तो अंतर्बाह्य बदलून जात असे.

पढीक पंडितांचा अभिमान दूर करुन त्यांच्या विद्यारुपी चंदनाभोवती पडलेला अहंकाररुपी सर्पाचा विळखा त्यांनी दूर केला. शास्त्राभ्यास व वेद विद्येचा पुरस्कार केला. लोकांची धर्म भावना जागृत केली. श्री महाराजांकडे आलेल्या त्या असंख्य लोक त्यांनी रोगमुक्त केले व कित्येकांना भूतबाधेपासून मुक्त केले. दारिद्रीच्या गंगेतून वर काढले पश्चातापाच्या अग्नीने जाळून लोकांची मने शुध्द केली.

षडशास्त्र संपन्न पंडितांपासून अक्षर शत्रू अडाण्यापर्यंत, राजधिराजापासून भाग्यहीनापर्यंत, वेदशास्त्र संपन्न ब्राम्हणापासून अंत्यजापर्यंत, सात्विक सदाचार संपन्न सतीपासून ते दुराचारी

वेश्येपर्यंत प्रतिदिनी असंख्य जीवात्मे श्री स्वामी समर्थांसमोर येत असत. कोणी शुध्द भावनेने कोणी निष्काम सेवेसाठी, तर कोणी परीक्षा घेण्यासाठी व निंदानालस्ती करण्यासाठी. पण श्री महाराजांनी आलेल्या व्यक्तीचा कधीही कंटाळा केला नाही. कपाळाला कधी आठी घातली नाही. उलट सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला आयुष्यभर जतन करावसं वाटेल तसा अनुभवांचा अमोल ठेवा प्राप्त करुन देऊन त्या व्यक्तीला परमेश्वराशी प्रेमरज्जूने बांधून टाकीत. एकदा श्री स्वामी समर्थांचे दर्शन झाले की, महाराज त्यांचे उपास्य दैवत, जीवन, सर्वस्व बनून जात. रुढी-परंपरांचे किंवा कोणत्याही अंध धर्म भावनांचे अवडंबर न माजविता ईश्वराच्या ठिकाणी अविचल निष्ठा ठेवण्याची कृतीशील प्रेरणा त्यांनी लोकांना दिली. अंत:करणातला अंधार दूर करुन समाजात ज्ञानाचे शतदीप उजळले.

श्री स्वामी महाराजांनी भक्तजनांना असंख्य चमत्कार दाखविले. त्या चमत्कारामागील हेतू ध्यानात घेणे आवश्यक आहे. लोकांच्या मनातील परमेश्वरांविषयीची श्रध्दा दृढ करणे, समाजातील पाखंड नाहीसे करुन त्यांची मने ईश्वराकडे वळविणे, ईश्वराच्या शक्तिचे दर्शन घडविणे, हा हेतू या चमत्काराप्रमाणे असे. आपल्या संस्कृतीची यथार्थ ओळख पटविणे हा त्यामागील उद्देश असे. या चमत्कारांकडे पाहण्यासाठी आपली दृष्टी स्वच्छ असली पाहिजे. हे चमत्कार म्हणजे जादुगाराने केलेले चित्त विभ्रमाचे प्रयोग नाहीत किंवा नजरबंदीचे खेळ नाहीत, तर पंचमहाभूतांवर सामर्थ्य गाजविणाऱ्या विश्वपालक जगन्नियंत्याच्या शक्तिचे ते ओझरते दर्शन होय. समाजाची अध्यात्मिक बैठक तयार करणे, लोकांमध्ये विवेक संपन्नता, पुण्यशीलपणा, धर्म परायणता आणि सौख्य नांदावे यासाठी अवतारी पुरुष ईश्वर शक्तिचे दर्शन घडवित असतात. ''अनन्यश्चिंतयंतो मां ये जन: पर्युपासते ।। तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम।।'' ही भगवंताची भुमिका असते ती मात्र आपण जाणली पाहिजे. केवळ चमत्कारांच्या दृष्टितून पाहणाऱ्यांना अवताराचे मर्मच कळले नाही असे म्हटले पाहिजे.

अक्कलकोट, जमखिंडी, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा इत्यादी संस्थानिक, विंचूरकर, माने इ. सरदारापासून ते दरिद्री बसाप्पासारख्या लोकांपर्यंत, ब्रम्हनिष्ठ वांबोरीकर, विष्णूबुवा ब्रम्हचारी, न्यायमूर्ती रानडे, ठाकुरदास बुवा इ. विव्दान श्रेष्ठांपासून ते थेट चोळाप्पासारख्या अज्ञ जीवापर्यंत, वासुदेव बळवंतासारख्या क्रांतिकारकापासून सर्व पेशातील डॉक्टर, इंजिनियर, वकील, व्यावसायिकापर्यंत अनेक सरकारी अधिकारी सर्वजण श्री स्वामी समर्थांच्या अद्‌भूत सामर्थ्याने मंत्रमुग्ध झाले होते. येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला मनातील विचार बोलून दाखवून सर्व जीवांच्या अंतर्बाह्य मीच भरलेला आहे. कर्तुम अन्यथा अकर्तुम मीच आहे ही सर्वसाक्षी, सर्वज्ञानी त्रिकालबाधीत परमेश्वराची वाणी यथार्थ असल्याचे दाखवित.

जनमानसातील अज्ञान दूर करण्याचे कार्य श्री स्वामी समर्थांनी केले आहे. एकदा युरोपीयन

छायाचित्रकाराने श्री स्वामी समर्थांचे छायाचित्र घेतले. ते जेंव्हा श्री स्वामीभक्तांना दाखविले तेंव्हा प्रत्येकाला त्या छायाचित्रात आपआपले कुलदैवत दिसू लागले. चराचर व्यापी परमेश्वराचे विश्वरुप ते हेच नव्हे काय? परमेश्वर अवडंबराचा, डामडौलाचा आणि वृथा स्तुतीचा भुकेलेला नसतो तर त्याच्या खऱ्या भक्तिची भूक आणि अंत:करणातून निर्माण झालेल्या प्रेमाची तहान लागलेलीच असते. या तहान भुकेतूनच तो कबिराचे शेले विणतो, जनाईला दळू लागतो, अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करतो, श्री एकनाथांच्या घरी कावडीने पाणी भरतो, दामाजीसाठी तो विठू महार बनला, पांडवांनी केलेल्या यज्ञात उष्टीखरकटी काढतो, सतीत्वाचे रक्षण करण्यासाठी सागराचे उल्लंघन करतो, धर्म रक्षणासाठी भवानी तलवार बनतो. परमेश्वर फक्त भाव पाहतो. हाच परमेश्वर एकाच वेळी अक्कलकोटला व मुंबईला असतो. हाच परमेश्वर समुद्रात बुडणाऱ्या नाखव्याला आधार देऊन वाचवितो,हाच परमेश्वर बंब गार्डन साहेबाचे विषारी किरडूचे विष तांदळाच्या धुवणाने व आळूच्या रसाने उतरवितो, बसप्पाची भक्ती पाहून हाच परमेश्वर त्याला सर्पाचे सोने करुन देतो. ह्या परमेश्वराला पाहूनच वांझ म्हशीला पान्हा फुटतो. हाच परमेश्वर रेड्याच्या मुखातून वेद वदवितो, भिंत चालवितो. ब्रम्हतदाकार वृत्ती म्हणजे काय? असा प्रश्न परमेश्वराला विचारणाऱ्या विव्दान श्रेष्ठांचा भ्रमपरिहार करणारा, स्वप्नात विंचवाचा दंश दूर करणारा परमेश्वर हाच.

चराचराशी श्री स्वामी समर्थ कसे एकरुप झाले होते. त्यांची अनेक उदाहरणे आहेत. एके दिवशी श्री महाराजांनी एकाएकी अंगावरील कपडे काढून टाकले. डोक्यावरची टोपी फेकून दिली व पितांबर सोडून अंगाला गुंडाळला. त्यांचे नेत्रातून खळखळा अश्रू वाहू लागले. दिवसभर ते उदास होते. तोंडाने ते सारखे म्हणत होते. ''पंढरीच्या लोकां! किती मारु हाका ।। तेथे माझा सखा पांडुरंग ।। ह्या त्यांच्या अंतरसाक्षीत्वाचा प्रत्यय दुसऱ्या दिवशी आला. ज्या दिवशी श्री स्वामी समर्थ विमनस्क होते त्याच दिवशी कोणी यवनाने श्री पांडुरंगाच्या पायावर दगड मारला होता. श्री पांडुरंगास दुखापत होताच श्री स्वामी समर्थांचे नेत्रातून चंद्रभागा वाहू लागली.

श्री महाराजांनी त्यांचे सन्निध आलेल्यांना नवे चैतन्यमय जीवनप्राप्त करुन दिले. मुंबईस हरिभाऊ ऊर्फ स्वामीसुत हे म्युनिसिपालिटीत नोकरीस होते. एका व्यवहारात झालेल्या नफ्याबद्दल श्री स्वामी महाराजांचे दर्शनास गेले. त्यावेळी श्री स्वामींनी हरिभाऊवर कृपादृष्टी टाकली व त्यांना पादुका करुन आपणास सांगितले. मुंबईस परत आल्यावर त्यांचे दोन स्नेही आपआपले उद्योगात मग्न झाले. परंतु हरिभाऊंना मात्र श्री स्वामी समर्थांशिवाय कांही सुचेना. संसारातील त्यांचे चित्त उडाले. त्यांनी चांदीच्या पादुका तयार केल्या. अक्कलकोटला स्वामी दर्शनास आले. स्वामींनी त्या पादुका सतत चौदा दिवस आपल्या पायात ठेवल्या व आपले आत्मलिंग

म्हणून हरिभाऊंना दिल्या. श्री स्वामी समर्थांनी हरिभाऊंना आज्ञा केली, ''तू माझा सुत आहेस, धंदा रोजगार सोडून बंदर किनाऱ्यावर जाऊन मोठा किल्ला बांधून ध्वजा उभी कर''

श्री महाराजांच्या प्रासादिक पादुका मस्तकी धारण करताच हरिभाऊला आत्मज्ञान प्राप्त झाले. मुंबईस परतताच त्यांनी श्री आज्ञेप्रमाणे आपला सर्व संसार लुटून टाकला, सर्व सोने ब्राम्हणास वाटून दिले. धर्मपत्नी यांचे मंगळसूत्रही काढून दिले. तिला एक पांढरे पातळ व स्वत:स एक कफनी ठेवली. श्री स्वामी समर्थांची अन्यय साधारण भक्ति केली. या थोर स्वामीसुताचे श्री स्वामी समर्थांच्या अगोदर श्रावण वद्य प्रतिपदेस निर्वाण झाले. श्री महाराजांचे एकनिष्ठ भक्त म्हणजे चोळाप्पा हे होत. श्री स्वामी समर्थांनी अक्कलकोटला आल्यानंतर जर कोणाकडूनच तीन दिवसांचे उपवासानंतर प्रथम चोळाप्पाकडेच श्री स्वामींनी अन्न भक्षण केले. एक वेडसर मनुष्य घरात आणल्याबद्दल घरातील बायका माणसांनी चोळाप्पांना खूप त्रास दिला. श्री स्वामी समर्थांनीही त्यांची अग्नीपरीक्षा पाहिली. घरातील वस्तु कोणासही द्यावी, धान्य गाईला घालावे, घरात कोठेही मलमूत्र विसर्जन करावे. घरातील मंडळी त्रासून गेली. पण चोळाप्पा मात्र जाणून होते की, महाराज हे अतिमानुष आहेत. सामान्य कोटीतील नाहीत. घरातील भांडीकुंडीदेखील गहाण टाकून त्यांनी श्री महाराजांची सेवा केली. श्री महाराजांच्या निर्वाणापूर्वी सहा महिने अगोदर स्वामीभक्त चोळाप्पा यांचा अंत झाला.

श्री महाराजांचे एक थोरभक्त श्री बाळाप्पा महाराज धारवाड जिल्ह्यातील करजगी तालुक्यातील हवेरी या गांवचे राहणारे. हे यजुर्वेदी ब्राह्मण, घरी सावकारी, सराफी, गजान्त लक्ष्मी. संसारात कोणतेही न्यून नाही. पण एके दिवशी अचानक मनात वैराग्य उत्पन्न झाले. सदगुरु प्राप्तीविषयी विलक्षण तळमळ लागली. वय अवघे ३० वर्षांचे बाळाप्पा गाणगापुरास आले. त्या ठिकाणी दृष्टांत झाला की, अक्कलकोटास जाऊन श्री स्वामी समर्थांची सेवा करावी. त्यानंतर बाळाप्पा अक्कलकोटास आले. त्यांना पाहताच साता जन्माची ओळख असल्याप्रमाणे श्री स्वामी समर्थांनी आनंद व्यक्त केला. बाळप्पांनी श्री स्वामी समर्थांची अनन्य सेवा केली. श्री महाराजांच्या अंतरीच्या खुणा ते बिनचूक सांगत असत. साधकावस्थेत त्यांच्या दैवी समर्थ्यांच्या प्रचिती देई श्री स्वामी समर्थांच्या निर्वाणा नंतर ते ३२ वर्षे हयात होते.

शके १८०० बहुधान्य नामसंवत्सरी चैत्र वद्य त्रयोदशीला मंगळवारी दुपारी ४ वाजता श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती दत्तावतार श्री स्वामी समर्थ यांनी आपल्या पार्थिव देहाचा त्याग केला. त्यासमयी श्री स्वामी मुखातून खसखशी एवढे तीन पांढरे दाणे बाहेर पडले.

श्री स्वामी समर्थांना समाधीस्त होऊन १४० वर्षे झाली. या काळात अक्कलकोट मुंबई, पुणे, सुरत, बडोदा, वेगुर्ले, जालना, आळंद, मैदर्गी, येवले, केज, विजापूर, वसई, ठाणे, चिपळूण, गोवा, फलटण वगैरे ठिकाणी मठ स्थापन झाले आहेत.

पार्थिव देहाने स्वामी आपल्यातून गेले असले तरी ''हम गया नही, जिंदा है'' हे त्यांचे वचन भक्तजनांना आधार आहे. ज्या ज्या वेळी आपण त्यांचे स्मरण करु त्या त्यावेळी श्री स्वामी आपणापाशी आहेत हे नि:संशय.

संदर्भ ग्रंथाचे नाव :- **सारांश मासिक २०१७**
लेखकाचे नाव :- **डॉ. श्री. प्र. रा. बारलिंगे**



श्री वटवृक्ष मंदिर, अक्कलकोट

# श्री महालक्ष्मी अंबाबाई देवी, कोल्हापूर

भगवान शंकराने अगस्ती मुनींना साक्षात्कार देवून वर्णलेली करवीर नगरीलाच दक्षिण काशी म्हणतात. या क्षेत्रात महालक्ष्मीचे वास्तव्य आहे. इतर सर्व प्रकारची तीर्थ क्षेत्रे आहेत. म्हणून या क्षेत्राला ''महामातृक क्षेत्र'' असेही म्हणतात. या दक्षिण काशीचा एक प्रमुख शक्तिपीठ म्हणून उल्लेख काशीखंड, पद्मपुराण, देवी भागवत, हरीवंश पुराण, स्कंदपुराण, मार्कंडेश्वर पुराणात आढळून येतो. करवीर नगरीचा इतिहास ४ ते ५ शतकांपूर्वीचा आहे. कोल्हापूरच्या शिलाहाराच्या पाच पिढ्यापैकी पहिला ''जतिग'' याने कोल्हापूरात / करवीरात वास्तव्य केले होते. नवव्या शतकात राजा गंडवादीत ११ व्या शतकात जयसिंह, सिंघल, १३ व्या शतकात राजा तौलम, १६ व्या शतकात राजे छत्रपती शिवाजी महाराज, राजे राजाराम, महाराणी ताराबाई यांनी आमदनी, राज्य चालविले. या करवीर नगरीला ''दक्षिण काशी'' म्हणून ओळखले जाते.

कोल्हापूरच्या / करवीरच्या श्री महालक्ष्मी मंदिर व श्री महालक्ष्मी / श्री अंबाई मूर्ती यांची स्थापना केंव्हा झाली या बद्दल निश्चित असे कांही सांगता येत नाही. परंतु हे महालक्ष्मी मंदिर / श्री महालक्ष्मी / श्री अंबाबाई मूर्ती या अतिप्राचीन आहेत. श्री देवीची मूर्ती ही रत्नशिलेची असून वजन अंदाजे चाळीस किलो आहे. मूर्तीचा आकार साळुंकीच्या आकाराप्रमाणे असून, ती दगडी चबुतऱ्यावर उभी आहे. मूर्तीच्या मागे सिंह उभा असून, मूर्तीत हिरकखंड मिश्रीत द्रव्य व वालुकामय दगड सांपडतो. मूर्तीच्या भूमध्यावर पद्मरागिणी आहे. मूर्ती चतुर्भुज असून, उजव्या हातात म्हाळुंग, डाव्या हातात पानपात्र आहे. मस्तकावर मुकूट असून, त्यावर शेषाने छाया धरली आहे. संशोधकाच्या मते मूर्ती पाषाणाची प्राचीनता ५ ते ६ हजार वर्षाची आहे. दररोज देवीची पाद्यपूजा, महापूजा, कुंकुमार्चन, रुद्राभिषेक यामुळे मूळ श्री देवीच्या मूर्तीची झीज होवून मूळ स्वरुप नष्ट होऊ लागले. म्हणून फाल्गुन शुध्द तृतीया १९५४ मध्ये श्री महालक्ष्मी / श्री अंबाबाई मूर्तीला वज्रलेप करण्यात आला. या श्री अंबाबाई/महालक्ष्मी सभोवताली लहान मोठी ३५ मंदिरे असून, मूळ मंदिराला जोडून सभा मंडप आहे. त्याला ''गरुडमंडप'' म्हणतात. या मंदिराची सर्व व्यवस्था पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती करते.श्री अंबाबाई / श्री महालक्ष्मी भारतातील लाखो लोकांची कुलस्वामिनी आहे. मंदिराचा मुख्य उत्सव दसरा होय. चैत्र महिन्यात रथोत्सव मोठा साजरा करणेत येतो. या मंदिराच्या सभोवताली अनेक छोटी मंदिरे आहेत. त्यातीलच पूर्व बाजूचे राम मंदिर असून, त्या मंदिरात अक्कलकोटहून श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज करवीरी येवून प्रथम राहिले.

संदर्भ ग्रंथाचे नाव :- **श्री महालक्ष्मी दर्शन**

लेखकाचे नाव :- **नंदकुमार मराठे**

## ।। अध्याय ५ वा ।।



श्रीक्षेत्र नृसिंहवाडी

### ▪ विषयसूची....!

१) महारोगी ब्राम्हणाला श्री स्वामींनी बरे केले
२) कोल्हापुरातील फडणीसांच्या घरी काही काळ श्रींचे वास्तव्य
३) स्व. श्रीमंत केदारराव शिंदे म्हैसाळकर
यांच्या गावी श्री स्वामींचे प्रयाण
४) दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला चालत जाणेचा ताराईचा नियम
५) ताराबाईची आई भिमाबाई
६) श्री स्वामी हेच ताराबाईचे दैवत

## अध्याय ५ वा

अक्कलकोटहून श्रीकृष्ण स्वामींच्या बरोबर आलेल्या कुष्ठरोगी ब्राम्हणाचे कर्म संपत आले होते. एके दिवशी श्रीकृष्ण स्वामींनी त्याला जवळ बोलावून सांगितले की, ''तुझी व्याधी, तुझा कुष्ठरोग आता नाहीसा झाला आहे. आता पंचगंगेत जावून स्नान कर व आपल्या घरी जा. नेहमी आमची आठवण ठेव.'' यावर तो ब्राम्हण श्रीकृष्ण स्वामींना म्हणाला ''माझी व्याधी, माझा कुष्ठरोग जावो अथवा न जावो. त्याची मला काळजी नाही. परंतू तुमच्या वियोगाने माझी सेवा अंतरेल याचे मला वाईट वाटते.'' असे बोलून स्नानास गेला. पंचगंगेत स्नान करताच तो आश्चर्य चकित झाला. त्याची अंगकांती बदलून पूर्वी सारखी सुंदर झाली होती. कुष्ठरोगाचे नामोनिशाण पुसले होते. आनंदाने बेहोष होवून तो श्री महालक्ष्मी मंदिराच्या पूर्वेकडील राम मंदिरात श्रीकृष्ण स्वामींच्या दर्शनासाठी त्वरीत परत आला. परंतू श्रीकृष्ण स्वामींचे त्याला दर्शन झाले नाही. त्याला अतिशय दुःख झाले. त्याने तेथेच मुक्काम केला. श्रीकृष्ण देवांचा शोध घेतला परंतू सर्व व्यर्थ. कांही दिवसांनी त्याला श्रीकृष्ण देवांनी दृष्टांतात सांगितले ''माझ्या आज्ञेप्रमाणे घरी जावून सुखाने संसार कर. माझे स्मरण कर, तुझे कल्याण होईल.'' या दृष्टांतातील आज्ञेप्रमाणे तो ब्राम्हण आपल्या गांवी परत गेला.

त्या काळी करवीरात फडणीस नांवाचा एक श्रीमंत गृहस्थ रहात होता. बायको, मुले, धन्यधान्य समृध्दी याने त्याचा संसार श्रीमंत होता परंतु संसारात त्याचे मन रमत नव्हते. नेहमी तो उदासवृत्तीने रहात असे. श्रीकृष्ण स्वामी हे कारणिक पुरुष असून ते सत्पुरुष आहेत असे त्याच्या कानावर गेले. श्रीकृष्ण स्वामींचा तपास करीत तो श्री महालक्ष्मी मंदिरात आला. श्रीकृष्ण स्वामींचे त्याने मनोभावे दर्शन घेतले. त्या दैवी सत्पुरुषाच्या दर्शनाने त्याला असे वाटू लागले की, श्रीकृष्ण स्वामींच्या जवळ कायम रहावे. त्यांची सेवा आपल्या हातून घडावी. फडणीसाच्या मनातील घालमेल ओळखून श्रीकृष्ण स्वामी त्याला म्हणाले ''तुझ्या इच्छे प्रमाणे माझ्या जवळ राहायला मिळेल पण कठीण प्रकारे सेवा करावी लागेल. सेवाधर्म पाळावा लागेल. त्याचा विचार कर.'' हे आपल्या मनातीलच विचार ऐकून श्रीकृष्ण स्वामी हे अवतारीच आहेत हे पटून त्यांना घरी घेवून आला व मनोभावाने त्यांची सेवा करु लागला.

फडणीसाची पत्नी भाविक नव्हती. ती कजाग बाई होती. तिची श्रीकृष्ण स्वामींच्यावर श्रध्दा नव्हती. ती असा विचार करी की, ''आपला नवरा भोळसट असून, घरात लहान लहान मुले आहेत. अशात हा साधू म्हणून मूर्ख मनुष्य घरात आणून ठेवला आहे हे बरे नाही. कसला साधू? हा आपल्या हाताने जेवत नाही. दुसऱ्याने भरवावे लागते. बसल्या जागी हा शौच करतो. हा विपरीत मनुष्य आहे. याची सेवा त्रासदायक आहे. याच्या सेवेने काय लाभ आहे?'' म्हणून ती श्रीकृष्ण स्वामींना त्रास देवू लागली. एके दिवशी श्रीकृष्ण स्वामी फडणीसाला म्हणाले, ''आता अशुभ वेळ आली आहे'' श्रीकृष्ण देवांचे हे बोलणे फडणीसाला कळले नाही.

स्वामींच्या बोलण्याचा उलघडा झाला नाही. पुढे थोड्याच दिवसात फडणीसाचा लहान मुलगा तापाने वारला. मग काय विचारता? फडणीसाच्या बायकोने मोठा आकांत केला. घरात आणलेला साधू नसून तो प्रत्यक्ष यमदूत आहे. त्याच्या मुळेच मुलगा गेला. अशा प्रकारची दुषणे ठेवून श्रीकृष्ण स्वामींची निर्भत्सना केली. ती ऐकून फडणीसाला खूप वाईट वाटले. त्याने बायकोची निर्भत्सना करुन म्हणाला ''तू दुष्ट, पापी स्त्री आहेस, श्रीकृष्ण स्वामींना दूषणे देवून तू कुठे पाप फेडशील. पुढील जन्मात तू नरकात जाशील'' हा पतीपत्नीचा झगडा ऐकून श्रीकृष्ण स्वामी फडणीसाला म्हणाले ''प्रपंचाचा तुम्हा पति-पत्नी वर पगडा आहे. लवकरच तुम्हांला आणखी मुले बाळे होतील'' असे बोलून श्रीकृष्ण स्वामींनी फडणीसाच्या घराचा त्याग केला. फडणीसाने बराच आग्रह केला परंतु श्रीकृष्ण स्वामी दुसरीकडे निघून गेले.

म्हैसाळकर या आडनावांचे एक संपन्न, धनिक, सदाचार संपन्न गृहस्थ त्यांच्या म्हैसाळ गांवी रहात होते. त्यांच्या घरी संतती, संपत्ती भरपूर असून, श्रीकृष्णस्वामींच्या ठायी त्यांची निष्ठा, श्रध्दा होती. म्हैसाळहून ते नेहमी फडणीसाच्या घरी श्रीकृष्ण स्वामींच्या दर्शनाला येत. करवीरात वास्तव्य असल्याने नेहमी स्वामींचे दर्शन घेत. त्यांना नेहमी वाटे की, श्रीकृष्ण स्वामींचे पाय आपल्या घराला, वैभवाला लागावेत, त्यांच्या अंत:करणातील शुध्द भावना ओळखून एक दिवस श्रीकृष्णस्वामी त्यांना म्हणाले ''तुमचा हेतू मला कळला. कांही दिवस वास तुमच्या गांवी होईल'' आपल्या मनातील हेतू न सांगता श्रीकृष्णस्वामीस कसा कळला? याचे आश्चर्य म्हैसाळकरांना वाटून राहिले व उत्तरोत्तर त्यांची श्रीकृष्णस्वामींच्या वरील श्रध्दा वाढत चालली. एके दिवशी दोन प्रहरी श्रीकृष्ण स्वामी फडणीसाच्या घरातून बाहेर पडले व म्हैसाळकरास म्हणाले की, ''कांही कार्य करवीरात आहे ते आवरुन म्हैसाळला जावू'' ते ऐकून म्हैसाळकरास फार आनंद झाला व स्वामींच्या मागोमाग निघाले, तेथून श्रीकृष्णस्वामी कुंभार गल्लीत जावून महानसाध्वी तारामतीच्या घरां समोर उभे राहिले. म्हैसाळकरास ते म्हणाले ''हेच माझे वसतीस्थान, घर'' ताराबाईला हाका मारुन ''आई भोजन दे'' म्हणू लागले. ताराबाई भिक्षा घेवून आली व श्रीकृष्ण स्वामींना बघताच म्हणाली ''आपण तर बटू मूर्ती ब्राम्हण दिसता. मी शिजवलेले अन्न तुम्हांला कसे वाढू? त्यापेक्षा तुम्हांला कोरडा शिधा देते आपण स्वयंपाक करुन ग्रहण करावा.'' ''ताराबाईने मला ओळखले नाही. तिची द्वैतभावना अद्याप दूर झाली नाही. तो पर्यंत आपण दुसरीकडे जावू'' असा विचार करुन श्रीकृष्ण स्वामी म्हैसाळकरांच्या सोबत म्हैसाळला निघून गेले.

दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला चालत जाण्याचा ताराबाईचा नियम होता. बरेच वर्षे हा नियम ताराबाईने पाळला होता. पण कर्मगती कोणास चुकली आहे. पुढे ताराबाईला पोटदुखीचा / पोटशुळाचा आजार जडला. अन्न खाणे / पचणे जमेना. पोटदुखी राहिना. यातूनही नृसिंहवाडीला जाण्याचा नियम ताराबाईंनी चालविला. पोटदुखीमुळे, शरीर व्याधीमुळे, ताराबाईला आता

नृसिंहवाडीला जाणे जमेना. एका पौर्णिमेला नृसिंहवाडीत मुक्कामाला असतांना ताराबाईने श्री दत्तात्रेयाला जड अंत:करणाने प्रार्थना केली. ''व्याधीमुळे मला आता चालत येवून तुमचे दर्शन घेणे जमणार नाही. व्याधी आता मला सोसवत नाही. यातून आता मला लवकर मुक्त कर'' जड अंत:करणाने तिने निरोप घेतला. ताराबाईचे शुध्द अंत:करण जाणून श्री गुरु दत्तात्रेयाने तिला रात्री दृष्टांत दिला की ''तुझ्या घरी आम्ही चालून आलो असता भोजन दिले नाहीस, आता तुझा भोग संपत आला आहे. यापुढे वाडीस पुन्हा येवू नको. म्हैसाळास जावून श्रीकृष्ण स्वामीस आपल्या घरी घेवून जा व द्वैतभाव सोडून भक्तिने त्यांची सेवा कर. मीच तो आहे'' असे स्वप्न पडताच ती जागी झाली. मनोमन स्वप्नाचे कौतुक करीत दुसरे दिवशी कोल्हापूरास परत आली. घोडागाडी घेवून म्हैसाळास श्रीकृष्ण स्वामींना आणणेस गेली. श्रीकृष्ण स्वामींना पाहून तिचे अंत:करण भरुन आले. झाल्या अपराधाची क्षमा मागून ती सभावे उभी राहिली. तिचा शुध्द भाव जाणून श्रीकृष्ण स्वामी तिच्या बरोबर जाणेस सिध्द झाले. हे पाहून म्हैसाळकरांना खूप दु:ख झाले. तथापि, करवीरास ताराबाईचे घरी दर्शन होईल असे सांगून स्वामी म्हैसाळहून करवीरास ताराबाई समवेत आले. ताराबाईने श्रीकृष्णस्वामींना घरी आणून पलंगावर बसवून नाना प्रकारची पक्वान्ने तयार करुन श्रध्देने घातली. त्या दिवसा पासून ताराबाईने श्रीकृष्णस्वामींना आपले उपास्य दैवत, आपला देव समजून आपले राहिलेले आयुष्य खर्ची घातले.

ताराबाईची वृध्द आई घरी होती. तिचे नाव भीमाबाई होते. आपली मुलगी श्रीदत्त अवतार समजून श्रीकृष्णाची / मनुष्याची सेवा करते / सलगीने वागते हे भीमाबाईला बरे वाटले नाही. तिला विषाद वाटू लागला. ती श्रीकृष्णस्वामींची निंदा करु लागली. एके दिवशी दोनप्रहरी भीमाबाई मैत्रिणींसह सारीपाठ खेळत होती. हास्यविनोद, दंगा चालला होता. तो पाहून श्रीकृष्ण स्वामी तेथे गेले व भीमाबाईला म्हणाले ''जन्मास आलेल्या नरदेहास संसारपट फिरत असता विचार करुन फांसा टाकावा व अनुकूल डाव न पडेल तर नरदेहास काळमुखी पडल्यानंतर पुर्नजन्म व नरक यातना चुकणार नाहीत व हातचा डाव गेला म्हणजे पुढे कांही उपाय चालणार नाही. मुली निमित्त उत्तम वाट दिसत असतांना यमघाट चढू नकोस'' श्रीकृष्णस्वामींच्या या लाक्षणिक बोलण्याचा अर्थ भीमाबाईला कळला नाही.

सारीपाठ खेळात व्यत्यय येतो म्हणून तिने परस दारात श्रीकृष्ण देवांना कोंडून घातले व पुन्हा सारीपाठ खेळण्यात मग्न झाली. इतक्यात ताराबाई तिथे आली व तिने आईला विचारले ''श्रीकृष्ण स्वामी कोठे आहेत?'' भीमाबाईने झालेली हकीकत ताराबाईला सांगितली. ताराबाईने घाबरुन दाराची कडी काढली व परसदारात श्रीकृष्ण स्वामी नाहीत पाहून ती घाबरुन गेली व बेशुध्द पडली. जवळच्या मंडळींनी ताराबाईला शुध्दीवर आणले व सर्वजण श्री श्रीकृष्ण स्वामींचा तपास करु लागले. तेंव्हा त्यांना मागील परसदारात असलेल्या औदुंबराच्या झाडावरील फांद्यावरुन श्रीकृष्ण स्वामी फिरत आहेत असे दिसले. ताराबाई व इतर भक्त मंडळींनी आर्जवाने श्रीकृष्ण स्वामींना औदुंबर झाडावरुन खाली उतरुन घेतले. त्यांची पूजा केली. ताराबाईने,

आईने अज्ञानपणाने केलेल्या अपराधांची क्षमा मागितली. भीमाबाईसही उपरती होऊन पुढे ती आयुष्यभर श्रीकृष्ण स्वामींच्या सेवेत श्रध्देने राहिली. श्रीकृष्ण स्वामी हा श्री गुरुदेव दत्ताचा अवतार आहे अशी ख्याती लोकांत दिवसेंदिवस वाढत चालली.

ताराबाईंच्या मुलाचे नाव दत्तोबा. तो मातृभक्त होता. ताराईचा प्रत्येक शब्द मानी, घरचा व्यवहार चालवी. माय-लेकरे श्रीस्वामी सेवेत सुख मानून होते. दत्तोबाच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई होते. तीहि स्वामीभक्त होती. महिन्याकाठी स्वयंपाकाला चार दिवस हातभार लागत नसे याची हुरहूर लक्ष्मीच्या मनाला लागे. पाचव्या दिवशी ताराई लक्ष्मीला म्हणे ''लक्ष्मी लवकर ऊठ आंबेमोहर तांदळाची खिचडी कर. काकड आरती होताच ती मी श्रीस्वामींना भरवीन.'' काकड आरती होताच. ताराई श्रीस्वामींना खिचडी भरवी. खिचडी खावून श्रीस्वामी तृप्त होवून ढेकर देवून म्हणत ''आज पोट भरले.'' ''स्वत: स्वयंपाक करुन श्रीस्वामींना नैवेद्य अर्पण केल्याने श्रीस्वामी प्रसन्न असतात/ राहतात.'' असे ताराई लक्ष्मीला म्हणत असे. तेव्हांपासून आजपर्यंत स्वत: स्वयंपाक करुन श्रीस्वामींना नैवेद्य अर्पण केल्याने, श्रीस्वामी सेवा करीत राहिल्याने श्रीस्वामींची कृपा श्री शिर्के घराण्यावर आहे/राहाणार आहे, कारण श्री शिर्के घराणे हे ताराईच्या वचनास जागत आहे.

भवतापांचे शमन होवून शांतीसुखाचा लाभ व्हावा म्हणून शेकडो लोक श्रीकृष्ण स्वामींच्या दर्शनास व आरतीस जमू लागले. कित्येक लोकांची पिशाच्चबाधा दूर झाली तर अनेकांची संकटे दूर झाली. सर्व लोक श्रध्देने/भक्तिने स्वामींना भजू लागले.

श्रीकृष्ण स्वामी परब्रम्हस्वरुप सर्वज्ञ व नेहमी आत्मरुपात रमणारे, भक्तांवर कृपा करणारे लोकांना वाटू लागले. ते नेहमी हसतमुख, प्रसन्नमुख, शांतवृतीत रममाण होत. ते अंगाने ठेंगणे व कांतीने तेजःपुंज होते. भावनिक/कामनिक लोकांची गर्दी त्यांच्या भोवती जमू लागली. परंतु निष्काम भक्ति करुन पारमार्थिक कल्याण फारच थोड्या लोकांनी साधले. मनुष्यरुपाने प्रकट होवून दूरदूरच्या भक्तांची संकटे ते दूर करीत. श्रध्दापूर्वक शरण गेल्यास त्यांच्या मनातील आशयाचे/प्रश्नांचे उत्तर देत, त्यांचे मन ओळखत. तथापि जग विविध आहे. कांही श्रीकृष्णस्वामींना मदांधपणे पीडा देत, त्रास देत. कोणी त्यांना वेडा म्हणत तर कोणी त्यांची निंदा करीत. परंतु सदैव ते आत्मस्वरुपी रममाण असत. संताना, सत्पुरुषांना अशा पाखंडी त्रासाला सामोरे जावे लागते. मगच देवपण खुलून दिसते. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, रामदास स्वामी इत्यादी या लोकांच्या कसोटीला, त्रासाला सामोरी गेल्याचे दिसून येते. ताराबाईचा मुलगा दत्तोबा सदाचारी असून, तोही ताराबाईंच्या आज्ञेत वागून श्रीकृष्ण स्वामी सेवेत रममाण झाला. ताराबाईने आपले तन, मन, धन श्रीकृष्णस्वामींना अर्पण केले व त्यांच्या सेवेत रात्रंदिवस निमग्न झाली.

*****

# स्व.श्रीमंत केदारराव शिंदे म्हैसाळकर यांच्या घराण्याची माहिती

विजयनगरचे पाडावानंतर बरेचसे थोर घराण्यातील शिलेदार आपणांजवळ असणाऱ्या सैन्यनिशी विजयनगर दौलताबाद सोडून उत्तरेकडे वळले. त्यातीलच शिवछत्रपतींचे घराणे दौलताबादजवळ वेरुळ जवळच्या परगण्यात स्थायिक झाले. जिजाबाईंचे माहेर – जाधवराव हे पण याच कालखंडात उदयास आले. भोसले घराण्यातील मालोजी, शहाजी वगैरे पराक्रमी पुरुष दक्षिणेतील यवनांच्या दरबारी शिलेदारी करु लागले. त्यावेळी शिंदे घराण्यातील पराक्रमी असे कांही शिंदे महाराष्ट्रात आले आणि त्यांनी पण स्वपराक्रमांनी आपल्या छोट्या जहागिऱ्या स्थापन केल्या. कण्हेरखेड हे शिंदे घराण्याचे पहिले ठिकाण मानले जाते. त्याचबरोबरच तोंडली–बोंडली ही इनामी गांवे पण शिंदे घराण्याचीच होती. या शिंदे लोकांपैकी कांही पराक्रमी पुरुष ढवळेश्वराला स्थायिक झाले. आजही त्या गांवी शिंदे घराण्यातील मूळ पुरुषांच्या समाध्या प्रचंड स्वरुपात उभ्या आहेत. तसेच कांहीसे कर्नाटकात मोडणारे म्हैसाळ हे टुमदार, कृष्णेच्या काठी असलेले गांव शिंदे घराण्याचेच आहे. कण्हेर गांवी शिंदे हे पाटील म्हणून घेत असत आणि त्यामुळेच महादजी शिंदे यांना पेशवे दरबारात पाटील बाबा म्हणून मोठ्या सन्मानाने संबोधले जायचे.

**शिंदे सरकार – कसबे म्हैसाळ गांवचे सरंजामदार –**

या घराण्याचा फार जुना इतिहास उपलब्ध नाही. परंतु सर्वसाधारण १५ व्या शतकापासून इतिहास मिळू शकतो. उपलब्ध माहितीनुसार या शिंदे सरंजामदार घराण्याचा मूळ पुरुष ''भवानराव शिंदे'' हे गांवचे राजे म्हणून कार्यभार सांभाळत होते. त्यांचा मोठा वाडा गांवच्या मध्यावर, टेकडीवर, उंचवट्यावर होता. (सध्या तो वाडा पाटील यांना विकला आहे) जवळच जैन मंदिर, सरकारी घोड्याची पागा, चौगुले यांचे वाडे होते. खाजगीतला वाडा व त्याचे जवळ दप्तरखाना, दिवाण कुलकर्णी यांचे ऑफिस होते. त्या इमारतीजवळ प्रचंड बुरुज होता. टेहळणीसाठी व प्रत्येक तासाला तास वाजविणेची व्यवस्था होती. अजूनही ह्या ठिकाणी हुड्यांचा वाडा म्हणतात. तो स्वर्गीय मलगोंडा केसगोंडा पाटील यांनी पुढे खरेदी केला. त्यांना हुड्यांतील पाटील म्हणतात.

नियमित आयुष्य जगणारे भवानराव एक सरंजामदार होते. भवानरावांना दोन राण्या होत्या. मोठ्या विठाबाई व धाकट्या नबाबबाई. भवानरावांच्या पश्चात या दोन्ही स्त्रियांनी बरीच वर्षे म्हैसाळ गांवचा कारभार पाहिला असावा असे वाटते. या दोन्ही स्त्रियांनी गांवासाठी कांही सार्वजनिक कामे केल्याचे दाखले आहेत.

अशा या दोन्ही महत्वाकांक्षी स्त्रियांनी कांही वर्षे म्हैसाळचा कारभार पाहिला व पुढे वंशाला वारस असला पाहिजे म्हणून सहकाऱ्यांच्या विचाराने दत्तक घेणेचा खल सुरु झाला. त्यावेळी सरकारनांच शिंदे म्हणत. इतर भाऊबंदांना ''मोकाशी'' म्हणत असत. मोकासा

म्हणजे वतन, त्यावरुन या लोकांना शिंदे आडनांव असतांनाही मोकाशी म्हणत असत. अजुनही कांही गांवात मोकाशी नांवाची मराठ्यांची घराणी आहेत. म्हैसाळ मधील मोकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कांही लोकांनी नंतर शिंदे हेच आडनांव चालू ठेवले.

भवानरावांच्या पहिल्या पत्नी विठाबाई यांनी वारसासाठी दत्तक घेणेचा विचार केला. त्याचवेळी भवानरावांच्या दुसऱ्या पत्नी नबाबबाई यांनी पण दत्तक घेणेचा विचार केला. गांवात दोन वारसदार होणेची चिन्हे दिसू लागली. दोन्ही बाजुचे लोकांतील कांही भाऊबंद विठाबाईकडे तर कांही नवाबबाईकडे. तसेच गांवातील लोकांमध्ये पण झाले. जो तो जागरुक हालचाली पाहू लागला व करु लागला. विठाबाईंनी आपल्या जवळच्या भाऊबंदापैकी मुलगा पाहिला तो म्हणजे ''केदारराव ऊर्फ आप्पासाहेब' होत. या मुलाच्या वडिलांचे नांव बाबासो शिंदे मोकाशी. हा भाऊबंद तसा थोडा जवळचा होता. बाबासोंच्या पत्नीचे नांव राधाबाई या सोनीच्या चव्हाण घराण्यातील होत्या. बाबासो व राधाबाई यांचा एकच असलेला पुत्र केदारराव यांना विठाबाईंनी दत्तक घेतले.

यावेळी कोल्हापुरच्या गादीवर छ. चौथे शिवाजी होते. वयाने ते लहान होते. त्याकाळी संस्थानाचा कारभार ब्रिटीश अधिकारी (रिजंट) पाहत असे. दत्तक युवराजांची सर्व व्यवस्था, शिक्षण वगैरे त्यांच्या नजरेखाली चाले. म्हैसाळची मंडळी कोल्हापुरला कोणाकडे गेली? केदाररावांना रिजंट पुढे कोणी उभे केले? हा इतिहास आपल्या दुर्देवाने जाणू शकत नाही.

कोल्हापूरच्या छत्रपतींच्या शिक्षणासाठी जय्यत तयारी सुरु होती. त्यासाठी रिजंटने सौराष्ट्रातील राजकोट राजधानीत प्रिन्स कॉलेजमध्ये छत्रपतींच्या शिक्षणाची व्यवस्था करणेचे ठरविले होते. ह्या कॉलेजमध्ये प्रायमरी, सेकंडरी, हायर एज्युकेशनची व्यवस्था होती. फक्त भारतातील राजे लोकांच्याच मुलांनाच तिथे घेतले जाई. कोल्हापूरच्या रिजंटने छत्रपती युवराजाबरोबर कंपॅनियन्स म्हणून दक्षिण भागातील संस्थानाच्या राजपुत्रांना सिलेक्ट केले होते. भाग्याची गोष्ट म्हणजे - अतिशय स्मार्ट, हुशार, चपळ अशा या म्हैसाळच्या राजपुत्राला छत्रपतींचा एक कंपॅनियन म्हणून राजकोटच्या प्रिन्स कॉलेजमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. ''कोल्हापुरने म्हैसाळचा सरंजामदार घडविला'' आहे. या सर्वांचा छोट्या केदाररावांवर फारच चांगला परिणाम झाला ते बहुश्रुत झाले. इंग्रजी विषयावर त्यांनी जबरदस्त पकड बसविली. ब्रिटीशांपेक्षा तडफदार ते इंग्रजी बोलत, अस्खलीत उच्चार, भरीव आवाज, उत्तुंग व्यक्तिमत्त्व, प्रसन्न जरब बसविणारा चेहरा यामुळे त्यांच्या पुढे उभे राहून बोलणे म्हणजे एक दिव्यच वाटत होते.

ह्या नंतर कागलचे महाराज जयसिंगराव घाटगे हे कोल्हापूर संस्थानचे रिजंट झाले. आप्पासाहेब म्हैसाळकर कोल्हापूर या ठिकाणीच असल्याने साहजिकच जयसिंगरावांच्या सानिध्यात आले. त्यांच्या बरोबर कोल्हापूर संस्थानच्या कारभारात लक्ष घालू लागले. तडफदार, उत्साही, बाणेदार, उमदा, राज घराण्याचे तेज असलेला हा म्हैसाळ जहागिरीचा

तरणाबांड राजपुत्र जयसिंगरावांसारख्या राजकारणी चाणाक्ष, धुरंदर व्यक्तीच्या नजरेतून कसा सुटेल? जयसिंगरावांनी आपला मोठा मुलगा श्रीमंत यशवंतराव यांना कोल्हापुरच्या गादीवर दत्तक दिले आणि तेच सर्व मराठ्यांचे दैवत शाहू महाराज.

जयसिंगरावांच्या सानिध्यात केदारराव आल्याने त्यांना चतुर जयसिंगरावांनी आपली धाकटी मेहुणी लक्ष्मीबाई यांचा विवाह केदारराव ऊर्फ आप्पासाहेब यांच्याशी केला. कोकणातील सुर्वे कुटुंब हे खानदानी कुटुंब आहे. ह्या सात बहिणी व दोन भाऊ (आप्पासाहेब व मामासाहेब) होते. त्यातील पहिली मुलगी कागल घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांना दिली होती. मागील सहा पण अशाच जहागिरदारांना दिल्या होत्या. केदारराव व लक्ष्मीबाई हे दोघेजण कोल्हापूर, कागल या ठिकाणी रहात होते. महाराजांचा दत्तकविधी, शिक्षण व राज्याभिषेक होईपर्यंत केदारराव कोल्हापूर मध्येच होते. छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार सुरु केल्यानंतर जयसिंगरावांच्या राजकारणाच्या तालमीत तयार झालेल्या आपल्या लोकांना जवळ केले. ह्यात प्रमुख आप्पासाहेब ऊर्फ केदारराव होते. सख्या मावशीचे पती म्हणून श्रीमंत केदारराव शिंदे म्हैसाळकरांना कोल्हापूर संस्थानात फार मान होता.

कोल्हापूर संस्थानात बराच काळ राहून श्रीमंत केदारराव आपल्या स्वत:च्या जहागिरीत म्हैसाळ या ठिकाणी अंदाजे २४-२५ व्या वर्षी आले. ह्यावेळी दीड-दोन हजार लोकवस्ती असलेले हे छोटे गांव होते. म्हैसाळ हे सांगली संस्थानच्या अधिपत्याखाली होते. त्याला ''कसबा म्हैसाळ'' असे म्हणत असत व अजूनही ''कसबा म्हैसाळ'' म्हणूनच सांगली जिल्ह्यात ओळखतात. तशी ही जहागिरी - सरंजाम सात गांवचा मिळून होता. त्यामध्ये मुख्य कसबे म्हैसाळ, नरवाड, कवठेगुलंद, मल्लेवाडी, मळणगांव वगैरे गांवे होती. त्याकाळी सरंजाम एकत्र न ठेवता त्या त्या गांवात शिंदे सरकार घराण्याला एक एक गांव दिले. त्यातील कांही गांवे सांगली संस्थानाच्या अधिपत्याखाली व कांही मिरज संस्थानाच्या अधिपत्याखाली होती. उदा. नरवाड मिरज संस्थानात होते. ब्रिटीशांच्या Divide & Rule यानुसार सर्वांना स्वतंत्र करुन त्यांच्यामध्ये भांडणे लागावीत ही त्यांची विचारसरणी/ विचारधारा होती आणि आत्तापर्यंत ते सर्व भांडतच आहेत.

श्रीमंत केदारराव शिदे म्हैसाळमध्ये आले. सध्या जैन मंदिराजवळ जो सरकार वाडा आहे तो सध्या स्वर्गीय मलगोंडा पाटील यांचे नातू व स्वर्गीय बाळासो मलगोंड पाटील यांचे चिरंजीव डॉ. श्री बापूसाहेब पाटील यांच्याकडे आहे. हा वाडा प्रचंड मोठा होता. त्याच्या दक्षिण बाजूस स्वतंत्र कचेरीची इमारत होती. मुख्य इमारतीच्या उत्तर बाजूस स्वतंत्र घोड्याच्या पागा, जनावरांचे गोठे होते.

संदर्भ ग्रंथाचे नाव :- **आनंदयात्री**

लेखकाचे नावः- **डॉ. श्री जयसिंगरावबाबा शिंदे (म्हैसाळकर)**

वंशावळ सांगणार - सुभाष शंकर हेळवी

मु. पो. नदी गुडीकेत्र

तालुका - हुक्केरी, जि. बेळगाव

# म्हैसाळकर शिंदे यांची वंशावळ

मूळ पुरुष भिवाजी (ग्वाल्हेर)

राणोजीराव(कण्हेर) — रत्नाजीराव — संभाजीराव — येसूबाई (मुलगी)

राणोजीराव(कण्हेर):

दत्ताजी (१० जानेवारी १७०७ पानिपतमध्ये शहीद झाले ) — जयाजी — विठोजी (पानिपतहून परत आलेच नाहीत) — महादजी (ग्वाल्हेर शाखा)

जयाजी

जानकोजी

केदारजी — माणकोजी

केदारजी → खेत्रोजी म्हैसाळ शाखा

माणकोजी → यमाजी - मल्लेवाडी शाखा

खेत्रोजी म्हैसाळ शाखा

केदारजी

भवानरावजी - पत्नी विठाबाई

दत्तक

केदारराव (आप्पासाहेब) पत्नी - लक्ष्मीबाई

दत्ताजीराव — यशवंतराव — गणपतराव — कन्या - कोल्हापूर सरनौबत

कन्या - कोल्हापूर सरनौबत: आबासो। — किशोरसिंग — जयसिंग — मोहनराव — आप्पासाहेब

दत्ताजीराव → शंकरावजी

यशवंतराव: वसंतराव — माधवराव — हणमंतराव

शंकरावजी: इंद्रसेन — दिलीपसिंह — केदाररावजी

आबासाहेब — किशोरसिंग — जयसिंग — मोहनराव — आप्पासाहेब

आबासाहेब: दीपक — किरण

जयसिंग: रतन — कैलास

मोहनराव: मनोज — परेश

आप्पासाहेब: आबासाहेब



स्व.श्रीमंत केदाररावजी शिंदे, म्हैसाळकर



ज्या राजवाड्यात श्रींचे वास्तव्य झाले तो जुना राजवाडा(म्हैसाळ)
(सध्या डॉ. श्री बापूसाहेब पाटील यांचे वास्तव्य)

# पुण्यश्लोकताराई शिर्केंची कुटुंबीय माहिती

शिर्के कुंटूंबिय मूळ कोकणातील. पुण्यश्लोक ताराईंच्या पतीचे नांव कृष्णाजी शिर्के होय. अनेक जन्मांची पूर्व पुण्याईने ताराबाईंच्या नृसिंहवाडीच्या दर पौर्णिमेला वारी करण्याने श्री दत्त महाराज त्यांच्या घरी आले. ताराबाई शिर्केंचे घर हे कुंभार गल्लीत असल्याने श्री स्वामींना कुंभार गल्लीतील दत्त महाराज किंवा कुंभार स्वामी हेच नांव रुढार्थाने पडले. श्री कुंभार स्वामींचे नांव हे श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज असे असून, त्यांचा नांदणीला (ता. शिरोळ) आप्पाभट जोशी व अन्नपूर्णादेवी यांच्या पोटी शके सतराशे सत्तावन्न, माघ कृष्ण पंचमी, रविवार, सूर्योदयाला (दि. ७/२/१८३६) रोजी झाला. श्री स्वामी समर्थ सन १८५७ च्या आसपास अक्कलकोटला प्रकट झाले. अंदाजे १८६० ते १८६५ दरम्यान श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज अक्कलकोटला श्री नृसिंहभान स्वामी म्हणजेच श्री अक्कलकोट स्वामी समर्थाच्या भेटीला गेले. त्यांच्यावर श्री स्वामी समर्थांनी कृपा करुन, अनुग्रह करुन श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना करवीर / कोल्हापूर हे कार्यस्थळी नेमून देवून त्यांना करवीरला जाण्याची आज्ञा दिली. एका कुष्ठी ब्राम्हणाला बरोबर घेवून श्रीकृष्ण सरस्वती दत्तमहाराज करवीर / कोल्हापूरला आले. श्री अंबाबाईच्या देवळात पूर्व बाजूला असलेल्या श्री राम मंदिरात उतरले.

त्या कुष्टी ब्राम्हणांचा कुष्ठरोग बरा केला. फडणीसाच्या बायकोला पिशाच्चमुक्त केले. अनेकांच्या वेदना, दु:ख दूर केले. एक दिवस ते ताराबाई शिर्केंच्या घरी दोनप्रहरी संपन्न, धनिक म्हैसाळकरांला बरोबर घेवून भिक्षेला उभे राहिले. ''आई आई, भोजन दे, भिक्षा घाल'' असे विनवून ताराबाईच्या घरासमोर उभे राहिले. पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंनी बाल स्वरुपातील दारासमोर उभा राहिलेल्या, भिक्षा मागणाऱ्या श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना ओळखले नाही. ताराबाई शिर्के ओली कोरडी भिक्षा घेवून बाहेर आल्या. परंतू ओली भिक्षा भाकरी, भाजी ही समोर उभा राहिलेल्या ब्राम्हण बटुला कशी द्यावी? हा प्रश्न पडला. त्यांना नृसिंहवाडीला श्री त्रैमूर्ती दत्तांनी दिलेला दृष्टांत आठवला नाही. त्यांनी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना ओळखले नाही. त्या भिक्षा मागणाऱ्या ब्राम्हण बटू मुर्तीस पाहून, एक क्षण थांबून, शिजलेले अन्न कसे द्यावे असा मनात विचार आणून त्या दारात भिक्षेला उभा राहिलेल्या बटू मूर्तीतील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना म्हणाल्या ''आपण ब्राम्हण दिसता. तुम्हाला शिधा सामान देते. स्वयंपाक करुन तुम्ही भोजन करा'' असे म्हणून परत घरात शिधा सामान आणण्यासाठी गेल्या. ''स्वप्नातील दृष्टांत प्रमाणे आपणास ओळखले नाही. ताराबाईच्या मनांत द्वैतभाव ठाण मांडून बसला आहे. तिला आत्मशोधन करु दे'' असे म्हणून श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज हे श्रीमंत केदारराव शिंदे सरकार (म्हैसाळकर) यांच्या बरोबर म्हैसाळ (ता. मिरज, जि. सांगली) ला आले. पुढे पोटशुळाने त्रस्त असलेली जिचा पूर्वसुकृत मोठा ठेवा आहे अशा ताराबाई नेहमी प्रमाणे पौर्णिमेला नृसिंहवाडीला श्री दत्त दर्शनाला आल्या व प्रार्थना करुन म्हणाल्या ''आता

पोटदुखीच्या व्याधीमुळे येथून पुढे तुमच्या दर्शनाला येणे कठीण आहे. हे आता तुमचे शेवटचे दर्शन घेत आहे. तुम्हाला त्रिवार वंदन करीत आहे.'' त्या रात्री ताराबाईनी नृसिंहवाडीत नेहमी प्रमाणे मुक्काम केला. स्वप्नात श्री दत्त महाराज ताराबाईच्या स्वप्नात आले व म्हणाले ''बटू रुपाने तुझ्या दारात मी भिक्षेला उभा होतो. तू आम्हांला ओळखले नाहीस. तुझा भोग आता संपला आहे. व्याधी संपली आहे. आता मीच तुझ्या घरी येतो. म्हैसाळला मला न्यायला ये'' स्वप्नातून ताराबाई खडबडून जागी झाली. तिला विस्मय वाटला, आनंदही वाटला. तिने श्री दत्तात्रेयाला ओळखले नाही याची मनोमन क्षमा मागितली. भिक्षेला आलेला बटू हाच दत्तात्रय होता, श्री दत्त अवतार होता याचा उलगडा स्वप्नाने केला होता. अधीरपणे ताराबाई कोल्हापूरला परत आली. घोडागाडी करुन सत्वर ती म्हैसाळला आली. श्रीमंत केदारराव शिंदे (म्हैसाळकरांच्या) वाड्यावर गेली. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना / कृष्णनाथांना क्षमा मागून, भिक्षा मागण्यासाठी आपण माझ्या घरी आला होता. मी अज्ञानाने ओळखले नाही म्हणून सांगून कोल्हापूरला घरी चलण्याविषयी विनंती करुन भावनेने, श्रध्देने ताराबाई उभी राहिली. ताराबाईची शुध्द भक्ती, पूर्व सुकृत पाहून श्री कृष्णनाथांचे मन भरुन आले. ते प्रसन्न झाले व म्हैसाळकरांना आशीर्वाद देवून ताराबाई बरोबर कोल्हापूरला तिच्या घरी निघाले, यथावकाश कोल्हापूरला पोहचताच ताराबाईनी कृष्णनाथांना पलंगावर बसवून, षोडशोपचार पूजा करुन पक्वानांची ताटे समोर ठेवली. कृष्णनाथांना आई म्हणून भरविले. श्री कृष्णनाथ हे ताराबाईचे दैवत होते. श्री स्वामी ताराबाईला आई म्हणत. यशोदा - कृष्णेचे या जन्मातील त्यांचे नाते पुन्हा सुरु झाले. श्री स्वामी सेवा अविरत करुन ताराबाईजीवन संपन्न करु लागली.

पुण्यश्लोक ताराबाईंच्या घरी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज म्हणजे श्री कृष्णनाथ आले त्यावेळी त्यांचे वय अंदाजे पंचवीस वर्षाचे असावे. श्री स्वामींनी २०/८/१९०० साली समाधी घेतली. म्हणजे श्री स्वामींनी पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंच्या घरी लहान मुलाप्रमाणे ४० वर्षे काढली. ते ताराबाई शिर्केंचे देव झाले. जगाचे देव झाले. पुण्यश्लोक ताराईमुळे श्री दत्त महाराज कोल्हापूरला आले व अनेक आर्त लोकांचा उध्दार केला हे सर्व ताराईमुळे घडले.

पुण्यश्लोक ताराई शिर्के व कृष्णाजी शिर्के यांना एक पुत्र होता. त्यांचे नाव दत्तात्रय / दत्तोबा असे होते. दतोबा शिर्केंच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई होते. त्यांनी जन्मभर स्वामी सेवा केली. दत्तोबा शिर्के यांना एक पुत्र होता. त्यांचे नाव रामनाथ होते. रामनाथ शिर्के एक चांगले चित्रकार होते. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत देखणे होते. श्री स्वामी सेवा, नित्य आरती, नित्य भजन असा त्यांचा दिनक्रम होता. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नांव लक्ष्मीबाई होते. लवकरच त्या वारल्या. श्री स्वामींच्या दृष्टांताने व भक्तांच्या आग्रहाने त्यांचे दुसरे लग्न हे कोल्हापूरातील शुक्रवार पेठेतील जैन स्वामींच्या मठा लगत राहणाऱ्या श्री स्वामी भक्त परशुराम दौलती माने यांच्या क्रमांक दोनच्या हिरा नावाच्या मुलीबरोबर झाले. श्री स्वामी आशीर्वादाने शिर्केंच्या

घरात आलेल्या या हिरा – सीता झाल्या. माईसाहेब शिर्के त्यांना म्हणले जाई. माईसाहेब या थोर तपस्वी होत्या. आज मठीतील पूजा अर्चा, उत्सव व इतर व्यवस्था याचा परिपाठ माईसाहेबांनी घालून दिलेला आहे. रामनाथ व सीताबाई शिर्के यांना तीन मुली व एक मुलगा पोटी जन्मले.

**१) तारामती :–**

या सर्वात मोठ्या असून, लग्नानंतरचे त्यांचे नाव मंदाकिनी शंकरराव भोसले, कोल्हापूर होय.

**२) मालुताई :–**

या क्रमांक दोनच्या कन्या लग्नानंतरचे त्यांचे नाव नलिनी मुरलीधर कदम, कोल्हापूर होय.

**३) वसंतराव ऊर्फ बाळासाहेब :–**

हे तिसऱ्या क्रमांकाचे चिरंजीव. यांची जन्म तारीख २५/१०/१९२८ हे राजबिंडे व्यक्तिमत्त्वाचे प्रेमळ होते. उत्तम भजन म्हणणारे रेडिओ स्टार होते. उत्तम संगीत जाणणारे होते. त्यांनीही आपले सर्व आयुष्य स्वामी सेवा, भजन, पूजन यात समर्पण केले. बाळासाहेबांनी श्री स्वामींच्या वरील जुन्या पोथ्या, साहित्याचा अभ्यास करून नवीन स्वरूपात समजणेस सोपी अशी श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांची पोथी लिहिली. त्या पोथीचे नांव ''**श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज चरित्र**'' होय.

**४) लीलाताई :–**

या क्रमांक चारच्या कन्या. लग्नानंतरचे यांचे नाव लीलाताई मधुकर नाईक, कोल्हापूर असे आहे. कृष्णाजी शिर्केना एकच पुत्र नांव दत्तोबा / दत्तात्रय, दत्तोबा शिर्केना एकाच पुत्र त्यांचे नाव रामनाथ शिर्के. रामनाथ शिर्के व सीतामाई शिर्के यांना तीन मुली व वसंतराव ऊर्फ बाळासाहेब एकच मुलगा. सीता / माईसाहेब या दि. ४/२/१९९४ ला स्वर्गवासी झाल्या तर बाळासाहेब दि. १९/११/१९९० ला स्वर्गवासी झाले. तारामती, मालुताई, लीलाताई याही स्वर्गवासी झालेल्या आहेत. स्व.वसंतराव ऊर्फ बाळासाहेब यांचा विवाह हा सातारा जवळच्या वेणेगाव येथील घोरपडे घराण्यातील विजयादेवी यांचेशी झाला होता. बाळासाहेब व विजयादेवी यांनी आपले संपूर्ण आयुष्य माईसाहेब शिर्के यांनी आखून दिलेल्या परिपाठाप्रमाणे श्री स्वामींची सेवा केली. लोकांना प्रेमाने, अगत्याने वागवले व श्री स्वामी लौकिक वाढविला. विजयादेवी या दि. ६/८/२००२ ला कालवश झाल्या. स्व. बाळासाहेब व विजयादेवी यांच्या पोटी तीन अपत्ये जन्मली. त्यांची माहिती खालील प्रमाणे.

**१) स्व.बबनराव ऊर्फ दत्तात्रय :–**

स्व. बाळासाहेब यांचे सर्वात मोठे चिरंजीव ते शांत स्वभावाचे, संगिताची जाण असलेले होते. ते उच्चविद्याविभूषित होते. उत्तम फोटोग्राफर होते. उत्तम भजन म्हणणारे होते. त्यांचा

विवाह कोल्हापुरातील दोनवडेकर कुटुंबातील गीतादेवी यांचेशी दि. ६/५/१९८० रोजी झाला. त्यांना दोन मुले असून, मोठ्या चिरंजीवाचे नांव रामनाथ (पिटू) असून, छोट्या चिरंजीवाचे नांव कृष्णनाथ (छोटू) आहे. बबनराव यांनी आपले संपूर्ण आयुष्य श्री स्वामी सेवेत भजन /पूजन / अर्चन यात शांतपणे घालविले आहे. श्री कृष्णनाथ यांनी भूगर्भ शास्त्रामध्ये पी.एच.डी पूर्ण केली आहे. बबनराव हे दि. ३/१/२००२ रोजी स्वर्गवासी झाले आहेत.

**२) स्व. शिवाजीराव :–**

स्व. बाळासाहेब यांचे क्रमांक दोनचे चिरंजीव. हे उत्कृष्ट तबलावादक होते. संगिताची जाण असणारे होते. तेही उच्च शिक्षित होते. उत्तम फोटोग्राफर होते. त्यांचा विवाह त्यांच्या वेणेगांवातील मामांच्या मुलीशी नलिनीदेवीशी दि. ६/५/१९८० रोजी झाला होता. स्व. शिवाजीरावांनी आपले संपूर्ण आयुष्य श्री स्वामी सेवेत घालविले. त्यांना एक मुलगी तिचे नांव राही असून लग्नानंतरचे नांव सौ. ज्योती किरण सुभेदार असून त्या डॉक्टर आहेत. त्या अमेरिकेत वास्तव्य करुन आहेत. स्व. शिवाजीराव यांना एक मुलगा असून त्यांचे नांव इंद्रजीत असून ते इंजिनिअर असून प्राध्यापक आहेत. शिवाजीराव हे दि. २३/९/१९९१ रोजी स्वर्गवासी झाले आहेत.

**३) महेश :–**

स्व. बाळासाहेबांचे हे तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात लहान चिरंजीव हे व्यापार शाखेतील उच्च पदवीधर असून, त्यांनी सुरुवातीला बँकींग क्षेत्रात नोकरी केली आहे. परंतु घरातील अडचणीमुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा देवून श्री स्वामी सेवा पत्करली. अंगावर पडलेली सर्व जबाबदारी स्वीकारुन ती उत्तमपणे पार पाडली. कारण घरातील सर्व मोठी माणसे कालवश झालेली होती. यांचा शुभ विवाह कोल्हापूरातील मोहिनी यांच्याशी झाला. त्यांना सत्यजीत (सोनू) हा एकुलता एक मुलगा आहे. तोही उच्च शिक्षण घेत असून, उत्तम चित्रकार आहे.

पुण्यश्लोक ताराई शिर्के यांनी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांनी समाधी घेण्यापूर्वी (समाधी दि. २०/८/१९००) म्हणजे अंदाजे १८९७ च्या आसपास श्री स्वामी चरणी देह अर्पण केला, स्वर्गवासी झाल्या तेंव्हापासून आजतागायत शिर्के कुटुंबीयांनी ताराईंनी स्वामींची मागून घेतलेली अखंड सेवा उत्तम प्रकारे चालविली आहे. म्हणजेच श्री स्वामींचा वास शिर्केंच्या घराण्यात आहे. ताराईच्या पुण्याईने श्री स्वामींनी जगाचा उध्दार केला आहे. पहाटे पाच वाजता शिर्के कुटुंबीयांची सेवा काकड आरती पासून दिवस सुरु होतो. रात्रीच्या शेज आरतीनंतर दिवस संपतो. तेथून भोजन विश्रांती म्हणजे पहाटे पाच ते रात्री ११ हा सर्व काळ शिर्के कुटूंबीय श्री स्वामी सेवेत आनंदाने कार्यतत्परतेने सगळ्यांशी मिळून मिसळून गोड वागून, पूजा अर्चा / आरती, भजन, जयंती, पुण्यतिथी, गुरुद्वादशी उत्सव हे पार पाडतात. अशा प्रकारे ताराई शिर्के व आताचा सर्व शिर्के परिवार यामुळे सर्वांचा उध्दार झाला आहे. ताराई शिर्केंच्या जुन्या मठीचा

आता नवीन मठीत/मंदिरात बदल झाला असून, सुंदर समाधी मंदिर झाले असून, वास्तूशांती दि.२३/३/२००९ रोजी पार पाडली.

१) स्व. रामनाथ दत्तोबा शिर्के

जन्म - १८८६ देवाज्ञा - १९३४

२) प. पू. वै. माईसाहेब रामनाथ शिर्के

जन्म - १९०७ निर्वाण - ४/२/१९९४

३) स्व. बाळासाहेब रामनाथ शिर्के

जन्म - २५/१०/१९२८ देवाज्ञा - १९/११/१९९०

४) स्व. शिवाजीराव बाळासाहेब शिर्के

जन्म - १९५५ देवाज्ञा - २३/९/१९९१

५) स्व. बबनराव ऊर्फ दत्तात्रय बाळासाहेब शिर्के

जन्म - १३/८/१९५३ देवाज्ञा - ३/१/२००२

६) स्व. श्रीमती विजयादेवी बाळासाहेब शिर्के

जन्म - १९३६ देवाज्ञा - ६/८/२००२

शब्दांकन :- **श्री महेश शिर्के, कोल्हापूर**



श्री मानस सरोवर, हिमालय

## तारामती सदनी। आले श्री गुरु मोक्ष दायनी ।।

तारामती सदनी ।
आले श्री गुरु मोक्ष दायनी ।।
पुंडलिकांच्या भक्तिसाठी
बध्द जाहला तो जग जेठी
तसा बांधला हिने परमेष्ठी
उपकृत भक्ता जनी ।।१।।

कैक जन्मीची सेवा खडतर
पर्ण भक्षुनी ध्यायी गुरुवर
अतिथीव्रत सेवेतही तत्पर
जन निंदा सोसुनी ।।२।।

अनु पौर्णिमा जाई लक्षुणी
श्रीपाद पुराला ती अनवाणी
दान धर्म करी मुक्त करानी
भिक्षुक दत्ता स्मरुनी ।।३।।

योगी मुनिंचे अराध्य दैवत
प्रसन्न केले हिने श्री अवधूत
दीन अनाथ आले तारत
कृष्ण सरस्वती म्हणूनी ।।४।।

इथे गुरुना वीज भेटली
इथे योग्याला सिध्दी लाभली
इथे भक्तांचे लाड करवीती
गुरुभक्ता अभिमानी ।।५।।

श्रीमती तारामती शिर्केचे कोल्हापुरातील कुंभार गल्ली मधील रहाते घर म्हणजे श्री कृष्ण सरस्वती महाराजांनी गौरविलेली वैराग्य मठी ही होय ! ह्याच वास्तू मध्ये महाराजांची समाधी असून येथे जवळ जवळ चार तपे महाराजांनी प्रत्यक्ष अगम्य लीला केल्या आहेत. आजही अनेक भक्तांना महाराजांच्या दिव्य शक्तीचा अनुभव तेथे येत असतो.

श्री स्वामी प्रेषित कोड / कुष्टाने त्रस्त झालेल्या सेवकास महाराजांनी व्याधी मुक्त केल्यावर फडणवीसांचे घरी कांही काळ वास्तव्य केले होते, तेथून श्री महिसाळकर ह्या प्रिय भक्ता समवेत महाराज कुंभार गल्लीत ''हे आमचे घर'' म्हणून तारामती शिर्केंच्या दारी भिक्षेसाठी थांबले आपल्या पूर्व परंपरागत अनुसयात्मज त्रयमुर्ती दत्तात्रेयांच्या दिन चर्येच्या नियमानुसार म्हणजे भर दुपारी माध्यान्ह समयास ओम भिक्षा देही! म्हणून तारामती शिर्केंच्या श्रध्दाळू अंत:करणास साद घातली. ह्या बटू भिक्षूकाला सिध्दान्न कसे वाढायचे म्हणून त्यांनी ''कोरडी भिक्षा आणून देते, आपण ते आदेश करुन जेवावे!'' असे म्हणून त्या आत जाऊ लागल्या तेंव्हा महाराज तशाही स्थितीत ताराबाईंच्यावर स्मित कृपा टाकून त्या भिक्षेचा अव्हेर करीत ''चल तुझ्या घरी!'' असे श्री महिसाळकरना म्हणत महिसाळ ग्रामी निघून गेले!

त्यावेळची ती समाज रुढीची ती कल्पना द्विज भिक्षूकास सिध्दान्न (जेवण) ब्राम्हणानीच घालावे. आपल्या सारख्याने घालणे उचित नव्हे. ह्या वेड्या कल्पनेतून महाराज तारामतींना जागे करु पाहत होते. तेवढ्यासाठीच त्यांनी तारामतीच्यांवर स्मित कृपा कटाक्ष टाकला होता.

महाराज अबोलपणे निघून गेले. ''त्याग'' म्हटला तर मंदस्मित करत निघून गेले, ह्या घटनेमुळे तारामतीच्या राहून राहून मनाला चुकल्या सारखे वाटत होते. अवाक् झालेली त्यांची मनस्थिती घडलेल्या कोणत्या ना कोणत्या तरी अपराधाची कारण मीमांसा शोधून काढण्यात थकून गेली. नित्य नेमाची नृसिंहवाडीची वारी पोटशुळाच्या त्रस्त तनू मनाच्या दहाने नियम भंग होऊ नये म्हणून कशीतरी पार पडली. तेथे यथाशक्ती नेहमी प्रमाणे दीन अनाथास भोजन घातले. त्याच रात्री त्यांना श्री गुरुंचा स्वप्न दृष्टांत झाला!

जटाजूट त्रिशुळधारी श्रीपाद श्रीवल्लभ रुपात महाराज तारामतींना म्हणाले ''तुला इकडे येण्यासाठी होणाऱ्या देहयातना चुकव्यात म्हणून मीच तुझ्या घरी येतो असे तुला सांगितले होते व त्या प्रमाणे मी तुझ्या दारी भिक्षेसाठी उभा राहिलो होतो. पण तू मला विन्मुख पाठविलेस! तुझ्या दारी आलेला श्री कृष्ण बटू मीच आहे. जा महीसाळ ग्रामी आणि उदंड सेवा कर आणून घरात त्यांची!''

श्रीपाद श्रीवल्लभ रुपातील ते अमृतोद्गार ऐकताच तारामतींचा आनंद गगनात मावेना त्या दत्त राजाला विनम्र अभिवादन करीत श्री कृष्ण सरस्वती महाराजांचा शोध घेत महिसाळ ग्रामी गेल्या. महिसाळकरांचे गृही तारामती श्री गुरुंना शरणांगत दंडवत घालून म्हणाल्या.

**घरी आलासी चालून । परी अबला मी हीन दीन ।**
**नाही ओळखीले ऐसे निधान । करुणाघन श्री गुरु ।।४५।।**
**अन्याय पोटी घालूनिया । आता चलावे श्री गुरुराया ।**
**परात्पर कृष्णा चिन्मया । कृतार्थकाया करी मम ।।४६।।**

महाराजांनी पण तारामतींच्या विनंती आग्रहाला मान दिला, आणि त्यांच्या हाताला धरुन ''चल! चल! चल! अश्वयान तयार कर!'' असे महाराज तारामतीला म्हणाले.

महिसाळकरांना मात्र त्यामुळे फार दु:ख झाले. महिसाळकरांनी तो पर्यंत महाराजांची मनोभावे अखंड सेवा सुश्रुषा विनम्रपणे केली होती. अखिल विश्वाला तेजस्वी करणाऱ्या ह्या दत्त मार्तंडाची अवतारोदयाची ती प्रात: पूजा अत्यंत पूज्य भावनेने केली होती. त्यांनी वाहिलेल्या भक्ति प्रेमाजुंळींच्या अर्ध्यावर हा प्रताप भानू दत्तात्रेयही सुप्रसन्न झाला होता.

तारामतीचे पणतू कै. बाळासाहेब रामनाथ शिर्के यांनीच स्वत: लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रातच लिहिले आहे. महानंदा अवतरे पृथ्वीवरती । तिची गाजे कीर्ती त्रिजगती । तैशीच कलीयुगी तारामती। भिक्षेस गुरु येती तिच्या। त्या महानंदेने कैलासपती शिव शंकराला प्रसन्न केले होते तर ह्या आधुनिक महानंदेने/तारामतींनी पूर्व सुकृतावर दत्त गुरु श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजाना प्रसन्न केले होते. आई आता मी इथे आलो आहे असे तारामातींना सांगून त्यांना त्यांच्या विषयी कर्दमातून बाहेर पडण्याचा वारंवार तगादा महाराजांनी लावला.

हे वैराग्यचं साम्राज्य आणि त्याचे महत्व चार तपे श्री गुरु यांच्या सानिध्यात तारामतीनी अनुभवले! महाराजांच्या छायेत तारामती व तारामतींच्या छायेत महाराज! अशा पुण्यप्रद् बनलेल्या वास्तूला म्हणूनच की काय महाराज ''वैराग्य मठी'' म्हणून संबोधू लागले.

व्याघ्रादी हिंस्त्र पशूनी आपला जन्मजात क्रूर स्वभाव सोडून मृदु सशा प्रमाणे मलूल व्हावे अशी किमया श्री कृष्ण सरस्वती महाराजांची आहे.

हिमाचलवासी एक तपस्वी संन्यासी कोल्हापूरचा लौकीक ऐकून जगदंबेच्या दर्शनाला आला. तरुण तेजस्वी ह्या विवक्त्याने मौनावस्थ धारण केली होती. गरज पडेल तेंव्हा तो पत्री मजकूर लिहून इतरांशी उत्तर देई. तो वैराग्य मठीत सकाळी सकाळीच महाराजांच्या दर्शनाला आला. नाही वंदन नाही स्तुती. अशा मौनावस्थेत तो महाराजांच्या कडे पहात होता. महाराज त्याच्याकडे पहात होते नेत्र पात कुणीही हालवत नाही. दोन्ही तेजस्वी मार्तंडाचे मौन संभाषण चाललेले इतर भक्त जनांनी नुसते पाहिले.

**ओसरलिया प्रथम प्रेमोर्मी**
**गीर्वाण भाषेत बोलती स्वामी**
**जनासी त्वमेवाहमस्मी ।**
**पदांब्ज नमामि यती म्हणजे ।।५६।।**

त्रयमूर्तीचा अंश, अक्कलकोट नंतर इथे तू वास केला. तुझ्या अवतार परंपरेनेच ही धरा सुखी संपन्न होत आहे. मौन त्यागून त्या तपस्व्याने महाराजांची अशी स्तुती केली व निरोप घेत वैराग्य मठी बाहेर पडला. ह्या नंतर महाराज जवळ असलेल्या भक्त जनास म्हणाले, लाखो तपस्व्यात ऐसा तपस्वी कदापि पहावयास मिळणार नाही. तुम्ही त्यास बसवीला नाही, प्रसाद

खडीसाखरेचा एक खडा ही त्याला दिला नाही. त्यावर भक्त जन म्हणाले ''आम्ही त्यांना बोलावून आणतो. म्हणून दारा बाहेर जातो तर तो तपस्वी कांही क्षण झाले नव्हते पण तो गुप्त झाला होता. महालक्ष्मी मंदिर ते पंचगंगा तीर असे चहु बाजूला १५ भक्तजन फिरुन आले पण तो साधक तपस्वी न दिसल्याचेच वृत्त त्यांनी महाराजांना सांगितले.''

महाराज हसून सर्वांना म्हणाले ''बस्सा आता गप्प इथे!'' दोन प्रहर पंधरा भक्त चहु बाजूला ज्याला शोधून थकले तो तपस्वी परत वैराग्य मठीत महाराजांच्या समोर येऊन उभा राहिला. महाराजांचे चरण दर्शन घेतल्यावर ''महाराज'' आपण परत पाचारण केले म्हणून आलो, आपल्या प्रेमळ भक्तांना संतोष दिधला. आता येतो मी महाराजांचा निरोप घेता महाराजांच्या पुढ्यात वैराग्य मठातच तो तपस्वी गुप्त झाला! महाबळेश्वराच्या समोरील एका उंच डोंगरावर किल्ला बांधून त्याला ''प्रतापगड'' हे नांव छत्रपती शिवाजी महाराजांनी दिले. नंतर त्या नांवाला शोभेल व सार्थ होईल असा अद्वितीय प्रताप तेथे छत्रपतींनी केला. त्याचप्रमाणे श्री कृष्ण सरस्वती महाराजांनी तारामतींच्या ह्या वास्तुत राहण्यास आल्याबरोबर ''वैराग्यमठी'' म्हणून संबोधू लागले व मग विषय प्रेमीयांना विषयी विरक्ते विरक्ते विवेक योगीयाना सिध्दी प्रदान ह्या प्रमाणे तिला साजलेशा एकाहून एक दिव्य आणि अगम्य लीला महाराज करत राहिले.

असेच आणखी एकदा परत एक हिमाचलवासी मदनापरी सतेज कांतीने भुषविलेला जटाधारी मौन वृत्तीत निमग्न असलेला विवेक योगी जगदंबा महालक्ष्मीचे दर्शन घेऊन महाराजांचे दर्शन घेण्यासाठी वैराग्यमठीत येऊन दाखल झाला! नुसते महाराजांची नजरा नजर होताच श्री गुरु सिंहासनापुढे जमिनीवर कोसळला. प्रहर दोन प्रहर झाले आता उठेल, नंतर उठेल श्री गुरुशी कांही तरी मनोगत बोलेल अशा विचारात महाराजांची सेवक मंडळी होती. पण तो कांही उठला नाही. जेव्हा रात्र झाली तेंव्हा कोण्या एका सेवकाने महाराजांना विचारले, ''महाराज ह्यांना भिंतीच्या कडेला नेऊन ठेऊ का ?'' महाराज म्हणाले ''नको ! ह्यांच्या अंगाला स्पर्श पण करु नका तुमचे भाग्य थोर म्हणून हा तुम्हाला दिसला!'' त्यावर तो सेवक म्हणाला ''महाराज सुकृताचा ठेवा होता म्हणूनच तुम्ही सेवेत ह्या लीला आम्हांस दाखवित आहात. हा तपी - योगी पण तेहतीस कोटी देव तुमच्या दर्शनाची अपेक्षा धरतात !''

महाराज ह्यावर त्या दासाला म्हणाले असे विठूरायाच्यात आणि याच्यात काही भेद करु नका! हा पुरुष नव्हे, हा पुरुषोत्तम आहे! ह्याने थोडी मागील कांही इच्छा होती म्हणून याने देहाला कष्टविले. ह्याचा विषयी कोणताच भ्रमिक विचार करु नका. ह्याप्रमाणे तिन दिवस रात्र उलटून गेल्यावर चौथ्या दिवशी मध्य रात्री महाराज त्यांच्या कानांत अस्पष्ट कांही तरी पुटपुटले! गुरुंचा कान मंत्र म्हणजे शिष्याच्या जीवनाची सार्थकता ! महाराजांचे ते कदाचीत पराकोटीचे सिध्द अमृत संजीवनीचे बोल असावेत ! ते बोल कानी पडताच तो तापसी त्वरीतपणे उभा राहून

श्री गुरुरायाना दृढलिंगन देत काही तरी सांकेतीक बोल बोलला. लगेच द्वारा बाहेर पडल्या क्षणीच अंतर्धान पावला. मती गुंग व्हावी अशा महाराजांच्या लीला दिवसें दिवस होत होत्या.

**इकडे श्री गुरु सांगती ।**
**आमुची तेथे नित्य वसती ।**
**त्या भूवनासी वैराग्य मठी ।**
**म्हणती पोटी सुख तुम्हा ।।**
**(उत्तर चरित्र)**

तारामतीचा नातू अगदी अबोलका वयाने नुसता सहा महिन्याचा असताना त्याला महाराज घेऊन वडणगे गांवी ''वेळाई'' म्हणजे शिव भवानीच्या दर्शनास निघाले होते. आद्य गुरु श्री शंकराचार्यानी ह्या शिव प्रिय भवानी मातेस समयांबा म्हणून संस्कृत भाषेत गौरवलेले आहे. आपले श्री कृष्ण सरस्वती महाराज ह्याच शिवप्रियेला ''वेळाई'' म्हणून संबोधून मराठी भाषेत गौरविले आहे. जेव्हा तुम्हाला संकट पडेल तेव्हा ह्या भवानीला या. ही संकट पडेल तेव्हा ही संकट वेळेला धावून येते. ही ''वेळाई'' आहे असे महाराज आपल्या भक्त जनास सांगत. जेंव्हा महाराज इकडे येत तेव्हा अशा कांही कांही गोष्टी त्यावेळी बोलून जात.

असेच एकदा ह्या वडणगे गांवास येताना त्या भक्त मंडळीत एक नादीष्ट भक्त होता. तारामतींच्या सहा महिन्याचा अबोलका नातू कोणी एक भक्त खांद्यावर घेऊन महाराजांच्या बरोबर चालत होता. दुपारच्या उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून एका भक्ताने महाराजांच्यावर छत्री धरली होती. ह्या मंडळीत जो नादीष्ट भक्त होता त्या भक्तास तो नाद सोडण्यासाठी महाराज सांगत असून सुध्दा तो भक्त सुधारत नव्हता. तो भक्त कोण हे इतर जवळच्या भक्तांना माहित पण नव्हते. हे षण्मासाचे बालक महाराजांनी खांद्यावर घेतल्यावर त्या नादिष्ट माणसाला उद्देशून म्हणाले. ''अरे ! महाराजांची अवज्ञा करु नको ! ते काय सांगतात ते ऐक नाहीतर तुझ्या वाटेला आयुष्यभर दारुण दुखः आल्याशिवाय राहणार नाही.'' ज्याला उद्देशून हे बालक बोलले तो भक्त चांगलाच मनोमनी वरमला असेल, परंतु ह्या घटनेमुळे सर्व भक्तांना महाराजांच्या अगम्य लीला शक्तीचा अचंबा मात्र वाटला.

''वेळाई'' च्या दर्शनानंतर महाराजांच्यासह ही भक्त मंडळी विठोबाच्या दर्शनासाठी वडणग्यासाठी पुढे निगवे ह्या गांवी गेली. वडणगे पुढे निगवे ह्या गांवी गेली. विठ्ठल मंदिरात महाराज न जाता बाहेरील उजव्या बाजूच्या फरशीवर बसले. महाराजांच्या परवानगीने भक्त मंडळी आत विठोबाच्या दर्शनास ह्या तारामतीच्या अजाण बालकासह गेली. दर्शन घेऊन झाल्यावर कोण्या एका भक्तास दुर्मती झाली. त्याने कडेवर असणाऱ्या ह्या बालकाचा उजवा हात धरुन श्री विठ्ठलमूर्तीच्या कानशिलात लगावली. तेंव्हा बाकीचे तीन भक्त मजेखातर ''खी! खी! करुन हासले त्या बाल हाताची थप्पड मारुन होताच त्या बालकाचे उजव्या हातातील

सुवर्णाचे कडे एकाएकी नाहीसे झाले.'' आता काय करावयाचे?

ते सर्व भक्त चिंता क्रांत अवस्थेतूनच ''श्री गुरुंच्या चरणी लागले'' ते भक्त महाराजांना ह्या घटने विषयी विचारणार तोच महाराज त्या सर्वांना उद्देशून म्हणाले ''काय रे ! कसली अवदसा तुम्हाला आठवली ! तरीपण तुम्ही माझे भक्त म्हणून विठूरायानी तुम्हाला सौम्यच शिक्षा केली आहे बरं का!'' नंतर ती पराक्रमी भक्त मंडळी महाराजांच्या वैराग्य मठीकडे परतत असतांनाच ह्या गंभीर घटनेच्या होणाऱ्या परिणामाविषयी विचार करु लागली. आता तारामती आपल्याला चांगलेच फैलावर घेणार! हे त्यांचे मनोगत विफलीत न होणारे असेच होते.

तारामतीचा स्वभाव करारी होता. त्यांनी एका एका भक्तांना चांगलेच धारेवर धरले त्यांच्या तावडीतून कोणी सुटले नाही. शेवटी त्या सर्व अपराधी मंडळींनी समान वर्गणी काढून दुसरे सुवर्णाचे तेवढ्याच मापाचे कडे तयार करुन त्या बालकाचे हातात चढवले. तारामतीची वृध्द माता भीमाबाई स्वामींना एक खुळा भ्रमिष्ट असेच समजत आली होती. तारामतींनी तिची समजून काढण्याचा प्रयत्न कैक वेळा केला होता, पण ते सर्व व्यर्थ गेले होते.

असेच एका दिवशी सणावाराच्या महत्वाच्या प्रसंगी महाराजांच्या दर्शनार्थीचा बराच मोठा जमाव जमला होता. त्यातील एका भक्ताचे सुवर्णाचे कडे कोणीतरी चोरले. लागलीच बोभाट झाला आळ मात्र वृध्द भीमाबाईवर आला. तारामतींची तर तारांबळ उडाली. त्यांनी बाहेर कुणालाही न सोडण्याचा प्रबंध रचला. चोर तपासासाठी राज नोकर तेथे पाचारण करण्यात आले तो पर्यंत अनेक भक्तांनी वृध्द भीमाबाईची एवढी वाक् पूजा केली की तिला कळून चुकले की आपण ह्या साक्षात दत्त गुरु सारख्या पूज्य समर्थ महा पुरुषांची निंदा करीत आले. म्हणूनच आपल्या मागे हे नसते बालंट लागले आहे. तिने मनोमनी श्री गुरुंची विनम्र भावे क्षमा याचिली तर परिपूर्ण शरणांगत झालेली पाहून ह्या अंतरसाक्षी सदगुरुंनी मग ते संकट निवारले.

राज नोकरांना तो खरा चोर सापडला त्या वेळे पासून भीमाबाई महाराजांना पूज्य मानू लागली. पण तिच्या देह स्वभावाने तिला परिपूर्ण सोडलेच नव्हते. जेवणानंतर दुपारच्या वेळी भीमाबाई आपल्या सख्यासह सारीपाठ खेळत असे.

एक दिवशी असाच त्यांचा सारीपाठ खेळ चालला असतांना महाराज तेथे येऊन म्हणाले.

**''अविचारे तेथे पडता फासा ।**
**नरक यातना न चुके सहासा ।**
**आधी पासून जागृत असा ।**
**प्रमाद वळसा पडेल ।।७०।।**
**मूळ सोडूनी बाहेर येता ।**
**नरक भोगी भिन्नावस्था ।**
**मध्येच काळमुखी पडता ।**

**जन्म मागुता चुकेना ।।७१।।**
**विचार करुनी टाका डाव ।**
**नातर होईल धावां धावां**
**चुकेल विश्रांतीचा ठाव।**
**अंती उपाय न सुचे मग ।।७२।।**

**(प्रथम चरित्र अध्याय ६)**

असे म्हणून महाराजांनी त्यांच्या खेळातील एक सोंगटी उचलली. तेव्हा भीमाबाई एकदम संतापल्या घडीभर जरा खेळावे म्हटले तर हा अवचीत येवून त्रास देतो आता ह्याला शयनागरी घालून येते. थांबा तो पर्यंत असे तिने सख्याना सांगत महाराजांचा एक हात पकडून फरफटत न्यावे तसे शेजघरात आणून आता ''झोप पलंगावर!'' असे म्हणून बाहेर येऊन दारास कडी लावून टाकली. आता तेथून तारामती निघाल्या, औदुंबर वृक्षावरुन कांहीसा आवाज आला म्हणून त्यांनी वरती पाहिले तो महाराज आवडीचा पर्ण खेळ करीत होते. महाराज झाडावर एकटे कसे ? ह्या विचारातच ताराबाईंनी आपला मोर्चा भीमाबाईकडे वळविला.

महाराज कुठे आहेत गं? असा सवाल काळजीयुक्त अविर्भावात विचारताच ''काय गं एवढी घाबरतेस? मी त्यांना खेळण्यात त्रास देत होते म्हणून शेज घरात कोंडून ठेवलाय, चल तुला दाखवते, शेज घरात ते झोपले असणार! ताराबाई पण म्हणाल्या ''चल, चल! दाखव मला!'' भीमाबाईंनी कडी काढून दार उघडे करुन पाहतात ते महाराज कुठे दिसेनात त्या छोट्याशा चार भिंतीच्या दगड मातीच्या खोलीत ते परब्रह्म कुठे कोंडून राहणार? महाराज नाही म्हटल्याबरोबर भीमाबाईंची बोबडी वळली आणि चक्कर येऊन जमिनीवर कोसळली तेही महाराजांचे नाव घेत! मिस्किलपणे तारामतींनी हसतच महाराजांचे तीर्थ तिजवर शिंपडून सावध करीत म्हटले ''कुठे आहेत गं महाराज!'' भीमाबाई त्यांना म्हणाली ''मी नष्ट पापीण! या खोलीत तर त्यांना मीच कोंडले होते. बाहेरुन कडी तर मीच लावली होती बाहेर पळून जाण्यास कोणत्याही मार्ग पण नाही. मग महाराज कसे नाहीसे झाले ते मला कांही कळत नाही. ह्या चिंतामणीला न जाणणारी मी तारे! ह्या माझ्या अपराधाला विसरुन जा!''

तारामती मग तिला म्हणाल्या ''माते! अगं तू आता मरायला टेकलीस आता तरी मूढपणा सोड आणि ह्या दत्तावताराला शरण जा! हा कांही सामान्य नर नव्हे! आपल्यासाठी आलेला हा साक्षात भव तारुन नेणारा सद्गुरु श्री कृष्ण सरस्वती महाराज आहे! चल तुला दाखवते त्यांचा साक्षात्कार ज्यांना तु कडी कुलूपात कोंडले होतीस ना! तो सद्गुरुराणा! बघ तो औदुंबरच्या फांदीवर!'' मग तारामती महाराजांना म्हणाल्या,''महाराज माझ्या मूर्ख मातेने तुम्हाला शेजघरात कोंडले, देवा आम्हांला क्षमा करा आणि खाली उतरुन चरण दर्शन द्या.'' नेत्रपूर्ण अश्रूंनी तारामतींनी प्रार्थना केली. त्या करुणाघनाने पण तारामतींच्यावर करुणेचा वर्षाव केला.

तारामतीच्या शब्दावर महाराज औदुंबरावरुन खाली उतरले. तारामती सह सर्वांनी महाराजांचे विनम्रपणे दर्शन घेतले. थोड्याच दिवसांनी ताप आल्याचे निमित्त होऊन भीमाबाई निधन पावली. तारामतींना अतीव दु:ख झाले. कालांतराने त्यांना माऊलीच्या विरहाचे दु:ख श्री गुरुमाऊलींच्या सेवेपायी विसरणे भाग पडले. रमाबाई ही एकवीस वर्षाची विधवा निपुत्रिक पण जवळ थोडी फार संपत्ती असलेली अबला होती. तिला एका समंधाने झपाटले होते. जोतिषी मंत्राचा त्यावर इलाज चालेना. समंधाचा जाच मात्र अधिकच वाढला. श्री कृष्ण सरस्वती महाराजांची तिने कीर्ती ऐकली होती. समंधबाधेतून मुक्तता होण्यासाठी त्यांच्याशिवाय पर्याय नाही म्हणून वैराग्य मठीत येऊन ती महाराजांच्या चरणी शरणांगत झाली.

आपलं गाऱ्हाणे तिने महाराजांना सांगता तिला महाराज म्हणाले या कार्यासाठी ५०० रुपये लागतील. हा सौदा व्यवहाराची मागणी थोडी विचित्र वाटणारी अशी आहे. त्रैयलोक्याच्या ह्या मोक्ष दायनी राजाला ५०० रुपये तरी कशाला पाहिजे होते! असा प्रश्न कुणाच्याही मनात येणे स्वाभाविक आहे. पांचशे रुपयातले पाच पैसेही पण महाराजांना नको होते. रमाबाईच्या कर्म दशेतनं तिच्याच खर्चाने तिला महाराज मुक्त करु पहात होते.

**अतित अभ्यांगत भणंग दीन ! स्त्री पुरुष शुद्र ब्राम्हण ।**
**तोषवावे कांही जन । अन्नदान देऊनी**

ह्या हेतूने केलेली मागणी ऐकताच रमाबाई गप्पच बसली. एवढी रक्कम जाणार म्हणून तिने त्यातल्या त्यात हात आकसात घेण्याचे ठरवून आत जाऊन एकांतपणे तारामतींना आपले गाऱ्हाणे सांगत ''हे घ्या, आणि महाराजांच्याकडून माझी समंधबाधा नाहीशी करा'' असे म्हणून त्यांच्या हातावर २५/- रुपये ठेवले. २५/- रुपयांच्या आमिषाने तारामतींनी रमाबाईची समंधबाधा घालविण्याची जोखीम स्वशिरावर घेतली ''तुम्ही निर्धास्त रहा'' असे रमाबाईंना त्यांनी वचन दिले. नंतर महाराजांच्या पुढे तारामतींनी तिला आणून ''महाराज या अबलेची मुक्तता करा'' असे म्हणून आग्रहाची विनवणी केली. महाराज त्यांना म्हणाले ''आधी जामीनगत करा. आधी जामीनगत पटवली पाहिजे.'' तारामती रमाबाईच्यासाठी जामीनगत राहिल्या. लगेच महाराजांनी त्या समंधाला हजर केले. तो रमाबाईच्या शरीर संचारुन महाराजांना म्हणाला ''देवा ह्या पापयोनित मला तुमचे दर्शन झाले या दुलर्भ दर्शनाला हीच पुण्यप्रदबाई कारणी आहे. आता मात्र मी कधीच हिला त्रास देणार नाही. देवा जातो आता मी.''

महाराजांचा निरोप घ्यावा तसा त्या समंधाने निरोप घेतला. संचार सोडून झाल्यावर ती रमाबाई सावध होऊन महाराजांच्या चरणी नतमस्तक झाली. त्यांच्या संमतीने रमाबाईने महाराजांचा निरोप घेत घरी गेली. गेली ती गेलीच! परत ती फिरली नाही. इकडे महाराजांनी तारामतींच्याकडे ''माझी जामीनगत आता पटवा'' म्हणून तगादा लावला. पण तारामती तर तेंव्हा कांहीही करु शकत नव्हत्या! ह्या नंतर कांही काळाने हिच रमाबाई अचानक वैराग्य

मठीत महाराजांच्या चरणी परत नतमस्तक होऊन रडत रडत आपली करुण कहाणी सांगती झाली. ''महाराज तुम्ही मागितले पांचशे रुपये ते मला देणे जड वाटू लागले म्हणून तुमचे चरण दर्शन पण घेणे टाळले. कालरात्री चार चोरानी मिळून माझे एक हजार रुपये पळवले!''

**श्री गुरु म्हणती बरे झाले । प्राप्त तेची शोधीत आले ।**
**गेले गेले सहस्त्र गेले । चित्रा वाटले बरे की? ।।१०५।।**

तारामतींना ही हकीकत समजताच त्या वाघिणी सारख्या चवताळून आल्या व रमाबाईला म्हणाल्या ''नष्ट पापीणे । आतातरी कशाला आलीस?'' तेंव्हा रमाबाईने महाराजांच्या बरोबर त्यांची पण क्षमा मागत म्हणाली ''तारामती! अगं तू पवित्र गुरु सेविका ! माझा एवढा अपराध तू पोटी घाल! तुझ्या करुणेची मी याचिका करीत आहे. एवढी मला भीक घाल!''

आता हिला बोलून तरी काय उपयोग? म्हणून तारामतीनी आपला क्रोध आवरला व मग हे प्रकरण शांत झाले. महाराज तारामतींच्या गृही वावरत! महाराज म्हणजे ह्या उकीरड्यात पडलेला एक हिराच आहे. या दत्त गुरुंना बाहेर कुठेतरी कायमचेच रहाण्याचे ठिकाण आयोजीत केले पाहिजे. असा विचार कांही भक्त सेवकांच्या मनात आला व त्यांनी रुद्र पठणाचा बेत योजून तो परिपूर्ण पण केला! नंतर चौदा दिवसांनी पुढे महाराज वेणी माधवांना म्हणाले ''वेणी अरे तुमचा रुद्र कैलास नाथाला मान्य आहे. परी पंढरीचा नाथ एक आण्याच्या देण्यात कर्ज बाजारी झाला आहे. उपवास, व्रत, वैकल्ये, अनुष्ठानाने कधी कर्जातून मुक्तता होत नाही.'' त्यावेळी महाराजांच्या उक्तीतला अर्थ लवकर विशद झाला नाही. त्याच रात्री रामदास व हरिपंत हे दोघे निद्रिस्त असता एकच स्वप्न एकाच वेळी दोघांना पडले.

वैराग्य मठीमध्ये जिथे आज भजनाच्या वेळी मृदंग वाजवला जातो त्या लाकडी खांबाला बलाढ्य हनुमंत मारुती रायाला ताराबाईंनी एका जाड जुड दोर खंडाने कर कचुनी बांधले असून, त्या उभय सेवक रामदास व हरिपंताना म्हणत आहेत.

''तीन जन्माचे माझे अगाध असे तप म्हणून हा मी मारुती राजाला असा इथे बांधून ठेवले आहे ! नाही तर तो काय?'' दोघेजण जागृत होऊन एकमेकांना पडलेले एकच स्वप्न सांगत होते. जवळच वेणी माधव होते. एकच स्वप्न ह्या उभयदासाना पडलेले पाहून विलक्षण आश्चर्य वाटले. गुरुची अगाध सत्ता विशद करते वेळी माधव स्वतःला गुरुंनी सांगितलेली.

**''पंढरीचा विठ्ठल भगवान । एक आणा त्यास झाले ऋण**
**अर्धे त्यातील गेले फिटून । अर्धे अजून बाकी असे**
**उभयतास सांगे येऊ । आजची बोलले श्री गुरु**
**कर्ज बाजारी रमावरु । मुक्त न करु शकते व्रते''**

आता तुम्ही श्री गुरुंना ह्या वास्तूतून बाहेर काढण्याचा विचार सोडा. महाराज कांही झाले तरी ही वैराग्य मठी सोडणार नाहीत! तारामतींच्या भक्तिचे ऋण फेडण्यासाठी ते इथे राहिले आहेत! ह्या स्थानाचा स्वीकार अथवा त्याग त्यांच्या इच्छेनुसारच होणार ! त्यात आपल्याला

कांहीही ढवळा ढवळ करता येणार नाही. वेणी माधवाचा हा विचार रामदास व हरिपंत उभयंतांना मान्य झाला. पुढे कांही दिवसांनी महाराजांनी घडविलेली ही एकच स्वप्नवार्ता सर्व श्रुत झाली. तारामतींना ही वार्ता समजताच त्यांच्या विनय भक्तिने अहंकाराची जागा घेतली.

''माझ्या भक्तीसाठीच महाराज इथे आले महाराजांना इथून हलविण्याचे रामदास, हरिपंताचे प्रयत्न माझ्या साठीच महाराजांनी निष्कळ ठरविले. मी भरवताच महाराज जेवतात माझ्या शब्दांकित महाराज आहेत.'' हा फाजील अभिमान तारामतींचा दिवसेंदिवस वाढतच जाऊ लागला. महाराजांच्या सेवक वर्गावर सारासार विचार न करता त्या गुरुगुरु लागल्या. महाराजांना तारामतींच्या स्वभाव आचरणात पडलेला फरक आवडला नाही. ते तारामतींना चिन्मयपणे तर इतर भक्तांच्या अनुषंगाने प्रगट प्रगल्भपणे बोलत असत. पण तारामतींना ते उमगत नसे, किंवा ते जाणून घेण्याची कधी इच्छाही बाळगली नसेल व म्हणूनच की काय मग एकदा महाराजांनी विपरीत घडविले. माघ मास शिशिर ऋतू मकर संक्रमण म्हणून कोल्हापूर जवळील चिखली ह्या गांवी प्रयाग तीर्थ स्नानारंभ होता. कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती, सरस्वती अशा पांच नद्यांचा संगम झाला म्हणून ह्या पंचगंगेच्या तीर्थ स्नानास एक महिन्यात काल १४ जानेवारी ते १४ फेब्रुवारी पर्यंत दरवर्षी मानला जातो त्या पर्व काली लाखो भाविक तीर्थ स्नानाचे पुण्य लुटत असतात. ह्या प्रयाग संगमी महाराजांच्यासह आपण सर्व भक्तांनी तीर्थ स्नान करुन भोजन प्रसादाचा आस्वाद घ्यावा असा विचार विश्वाचे सूत्रधार महाराजांच्याच प्रेरणेने कोण्या एका भक्तास सुचला व त्याला तारामतींसह सर्व इतर भक्तांनी पण मान्यता दिली. समय दिवस ही आयोजीत करण्यात आला. कृष्णा स्वार व कृष्णा लाड ह्या उभय सेवकांच्या खांद्यावर आळीपाळीने बसून तारामतींसह सर्व भक्तांच्या समवेत महाराज प्रयाग संगमी आले. तीर्थ स्नान करण्यास श्री गुरुंनी भक्तास सांगता, सर्व भक्तांचा आग्रह झाला की, ''देवा तुम्हीच आधी गंगा स्नानास चला!''

भक्तांची विनवणी पाहून मंदस्मित करत श्री गुरु गंगेच्या काठावर आले. सर्व भक्तांना आनंद झाला . पण महाराज तेथे कांही काळ स्तब्ध उभे राहिले कांही केल्या ते पाण्यात उतरेनात. खाली तीन पायरीवरुन गंगा माई संथपणे वाहत होत्या! काठावर महाराजांना परत भक्तवृंदाने स्नान करण्याचा आग्रह करत असतांनाच संथ वाहणाऱ्या गंगा लहरींना अतुरतेने उसळी घेऊन फक्त श्री गुरु चरणा भोवतीच किंचीत काळ फेर धरला नव्हे तर ती पंचगंगामाईनी मारलेली ती श्री गुरु चरणाला मिठी भक्तांनी पाहिली. त्याच क्षणाला सर्व भक्तांच्या अंत:करणातील भक्तिने एकच अति उंच स्वर पकडला

**''श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज की जय''**

''झाले ! झाले ! गंगास्नान आमुचे झाले !'' असे महाराज म्हणाले व वरती येऊन एका वृक्षछायेत बसले. कांही भक्तांनी तीर्थस्नान करुन त्वरेने जे काम मिळेल ते करु लागले, तारामती समाराधनेचा बेत योजत होत्या! कोणी भक्त मंडप उभा करत होते. कोणी भक्त गंगा

नीर आणून धावपळ करीत होते, कृष्णा स्वाराना अपस्मारीचा केंव्हा केंव्हा त्रास होई म्हणून ते नुसते महाराजांचे नामस्मरण करत होते. तर कृष्णा लाड व वासुदेवराव दळवी दोघे महाराजांचे चरणसेवा करीत महाराजांचे चिंतनात दंग झाले होते.

महाराज अवचितपणे उठून ह्या लाड दळव्याना म्हणाले ''चला! चला! उठा! अंगी वैराग्य धैर्याचं बळ धरा आणि सांभाळ करण्याची प्रार्थना करा दत्ता जवळ आणि चला आता आपल्याला फार दूर जायाचं आहे. तारेला जागे करुया! चला! चला!'' असे म्हणत महाराज धावत सुटले. गोंधळलेल्या मन:स्थितीत लाड व दळवी महाराजांच्या पाठोपाठ धावत जाण्यापलिकडे कांहीही करु शकत नव्हते! महाराजांनी नजिकच्या एका दुकानात येऊन एक मूठभर चिरमुरे घेऊन ते तारामतींच्या जवळ येऊन ते देत म्हणाले ''आई हे घ्या! हेच तुम्हांला गोड वाटले म्हणून आधी तुम्हांला देत आहे! ते घ्या आता इथून पुढे आमच्यावर शब्द ठेऊ नका! तुमचे तुम्ही निज कर्म बध्द झाला आहांत!'' असे प्रगल्भ भाष्य करीत महाराजांनी तेथून पळ काढला! त्यांच्या पाठोपाठ लाड व दळवी पण धावत गेले! आडवळणी ते तिघेजण पळत गेले. हां हां म्हणता जे गेले ते गेलेच, दृष्टीआड झाले. पाठलाग करण्यासही ते कुणाला शक्य झाले नाही. तारामती तर अवाक झाल्या. त्यांना काय घडले आहे हेच कांही समजेना. कोणत्याही बाबतीत कोणत्याही प्रसंगी महाराजांना अटकाव वा मज्जाव करण्याचा अधिकार तारमतींना त्यांच्याच गुरु कृपेमुळे अनायासे प्राप्त झाला होता. परंतु ह्या क्षणाला त्या दिग्मूढ बनल्या गेल्या. काय घडे हे आज अकल्पित असे त्यांना ही म्हणावयाची पाळी आली. भांबावून गेलेल्या मन:स्थितीतीतून कांही काळाने त्या पूर्व स्थितीत आल्या. श्री गुरुंच्या वियोगाचं दु:ख त्यांना होरपळून काढू लागले. शोकाकुल मन स्थितीत ते त्या प्रत्येक भक्तांस महाराजांना शोधून आणण्यास सांगू लागल्या, आणतो आणतो असे म्हणून कांही जण शोधावयास गेले ते थकून भागून निराशपणे तारामतींच्या जवळ आले.

घोर अरण्यात बसून ऊन वारा पाऊस पाण्यात खडतर तपश्चर्या साधक तपस्व्यांना ज्या भगवंताचे दर्शन होत नाही तो परमात्मा श्रीकृष्ण सरस्वती रुपात प्रकट साकार होऊन गुप्त झाला असता तारामतींचे हेर त्यांना शोधून काढण्यासाठी दिवसभर वण वण भटकून आले. त्या हेरांचे दिवसभरांचे श्रेय वाया गेले. अश्रू ढाळून ढाळून तारामतींचे नेत्र सुजले. एका क्षणाच्या कालावधीत निद्रा ग्लानीमध्ये महाराज नेहमी प्रमाणे तारामींच्या पुढ्यात उभे राहून म्हणाले.

''आई! विवेक बळानं आता चित्त आवरा, प्राप्त प्रसंगात उचित काय ते पहा, जेवण प्रसाद व्यर्थ जाऊ देऊ नका, समस्त भक्तवृंद उपवासी आहे ह्यांची नोंद घेऊन त्यांच्यासह तुम्ही भोजन उरकून घ्या!'' तारामती सावध झाल्या. जड अंत:करणाने गुरुंची आज्ञा म्हणून प्रसाद भोजन सर्वांनी घेतले. निद्राविरहीत रजनी सर्व भक्तांनी श्री गुरुंच्या चिंतन मननात काढली. दुसऱ्या दिवशी तारामतींसह सर्व मंडळी कोल्हापूरला परतली.

गाभाऱ्यात देव नाही. देहात आत्मा नाही. विश्व शून्य साक्षी झाल्यासारखे तारामतींना वाटू लागले. त्यांचे जेवण खाण्यावरचे लक्ष उडाले, विश्रांती झोप काळजीने महाराजांच्या सिंहासनापुढे त्यांनी निर्वाण मांडले. कांही भक्तांनी त्यांना धीर देत सांगितले ''सीतामाईंच्या शोधासाठी समस्त वानरगण दशदिशा धावला. आम्ही पण आता महाराजांचा ठाव ठिकाणा शोधण्यासाठी निघत आहे. तुम्ही धीर सोडू नका!'' असे म्हणत कांही भक्त परत श्री गुरुंच्या शोधासाठी निघाले.आशानपान विरहींत मांडलेल्या निर्वाण तारामतींच्या शोकाकूल अवस्थेत आठव्या दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास सिंहासनाधिष्ट महाराज तारामतींना मंजुळ स्वरात म्हणाले ''अगं तारे! कशाला निर्वाण मांडलेस? उठ आधी आणि देह रक्षणासाठी का होईना थोडेसे जेव! तुला तुझा अहंकार बाधला. प्रयागला गुप्त झालेल्या दिवसापासून २१ व्या दिवशी तू मला इथे बसलेले पाहशील उठ! उठ! आणि काही तरी भक्षण कर!''असे म्हणत महाराज अंतर्धान पावले.

अमृत संजीवनीचे उद्‌गार ऐकताच तारामतींच्या जीवात जीव आला! महाराज परत एकविसाव्या दिवशी दर्शन देणार ह्या विचाराने त्या प्रफुल्लित झाल्या महाराजांची आज्ञा म्हणून त्यांनी मग भोजन पान सुरु केले. ''तुला तुझा अहंकार बाधला!'' हे महाराजांचे शब्द तारामतींच्या कानात एक सारखे घुमत होते. श्री गुरुंना त्या न आवडणाऱ्या (अहंकाराच्या) साऱ्या घटना त्यांच्या मन:चक्षू पुढे उभ्या राहिल्या आता इथून पुढे तसे न वागण्याचा त्यांनी संकल्प केला. गुरुंचे भक्त ही गुरुंचीच संपत्ती आहे गुरुंचेच ते वैभव आहे. आपण त्यांचा अपमान केला ही चूक आता इथून पुढे कदापीही करणार नाही.

**आम्ही आणि आमुचे दास।**
**भेदाचा यात ना लव लेश ।**
**सोडा रे सोडा भ्रम नि:शेष ।**
**गुरुवर्य खास असेती हे ।।२३।।**

**– अध्याय १५ उत्तर चरित्र**

हे गुरुंचे बोल लक्षात आले. गुरुंच्या भक्तामुळे माझ्या ह्या वास्तुला शोभा आहे. गृह नक्षत्रामुळे जशी चंद्रला तारांगणात शोभा मग माझ्या ''तारेच्या ह्या अंगणात'' श्री गुरुंना भक्ता मुळे शोभा नाही का? ही शोभा हेच ह्या वैराग्य मठीचे ऐश्वर्य आहे ह्या प्रमाणे करत असलेल्या आत्म परीक्षणात तारामतींना आत्मबोध म्हणजेच ''निजबोध'' महाराजांनी दिला या निजबोधात महाराजांनी प्रतिक्षा महाराजांच्या चिंतनात त्या करु लागल्या! हरिवेड्या गोपिकांचे हरि विरही दु:ख श्री गुरुच्या मुळे त्यांच्या वाटेला आले. महाराजांच्या विषयी त्यांच्या कुण्या भक्तांनी पण कसलीही वार्ता कळविली नाही. ते भक्त गांवो गांवे फिरत गेले, तेथील गांवकरी त्यांना सांगू लागले.

**‘‘कोणी म्हणती परवा गेले । कुणी म्हणती काल देखीले’’**

**आमुचे ग्रामी भोजन केले । न कळे पुढे काय झाले ।।२३।।**

असे राजापूर पर्यंत शोध काढत भक्त गेले. श्री रामभाऊ वैद्य यांनी गुरु आगमनाची इत्थंभूत माहिती त्यांना सांगितली. महाराज जिथे जातील जिथे रहातील जिथे जेवतील त्या त्या स्थानाला श्री क्षेत्र नृसिंहवाडीचे मान महत्व प्राप्त होई. रामभाऊ वैद्य मोठ्या भाग्याचे म्हणून महाराज त्यांचे घरी येऊन राहिले. ‘‘उभ्या राजापूर गांवाने त्यांना पूजले अत्यंत प्रीतीने ओवाळले, आता ते वासुदेवराव दळवी व कृष्णा लाडा समवेत कागलला हरिपंत शिदनेर्लीकरांकडे गेले आहेत!’’ असा समग्र वृत्तांत तारामतींना एका भक्ताने पत्राने कळविला.

महाराज प्रयागला गुप्त झाल्यानंतर हरिपंत वैराग्यमठी सोडून कागलला त्यांच्याकडे आलेले आहेत. ही पत्रातून आलेली महाराजांची वर्दी लागताच तारामती अश्वयानातून हरिपंताच्याकडे आल्या. ‘‘महाराज आमच्याकडे काल पर्यंत होते. त्यांच्यासाठी आम्ही काल घरी मेजवानी केली व नंतर ते नृसिंहवाडीला गेले आहेत आपण तिकडे जाता श्री गुरु निश्चितच भेटतील!’’ तारामतींनी तिकडे जाण्याचे ठरवले. त्यांच्या बरोबर दुसरे अश्वयान करुन हरिपंत पण नृसिंहवाडीला आले. वाडीकरांनी तारामतींना सांगितले. ‘‘तुमच्या महाराजांच्या सारख्या दिव्य साक्षात्कारी समर्थ महापुरुष आमच्या ह्या वाडीत असावा, त्यांनी येथे कायमचाच वास करावा म्हणून दोनशेहून अधिक वाडीवासीयांनी त्यांना गराडा घातला! पण व्यर्थ झाले. एवढ्या आम्ही सर्वांच्या तावड्यातून त्यांनी आपला मार्ग हा काढलाच स्वत:च्या पादुका कृष्णा लाडांच्या हाती देऊन ते जळात उतरले व पाठोपाठ उभय दासांना येण्यास सांगितले.’’

ते तिघे जलात उतरुन पुढे गेले त्यांच्या पाठोपाठ आम्हां कुणालाही जाता येईना कारण तो कृष्णामाईचा डोह अति खोल आहे. महाराजांसह लाड दळव्यांना मात्र गुडघ्या एवढेच पाणी लागलेले आम्हाला दिसून आले. अत्यंत खोल डोहाच्या पाण्यावरुन उभय दासासह चालत गेलेल्या ह्या त्रयमूर्तींकडे आम्ही हताश होऊन नुसते पहातच राहिलो. मिरज ग्रामीचा मार्ग लक्षून महाराज गेले आहेत तेंव्हा तेथे गेल्यावर आपल्याला ते भेटतील!’’ ‘‘आपल्या मार्गात अजून दैव आड येत आहे’’ असे तारामती म्हणाल्या. त्या वेळी तिन्ही सांज झाल्यामुळे तेथेच वस्ती करुन दुसऱ्या दिवशी मिरजेला जाण्याचे ठरविले. ‘‘तू इकडे येऊ नको मीच तुझ्या कडे येतो’’ श्रीपाद श्रीवल्लभ रुपातील ते अमृतोद्‌गार तारामतीना आठवले त्या प्रमाणे महाराज त्यांच्या घरी येऊन राहिले. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी आज वाडी पाहिली. गुरचरित्रातील महिमा व महाराजांनी केलेल्या व प्रत्यक्ष पाहिलेल्या दिव्य लीलांच्या स्मृती मध्ये तारामतींनी ती रात्री काढली. त्यावेळी विसाव्या दिवसाची समाप्ती झाली होती. दुसऱ्या दिवशी महाराज मिरजेहून कोल्हापूरला आले आणि तारामती वाडीहून मिरजेला गेल्या. मिरजेहून महाराज कोल्हापूरला निघून गेले आहेत हे समजताच मग मात्र हतबल होऊन मनोमनी प्रार्थना करत महाराजांना म्हणाल्या.‘‘काय

हे गुरु माऊली किती तुला शोधू? एवढा अंत कशाला गुरुराया पहातोस? गांवोगांव फिरुन शोधून शोधून थकले. परमावधी झाली जाते कोल्हापूरला!'' ह्या विचारांबरोबर महाराजांनी सांगितलेले वचन तारामतींच्या लक्षात आले. ''प्रयागाहून गुप्त झालेल्या दिवसा पासून एक विसाव्या दिवशी तू मला इथे सिंहासनाधिष्ट झालेला पहाशील!'' तो एकविसावा दिवस उजाडलाच होता आणि मिरजेहून तारामती कोल्हापूरला त्यांच्या वैराग्य मठीत येऊन दाखल झाल्या. महाराजांनी दृष्टांत खरा करुन दाखविला होता. महाराज सिंहासनावर विराजमान झाले असून दोन बाजूला जय विजया प्रमाणे वासुदेवराव दळवी व कृष्णा लाड विनम्रपणे हात जोडून उभे होते. तारामतींनी महाराजांना असे पहाताच महाराज म्हणून आर्तभावनेने चरणांवर लोटांगण घातले. नंतर गहिंवरलेल्या शब्दात महाराजांना प्रार्थित म्हणाल्या.

**आता हेची मागणे देवा । वियोग ऐसा कधी न व्हावा**

**मरण येता दु:ख न जीवा । परी न बरवा जाच हा ।।५४।।**

नंतर तारामतींनी महाराजांचे चरण प्रक्षालन करुन पंचारती केली. मग षड्रस् पक्वानांचे भोजन करुन स्वहस्ते त्यांच्या मुखी भरविले आणि नंतर महाराज शयनागारी निद्रीस्त झाले.

मग कृष्णा लाडांना तारामतीनी अगदी जिज्ञासूपणे महाराज प्रयागातून गुप्त झाल्यापासूनची हकीकत विचारली. लाडानी पण ते सर्व प्रवास वर्णन करुन सांगितले.

विशाल सह्याद्रीतील विशाल प्रवास व ते पण अनवाणी अन्नाविणा उपवाशी सलग १० दिवस सह्याद्रीत अतिखोल दरीत उतरुन गगनचुंबी कडे चढत, वाटेतच त्या अजस्त्र अजगराला तृण पेंडीसम उचलून कृष्णा लाडानी बाजुला भिरकटून दिलेले, वराह, व्याघ्र, क्रूर, हिंस्त्र पशू ह्या त्रयमूर्ती पाहून भयभीत होऊन पळून जात हे समग्र वर्णन ऐकून तारामतीची मतीच गुंग होऊन गेली. शंभर रुपयावर जमलेला राजापूरच्या राजभाऊ वैद्यांना प्राप्त झालेला प्रसाद ऐकून मात्र त्यांची अभिलाषा बळावली. राजापूरचे लोक अत्यंत भाविक आहेत. आपण पण अशा ठिकाणी जाऊन कांही द्रव्य प्राप्ती करुया हा विचार तारामतीच्या मनात घर करुन राहिला. नंतर ऐके दिवशी मग त्यांनी तो विचार महाराजांना बोलून पण दाखविला. ''करा! करा! कांक्षा पूर्ती करा!'' असे महाराजही त्यांना बोलले महाराजांच्या बोलण्यातील खोच त्यांनी लक्षात घेतली नाही. फक्त त्यांनी शब्दार्थावर बेत नियोजीत केला व एके दिवशी महाराजांच्यासह अगदी त्यांना वाटणारे जवळचे कांही भक्त घेऊन त्या राजापूर गांवी येऊन दाखल झाल्या.

श्रीकृष्ण सरस्वती महाराज परत कोल्हापूरहून आपल्या राजापूरला येत आहेत ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. परत महाराजांच्या दर्शनासाठी भक्तांची एकच झुंबड उडाली. अगणित भाविकांनी महाराजांचे दर्शन घेतले. अगदी पहिल्याप्रमाणे मोठ्या श्रध्दायुक्त अंत:करणाने परंतु पहिल्या सारखी कांही द्रव्यप्राप्त मात्र झाली नाही. ज्या हेतूने कोल्हापूर सोडून तारामती राजापूरला गेल्या तो हेतू निष्फळ झाला. परत त्यांनी महाराजांसह कोल्हापूर गाठले.

**नाही मिळाला एक पैसा ।**
**वाटेस भोगिले कष्ट दशा ।**
**देव सोडून अर्थ लालसा ।**
**करता अनर्थ होय ऐसा ।।६४।।**
**लज्जीत झाली तेंव्हा तारा ।**
**परतून आली करवीर नगरा ।**
**अहंकार नासला सारा ।**
**सेवी सद्‌भावे गुरुवरा ।।६५।।**

**– (प्रथम चरित्र)**

परत विवेक बळाने आपले संपूर्ण मन त्यांनी श्री गुरुंच्या सेवेत दृढ करण्याचे ठरवले.

महाराजांची कीर्ती दिगंतात पसरली होती. आपल्या कोल्हापूरात साक्षात दत्त गुरुंचा अवतार श्री कृष्ण सरस्वती महाराजांच्या रुपात प्रगट झाला आहे. हे समजल्यामुळे कोल्हापूरचे छत्रपती श्री शाहूमहाराजे हे महाराजांच्या दर्शनासाठी येऊन गेले.

**पुण्य शील खरीच अंगना**
**गुरुपद कमल प्रेम लीना**
**परिद्रव्यार्जनाची वासना**
**भुलवी मना तियेच्या ।।४२।।**

**– (उत्तर चरित्र)**

एके दिवशी ताराबाई महाराजांना म्हणाल्या ''महाराज छत्रपतींच्याकडे कांही तरी मागा की!'' महाराज त्यांना म्हणाले ''तो काय मला देतोय मीच त्याला दिलंय!''

म्हणून श्री शाहूमहाराजांच्या छत्रपती पदामागे महाराजांची कृपा होती हे सिध्द होते. जेंव्हा हे छत्रपती शाहूराजे जन्माला आले तेंव्हा महाराजांनी मंदिरात येणा जाणाऱ्या भक्तांना साखर वाटत म्हणले होते ''कोल्हापूरचा राजा जन्माला आलांय घ्या ! तोंड गोड करा!'' त्या सुमारास छत्रपतींच्या राज घराण्यात कोणी जन्माला आले नव्हते. मात्र कागलच्या घाटगे घराण्यात हे ''यशवंत'' बालक जन्माला आले होते व कांही वर्षानंतर म्हणजे छत्रपतींच्या दत्तक प्रकरणानंतर हरिपंत शिदनेर्लीकरांनी महाराजांच्या शर्कर वाटपा मागील ह्या गुपिताचा स्फोट केला.

तारामतींची ''धनाशा'' हा कांही केल्या त्यांना सोडेच ना. ''आई ह्या मिळकत पैशासाठी किती सोस करतीस? अष्टप्रहर द्रव्यर्जनाची इच्छा धरुन गाठी पदरी बांधून तरी ते किती धन दौलत बरोबर नेणार आहेस? अगं पूर्व संचितानी घरी आलेल्या देवाची जरा कांही तरी आठव ठेव की?'' असे महाराज तारामतीना म्हणत ह्यावर तारामतींनी पण महाराजांना अगदी निर्भिडपणे विचारले. ''महाराज तुम्ही माझे सर्वस्व आहात पण मी अबला एकटी तरी काय

करु. जरा कुणा भक्ताला काय कमी पडले, तर तेही मनाला आवडत नाही. हा माझा पुत्र दत्ता तो पण कांही काम करत नाही. मग सांगा आता महाराज मी तरी काय करु ह्याला?''

ह्या उत्तरावर महाराज तारामतीवर मंदस्मित कृपादृष्टीने म्हणाले? ''अगं तारे! गोवर्धन कुणी उचलला? त्याचा भार कुणी साहिला? सावळ्या कृष्णाने नव्हे तर तो भार साहिला त्याच्या प्रेमळ सर्व सवंगड्यांनी श्री कृष्ण होता तो फक्त निमित्ताचा धनी! अभिमान शून्य अशा त्यांच्या प्रेमा पुढे स्वत:चे प्रगाढ महात्म्य द्वारकाधीशाने सोडले होते. ओले कोरडे असे न म्हणता त्यांचे उच्छिष्ट मोठ्या आदराने सेवन केले होते. त्यांच्या प्रेमावर श्री कृष्णाने आपले सर्व ऐवर्श्य सोडले होते. ''तारे, तू पण तसेच केलेस बघ. ह्या माझ्या सेवकांना तू पोसलेस, तुझ्या उपकारात आता मी कायमचाच राहिलो आहे हं!''

महाराज स्वैर व चिन्मयपणे बोलून जात. पुष्कळ वेळा त्यांच्या बोलण्यातला अर्थ जवळ असणाऱ्या प्रज्ञावंतालाही लागत नसे. पण तोच प्रगल्भ अर्थ अशिक्षित प्रामाणिक निर्मळ मनाच्या सेवकास मात्र महाराजांच्या कृपा प्रेरणेने त्वरीत समजे. चार तपे महाराजांनी तारामतीच्या वास्तूत अगम्य लीला करीत काढली, पण तो काळ क्षणासारखा निघून गेला होता. एके दिवशी महाराज अचानकपणे आजारी पडले. दीन दुबळ्यांची आधिव्याधि हरण करणारे महाराज ज्वराने फणफणत होते. नेहमीची दिनचर्याही बंद होती. वैद्यबुवा येऊन गेले. तारामतींची झोप उडून गेली होती. जेवण खाण्यावरचे लक्ष उडाले होते.

तारामती सतत श्री गुरुंच्या चरणाजवळ बसून होत्या. कुलदैवत श्री खंडेरायाला प्रार्थित त्या म्हणाल्या ''हे कुलस्वामी खंडेराया तुझ्याच ह्या अवताराला माझ्या श्री गुरुरायांना तुझा तूच चांगले कर!'' असे म्हणून त्यांनी देव घरातून खंडेरायाचा अंगारा आणून महाराजांच्या कपाळी लावून एक चिमट त्यांच्या मुखी घातली.

तारामतींची महाराजांवरील श्रध्दा मोठी होती. महाराज त्या रात्री नंतर अरुणोदयकाळी उठून म्हणाले ''ह्या बाधेचा परत स्वीकार करु परंतु आता ह्या क्षणाला तिला बांधून ठेवलेच पाहिजे.'' असे म्हणून आपल्या अंगीची कौपीन काढून शेज घरातील स्वत:च्या पलंगाच्या एका पायास तिला गाठ मारुन ठेवले. लगेच नित्यवत जवळ असणाऱ्या व दर्शनाला आलेल्या सेवकांस महाराज म्हणाले ''चला रे! चला! आता आपण गंगेकडे फिरुन येऊया!'' सेवकांनी श्री गुरुंच्या दर्शनाबरोबर भाळास हात लावून पाहिले. त्यांना फणफणणारा ज्वर शांत झाला होता. तारामतीना हे समजताच महाराजांना फिरण्यास नेऊ नका. त्यांची तब्येत बरी नाही अशी मनाई करताच महाराजांचा ताप पळाला आहे हे सांगितले. तारामतींनी येऊन महाराजांचे दर्शन घेतले ताप नाही म्हणून त्यांना समाधान वाटले, कोण्या एका भक्ताने मग त्यांना सांगितले. ''महाराज तापाला पण आता सोबत फिरायला नेत आहेत तुम्ही निर्धास्त रहा''मग महाराज पंचगंगेकडे त्या भक्ता समवेत फिरावयास गेले. तारामतींना आता वार्धक्य प्राप्त झाले होते.

महाराज आजारातून उठले होते. मृत्यूविषयी ते विचार तारामतींच्या डोक्यात घर करुन रहात होते.

महाराजांसाठी आपण समाधी बांधून ठेवली पाहिजे. ह्या विचारात त्या गर्क असतांना महाराजांनी हे मनोगत जाणून उद्‌गारले.

**म्हणती रांडेचे चळले चित्त । पुढती पाठवू हेची उन्मत ।**
**भोगणे पडे आपले स्वकृत । दोष न यात दुजियांचा ।।१२५।।**

याप्रमाणे मृत्यू जवळ येऊन ठेपलेल्या तारामतींचा अंत झाला महाराज तेंव्हा राशिवडेकरांच्या घरी गेले होते. तारामतींच्या निधनाची वार्ता कोणी भक्ताने त्वरीत येऊन महाराजांचे कानी घातली. महाराजांनी संसार मायेच्या विरही दु:खाला मान दिला. ''आई। आई। काय म्हणून तू मला सोडून गेलीस.'' असे म्हणून महाराज वैराग्य मठीत येऊन तारामतींच्या गळ्यात पडले. दु:खितांची दु:खे हरण करणारा अगम्य लीलांचा सूत्रधार तारामतींच्या विरही दु:खात वाहून जात होता, स्वानंद हास्य वदनी तनू हेमकांती असणाऱ्या श्री कृष्ण सरस्वती महाराजांचे त्यांच्या जीवन कार्यात तेजस्वी नेत्र अश्रूगंगेने ओथंबलेले भक्तांनी त्यांना प्रथमच पाहिले.

महाराजांनी तारामतींची आरती ओवाळणी केली व ''आई'' हे घे असे म्हणून त्यांनी एक खडीसाखरेचा खडा पुढे केला. मृत तारामतीनी डोळे उघडून स्वत:च्या हाताने तो खडी साखरेचा खडा घेऊन स्वमुखी शेवटचा गुरुप्रसाद भक्षण केला. उभे आयुष्य ज्या गुरुंच्या सेवेत वेचले. अंत घडीला त्या सद्‌गुरुंचे दर्शन न व्हावे ही तळमळ तारामतींच्या अंतरात्म्याला लागली होती. ती तळमळ शांत होण्यासाठी मृत तारामतींना सजीव करुन त्यांच्या पुढ्यात मोक्षदाईनी महाराज उभे राहिले. देहाच्या क्षीणतेने त्या बोलू शकत नव्हत्या. भावनांचा भुकेलेला भगवंत तारामतींच्या व्यथा जाणत होताच. सद्‌गुरुंच्या सेवेत जीवनाची कृतार्थता जेवढी साधता येईल तेवढी गुरुच्या कृपेमुळे साध्य झाली होती. ह्या समाधानतेत अनंत ब्रम्हांड नायक परब्रम्ह नायक परब्रम्ह श्री कृष्ण सरस्वती महाराजांचे रम्य मनमोहक रुप शेवटच्या क्षणात नेत्रामध्ये साठवीत अबोल पण स्मीतपणे महाराजांना मनोमनीच शेवटचे अभिवादन करत डोळे सुशांततेने मिटले ते कायमचेच.

स्मशानात तारासुत दत्तोबाचे सांत्वन महाराजांनी केले. आपल्या अंगावरच्या उपरण्याने महाराजांनी स्मशानभुमीतील ती जागा स्वच्छ केली. त्या जागेवर चित्ता रचण्यात आली. असंख्य गुरुदासांसह महाराजांच्या उपस्थितीत दत्तोबांनी जन्मदायिंनी तारामतीस अग्नी दिला आणि आपल्या दु:खाचा सर्वस्वी भार महाराजांच्या खांद्यावर टाकून हंबरडा फोडीत मिठी मारली. अनंताच्या समोर तारामती अनंतात विलीन झाल्या.

तारामतींनी संपूर्ण आयुष्य महाराजांच्या सेवेसाठी वेचले. महाराजांच्या कोणत्याही दिन चर्येत, कोणत्याच प्रकारे खंड वा हलगर्जीपणा दाखविला नाही. अगदी आपल्या अपत्याप्रमाणे महाराजांचे जेवण खाण त्यांनी केले.

**फार काय वदू तेहतीस कोटी ।**
**अमरा रुचली हे करवीर क्षिती ।**
**आम्हा पायारी जगदंब ती ।**
**आम्हा वसती असे तेथे ।।**

आदिमाया आदिशक्ती श्री महालक्ष्मी मातेच्या आग्रहाने त्रयमूर्ती अनुसयात्मज दत्तात्रेय कोल्हापूरी अवतरले. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज म्हणून तारामतीच्या महान पुण्याईने त्या वास्तूत राहिले ती महान पुण्याई हे तारामतींची. आपणा सर्व भाविक भक्तजनांवर उपकार म्हणूनच भाविक ह्या अनंत कोटी ब्रम्हांडनायकाचे येथे हे रम्य आल्हाद विलोभनीय दर्शन घेत आहोत.

लेखकाचे नांव :- **श्री बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, कोल्हापूर**



पुण्यश्लोक ताराई शिर्केंच्या वैराग्य मठीतील/घरातील औदुंबर वृक्षाचे छायाचित्र



स्व. रामनाथ दत्तात्रय शिर्के



स्व. सीतादेवी/माईसाहेब रामनाथ शिर्के



स्व. बाळासाहेब उर्फ वसंतराव रामनाथ शिर्के

# // समुद्र भरला आहे //

## ।। अध्याय ६ वा ।।



श्रीक्षेत्र औदुंबर

### ▪ विषयसूची....!

१) बेडगकर यांची माहिती
२) कोल्हापुरातील रमाबाई पिशाच्चमुक्त
३) कोल्हापुरातील सरवीर पुणेकर

## अध्याय ६ वा

जोशी नांवाचे एक गृहस्थ बेडग गांवात रहात होते. घरदार शेती वाडी होती, संपत्ती होती, संतती होती. त्यामुळे जोशी सुखाने प्रपंच करुन बेडग गांवी रहात होते. पुढे कांही काळाने त्यांची पत्नी वारली. पत्नीचे निधन त्यांच्या शोकाला दुःखाला कारणीभूत झाले. दोन लहान मुलांना बघून तो रडत बसे. पुढे या मुलांचे कसे होणार या विचाराने त्याला चैन पडेना. पुढे जोशीचे दुसरे लग्न झाले. त्याच्या दुसऱ्या पत्नीचे नांव लक्ष्मी होते. तिचे माहेर कोल्हापूर होते. तिच्या भावाचे नांव विष्णूपंत होते. पुढे जोशी नोकरी निमित्त लक्ष्मी व पहिल्या पत्नीची दोन मुले घेवून कोल्हापूरला आला व आपला मेव्हणा विष्णूपंत यांच्या घरी राहू लागला. पुढे कांही दिवस गेले. एकदा विष्णूपंत आपली बहिण लक्ष्मीला घेवून कुंभार गल्लीतील ताराबाई शिर्केंच्या घरी श्री कुंभार स्वामींच्या दर्शनाला भक्तीभावाने आला. सर्वांनी श्रध्देने श्री स्वामींचे दर्शन घेतले. लक्ष्मी दर्शन घेताच श्री स्वामी तिला म्हणाले ''तुला सुलक्षणी कन्या होईल. तिचे पालकत्व मी घेईन. '' यावर लक्ष्मी श्री स्वामींना म्हणाली ''घरी सापत्न संबंध / सावत्र नाते असताना मला आणखी कशाला मुलगी देता? सवतीची मुले आपली म्हणून मी सांभाळते आहे. मला मुलगी झालेस केवळ अनर्थ घडून येईल. दुःख निर्माण होईल. मला मुलगी नको.'' यावर श्री स्वामी लक्ष्मीला म्हणाले ''जे मागता न मिळे, मिळता ते न टळे ही संचिताची फळे, गप्प उगीस बैस.''

श्री स्वामींचे बोलणे लक्ष्मीला पटले नाही. तथापि, त्या रात्री लक्ष्मीला एक सुंदर स्वप्न पडले. तिच्या स्वप्नात चार मुसलमान फकीर दीप बरोबर घेवून आले व मुसलमानी भाषेत तिला म्हणाले ''सुनो बेटी हमारा सवाल, अल्लाका परसाद ले नारीयल, निर्मल बेटी होगी, अच्छा खयाल करना, दो आना दाम देना, फिर जायेंगे मकाना'' हे स्वप्न व फकीरांचे बोल ऐकून लक्ष्मी घाबरुन झोपेतून उठली व आश्चर्यचकित झाली. पुढे दुसऱ्या दिवशी तिला पडलेल्या स्वप्नातील चार फकीर प्रत्यक्ष तिच्या घरी भिक्षा मागायला आले, दारात येवून उभे राहिले. फकीर तिला प्रसाद घेण्याविषयी विनंती करीत होते. तथपि, लक्ष्मीने प्रसाद घेण्याचे टाळले, शेवटी ते चारीही फकीर निघून गेले. सायंकाळी नोकरीवरुन विष्णूपंत घरी येताच त्याला लक्ष्मीला पडलेले स्वप्न व प्रत्यक्षात तिला प्रसाद द्यायला आलेले फकीर हा प्रकार समजला. तो लक्ष्मीला म्हणाला ''किती तुझी शूद्र बुध्दीमता, दैव देते आणि कर्म नेते हेच खरे'' यावर आपली बहिण लक्ष्मीला विष्णूपंत कुंभार गल्लीतील श्री स्वामींच्या दर्शनाला घेवून आला व दर्शन घेवून म्हणाला ''स्वप्नातील फकीर खरेच दुसऱ्या दिवशी दारात येवून लक्ष्मीला प्रसाद देत होते. तो प्रसाद तिने घेतला नाही. हा तिचा मूर्खपणा आहे. तिचा अज्ञानपणा आहे. तथापि, तुम्ही तिच्यावर कृपा करा.'' यावर श्री स्वामी म्हणाले ''एक दफे गया अक्कल, बार

बार दरशनकी मुश्किल, दो वक्त खाली गया बोल, सबका दिल नाखूष अभी, सपनोंके आदमी सच हुए, फिरभी लायेंगे उनको अभिच'' असे बोलून श्री स्वामी लक्ष्मीकडे नाराजीने पाहू लागले. एवढ्यात सकाळी विष्णूपंत / लक्ष्मीच्या घरासमोर भिक्षेला आलेले तेजस्वी चार फकीर आले. त्यांनी श्री स्वामी समोर नारळ ठेवून, श्री स्वामींना नमस्कार करुन झटक्यात निघून गेले. श्री स्वामींनी फकीरानी त्यांच्या समोर ठेवलेला नारळ घेतला व लक्ष्मीच्या ओटीत घालून तिला म्हणाले ''एकदा ब्रम्हदेव देवून चुकला. मानवाने त्या नारळाचा अपमान करु नये. जा सुखी रहा'' पुढे वर्ष गेले. श्री स्वामी कृपेने लक्ष्मीला सुंदर मुलगी झाली. त्या मुलीला घेवून लक्ष्मी श्री स्वामी दर्शनासाठी कुंभार गल्लीत आली. मुलीला श्री स्वामींच्या पायावर घालून दर्शन घेवून उभी राहिली. श्री स्वामींनी त्या लहान बाळाला/मुलीला उचलून घेतले. आशीर्वाद दिला व म्हणाले. ''घाणवट खाऊ आली''

रमाबाई नावांची स्त्री कोल्हापुरात रहात होती. तिला पिशाच्य बाधा/समंधबाधा होती. त्यामुळे तिला प्रकृतिस्वास्थ नव्हते. ती रोडकी/अशक्त झाली होती. त्यातच तिचा नवरा वारला होता. पोटाला मूलबाळ नव्हते त्यामुळे सांपत्तिक परिस्थितीत सुख मानून दिवस गुजारत होती. सुख मानून दिवस काढीत होती. पिशाच्चबाधेवर / समंधबाधेवर भरपूर उपाय केले / मंत्रतंत्र उपचारले परंतु गुण आला नाही. समंधाने ती जर्जर झाली. मग कुंभार गल्लीतील स्वामींचे नाव कानावर येताच ती ताराबाईच्या घरी स्वामीच्या दर्शनासाठी आली. रमाबाईने स्वामींचे दर्शन घेताच स्वामी तिला म्हणाले ''पाचशे रुपये खर्चून गोर गरीबांना जेवण दे म्हणजे तुझी पिशाच्चबाधा/समंधबाधा दूर होईल.'' मग, ताराबाईला एकांतात गाठून रमाबाई म्हणाली ''पंचवीस रुपये पदरात घालते ही समंधबाधा स्वामींना सांगून विनवून दूर कर. आता त्रास सहन होत नाही'' मग ताराबाईला रमाबाईची दया येवून स्वामींना म्हणाली ''रमाबाईला पिशाच्चबाधेचा / समंधबाधेचा त्रास आता सहन होत नाही. कांही तरी उपाय करुन तिला समंधबाधेतून मुक्त करा.'' यावर स्वामी रमाबाईस म्हणाले ''ताराबाई सांगते म्हणून तुला पिशाच्चबाधेतून / समंधबाधेतून मुक्त करतो. परंतु पुढे सावधगिरीने वाग'' तत्क्षणी रमाबाईला पिशाच्च संचार झाला व ते स्वामींना म्हणाले ''रमाबाईचा माझ्यावर उपकार झाला. तुमच्या दर्शनाने पिशाच्च योनीतून मुक्त झालो'' रमाबाई थोड्या वेळाने सावध झाली / स्वामींना नमस्कार करुन ती घरी निघून गेली. पाचशे रुपयाचे काम पंचवीस रुपयात झाले. रमाबाईला आराम वाटल्याने तिने ताराबाईच्या घरी स्वामी दर्शनाला येण्याचे बंद केले, टाळले. स्वामी ताराबाईला म्हणू लागले. ''तुझ्यासाठी रमाबाईला समंधमुक्त केले. तु जामीन होतीस म्हणून तिला मुक्त केले. जामीनदार तू आहेस. त्यामुळे कधी तरी तुला त्रास होईल.'' पुढे काही दिवस गेले. रमाबाईच्या घरी चोरी झाली. हां हां म्हणता हजार रुपये गेले. मग रमाबाईला पश्चाताप झाला. स्वामी मागत होते /

खर्चायला सांगत होते त्याच्या दुप्पट गेले. तिला पश्चाताप झाला. परत ती ताराबाईच्या घरी आली. स्वामींची क्षमा मागून सेवेला लागली. घरदार, पैसा अडका या अशाश्वताचा मोह सोडून निरीच्छपणे स्वामी सेवेत सुख मानू लागली. स्वामींचे समाधान झाले. स्वामींनी तिचा अंगिकार केला. मग आता रमाबाईला दु:ख / दैन्य कसले?

कोल्हापूर छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारात सरवीर पुणेकर म्हणून अधिकारी होता. त्याचा त्याच राज दरबारात राजाराम खंडेराव नावांचा मित्र होता. तो सरवीर पुणेकराचा वरिष्ठ अधिकारी जिगर मित्र असून, पुरा नास्तिक होता. एकदा सरवीर पुणेकर कुंभार गल्लीतील स्वामींच्या दर्शनाला जात असताना राजाराम खंडेराव सरसुभे हा जिगर मित्र त्यांच्या घरी भेटायला आला व तो त्यांना विचारु लागला ''कुठे निघालात'' यावेळी सरवीर पुणेकर सरसुभे ला म्हणाला ''इथंच जवळच कुंभार गल्लीत ताराबाईच्या घरी नृसिंहवाडीचे साक्षात दत्त आहेत. त्यांच्या दर्शनाला चाललो आहे '' यावर सरसुभे त्याला म्हणाला ''तुम्ही तर विद्वान, सदसद् विवेक बुध्दी सोडून मनुष्य रुपात तुम्ही दत्त पाहता हे योग्य नाही. तुम्हा आम्हाला तो मनुष्यच आहे'' यावर सरवीर पुणेकर सरसुभेला म्हणाला ''मी तर स्वामींच्या दर्शनाला चाललो आहे. तुम्हीपण चला त्यांच्या दर्शनाला. मग घेताच दर्शन ते मनुष्य आहेत की देव आहेत हे तुम्हांला कळून येईल मग तुम्हांला त्यांचे थोरपण कळून येईल. चला माझ्या बरोबर स्वामींच्या दर्शनाला'' यावर दोघे मिळून ताराबाईच्या घरी स्वामींच्या दर्शनाला आले. सरसुभ्याला पाहून स्वामींनी त्याचा हात धरुन त्याला शौचकुपात / संडासमध्ये ढकलून कोंडून घातले.

तो प्रकार पाहून सरवीर पुणेकर घाबरुन गेला. सरसुभे अधिकाराने उन्मत होता. तो आता स्वामींना व मला अतिशय त्रास देणार म्हणून पुणेकर घाबरुन गेला. मीच जर सरसुभ्याला स्वामींच्या दर्शनाला आणले नसते तर हा प्रकार घडला नसता. स्वामींना व मला ताप झाला नसता असे सरवीर पुणेकराला वाटू लागले. एवढ्यात स्वामींनी शौचकुपाचे / संडासचे दार उघडले. सरसुभे बाहेर आला व स्वामींच्या चरणावर लोळू लागला. क्षमा याचना करु लागला. ''मी अनंत अपराधी आहे'' म्हणू लागला. एवढ्यात सरवीर पुणेकर सरसुभेला म्हणाला ''मी तुम्हाला स्वामींच्या दर्शनाला घेवून आलो हीच माझी चूक झाली आहे. मीच तुम्हांला आणले नसते तर हा प्रकार घडला नसता. आपण माझ्या घरी जावू या. थोडी विश्रांती घ्या म्हणजे तुम्हांला आराम वाटेल. झाल्या प्रकारा बद्दल मला क्षमा करा'' यावर सरसुभे सरवीर पुणेकरांना म्हणाला, ''आता घरी जायला नको. आरतीची वेळ आहे. आरतीचा लाभ घेवू या. पुन्हा अशी संधी मिळणार नाही. मी भाग्यवान आहे'' आरतीचा लाभ घेवून दोन घटका स्वामींच्या सहवासात घालवून दोघे सरवीराच्या घरी आले. त्यावेळी उतावीळ होवून सरवीर पुणेकराने सरसुभेला झालेल्या नास्तिक बुध्दीच्या परिवर्तनाबद्दल विचारले. त्यावर सरसुभे सरवीर पुणेकराला म्हणाला. ''जेव्हा मला स्वामींनी शौच्च कुपात कोंडले त्यावेळी त्यांनी माझ्या कडून मी

केलेल्या निंदेचा पाढा वाचून घेतला. मी केलेल्या निंदेचा पाढा इतर कोणाला माहित नव्हता. मी करीत असलेली स्वामी निंदा केवळ त्यांनाच ठाऊक होती. म्हणूनच ते सर्व त्यांनी कबूल करुन घेतले. एकाच ठिकाणी बसून भूत-भविष्य-वर्तमान जाणतो. त्रिभुवन पालथे घालतो. त्याला कां जाऊ नये शरण तूच सांग'' सरसुभेचे म्हणणे सरवीर पुणेकराला पटले. स्वामी विषयी त्यांचे प्रेम वाढले भक्ती वाढली. संशय पटल दूर झाले. साक्षात नृसिंह वाडीचे दत्त ते हेच म्हणून ताराबाईच्या घरी दर्शनाला येवू लागले.

*****

## श्री श्रींचे भक्त छायाचित्रासोबत



**डावीकडून उभे १) तात्याबुवा २) लक्ष्मण ३) स्व.गोविंद दत्तात्रय व्यास ४) स्व. डॉ. धनवडे ५) शंकर भटजी**

**डावीकडून बसलेले १) स्व. विष्णूअण्णा परांडेकर २) प.पू.नामदेव महाराज ३) स्व.रामभाऊ मुरगुडकर४) स्व. कृष्णा लाड**

**डावीकडून बसलेली लहान मुले १) दत्तात्रय फलटणकर २) चंपूताई ३) बाबुराव पोखरेकर**

# बेडगकर जोशी यांची माहिती

बेडग हे गांव मिरजेपासून ११ कि.मी.आहे. बेडग हे मिरज तालुक्यातील खेडेगांव असून सधन गांव आहे. पानमळ्यासाठीही हे गांव प्रसिध्द आहे. द्राक्षबाग, ऊस ही आता महत्वाची पिके असून म्हैसाळ योजनेच्या पाण्यावर ही पिके घेण्यात येतात. या गांवचे सरंजामदार घोरपडे सरकार असून, गांवात त्यांचा वाडा आहे. गांवात मुख्यत: वंजारी समाज व मराठा समाजाची लोकवस्ती आहे. इतर समाजाचे लोकही गुण्यागोविंदाने राहतात. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पोथीतील १८ व्या शतकात होऊन गेलेले दामोदर जोशी हे बेडगचे रहिवासी होते. दामोदर यांना बाळकृष्ण जोशीनी दत्तक घेतले होते. दामोदर जोशी यांची पहिली पत्नी वारल्याने ते अतिशय दु:खी झाले. घरी लहान दोन मुले यामुळे त्यांना घर कसे चालवावे याची चिंता पडली. सर्वांच्या संमतीने त्यांचे दुसरे लग्न करण्याचे ठरले. त्याकाळी कोल्हापूरला श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे (कुंभार स्वामींचे) एक शिष्य स्व. विष्णूआण्णा परांडेकर हे कोल्हापूरला रहात होते. त्यांची लहान बहीण लक्ष्मी हिला दामोदर जोशी (बेडगकर) यांचेशी लग्न करुन दिली. लक्ष्मी बरोबर विवाह झाल्यानंतर दामोदर जोशी पहिल्या पत्नीपासून जन्मलेली दोन मुले घेवून कोल्हापूरला सासूरवाडीला म्हणजेच विष्णू आण्णा परांडेकर यांच्या घरीच रहायला गेले. कोल्हापूरातच उद्योगधंदा करुन तेथेच स्थायिक झाले.

दामोदर जोशींना पहिल्या पत्नीपासून दोन मुले, लक्ष्मी पासून एक मुलगी, तिसऱ्या पत्नीपासून ठकी नावाची मुलगी अशी चार अपत्ये झाली. परंतू चारही अपत्ये मयत झाली. त्यामुळे दामोदर जोशी यांनी नोंदणी (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) च्या वामन देशपांडे यांना दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर वामन देशपांडे यांचे नांव विष्णूपंत दामोदर जोशी झाले. ते नांदणीला रहाणेस गेले.

**स्व. विष्णूपंत जोशी यांना तीन मुले झाली.**

१) श्रीपाद (मयत) यांना सुनिल नांवाचा मुलगा आहे.

२) दत्तात्रेय (हयात) यांना गणेश नांवाचा मुलगा आहे.

३) दिगंबर (बाळकृष्ण) हे बेडगेहून नांदणीच्या लक्ष्मण देशपांडे घराण्यात दत्तक आले. दिगंबर देशपांडे यांना श्रीकांत नांवाचा मुलगा आहे.आज स्व. विष्णूपंत दामोदर जोशी (बेडगकर) यांचे सर्व कुटूंब नांदणीला स्थायिक झाले असून सर्व नातवंडे उच्च शिक्षित असून, शेतीवाडी नोकरीत कार्यरत आहेत. तसेच सर्वजण आजही श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या सेवेत अखंडपणे कार्यरत आहेत.

शब्दांकन :- **श्री. मुकुंद जोशी, नांदणी**

# ॥ समुद्र भरला आहे ॥

## ॥ अध्याय ७ वा ॥



श्री जोतिबा, वाडी रत्नागिरी

### ▪ विषयसूची....!


१) श्री ज्योतिर्लिंग दर्शन
२) कपटी सावकार
३) कागलचा हरिपंत शिदनेर्लीकर
४) राजगुरु श्री सिध्देश्वर स्वामी महाराज

## अध्याय ७ वा

एकदा स्वामी भक्तांना म्हणाले ''श्री ज्योतिर्लिंगाला दर्शनाला जावू या, दक्षिण केदारला वाडी रत्नागिरीला जावू या.'' हे ऐकून भक्त बाळकू राशिवडेकर समोर येवून म्हणाला ''चला बसा माझ्या खंद्यावर क्षणात त्वरीत श्री जोतिबा दर्शनाला जावू या'' यावर ताराबाई स्वामींना म्हणाली ''सर्व भक्तांनाही श्री जोतिबा दर्शनाला न्या व लवकर परत या मला जीवाला हुरहुर लागते'' अशा रीतीने बाळकूच्या खांद्यावर स्वामींना बसवून सर्व भक्तमंडळी वाडी रत्नीगिरी म्हणजेच श्री जोतिबा दर्शनाठी डोंगराकडे निघाली. चालत चालत सर्व मंडळी रामभाऊ फारिकाच्या घरा जवळ माध्यान्ह काळी आली. रामभाऊ फारिकाने असा विचार केला की, स्वामींना रस्त्यात / प्रवासात भूक लागली तर लाडू / मोदक असे फराळाचे जिन्नस तर घरातून बांधून घ्यावेत. फारिकाचा विचार सामजून स्वामी त्याला म्हणाले ''लाडू, मोदक फराळाचे जिन्नस बरोबर घेवून भूक टाळण्यासाठी, भूक शमविण्याची कांही गरज नाही. प्रवासातील तहान भुकेची मी व्यवस्था केली आहे. याची प्रवासात प्रचिती येईल'' हे ऐकून फारिकाने लाडू / मोदक फराळाचे जिन्नस न घेता स्वामींच्या बरोबर सर्वजण भराभर जोतिबा डोंगराकडे वाटचाल करु लागले. रस्त्यातील वडणगे गांवा पर्यंत पोहचे पर्यंत सर्वजण घामाने भिजून निघाले, उन्हाने घामाघूम झाले. हे पाहून दयाळू स्वामी सूर्याकडे पाहून म्हणाले ''अंबेच्या मंदिरात आम्ही विश्रांती घेणार आहे. अंबेचे मंदिरही अजून दूर आहे. तेंव्हा उन्हाचा त्रास आम्हाला होवू नये. शीतल / शांत हो'' स्वामींच्या या बोलानंतर भराभर ढग जमू लागले. ढगांनी सूर्याला व्यापून टाकले. सगळीकडे सावली पसरली. उन्हाची तीव्रता कमी झाली. अशा रीतीने सर्वांना स्वामींचे सूर्य / चंद्रा वरील सत्तेचे मोल पटले.

सर्वजण आनंदाने भर दोन प्रहरी वडणगेच्या अंबेच्या मंदिरात पोहचले. थोडीफार विश्रांती घेवून पुन्हा स्वामी भक्तासह जोतिबा डोंगराकडे जाऊ लागले / प्रवास करु लागले. भर दुपार झाल्याने उन्हामुळे स्वामींना फार तहान लागली. एवढ्यात एक शेतकरी भेटला त्या शेतकऱ्याकडून रामभाऊने पाणी आणणेसाठी भांडे मागून घेतले. स्वामींना पिण्यासाठी पाणी आणण्यासाठी रामजी विहीरीचा शोध घेऊ लागला. तेवढ्यात एका शेतात विहीरीजवळ एक ब्राम्हण फराळ / जेवण घेत असतांना दिसला. भर दुपारची वेळ रामजीने त्या ब्राम्हणाला आपल्या स्वामींना लागलेली तहान / प्रवास या विषयी हकिकत सांगितली. यावर त्या ब्राम्हणाने रामजी जवळ सर्वांना पुरतेल एवढे लाडू खाण्यासाठी दिले व विनयाने म्हणाला ''माझे लाडू मी तुमच्या गुरुसाठी व तुम्हांसाठी खाण्यासाठी देत आहे. ते सर्वांनी खावेत लाडू खाऊन तुमचे गुरुही तृप्त होतील. माझे लाडू यामुळे सत्कारणी लागतील'' रामजीने त्या ब्राम्हणाने दिलेले लाडू व पाणी घेवून आला. स्वामींनी व सर्व भक्तांनी त्या लाडवाचा आस्वाद घेतला, पाणी प्याले. सर्वांची भूक शांत झाली. अशा प्रकारे स्वामींनी रामजीला घरातून लाडू / मोदक असे फराळाचे जिन्नस

घेवू नको म्हटले होते याची प्रवासात सर्वांना प्रचिती आली. आपला स्वामीवरील अविश्वास अयोग्य आहे असे रामजीस वाटू लागले. आपण अल्पमती आहोत असे वाटू लागले. जोतिबा डोंगराकडे जात असतांना पेरुची झाडे लागली. झाडावरील पेरु खात, स्वामींच्या नांवाचा जय जयकार करीत सर्वजण जोतिबा डोंगरावर पोहोचले. श्री जोतिबा मंदिरात पोहोचले. श्री जोतिबाला / केदारनाथाला नमस्कार करुन स्वामी केदारनाथाची स्तुती गाऊन म्हणू लागले. ''करवीरनिवासिनी अंबाबाईच्या मदतीला तू धावून आलास लढाईत रत्नासुराला तू मारलेस, आई अंबाबाईला विजय मिळवून दिलास, तिच्यावर उपकार केलास. परंतु तिने तुला स्थानापन्न होणेस बसणेस परवानगी / अनुमती दिली नाही काय? युगे अठ्ठावीस पांडूरंग विटेवर उभा आहे तसा तूही उभा आहेस काय? आई अंबाबाई निष्ठूर आहे काय? तुझे दर्शन घेवून गुलाल उधळणाऱ्या भक्तांना तू त्वरीत पावतोस. आता आम्हांला तुझे दर्शन झाले आहे. परत करवीर / कोल्हापूरला जाण्याची आज्ञा दे'' असे म्हणून स्वामी सोबतच्या भक्तांना म्हणाले ''चला लवकर परत. ताराबाईला उपवास पडेल. माझ्याशिवाय ती अन्न ग्रहण करणार नाही. जेवणार नाही.'' अशा रीतीने श्री जोतिबाचे दर्शन घेवून / सर्व मंडळी स्वामीसह रात्री ताराबाईच्या घरी बाळकूच्या खांद्यावर बसून परत आली. आल्यानंतर सर्व भक्त मंडळींनी स्वामींची शेजारती केली. अशा प्रकारे श्री जोतिबा डोंगराची / श्री केदारनाथ दर्शनाची यात्रा पूर्ण झाली.

कोल्हापूरच्या शेजारी एका खेडेगांवात दोन भाऊ आनंदाने रहात होते. त्या गांवातील एक कपटी सावकाराने त्या दोन भावात वाटणी वरुन वितुष्ट/वाईटपणा आणला. त्या सावकाराच्या कपटीपणाला धाकटा भाऊ बळी पडला व त्याने थोरल्या भावाला घरातून हाकलून दिले. घरातून हाकलून दिल्यानंतर तो थोरला भाऊ कोल्हापूरला निराश होऊन परागंदा होऊन आला व आई अंबाबाईच्या देवळात राहू लागला. श्री अंबाबाईच्या देवळात स्वामींची कीर्ती त्या थोरल्या भावाच्या कानावर पडली व तात्काळ तो स्वामींच्या दर्शनाला ताराबाईच्या घरी आला. श्री स्वामींचे दर्शन घेवून तो स्वामींना म्हणाला ''कपटी सावकाराचे ऐकून धाकट्या भावाने मला घरातून हाकलून दिले आहे. माझी पत्नीही मला सोडून गेली आहे. मी आता जगात एकटाच राहिलो आहे. श्री अंबाबाईच्या देवळात तुमची कीर्ती ऐकून तुमच्या दर्शनासाठी आलो आहे. मला या सर्व संकटातून सोडवा. मार्ग दाखवा. तुमच्या पायाजवळ थारा द्या. तुमच्याशिवाय या जगात माझा कोणी वाली नाही'' हे ऐकून स्वामी त्याला म्हणाले ''तुला आसरा दिला आहे. इथं रहा, रोज पंचगंगेतून पाण्याच्या घागरी भरुन आणीत जा. तुझ्या पोटा पाण्याची सोय इथं केलेली आहे, ताराबाईच्या घरी केलेली आहे.'' अशा प्रकारे स्वामींची सेवा करता करता सहा महिने गेले. एक दिवस त्या मनुष्याचा धाकटा भाऊ शोध घेत घेत ताराबाईच्या घरी आला व त्या थोरल्या भावास म्हणू लागला ''त्या कपटी सावकाराने आपल्या दोघात वाटणीवरुन वितुष्ट आणले. मीही त्याचे ऐकले. कपटीपणा मुळे सावकाराची

तरणीताठी बायको वारली. त्याचा त्यालाही पश्चाताप झाला आहे. मीही माझ्या बायकोचे ऐकून तुझ्याशी दुष्टपणाने वागलो आहे. आता घरी परत चल. घर व जमीन तुला समान वाटून देतो'' ते ऐकून तो थोरला भाऊ त्याच्या धाकट्या भावास म्हणाला ''तुला तुझा संसार बायको प्रिय. तू तिचे ऐकून संकटात मला ढकललेस. मला आता घरदार/शेती काहीही नको. तुला लखलाभ होवो,'' ते ऐकून धाकटा भाऊ थोरल्या भावास म्हणाला ''मला माझ्या अपराधाची क्षमा कर. तुझ्या स्वामीजवळ जाऊया ते काय म्हणतात ते तर पाहू या'' यावर दोघे भाऊ स्वामीजवळ आले व दर्शन घेवून उभे राहिले. यावर स्वामी थोरल्या भावास म्हणाले ''धाकट्या भावाचे ऐक त्याच्या बरोबर परत घरी जा. त्या सावकाराला क्षमा कर, भावाला क्षमा कर. आनंदाने भाऊ भाऊ एकत्रित रहा. सुखाने संसार कर. धाकट्या भावाचे मन मोडू नकोस.'' मग स्वामींचे ऐकून तो थोरला भाऊ धाकट्या भावाबरोबर परत घरी गेला. तो कपटी सावकारही त्यांच्या घरी येवून त्याने आपल्या कुकर्माची क्षमा थोरल्या भावाजवळ मागितली. अशा रीतीने त्या थोरल्या भावाने रोज पंचगंगेतून पाण्याच्या घागरी भरुन आणण्यासाठी सेवा केली. स्वामीकृपेने त्याचे घर, त्याचा संसार पुन्हा सजला. जो मनुष्य स्वामीसेवेत आयुष्य घालवितो त्याला या जगात कसलेही दु:ख रहात नाही. जगात त्याला काहींही दुर्मिळ असत नाही.

कोल्हापूर जवळ कागल हे तालुक्याचे गांव आहे. या गांवात हरिपंत शिदनेर्लीकर नांवाचे गृहस्थ रहात होते. राजदरबारात ते नोकरी करीत असल्याने त्यांची आर्थिक स्थिती बरी / चांगली होती. वरचेवर कामानिमित्त हरिपंत शिदनेर्लिकर कोल्हापूरला कामानिमित्त येत असत. कोल्हापूरात येत असल्याने वरचेवर स्वामींची ख्याती / स्वामींचे दिव्य जीवन त्यांच्या कानावर पडत होते. सुकृतामुळे हरिपंत शिदनेर्लीकर यांना स्वामी दर्शनाची जबरदस्त ओढ लागली. या दर्शनाच्या ओढीने ते एकदा स्वामी दर्शनाला कोल्हापूरला ताराबाईच्या घरी गेले. स्वामी दर्शनाने त्यांचे पूर्व सुकृत फळाला आहे. त्यांची वृत्ती पालटली, अंतरंग बदलून गेले व रोज स्वामींच्या दर्शनाला येवू लागले. लवकरच हरिपंत शिदनेर्लीकर यांनी राजदरबारातील मानाची नोकरी सोडली व स्वामी सेवाधर्म मानला व स्वामीच्या सेवेत जीवन व्यतित करु लागले. पहाटे लवकर उठून स्नान संध्या आटोपून ते घरा शेजारच्या श्री खंडोबा मंदिरात अनुष्ठान करीत. अनुष्ठान संपल्यानंतर ते पुन्हा स्वामी दर्शनाला येत व स्वामी सेवेत दिवस घालवीत. हा त्यांचा नित्यक्रमच होता. एकदा काय झाले ज्या श्री खंडोबा मंदिरात हरिपंत अनुष्ठानाला बसत / वाचनाला बसत त्या मंदिराला उजेडवारा येण्यासाठी एकच खिडकी होती. त्या खिडकीत एक मांजर रोज येवून बसू लागले. त्यामुळे वाचनाला पुरेसा प्रकाश येईना म्हणून हरिपंताने रागाने त्या मांजराच्या तोंडाला मारले. पुढे अनुष्ठान / वाचन पूर्ण होताच हरिपंत स्वामी दर्शनाला मठीत गेला. तेंव्हा स्वामींनी मांजर रुपाने हरिपंताच्या अनुष्ठानाला गेलो असता खिडकीत बसून वाचन ऐकत असतांना हरिपंताने मला गालावर मारले. हा पहा माझा गाल माराने लाल झाला

आहे म्हणून हरिपंताना व जवळ असलेल्या भक्तांना दाखविला. स्वामींचा लाल झालेला गाल आपल्या माराने झालेला पाहून तो ओशाळला व त्यांच्या मनाला वाटले. प्रत्यक्ष भगवंत / अनुष्ठानाला / अनुष्ठान पहायला आला असतांना त्यांनाच मी थप्पड मारण्याचा मूर्खपणा केला. पश्चातापाने हरिपंताचे मन होरपळले. स्वामी केवळ मनुष्यरुपातच नाहीत तर पशुपक्षांचे अवतार धारण करणारे प्रत्यक्ष भगवंताचे / श्री दत्तात्रयाचे अवतारच आहेत अशी त्यांनी खूणगाठच बांधली.

एकदा स्वामी आपल्या भक्तांना म्हणाले ''पंचगंगा नदीकाठी असलेल्या सिध्दनाथाचे दर्शन घेवू या. परत येतांना वाटेत तुम्हा मौज दाखवू या'' श्री सिध्दनाथाचे दर्शन घेवून परत येतांना एक द्रविड देशाचा ब्राम्हण पंचगंगेत स्नान करुन सोवळ्याने मंत्र पठण करीत चाललेला भक्तांनी पाहिला. स्वामींचे अलौकिक तेज पाहून तो द्रविडी ब्राम्हण स्तंभित झाला व थबकला. भाषेची अडचण असल्याने हातवारे करुन स्वामींची चौकशी केली हे महामुनी कुठले असाही प्रश्न हातवारे करुन केला. भक्तांनी श्री स्वामीजी हे प्रत्यक्ष दत्त अवतार असल्याचे सांगताच जरी सोवळे असले तरी स्वामींचे दर्शन घेवू या, फार तर पुन्हा एकदा स्नान करावे लागेल असा विचार त्या द्रविडी ब्राम्हणाच्या मनात आला. स्वामींनी त्या द्रविडी ब्राम्हणाच्या मनातील विचाराचा गोंधळ ओळखला व त्याला म्हणाले ''माझ्या दर्शनाने, माझ्या स्पर्श दर्शनाने तुझे सोवळे बिघडणार नाही घे दर्शन'' स्वामींचे हे अंतरसाक्षित्वाचे बोल ऐकून त्या द्रविडी ब्राम्हणाला आपल्या मनांतील सोवळ्या ओवळ्याचा गोंधळ स्वामींनी कसा ओळखला याचे आश्चर्य वाटले. खरोखरीच स्वामीजी श्री दत्तात्रयाचे अवतार आहेत असे त्या द्रविडी ब्राम्हणाला पटले व त्यांनी स्वामीजींचे स्पर्श दर्शन घेवून त्यांची अलौकित्वाची स्तुती गायली.

*****

## वाडी रत्नागिरीचा जोतिबा –

महाराष्ट्रातील या लोकदेवाचे प्रमुख स्थान कोल्हापूरजवळ वायव्येस नऊ मैलांवर असणाऱ्या डोंगरावर वा रत्नागिरीवर आहे. मूळचा केदारनाथ असणारा हा देव कोल्हापूरच्या महालक्ष्मीस दैत्यसंहाराच्या कार्यात मदत करण्यासाठी आला व तो तेथेच विजयानंतर स्थिरावला. ज्योतिर्लिंगाच्या रुपात निवास करणारा जोतिबा चतुर्भुज आहे. हातात खड्ग, पानपात्र, डमरु व त्रिशूळ ही शिवाची आयुधे आहे. अश्व हे त्याचे वाहन. रवळनाथ, खंडोबा यांच्याप्रमाणेच हा जोतिबा लोकमानसावर प्रभाव ठेवून आहे. हिमालयातील प्रसिध्द केदारनाथच दक्षिणेत लोकरक्षणासाठी जोतिबा बनला.

संदर्भ ग्रंथाचे नाव – **नाथसंप्रदाय : उदय व स्वरुप**
लेखकाचे नाव : **प्र. न. जोशी**

# ।। श्री जोतिबा ।।

पौगंड ऋषी व त्यांची पत्नी विमलांबुजा - यांना बरेच दिवस मूल नसल्याने त्यांनी बद्रिनाथ / बद्रिकेदारला घोर खडतर तपश्चर्या केली. तसेच पुत्र व्हावा म्हणून पुत्रकामेष्टी यज्ञही केला. त्यांच्या तपश्चर्येने श्री बद्रीनाथ प्रसन्न झाले व ''मी तुमच्या पोटी जन्म घेईन'' असे सांगितले. पुढे कांही काळा नंतर चैत्र महिन्यात, रविवारी शुध्द अष्टमीच्या दिवशी बद्रीनाथ / भगवान शंकर स्वत: आपण आठ वर्षाची बालमूर्ती होऊन पौगंड ऋषी व विमलांबुजा या ऋषी पती पत्नी समोर प्रकट झाले. ऋषी पती पत्नीनी बालकास प्रेमाने अलिंगन दिले ही आठ वर्षाची बालमूर्ती म्हणजेच बद्रीकेदारनाथाची प्राणजोतच होय म्हणून या मुलाचे नाव ''जोतिबा'' ठेवले. असे ज्योतिबाचे स्थान कोल्हापूर पासून वायव्येस १२ मैलावर आहे. या क्षेत्रालाच वाडी - रत्नागिरी म्हणतात. ज्योतिबाचा डोंगर म्हणतात. वाडी - रत्नागिरी हे केदारनाथांचे / जोतिबाचे पवित्र स्थान आहे. सह्याद्री पर्वताचा फाटा पन्हाळगड, पावनगड असा व्यापला आहे. त्या सह्याद्री पर्वताचा सोंडेसारखा शंखाकृती वर गेलेला जो भाग तोच ज्योतिबाचा डोंगर होय. समुद्र सपाटी पासून या स्थानाची / डोंगराची उंची ३१०० फूट आहे.

श्री जोतिबाच्या डोंगरावर श्री केदारलिंगाचे पवित्र स्थान आहे. श्री ज्योतिबा हा प्रकाश देणारा, अज्ञान, अंधार नष्ट करणारा ब्रह्मा - विष्णू - महेश यांचा अवतार आहे. श्री जोतिबाने या भागातील रत्नासूर या दैत्याचा वध केला. या भागातील लोकांच्यावरील संकट टळले. आनंदी आनंद झाला रत्नासुराच्या नांवावरुन या भागाला ''वाडी - रत्नागिरी'' हे नांव पडले.

करवीरनिवासिनी महालक्ष्मी / अंबाई हिच्या खडतर तपश्चर्येने दुष्ट राक्षसांचा / दैत्यांचा नि:पात करण्यासाठी श्री बद्रीकेदारहून केदारनाथ दक्षिणेकडे निघाले, करवीरी येण्यासाठी निघाले. अनेक ठिकाणी दैत्यांना त्यांनी ठार केले व प्रजेला सुखी केले. त्या त्या ठिकाणी ज्योतिर्लिंग स्थापन झाली. ही ज्योतिर्लिंगे म्हणजेच त्यांच्या प्रवासाची चिन्हे होय. त्यांच्या नांवाचा जयजयकार चालू झाला. ज्याचे भोजन रक्ताचे आहे त्या रक्तभोज दैत्याचा नि:पात श्री केदारनाथाने केला. सर्वत्र आनंदी आनंद झाला. सुख - शांती नांदू लागली. हे श्री महालक्ष्मी / अंबाबाई ला कळताच ''चांगला भला आहे - सौदागर'' असे उद्‌गार काढले. बद्रीनाथहून दक्षिणेकडे श्री केदारनाथ आल्याने श्री महालक्ष्मीने त्यांना सौदागर / प्रवासी म्हंटले आहे. म्हणून ''श्री ज्योतिबाच्या नांवाने चांगभला'' असा जयजयकार केला जातो. खोबरे गुलाल उधळले जाते. दुष्ट राक्षसांचा वध करीत करीत श्री केदारनाथ औंधला (जि. सातारा) आले. त्या ठिकाणी औंधासुर नांवाचा दैत्य लोकांना त्रास देत होता. तो बलाढ्य दैत्य होता. तेथीलच एका दिव्य स्त्रीच्या मदतीने केदारनाथाने औंधासुराचा वध केला. त्या स्त्रीच्या अमोल मदतीबद्दल तिथेच तिला राज्य बहाल केले. श्री केदारनाथ करवीरला वाडी रत्नागिरीला आले. पुढे चैत्र शुध्द

एकादशीला वाडी रत्नगिरीहून औंधला त्या दिव्य स्त्रीला भेटावयास जात. त्या दिव्य स्त्रीला भेटून / तेथील राज्य कारभार पाहून चैत्र वद्य एकादशिस औंधहून – वाडी रत्नागिरीला केदारनाथ परत येत. या दिवसास पाकाळणी म्हणतात. पुढे केदारनाथांना वाडी रत्नागिरीहून औंधला एवढ्या दूर जाणे कठीण होवू लागले. म्हणून श्री केदारनाथानी औंधच्या त्या दिव्य स्त्रीस / गुरु माऊलीस वाडी रत्नागिरीला ''ये माई'' अशी हाक मारली. अंत:करणपूर्वक हाक मारताच ती दिव्य स्त्री वाडी रत्नागिरीला आली. आपल्या गुरुमाऊलीला श्री केदारनाथांनी नयनरम्य अशा वृक्षराजीत डोंगरावर ''यमाई देवी'' म्हणून वसवली.

प्रत्येक रविवारी, चैत्र शुध्द प्रतिपदा, चैत्र शुध्द पौर्णिमा (महायात्रा), श्रावण शुध्द पंचमी, षष्ठी, अश्विन शुध्द दशमी (दसरा) कार्तिक पौर्णिमा, पौष पौर्णिमा, माघी पौर्णिमा हे श्री केदारनाथांचे / श्री ज्योतिर्लिंगाचे उत्सवाचे दिवस आहेत. मुख्य उत्सवात (महायात्रेत) सासन कांठ्या भक्तमंडळी नाचवितात. ३० ते ३५ फूट उंचीची बांबूची काठी असते. काठीच्या शेंड्याला तुरा / कापड बांधलेले असते. बांबूच्या तळापासून चार ते पाच फूटावर एक आडवी फळी मारलेली असते. त्यावर ज्योतिबाचे वाहन घोडा ठेवलेला असतो. यात्रेच्या वेळी या सासन कांठ्या भक्तमंडळी आनंदाने बेहोष होऊन ''चांगभलं'' अशा गर्जनेत नाचवित असतात. सातारा जिल्ह्यातील किवळ गांवच्या नावजी पाटलाच्या सासन काठीस मुख्य मान आहे. चैत्र शुध्द पौर्णिमा हा मुख्य उत्सवाचा दिवस असून, महाराष्ट्र व इतर प्रांतातून सासन काठ्या उत्सवासाठी येतात. श्री ज्योतिबाचे मुख्य वहान घोडा तर उपवाहन शेष नाग, चार हात, प्रत्येक हातात अनुक्रमे खड्ग, अमृत पात्र, त्रिशूळ, डमरु, मस्तकावर गंगा धारण केलेली आहे तर मूर्ती उभी आहे. तर खारीक, गुलाल, दवणा या श्री ज्योतिबास आवडणाऱ्या वस्तू आहेत.



श्री जोतिबा मंदिर (वाडी रत्नागिरी डोंगर)

# राजगुरु सिध्देश्वर स्वामी महाराज यांची माहिती

मराठी संस्कृतीच्या जपणूक करणाऱ्या यादव साम्राज्याच्या वेरुळच्या उत्तरेस आठ कोस ''निधोन बावरे'' नांवाचे एक खेडेगांव आहे. त्या खेडेगांवात रामभटबाबा कृष्णात्री गोत्री एक सात्त्विक ब्राम्हण राहत होते. अंतूर व फलंबरी या दोन गांवचे त्यांच्याकडे पौराहित्य होते. रामभटबाबा हे वेदशास्त्र संपन्न सात्त्विक ब्राम्हण असून जरी व्यवसाय जोतिषी असला तरी स्वभाव निर्लोभी होता. श्री प्रभू रामचंद्र त्यांचे आराध्य दैवत. स्नानसंध्या, पूजा अर्चा, नामस्मरण, ध्यानधारणा यात ते सगळा दिवस घालवीत. त्यांच्या धर्म पत्नीचे नांव गोदावरी होते. पती सेवा, ईश्वर, हरी नामस्मरण, अत्यंत समाधानी अशा त्या थोर पतिव्रता होत्या.

श्री रामभटांना ज्योतिषाचा उत्तम अभ्यास अगवत होता. त्यामुळे ज्योतिषांच्या निमित्ताने लोकांची वर्दळ त्यांच्या घरी अहर्निश होती. त्यांना पहिला मुलगा होता. त्याचे नांव हरिभट होते. त्याचा विवाह झाला होता. सूनही जबाबदारी गृहिणी होती.

श्रीरामभट व गोदाताईना आता संसारातील व्यथा बाजूला ठेवून अध्यात्मिक सुख व शांतता अनुभवयाची होती. कुठं तरी दूर एकांत स्थळी जावून स्वसाधना करायची होती. ईश्वर चरणी एकाग्र व्हायचे होते. यासाठी त्यांनी आपला मुलगा हरिभट व सुनेवर प्रपंचाचा भार सोपवून एके दिवशी सुमुहूर्तावर आवश्यक तेवढे साहित्य घेवून घराचा निरोप घेतला.

मजल दरमजल प्रवास करीत ते कोकणात सागर किनारी असलेल्या हरिहरेश्वरला पोहचले. हरिहरेश्वर हे अत्यंत प्रखर जागृत देवस्थान असून, समुद्र किनारी वसलेल्या अत्यंत रम्य ठिकाणी आहे. पाहिजे तसा एकांतवास या रम्य ठिकाणी रामभटबाबांना येथे मिळाला. हरिहरेश्वराच्या पाठीमागे भैरवनाथाचे मंदिर होते. ब्राम्हमुहूर्तावर उठून स्नानसंध्या आटोपून हरिहरेश्वराची, भैरवनाथाची पूजाअर्चा, वाचन, जप, नामस्मरण, त्रिकाल स्नानसंध्या यात त्यांचा सर्व दिवस जाऊ लागला. होता होता एक तपाचा (बारा वर्षे) काळ त्यांनी श्री हरिहरेश्वर व भैरवनाथांच्या सेवेत अत्यंत आनंदाने घालविला. त्यांच्या या तपाचे फळ त्यांना लवकरच मिळाले. श्री हरिहरेश्वराने स्वप्नात दृष्टांत दिला व आदेश दिला की, ''तुमचे कार्य झालेलं आहे. तुम्ही प्रसन्न चित्ताने घरी जा. तुम्हा उभयतांची पूजा अर्चा / सेवा आमच्या चरणी रुजू झालेली आहे. तुमचे कल्याण आहे.'' या दृष्टांताने श्रीरामभटबाबा व मातोश्री गोदावरीना अतिशय आनंद झाला. आपल्या बारा वर्षाच्या अनुष्ठानाची हरिहरेश्वरला सांगता घालून गांव जेवण घालून ते आपल्या गांवी ''निधोन बावरे'' ला परत आले. ''निधोन बावरे'' या आपल्या गांवी परत आल्यावर लोकांनी / गांववाल्यांनी / त्यांच्या पै पाहुण्यांनी त्यांचे आनंदाने / उत्साहाने स्वागत केले. त्यांच्या खडतर तपश्चर्ये बद्दल धन्योद्‌गार काढले. श्री रामभटजी आता हळूहळू घरातील व्यवहारात / पौराहित्यात लक्ष घालू लागले. लवकरच बारा वर्षाच्या तपश्चर्येनंतर त्यांना शके १६६५ शालिवाहन शके प्रमोदीनाम

संवत्सरात वसंत ऋतू, चैत्र शुध्द पक्षी, श्रीराम नवमी दिवशी, पुनर्वसु नक्षत्र, अतिगंड योग, तैतील करण, मिथुन लग्नी, माध्यान्ह समयी एका बालकाने त्यांच्या पोटी जन्म घेतला. श्री रामभटबाबांनी व सौ.गोदावरींनी या आपल्या दिव्य बालकाचे नांव ''सिध्देश्वर'' ठेवले. सिध्देश्वरा नंतर रामभटांना व गोदावरींना पुढे कन्या झाल्या. अशा तऱ्हेने रामभटांना एकूण २ मुले व ५ मुली झाल्या. त्यांचे घर जणू गोकूळच झाले.

धर्मशास्त्राप्रमाणे सिध्देश्वरांचा व्रतबंध / मुंज झाल्यानंतर लवकरच त्यांचा त्या काळच्या परिस्थितीनुसार लहानपणीच लग्नही झाले. लवकरच या लहान वयात म्हणजेच वयाच्या १२ ते १५ व्या वर्षी ते घर सोडून औरंगाबादला वेद अध्ययनासाठी नाना शास्त्री नावांच्या प्रख्यात पंडिताकडे आले. ते कुशाग्र बुध्दीचे एकपाठी होते. त्यांचा स्वभाव विरक्त, शांत, समाधानी, ईश्वर भक्तित गढून जाणारा होता. लवकरच त्यांची पत्नी वारल्याने ते परत गांवी आले. आता संसाराचा धागा तुटला होता. मन विषण्ण झाले होते. औरंगाबादच्या एका धार्मिक कार्यक्रमात त्यांची कवी मनाचे, श्री ईश्वर भक्तित सदैव रंगलेल्या महान भगवद् भक्त थोर संत श्री अमृतराय यांची गाठ पडली. श्री संत अमृतरायाच्या बरोबर श्री सिध्देश्वर हे त्यांच्या श्रीक्षेत्र पैठण गांवी गेले. श्री अमृतरायांनी श्री सिध्देश्वरांचा शिष्य म्हणून स्वीकार केला. श्री सिध्देश्वरांना मना सारखा गुरु मिळाला व अमृतरायना शिष्योत्तम मिळाला. लवकरच वेद अध्ययन, ईश्वर प्राप्ती बोध संथा पूर्ण करुन श्री सिध्देश्वर हे आपल्या गांवी परतले.

आता श्री रामभटजी व सौ. गोदावरी आई वृध्द झाले होते. परंपरेने आलेले गांवचे जोशीपण त्यांनी श्री सिध्देश्वराकडे सोपविले व अपुरा संसार पुन्हा पूर्ण करणेस सांगितले. निधोन बावरे गांवापासून अकरा कोस असलेल्या ''सुरंगली'' गांवच्या गंगाधरपंत व सौ.लक्ष्मीबाई पाटील यांची कन्या भवानीबाई यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. अशा प्रकारे श्री सिध्देश्वरना पुन्हा एकदा प्रपंचात जाणे भाग पडले. श्री सिध्देश्वर जरी प्रपंचात पडले होते तरी त्यांच्या वृत्तीत व कृत्तीत कांही फरक पडला नव्हता. ते विरक्त होते. स्नान संध्या, ईश्वर चिंतन, वेदाभ्यास यात खंड नव्हता. लवकरच त्यांचे वडील श्री रामभटबाबा वारले. त्यांच्या आई गोदावरीमातेना फारच दु:ख झाले. वडिलांचे वर्ष श्राध्द होताच मनाच्या चित्त शांतीसाठी श्री सिध्देश्वर घरदार सोडून निधोन बावरे सोडून पैठणला आले. त्यांनी आपले गुरु श्री संत अमृतराय यांचा आशीर्वाद व सहवास साधला. श्री अमृतरायांच्या आदेशाने श्री सिध्देश्वर पुढील साधना, विद्या अध्ययनासाठी श्री क्षेत्र काशीला आले. श्री काशी क्षेत्री राहणाऱ्या श्री अमृतराय यांचे गुरुबंधू अद्वैतानंद स्वामी यांच्या आश्रमात राहून पुढील विद्या अध्ययन केले. योगाभ्यास पूर्ण केला. श्री स्वामी अद्वैतानंदाच्या कृपेने श्री सिध्देश्वरला मनोबल, तपोबल, समाधान प्राप्त झाले. त्यांना समदृष्टी साधली. चित्कला प्राप्त झाली, परमानंद प्राप्त झाला, आत्मशांती लाभली. भावसमाधिचा आनंद लाभला. श्री स्वामी अद्वैतानंदाच्या सहवासात दोन वर्षाचा काल व्यतीत करुन त्यांच्या आशीर्वादाने

ते धन्य झाले. श्री स्वामी अद्वैतानंदानी गंगा किनारी समाधी घेतल्यावर ते तीर्थस्थळे हिंडत फिरत, हिमालय पर्वतातील पवित्रस्थलांचे दर्शन घेवून, अनेक साधू संन्याशी, योगी, अवतारी पुरुष यांच्यात कांही दिवस घालवून ते तुळजापूरला आले. बरेच दिवस मुक्काम केला. तेथून सातारा मार्गे कराडला आले. श्रीकृष्णा कोयना संगमात स्नान करुन कृष्णा नदीच्या काठाने प्रवास करीत ''श्री क्षेत्र नृसिंहपूर'' या त्यांच्या मनाजोग्या निवांत स्थळी आले. हे पवित्र स्थळ म्हणजे श्री भगवान लक्ष्मी नृसिंहाचे स्थान षोडषभूजा नरसिंह देव अखंड शाळीग्रामाची पुरुषभर उंचीची भव्य मूर्ती. श्रीनृसिंहमंदिर हेमाडपंथी बांधलेले आहे. मूर्ती भुयारात आहे. श्री सिध्देश्वराला हे स्थान फार आवडले. ध्यान धारणेसाठी हवा असणारा एकांतवास, समोरुन संथ वाहणारी कृष्णानदी यामुळे श्री सिध्देश्वरांनी श्री क्षेत्र नरसिंहपूर ही आपली तपोभूमी, कर्मभूमी मानली. तेथेच त्यांनी ध्यान धारणा, योगसाधना चालू ठेवली. केवळ जन कल्याणार्थ जन्म घेतलेल्या ईश्वरी अंशाच्या श्री सिध्देश्वरांची कीर्ती आसपासच्या पंचक्रोशीत पसरली. त्यांच्या दर्शनाला लोकांची, भाविकांची, आर्ताची गर्दी होऊ लागली.

राधाबाई व्यास, मुरारीभट व्यास, काब्रस सावकार, आलास गांवचे कुलकर्णी व त्यांची पत्नी भीमाबाई, कराड कोळ्याची वेणुताई गुणे, वेणुताईचा उपाध्याय महादेव भट अशी बरीच मंडळी श्री सिध्देश्वरांची शिष्य झाली. श्री नरसिंहपूरच्या पूर्वेस असलेल्या शिरटे गांवाजवळ असलेल्या श्री पशुपतीनाथ मंदिरात श्री सिध्देश्वरांनी एकांतवास करुन ईश्वर चिंतनात नामस्मरणात, जप तपात आपला नित्यक्रम चालवू लागले. शिरटेच्या पशुपतिनाथ मंदिरापासून जवळ असलेल्या कापूसखेड गांवातील काशिपंत कुलकर्णी, कऱ्हाडचे मोरोपंत पेंढारकर, रेठरेच्या माधवराव रेठरेकर, त्र्यंबकराव रेठरेकर बंधू आदी मंडळी त्यांची शिष्य झाली.

श्री नृसिंहपूर, शिरटे पशुपतिनाथ व आसपास भागात ११ वर्षांचा काळ तप साधनेत घालवून श्री सिध्देश्वर आपल्या जन्मगांवी पुन्हा एकदा जाणेसाठी निघाले. कराड, पंढरपूर, सोलापूर, नगर, नाशिक करुन औरंगाबादला आले. आपल्या वृध्द झालेल्या श्रीसंत अमृतरायना भेटून त्यांचा आशीर्वाद घेवून आपल्या ''निधोन बावरे'' गांवी आले. गांवात त्यांचे जंगी स्वागत करणेत आले. घरी आल्यावर त्यांचे थोरले बंधू, भावजय यांना फारच आनंद झाला. परंतु श्री सिध्देश्वरांनी घर सोडल्यावर त्यांच्या मातोश्री गोदावरी या त्यांना शोधायला बाहेर पडल्या त्या पडल्याच. सगळी तीर्थक्षेत्रे, मंदिरे, गिरीकंदरे मातोश्री गोदावरीनी पालथी घातली. परंतु श्री सिध्देश्वराचा शोध त्यांना लागला नाही. परंतू गांवातील पूर्ण वाचासिध्दी असलेला, तपश्चर्यी जमालशहा फकिराने त्यांना सांगितले की ''श्री सिध्देश्वर तुला येवून भेटेल तो योगी आहे. काळजी करु नकोस. उडीदडाळ कालवण व भाकरी मला वाढ. लवकरच तो येईल'' रखम भटजींना मातोश्री गोदावरींच्या ठावठिकाण्याची माहिति होती. श्री सिध्देश्वरांच्या आज्ञेने रखम भटजी करवीर क्षेत्री श्री अंबाबाईच्या मंदिरात आले. त्यांनी मातोश्री गोदावरींची भेट घेतली व

श्री सिध्देश्वर बावऱ्याला आल्याचे सांगितले. मातोश्रींनी श्री अंबाबाईची भरल्या डोळ्यांनी पूजा बांधून नवस पूर्ण करुन रखम भटजी बरोबर बावऱ्याला आल्या. वृध्दत्वाने थकलेल्या आईची गाठ पडल्याने श्री सिध्देश्वरास अतिशय आनंद झाला. घर गोकुळ झाले. श्री सिध्देश्वर ईश्वर शोधात, गुरु शोधात बाहेर पडल्यावर त्यांची मंडळी सौ. भवानीबाई या त्यांच्या माहेर सुरगंली / कळंबसर येथे जावून राहिली होती. त्याही बावऱ्याला परत आल्या. श्री सिध्देश्वर आपल्या आई गोदावरी व पत्नी भवानीबाई यांना घेवून श्री नरसिंहपूरात त्यांची राहण्याची व्यवस्था केली. सर्व लोक, भक्तमंडळी श्री सिध्देश्वरांना गुरु मानून श्री गुरु बुवा महाराज म्हणत. त्यांचा सर्वकाळ ईश्वर चिंतानात जात असे. काबरस सावकार, सिन्नाप्पा, हरभट रेणावीकर, महादेवशास्त्री, विनायक भट, मुकूंदपंत असे भक्त श्री सिध्देश्वर आश्रमाची व्यवस्था पहात होती. श्री सिध्देश्वर स्वामींचा वाडा म्हणजे ''हे विश्वची माझे घर'' झाले होते. त्यांचा सर्व वेळ तपसाधनेत, भक्तांना मागदर्शन करण्यात आनंदाने जात होता. जनसंपर्क आता वाढतच चालला होता. त्यामुळे श्री सिध्देश्वर स्वामींच्या साधनेत अडथळा येत चालला होता. आता त्यांनी मौन धरले होते.

याच काळामध्ये दीनांचे आश्रयदाते श्री भक्तांचे कनवाळू ही कीर्ती ऐकून एक मध्यम वर्गीय घरातील गृहस्थ बाजीपंत श्री सिध्देश्वर स्वामींच्या दर्शनाला आला. श्री स्वामींच्या दर्शनाने तो सुखावला. त्यांच्या सेवेत तो रमला. श्री स्वामींच्या कृपेने त्याचा भग्योदय झाला. त्यावेळी करवीर प्रांती श्री शिवछत्रपती राजे व त्यांच्या मातोश्री जिजाबाईसाहेब यांच्या आज्ञेने येसाजी शिंदे हे सर्व राज्य कारभार पहात होते. येसाजी शिंदे हे खूपच चाणाक्ष व राजकारण धुरंधर होते. ते अत्यंत व्यवहार कुशल होते. माणसांची अचूक पारख त्यांना होती. योगायोगाने श्री स्वामी कृपेने बाजीपंत येसाजी शिंदेकडे कामानिमित्त आले. दारिद्र्याने गांजलेल्या बाजीपंतातील कामाचा प्रामाणिक माणूस हेरला व त्यांना आपला कारभारी म्हणून आपल्या पदरी नोकरी दिली. ''श्री स्वामी कृपेने'' श्री गुरुकृपेने बाजीपंतांना सोन्याचे दिवस आले. येसाजी शिंदे या आपल्या धन्याची बाजीपंताने प्रामाणिकपणे घरचा माणूस म्हणून सेवा केली. एका व्याधीतून पोटदुखीतून बरे व्हायला मदत केली. याच बाजीपंताने आपले धनी येसाजी शिंदे यांना आपले गुरु श्री सिध्देश्वर स्वामींच्या दर्शनाला येता यावे, त्यांना श्री गुरु दर्शन व्हावे, या हेतूने व्यंकटराव सबनीस, आण्णाचार्य यांच्या मदतीने श्री सिध्देश्वर स्वामींना विनंती करुन नरसिंहपूरहून करवीरला आणले. येसाजी शिंदेना फार आनंद झाला. सर्वांनी श्री सिध्देश्वर स्वामींची शोभायात्रा काढली. श्री स्वामींची सबनीस वाड्यात चोख व्यवस्था ठेवली. येसाजी रोज तिन्ही त्रिकाळ दर्शनास जाऊ लागले. त्यांचाही भाग्योदय श्री स्वामी दर्शनाने झाला.

त्याकाळी श्रीमंत महाराज शिवछत्रपती हे करवीरचे राजे त्यांचा मुक्काम पन्हाळगडावर असून तेथून ते कोल्हापूरची गादी व राज्यकारभार चालवीत होते. एकदा त्यांच्या पाठीवर पुटकुळी

उठली व दुखू लागली. हळूहळू त्या पुटकुळीचा आकार वाढतच चालला. सर्व पाठ लाल झाली. असह्य वेदना चालू झाल्या. ते रात्रंदिवस वेदनेने तळमळू लागले. राजवैद्य, वैद्य, हकीम झाले. औषधे, गुटीका, मात्रा, भस्मे झाली. परंतु गुण नाही. महिना झाला. पालथे झोपून सुध्दा वेदना कमी नाहीत. रात्रंदिवस राजे वेदनेने तळमळत होते. दरबारचे सर्व मानकरी, सरदार, रयतही चिंतेत पडले. दिवसें दिवस छत्रपतींचे दुखणे वाढतच चालले. पुटकुळी / फोड फुटेना, अंगास वस्त्र लागू देईना, झोप लागेना, उठून बसणे सहन होईना अशी अवस्था छत्रपतींची होवून बसली. तेही चिंताक्रांत झाले. अशाच एके दिवशी छत्रपतींना किंचीत डोळा लागला होता. इतक्यात त्यांना स्वप्नात दृष्टांत झाला. सुवर्णकांती डोईस शालनामा बांधलेले, अंगावर भरजरी शालजोडी, कासेला रेशीमकाठी धोतर, अंगावर गोपीचंदनाचे टिळे, रामनामाची मुद्रा, एका हातात पळीपंचपात्र, पायामध्ये पादुका, गळ्यात पोवळ्यांची, स्फटिकाची माळ अत्यंत तेजस्वी अशी मूर्ती त्यांच्याजवळ आली व म्हणाली ''आप्पा हे तुला काय झाले आहे? ऊठ चिंता करु नकोस, व्याकुळ होऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे.'' असे म्हणून त्या दिव्य मूर्तीने त्यांच्या पाठीवरुन हात फिरवला, त्यांच्या मस्तकी हात ठेवून ती मूर्ती अंर्तधान पावली. छत्रपती स्वप्नातून जागे झाले. त्यांना खूप आश्चर्य वाटले. दिवाणखान्याचा दरवाजा तर बंद होता. पाठीवरची पुटकुळी / फोड / करट फुटून त्यातून घाण वाहून गेली होती. वेदना कमी होत चालल्या होत्या. छत्रपतींना परम संतोष झाला होता. स्वप्नातील ''आप्पा'' ही हाक त्यांच्या ह्दयात बसली होती. श्री स्वामींचे सोज्वळ रुप त्यांच्या डोळ्यात बसले होते. पण हे दिव्य पुरुष स्वामी कोण? हे त्यांच्या मनात घोळत होते.

छत्रपती या मोठ्या व्याधीतून मुक्त झाले. याचा सर्वांना आनंद झाला आणि आश्चर्यही वाटले. आता आपले स्वप्नात / दृष्टांतात कल्याण करणारे स्वामी कधी भेटतील याचा ध्यासच छत्रपतींना लागला. याच वेळी कारभारी येसाजी शिंदेनी, बाजीपंतांनी छत्रपतींना सबनीस वाड्यात वास्तव्याला आणलेल्या आपले गुरु श्री सिध्देश्वर स्वामींच्या दर्शनाला आणले. स्वप्नात ज्या दिव्य विभुतीने दर्शन दिले. पाठीवरुन हात फिरवला. ज्या हस्तस्पर्शाने पाठीवरील पुटकुळी / फोड गळू फुटला व वेदना नाहिशा झाल्या, त्या दिव्य त्रिमुर्तींना छत्रपतींनी ओळखले व त्यांचे दिव्य चरण धरले. श्री सिध्देश्वर स्वामींना साष्टांग नमस्कार घातला. श्री सिध्देश्वर स्वामींनी त्यांना उठवले व म्हणाले ''आप्पा, सुखरुप आहेस काय'' आप्पा ही श्री गुरुंची वाणी ऐकून छत्रपतींच्या डोळ्यातून अश्रुधारा चालल्या. स्वप्नातील दृष्टांतातील ती हाक व ही हाक एकच होती. हेच ते आपले श्रीगुरु हे छत्रपतींनी ओळखले. श्री सिध्देश्वर स्वामी महाराज यांचे ते शिष्य झाले. श्री सिध्देश्वर स्वामी महाराज आता करवीर संस्थानचे राजगुरु झाले. लवकरच छत्रपतींनी श्री सिध्देश्वर स्वामी महाराजांच्या सर्व परिवाराला नरसिंहपूरहून करवीरला आणून त्यांच्या पायी आपली निष्ठा, श्रध्दा, धन अर्पण केले. छत्रपतींच्या परिवारातील राजघराण्यातील

सर्वांना श्री सिध्देश्वर स्वामींना गुरु करुन घेतले, अनुग्रह घेतला. छत्रपतींच्या करवीर वासियांच्या सर्व सुखात / दुःखात श्री सिध्देश्वर स्वामी महाराजांनी मार्गदर्शन केले, आशीर्वाद दिला, राज्य राखले, सुखी ठेवले.

यानंतर अनेकांचा उध्दार करुन तीर्थक्षेत्र नाशिक, अनेक महत्वाची तीर्थक्षेत्रे आपल्या परिवारासह प्रवास केला व परत कोल्हापूरला आले व राज घराण्याचे गुरु म्हणून वास्तव्यास राहिले. श्री अंबाबाई दर्शन करीत, साधना, तप करीत राहिले. श्री छत्रपती त्यांचे आज्ञेनुरुप वागत. सतत श्री स्वामी सेवेत रहात. अशा प्रकारे राजे श्री गुरु सेवा करीत. छत्रपतींना यश, संपदा, लढाईत जय मिळत गेला.

श्री सिध्देश्वर गुरु महाराज आता थकत चालले होते. ज्या कार्यासाठी त्यांनी अवतार धारण केला होता ते कार्यही संपत चालले होते. अनेक दीन दुबळ्यांना, आर्तांना, मुमुक्षाना त्यांनी ईश्वराबद्दल निष्ठा, भक्ति, प्रेम, शिकवले होते. भक्तिमार्ग सर्वांना दाखविला होता. त्यांचा संसार निष्काम कर्मयोग्याचा होता. त्यांच्या संसारात सर्व शुध्द, सात्विक, पवित्र, प्रेमळच होते. त्यांची मुले बाबा महाराज, नाना महाराज, भाऊ महाराज हे अध्यात्मिक क्षेत्रात पारंगत होती. त्यांच्या दोन्ही कन्या बहिणाबाई (पती आनंदराव आबाजीराव प्रतिनिधी, विशाळगडकर) कृष्णाबाई (पती सदाशिवराव खंडेराव देशपांडे, कडेगांवकर) या अत्यंत सात्विक होत्या. न्यूनता कांहीही नव्हती. गुरुशिष्यांचे पूर्वजन्मीचे ऋणानुबंध परंपरा ध्यानी घेवून श्री सिध्देश्वर स्वामी महाराजांनी अनेकांचा उध्दार केला होता. अनेक भक्तांची संकटे त्यांनी दूर केली होती. करवीरचे छत्रपती राजे शिवाजी यांचे सर्व राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक व वैयक्तिक उध्दाराची गती साधली होती. अनेक जीवमात्रांचा उध्दार करुन शके १७२३ दुर्गती नाम संवत्सर, वसंत ऋतु वैशाख वद्य षष्ठी इंदुवार (इ.स. १८०१) रोजी श्री सिध्देश्वर स्वामी महाराजांनी समाधी घेतली. छत्रपतींनी त्यांची समाधी पंचगंगा घाटावर बांधून त्यांच्या पादुका स्थापन करुन मंदिर बांधले. हे मंदिर १६ मे १८०७ रोजी पूर्णत्वास गेले. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज रोज शुक्रवार पेठेतून पंचगंगा नदीकाठी फिरायला जात त्यावेळी याच सिध्दनाथांचे ते दर्शन घेत.

संदर्भ ग्रंथाचे नांव - **श्रीगुरु सिध्देश्वर कथामृत**
लेखकाचे नांव - **डॉ. एम. आर. कुलकर्णी**
प्रकाशक :- **रामचंद्र पंडित ट्रस्ट, कृष्णानगर, सातारा**





राजगुरु श्री सिध्देश्वर स्वामी महाराज यांची समाधी, पंचगंगा घाट कोल्हापूर

# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय ८ वा ॥



श्री निर्गुण पादुका, गाणगापूर

**▪ विषयसूची....!**

१) विष्णू व दत्ता धारवाडकर
२) रुई (ता. हातकणंगले) येथील तरुण खाच ओलांडून आला.
३) विष्णुपंत चित्रकार (पेंटर)

# अध्याय ८ वा

विष्णू व दत्ता धारवाडकर हे दोघे बंधू गाणगापूर सेवेसाठी तीन वर्षे राहिले होते. साधना करीत होते. काषायवस्त्र परिधान करुन, अंगाला भस्म चर्चन करुन, हाती कमंडलू घेवून भगवान दत्तात्रय यती स्वरुपात त्यांच्या स्वप्नात आले. स्वप्नात विष्णू धारवाडकरला ते म्हणाले ''करवीर क्षेत्री (कोल्हापूर) मी ताराबाईच्या घरी मनुष्य रुपात आहे. तेथे तू सेवेला, दर्शनासाठी ये. पंचगंगा नदीकाठी झाडावरील पाने गोळा करण्याचा खेळ मी करीत असेन, पर्णक्रीडेची मला आवड आहे. त्यावरुन तू माझी ओळख धर'' स्वप्नातील यतीरुपातील श्री दत्तात्रेयाचा आदेश ऐकून गाणगापूर ते कोल्हापूर असा आठ दिवसाचा प्रवास करीत विष्णू व दत्ता धारवाडकर कोल्हापूर पोहचले व पंचगंगा नदीकाठी वास्तव्य करुन राहिले. एके दिवशी स्वामी आपल्या भक्तांना म्हणाले ''विष्णू व दत्ता धारवाडकर हे दोघे भाऊ माझ्या दर्शनासाठी येवून आठ दिवस झाले आहेत. ते पंचगंगा नदीकाठी राहिले आहेत. चला त्यांना भेटू या'' स्वामी आपल्या भक्तांसाठी पंचगंगा नदीकाठी पोहचले. विष्णू धारवाडकर पंचगंगेत स्नान करीत होता. स्वामींनी रामजीला एका झाडावर चढणेस सांगितले व पाने खाली टाकणेस सांगितले. रामजी झाडांची पाने स्वामी सांगतील त्याप्रमाणे खाली टाकू लागला. रामजी स्वामींना विचारुन पान तोडी तेंव्हा स्वामी रामजीला ''हे पान नको, ते पान टाक. ते पान टाकू नको हे टाक'' असा स्वामी खेळ करु लागले. हे पान नको ते पान, ते पान नको दुसरेच पान असा बराच वेळ खेळ / लीला चालू होती.

एवढ्यात स्नान करुन विष्णूपंत तेथे आला. स्वामींच्या पर्णक्रीडेचा खेळ पाहून त्याला पडलेल्या स्वप्नाची आठवण झाली म्हणून त्याने स्वामींच्या बरोबर असलेल्या भक्तांच्या जवळ स्वामींविषयी चौकशी केली. ते बघून स्वामी स्वत:च पुढे झाले व विष्णूपंताला म्हणाले, ''तुला स्वप्नात यतीने / श्री दत्तात्रेयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे तुझ्या ओळखीसाठी मी हा पर्णक्रीडेचा खेळ खेळला आहे. आता तुला माझी ओळख पटली काय?'' स्वामी मुखातील स्वामींचे वचन ऐकून विष्णूपंताला आनंद झाला व आपला भाऊ दत्ता धारवाडकराला बोलावून सांगितले ''गाणगापूरास जे स्वप्न पडले होते, जो दृष्टांत झाला होता, ज्यांची गाठ पडावी, दर्शन व्हावे तीच गुरुमुर्ती आपल्या समोर उभी आहे. त्यांचे दर्शन घेवू या'' स्वामी दर्शनाने विष्णू व दत्ता धारवाडकर यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. आनंदाने ते बेहोश झाले. भक्तांना त्यांनी गाणगापूर येथे पडलेले स्वप्न, श्री भगवान दत्तात्रयाची आज्ञा, गाणगापूर ते पंढरपूर झालेला प्रवास, स्वामींनी केलेली पर्णक्रीडा व स्वामी दर्शन याची माहिती सांगितली. स्वामी कुणाकडून कशी सेवा करुन घेतील याचा कांही तर्क भक्तांना चालेना. विष्णू व दत्ता धारवाडकर यांनी ताराबाईचा मुलगा दत्तोबा यास विनंती केली की, स्वामी सेवेसाठी तुमच्या मठीत / घरात आम्हांला आसरा द्या. दत्तोबानेही त्या दोन्ही भावांना स्वामी सेवेसाठी त्यांच्या घरी / मठीत राहण्याची परवानगी दिली. तिकडे स्वामींनी पर्णक्रीडेचा खेळ बंद केला व रामजीला झाडावरुन

खाली उतरणेस सांगितले. सर्व भक्तांना स्वामी म्हणाले ''विष्णू व दत्ता हे दोघे भाऊ तुम्हाला नवीन सेवेकरी वाटतील. परंतु ते जुनेच माझे भक्त आहेत.'' स्वामींच्या बरोबर विष्णूपंत व दत्ता दोघे भाऊ मठीत चालत आले. अशा रीतीने पर्णक्रीडेचा / पान खेळ पुरा झाला. श्री भगवान दत्तात्रेयाच्या आज्ञेने विष्णू व दत्ता कोल्हापूरला आले त्यांचे आजन्म सेवक राहिले.

इचलकरंजी जवळ रुई नांवाचे खेडेगांव आहे. त्या खेडे गांवातील एक तरुण पुढील इंग्रजी शिक्षणासांठी कोल्हापूरला राहिला होता. तो श्रध्देने / मनोभावाने रोज स्वामींचे दर्शन घेई. स्वामींच्या दर्शनाने त्याचे शिक्षण व्यवस्थित चालू होते. वर्षाला उत्तम रीतीने उत्तीर्ण होत होता. स्वामींचे दर्शन तो कधीही चुकवत नसे. एकदा कांही कामानिमित्त त्याला पन्हाळ्याला जायचे होते. नेहमी प्रमाणे तो स्वामींच्या दर्शनाला आला. दर्शन घेतले व पन्हाळ्यास जाणेची परवानगी / आज्ञा मागितली. परंतु स्वामी काहीच बोलले नाहीत. त्यांनेही फारसे लक्ष दिले नाही व तो पन्हाळ्यास गेला. तेथील काम आवरणेस उशीर झाला. परतणेस उशीर होईल व त्यामुळे सायंकाळचे नेहमी प्रमाणाचे स्वामी दर्शन होणार नाही याची त्याला चुटपुट लागली. आडवाटेने गेल्यास कोल्हापूरला लवकर पोहचू व नित्य नियमाचे सायंकाळचे स्वामींचे दर्शन घडेल या विचाराने तो आडवाटेने कोल्हापूरला येवू लागला.

मुळात संध्याकाळ झाली होती. डोंगर जंगलातील ती पायवाट यातच तो तरुण रस्ता चुकला. रात्र होवू लागली, वाट नीट दिसेना, त्यातच आडवा मोठा ओहळ लागला. त्यामुळे तो घाबरुन गेला. स्वामींनी पन्हाळ्याला जाण्याची आज्ञा दिली नव्हती. परवानगी दिली नव्हती, तरी आपण पन्हाळ्याला गेलो ही आपली चूक झाली असे त्याला वाटू लागले. तो दुर्दैवाला दोष देवू लागला. नियमाचे संध्याकाळचे / रात्रीचे स्वामी दर्शन चुकणार याचे त्याला वाईट वाटू लागले व स्वामींचे नामस्मरण करीत ओहळाच्या एका टोकाला बसून राहिला. एवढ्यात ओहळाच्या पलिकडे एक स्त्री त्याला दिसली. त्या स्त्रीनेच त्याला विचारले ''तू कोण कुठला? या आडमार्गाला कसा आलास, रस्ता चुकला आहेस काय? मला सर्व सांग'' त्या तरुणाने त्या स्त्रीला सांगितले ''माझे काम पन्हाळ्याला होते. माझे घर कोल्हापूरात आहे. स्वामींचे दर्शन चुकू नये म्हणून राजरस्ता सोडून कोल्हापूरला लवकर पोहचावे म्हणून या आड वाटेने आलो आहे. माझा रस्ता चुकला आहे. पाण्याने / चिखलाने भरलेला हा ओढा / ओहळ लागला आहे. रस्ता चुकला आहे म्हणून मी येथे थांबलो आहे'' या आडरानी, अवेळी त्या स्त्रीला बघून घाबरुनच त्याने त्या स्त्रीला विचारले. ''या अवेळी या आडमार्गी तू कुठे निघाली आहेस? तू कोण आहेस ?'' यावर ती स्त्री म्हणाली ''मी गौळण आहे. दूध घालून घराकडे निघाली आहे. माझी वाट बघून बरोबरच्या गौळणी पुढे गेल्या आहेत. त्यामुळे मी एकटीच मागे राहिली आहे. मीही वाट चुकली आहे. तुझा हात दे इकडे ओहळाच्या / ओढ्याच्या अलीकडे ओढून घेते'' म्हणून तिने हात लांबविला. त्या तरुणानेही तिच्या हातात हात दिला. त्या स्त्रीने त्याला अलगद खाचेच्या / ओहळाच्या / ओढ्याच्या अलीकडे ओढून घेतले. ती स्त्री निघून गेली. त्या तरुणाने पाहिले

ती खाच पाणी चिखलाने भरलेली होती. खाच बारा हात रुंदीची (१८ ते २०फुट) होती. त्या स्त्रीने त्याला अलिकडे कसे ओढून घेतले याचे त्याला आश्चर्य वाटले. अद्भूत वाटले. ती स्त्री नसून, प्रत्यक्ष स्वामीच या प्रसंगातून सोडविण्यासाठी आले असे त्याला वाटले. लगबगीने तो कोल्हापूरात आला व स्वामींच्या दर्शनाला अधिर होवून गेला. त्याला पाहताच स्वामी म्हणाले, ''खांच ओलांडून आलास काय, सुखरुप आहेस काय?'' हे स्वामींचे अंतरसाक्षित्वाचे बोलणे ऐकून त्याला आश्चर्य वाटले. आज्ञा मोडल्याचे दु:खही झाले व तो स्वामींना म्हणाला ''माझ्यासाठी तुम्हांला कष्ट पडले. गौळणीच्या रुपात येवून माझी त्या प्रसंगातून सोडवणूक केली. आता तुमचे चरण मी कधीही विसंबणार नाही / विसरणार नाही'' असे म्हणत त्याने स्वामींच्या पायांना मिठी घातली.

कोल्हापूरात राजदरबारात विष्णूपंत नांवाचे चित्रकार (पेंटर) काम करीत होते. इमाने इतबारे काम करीत होते. सकाळी लवकर स्नानसंध्या आटोपून श्री स्वामींचे दर्शन घेवून मगच ते राजदरबारात कामावर हजर होत. श्री स्वामींचे दर्शन ते रोज नित्य नियमाने घेत. त्या काळी चिंचली गांव हे कोल्हापूर संस्थानच्या अखत्यारीत होते. श्री महांकाली (मायाक्का) देवीची यात्रा पुरातन काळापासून तेथे भरते. देशभरातून अनेक भक्त या मायाक्का देवीच्या दर्शनाला चिंचणीला येतात. अशा या यात्रेचे हुबेबुब चित्र, सुंदर चित्र काढून आणण्याची राजाज्ञा विष्णूपंताला झाली. विष्णूपंत मायाक्का देवीच्या चित्र काढण्यासाठी चिंचणीला गेले. परंतु दुर्दैवाने त्यांच्या हाताला कांपरे भरल्यामुळे त्या यात्रेचे चित्र हुबेहुब रेखाटत आले नाही. त्यामुळे ते चित्र राजदरबारातील राजाला आवडले नाही. राजाने त्यांना कामावरुन कमी केले.

नोकरीवरुन काढल्यामुळे आता संसाराचे काय होणार? मुलाबाळांचे काय होणार? पोटपाणी कसे चालणार या विचाराने विष्णुपंताचे मन भरकटून गेले. नेहमी प्रमाणे श्री स्वामींच्या दर्शनाला गेल्यावर विष्णुपंताने दैवगतीचे फासे उलटे पडल्याने, दैवगती फिरल्याने नोकरी गेल्याचे व संसाराचे काय होणार याचे सर्व स्वामींच्या कानावर घातले. श्री स्वामींनी विष्णुपंताला अभय दिले व म्हणाले ''कशाला जुन्या वस्त्राचा मान पाहिजे? कशाला जुनी नोकरी पाहिजे? जुन्या नोकरी पेक्षा नवीन चांगली नोकरी देतो. घाबरु नको'' असे म्हणून श्री स्वामींनी मूठभर तांदूळ विष्णुपंताच्या ओंजळीत टाकले. पुढे लवकरच श्री स्वामींच्या आशीर्वादाने विष्णुपंताला चांगल्या पगाराची नवीन नोकरी मिळाली व पुन्हा त्याचा संसार व्यवस्थित चालू लागला. पगार चांगला बऱ्या पैकी असल्याने पैसाही शिल्लक राहू लागला. पैसा शिल्लक राहू लागल्याने, धन संचय होवू लागल्याने विष्णुपंताने श्री स्वामींना विचारुन मध्यवस्ती / गजबजलेली वस्ती सोडून कोल्हापूरच्या बाहेर नवीन घर विकत घेतले व त्या घरात मुलाबाळांसह राहू लागला. परंतु एक एक वेळा विष्णुपंताचे मनात आपण गांवाबाहेर राहतो तेंव्हा दरोडेखोर / चोर यांचा आपणास त्रास होईल काय? अशी शंका येवून भीती वाटत असे. मनातील शंका तो श्री स्वामींनाही बोलून दावी. एकदा विष्णुपंत नेहमीप्रमाणे श्री स्वामी दर्शनाला गेला असता श्री स्वामी त्यास म्हणाले ''आज

रात्री मी तुझ्या घराकडे येणार आहे. तुझे रक्षण करण्याला मी समर्थ आहे. भिऊ नकोस'' त्या दिवशीच्या रात्रीच कांही चोर विष्णुपंताच्या घरी मागच्या दाराला चोरी करण्यासाठी आले. परंतु त्या चोरांच्या कानांवर ''धरा धरा'' असा आवाज आला. तो आवाज ऐकून चोरी न करताच चोर घाबरुन पळून गेले. कोणी तरी गस्तवाले पकडण्यास येत आहेत असे वाटून चोर पसार झाले. चोरांच्या गलबल्याने विष्णुपंत जागा झाला व घराबाहेर आला. गस्तवाले त्याला दिसले नाहीत परंतु चोर मात्र पळून गेल्याचे त्याच्या लक्षात आले. मनातल्या मनात त्याने श्री स्वामींचे आभार मानले.

दुसऱ्या दिवशी श्री स्वामींच्या दर्शनाला नित्यनियमाप्रमाणे गेल्यावर स्वामी त्याला म्हणाले ''सगळे व्यवस्थित आहे काय? काल रात्री चोराचा काय त्रास झाला काय ? सांग मला'' यावर विष्णुपंताला गहिंवरुन आले व तो श्री स्वामींना म्हणाला ''माझ्यासाठी तुम्ही गस्तवाल्याचे रुप धारण करुन आलात, चोरांना पळवून माझ्या बायका मुलांचे, संपत्तीचे रक्षण केलात हे उपकार कुठे फेडू. माझ्यावर तुमचे अनंत उपकार आहेत. तुम्ही माझे परमेश्वर आहांत. परमेश्वराचे अवतार आहात. तुमची महिमा मी सर्व लोकांना सांगत राहीन'' असे म्हणत त्यांने श्री स्वामींच्या चरणाला अश्रूंचा अभिषेक घातला व पाय घट्ट धरले.

कडक उन्हाळ्याचे दिवस होते. श्री स्वामी शेज घरात दोनप्रहरी विश्रांती घेत होते. सेवक मंडळी शेज घरात बसली होती. तर कांही सेवक मंडळी नामस्मरण मग्न होती. ताराबाईच्या घराच्या मागील दाराला असणाऱ्या औदुंबराच्या झाडाखाली श्री स्वामींचा भक्त कृष्णा लाड हा दोनप्रहरी नैवेद्याची भांडी घाशीत होता. इतक्यात आभाळ काळ्या ढगांनी भरुन गेले. पाऊस सुरु झाला. विजेचा कडकडाट चालू झाला. विजेच्या कडकडाटाने धरणी कांपू लागली. जोराचा वारा, जोराचा पाऊस यातच वीज पडल्याचा कडकडाट ऐकून घाबरुन कृष्णा लाड भांडी घासण्याचे काम सोडून आंत येवून थांबला. पाऊस बंद होताच पुन्हा तो भांडी घासू लागला. एवढ्यात कानठळ्या बसविणारा वीज कडाडल्याचा आवाज आला. औदुंबराच्या झाडाखालील भांड्या भोवती वीजेचा लोळ फिरु लागल्याचे पाहून लाडला वाटले कांही तरी विपरीत घटना घडून अनर्थ होणार या विचाराने घाबरुन गेला. एवढ्यात त्याने पाहिले विजेचा लखलखता लोळ शेजघरात गेला व श्री स्वामी चरणांना नमन करुन परत आकाशात गेला. मग प्रचंड आवाज झाला. वीज धरणीवर येताच प्रचंड हनी करते. परंतु शेज घरातील श्री स्वामींच्या दर्शनाने ती पुनरपि आकाशात कशी परत गेली? तिने कसल्याही प्रकारची हनी केली नाही. उलट श्री स्वामी चरणा जवळ नमली याचे कृष्णा लाडाला अतिशय आश्चर्य वाटले. विस्मय वाटला व मनातल्या मनात तो श्री स्वामींच्या अतर्क्य शक्तिचे गुणगान करु लागला.

*****

# स्व. अनंत भिकाजी कुलकर्णी, रुई यांची माहिती

रुई गांवचा एक तरुण कोल्हापूरला शिक्षण घेणेसाठी राहिला होता. कुंभार गल्लीतील पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंच्या घरी वास्तव्याला असलेल्या श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज / स्वामी यांच्या दर्शनाला नियमित जात असे. श्री स्वामींच्या कृपेने दरवर्षी तो परीक्षा उत्तीर्ण होत असे पुढे शिक्षण चालू होते. एकदा त्याला पन्हाळ्याकडे एका कामासाठी जायचे होते. त्याने श्री स्वामींची परवानगी मागितली. परंतु श्री स्वामींनी परवानगी दिली नाही. त्यानेही परवानगीचा फारसा विचार केला नाही. पन्हाळ्याकडील कामासाठी श्री स्वामींची परवानगी नसतांना तो गेला. तिकडील सर्व काम आटोपून लवकर कोल्हापूरला परतून नेहमी प्रमाणे श्री स्वामी दर्शन घेण्यासाठी त्याने राजरस्ता सोडून आड मार्गाने परतू लागला. एवढ्यात अवेळी जोराचा पाऊस चालू झाला. सायंकाळच्या अंधारामुळे त्याचा रस्ता चुकला व वाटेत खाच (ओढा) लागली, ओढा लागला. अवेळी पावसाच्या पाण्याने ओढा वहात होता, चिखलाने भरलेला होता. आता त्याला भयाने ग्रासले की, हा आता ओढा कसा ओलांडायचा? नियमितपणे घडणारे/होणारे श्री स्वामींचे दर्शनही चुकणार या विचारानेही तो दु:खी झाला. एवढ्यात त्याला ओढ्याच्या पलिकडे एक स्त्री दिसली. यानेच तिला तू कोण? कुठली? विचारण्याऐवजी तिनेच त्याला विचारले ''या वेळी तू इथं कसा?'' त्याने वाट चुकल्याचे सांगितले. तसेच त्याने भीतीने तिला विचारले ''तू कोण? कुठली?'' त्यावेळी ती स्त्री त्याला म्हणाली ''मी गौळण असून दूध घालायला गेले होते. सोबतच्या गौळणी मी येत नाही असे वाटून पुढे निघून गेल्या आहेत. मला उशीर झाल्याने आता निघाले. हात पुढे कर तुला अलिकडे घेते'' म्हणून तिने हात लांबविला. क्षणाचा विचार न करता त्याने तिच्या हातात हात दिला. त्या स्त्रीने त्याला ओढ्याच्या अलिकडे ओढून घेतले व ती स्त्री निघून गेली. तो ओढा अठरा हात रुंद होता. त्या युवकाला याचे आश्चर्य वाटले. त्या स्त्रीने आपला बोजा कसा पेलला? याचेही आश्चर्य वाटले व भीतीही वाटली. तडक तो कुंभार गल्लीत नेहमी प्रमाणे रात्री दर्शनाला आला. दर्शन घेताच श्री स्वामी त्याला म्हणाले ''खाच ओलांडून सुखरुप आलास?'' त्या तरुणाच्या मग लक्षात आले की खाचेच्या अलिकडे हात देवून ओढून घेणारी ती स्त्री गौळण नसून आपल्यासाठीच श्री स्वामींनी गौळणीचे रुप घेवून, खाच पार करुन दर्शनाचा नियम कायम राखला. त्या युवकाचे डोळे भरुन आले. पुन्हा पुन्हा त्याने श्री स्वामींची स्तुती करुन दर्शन घेतले. जन्मभर तो त्यांच्या सेवेत राहिला. हा तरुण म्हणजे रुई (ता. हातकणंगले) येथील स्व अनंत भिकाजी कुलकर्णी होय. रुई गांवात परंपरागत पाटील व कुलकर्णी ही दोन्ही घराणी पन्हाळ्या जवळच्या रेवाळे गांवचे. ही दोन्ही घराणी भारद्वाज गोत्री ब्राम्हण यांची मूळ घरे, शेतीवाडी रेवाळ्याला आहेत. रुईला आल्यानंतर पाटील व कुलकर्णी या घराण्यातील पराक्रमी लोकांनी रुईच्या यवन सत्तेचा पराभव केला व रुई गांवची पाटीलकी व कुलकर्णी वतनदारी सांभाळली. स्व. भिकाजी कुलकर्णी हे रुई

गांवचे वतनदार कुलकर्णी होते. ते सात्त्विक व धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना अनंत व नारायण ही दोन मुले. यातील स्व. अनंत (अंतोबा) हे कोल्हापूरला शिक्षणासाठी होते. ते कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या / स्वामींच्या दर्शनाला न चुकता जात. अंतोबांची श्री स्वामींच्या वर पूर्ण श्रध्दा होती. श्री स्वामींची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. पन्हाळ्या जवळच्या रेवाळे गांवातील शेतीवाडी ते बघत / करीत. खाच ओलांडून, ओढा ओलांडून सुखरुप परत येण्याची घटना ही रेवाळ्यातील शेतीचे काम करुन परत कोल्हापूरला येताना घडली आहे. अनंतरावाचे मातृपितृ छत्र लहानपणीच हरवले होते. पुढे ते शिक्षकांचे/तलाठीचे काम करुन उदर निर्वाह चालवीत. कुंभार गल्लीतील श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची/श्री स्वामींची अनंतरावावर कृपा होती. त्यांना वाचासिध्दी प्राप्त होती. त्यांचा ज्योतिष - पंचाग शास्त्राचा गाढा अभ्यास होता. त्याकाळी ते आसपासच्या खेड्यातील प्रसिध्द ज्योतिषी होते. लोकांच्या ते आपल्या परीने समस्या सोडवत, मार्गदर्शन करत. ते ब्रम्हचारी होते. शेवटी शेवटी ते रुईलाच स्थाईक झाले. रुईहून  रेवाळ्याला जाऊन येवून शेती बघत. गांवातील श्री व्यंकटेश व श्री नृसिंह मंदिरातील सर्व पूजा अर्चा उत्सव हे अनंतराव व त्यांचे बंधू नारायण हे करीत / चालवत. वंश परंपरेने आजही या दोन्ही देवस्थानची पूजा पाठ स्व. अनंतराव व नारायण कुलकर्णी यांच्या घराण्यात चालू आहे. अनंत भिकाजी कुलकर्णी हे दि. २७/४/१९६१ रोजी वारले आहेत. नारायण भिकाजी कुलकर्णी हे ही आता वारले असून, त्यांना रामचंद्र, केशव (देवजी), व गोपाळकृष्ण ही तीन असून ते आता रुईलाच स्थाईक आहेत.



श्री लक्षतीर्थ सरोवर, कोल्हापूर

# सिध्दपीठ अलंकापुरी (श्री क्षेत्र आळंदी)

ज्ञानेश्वरांच्या वास्तव्याने आणि समाधि स्थानामुळे वारकरी वैष्णवांना प्रिय अलंकापुरी अथवा आळंदी हे एक सिध्दपीठ म्हणून प्राचीन काळापासून ओळखले जाते. येथील ग्रामदैवत सिध्देश्वरासही ज्ञानेश्वर चरित्रात फार महत्वाचे स्थान मिळाले आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच्या काळीही आळंदी हे एक शिवपीठ म्हणून प्रसिध्द होते. अलंकापुरीस आनंदवन असेही नाव त्यावेळी होते. प्राचीन काळी हा प्रदेश अरण्यमय होता ।। प्रकटोस्मिन्महाक्षेत्रे आनंदाख्य महावने। नास्ति नास्ति समक्षेत्रं त्रैलोक्य पावने स्मृतम् ।। असे शंकरांनी म्हटल्याचे सह्याद्रिखंडात आले आहे. या प्राचीन सिध्दपीठास कृतयुगात आनंदवन, त्रेतायुगात वारुण, द्वापारात कपिल आणि कलियुगात अलका, अशी नावे मिळाल्याची हकीकत पुराण कथांतून आढळते. नंतरच्या काळात हे सिध्दपीठ वैष्णवांना वैकुंठपीठ म्हणून मान्य झाले. भूमिनामें वैकुंठपीठा । ते हे अलंकापुरी श्रेष्ठा । आदि वरिष्ठापीठ अठरा ।। या ओवीप्रमाणे नामदेवांना आळंदी हे क्षेत्र अठरा पीठांत श्रेष्ठ वाटते. अलंकापुरी हे शिवपीठ । पूर्वी येथे होते नीलकंठ। ब्रम्हादिकी तप वरिष्ठ । येथेचि पै केले ।। अशीही माहिती नामदेव देतात. या जुनाट शिवपीठाचे रुपान्तर विष्णुरुपी ज्ञानेशांच्यामुळे वैकुंठपीठात झाले हे नाथपंथाच्या हरिहरऐक्यास धरुनच झाले. जुनाट पै वैकुंठपीठ। पूर्वी येथे होते नीलकंठ । ब्रम्हा, विष्णु, रुद्र, इंद्र । ते हे शिवक्षेत्र प्रत्यक्ष ।। अशी महती या पीठाची गाइली जाते.

आळंदीची पंचक्रोशीही शिवस्थानांनी विभूषित आहे. पूर्व दिशेस मरकळ- जवळ मातुलिंग व केशवराज, दक्षिणेला पुण्यात नागेन्द्रीकाठी नागेश्वर, पश्चिमेस इंदोरीस ब्रम्हेश्वर, उत्तरेस खेड अथवा राजगुरुनगरला सिध्देश्वर, अशा पवित्र स्थानांमुळे आळंदीचा परिसर प्राचीन काळापासून देवदैवतांनी गजबजलेला आहे. संत एकनाथांनी या पीठाचे वर्णन करताना म्हटले आहे-

**सिध्देश्वर स्थान दरुषनें मुक्ती। ब्रम्हज्ञान प्राप्ती वटेश्वरी ।।**
**चौऱ्यांशी सिध्दांचा सिध्दबेटीं मेळा । प्रत्यक्ष स्थापिला कल्पवृक्ष ।।**
**तयासी घडतां नित्य प्रदक्षिणा । नाही पार पुण्या वास स्वर्गी ।।**
**अमृतमय वाहे पुढे इंद्रायणी । भागीरथी आदिकरुनी तीर्थराज ।।**

काशी, गया, प्रयाग, इत्यादि क्षेत्रांपेक्षा आळंदी श्रेष्ठ, अशी श्रध्दा सर्वत्र दिसते. ज्ञानेश्वर मंदिराचा देऊळवाडा, हैबतरावबाबाची पायरी, गरुड, हनुमंत, सभामंडप, समाधिमंदिर, वा गर्भागार, गणेश मंदिर, मुक्ताबाई मंदिर, सिध्देश्वर मंदिर, अजानवृक्ष, सुवर्णाचा पिंपळ, नाथांचा पार, भोजलिंगकाका; अशा अनेक महत्वाच्या स्थानांशी लक्षावधी साधकांच्या भावना गुंतलेल्या आहेत. महाराष्ट्रातील नाथसंप्रदाय प्रवर्तक ज्ञाननाथ येथेच जिवंत स्वरुपात वावरत असल्याची श्रध्दा त्यांची आहे.

संदर्भ ग्रंथाचे नाव- **नाथ संप्रदाय उदय व विस्तार**
लेखकाचे नाव - **डॉ. प्र. न. जोशी**

## ।। अध्याय ९ वा ।।



श्री क्षेत्र औदुंबर

### ▪ विषयसूची....!

१) आळत्याची येसुबाई
२) स्वामीभक्त हरिपंत शिदनेर्लीकर
३) एका भक्ताचे अपत्य प्राप्तीचे पेढे

# अध्याय ९ वा

कोल्हापूर ते हातकणंगले दरम्यान आळते हे खेडेगांव आहे. या आळते गांवात येसूबाई नांवाची विधवा बाई रहात होती. तरुणपणीच वैधव्याची कुऱ्हाड पडल्याने ती आपल्या माहेरी वडिलांच्या घरी रहात असे. कीर्तन ऐकणे, पुराण ऐकणे, हरी भजन ऐकणे यात ती आयुष्य घालवीत होती. काळ घालवीत होती. कीर्तन ऐकणे, पुराण ऐकणे, हरिभजनात वेळ घालविणे यातून तिला वेळोवेळी वाटू लागले की आपण गुरु करावा, गुरु कडून मंत्र दीक्षा घ्यावी. आळत्याला येणाऱ्या कीर्तनकारांना / पुराणिकांना भेटून ती गुरु कसा मिळेल याची चौकशी करु लागली. परंतु ते जे सांगत ते तिच्या मनाला पटत नसे. त्यामुळे गुरु करून घेण्याची तिची इच्छा कांही पुरी होईना. असा बराच काळ गेला. एके दिवशी पंढरपूरचा एक प्रवासी ब्राम्हण तिच्या घरी आला व दोनप्रहरचे भोजन मिळेल कां असे विचारु लागला. येसूबाईने त्यांना सांगितले, ''स्नान करुन या मी तुमच्या भोजनाची तयारी करते'' यावर तो पंढरीचा ब्राम्हण आपल्या घरी आल्याचे पाहून येसूबाईला आश्चर्य वाटले व प्रत्यक्ष पांडुरंगानेच हा प्रवासी ब्राम्हण आपल्या घरी भोजनास पाठविला आहे असे तिला वाटले. उत्तम प्रकारच्या भोजनाने त्या प्रवासी ब्राम्हणाचे मन समाधान झाले. क्षेम खुशाली नंतर त्या प्रवासी ब्राम्हणाने येसूबाईला अस्वस्थतेचे कारण विचारले. त्यावर येसूबाई त्या ब्राम्हणाला म्हणाली, ''या नर जन्मात गुरु करुन मोक्ष मिळावावा असे मनाला वाटते. परंतु मला ब्रम्हचारी गुरु भेटावा असे वाटते'' तिचे बोलणे ऐकून मनातील खळबळ बघून तो प्रवासी ब्राम्हण तिला म्हणाला ''कार्तिक महिन्यातील सोमवारी तुला ब्रम्हचारी गुरु भेटेल, मिळेल. गुरु भेटीची पत्रिका / निरोपही तुला मिळेल'' असे सांगून त्या प्रवासी ब्राम्हणाने येसूबाईचा निरोप घेतला. पुढे कांही दिवस गेले.

पंढरपूरच्या त्या प्रवासी ब्राम्हणाने सांगितलेला गुरु भेटीचा कार्तिक महिनाही जवळ आला. गुरु भेटीचा निरोप / पत्र वगैरे कांहीही येसूबाईला आले नाही. त्यामुळे तिला चुटपूट लागली. यावेळी तिच्या वडिलांना न्यायालयाचे कामकाज लागले. त्यामुळे त्यांना कोल्हापूरला जाणे भाग पडले. तिचे वडिल तिला म्हणाले ''न्यायालयाचे / कोर्टाचे काम आहे. या कामासाठी आठ दिवस लागणार आहेत. आपण कोल्हापूरला जावू या'' येसूबाईला घेवून तिचे वडिल कोल्हापूरला आले. त्यांचे एक बंधु कोल्हापूरात रहात होते. त्यांच्या घरी राहण्यासाठी उतरले. दुसऱ्या दिवशी वडिल न्यायालयाच्या/कोर्टाच्या कामासाठी बाहेर गेले. तिच्या चुलत्याच्या घरातील कांही स्त्रिया व पुरुष मंडळी जवळच असलेल्या ताराबाईच्या घरी असलेल्या दत्त रुपात अवतरलेल्या स्वामींच्या दर्शनाला निघाली. त्यांच्या बरोबर येसूबाईही ताराबाईच्या घरी दत्त दर्शनाला आली. त्या गर्दीत येसूबाई दिसताच स्वामी तिच्या पुढे उभे राहिले व म्हणाले ''आज कार्तिकातील सोमवार आहे. तुला याच दिवशी गुरुमंत्र पाहिजे होता. गुरुही तुला ब्रम्हचारी पाहिजे होता. आता तुझी गुरुप्राप्तीची इच्छा पूर्ण करुन घे.'' ते स्वामींचे बोल ऐकून येसूबाई विस्मय चकित झाली. कधी न पाहता आठवण करून दिली होती. ब्राम्हणाने जो

गुरुप्राप्तीचा कार्तिक महिन्यातील सोमवार याचीही आठवण करून दिली होती. या पूर्वी आपल्याकडे जो पंढरपूरचा प्रवासी ब्राम्हण आला होता तो दुसरा तिसरा कोण नसून कधी न बघता त्या पंढरपूरच्या प्रवासी कोणी नसून हे स्वामी / सदगुरु त्या ब्रम्हचारी रुपात आले होते याची तिला खात्री पटली. काय थोर आपले भाग्य असे तिला वाटू लागले. तिने ब्रम्हचारी स्वामींना गुरु करुन आपल्या जीवाची तळमळ शमविली. आपले भाग्य जागविले. न्यायाच्या/ कोर्टाच्या कामाचे पत्र / निरोप हाच गुरुप्राप्तीचा निश्चित दिवसाचा निरोप असे तिला वाटले. येसूबाई येथून स्वामीसेवेत / गुरुसेवेत काळ घालवू लागली.

हरिपंत शिदनेर्लीकर हा स्वामींचा भक्त होता. हा ब्राम्हण उच्च समाजातील असल्याने तो इतर भक्तांना कमी लेखत होता. तुच्छ मानीत होता. त्याच्या मनात नेहमी कुटिल विचार येत, कुटिल मनाचा होता. हरिपंताचा कुटिल स्वभाव स्वामींना आवडत नव्हता. एक एक वेळा हरिपंताची स्वामींना कीव येई. वेळ आल्यावर अनुभवानेच त्याला जागृत करु असे स्वामी म्हणत. एकदा हरिपंत शिदनेर्लीकरांना वाटले की, स्वामींनी आपल्या घरी पायधूळ झाडावी, भोजनास यावे तसे त्याने स्वामींना सांगून विनवणी केली. यावर स्वामी त्याला म्हणाले ''तुझे मन निर्मळ असेल, निर्मळ मनाने, खुल्या मनाने भिक्षेचे आमंत्रण दिले असशील तरच मी भिक्षेला आनंदाने तुझ्या घरी येईन.'' स्वामींचे बोलणे ऐकून हरिपंताला वाटले स्वामी आपल्या घरी पायधूळ झाडणार, भिक्षेला येणार. हरिपंताने पंचपक्वान्नाचा बेत करुन फक्त ब्राम्हण भक्तांना भोजनाचे आमंत्रण देवून दळवी व लाड यांना हलक्या जातीचे मानून त्यांना भोजनाला बोलविले नाही.

हरिपंताचे हे कुटिल कृत्य स्वामींनी अंतर्ज्ञानाने ओळखले. इतक्यात दळव्याने गांवभर भिक्षा मागून झोळी आणली. ते पाहून स्वामींना हरिपंताची भिक्षा / भोजन टाळण्यास चांगली संधी आल्याचे वाटले. दळव्याला स्वामी म्हणाले ''चल लवकर झोळी सोड. जी भिक्षा आणली आहेस त्यातील अन्न मला भरव. मला भूख लागली आहे.'' ते ऐकून झोळीतून आणलेल्या भिक्षेचे अन्न दळवी स्वामींना खाऊ घालू लागला. भरवू लागला. स्वामीही दळव्याने आणलेले भिक्षेचे अन्न आनंदाने खाऊ लागले. ही भिक्षा त्यांना रुचकर लागली. दळव्यालाही भिक्षेचे अन्न भरवतांना आनंद वाटू लागला. एवढ्यात पंचपक्वान्नाची तयारी करुन हरिपंत शिदनेर्लीकर स्वामींना घरी पायधूळ झाडण्यासाठी भिक्षेला येण्यासाठी बोलविण्यासाठी ताराबाईच्या घरी गेला. परंतु दळव्याने आणलेले भिक्षेचे अन्न ग्रहण करीत असलेल्या स्वामींना पाहून त्याला फार वाईट वाटले व त्याच्या मनात विचार आला की, ''एवढे आपण खर्च करुन पंचपक्वान्नाचे जेवण तयार केलेले अन्न फुकटचे गेले'' एवढ्यात स्वामी हरिपंताला म्हणाले ''तुमचे सोवळे तुमच्या बरोबर. जरी ओवळे असलेले ब्राम्हण नसलेले माझे भक्त मला प्रिय, त्यांनी आणलेली भिक्षा मला प्रिय. मी भिक्षेला / भोजनाला येत नाही.'' यावर हरिपंताने दळवी – लाड यांनाही भोजनाचे आमंत्रणही दिले. स्वामी, लाड, दळवी यांना परोपरीने भिक्षेला

/ भोजनाला येण्याची विनंती केली. परंतु ही विनंती त्यांनी मान्य केली नाही. निराश होऊन, उपरती होवून हरिपंत परत आला. पुढे मनातून त्याने गुरुबंधू विषयी असणारा मत्सरभाव सोडला, सर्वांना मनापासून गुरुबंधू मानू लागला, मनात समता वागवू लागला.

कोल्हापूरात ताराबाईच्या घरी येवून एके दिवशी एक गृहस्थ पेढे वाटू लागला. स्वामींच्या सेवकांनी त्याला पेढे वाटण्याचे कारण विचारले. तो एक श्रीमंत गृहस्थ होता. त्याच्या घरी भरपूर संपत्ती होती. त्याची पत्नीही सुंदर होती. सर्व कांही होते पण त्यांना मूल नसल्याचे शल्य होते. म्हणून तो दु:खी होता. मुलासांठी अनेक देवांना त्या पतीपत्नीने नवस बोलले, अनेक व्रतवैकल्यही केली परंतु त्यांचे नशीबच खोटे. बारा वर्षानंतरही त्यांना मूल झाले नाही. शेवटी ते नवरा बायको कुंभार गल्लीतील दत्ताला आले. आपल्या मनातील मूल नसल्याचे शल्य स्वामींच्या कानांवर घातले. यावर स्वामी त्यांना म्हणाले ''तुमच्या नशिबातच मुलबाळ नाही देवादिकाला चुकले नाही तिथे मी काय करणार'' हे स्वामींचे बोल ऐकून निराश होवून ते नवरा बायको परत घरी गेले. कुंभार गल्लीत दर्शनाला येण्याचे टाळत गेले. पुढे कांही काळानंतर मुलबाळ होण्यासाठी, पोटपाणी पिकण्यासाठी पत्नीच्या इच्छेकरिता ते नवरा बायको त्यांचे कुलदैवत जोतिबाला गेले. जोतिबाच्या पुजाऱ्याच्या कानांवर मूल होण्याबाबत कळवळून विनंती घातली. यावर तो दयाळू पुजारी म्हणाला ''येथे डोंगरावरच राहणाऱ्या ज्योतिषज्ञानी वेणीमाधव नावांच्या स्वामींच्या ही गोष्टी कानावर घालू या. तो कुंभार गल्लीतील श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा चेला आहे, शिष्य आहे. त्यांच्याकडून तुम्हाला पुत्रप्राप्तीची माहिती मिळेल. मार्ग मिळेल. त्यांच्या गुरुसारखाच तुम्हांला पुत्र होईल.'' असे म्हणून त्या पुजाऱ्या बरोबर ते नवरा – बायको वेणी माधव स्वामींच्या दर्शनाला आले. त्यांचे दर्शन घेवून अपत्य / मूलबाळ नसल्याची व्यथा त्यांच्या कानांवर घातली. यावर वेणी माधव स्वामी त्यांना म्हणाला ''तुमची अपत्याची / मूलबाळ होण्याची इच्छा पूर्ण होईल. तुम्हाला तुमच्या मनासारखा पुत्र होईल. तुम्ही कुंभार गल्लीतील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनाला जात जा. तुमची मनोकामना पूर्ण होईल.''

यानंतर ते नवरा – बायको कुंभार गल्लीतील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनाला गेले. स्वामींचे दर्शन घेताच स्वामी त्या नवरा – बायकोला म्हणाले ''पूर्वी तुला तुझ्या नशिबातच मूल नाही असे सांगितले होते. परंतु माझा शिष्य वेणी माधवने तुला मूल होईल असे सांगितले आहे. त्याच्या शब्दाला मी उभा आहे. वेणी माधवाचा कमीपणा करणार नाही. तुला मुल होईल'' स्वामींच्या बोला प्रमाणे त्यांच्या पुन:श्च आशीर्वादाने त्या नवरा बायकोला काही दिवसानंतर मुल झाले अशा प्रकारे वेणी माधवांच्या शब्दाची / आशीर्वादाची बूज स्वामींनी राखली. शिष्याने दिलेल्या शब्दाची किंमत राखण्यासाठी, भक्तांनी दिलेल्या शब्दाची किंमत राखण्यासाठी गुरु कशी धांव घेतात, त्याचे महत्व येथे हजर असणाऱ्या हरिपंत शिदनेर्लीकराला समजून आले. त्या दिवसांपासून त्याचा सर्व गुरुबंधूविषयी आदर व प्रेम भाव जागा झाला.

## ।। ब्रम्हचारी सद्‌गुरुंचा ध्यास ।।

**हवा मज ब्रम्हचारी सदगुरु ।**

**यती मुनी वा नको संसारी – परी जीवन उध्दारु ।। धृ. ।।**

**अभागिनी सौभाग्य मुकले**

**मजवरी आभाळ कोसळले**

**जगा जीवन जड हे जहाले असारी संसारी या तारु.. ।।**

**हवा मज ब्रम्हचारी सदगुरु... ।।**

**विषयी विखार जो शांतवतो**

**ज्ञान गभस्ती तिमीर नाशीतो**

**पाप निकर जाळून टाकतो**

**दुरीते दु:खीतांची हाऊ...।।**

**हवा मज ब्रम्हचारी सद्‌गुरु...।।**

**येईल का क्षण तो या जीवनी ?**

**अभागिनी मी धन्य होऊनी**

**जीवन अर्पिन श्री गुरुचरणी**

**अधोऱ्या मना किती आवरु.. ।।**

**हवा मज ब्रम्हचारी सदगुरु.. ।।**

आळते ग्रामी येसूबाई ह्या नावाची एक रुपसंपन्न तरुणी राहात होती. तिच्या पित्याने चांगल्यातली चांगली गुणपत्रिता पाहून तिचे विवाह कौतुक थाटामाटात साजरे केले. प्रारब्धाची गतीच इतकी गहन की त्याच्या एका फटाक्या सरशी राजाचा रंक क्षणाचा विलंब न लागता होत असतो. असाच एक प्रारब्धाचा फटका, ह्या सुंदर असणाऱ्या नववधूवर पडला. येसुबाईच्या सौभाग्य सुखावर कुऱ्हाड पडली आणि तिच्या पदरी वैधव्य प्राप्त झाले. एकलकोंडी आयुष्याच्या पति-विरहित जगण्यात तिला कोणतीच अभिलाषा उरली नाही.

ऐन यौवनावस्थेत येसुबाईवर अशी आपत्ती कोसळल्यामुळे त्यांच्याबद्दल प्रत्येकांच्या मनात पूज्य भाव निर्माण झाला होता. त्यांना भगवंताच्या गीत भजनात रमण्याचा छंद लागला. ह्या गीत-भजनाच्या नंतर पुराण कीर्तन श्रवणांची विलक्षण गोडी पण त्यांना लागली. अशाच एका भगवंताच्या कीर्तनात येसुबाईंना श्रीगुरुंचा महिमा पुराणिक बुवाकडून ऐकण्याचे भाग्य लाभले.

''गुरु हा संत कुळीचा राजा आहे. गुरु हा भवार्णवीचे तारु आहे. ऐहिक परमार्थीक जीवन

धन्य करावयाचे असल्यास सदगुरुंना शरण गेलेच पाहिजे.'' जन्म - मृत्यूच्या फेऱ्यातून पार व्हावयाचे असल्यास गुरुंचा मंत्र हा कानी पडावाच लागतो. तरच मनुष्याला मुक्ती मिळते. नाही तर चौऱ्याऐंशीलक्ष जन्मांचा फेरा हा फिरावाच लागतो. सर्व जन्मात नर जन्म हा श्रेष्ठ असतो. ह्या जन्मातच जीवाला शिवाशी तादात्म्य पावता येते ते सदगुरुंच्या मंत्र प्रभावानेच साधता येते. लिंग देहाची बसलेली जबर गाठ साक्षात् परब्रम्ह असणाऱ्या सदगुरुंच्या शिवाय कोणीही सोडविण्यास समर्थ नसतो. सदगुरुंच्या सारखे उध्दारक दैवत शोधून पहावयास गेलात तरी त्रिभुवनात सुध्दा मिळणार नाही.

सुखाचा सागर । प्रेमाचा आगर । नीतिधैर्याचा न ढळणारा डोंगर म्हणजे सदगुरु! दुष्टांना दंड देणारा; दासांना अभय देणारा सदगुरु हा वैराग्याचा महामेरु आहे ! साधकांशी सहाय्य करणारा सदगुरु धन तिमिरात शुक्राचा तेजस्वी तारा होय. प्रेमळ भक्तिच्या घरात सर्व मनोकामना पुरी करणारी सदैव दुभणारी कामधेनू म्हणजेच श्री सदगुरु होय ! आणि त्यांचा कानमंत्र हे साक्षात मृतप्राय जीवाला सुलभपणे मिळालेले ओजस्वी संजीवन होय.

कीर्तन संपून गेले पण येसूबाईचे मन आता गुरुंच्या प्राप्तीसाठी तळमळू लागले. जीवनात गुरुंची असलेली उपयुक्तता त्यांना मनोमनी पटली होती. त्यांना श्रीगुरुंचा निरंतर ध्यास लागला.

श्री गुरुंच्या चिंतनात एका बाजूने मन रमत होते. तर गुरुंच्या नांवाखाली साधू म्हणवून घेणारे समाजविघातकी ढोंगी लोकांची कमतरता ह्या जगात कमी नाही. ह्याची पण खंत दुसऱ्या बाजूने वाटू लागली होती. यती, मुनी आणि तपी हे सुध्दा महाभाग काम, क्रोधादी विकारांच्या आहारी गेलेले येसुबाईच्या श्रवणात आले होते व म्हणूनच ह्यापैकी कुणीही आपला सदगुरु असावा हे त्यांच्या मनाला वाटेना.

विषय कर्दमापासून दूर असून ब्रम्ह तत्वाचे पालन करणारा ब्रम्हचारीच सदगुरु आपला असावा असा निश्चय येसुबाईच्या मनाने घेतला आणि ह्या योग्य निश्चयाला अनुसरुन साहजजिकच त्यांच्या मनाला ब्रम्हचारी गुरुंचा ध्यास लागला. त्यांचे अंत:करण सदगुरुंच्या प्राप्तीसाठी व्याकुळ झाले. ह्याच व्याकुळतेचे त्यांचे जीवन अधिकच दु:ख कष्टी होत निघाले. अशा स्थितीत येसुबाईचा बराच कालावधी लोटला गेला. सदगुरुंनीही त्यांच्या मनाची तळमळ जाणली आणि एके दिवशी पौर्णिमेचा पुण्य मुहूर्त साधून एक ब्राम्हण माध्यान्हाचा समय साधून येसूबाईच्या घरी क्षुधा शमनार्थ चार घास भोजन प्राप्तीसाठी याचक म्हणून दारी उभा राहिला. अतिथी पूजनार्थ तत्पर असणाऱ्या येसुबाईंनी त्यांची स्नान भोजनाची व्यवस्था स्वत:च आत्मीयतेने केली. भोजन समयी प्रवासाचे कारण विचारता त्या द्विजाने आपली सविस्तर हकीकत येसुबाईंना सांगितली. स्वत: तो मूळ पंढरीचा असून भार्या मुलांचा प्रपंच हाकणारा सुखी - संसारी गृहस्थ होता. दर पौर्णिमेला पंढरीहून औदुंबरला पायी चालत चालत येण्याची तो वारी ''उपासनेला दृढ

चालवावे'' ह्या तत्वाला धरुन करत होता. ही त्याची वारी फार पुरातन अशी होती. त्या द्विजाच्या बोलण्या चालण्यावरुन तो फार सुशिल अणि संसारी गृहस्थ होता. नाही तर त्याच सभ्य गृहस्थाला गुरु करुन घ्यावा असा विचार येसुबाईच्या मनात येऊन गेला.

सद्गुरुंच्या प्राप्तीसाठी अशी येसुबाईच्या मनात चाललेली तळमळ पाहून ते गृहस्थ येसुबाईंना म्हणाले... ''बाई तुमचे मन असे चिंताग्रीत का?'' आपला काय विचार आहे तो मला सांगितला तर मी आपली चिंता संकट दूर करीन!'' तेंव्हा येसुबाईनी बरेच दिवस मनात ठेवलेले गुपीत त्या याचकांच्या पुढ्यात उलगडून सांगताना म्हणाल्या, ''मला सद्गुरु पाहिजे आहे; परंतु संसारी, यती, मुनी किंवा तापसी ह्यांच्यापैकी तो कोणीही नसावा! सदाचारी आणि नीतीसंपन्न असा ब्रम्हचारी गुरु मला पाहिजे.'' मग तो विप्र म्हणाला, ''बस्स! एवढ्यासाठी तुम्ही इतक्या दु:खी - कष्टी झालांत ? तुम्हांला दुसरा तिसरा कोणी नसून ब्रम्हचारीच सद्गुरु मिळेल. आम्ही तुम्हाला कार्तिक महिन्याच्या सोमवारी पत्र-पाठवू, त्या दिवशी आपल्याला भवार्णावातून पार करणारे मोक्षदानी सद्गुरु भेटतील! आता मला आपला निरोप द्या! फार विलंब झाला आहे. आजच्या आज मला श्री क्षेत्र औदुंबरला गेले पाहिजे. दर पौर्णिमेला मी पंढरीहून इकडे येत असतो. माझे ते फार पुरातन असे व्रत आहे! येतो मी!'' असे म्हणून येसुबाईचा निरोप घेऊन द्विजरुपात आलेल्या पंढरीच्या रायाने अभागी झालेल्या येसुबाईच्या जीवनात आशेचा किरण टाकून बघता बघता नयना समोरुन दूर गेला! आणि येसुबाई गुरुप्राप्तीच्या महत् योगाकडे जवळ जवळ येऊ लागल्या.

ह्या घटनेपासून येसुबाई मनोमनी विचार करीत की, ''पंढरपूरला कायमचे वास्तव्य असणारा हा द्विज दर पौर्णिमेला औदुंबरला कशास येईल?'' पण लागलीच त्याचे उत्तर त्याच द्विजाने सांगितले. त्या वचनातून मिळत असे. औदुंबरला दर पौर्णिमेला पायी पायी चालत येणे हे माझे पुरातन व्रत आहे असे म्हणतो. सामान्य माणसाला पुरातन हा शब्द म्हणण्याचे कांही कारण नाही. फार तर फार दिवस, वर्ष, महिने असे सामान्य माणूस म्हणतो. ''पुरातन व्रत'' म्हणणारा द्विज सामान्य नसून पुरातन असणारा हा साक्षात विठुराया होय. ह्या विठुरायानं माझं अंत:करण खास भुलविले, त्याला आपण उगीचच सोडलं! पण त्याला अडवून तो काय थोडाच अडणार... जो स्वत: सेना न्हावी बनला होता, ज्याने स्वत: विठु महार होऊन बेदरच्या भूपालला भूलविले त्यानेच माझ्यावर असे मायाजाळ टाकले. साक्षात् तिन्ही जगत धनी चालून माझ्या घरी आला. त्यालाच ''गुरु'' करुन घेतले असते तर फार बरं झालं असतं! पण मी त्याला ''संसारी गृहस्थ'' म्हणून व्यर्थ दवडले, हेकेखोर स्वभावाने ''ब्रम्हचारी गुरुंचा'' हा दुराग्रह म्हटला तरी तो द्विजरुप पंढरी रायाने मान्य केला आणि कार्तिक महिन्यात सोमवारी पत्र पाठवतो त्या दिवशी ब्रम्हचारी गुरुप्राप्ती होईल असे अभिवाचन पण दिले आहे! तेव्हा हे पंढरीराया काय करायचे ते कर, पण मला सद्गुरुंचे चरण एकदा लवकरात लवकर दाखव! ही अंत:करणाची तळमळ येसुबाई त्या

पंढरीनाथास वारंवार वाहत असे. सांगितलेला दिवस समीप येऊन ठेपला पत्र मात्र कोठून आले नाही, मात्र येसुबाईच्या पिताजींचे छत्रपतींच्या दरबारी अगदी अचानक व अगदी निकडीचे काम निघाले, आणि हे पितापुत्री करवीरास येऊन दाखल झाले. ह्या पिताजींच्या अचानक कामामुळे येसुबाईच्या मनाच्या ध्यासाने थोडी विश्रांती घेतली. कोल्हापूर पाहिल्या सारखं होईल ह्या विचाराने पिताजींनी लाडिकपणे येसुबाईंना बरोबर आणली. एका बांधवांच्या घरी त्यांनी वास्तव्य केले होते. दुसऱ्या दिवशी सोमवारी उपवास असल्यामुळे घरातील सर्व गृहिणी श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनास नेहमीप्रमाणे निघाल्या. त्यांच्याकडून येसुबाईंना समजले की, हे महाराज दत्तावतारी थोर रत्न विभूती आहेत. हे समजताच येसुबाईच्याही मनात पूज्य भाव निर्माण झाला व त्या पण इतर तेथील स्त्रियांसमवेत कुंभार गल्लीत वैराग्य मठीमध्ये महाराजांच्या दर्शनास आल्या !

इतर स्त्रियांनी दर्शन घेऊन झाल्यावर येसुबाई महाराजांचे चरण दर्शन घेणार होत्या येवढ्या अवधित महाराजच उद्गारले, ''करा! करा! त्वरा करा! निश्चित दिवस आजचाच खरा! तुम्हाला ब्रम्हचारी सद्गुरु पाहिजेत होता ना! घ्या! घ्या!'' असे म्हणत श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी आपले दोन्ही चरण दर्शन देण्यासाठी येसुबाईच्या पुढे केले.

येसुबाईंनी महाराजांचे विनम्र चरण दर्शन घेतले. त्या आश्चर्यचकित झाल्या. पंढरीच्यारायाने औदुंबरच्या वारकरी द्विजरुपात दिलेले अभिवचन सत्य झाले होते. ''तो'' निश्चित दिन आज उगवला होता! आणि मनाला ध्यास लागलेल्या ब्रम्हचारी सद्गुरु श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या रुपात मिळाला होता.

कामानिमित्त पित्याचे कोल्हापूरला येणे हे पत्र रुपी आमंत्रण झाले होते. येसुबाईच्या अभागी जीवनात आता भाग्योदय झाला होता. जन्मोजन्मीच्या संचिताची देणगी त्यांना मिळाली होती. महाराजांच्या तेजोमय दर्शनाचे त्यांचे नैराश्य पार मावळले होते. त्रयमूर्ती दत्तगुरुंची साक्षात् असलेला अवतार श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज आपले सद्गुरु झाले ह्याचा त्यांना अत्यानंद झाला होता. नंतर आठ दिवस त्या कोल्हापूर येथे राहिल्या होत्या. बरोबरीच्या त्या स्त्रिया नंतर येसुबाईंना म्हणाल्या ह्या महाराजांना तुम्ही यापूर्वी कधी पाहिले होते? येसुबाईंनी मग त्यांना आपली सर्व पूर्व हकिकत निवेदन केली. दररोज अशा आठ दिवस त्या स्त्रियांसमवेत येसुबाई महाराजांच्या दर्शनाला न चुकता येत. त्यांच्या पित्यांचे छत्रपतीच्या दरबारातील काम आटोपले. मग श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या परवानगीने येसुबाई पित्यासमवेत आपल्या गांवी निघून गेल्या.

त्या गांवी कालांतराने येसुबाईचा एकमेव असणारा पिताजींचा आधार तुटला. त्यांच्या निधनाने येसुबाईचे मायेचे छत्र हरवले. मग त्यांनी आपले सद्गुरु श्रीकृष्ण सरस्वती दत्त

महाराजांच्या चरणी धाव घेतली. महाराजांनी त्यांना आपल्या वैराग्य मठीतच कायमचे वास्तव्य करण्यास सांगितले. ह्या आज्ञेनुसार त्या वैराग्य मठीतच कायमच्या राहिल्या. त्यांना महाराजांचा अनुग्रह मिळाला होता. तारामती शिर्के व त्यांचे जीवाभावाचे नाते महाराजांच्या कृपेमुळे जडले. तारामतींना कोणीही बहीण नव्हती. ती येसुबाईच्या रुपात गुरु भगिनी म्हणून मिळाली.

महाराजांच्या सेवेत तारामतींना येसुबाईचा एक मदतीचा हात लाभला होता. तारामतीचे एक सुपुत्र दत्ताजींना एक मावशी मिळाली. तारामतींच्या निधनानंतरची मठातील सेवेची सर्व जबाबदारी येसुबाईंनी सांभाळली होती. स्वयंपाक, घरातील देखरेख, महाराजांची पहाटेची तूपखिचडी नाष्टा, दुपार व रात्रीचे भोजन, पांच वेळच्या महाराजांच्या आरत्या या क्रमात तारामतींच्याप्रमाणे कोणतीही कसूर होऊ दिली नाही. महाराजांनी समाधी घेतली तरीही पूर्वीची नित्य नैवेद्य, आरतीची परंपरा ताईंनी नियमित वेळेनुसार कायमचीच ठेवली.

महाराजांच्या कृपेमुळे येसुबाईंना निकोप देह-प्रकृती लाभली होती. त्या सदृढ, गौर वर्ण, तेजस्वी अंगकांतीच्या होत्या, महाराजांच्या नामस्मरणात त्या नेहमी गढून गेलेल्या असावयाच्या, महाराजांच्या नामस्मरणात त्यापण सन १९२९ च्या सुमारास महाराजांच्या चरणी विलीन झाल्या. माळकरी लोकांची जशी अंत्ययात्रा काढतात तशी येसुबाईंची अंत्ययात्रा तारामतीचे नातू स्व. रामनाथ शिर्के यांनी काढली होती. तारामतींची आजीची माया रामनाथ शिर्के यांना विशेष अशी मिळाली नव्हती. ती आजीची माया येसुबाईंनी रामनाथांना दिली होती. येसुबाईंचे उत्तर कार्य स्व. रामनाथ शिर्के यांनीच केले. येसुबाईमुळे सद्‌गुरुंच्या सेवेचा आदर्श सर्व भक्तांना प्रेरणादायी ठरला. रामनाथांच्या सह सर्व गुरुंच्या सेवक लेकरांवर त्यांनी मातृवत् माया ममतेचं सुख प्रेमळपणे दिले होते. येसुबाई या बाल विधवा होत्या. सुखाचा लवलेशही त्यांच्या वाटेला आयुष्यात जरी आला नसला तरी निराश व भयाण अशा त्यांच्या जीवनात श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा गुरुकृपेचा अल्हाददायी मळा फुलला होता. गुरुप्रेम आणि भक्तिचं मूर्तीमंत सोज्ज्वळ स्वरुप अशा येसुबाई झाल्या होत्या. त्यांच्या पवित्र आठवणी आम्हाला प्रेरणादायी ठरोत ! त्यांचे चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम !

संदर्भ ग्रंथ : - **श्री श्रीकृष्ण सरस्वती लीला मासिक**

जयंती विशेषांक दि. २०/२/१९९५

लेखक :- **श्री बाळासाहेब शां. नाडकर्णी, कोल्हापूर**

# भीमा– अमरजेच्या संगमावर

गाणगापूर हे स्थान सध्याच्या म्हैसूर राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यात भीमा–अमरजेच्या संगमावर आहे. गुरुचरित्रात गाणगापूरचा उल्लेख गाणगापूर, गाणगाभवन, गंधर्वभवन, गंधर्वपूर या नावांनी आढळतो. वाडीवरुन श्रीगुरु गाणगापुरी आले आणि संगमस्थानी निसर्गाच्या रमणीय सान्निध्यात वसती करुन राहिले. हे संगमस्थान गाणगापूर गावाच्या नैऋत्य दिशेस सुमारे दोन मैल अंतरावर आहे.येथे पूर्ववाहिनी अमरजा व उत्तरवाहिनी भीमा यांचा संगम झाला आहे.

गुरुचरित्रात (अध्याय ४८) अमरजेच्या उत्पत्तीविषयी एक पुराणकथा आलेली आहे : फार पूर्वी जालंधर नामक दैत्य अत्यंत मातला आणि त्याने सारी वसुंधरा संत्रस्त बनविली. देव–दानवांच्या रणधुमाळीत इंद्रासहित सारे देव पराभूत झाले. जालंधराच्या किमयेमुळे दैत्यांच्या रक्ताच्या बिंदुबिंदूतून पुन: दैत्य निर्माण होत. या अरिष्टाचा प्रतिकार कसा करावा, हे सुचेनासे झाल्यावर इंद्र शिवाकडे गेला आणि सारे शोचनीय वृत्त त्याने शिवास निवेदन केले. ते वृत्त ऐकून शिव क्रोधाविष्ट झाला आणि रौद्रावतार धारण करुन दैत्यांच्या निर्दाळणासाठी निघाला. त्या वेळी मृत देवांच्या संजीवनासाठी त्याने इंद्राजवळ जो अमृतघट दिला, त्या अमृतघटातील उरलेल्या अमृताचा ओहळ म्हणजेच ही अमरजा नदी. तिचा उद्भव देवांच्या संजीवनासाठी आणि दैत्यांच्या सहारणासाठी प्रवृत्त झालेल्या शिवाच्या करातील अमृतघटातून झालेला आहे. असे ही पुराण–कथा सांगते. अमरजेने ज्या भीमेच्या जीवनात समरसीकरण साधले आहे, ती भीमाही संतांच्या संस्पर्शामुळे आणि पांडुरंगाच्या चरणतीर्थामुळे मानवाच्या ह्रदयातील देवत्वाचे संजीवन घडवीत आहे आणि दानवत्व संहारीत आहे. अशा या दोन सरितांचा संजीवक– संगम श्रीगुरुंना अनुष्ठानयोग्य वाटला असल्यात त्यात आश्चर्य नाही.


गाणगापूर हे ब्राम्हणांना ‘अग्रहर’ म्हणून मिळालेले गाव होते. विद्येने प्रतिष्ठित आणि परिस्थितीने सुस्थित असे अनेक ब्राम्हण गावात होते. परंतु श्रीगुरु एका गरीब ब्राम्हणाच्या घरीच नित्य भिक्षेला जात. त्या ब्राम्हणाच्या घरी एक भाकड म्हैस होती. त्या म्हैशीच्या पाठीवरुन खारी मारती वाहून लोकांच्या बागाइतीला खत म्हणून देण्याचा उद्योग तो करीत असे. एके दिवशी श्रीगुरुंच्या कृपाप्रभावामुळे त्या वांझ म्हैशीला पान्हा फुटला आणि त्या क्षणापासून त्या निष्कांचन ब्राम्हणाच्या ओसाड जीवनात भाग्याची अमृतधारा वाहू लागली. अशी कथा गुरुचरित्रात वर्णिली आहे. या घटनेमुळे संगमावर अज्ञात अवस्थेत अनुष्ठान आचरणारे श्रीगुरु गावकऱ्यांच्या आश्चर्याचा आणि आदराचा विषय बनले. ग्रामाधिकाऱ्याच्या कानी हे वृत्त पडल्यावर तो विनीतभावाने श्रीगुरुंकडे गेला आणि त्याने त्यांना आग्रहाने गावात रहावयास आणले. गावात रहावयास आल्यानंतरही श्रीगुरु अनुष्ठानासाठी नित्य संगमावर जात असत.

संदर्भ ग्रंथाचे नाव – **श्री दत्त संप्रदायाचा इतिहास**

लेखकाचे नाव– **डॉ. रा. चिं. ढेरे**

# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय १० वा ।।



**श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी, श्री क्षेत्र आळंदी**

## विषयसूची....!


१) कोल्हापूरचा कृष्णा लाड
२) मिरजेचे गाडगीळ बुवा
३) गाणगापूरचा रामदास
४) ऐतवड्याचा देवगोंडा महारोगी

# अध्याय १० वा

कोल्हापूरला उत्तरेश्वर पेठेत कृष्णा लाड नांवाचा एक पैलवान राहत होता. जोर बैठका काढून / व्यायाम करुन त्यांने तालमीत शरीर कमविले होते. शरिरसंपदा प्राप्त केली होती. तो फार व्यायामप्रेमी पैलवान होता. रोजची तालीम झाल्यावर प्रल्हाद तळ्यात स्नान करुन मगच बाबू जमाल या अवलियाच्या तुरबतीचे नियमितपणे दर्शन घेऊन उद्योगधंद्याला जाई. बाबू जमाल अवलिया व श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज या दोन सत्पुरुषांची घनिष्ठ अशी मैत्री होती. जगाच्या उध्दारासाठी या दोन थोर सत्पुरुषांनी अवतार धारण केला होता. लौकिकदृष्टी हे दोन अवतार असले तरी एक बाबू जमाल फकीर तर दुसरे श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचा जग कल्याणाचा विचार एकच होता. त्यांचे संभाषण गुप्तपणे चालत असे. एकदा प्रल्हाद सरोवरात / तळ्यात स्नान करुन कृष्णा लाड बाबू जमाल तुरबतीस भक्तिभावाने प्रदक्षणा घालत असतांना त्याला तुरबतीतून बाबू जमालचा आवाज आला ''श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची महती तू ओळखत नाहीस. आता यापुढे त्यांच्या दर्शनाला तू कुंभार गल्लीत जात जा'' कृष्णा लाडानेही तो तुरबतीतून आवाज ऐकला परंतु ऐकले न ऐकले असे करुन, बाबू जमालवरील अत्यंत भक्तिभाव म्हणून कृष्णा लाडाने कुंभार गल्लीतील प्रत्यक्ष दत्त अवतार श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या दर्शनाला जाण्याचे टाळले. आपला बाबू जमाल दर्शनाचा नित्यनियमच रोज पुढे चालविला.

परंतु एके दिवशी गंमत झाली. ती अशी नित्यनियमाप्रमाणे बाबू जमाल तुरबतीला प्रदक्षणा घालत असतांना कृष्णा लाडाला थंडी वाजून ताप आला. त्याला मागे तुरबतीतून आलेल्या बोलाची आठवण झाली व तो त्वरीत कुंभार गल्लीत श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनाला आला. त्याला पाहताच स्वामी त्याला म्हणाले ''बाबूचे तू ऐकले नाहीस. माझ्याकडे जाणेस सांगितले होते तेही मनावर घेतले नाहीस. त्यामुळे तुला थंडी तापाने घेरले आहे. जमाल व मी एकच रुप मानून अद्वैत भावाने माझ्या जवळ रहा'' हे स्वामींचे बोलणे ऐकून तो आश्चर्य चकीतच झाला. स्वामींनी मला कधी पाहिले नाही. मीही कधी स्वामी दर्शनाला आलो नाही. तरीही स्वामींनी आपल्या मनातील द्वैतभावाची खळबळ कशी ओळखली? याचा त्याला विस्मय वाटला व बाबू जमालने मनुष्य रुपातील खरा देव दाखविला अशीच त्याच्या मनाची धारणा झाली. त्या दिवशी पासून कृष्णा लाड स्वामींच्या सानिध्यात कायम राहिला.

कृष्णा लाड स्वामींच्या सेवेत राहिला परंतु त्याच्या मनातील द्वैतभाव पूर्णपणे जात नव्हता. कार्तिक महिना चालू होताच लाडाला श्री विठ्ठल दर्शनाला पंढरपूरला जाऊ वाटू लागले. त्याने स्वामींकडे पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला जाण्याची परवानगी मागितली. पंढरीला जावू वाटते असे वारंवार सांगितले. परवानगी देणेविषयी सतत विनवणी केली. त्याची विनवणी ऐकून स्वामी त्याला म्हणाले ''देहाला उगीच कष्ट देवू नकोस. उगीच तीर्थक्षेत्रे हिंडू नकोस. माझ्या स्वरुपात इथंच पांडुरंगाला बघ'' परंतु लाडाला ते पटले नाही. यावरही पंढरपूरला जाण्या

विषयीची त्याची विनंती ऐंकून स्वामींनी त्याला पंढरपूरला जाण्याची परवानगी नाईलाजाने दिली व म्हणाले ''जा पंढरपूरला परंतु बराच त्रास होईल. त्रास भोगावा लागेल'' स्वामींचे बोल कृष्णा लाडाने मनावार घेतले नाही. पडत्या फळाची आज्ञा मानून तो पंढरपूरला विठ्ठल दर्शनाला निघाला. रेल्वेने मिरजेत पोहचताच त्याला मिरजेत असलेले एक थोर सत्पुरुष गाडगीळ बुवांचे दर्शन घेवून मगच पुढे पंढरपूरला जावे असे वाटले. गाडगीळांच्या दर्शनाला जाताच ते कृष्णा लाडाला रागाने म्हणाले, ''स्वामींची आज्ञा मोडून पंढरपूरला कां निघाला आहेस? स्वामींची आज्ञा मोडणारा मनुष्य मला आवडत नाही. स्वामींचा सहवास सोडून मला भेटणे म्हणजे सागराचा सहवास सोडून ओढ्याला भेटण्या सारखे आहे. चिंतामणी सोडून खड्याला भुलल्या सारखे आहे. तुझा स्पर्श सुध्दा नको'' ऐवढे बोल ऐकून सुध्दा कृष्णा लाडाच्या मनात प्रकाश पडला नाही. परत स्वामीकडे फिरावे व स्वामी सेवेत रहावे असे वाटले नाही.

वंदनीय असलेल्या गाडगीळ बुवांचे बोल ऐकून निराश होऊन पुन्हा कृष्णा लाड आळंदीला निघाला. श्रीक्षेत्र आळंदीला कृष्णा स्वार प्रवास करुन पोहचला. परंतु रात्र झाल्याने त्याला श्री संत ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले नाही. तसेच त्याला कुठेही आसरा/भोजन मिळाले नाही. एका धर्म शाळेत त्याने मुक्काम केला. दिवसभराच्या प्रवासाने दमून गेल्याने त्याला गाढ झोप लागली. झोपेत त्याला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात त्याला एक ब्राम्हण आला व म्हणाला ''स्वामी सेवेत आनंद होता. पंचपक्वान्न सोडून भाकरीचे तुकडे मागत फिरणे असे तुझे वागणे आहे. त्वरीत स्वामी सेवेसाठी मागे फिर'' स्वप्नातील ब्राम्हणाचे बोल ऐकून कृष्णा लाड खडबडून जागा झाला. श्री संत ज्ञानेश्वरच स्वप्नात आले हे त्याला कळून चुकले. श्री स्वामी आज्ञा मोडून, स्वामी सेवा चुकवून आपण आळंदीला आलो, ज्ञानेश्वरांना न आवडता झालो याचा त्याला पश्चाताप झाला. आता परत कोल्हापूरला जावे वाटू लागले. पुन्हा त्याच्या मनात असे आले की, आळंदी पर्यंत आलो आहेच. श्री संत ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन झाले आहेच. जाता जाता श्री क्षेत्र पंढरपूरला जाऊन श्री विठ्ठल दर्शन घेवून मग कोल्हापूरला परत जावू या. मग प्रवास करीत करीत कृष्णा लाड पंढरपूरला पोहचला.

त्याने श्री पांडुरंगाचे दर्शन घेतले व धर्मशाळेत वस्ती केली. त्याच रात्री त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात दोन ब्राम्हण आले. त्यापैकी एक ब्राम्हण दुसऱ्या ब्राम्हणाला कृष्णा लाडाकडे बोट दाखवून विचारात होता ''हा भक्त कोण? कुठून आला आहे?'' दुसरा ब्राम्हण पहिल्या ब्राम्हणाला म्हणाला ''हा कोल्हापूरच्या कुंभार स्वामींचा भक्त आहे. स्वामी प्रत्यक्ष परमेश्वर रुप न मानता, विठ्ठल रुप न मानता, कोल्हापूरात पोट भरत नाही म्हणून इकडे भाकरीचे तुकडे मागायला आला आहे हे योग्य नाही.'' हा दोन ब्राम्हणामधील संवाद ऐकून कृष्णा लाड जागा झाला. स्वामींची आज्ञा मोडून आपण आळंदीला/पंढरपूरला आल्याचे त्याच्या लक्षात आले. परत स्वामी दर्शनाला/सेवेला कृष्णा लाड कोल्हापूरला त्वरीत माघारी परतला. त्याने स्वामींच्या पायाला घट्ट मिठी मारुन आज्ञा मोडल्याची क्षमा मागितली. स्वामींनी त्याला क्षमा केली. ''तू

माझे बालक आहेस, आळंदी / पंढरपूर दर्शनाचा तुझा हट्ट पुरविला. आई मुलावर कधी रागावत नाही'' तेंव्हा पासून कृष्णा लाड स्वामी चरणी अखंड सेवेत काळ घालवू लागला. एकांतवासात नामस्मरण करु लागला.

कृष्णा लाडाला स्वामीची आज्ञाभंग करुन आळंदी/पंढरपूरला गेल्याचे खूप दुःख व पश्चाताप झाला. त्याला कधी कधी वाटे स्वामी त्याच्यावर नाराज आहेत. पुढे कांही दिवसांनी एक स्त्री त्याच्या स्वप्नात आली व त्याला आईप्रमाणे स्तनपान करु लागली. कृष्णा लाड स्वप्नातून खडकन जागा झाला. या वयात स्तनपानामुळे त्याला शरम वाटू लागली. प्रत्यक्ष त्याने तोंड पुसून पाहिले तर तोंडाला प्रत्यक्ष दूध लागले होते. ते बघून त्याच्या लक्षात आले की, स्वप्नात आलेली स्त्री ही प्रत्यक्ष स्वामीच होत. स्वामीनीच/गुरु माऊलीनीच आपल्याला स्तनपान केले आहे. स्वामी हीच आता आपली गुरुमाऊली आहे. स्वामी हे अंतर्ज्ञानी असून, त्यांच्या इच्छेने/कृपेने सर्व जीवन सफल/यशस्वी होते असे वाटू लागले. आपल्या सारख्या अति सामान्याला स्वामीनी शिष्य करुन घेतले याचे त्याला नवल, आश्चर्य, आनंद वाटला. तेंव्हापासून तो स्वामींची एकनिष्ठपणे सेवा करु लागला. त्यांचा आवडता शिष्य बनला.

दिवसेंदिवस स्वामींची कोल्हापूरात ख्याती वाढू लागली. पिशाच्च बाधा असणारे, संकटात असणारे तर ज्ञान संपादन करण्यासाठी दर्शनासाठी अनेक लोक स्वामींच्या दर्शनाला येवू लागले. असंख्य भक्त झाले. वीणा, टाळ, मृदंगाच्या आवाजात भजन / पूजन / कीर्तन / सोहाळे / धूपारती होऊ लागली. स्वामींच्या कीर्ती सुगंधामुळे दिवसें दिवस भक्तजनांची संख्या वाढत चालली. या सगळ्या भक्तांच्या गर्दीत तारांगणातील चंद्रा प्रमाणे स्वामी शोभू लागले. रामभाऊ मुरगुडकर, गोविंद व्यास, रामभाऊ फारीक, म्हादबा पटकार ही सर्व सेवेकरी मंडळी स्वामींच्या सेवेत तत्पर असत. अशा अनेक भक्तांची मालिका शोभू लागली.

श्री गाणगापूर येथे रामदास नावाचा भक्त भगवान दत्तात्रयांचे दर्शन व्हावे म्हणून केवळ लिंबाचा रस प्राशन करुन तीन वर्षे तपश्चर्या करीत होता. श्री दत्तात्रयांनी रामदासाची उग्र तपश्चर्या पाहून त्याला स्वप्नात दर्शन दिले व सांगितले ''कोल्हापूरला ताराबाईच्या घरी मीच कृष्ण सरस्वती म्हणून मानव रुपात वास्तव्य करुन आहे. तेच तुझा उध्दार करतील. मनोरथ पूर्ण करतील. तरी तू त्वरीत कोल्हापूरला जा. कोल्हापूरला चालत जाण्याला उशीर होईल गाडी भाड्याला पांच रुपये तुला देत आहे'' या स्वप्नाने रामदास खडबडून जागा झाला व प्रत्यक्ष त्याला उशाला ठेवलेले पांच रुपये पाहून आश्चर्य वाटले/आनंदही वाटला. वाहनाने तो कोल्हापूरला त्वरीत ताराबाईच्या घरी चौकशी करीत पोहचला. श्री स्वामी दर्शनाने त्याला आल्हाद वाटला, आनंद वाटला. आजवरचा जन्म फुकटच गेला असे त्याला वाटू लागले. पुढील सर्व आयुष्य रामदासाने स्वामींच्या सेवेत, स्वामींच्या पूजेत आनंदाने व्यतीत केले.

ऐतवड्याला (ता. वाळवा, जि. सांगली) देवगोंडा नांवाचा शेतकरी सहकुटूंब रहात होता. बायको - मुले यांच्यासह घरची शेती करीत असे. सोबत आपल्या भावाला घेवून, एकत्रितपणे

शेतात राबत असे. एकत्रित कुटूंबाचा आनंद भोगत असे. परंतु मनुष्याला प्रारब्ध चुकले आहे काय? दुर्देवाने देवगोंडाला महारोग झाला. महारोगावर औषध करुन तो दमला. परंतु महारोग कांही बरा होईना, आपली लक्षणे सोडीना. तेंव्हा त्याच्या पुढे दोनच मार्ग राहिले. घर सोडून दूर जाऊन शेतात राहणे किंवा गांव सोडून जाणे. हा विचार त्याने आपल्या भावाच्या/ बायकोच्या कानावर घातला. भावाने त्याला शेतात झोपडी बांधून राहणेस सांगितले. बायकोनेही त्याला शेतात जाऊन राहणेस सांगितले. त्यामुळे तो खूपच दु:खी झाला. बायकोचे बोलणे ऐकून त्याच्या ह्रदयाला घरे पडली.

दैवगतीचा फेरा फिरताच, संकटांची मालिका पाठीमागे लागताच आपल्या जीवाचे लोकही आपल्याला संकटात लोटून मागे फिरतात असे त्याला वाटू लागले. तो दु:खाने व्याकुळ होवून रडू लागला. आता आपल्याला या जगात सद्‌गुरु शिवाय कोणीच नाही असे वाटून तो नृसिंहवाडीत येवून राहिला. श्री दत्तगुरुशिवाय आपल्याला कोणी त्राता नाही. त्यांच्याशिवाय मायेचे कोण नाही. या संकटातून सोडविणारे त्यांच्या शिवाय कोणी नाही या भावाने तिथे तीन वर्षे काढली. रोज तिन्ही त्रिकाळ श्री दत्त पादुकांचे दर्शन, तीर्थ प्राशन हा नियम केला. मनोभावाने श्री दत्ताला भजू लागला. परंतु महारोगाची व्याधी कांही कमी होईना. दिवसेंदिवस तीन वर्षात व्याधी वाढतच चालली. महारोगी देवगोंडा नृसिंहवाडीत दु:खाने दिवस ढकलत होता. एक दिवस त्याला आण्णाप्पा नावांचा नातेवाईक नृसिंहवाडीत भेटला. त्याने देवगोंडाची चौकशी केली. त्याच्या महारोगा विषयीची, त्याच्या घरच्या लोकां विषयीची चौकशी केली. देवगोंडा आण्णाप्पाला म्हणाला. ''जो पर्यंत आपण धड असतो, पैसे कमवितो, सर्वांचे चालवितो तो पर्यंत आपण सर्वांना गोड, प्रिय असतो. परंतु ज्यावेळी आपल्यावर कर्माची धाड पडते. वाईट परिस्थिती येते त्यावेळी त्या संकटात आपल्याला सर्वजण सोडून जातात. माझेही तसेच झाले आहे.

आता कोणी आप्तस्वकीय राहिलेली नाही. मी आता पोरका झालो आहे. एकटा राहिलो आहे. मरणाची वाट बघत जगत आहे.'' देवगोंडाची प्राप्त झालेली परिस्थिती बायको, मुले, आप्तस्वकीय झालेले दूर हे पाहून आण्णाप्पाला अतिशय वाईट वाटते. आण्णाप्पा देवगोंडाला म्हणााला ''घाबरु नकोस. आम्ही राहतो त्या कोल्हापूरात श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज नावांचे महाराज / थोर सत्पुरुष राहतात. तू माझ्या बरोबर कोल्हापूरला चल. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्तात्रयाचे अवतारच आहेत. त्यांच्या दर्शनाने तुझे चांगले होईल. तुझ्या महारोगाच्या व्याधीवर कांही तर उपाय सांगतील बघू या. त्यांच्या दर्शनाने तुझे भाग्य पालटले तर, प्रयत्न करु या'' आण्णाप्पा देवगोंडास घेवून कुंभार गल्लीतील ताराबाईच्या घरी दर्शनास आला. परंतु स्वामींच्या दर्शनाला आलेले भक्तगण देवगोंडाला महारोग आहे म्हणून आत येवू देईनात. इथंही प्रारब्ध पाठ सोडत नाही हे बघून देवगोंडा अतिशय दु:खी झाला. त्याने बाहेरुनच दर्शन घेतले. बाहेरुनच दर्शन घेण्याचा नियम त्याने चालविला. आपला भोग आहे तो पर्यंत तो

भोगला पाहिजे या विचाराने तो बाहेरुनच दर्शन घेई, स्वामींना हात जोडून वंदन करी. त्यातूनही कधी कधी अंतर्ज्ञानी स्वामी गर्दीतून तुरुतुरू बाहेर येत. महारोगी देवगोंडाच्या अंगावरुन हात फिरवत व परत आत जात. जसे जसे स्वामी देवगोंडाच्या अंगावरुन हात फिरवत तसतसे देवगोंडाला बरे वाटू लागले. जणू आईच अंगावरुन हात फिरवत आहे असे वाटे. देवगोंडा आनंदून जात असे. बघता बघता हा क्रम चार महिने चालू होता. स्वामी कृपेने / स्पर्शाने देवगोंडाचा महारोग घटत गेला / बरा होत गेला. शिळा रुपी अहिल्याचा प्रभू रामचंद्राच्या पायाच्या बोटाच्या स्पर्शाने जसा उध्दार झाला तसाच उध्दार स्वामींच्या हस्तस्पर्शाने देवगोंडाचा उध्दार झाला. देवगोंडा महारोगातून पूर्ण बरा झाला. त्याचे शरीर पूर्वी प्रमाणे झाले. त्याची अंगकांती बदलून गेली. देवगोंडाचा आनंद त्रिभुवनात मावेना. आण्णाप्पाचे उपकार तो आठवू लागला. आण्णाप्पाने जर स्वामींची गाठ घालून दिली नसती, मला कोल्हापूरला आणून आधार दिला नसता तर मी मृत्यूमुखी पडलो असतो असे त्याला वाटे. आण्णाप्पाचे उपकार या जन्मात कधीच फिटणार नाहीत, स्वामींचे उपकार कधीच फिटणार नाहीत. असे वाटून तो सद्‌गत होई. हळू हळू देवगोंडा महारोगातून बरा झाल्याचा चमत्कार सर्व भक्तांत पसरला. देवगोंडा आश्चर्याचा विषय झाला, चर्चेचा विषय झाला. हळूहळू ही वार्ता ऐतवड्याला देवगोंडाच्या भावाच्या घरी पोहचली. देवगोंडाच्या भावालाही आनंद वाटला. देवगोंडाची बायको / मुले या सर्वांसह तो देवगोंडाला भेटायला, परत घरी न्यायला कोल्हापूरला ताराबाईच्या घरी आला. त्यांनीही स्वामींचे भक्तिभावाने दर्शन घेतले. देवगोंडाचा भाऊ देवगोंडाला म्हणाला ''स्वामींची सदगुरुंची तुमच्यावर कृपा झाली. तुम्ही महारोगातून बरे झाला आहात घरी परत चला'' देवगोंडाच्या बायकोनेही घरी परत चलण्याची विनंती केली. परंतु देवगोंडाने ते मानले नाही.

संकटात असतांना महारोग झाला असता बायको / मुले / भाऊ हे सर्व कशा प्रकारे वागले होते / हे देवगोंडा विसरला नव्हता. तसेच स्वामींनीच महारोग बरा करुन त्याला पुर्नजन्म दिला होता. त्याला आता घरदार संसार गोड वाटत नव्हता. घराचे पुन्हा तोंड बघायचे नाही. उर्वरित आयुष्य स्वामी सेवेत घालवायचे त्याच्या मनाचा निश्चय होता. स्वामी हे त्याचे दैवत होते. स्वामींच्या संत संगतीने त्याची आता मनोवृत्ती बदलली होती. म्हणून त्याला संसार, घरदार असार वाटत होते. त्याने साधुवृत्ती धारण केली होती, संसाराची पुंगी वाजविली होती. स्वामींच्या सेवेत / नामस्मरणात देवगोंडा रमून गेला होता. खोटा संसार त्याला नको वाटत होता. हे सर्व विचार स्वामी संगतीने / कृपेने त्याच्या अंगात भिनले होते. ''परंतु तुझा संसार अपुरा झाला आहे. तो पुरा कर'' अशी आज्ञा स्वामींनी देवगोंडाला केली. स्वामींच्या आज्ञेने बायको / मुले / भावांसह परत ऐतवड्याला आला व खाली मान घालून संसाराचा रथ हाकू लागला. स्वामींच्या स्मरणात आयुष्य कंठू लागला.

*****

# ।। श्री कृष्णा लाड ऊर्फ देव बुवा ।।

श्रीकृष्ण सरस्वती महाराजांचे अनुग्रह लाभलेले सर्वात पहिले शिष्य म्हणजे कृष्णा लाड हे होय. उत्तरेश्वर पेठेमध्ये राहणारे बाबू जमाल तालमीचे प्रसिध्द मल्ल म्हणून त्यांची ख्याती होती. भल्या पहाटे प्रल्हाद सरोवरात स्नान करुन श्री बाबू जमाल तुरबतीचे दर्शन घेऊन अंग मेहनत करुन ते शरीर कमवित असत. अशाच एका पहाटे ते दर्शन घेत असताना तुरबतीतून साक्षात कलंदर अल्ला बाबू जमाल फकीर रुपात प्रगट होऊन कृष्णा लाडांना म्हणाले ''आजसे तुम यहाँ नही आनेका, श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज अल्ला के पास जावो.'' हे ऐकताच कृष्णा लाड म्हणाला, ''तुम तो मेरे सब कुछ हो!'' परंतु हे शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडत असतांनाच त्या तुरबतीमध्ये अल्ला बाबू जमाल अंतर्धान पावले.!

कृष्णा लाडांची बाबू जमाल वर एवढी निष्ठा होती की, साक्षात ह्या अल्लांनी आज्ञा केली तरी कृष्णा लाड श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या दर्शनास गेले नाहीत. तशी त्यांची तब्येतही बिघडली. तापाने त्यांचा संपूर्ण देह होरपळून जावू लागला. मग मात्र त्यांनी वैराग्य मठीकडे धाव घेतली ते दर्शनाला येताच श्रीकृष्ण सरस्वती महाराज त्यांना म्हणाले, ''या तुम्हांला बाबूने पाठविले काय? या या बाबू आमचा प्यारा दोस्त आहे. तुमचा ज्वर आम्ही १२ वाटे पळवून लावू'' असे उद्‌गारत महाराजांनी कृष्णा लाडाच्या पाठीवरुन आपला करुणाकर फिरवताच तापाने होरपळणारी तनू निमिषात शांत झाली. महाराजांच्या हस्त स्पर्शाने क्षणार्धात त्यांच्या देहामध्ये पडलेला विलक्षण फरक त्यांच्या प्रगाढ निष्ठेला कारणीभूत ठरला. त्या निष्ठेतच महाराजांच्या दिव्य शक्ति सामर्थ्यांचे दर्शन कृष्णा लाडांना आजन्म मिळत राहिले.

एकदा सर्व भक्तासमवेत श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्यासाठी सहभोजनाचे प्रयोजन लक्षतीर्थ येथे करण्यात आले होते. जागेची साफसफाई करण्यासाठी म्हणून कृष्णा लाड आधी पुढे गेले होते. त्या तीर्थाच्या घाटावरील शेवळलेल्या पायरीवरुन पाय घसरुन ते पाण्यात पडले. त्यांचे पाय कमल वेलात गुरफटून ते पाण्यात बुडू लागले. पोहण्यात तरबेज असलेले धडधाकट मल्ल पण या प्रसंगाने पुरते गांगरुन गेले. प्राण वाचविण्यासाठी त्यांची केविलवाणी धडपड चालू होती. हातापायांच्या चाललेल्या शेवटच्या खटाटोपात त्यांनी मनोमनी महाराजांचे स्मरण करताच ते घाट काठावर फेकले गेले! त्यांनी सुटकेचा श्वास टाकला तो महाराजांच्या जय जयकारातच! गजेंद्राच्या हाकेला धावणारा वैकुंठेश्वर श्री गुरुंच्या रुपात आपल्याला मिळालेला आहे. त्यांच्या भक्ती सेवेपुढे अधिक सुख - सौख्य, काय भार्या मुले संसारात मिळणार? या विचाराने ते पूर्ण विरक्त बनले. त्यांचे वैराग्य पाहून महाराजांनी पण त्यांना यथाकाली दीक्षा दिली. भगवे वस्त्र परिधानास दिले. श्रावण वर्षाकाली महाराज कृष्णा लाडाला म्हणाले ''कृष्णा आज वीज भेटायला येणार आहे बघ!'' यानंतर कांही वेळाने दुपारच्या जेवण्याची भांडी स्वच्छ धूत असता आधिच चालू असलेल्या श्रावणधारेतून मेघ गर्जना करीत विद्युल्लतेने आगमन केले. कान गडप

करणारा प्रचंड आवाज आणि पुढ्यातील भांड्यावरुन पुढे गेलेला दिव्य अग्नी लोळ पाहून कृष्णा लाड अवाक् झाले. दोन तीन दालनातून माहितगार व्यक्ती प्रमाणे वीजेने शायनागारात जाऊन महाराजांना प्रदक्षिणा काढली; नव्हे आपल्या दिव्य तेजाने ओवाळणी करीत औदुंबर वृक्षी निघून गेली.

द्वापारयुगात कंसाच्या करातून निसटून गेलेली यशोदा नंदिनी वीज या कलियुगात ह्या कृष्णाला आपल्या लाडक्या बंधुला आपल्या दिव्य तेजाने भाऊबीजेप्रमाणे ओवाळणी करुन चिरंतन स्मृतीमागे ठेवून गेली! तो दिवस होता बंधु-भगिनींच्या प्रेमाचा! नारळी पौणिमा रक्षा बंधनाचा! ह्याच औदुंबर वृक्षाखाली महाराजांची चरण सेवा कृष्णा लाड आणि वासुदेव दळवी करत होते. अलक्षलक्षी रक्षण करणाऱ्या ह्या महाराजांनी आपल्या अंगावरचा शर्ट व कोरडी छाटी पिळत ''धरा! धरा!'' असे म्हणत ओंजळभर पाणी काढून ते वासू कृष्णाना पिण्यास दिले ते अगदी खारट समुद्रातील पाण्याप्रमाणे होते! त्याच क्षणाला एक राजापूरचा व्यापारी समुद्र तुफानात बुडून मरण्याच्या अंत्य घडीला पोहचला होता. त्याने फक्त महाराजांचे स्मरण करताच त्याला त्या समुद्रावर महाराजांची मूर्ती दिसली! क्षणार्धात एका हाताच्या कोपर ठोशाने त्याचे बुडणारे जहाज किनाऱ्याला पण थडकावले! त्याला मृत्यूच्या जबड्यातून महाराजांनी सोडवले!

महाराजांच्या ही अगम्य शक्ति व लीला पाहून महाराजांचे गुरु किती सामर्थ्यशाली असतील? आपण त्यांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे! हा विचार कृष्णा लाडांनी महाराजांना बोलून पण दाखवला. ''तुझे मानस तात्यासाहेबांचे दर्शन घेऊ इच्छिते काय? बरं! बरं होईल तुझी इच्छा पूर्ण!'' महाराज तेंव्हा उद्गारले ! लाडक्या भक्ताच्या इच्छेला महाराज तरी मग कशाला विलंब लावणार! लगेच कृष्णा लाडांना स्वप्नात दृष्टांत झाला. एका भव्य मंडपामध्ये सिंहासनाधिष्ट वैराग्याचा मेरु भवार्णवीचे तारु अक्कलकोटीचे जगद्गुरु अजानुबाहू नृसिंहभान सरस्वती विराजले असून, त्यांच्या उजव्या बाजुला उभे असलेल्या श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी स्वामी समर्थगुरुंचे पदवंदन करण्यास कृष्णा लाडांना नेत्र संकेताने सुचविले. कृष्णा लाडांनी पण विनम्रपणे गुरुची आज्ञा झेलत परमेष्ठींना साष्टांग प्रणिपात केला! डोळे भरुन त्या जगनियंत्याचे मनसोक्त दर्शन घेतले.

स्वप्न दृष्टांतामधून कृष्णा लाड जागे झाले. गुरुंच्या गुरुंचे दर्शन गुरुंनी दिलेल्या तृप्त मानसिक समाधानाने ते धन्य झाले. या साक्षात्कारानंतर मध्यंतरी बरीच वर्षे लोटली होती. ह्या कालावधीत स्वामी नृसिंहभान सरस्वती अक्कलकोट महाराज समाधीस्त पण झाले होते आणि नंतर श्रीकृष्ण सरस्वती महाराज कृष्णा लाडांच्यासह कांही निवडक शिष्य भक्तांसमवेत पंढरपूरहून अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या समाधी मंदिरात आले होते. दर्शन घेत असता कृष्णा लाडांच्या मनात स्वामी समर्थांच्या रुपाविषयी विकृत विचार डोकावले त्याचक्षणी ते उद्गारले, ''हा काय माझ्या गुरुंचा गुरु?'' निर्मिषात उभ्या असलेल्या इतर गुरु बंधुच्या बरोबर समाधीचे दर्शन घेणाऱ्या कृष्णा

लाडांना विना देह आकृतीचे शब्द कानावर पडले ''मुर्खा ! हा असला द्वाडपणा सोड आणि पहा ! उघड्या डोळ्यांनी बघ! या अक्कलकोटच्या गुरुशिष्याची विष्ठा तुझ्या सर्वांगास लागली आहे.'' कृष्णा लाड त्या विष्ठेने प्रत्यक्ष परिपूर्ण माखले गेले होते. जवळील त्यांचे गुरुबंधू त्यांना विचारत होते. ''काय कृष्णा! समर्थाचे दर्शन घेत असता, काय ही दुर्गंधीत विष्ठा तुला कुठली लागली आहे?'' जागृती स्वप्न सुषूप्ती ह्या कुठल्या अवस्थेत आपण आहोत ह्याचे कृष्णा लाडांना भानच राहिले नाही. गुरु बंधुनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देतांना भक्ति मनातील विचारांबरोबर झालेला हा साक्षात्कार कृष्णा लाडांनी त्यांना निवेदन करीत शेवटी सांगितले'' ''गुरुंचे गुरु हे समाधिस्त खरे, पण इथे नको असलेल्या विष्ठे प्रमाणे केलेला दुर्गंधीत कुतर्क मला नडला आणि महाराजांनी तो भ्रम क्षणात दूर पण केला!''

विशिष्ठ उद्देश साध्य करण्यासाठी एकदा महाराजांनी तारामती सह सर्व भक्तांना सोडून वासू दळवी व कृष्णा लाडांना घेऊन प्रयाग तीर्थाहून सह्याद्री पर्वताकडे धाव घेतली. डोक्याला घेरी येणाऱ्या दऱ्यात उतरुन गगनाला भिडणारे कडे ते अनवाणी काटेरी मार्ग अवलंबत होते. निसर्ग देवतेचे नयनरम्य दर्शन बरोबर आक्राळ विक्राळ, क्रूर, महाभयंकर दृष्ये त्यांच्या पुढे तरळत होती.

महाराजांच्या आज्ञेने मार्गात पडलेल्या एका अजस्त्र अजगराला कृष्णा लाडाने तृणपेंढीसम उचलून बाजूला दूर फेकून दिले. वाघ, डुकरे तर महाराजांसह ह्या दोन जयविजयासम असणाऱ्या शिष्यांना पाहून भयभीत होऊन दूर पळत होती. ह्या हिंस्त्र क्रूर जनावरांच्या दृष्टीला हे त्रयमूर्ती कसे दिसले असतील? क्षुधा तृषेने तळमळत असलेल्या या भक्तांना चार दिवसांनी एक गांव दिसले. झाडापाला खाल्लेल्या आतड्यांना अन्नाच्या घासाचा ध्यास लागला होता. महाराजांनी पूर्ण भाकित केल्याप्रमाणे व वासू दळव्यांनी गुर्वज्ञा उल्लंघल्यामुळे ''चोर लुटारु'' समजून या त्रयमूर्तींना कैदेत ठेवण्यात आले. वासू कृष्णांना मग महाराज म्हणाले, ''आता गंमत पहा हं!'' त्या पहारेकऱ्यांच्या समोरुन महाराज सरळ बाहेर पडले व तेथील पाटलाच्या बायकोकडून भाजी भाकर घेऊन आले. पाटलाच्या बायकोने तिघांना एक भाकरी कशी पुरेल म्हणून आणखीन दोन भाकरी घेऊन आली व चार दिवसानंतर त्या त्रयमूर्तींनी प्रथमच अन्न भक्षण करुन थोडी क्षुधा शमवली, त्या गांवचा कोतवाल महाराजांचा भक्त निघाला. त्याने या सर्वांचा आदर सत्कार करुन कैदेतून सुटका केली.

यानंतर या सर्वांनी गावकऱ्यांचा निरोप घेऊन दुसऱ्या गांवाकडे प्रयाण केले. दुसऱ्या गांवात प्रवेश करताच तेथील इनामदाराने वाटेवर येऊन महाराजांना साष्टांग प्रणिपात केला. त्यांच्या हाताला धरुन महाराज आतुरतेने त्यांच्या घरी गेले. त्या इनामदारांने महाराजांसह वासुकृष्णांना सुवासिक तेल लावून गरम पाण्याने स्नान घातले. तीन चार दिवस त्या इनामदाराच्या भक्ति सेवेचा मनमुराद स्वाद घेतल्यावर आणि इनामदाराने तयार केलेल्या शकटा रोहणाने महाराज राजापूरला रामभाऊ वैद्यांकडे गेले. ''कोल्हापूरचा दत्त'' म्हणून उभ्या राजापूर गांवाने महाराजांच्या

चरणावर लोटांगण घातले. एक दिवसात नारळ खारिकांच्या ढिगासह त्यावेळच्या स्वस्ताईत १०० रुपयावर खजिना भांडार जमा झाले. रामभाऊ वैद्यांनी कृष्णा लाडाला तो देऊ करत असता नाकारला व महाराजांच्या बरोबर ते २१ दिवसांनी कोल्हापूरला परतले. कृष्णा लाड नेहमी स्वत:च्या गळ्यात महाराजांच्या पादुका धारण करीत असत. त्यांच्या मातोश्रींच्या हातून आयुष्यात बरेच पापाचारण झाले होते. अंत्य घडीच्यावेळी तिला डोळ्यासमोर अंत्यजांचा थवा दिसला ती कृष्णा लाडांना म्हणाली, ''हे इतुके कशाला रे मुला! काढ त्यांना हाकलून!'' कृष्णा लाडानी ओळखले आयुष्यात केलेली ही क्रूर पापे सदृष्यपणे आता डोळ्यापुढे उभी राहिलेत. त्यांनी स्वत:च्या गळ्यातील महाराजांच्या पादुका काढून त्या मातेच्या गळ्यात घातल्या लगेच त्या मातोश्रीला त्या अंत्यजांच्या ऐवजी तिथे ब्रम्हवृन्द दिसला! तिच्या मुखीचे ब्रम्हवृन्द हे शब्द कृष्णानी ऐकताच ''काय हा गुरु पादुकांचा प्रभाव आहे,'' ह्या पादुका नव्हेत तर ह्या जीवन नौका आहेत म्हणून त्यावर कृष्णा लाड नतमस्तक झाले! त्यांची आई वारली! तिला सद्‌गती मिळावी म्हणून काकुळतेने कृष्णा लाडांनी महाराजांना प्रार्थना केली. तेव्हा महाराज उद्‌गारले आधी येथेची आणू पोरगी ! मग पाठवू मागील मार्गी ! अनायसे साधीली सुगी। निवास स्वर्गी होईल । ह्या उक्तिप्रमाणे लाडाच्या आईस श्वान गती प्राप्ती झाली. शिवूबाई ह्या महाराजांच्या सेवक शिष्याजवळील कुसारी कुत्री ही कृष्णा लाडांची आई होय. या कुत्रीचे महाराजांसह सर्व भक्तगण एखाद्या प्रिय व्यक्तीप्रमाणे लाड करीत असत यथा काली महाराजांच्या कृपेने तिला मुक्ति मिळून वैकुंठास उध्दरुन गेली.

भक्तियुक्त अंत:करणाचे कृष्णा लाड भजन गायनात रमून जात. अभंग गाथेत गाईलेली ज्ञानेश पंढरीनाथांची थोरवी पाहून आळंदी पंढरी पाहण्याची अनिवार इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. महाराजांची पूर्ण अनुमती नसतांना महाराजांच्या इच्छेविरुध्द आळंदी पंढरीच्या वारीसाठी कोल्हापूर सोडले. प्रथम ते मिरजेच्या दोन्ही नेत्रांनी अंध असणाऱ्या रामदासी बाबा गाडगीळ या संत पुरुषाच्या दर्शनास गेले. तेथे लाड जाताच ''चिंतामणी टाकून खडे गोळा करायला आलास का?'' असे म्हणून त्यांनी लाडाकडे पाठ पाठविली. लाड फिरुन जाऊन त्यांच्यापुढे चरण स्पर्श करताच गाडगीळ बाबा म्हणाले, ''अमृतोदधी जवळ असतांना ओढे नाले शोधत आला आहेस काय?'' म्हणून लाडांना त्यांनी गाली प्रदान केले. तरी लाडांना या उक्तितला अर्थ अजिबात उमगला नाही. मग कृष्णा लाड आळंदी वाटेस लागले. त्यावेळच्या जमान्यात चोर लुटारुंचा सुळसुळाट होताच. अधिक सदगुरुची आज्ञा उल्लंघली म्हणून त्यांना कुणी भिक्षा घालीत नसत तर विश्रांतीसाठी कुठे पहुडले तर लाडाना गांवातील वाटसरु गोसावी वेषातील हा लुटारु ! चोर असावा ह्या कल्पनेने बोवा पुढच्या गांवात विश्रांती करा. खरे तर आता इथून उठा! असे म्हणत जवळ जवळ त्यांना हाकलून काढीत असत. मुठभर भिक्षा त्यांना कुणी दिली नाही तेंव्हा लाड किती लोक पाखंडी-नास्तिक होत निघालेत! असा दोषारोप करीत.परंतू त्यांची चूक त्यांच्या

लक्षात आली नाही. केवळ जल प्राशनाने क्षुधा तृष्णेचा वणवा शांत करीत सव्वाशे मैलाचा पायी प्रवास हतबल होऊन एकदाचे आळंदी क्षेत्रात प्रवेशिले. समय रात्रीचा नुकतीच शेजारती होऊन गेलेली होती. प्रवासातील थकव्यामुळे ते सरळ विना समाधी दर्शन घेत निद्रीस्त जाऊन पहुडले.

रात्री स्वप्नांमध्ये एक ब्राम्हण लाडांना म्हणाले, ''काय बोवा! केव्हां केव्हां भिकेचा नाद लागतो की काय वाटते, म्हणून तुम्ही इकडे शिळे तुकडे मागत आला?'' लाड म्हणाले 'का, रागवता मी आलो माऊलीच्या दर्शनाला ''मग का नाही झाले अजून दर्शन?'' असे ते ब्राम्हण म्हणता लाड त्यांना सांगते झाले ''मी आलो रात्री शेजारतीनंतर उशिरा!'' त्यावर ते ब्राम्हण म्हणाले, ''जरी उशिर झाला असला तरी तुम्हाला कोण मज्जाव करणार होतं? दर्शन हे इच्छेनुरुप असते!''

असे ब्राम्हण म्हणत असता कृष्णा लाड स्वप्न दृष्टांतामधून जागे झाले. द्विज रुपात ज्ञानेश्वर माऊलींनी दर्शन दिले हे त्यांनी ओळखले. भक्ति मार्गातील ज्ञानबोध ज्ञानेश्वर माऊलीच्या शिवाय दुसरे देणार तरी कोण? मिरजेच्या गाडगीळ बाबांच्या उक्तितला अर्थ आता त्यांच्या लक्षात आला. महाराजांना आपण सोडून आलो हे गाडगीळ बाबा आणि ज्ञानेश्वर माऊलींना आवडले नाही ही चूक लाडांच्या लक्षात आली. दुसऱ्या दिवशी इंद्रायणीत स्नान करुन माऊलींच्या समाधी दर्शनासाठी आले. दर्शन घेत ते म्हणाले,

**''ज्ञानेश्वरा तूची श्रीकृष्ण । तूची माझा स्वामी पावन ।**
**नाही कळले तव महिमान । आलो म्हणून ये ठायी ।**
**श्रीगुरु कृष्ण सरस्वती । ज्ञानेश्वरा तुझीच मूर्ती ।।**
**नेणे माझी अल्पमती । कळले शेवटी परी ।।''**

अशी करुणा भाकून आळंदी क्षेत्रात भिक्षेसाठी फेरी केली, कोल्हापूर सोडल्यानंतर प्रथमच त्यांना पोटभर मधुर भिक्षा मिळाली. एक दिवस त्यांनी तेथेच विश्रांती घेतली. माऊलीला जिव्हाळ्याचा निरोप दिला. कोल्हापूरच्या ऐवजी पंढरीचा मार्ग धरला. परत उपासमार । परत जन समाजातून तिच बोळवण । त्याच देहकष्टाच्या हाल अपेष्टातून चार दिवसांनी पंढरपूर क्षेत्रात आगमन केले. पंढरीनाथांचे त्यांनी कलकललेल्या अंत:करणाने डोळे भरुन दर्शन घेतले.

त्या रात्री परत लाडांना दुसरे स्वप्न पडले. एक काळा एक गोरा द्विज संभाषण करीत असून स्वत: लाड ते जवळच बाजुला राहून ऐकत आहेत. एक दुसऱ्यास विचारत आहे ''हे कोण? इथे का दडला आहे असा'' दुसरा द्विज म्हणतो ''तिकडे त्याचे भरेना पोट म्हणून आला आहे इकडे, शिळे तुकडे मागायला! श्रीकृष्ण गुरुचा श्रेष्ठ भक्त हा खरा, तरी पण आम्हाला त्याचा वीट आला आहे!'' ह्या विप्रसंवादातून खजिलपणे लाड जागे झाले. त्यांच्या लक्षात आले. श्री गुरुंचे चरण सोडले हे पंढरीनाथ व ज्ञानेश्वर माऊलींना आवडले नाही व म्हणून त्यांच्या आपण कृपेला आता दुरावलो आहे. दुसऱ्या दिवशी मग हाल अपेष्टांनी झडती, दिलेल्या स्वत:च्या देहास इंद्रायणी

प्रमाणे पवित्र पतितास पावन करणाऱ्या चंद्रभागेत स्नानाभिषेकच घातला म्हणावयाचा. देहाचे एकवटलेल्या त्राणांनी नयनाश्रुतून त्रयलोक्याचा लावण्यगाभा पाहिला आणि मग क्षीणात क्षीण होत निघालेल्या आवाजात गल्ली बोळातून भिक्षेसाठी फेरी मारली ! पण व्यर्थ !

पंढरी म्हणजे पतितांचा उध्दार करणाऱ्या दीनांचा कैवारी म्हणून मिरवणाऱ्या विठुरायाच्या त्यावेळचं चार सहस्त्र धार्मिक लोकवस्तीने गजबजलेल्या संत सम्राटांच्या या राजधानीत चार घास भिक्षा या कृष्णा लाडाला कुणी घातली नाही. श्रीकृष्ण सरस्वतींच्या या लाडक्या लाडाचा पाहुणचार पंढरीनाथाने असा केला कारण की, श्री गुरुंची गैरमर्जी हे कृष्णा लाड परिपूर्ण जाणत होते. क्षुधा तृष्णेने मृत्यू सामोरे जात असतांना सुध्दा कोणत्याही प्रकारच्या असूयानी पंढरीनाथांना दोष देण्याचा विचारही लाडाच्या मनाने केला नाही . एवढी त्यांची भक्ति विनयशील व जागृत होती आणि त्याच विनयशील भक्तितून त्यांनी पंढरीनाथाच्या शिखरास शेवटचा नमस्कार केला. व्याकूळ झालेल्या तशा अवस्थेत कोल्हापूरचा मार्ग धरला. मनोमन सद्गुरुंना शरण जाऊन त्यांनी प्रार्थना केली. जर मी जगलो वाचलो तर तुमची चरण सेवा आमरण करीन! आणि आतांच जर मरण आले इथूनच तुम्हाला प्रणिपात अशा विचारात ते जड अंत:करणाने एक एक पाऊल पुढे पुढे टाकत निघाले.

आळंदी क्षेत्रात ज्ञानेशानी दिलेल्या भोजनाव्यतिरिक्त आत्तापर्यंतच्या १० दिवसात त्यांच्या पोटात अन्न नव्हते. २५० मैलाहून अधिक झालेल्या पायी प्रवासाने मल्लाप्रमाणे असणारी देहयष्टी पूर्णपणे ढेपाळली होती. नेत्रांतर्गत प्राण गरागर फिरत असता हेलपांड्या जाऊन ते एक वृक्ष छायेत मुर्च्छा येऊन पडले. तेंव्हा त्यांना तृतीय स्वप्न पडले. एक विप्र त्यांना म्हणाला,''रथी बैसला सूर्यनारायण! आता तुज काय चिंतेचे कारण?''

हे ऐकून कृष्णा लाड जागे झाले. समोर एक शेतकरी अबला त्यांना खुशाली विचारत होती. तिने हे गोसावी महाराज भुकेने व्याकुळ झालेले पाहून पतीसाठी आणलेली आपल्या जवळची शिदोरी सोडून तिने लाडाला खावयास दिले. त्यांच्या अंगात थोडे प्राण आले. तिने आग्रह करुन शेजारीच असणाऱ्या स्वत:च्या शेतात लाडांना नेले. पतीसहीत तेथील कामगार लोक भगवतभक्त होते. तेथे जाताच,''गोसावी महाराज'' म्हणून सगळ्या लोकांनी लाडांच्या चरणावर डोके ठेवले. लाडाला पुन्हा तेंव्हा उत्तमपैकी जेवण देण्यात आले. एक दिवसाच्या विश्रांतीने लाड कोल्हापूरच्या वाटेला लागले. तेंव्हा त्यांना दोन दिवस पुरेल एवढी शेंगा कणसांची शिदोरी त्या शेतकरी अबलेने दिली. यानंतरचा प्रवास सुखरुप होऊन कृष्णा लाड विनासायास कोल्हापूरला वैराग्य मठीत आले.

वैराग्य मठात प्रवेश करताच महाराज त्यांना म्हणाले, ''काय बुवा हिंडून फिरुन झाले की नाही?'' महाराजांना नमस्कार करीत लाड म्हणाले, ''महाराज! माझी चूक झाली! मला आता क्षमा करा! अज्ञानाने तुम्हाला सोडून गेलो व दारुण यातना भोगून आलो! आता मात्र तुमच्या चरण सेवेत कधी नंतर पडू नये! गुरुराया एवढी माझी इच्छा पूर्ण करा!'' महाराज म्हणाले, 'आता

एकांतवासच धरा'' कृष्णा लाड परत मनात अधिकच चरकले. आपल्यावर महाराज अधिक रागावले आहेत असा त्यांचा विचार झाला. गुरु आज्ञेप्रमाणे त्यांनी एकांतवास धरला. कुणाशीच एकही शब्द न बोलता अगदी मौनव्रत स्वीकारले. मात्र ते मनातच्या मनात स्वत:शीच फार दु:ख करु लागले. गुरुंच्या मर्जीतून आपण उतरलो? त्यांच्या क्रोधालाही अपात्र ठरलो अशी ते स्वत:शीच खंत वाढवीत असतांना मग एकदा अशाच विचारात त्यांना दृष्टांत झाला.

एक तरुण युवती लाडांना मनसोक्त स्तनपान करत आहे व लाड पण लाडीकपणे एखाद्या शिशू सेवेने आकंठ स्तनामृत पित आहेत. बराच वेळाने कृष्णा लाड भानावर आले! आपण वयोवृध्द असून एखाद्या लहान किशोरप्रमाणे स्तनपान कसे करत आहोत? ह्या विचाराने ते स्वप्नातल्या स्वप्नातच फार ओशाळले व त्या ओशाळलेल्या क्षणालाच मग ते जागे पण झाले! परंतू हे स्वप्न तरी कसे म्हणावयाचे? स्वप्नातले ते स्तनामृताचे थेंब जागृतपणे पण कृष्णा लाडांच्या ओठी गाली ओंघळत होते!

''आम्हांला तुझा बिलकुल राग आला नाही'' हे वत्सल ममतेने श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी लाडक्या कृष्णा लाडांना पटवून दिले! कृष्णा लाड सद्‌गुरुंच्या प्रेम गंगेत असे अथांग न्हावून निघाले होते! तू जीवन मुक्त आहेस! असे म्हणून महाराजांनी त्यांना जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त केले होते! पंचगंगेच्या ब्राम्हण घाटा पलिकडील घाटास राजपूत घाट म्हणत. तो घाट आज परिपूर्ण उखडला गेला आहे. कृष्णा लाडांची देहवसनानंतर तेथे तुळशीवृंदावना सहीत एक स्मारक शिला त्यावर पादुका करुन बसवली होती. पंचगंगेच्या दरवर्षी येणाऱ्या महापूराने लाडांची ती स्मारक शिला वाहून गेली! कृष्णा लाडाचा स्वभाव मनमिळावू, शांत, निगर्वी होता. उभ्या आयुष्यात त्यांचे कुणाशीच भांडण झाले नव्हते, तपस्वी देव माणसाप्रमाणे त्यांचे शुध्द आचरण होते. त्यामुळे महाराजांसहीत सर्व भक्तगण त्यांना ''देव बुवा'' म्हणून संबोधित होते.

लाडाचे गुरुबंधू स्व. नामदेव महाराज चव्हाण यांच्या स्व. धर्मपत्नी सौ. गंगाबाई रोज पहाटे तीन वाजता पंचगंगेवर स्नान व कपडे धुण्यास जात असत. गंगाबाई एकदा एक वाजताच तीन वाजले समजून पंचगंगेवर गेल्या. त्यांच्या घरच्या जवळील तहसीलदार कार्यालयातील घड्याळाप्रमाणे दर तासाला एक ह्याप्रमाणे घंटा-टोल दिले जात असत! ह्यावेळी एक वाजताच तिथल्या शिपायाने एकच्या ऐवजी तीन टोले मारले म्हणून ह्या सौ. गंगाबाई तीन वाजले समजून पंचगंगेवर आल्या. तेंव्हा देहवासानंतर प्रत्यक्ष कृष्णा लाड सदेह तिथे प्रगट होऊन गंगाबाईना म्हणाले ''आज तुम्ही ह्या मध्यरात्री एक वाजताच आला! तीन वाजले नाहीत पण झोपेतच त्या शिपायाने एकच्या ऐवजी तीन टोल मारलेत. परत इतक्या मध्यरात्री तुम्ही इकडे येऊ नका! ह्या पारावर एक समंध आहे व पेरु बागेच्या चिंचेवर एक नालायक (पिशाच्च) आहे. तेंव्हा आज मी तुम्हांला पोहचवायला येतो.'' असे म्हणून गंगाबाईचे काम अटोपल्यावर कृष्णा लाड भोपेरावाच्या वाड्यापर्यंत पोहचवण्यासाठी आले. शेवटी गंगाबाईची कौटुंबिक खुशाली विचारुन झाल्यावर ते

अंतर्धान पावले.''अलिकडच्या कांही वर्षापूर्वी लाडाच्या संदर्भात त्यांच्या समाधी स्मारकाच्या जागेकडे हात दाखवीत पंचगंगेवरील घाटावर श्री समर्थ चिले महाराज आमच्या पूज्य मातोश्री स्व. श्रीमती सीताबाई शांताराम नाडकर्णीला म्हणाले, ''अगं देव बुवा इथेच आहे असे आपण समजायचे. जरी शिळा वाहून गेली तरी त्याला नाही म्हणायचे नाही हं!''

श्री कृष्णा लाड म्हणजे सदगुरु श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या गळ्यातील अनमोल कौस्तुभच होय. श्री कृष्णा लाडांनी भक्ति सेवा करुन श्री कृष्ण सरस्वती महाराजांशी अशी सायुज्जता मिळवली!

संदर्भ ग्रंथाचे नांव :- **श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज लीला मासिक**
पुण्यतिथी विशेषांक दि. १५/८/१९९०
लेखकाचे नांव :- **श्री. बा. शां. नाडकर्णी**



स्व.कृष्णा लाड उर्फ देवबुवा

# वंदनीय रामदासी गाडगीळबुवा, कृष्णाघाट मिरज

एकदा कार्तिक माहिन्यात कृष्णा लाडाने श्री क्षेत्र पंढरपूरला श्री. विठ्ठल दर्शनाला जाण्यासाठी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज (श्री कुंभारस्वामी) यांचेकडे परवानगी मागितली. श्री स्वामी कृष्णा लाडाला म्हणाले ''माझ्या रुपातच श्री पांडुरंगाला पहा. उगीच देहाला कष्ट देवून पंढरपूरला जाऊ नको'' परंतु श्री स्वामींचे हे बोलणे कृष्णा लाडाला रुचले नाही, पटले नाही. पुन्हा पुन्हा कृष्णा लाड श्री स्वामींची श्री क्षेत्र पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला जाण्याची परवानगी मागू लागला. शेवटी श्री स्वामींनी त्याला नाईलाजाने श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्याची अनुमती / परवानगी दिली. परंतु प्रवासात यातना होतील. पडत्या फळाची आज्ञा मानून कृष्णा लाड श्री क्षेत्र पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला निघाला. प्रथम मिरजेत आला. त्याकाळी मिरजेत वंदनीय रामदासी गाडगीळबुवा म्हणून थोर सत्पुरुष होते. कृष्णा लाड त्यांच्या दर्शनाला गेला. कृष्णा लाड गाडगीळबुवांचे दर्शन घ्यायला जाताच गाडगीळबुवा त्याला रागाने म्हणाले ''श्रीकृष्ण गुरु. जाऊ नको म्हणतांना त्यांची आज्ञा मोडून कां आलास? गुरु वचन मोडणारा भक्त आम्हांला आवडत नाही. श्रीकृष्ण गुरू सागर असतांना माझ्या सारख्या ओढ्याला भेटणेस कां आलास? चिंतामणी सोडून खड्याला कां भुललास? तुझा स्पर्शसुध्दा नको. माझे दर्शन घेवू नकोस. चालता हो'' अशा रीतीने वंदनीय गाडगीळबुवांनी कृष्णा लाडाची श्रीकृष्ण गुरुंचे वचन मोडले म्हणून, आज्ञा भंग केला म्हणून निर्भत्सना केली.

या वंदनीय गाडगीळबुवांचे पूर्ण नांव स्व. महादेव प्रभाकर गाडगीळ, गाडगीळबुवांचे मूळ घराणे वेळणेश्वरचे (ता. गुहागर). त्यांच्या वडीलांचे नांव वेदशास्त्र संपन्न प्रभाकर गाडगीळ. वंदनीय गाडगीळ यांच्यावर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार उत्तम झाले होते. त्यांचा जन्म इ.स. १८६० साली मिरजेत झाला. घरात वडिलोपार्जित भिक्षुकी चालत असल्यामुळे व लहानपणापासून त्याच वातावरणात वाढल्यामुळे त्यांच्यावर उत्तम संस्कार झाले होते. त्यातूनच त्यांनी वेद अध्ययन करुन वेदशास्त्र संपन्न शास्त्री पदवी मिळवली होती. लहानपणीच त्यांच्या एका डोळ्याची दृष्टी गेली होती. त्यांचा सर्वस्व ओढा श्री दत्त भक्तिकडे होता. श्री दत्त उपासनेमुळे ते सतत नृसिंहवाडीस वास्तव्य करीत. बारा वर्षे कठोर तपस्या त्यांनी नृसिंहवाडीत केली. त्यावेळी कृष्णा नदीला पूल नव्हता. पावसाळ्यात कृष्णा नदीला पूर आल्यावर गाडगीळबुवांची आज ज्या ठिकाणी समाधी आहे त्या ठिकाणी बसून नृसिंहवाडीकडे तोंड करुन ते तपाचरण करीत. कांही काळ त्यांनी श्री सज्जनगडावर वास्तव्य करुन श्री रामदास स्वामींच्या दासबोध ग्रंथाची अनेक पारायणे केली. श्री रामदास स्वामींच्या विचारानी त्यांना भारावून टाकले होते. सज्जनगडावर ते वास्तव्याला असल्यामुळे त्यांना रामदासी म्हणत, समर्थ म्हणीत. पुढे पुढे त्यांच्या दुसऱ्या डोळ्याची दृष्टीही गेली. त्यांची समाधी मिरजेच्या पुण्यभूमी कृष्णाघाटावर वॉटर वर्क्सच्या परिसरात आहे. त्यांची पुढील पिढीची माहिती खालील प्रमाणे-

त्यांच्या लहान भावाचे नांव स्व. जनार्दन प्रभाकर गाडगीळ, स्व. जनार्दन प्रभाकर गाडगीळ यांना एकच मुलगा. त्यांचे नांव स्व. हरि जनार्दन गाडगीळ (भावाचा मुलगा-नातू)

स्व. हरि जनार्दन गाडगीळ यांना एकूण तीन मुले

१) स्व. प्रभाकर हरि गाडगीळ :- यांना १) भास्कर व २) शरद (मयत) ही दोन मुले

२) स्व. पंडित हरि गाडगीळ :- ब्रह्मचारी होते

३) स्व. हणमंत हरि गाडगीळ :- यांना दोन मुले

(अ.) श्री माधव हणमंत गाडगीळ (ब.) स्व. मिलींद हणमंत गाडगीळ - हे ब्रम्हचारी होते

श्री माधव यांना दोन मुले श्रेयस, तेजस ही दोन मुले

श्री वंदनीय रामदासी गाडगीळ बुवा हे अंध होते. ते वेदशास्त्र संपन्न श्री नृसिंह सरस्वती कृपापात्र थोर उपासक होते. तसेच समर्थ रामदास भक्त होते. गाडगीळ बुवांचा मिरजेत ब्राम्हणपुरीत वाडा आहे / होता. त्यांची समाधी मिरज कृष्णाघाटावरील वॉटर वर्क्सच्या कंपाऊंड मध्ये रस्त्यालगत आहे. त्यांच्या समाधीला समर्थ रामदासीबुवांची समाधी म्हणतात. दगडी चौथऱ्यावर वीट बांधकामाची घुमटी असून, त्यात त्यांच्या पादुका आहेत. शेजारीच राऊळ बुवांची समाधी आहे. निरंजन रघुनाथांची समाधी आहे. कुंभार स्वामींचे शिष्य श्री कृष्णास्वार (बुवा) यांची समाधी आहे तर जवळच श्री दत्तावतार आण्णाबुवांची समाधी आहे.

शब्दांकन :- **श्री. माधवराव गाडगीळ, मिरज**



स्व.वंदनीय गाडगीळबुवा यांची समाधी, कृष्णाघाट मिरज

# ऐतवड्याचा देवगोंडा माहिती

ऐतवडे (बुद्रूक) ता. वाळवा, जि. सांगली येथे देवगोंडा पाटील रहात होता. शेत जमीन भरपूर होती. मोठा दगडी वाडा होता. दोन भावासह देवगोंडा पाटील आनंदाने एकत्रीत रहात होता. परंतु वेळ फिरली आणि देवगोंडाला वेळ वाईट आली. दिवस वाईट आले. देवगोंडाला महारोग झाला. त्याला खूप वाईट वाटले. परंतु त्याकाळी महारोगावर विशेष औषध उपचार नव्हते. हा संसर्गजन्य रोग असल्याने घरच्या मंडळींनी म्हणजे सख्ये भाऊ तसेच पत्नीने सुध्दा शेतात जाऊन राहण्याचा त्याला सल्ला दिला. देवगोंडाला खूप वाईट वाटले. जो संसार, जे नातलग त्याला आपले वाटले, स्वत:च्या पत्नीनेही त्यांना गांवा बाहेर, शेतात राहण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांचे संसारातील मनच उठले. देवगोंडाला त्याच्या भावानी गांवा बाहेर शेतात रामेश्वराच्या देवळाजवळ राहण्यासाठी झोपडी घालून दिली. त्याच्या कुटूंबीयांनी व गांवातील लोकांनी महारोगी म्हणून त्याची हेटाळणी केली. देवगोंडा अतिशय दु:खी झाला. या जगात एक सद्गुरु वाचून कोणी वाली नाही असा विचार करुन तो नृसिंहवाडीला आला.

रोज नदीत अंघोळ, श्री दत्त पादुकांचे दर्शन, भिक्षा मागून पोट भरु लागला. त्याचा महारोग दिवसेंदिवस वाढतच गेला. अशी तीन वर्षे गेली. एके दिवशी त्याचा एक ''आण्णाप्पा'' नांवाचा पाहुणा जो नृसिंहवाडीला देव दर्शनाला आला होता तो भेटला. देवगोंडा आण्णाप्पाला म्हणाला ''जो पर्यंत आपण धड असतो, पैसे कमवितो, सर्वांचे चालवितो तो पर्यंत आपण सर्वांना गोड, प्रिय असतो. आता माझ्यावर कर्माची धाड पडली आहे. मला महारोग झाला आहे. मला घराबाहेर हाकलले आहे. मी आता पोरका झालो आहे. मरणाची वाट बघत आहे'' हे ऐकून आण्णाप्पालाही अतिशय वाईट वाटले. आण्णाप्पा देवगोंडाला म्हणाला ''कोल्हापूरात कुंभार गल्लीत श्री दत्त महाराज राहतात. तेही दत्ताचे अवतार आहेत. त्यांच्या कृपेने तू बरा होशील. तू चल माझ्या बरोबर'' आण्णाप्पा देवगोंडाला घेवून कोल्हापूरात आला. त्याने देवगोंडाला कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या चरणावर घातले. देवगोंडाला आता दररोज श्री दत्त महाराजांचे दर्शन घडू लागले. श्री दत्त महाराजांचे कांही भक्त देवगोंडाला महाराजाजवळ महारोग असल्याने येवू देत नसत. परंतू श्री दत्त महाराज भक्तांच्या गर्दीतून तुरुतूरू बाहेर येत देवगोंडाच्या अंगावरुन हात फिरवून आधार देत, माया करीत. बघता बघता चार महिने गेले. देवगोंडा महारोगातून बरा झाला. ही बातमी ऐतवड्याला त्याच्या भावाना व पत्नीला समजली. सर्वजण देवगोंडाला घरी नेण्यासाठी कोल्हापूरला आले. स्वामींना त्यांनी विनंती केली. पूर्वी भाऊ, पत्नी कसे वागले होते हे देवगोंडा जाणून होता. केवळ आण्णाप्पा मुळे कुंभार स्वामींच्या कृपेने आपण बरे झालो याची त्याला जाणीव होती. त्याला संसार नको होता. सद्गुरुंच्या सहवास, सेवा पाहिजे होती. तथापि, कुंभार स्वामींच्या श्री दत्त महाराजांच्या आज्ञेने त्याला संसाराकडे घराकडे जाणे भाग पडले. देवगोंडा पाटील परत पुन्हा ऐतवडे (बुद्रूक) ला आला. पुन्हा संसार करु लागला. पुन्हा पुन्हा स्वामी दर्शनाला कोल्हापूरला जाऊ लागला. त्याला एकूण पाच मुले होती.

# हजरत पिर शहाजमाल (बाबू जमाल कलंदर)
# दर्गाह शरीफ कोल्हापूर
## हिंदू मुस्लिम ऐक्याचे / सर्व धर्म समभावाचे प्रतिक
## (दर्गाह शरीफचा पूर्व इतिहास)

हजरत पिर शहा जमाल उर्फ बाबू जमाल कलंदर हा सुमारे ७०० ते ८०० वर्षापूर्वीचा जुना पुरातन पवित्र दर्गाह शरीफ असून तो सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. हे मूळचे राहणारे बल्क बुखारा (इराण) येथील आहेत. त्यांचे गुरु हजरत इब्राहिम जवाबी (रहै.अ.) यांचे सांगणेवरून हजरत पिर बाबू जमाल दिल्लीला (भारत) येथे आले. त्यांचे मूळ नाव हजरत जमालूद्दीन आहे. दिल्लीला त्यांची मुलाखत बुजुर्ग हजरत कुतबुद्दीन बख्तीयार (काकी) चिस्ती (रहै.अ.) यांच्याशी झाली. त्यावेळा दिल्लीचा बादशहा शमशुद्दीन अल्तमश हा होता. (रजिया सुलतानचे वडिल) हजरत कुतबुद्दीन बख्तीयार (काकी) चिस्ती (रहै.अ.) यांचे सांगण्यावरुन हजरत जमालुद्दीन (बाबूजमाल) हे भारताच्या दक्षिणेकडे महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात कुंभोज या गावी आले. येथील या डोंगरात त्यांचे चाळीस दिवस वास्तव्य होते. त्या दरम्यान तेथेही जैन मुनींचे वास्तव्य होते. त्या काळच्या अख्यायिका नुसार करवीर नगरीत (कोल्हापूर) भला मोठा एक राक्षस जैन मुनींना त्रास देत होता. तो कोणालाही ऐकत नव्हता. त्याच्या त्रासाला कंटाळून कुंभोज येथील जैन मुनींनी त्या राक्षसाचा बंदोबस्त करण्यासाठी बाबू जमाल यांना करवीर नगरीत आणले.

बाबू जमाल यांनी आपल्या ईश्वरी ताकदीच्या जोरावर त्या दैत्याचा नायनाट केला. तो मरतेसमयी त्यांना शरण आला व म्हणाला ''बाबा तुमच्या पायापाशी माझे दफन व्हावे'' तसे बाबांनी त्याला दफन केले. आता जी दर्ग्याची पहिलीच मोठी पायरी लागते तेथेच त्या दैत्याला / राक्षसाला दफन केले आहे. यानंतर हजरत पिर बाबू जमालचे वास्तव्य करवीर (कोल्हापूर) नगरीतच झाले. बाबा आपल्या गोड वाणीने लोकांना लोक कल्याणाचे प्रवचन करू लागले. सर्व धर्माचे लोक त्यांचे प्रवचन ऐकायला येऊ लागले. ते स्वतः जलाली असलेने तेथे स्त्रियांना येणेस परवानगी नव्हती. तरी देखील एक पाच सहा वर्षे वयाची मुलगी तेथे बाबांचे प्रवचन ऐकण्यास नेहमी येत असे. मन लावून भक्ती भावाने बाबांचे लोक कल्याणाचे प्रवचन ऐकत असे. प्रवचन संपले तरी बाबांची सेवा करीत बसत असे. मुलींच्या लोकांना ते आवडत नसे. बाबांचे व त्यांचे खटके उडत असत. एके दिवशी न राहवून मुलीकडच्या काही लोकांनी / आप्तानी बाबांचे प्रवचन चालू असताना सर्व लोकांच्या समक्ष त्यांना जाब विचारला कि ''बाबा तुम्ही जलाली, तुम्हाला स्त्री वर्ज आहे, मग ही मुलगी तुमच्या सेवेला, तुमच्या प्रवचनाला कशी चालते?.'' हे ऐकून सर्व लोक अचंबित झाले यावर बाबांनी आकाशाकडे आपल्या अल्लाहकडे / परमेश्वराकडे पाहिले व दुवा केली. मग आलेल्या जन समुदायाकडे पाहिले व सर्वांना उद्देशून सांगितले ''हे म्हणतात ते बरोबर आहे, पण हि मुलगी आहे हे जे लोक म्हणतात ते चूक आहे, हि मुलगी नसून मुलगा

आहे.'' बाबांनी तेथेच आपला दैवी चमत्कार दाखविला व त्या मुलीचा मुलगा केला व त्याचे नाव बाबु ठेवले. लोकांना उद्देशून पुन्हा म्हणाले ''माझ्या नावाच्या अगोदर याचे बाबूचे नाव घ्या'' तेथूनचं शहा जमालूद्दीनचे बाबू जमाल हेच नाव पडले. दर्गाह शरीफ मध्ये आत गेल्यानंतर उजव्या बाजूस लहान कबर / समाधी आहे ती बाबूची आहे. हजरत पीर बाबू जमाल लोक कल्याणाचे शिक्षण देत असत. त्या शिक्षणासाठी लोक त्यांच्याकडे पुष्कळ येत असत त्यांना ते शागिर्द (सेवक) म्हणत असत. शिक्षण पूर्ण झालेनंतर त्यांची परिक्षा घेऊन ती शागिर्दना दुसरीकडे लोककल्याणासाठी पाठवित असत. असेच एकदा आपल्या शार्गिदांचे / सेवकांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कठोर परिक्षा घेणेचे ठरविले. एक मोठी कढई आणून त्यात तेल ओतून ते उखळेपर्यंत गरम केले व सर्व सेवकांना म्हणाले ''मला चाहणारे (अजिज)कोण असेल तर त्याने या उखळत्या तेलात उडी मारावी.'' सगळे शार्गिद / सेवक /शिष्य घाबरले.

परंतु एक शिष्य त्या उखळत्या तेलात उडी मारण्यास तयार झाला. त्याचे नाव उस्मान मूलबन्दी. त्याने त्या उखळत्या तेलात उडी मारली. त्यानंतर बाबांनी त्याला उखळत्या तेलातून बाहेर काढले. तो लालभडक झालेला व जीवंत हे बघून बाबांच्या तोंडातून उद्‌गार बाहेर पडले. ''शहेबाज लाल शहेबाज कलंदर!.'' तेव्हापासून मूलबुंदी या शिष्याला लाल शहेबाज कलंदर ही पदवी मिळाली व ते तेव्हापासून जगामध्ये साडेतीन कलंदर मध्ये जाऊन बसले. शिष्याच्या कलंदरीतून गुरुला कलंदर हि पदवी मिळाली. तेव्हापासून बाबांना हजरत पिर बाबू जमाल कलंदर हे नाव पडले. बाबांनी लाल कलंदरला येथून लोककल्याणासाठी पाकिस्तान मधील सिंधरोयन ह्या गावी पाठवले. तेथे त्यांचे नाव तरवीलाल शहेबाज कलंदर असे आहे. त्यांना सिंधी समाज फार मानतो व झुलेलाल या नावाने संबोधतो. ह्या गुरुशिष्याचे नाते म्हणजे बाबांचे गुरु करबलाचे हजरत ईब्राहिम जवाबी (रहै.अ.) हे होय. त्या गुरुचा मुलगा उस्मान मूलबंदी म्हणजेच लाल शहाबाज कलंदर असे हे गुरुशिष्याचे नाते आहे.

असा हा पूरातन पवित्र दर्गाह असून तो सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान आहे. ह्या दर्गा शरीफचा घुमट श्रीमंत पेशवे यांनी आपल्या नवस पूर्तीसाठी बांधला आहे. पूर्वी या दर्गा शरीफच्या उरुसांचे (उत्सवाचे) गलेब व इतर खर्च कोल्हापूर संस्थान कडून मिळत असे. राजश्री छत्रपती श्री शाहू महाराज प्रतिवर्षी मोहरम मध्ये आपल्या चिरंजीवासहित येथे दर्शनसाठी येत असत. नवसाला पावणारा म्हणून भक्तगणांत ख्याती / कीर्ती असलेला हजरत पिर बाबू जमाल हा संस्थान काळातील एकमेव दर्गाह शरीफ आहे. उरुस व मोहरम हे उत्सव येथे मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येतात. ह्या पवित्र कार्यक्रमात / उरुसात सर्व धर्मीयांचे लोक मोठ्या उत्साहाने भाग घेतात. असा हा हजरत पिर बाबू जमाल दर्गाह शरीफ व तेथील परिसर कोल्हापूरातील मोहमीडन एज्युकेशन सोसायठी यांच्या व्यवस्थापनाखाली आहे. हजरत पिर बाबू जमाल दर्गाह शरीफ यांच्या उरसा अगोदर त्यांचे शिष्य हजरत पिर लाल शहबाज कलंदर यांचा उरुस होतो. तो मुसलमानी रोजेचा महिना रमजान शरीफच्या २३ तारखेला होतो. त्या नंतर बाबांचा उरुस मुसलमानी रोजेचा महिना रमजान शरीफच्या २६ तारखेला होतो.



श्री बाबु जमाल दर्गा, कोल्हापूर



डावीकडे श्री हजरत जमाल यांची समाधी, उजवीकडे बाबुची समाधी

# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय ११ वा ॥



श्री क्षेत्र पंढरपूर

- **विषयसूची....!**

१) श्री स्वामींना घेवून पंढरपूर पायी वारी
२) सज्जनगडचा एक ब्राम्हण
३) कोल्हापूरचा विष्णुपंत व
त्यांची बहिण अन्नपूर्णा

# अध्याय ११ वा

श्री स्वामी सेवेत ताराबाई आयुष्य घालवीत होती. स्वामी ताराईला विसंबून रहात नव्हते. ताराईही स्वामींना विसंबून रहात नव्हती. ताराबाईला कोल्हापूर सोडून कुठेही जात येत नव्हते. कोल्हापूरात एकाच ठिकाणी राहिल्याने, बराच काळ वास्तव्य केल्याने ताराबाईला कंटाळा आला होता. कुठे तरी चार दिवस बाहेर जावे असे ताराबाईला वाटले. यासाठी ताराबाईने पंढरपूरला जाण्याचे ठरविले. स्वामींच्या व सर्व स्वामी भक्तांच्या कानावर ही गोष्ट घालून स्वामींची अनुमती मिळविली. सर्व स्वामी भक्तांना अतिशय आनंद झाला. कार्तिक महिन्यात स्वामींना घेवून, सर्व भक्तांना घेवून ताराबाई श्री क्षेत्र पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला निघाली. प्रवास करीत आठ दिवसांनी एका खेडेगावांत सर्व मंडळी मुक्कामाला आली. त्या खेडेगांवातील लोकांनी स्वामींचे दर्शन घेवून गांवावरील संकट कथन केले. प्लेगाच्या साथीने त्या गांवात थैमान घातले होते. प्लेगाने असंख्य लोक मरण पावले होते. कोण म्हणे माझा पिता वारला, कोण म्हणे माझा एकुलता एक पुत्र वारला. कोण म्हणे माझी माता वारली, लोकांच्या मरण यातना ऐकून ताराबाईचे मन द्रवले. ती स्वामींना म्हणाली. ''येथे तर प्लेगाची साथ चालू आहे. मृत्यूने गांव मोकळे होत चालले आहे. माझ्यावर विश्वास ठेवून आपले सर्व भक्त आपल्या बरोबर पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला पायी चालत आले आहेत. घरदार सोडून आपल्यावर श्रध्दा / विश्वास ठेवून भक्तिभावाने चालत आलेले आहेत. अशा एखाद्या भक्तांवर जर मृत्यूची कुऱ्हाड कोसळली व विपरीत घडून आले तर मी इथंच प्राणत्याग करीन.''

ते ऐकून स्वामींचे मन भरुन आले व म्हणाले ''एक खिळा द्या महामारी (प्लेग) चा अगोदर बंदोबस्त करतो.'' म्हणून एक खिळा जमिनीत ठोकला. खिळा ठोकल्याने त्या गांवातील प्लेगची साथ सत्वर थांबली. सर्वांना स्वामींच्या अद्‌भुत लीलेचे आश्चर्य वाटले, सर्व गावकऱ्यांनाही आश्चर्य वाटले. स्वामींचे चरण दर्शन घेवून त्या खेडेगांवात मुक्काम करण्याविषयी विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार त्या दिवशी एक रात्र त्या गांवात मुक्काम करुन स्वामी सर्व मंडळीसह वरील श्री क्षेत्र पंढरपूरला पुढे निघाले. पंढरपूरला पोहचताच भक्तमंडळींनी चंद्रभागेच्या तीरावर स्वामींना व सर्व भक्तांना राहण्यासाठी मंडप उभा केला. रोज भजन / कीर्तन, नामस्मरण श्री विठ्ठल दर्शन याने भक्तमंडळी / ताराबाई सुखावून गेली. बघता बघता पंधरा दिवस गेले. ताराबाई व भक्तांनी श्री विठ्ठल दर्शनासाठी स्वामींना घेवून श्री विठ्ठल मंदिरात आणले. श्री विठ्ठल मंदिरात येताच स्वामीं श्री विठ्ठल मूर्तीचे भक्तीभावाने दर्शन घेवून विठ्ठल मूर्तीकडे पहात स्तब्ध राहिले. श्री विठ्ठल मूर्तीच्या डोकीवरील पगडी काढून आपल्या डोक्यावर ठेवली. श्री विठ्ठल मूर्ती बरोबर कांही तरी बोलू लागले. असे त्रिवार केले. जवळचे श्री विठ्ठलाचे बडवे पुजारी सुध्दा विस्मय चकित झाले. ते थोर सत्पुरुष आहेत हे त्यांनी ओळखले. सत्पुरुषांच्या लीला त्यांनाच माहित असतात. या विचाराने त्यांनी श्री विठ्ठलाच्या दर्शनाला स्वामींना कोणताही

अडथळा आणला नाही. दोषाला पात्र होण्याचे त्यांनी टाळले. श्री विठ्ठल दर्शन मनसोक्तपणे घेवून स्वामी भक्तमंडळीसह / ताराबाईसह श्री क्षेत्र तुळजापूरला आले. श्री तुळजा भवानीचे दर्शन घेवून सर्व मंडळी श्री क्षेत्र अक्कलकोटला श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाला आली. श्री स्वामी समर्थांच्या / नृसिंहभानांच्या समाधीचे सर्वांनी दर्शन घेतले. श्री स्वामी समर्थांच्या समाधीचे दर्शन घेतांना कृष्णा लाडाचे मन स्वामी समर्थ आपल्या गुरुंचे / स्वामींचे गुरु असतील कां? या संशयाने मन शंकित झाले. असा संशय / विचार कृष्णा लाडाच्या मनात येताच त्याला मूर्च्छा / चक्कर आली. मूर्च्छेतच त्याच्या कानावर शब्द आले ''तुझा खोडगुणी स्वभाव / द्वाड स्वभाव गेला नाही का? गुरुंच्या गुरुविषयी / त्यांच्या थोरवी विषयी मनात संशय घेवून उगीच पापाचा कां धनी होतोस? संशय घेतल्याने तुझ्या अंगाला तू शुध्दीवर येताच विष्ठेची दुर्गंधी येईल'' थोड्या वेळाने कृष्णा लाड शुध्दीवर आला. विष्ठेची दुर्गंधी येवू लागली. विष्ठा मात्र दिसत नव्हती. कृष्णा लाड मूर्च्छेतून शुध्दीवर येताच सर्व भक्तांनी त्याची चौकशी केली. त्याने आलेली मूर्च्छा / चक्कर मूर्च्छेत कानांवर आलेले बोल, मनांतला संशय व शुध्दीवर आल्यानंतर येणारी विष्ठेची दुर्गंधी याची सविस्तर हकिकत सर्वांना सांगितली. तसेच आपल्या स्वामींचे श्री स्वामी समर्थ / नृसिंहभान गुरु आहेत हेही सांगितले.

सज्जनगडला राहणारा एक ब्राम्हण कांही कामानिमित्त कोल्हापूरला पाहुण्याकडे आला होता. पाहुण्याच्या घरी कांही दिवस राहिला. पाहुण्यांच्या आग्रहावरुन तो ब्राम्हण पाहुण्या बरोबर कुंभार गल्लीत ताराबाईच्या घरी स्वामी दर्शनाला गेला. स्वामींच्या पुढे नारळ / साखर ठेवून दर्शन घेवून स्वामींच्या कडे पहात स्तब्ध पणे उभा राहिला. परंतु त्यांच्या मनात असा विचार येत होता की ''जगात श्री रामदास स्वामी सारखे कोणी अवतारी सत्पुरुष नाहीत. होणार नाहीत.'' अंतरसाक्षीने त्या सज्जनगडाच्या ब्राम्हणाचे विचार ओळखून स्वामी त्याला म्हणाले, ''मीही तुझ्यासारखा सामान्य माणूस आहे. माणसापुढे नारळ / श्रीफळ अर्पण करुन काय उपयोग? उचल तुझा नारळ'' हे ऐकून तो ब्राम्हण खजील झाला. आपल्या मनातील विचार / खळबळ स्वामींनी ओळखल्याचे त्याला आश्चर्य वाटले. तो ब्राम्हण लज्जेने खाली मान घालून उभा राहिला. स्वामींच्या चरणावर शरणागत होवून तो स्वामींना म्हणाला ''आपणच प्रत्यक्ष श्री रामदास स्वामी आहात. अज्ञानामुळे मी आपणाला ओळखले नाही. झोळी, कुबडी वगैरे आपल्या जवळ नसल्याने मी आपणाला ओळखले नाही. या अपराधाची मला क्षमा करा.'' यावर स्वामींनी त्याला जवळ बोलविले व म्हणाले ''रामदास स्वामी प्रत्यक्ष हनुमान होते. मीही तोच आहे'' व त्या ब्राह्मणाला कमरेजवळ असलेले शेपूट दाखविले. अशा प्रकारे त्या सज्जनगडच्या ब्राम्हणाला व त्यावेळी हजर असलेल्या भक्तांना ती शेपटी पाहून स्वामी हे हनुमानाचे अवतार आहेत हे पटून आपण भाग्यवान असल्याचे वाटले. नंतर ते शेपूट गुप्त झाले. अशा प्रकारे रामदास स्वामी व मी एकच हनुमानाचे अवतार हे त्या सज्जगडच्या ब्राम्हणाला

अनुभव देवून निःसंशय केले. नंतर तो सज्जनगडचा ब्राम्हण स्वामींना त्रिवार वंदन करुन परत आनंदाने सज्जनगडला निघाला.

विष्णुपंत नांवाचे स्वामींचे एक भक्त कोल्हापूरात रहात होते. त्यांना अन्नपूर्णा नांवाची बहिण होती. बालपणीच तिला वैधव्य आल्याने तिला विष्णुपंतानी घरी आणून ठेवली होती. विष्णुपंता बरोबर रोज ती स्वामींच्या दर्शनाला येई. भजन – पूजन – स्वामी सेवा यातच ती रमत गेली. दिवसेंदिवस स्वामींच्या वरील श्रध्दा / निष्ठा वाढत गेली. दिवसेंदिवस वैधव्याचा घाव ती विसरत गेली. कांही काळानंतर तिला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात स्वामी तिला म्हणाले ''मला बसायला मेघडंबरी आवडते. एक छानसी मेघडंबरी माझ्यासाठी करुन दे / आण'' स्वप्नातून ती खडबडून जागी झाली. तिला आश्चर्य वाटले. लवकरच भरपूर पैसे खर्च करुन स्वामींना बसण्यासाठी एक सुंदर मेघडंबरी तिने करुन स्वामींना अर्पण केली. त्या मेघडंबरीवरच स्वामी आनंदाने बसू लागले. नित्य बैठक मारु लागले.

विष्णुपंत राजदरबारात नोकरीला होता. नोकरी म्हणली की बदली आली. कोल्हापुरातून विष्णुपंताची बदली झाल्याचा हुकूम / पत्र आले. बदलीच्या ठिकाणी जावे लागणार, कोल्हापूर सोडावे लागणार. त्यामुळे स्वामींचे नित्य दर्शन चुकणार या विचाराने विष्णुपंत निराश / दु:खी झाला. नित्य नियमाप्रमाणे स्वामी दर्शनाला गेला असता स्वामी त्याला म्हणाले ''बदलीबाबतची राजाज्ञा / हुकूम पाळून बदलीच्या ठिकाणी हजर हो. लवकरच तुला परत कोल्हापूरात आणू या''

स्वामींचे वचन ऐकून विष्णुपंताला आनंद झाला. लवकरच विष्णुपंत बायको / मुलांना घेवून बदलीच्या गांवी गेला. बदलीच्या ठिकाणी हजर झाला. नित्य नियमा प्रमाणे रोज पहाटे लवकर उठून प्रात:स्नान करुन स्वामींच्या प्रतिमेची / फोटोची पूजा करुन विष्णुपंत काकड आरती करीत असे. एके दिवशी काकड आरतीच्या वेळी भस्म चर्चलेली, रुद्राक्ष धारण केलेली संन्यासी व्यक्ती विष्णुपंताच्या घरासमोर उभा राहिलेली पाहून शेजारी राहणाऱ्याने त्या संन्याशी व्यक्तीला विचारले ''तुम्ही कोण? कोठून आला'' त्यावेळी तो संन्याशी त्या शेजाऱ्याला म्हणाला ''विष्णुपंत रोज पहाटे काकड आरती करतो ती मला आवडते. त्या आरतीसाठी मी हजर राहतो'' ते ऐकून त्या शेजाऱ्याने विष्णुपंताला एके दिवशी विचारले ''तू रोज पहाटे / सकाळी जी काकड आरती करतोस त्यावेळी हजर राहणारी संन्याशी विभुती कोण असते? मला ती तपोराशी विभुती रोज दृष्टीला पडते'' ते ऐकून विष्णुपंत चकितच झाला व शेजाऱ्याला म्हणाला ''इतके वर्षे मी काकड आरती करतो. परंतु मला मात्र तो संन्याशी कधी दिसला नाही. त्याचे दर्शन झाले नाही. परंतु तुम्हाला मात्र संन्याशी / अवधूताचे दर्शन झाले. तुम्ही मात्र भाग्यवान आहात. माझी भोळी भाबडी पूजा / काकड आरती पाहून माझे स्वामीच माझ्या दारी तिष्ठत उभे राहिले. ते माझे गुरु / परमेश्वर रुपी स्वामी कृष्ण सरस्वतीच आहेत.''

काही काळानंतर स्वामींच्या बोलाप्रमाणे विष्णुपंताची बदली परत कोल्हापूरला झाली. राजाज्ञा / हुकूम होताच विष्णुपंत बायको / मुलांसह कोल्हापूरला परत आला. कोल्हापूरला येताच तो स्वामींच्या दर्शनाला आला. बायको मुलांसह त्याने दर्शन घेतले व स्वामींना तो म्हणाला ''माझी भोळी भाबडी सेवा पाहून आपण रोज काकड आरतीला अवधूत रुपात हजर राहिलात. माझ्यासाठी आपण फार श्रम घेतलात, श्रमलात. आपले उपकार जन्मोजन्मी विसरणार नाही.'' यावर स्वामींनी त्याला उठविले व म्हणाले ''तू, तुझे घरदार भाविक आहे. यापुढे तुला दूर पाठविणार नाही, तुझी बदली होणार नाही. माझ्या नित्य दर्शनाचा वियोग होणार नाही.'' हे ऐकून विष्णुपंताला आनंद झाला. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

*****



स्व. विष्णुआण्णा परांडेकर

# श्रीगुरुंचे चित्रगुप्त

## (स्व. विष्णुपंत ऊर्फ आण्णा परांडेकर)

**।। प्रेमानंदी गुरुपदी आसरा ।**
**घेती मानुनी तुच्छ संसारा ।**
**वियोग न साहे ज्यांच्या अंतरा ।**
**त्या गुरु किंकरा प्रार्थितसे ।।**

अशा भक्तापैकी स्व. विष्णूपंत ऊर्फ आण्णा परांडेकर हे श्रीगुरुंचे फार मोठे निस्सिम भक्त होते. त्यांचे श्रीगुरुंवर व त्यांचे भक्तांवर अतिशय प्रेम होते. स्वभावाने ते अतिशय भोळे होते. हे मूळचे करवीरचे. महाद्वार रोड, कोल्हापूर येथे त्यांचे घर होते.

एक क्षण सुध्दा ते श्रीगुरुंच्या भक्तिसाठी वाया जाऊ देत नसत. त्यांना पुत्र व दोन भगिनी असा त्यांचा परिवार होता. घरचे लहान थोर, स्त्री-पुरुष सर्व मंडळी भक्तियुक्त अंत:करणाने श्रीगुरुंचे दर्शनासाठी नित्य वैराग्यमठीमध्ये येत असत. आपल्या घरच्या सर्व मंडळीचे श्री गुरुवरील प्रेम, निष्ठा, पाहून त्यांना आनंद होत असे. ते सर्वांना उपदेश करीत, ''नर देहाची राख रांगोळी आज ना उद्या होणार, तरी श्री गुरुंच्यावर निष्ठा ठेवून प्रेमाने त्यांची सेवा करुन नर देहाचे सार्थक करुन घ्या.''

**।। धन्य धन्य ते जननी जनक । जयांचे पोटी ऐसे बालक ।**
**भगवद् भक्ती सुखदायक । मानुनी क्षण एक न सोडिती ।।**

नित्य वैराग्यमठीमध्ये भक्तियुक्त अंत:करणाने ते जात असल्यामुळे श्रीगुरुंचा वियोग त्यांना सहन होत नसे. श्रीगुरुंच्या सेवेमध्ये कोणी अडथळा आणला अगर हायगय केलेली त्यांना खपत नसे.

**।। वेणीमाधव ते दळवी लाड । म्हादबासी न देहाची चाड ।**
**। विष्णुपंत म्हणे गुरुप्रदा आड । येई ते द्वाड टाकावे ।।**

स्व. विष्णुपंत परांडेकर यांची बदली झाल्यामुळे नोकरीनिमित्त त्यांना दुसऱ्या गांवी जाणे भाग पडले. श्रीगुरुंचा वियोग त्यांना सहन होईना. त्यांना फार दु:ख झाले. नेहमी प्रमाणे श्रीगुरुंच्या दर्शनाकरीता वैराग्यमठीमध्ये गेले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. श्री गुरुंनी, त्यांना ठरल्याप्रमाणे ''थोड्या दिवसांसाठी तुम्हाला जावे लागणार आहे. तरी कांहीही काळजी न करता आमुची आज्ञा मानून आपण आता जावे. तुम्हांला परत इकडे आणवूं तरी मनात कोणताही विचार न आणता आपण जावे'' असा आपल्या मंगलमय वाणीने - प्रेमाने जाणेचा आदेश दिला.

त्यामुळे स्व. विष्णुपंताना फार आनंद झाला. मला करवीर सोडावे लागणार हा विचार

श्रीगुरुंना सांगण्याआधीच त्याचे उत्तर श्रीगुरुंनी सांगितले. श्रीगुरुबोल ऐकताक्षणी हे अंत:साक्षी दत्त आहेत यामध्ये आश्चर्य कांहीच नाही. याची त्यांना प्रचिती आली असो, आता आपल्याला जाणे कांही चुकणार नाही. तरी धीर सोडून चालणार नाही असा विचार करुन ते आपल्या घरी आले. त्याच दिवशी संध्याकाळी गांवी जाणेची सर्व तयारी करुन बायको-मुलांसह बदलीचे ठिकाणी दुसऱ्या गांवी गेले. श्रीगुरुंच्यावर मन एकाग्र करुन आपल्या निश्चित ठिकाणी सुखरुप पोचले. आपल्या व्यवसायामध्ये मग्न होऊन नित्य नियम सुरु केला. सायंकाळी घरी आल्यानंतर प्रपंचाचे थोडे काम करुन रात्री भोजन झाल्यानंतर श्रीगुरुंच्या ते नामस्मरणामध्ये तल्लीन होत. श्रीगुरुप्रतिमा पुढे ठेवून कन्या, पुत्र यांना बरोबर घेऊन श्री विष्णुपंत आनंदाने अरुणोदयी काकड आरती करु लागले. एके दिवशी प्रात:काली नित्याप्रमाणे आरती पूर्ण झाली. कोणी एक गृहस्थ त्यावेळी द्वाराजवळ उभे होते. रुद्राक्षधारी भस्मचर्चित एक दिव्य विभूती त्यांनी पाहिली. त्या नूतन सत्पुरुषांना पाहून द्वारस्थ गृहस्थाने ''आपण कोठून आलात? पुढे कोठे जाणार?'' अशी चौकशी केली. ते म्हणाले, ''श्री विष्णूपंत हे भगवतभक्त आहेत, हे ओळखून त्यांच्या भक्ति करिता रोज आम्ही आरतीस येतो. आता आम्हाला उशिरा होत आहे. आमचे स्थान फार दूर आहे.'' एवढे सांगून ते निघून गेले. द्वारस्थ गृहस्थ ही सर्व घटना पहातच राहिले.

स्व. विष्णुपंत आरती पूर्ण करुन बाहेर आले. द्वारस्थ गृहस्थ श्री विष्णुपंतांचे जवळ जाऊन दिव्य तपोराशी अवधूत तुमच्या घरी रोज आरतीकरिता येतात असे त्यांना सांगितले. द्वाराबाहेर उभे राहून मी त्या अवधूतांना पाहिले व त्या विभूतीची, ज्ञानी पुरुषाच्या चौकशीची उत्कंठा लागली. स्व. विष्णुपंत आश्चर्याने पाहून ''हे काय कोडे आहे?'' याचा त्यांना उलगडा होईना. ''आम्ही त्यांना पाहिले नाही. तुमच्या दृष्टीस कसे काय पडले?'' याची चौकशी करु लागले. दुसरे दिवशी कोणीही अवधूत स्व. विष्णुपंतांना दिसले नाहीत. श्रीगुरुंनी पूर्ण कृपा केली व प्रगट झाले. श्रीगुरुंची लीला अगम्य आहे हे मनोमन जाणले. श्री गुरुंच्यावर पूर्ण श्रध्दा ठेवून कांही काळ तेथे क्रमिल्यानंतर कोल्हापूरला येण्याचा त्यांना संदेश मिळाला. कोल्हापूरला जाण्याची पूर्ण तयारी करुन, कोल्हापूरला येऊन श्रीगुरुंना भेटण्यासाठी ताबडतोब वैराग्यमठी येथे आले. श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार घातला. डोळ्यामधून प्रेमाश्रूधारा वाहू लागल्या. श्रीगुरु त्यांना प्रेमाने म्हणाले, ''आता येथे राहावे, यानंतर तुम्हांला बाहेरगावी कोठेही जावे लागणार नाही.''

धन्य धन्य ते श्रीगुरु - भक्त ज्यांच्या भक्तिसाठी प्रेमासाठी श्रीगुरु स्वत: प्रगट होऊन आरतीला हजर राहिले! श्रीगुरुंच्या समाधीनंतर श्रीगुरुचरणांच्या सेवेसाठी निजबोधमठी (व्यासमठी) येथे त्यांनी आपले सर्व आयुष्य तन-मन-धन अर्पण करुन श्रीगुरुंची उत्तम प्रकारे सेवा केली. ''आण्णा'' या नावानेच सर्व भक्त त्यांना संबोधित असत. सेवेची आवड व श्रीगुरुचरणी दृढ विश्वास असल्यामुळे श्रीगुरुंची वाणी, गूढ, भाषा थोडीफार ते जाणत असत. सदैव श्रीगुरुंच्या लीलासंग्रह करण्याचा त्यांना छंद होता. रात्रंदिवस श्रीगुरुंच्या लीला लेखन करण्यामध्ये गुंग

असत. समजले अगर नाही समजले, श्रीगुरुवदनातुनी जे निघेल त्याची त्यांच्याकडे नोंद असे.

**।। श्रीगुरुचरित्र भाविकजना । पठणश्रवणा मिळो हे वासना ।**
**प्रत्यक्ष दिसला नाही लोचना । त्यास्तव प्रयत्न करिती जे ।।**

श्री गुरुंच्या पूर्वचरित्रामधील लीलांची त्यांनी गाथाच तयार केली होती. यासाठी त्यांना भगीरथ प्रयत्न करावे लागले. त्यामुळे श्रीगुरुंचे लीलारुपी वैभव जगाला समजले. ''श्रीकृष्णविजय'' पूर्वचरित्राला विष्णुपंत आण्णा परांडेकर यांचाच फार मोठा आधार आहे. जणू काय ते (श्रीगुरुंचे) चित्रगुप्तच होते. त्यामुळे श्रीगुरुंचे पूर्वचरित्रांमधील लीलांचे तन्मय होऊन वाचन करतांना, प्रत्यक्ष श्रीगुरु, शिष्य व त्यांच्या लीला यांचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहाते व त्यांचे आपले देहभान हरपते.

**।। परांडेकर लिहीली गाथा । उपयुक्त झाली मागील चरित्रा ।।**
**आता स्वामी वदविती स्वत: । अंत:स्फत:स्फूर्तता सामर्थ्ये ।।**

श्रीगुरुंचे उत्तर चरित्र स्वत:हून श्रीगुरुंनी श्री मुजुमदार यांचेकडून लिहून घेतले.तात्पर्य, श्रीगुरुंचे पूर्वचरित्राचा स्व. विष्णुपंत आण्णा परांडेकर यांचे प्रयत्नामुळेच व चतुरपणामुळे आपल्याला लाभ झाला. त्यामुळे श्रीगुरुंच्या अगम्य लीला समजल्या व पठण श्रवण करणेस मिळाल्या.

**।। सूर्योदयापासूनी अस्तापर्यंत । रात्री तैसेची घडे जे वृत्त ।**
**निरलस लिहून ठेविती । नेणो मनोगत याती ।।**

श्रीगुरुंचे चरित्र सद्भावाने सावकाश पठण केले असता, सर्वदु:ख क्लेश नाहीसे होऊन गृही समाधान नांदते व स्त्री, सुत, धन प्राप्त होऊन अंती वैकंठाची प्राप्ती होते. श्रीगुरुचरणी शुध्द भाव, दृढविश्वास ठेवल्यास सर्व इच्छा पूर्ण होऊन, दुर्गती नाहीशी होते व सर्वत्र विजय होतो.

**। सुदीर्घ काळ श्रीकृष्ण संगती । करीता नाठविली जया संस्कृती ।।**
**रंगले गुरुरंगी दिवसराती । काळ दडविती गुरु सेवे ।।**

असे हे थोर पुण्य पुरुष स्व.विष्णुपंत आण्णा परांडेकर यांनी निजबोध मठी (व्यासमठी) येथे आश्विन कृष्ण चतुर्थी संकष्टी गुरुवार तारीख – ५/१०/१९४४ साली देहत्याग केला. स्व. विष्णुआण्णा परांडेकर यांचे शुभ चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम ।

संदर्भ ग्रंथ :– **श्री श्रीकृष्ण सरस्वती लीला**

मासिक दि. ९/२/१९९६

लेखक :– **श्री. विष्णूपंत कुलकर्णी**

# श्री क्षेत्र पंढरपूर

श्री क्षेत्र पंढरपूर हे हिंदू धर्मीयाचे प्रमुख स्थान आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, चोखा मेळा, गोरा कुंभार, दामाजी , सावता माळी, जनाबाई, सखुबाई, कान्होपात्रा, भानुदास वगैरे अनेक संतानी पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा गायला, वाढवला. श्री विठ्ठल कानडा समजला जातो. 'गो-पाल' श्रीकृष्ण व्दारेकहून आपले गुराखी व 'नवलाख' गुरे बरोबर घेऊन आला ही पारंपारिक समजूत एकेकाळी 'कानड' असणाऱ्या पंढरपूरच्या आसमंतातील जानपद, धार्मिक श्रध्दा व गोपजन संस्कृतीचे वातावरण यांच्याशी जुळते. श्री विठ्ठल देवतेची प्रसिध्दी सहाव्या शतकात होती. त्यांच्या अगोदर दोनशे तीनशे वर्ष तरी देवस्थानचे अस्तित्व असावयास हरकत नाही. तेव्हा इ.स.तिसऱ्या शतकापासून ज्ञानदेवाच्या कालापर्यंतचा काल हजार वर्षांचा भरतो. या काळात विठ्ठल भक्तीचा उदय होऊन तो संप्रदाय वृध्दिंगत होत गेला. ज्ञानेश्वराने पंढरीच्या भक्तीपंथाचा पुरस्कार केला. भक्तीप्रेमाच्या पंथात ते पूर्णपणे समरस झाले.

पूर्वापार चालत आलेल्या या भक्तीपंथात त्यांनी नवीन आशय ओतला, तो सोपा सुटसुटीत अधिक सखोल व व्यापक केला. पंढरीच्या भक्ती केंद्रास नवीन तेज प्राप्त झाले. पंढरीच्या प्रेमळ वारीस प्रेमळांच्या स्नेह संमेलनाचे स्वरुप लाभले. प्रत्येक वर्षी दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत भारतातील लक्षावधी भक्तजन वारीच्या यात्रेच्या काळात व इतर वेळेस पंढरीस येतात आणि चंद्रभागेत स्नान करतात. श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन कृत कृत्य होतात. पंढरपूर हे दक्षिण काशी असून त्यास संतांचे माहेरघर म्हणतात. संत मंडळी आणि भक्त मंडळीच्या भक्तीने भारावून जाऊन श्री विठ्ठलाने प्रत्यक्ष दर्शन दिल्याची उदाहरणे श्री विठ्ठल दैवताच्या भावी अभ्यासात आढळतात. कर्नाटक आणि महाराष्ट्रातील संतांनी भक्तिरस प्रधान काव्य रचले आहे. त्याची प्रचिती संतांच्या अभंग, ओव्या, गवळण, भारूडे, या प्रयत्नातून येते. पंढरपूर हे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात असून श्री विठ्ठल मंदिर हेच देऊळ आहे. त्याशिवाय नगर प्रदक्षिणा व चंद्रभागा स्नान यामुळे देखील या स्थानास विशेष महत्व प्राप्त झाले आहे. चंद्रभागा या नदीचे नाव भीमा आहे. पण या ठिकाणावरील ती चंद्रकोरीप्रमाणे वाकल्यामुळे हिला या पंढरपूर पुरते चंद्रभागा नाव पडले असे सांगतात. ही वारकरी संप्रदायाची पुण्यवान नदी आहे. ही नदी भीमाशंकर जवळच्या डोंगरात उगम पावलेली आहे. या नदीची लांबी २००/२५० मैल असावी. दक्षिणवाहिनी भीमा नदीच्या काठी वसलेले पंढरपूर सुमारे १८०० ते १९०० वर्षापासून अस्तित्वात असल्याचे सांगितले जाते. पूर्वी पंढरपुरास पंढरी, पांडुरंगपूर, फागनीपूर, पौडंरिक क्षेत्र, पंडरंगे, पांडुरंग पल्ली अशी नावे होती.

पंढरपुरातील श्री विठ्ठल मंदिर भव्य आणि विशाल आहे, तसेच लांब रुंद ही आहे. मंदिराला आठ दरवाजे आहेत. मंदिरातील प्रत्यक्ष गाभाऱ्यात तीन फुटाची विठ्ठल मूर्ती आहे.

पांडुरंग कटीवर हात ठेवून उभा आहे. विटेवर उभा असलेल्या विठोबाचे वर्णन 'युगे अठ्ठावीस, कर कटेवरी ठेऊनिया' असे करतात. कृत, त्रेता, व्दापार व कली अशी चार युगे सांगितली जातात. या चार युगात भगवंतानी दशावतार पूर्ण केला. चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे मिळून एकूण अठ्ठाविस युगे होतात आणि म्हणूनच संत नामदेवांनी विठ्ठलाच्या आरतीत विठ्ठलास युगपुरुष व चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे मिळून अठ्ठावीस असा, 'युगे अठ्ठावीस विटेवर उभा' अर्थ धरला असावा. अशा पंढरपूर वारीला ताराई श्री स्वामींना घेऊन निघाल्या.


संदर्भ ग्रंथाचे नाव :- **वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य**

संपादक :- **डॉ. शिवाजीराव मोहिते**

लेखकाचे नांवः- **डॉ. अरविंद नेरकर**



श्री तुळजाभवानी माता, तुळजापूर



श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट

# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय १२ वा ।।



श्री लक्षतीर्थ सरोवर, कोल्हापूर


- **विषयसूची....!**

१) श्रींचे लक्षतीर्थ स्नान
२) कुलकर्ण्याचा पोटशूळ
३) अक्कलकोटचा महादेव भट शिक्षक

# अध्याय १२ वा

कोल्हापूरात अनेक सरोवर आहेत. त्यापैकी लक्षतीर्थ सुंदर सरोवर आहे. श्री स्वामी अशा सरोवर काठी वनभोजनाला सर्व भक्तांसह जाऊन आनंद लुटत. एकदा ताराबाईने वनभोजनाचा बेत आखला. वनभोजनाचा बेत ऐकून सर्वांना आनंद झाला. स्वामींनी कृष्णा लाडाला वनभोजनाचा बेत सांगितला व लक्षतीर्थवर जाऊन स्वच्छता आदल्या दिवशी करणेस सांगितले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी कृष्णा लाड लक्षतीर्थवर उजडताच शीघ्रगतीने गेला. स्नान आवरून स्वच्छता करणेसाठी स्नानासाठी तळ्यात उतरला. परंतु शेवाळल्याने त्याचा दगडावरून पाय घसरला व त्याच्या नाका तोंडात पाणी चालले व तो बुडू लागला. कृष्णा लाड पैलवान होता. परंतु पाण्यात व आग्नीपुढे कोणाचे कांही चालत नाही. तो बुडू लागताच/समोर मरण दिसताच स्वामींची आठवण काढून धावा करू लागला. तो म्हणू लागला ''मरणाची मला चिंता नाही. मरणाला मी घाबरत नाही. परंतु शेवटी तुमचे चरण दिसावेत म्हणजे मी या जन्मात कृतार्थ होवून मुक्त होईन. जर पुढे मी मनुष्य म्हणून जन्मलो तर तुमच्या सेवेसाठीच जन्माला घालावे'' एवढ्यात एक क्षण गेला ना गेला स्वामींच्या सारखे कोणी तरी आले व लाडाला अलगद काठावर आणून ठेवले. या चमत्काराचे लाडाला आश्चर्य / नवल वाटले. मनोमन तो स्वामींचे उपकार आठवून सद्‌गदित झाला.

एवढ्यात स्वामी व त्यांचे सर्व शिष्य लक्षतीर्थवर आले. बुडून मरण्याचा आलेला प्रसंग त्यांने सर्वांना सांगितला. परंतु सर्व गुरुबुधूंना खोटा वाटला. लाडानीही विचार केला, हळूहळू मरणातून वाचविल्याची लीला सर्व गुरुबुधूंना समजेल. लक्षतीर्थात स्वामी स्नानासाठी उतरले व म्हणू लागले ''चला लवकर स्नान आटपू या, ताराबाई यायच्या आत. कारण ताराबाई स्नानासाठी पाण्यात उतरु देणार नाही.'' एवढ्यात ताराबाई तेथे लक्षतीर्थच्या काठी पोहचली व स्वामींना म्हणाली ''पाण्याला बघता घाबरता मग स्नानासाठी तळ्यात कशाला उतरता?'' एवढ्यात ताराबाईचे न ऐकता स्वामींनी पाण्यात बुडी मारली. सभोवतीची भक्त मंडळी बघतच राहिली. सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. स्वामींनी पाण्यात बुडी मारुन गुप्त झाले व पलिकडच्या तीरावर जाऊन निवांत बसले. भक्त मंडळी घाबरी पडली. ताराई शोक करु लागली. हा सर्व आकांत स्वामी सरोवराच्या पलिकडील तीरावरून शांतपणे पहात बसले होते. स्वामी असे अचानक कसे व कां गुप्त झाले याचा विचार भक्त करु लागले. मग ताराईचा मुलगा दत्तोबाच्या लक्षात आले की, कृष्णा लाडाने त्याच्यावर आलेला बुडण्याचा प्रसंग, त्यातून त्याला स्वामींनी कसे वाचविले हा सांगितलेला चमत्कार, हे सर्व खरे असले पाहिजे. परंतु आपण सर्वांनी कृष्णा लाडाला खोटे ठरविले. उगीच त्याच्या सांगण्यावर संशय घेतला, शंका घेतली, मग दत्तोबानी व इतर भक्तांनी मनोमन क्षमा मागितली. क्षमा मागताच स्वामींना दया उपजली व सर्वांना क्षमा करून पुन्हा ते भक्त समुदयात प्रकट झाले. सर्वांना अतिशय आनंद झाला. यावर कृष्णा लाड सर्वांना म्हणला, ''मला उगीच खोटे ठरविला. भक्तांच्या संकटाला माझा गुरु धावतो त्यांचे अनंत उपकार,'' वन भोजनाचा

मोठा थाट झाला, वन भोजना नंतर सर्व भक्त मंडळी व स्वामी विश्रांती घेत होते. एवढ्यात एक ब्राम्हण आला व स्वामींना नमस्कार करून सर्व भक्तांना आपली कर्म कहाणी सांगू लागला, मी एका गांवचा इनामदार कुलकर्णी आहे. काही गांव मला इनाम आहेत. माझं घरचं सगळं चांगलं आहे. सुंदर मुलगा/मुलगी/मंडळी असं माझं कुटुंब आहे. परंतु गेली सात वर्षे मी पोटदुखीने/पोटशूळाने आजारी आहे. पोट फार दुखते. अन्न जात नाही. फार कष्ट होतात. व्यथा होतात, दिवस पोटदुखीच्या कष्टात जातात. परंतु उपाय करूनही पोट दुखीची व्यथा काही संपेना. शेवट उपाय म्हणून नृसिंहवाडीस गेलो. उपवास करू लागलो, गुरु चरित्र पारायण करू लागलो. गुरु चरित्र पारायण सुरु असतांना एके दिवशी रात्री स्वप्नात एक बटू मूर्ती आली. पांढरा शुभ्र अंगरखा व डोक्याला टोपी असा बटु मुर्तिचा पेहरावा होता. बटू मूर्ति स्वप्नातच म्हणाली ''तुझे गुरु चरित्र वाचनाने मी समाधान पावलो आहे. आठ दिवसातच तुझ्या पोटशूळाला त्रिशुळ दाखवितो. आठ दिवस तू गुरु चरित्र वाचनाची सेवा कर.'' स्वप्नातील बटूचे बोलणे ऐकून समाधान वाटले व तत्क्षणीच जागा झालो.

स्नान संध्या आटोपून गुरु चरित्र नेहमी प्रमाणे वाचण्यास बसलो. एवढ्यात स्वप्नातील बटू प्रत्यक्ष माझ्या समोर आला व म्हणू लागला ''आता गुरु चरित्र वाचणे बंद कर. माझ्या भिक्षेची सोय कर, भिक्षा घाल.'' बटू आज्ञा मानून भात शिजवून बटूस भिक्षा घातली. पुढे रोज बटूस भाताची भिक्षा घालू लागलो. उरलेली भाताची शिते मी खाऊ लागलो. असा आठ दिवस क्रम चालला. दिवसे दिवस पोटशूळ/ पोटदुखी कमी होत चालली. परंतु नवव्या दिवसा पासून भिक्षेला येण्याचे बटूने बंद केले. मला फार दुःख झाले. बटूपायी मन तळमळू लागले. बटूचा ध्यास लागला. बटू शिवाय काही सुचेना. एके दिवशी बटु पुन्हा स्वप्नात आला व म्हणाला ''माझी भेट करवीरला ताराबाईच्या घरी होईल. इतरत्र मला शोधू नको.'' स्वप्नातून मी जागा झालो, अजून अंधार होता थोडेसे उजडल्यावर दृढविश्वासने कोल्हापूरला ताराबाईच्या घराचा शोध घेत कोल्हापूरला आलो. ताराबाईच्या घरी चौकशी केली तर स्वामी लक्षतीर्थाला वनभोजनासाठी गेल्याचे कळले. आता स्वामी दर्शन घेतले. एवढ्यात स्वामी उठले व त्या ब्राम्हणाला म्हणाले, ''तुझा पोटदुखीचा रोग बरा झाला आहे. पोटशूळ पूर्णपणे थांबला आहे. आता तुझे पुढचे दिवस उत्तम आहेत. काळ उत्तम आला आहे. यापुढे माझे चिंतन/नामस्मरण करून काळ घालवीत जा.'' ही स्वामी आज्ञा ऐकून ब्राम्हणाला फार आनंद झाला. ब्राम्हणाने परतण्याची आज्ञा स्वामींना मागितली. यावर स्वामी त्याला म्हणाले. ''पोटशुळाची भीती सोड, प्रसाद घे मग जा'' यावर त्या पोटशुळ्या ब्राम्हणाने वनभोजनाच्या रुचकर अन्नाचा प्रसाद आनंदाने सेवन केला. प्रसाद ग्रहण केल्यानंतर त्या ब्राम्हणाने नृसिंहवाडीत येवून स्वामींनी पोटशूळाचा विकार/रोग बरा केल्याचे सर्व भक्तांना कथन केले. परंतु सर्व भक्तांना त्या ब्राम्हणाचे कथन खोटे वाटले कारण स्वामी तर रात्रंदिवस सर्व भक्तांत असत. कोल्हापूरही त्यांनी कधी सोडले नाही. परंतु गुरु चरित्रातील कथा आठवून स्वामींच्या चमत्काराची कथा मग सर्वांना पटली.

एके दिवशी ताराबाईच्या घरी एक ब्राम्हण स्वामींच्या दर्शनाला आला. दर्शन घेवून बसला असता काही भक्तांनी त्याची चौकशी केली, येण्याचे कारण विचारले, यावर तो ब्राम्हण म्हणाला, माझे नांव महादेव भट्ट मी अक्कलकोटचा रहिवासी. मी शिक्षकाचे काम करीत होतो. आता माझा संसार संपला आहे. माझी बायको, मुले वारली आहेत. त्यामुळे मला आता कोणताही मोहपाश राहिला नाही. साधना करावी, नाम घ्यावे, गुरुसेवा करावी, आत्मउन्नतीचे साधन प्राप्त करावे म्हणून अक्कलकोटला आलो. अक्कलकोटला नृसिंहभान स्वामींचे सेवेत चौदा वर्षे राहिलो. माधुकरी मागून त्यांच्या सेवेत राहिलो. परंतु आता नरसिंहभान स्वामीनी समाधी घेतली, अवतार समाप्ती केली त्यामुळे त्यांच्या विरहाने माझे मन तळमळू लागले. त्यांची मूर्ती/ गुरुमूर्ती माझ्या नजरे समोर सारखी उभी राहू लागली. माझे नामस्मरण / चिंतनावरील मन उडून गेले. स्वामींच्या विरहाने मन झुरु लागले. महिनाभर रामायण वाचले. परंतु त्यातही मन लागेना. मनाची अस्वस्थता वाढू लागली बेचैनी वाढू लागली, माझे नामस्मरण / चिंतनावरील मन उडून गेले. स्वामींच्या विरहाने मन झुरुन गेले. दाही दिशांना अंधार दिसू लागला. एक दिवस रात्री स्वप्नात नृसिंहभान स्वामी आले व म्हणाले, ''तू करवीर क्षेत्राला जा, कोल्हापूरला जा, तेथे श्री कृष्ण सरस्वती हे दत्ताचा अवतार आहेत. ते ताराबाईच्या घरी आहेत. त्यांची कोल्हापुरात सर्वत्र कीर्ती पसरली आहे. त्यांच्या ठिकाणी मला बघ. ते तुला मार्ग दाखवितील.''

स्वप्नातल्या दृष्टांता प्रमाणे महादेव भट्ट कोल्हापूरला आला. ताराबाईच्या मठीत राहून स्वामी दर्शन घेवून सेवा करू लागला. रोज रामायण वाचू लागला, परंतु नृसिंहभान स्वामींच्या आठवणींने तो दुःखी होई, त्याचे चित्त ना स्वामींच्या सेवेत, न रामायणाच्या वाचनात स्थिर रहात नसे. ही त्याच्या मनाची घालमेल, अस्थिरता स्वामींच्या लक्षात आली. श्री नृसिंहभान स्वामींच्या वरील त्याच्या भक्तीचे कौतुक वाटले. एके दिवशी स्वामींनी त्याला जवळ बोलविले, स्वामींनी बोलवताच महादेव भट्टाने येवून स्वामींचे चरण धरले. घट्ट चरण धरुन तो स्वामींच्या मुखाकडे पाहू लागला. मुख पहाताच त्याच्या लक्षात आले की, स्वामींना समाधि लागली आहे. स्वामी श्री नृसिंहभानाच्या रुपातच आहेत. श्री नृसिंहभानाचे रुप पाहताच महादेव भट्ट घाबरुन गेला. काय करावे त्याला कळेना. पुन्हा स्वामी त्याला म्हणाले, ''तुझे गुरु श्री नृसिंहभान व मी वेगळा नाही. श्री नृसिंहभानांच्या दर्शनाची तुला आस / इच्छा होती, ही दर्शनाची तुझी इच्छा पूर्ण करुन घे. घाबरु नको. श्री नृसिंहभानांचे स्वरुप डोळ्यात साठवून घे, पुन्हा असे तुला दर्शन होणार नाही.'' असे महादेव भट्टाला सांगून स्वामींनी पुन्हा मूळरुप धरले. श्री नृसिंहभान स्वामी व श्री कृष्ण सरस्वती एकच आहेत याची खात्री महादेव भट्टाला पटली. त्याचा व्दैतभाव अशा प्रकारे स्वामींनी दूर केला. नृसिंहभानांचे रूप पाहून दर्शनाने त्याचे मन समाधान पावले. महादेव भट्टाचे अंतःकरण शुध्द झाले. अशा प्रकारे महादेव भट्ट रोज स्वामींना साष्टांग प्रणिपात करीत, नमस्कार करीत, सेवा करीत, आत्मउन्नतीचे साधन शोधीत स्वामींच्या जवळ आजन्म राहिला.

*****

# / समुद्र भरला आहे /

## ।। अध्याय १३ वा ।।



**श्री क्षेत्र प्रयाग संगम, चिखली (कोल्हापूर)**

### ▪ विषयसूची....!


१) श्रींचे प्रयाग संगमी स्नान

२) ताराईचे गर्वहरण

३) स्वर्गीय रामभाऊ वैद्य करंबेळकर, (राजापूर) यांच्या घरी श्रींचे आगमन

# अध्याय १३ वा

कोल्हापूरात असंख्य घरे होती. परंतु श्री स्वामींना ताराईचे घरच आवडत होते. ताराईच्या घरीच वस्ती करुन होते. ताराईच्या हाताचेच स्वामी भोजन घेत. यशोदा-कृष्णाचे जसे आई मुलाचे नाते होते तसे स्वामी व ताराईचे आई-मुलाचे नाते होते. त्यामुळे स्वामी दिसले नाहीत तर ताराई बेचैन होई. तर ताराई दिसली नाही तर स्वामी बेचैन होत. त्यामुळे ताराबाई स्वतःला अत्यंत भाग्यवान समजू लागली व इतरांना व इतर स्वामी भक्तांना तुच्छ मानू लागली. तुच्छ लेखू लागली. गर्व पिशाच्चाने, अहंकाराने तिला पछाडले. परंतु गर्वाची बाधा स्वामींनी मनोमन ओळखली, ही झालेली गर्वाची बाधा स्वामींना आवडली नाही, पसंद पडली नाही, गर्वाची बाधा, अहंकार ही भक्तीच्या मार्गाला बाधा ठरते. म्हणून ताराबाईला आलेला गर्व/अहंकार दूर करण्याचे स्वामींनी मनोमन ठरविले. कोल्हापूर जवळ प्रयाग तीर्थ आहे. कासारी/भोगावती या नद्यांमध्ये सरस्वती नदी गुप्त रुपाने वास करते. या तिन्ही नद्यांच्या संगमाला प्रयाग तिर्थ म्हणतात. मकर संक्रातीच्या वेळी या प्रयाग तिर्थात स्नान केल्यास मनुष्य जीवन पावन होते. मनुष्य जीवनातील पापे नाहीशी होतात म्हणून अनेक लोक या तिर्थात स्नान करतात. वन भोजन करतात व पुण्य मिळवतात.

अनादि काळापासून या प्रयाग तिर्थावरील स्नानाची परंपरा चालू आहे. अशा या अनादि प्रयाग तिर्थावर स्वामी भक्तांसह स्नानासाठी / वन भोजनासाठी निघाले, प्रयाग तिर्थावर स्नान व वन भोजन हा कार्यक्रम / बेत स्वामींच्या प्रेरणेने भक्तमंडळीनीच ठरविला होता. प्रयाग तिर्थावर स्वामी भक्त मंडळीसह आनंदाने आले, ते ताराबाईला जी गर्वाची बाधा झाली होती, जो अहंकार / गर्व भक्ती मार्गाला बरा नव्हता, तो दुर करण्याच्या निश्चयानेच. भक्तमंडळी स्वामींना घेवून गंगा स्नानासाठी प्रयाग तिर्थावर संगमावर पावन होण्यासाठी आली. संगम नदीकाठी स्वामी असतांना पंचगंगेने/ संगम तिर्थाने आपल्या कांठी उभे असलेल्या स्वामींचे पाय लाटरूपाने येवून धुतले. भक्तानीही मनोमन स्वामींच्या चरणांचे स्नान गंगेने /पंचगंगेने केले हे जाणले. स्वामीही म्हणाले, ''गंगास्नान/प्रयाग स्नान झाले.'' प्रयाग कांठावरून भक्त स्वामींना घेवून आले. त्यांना एका झाडाच्या / वृक्षाच्या सावलीला बसवले. स्वामींच्या जवळ सेवेला वासू दळवी व कृष्णा लाड बसुन होते. सर्वांचे प्रयाग तिर्थात स्नान झाले होते. आता समराधनेचा बेत चालला होता. वन भोजनाची / प्रसादाची तयारी भक्त मंडळीनी चालू केली होती. वेगवेगळे पक्वान्ने तयार करण्याचे चालू होते. स्वामी वृक्षाखाली सावलीला बसून होते. ते कृष्णा व वासूला म्हणाले. ''आपल्याला आता दूर जायाचे आहे. अंगात धीर व वैराग्य धरा. तुमचा रक्षणकर्ता दत्तच आहे.'' एवढे बोलून स्वामी एका मिठाईच्या दुकानात गेले त्या दुकानातून एक मूठभर चिरमुरे घेवून त्यांनी ते चिरमुरे ताराबाईच्या हातावर ठेवीत तिला म्हणाले ''कर्मबध्द असलेल्यांना चिरमुरेच गोड लागतात.'' असे संदिग्ध बोलून स्वामी भक्तमंडळीतून पळू लागले. स्वामी रागाने भक्तमंडळीतून पळत का

जात आहेत? किंवा त्यांच्या रागाचे /कोपाचे काय कारण आहे याचे कारण मात्र भक्तमंडळीना कळेना. भक्तमंडळीही स्वामींच्या मागे धावू लागली. स्वामी व वासु-कृष्णा आता गर्दीपासून पळत पळत बरीच दूर गेली होती/सगळयांच्या दृष्टीआड झाली होती./गुप्त झाली होती. कृष्णा लाड - वासु दळवी मात्र स्वामींच्या मागे अजून धावतच होती. ते दोघेही परत फिरले नाहीत. मात्र बाकीची भक्त मंडळी प्रयागावर परत फिरली.

घडलेला सर्व प्रकार ताराबाईच्या कानांवर घातला. रागाने / कोपाने स्वामी प्रयागावरून दुर निघून गेल्याचे, आपणांला सोडून दूर निघून गेल्याचे ऐकून ताराबाईंना अत्यंत वाईट वाटले व जमिनीवर ती निश्चेष्ठ / बेशुध्द पडली. असा बराच उशिर झाला. सर्व भक्तमंडळींना अति दुःख झाले. एवढ्यात ताराबाईच्या कानी गुरुवाणी आली, ''स्वयंपाक तयार आहे / प्रसाद तयार आहे तो मातरा करु नका, अन्न व्यर्थ घालवू नका, अन्नब्रम्हाचा शाप बरा नव्हे सर्वजण जेवण करा.'' ताराबाई शुध्दीवर आली, सर्वांना तिने भोजन करण्यास / प्रसाद घेणेस सांगितले, गुरुविरहाने व्याकूळ झालेल्या भक्तमंडळीनी अन्नाला हात लावला नाही तर अन्नब्रम्हाचा शाप बरा नव्हे म्हणून कांही मंडळीनी थोडे जेवण, थोडासा प्रसाद ग्रहण केला. ताराबाईने अन्नाला शिवले नाही.

प्रयाग तिर्थावर शोक करीत / दुःख करीत ताराबाई भक्तांसह घरी परतली. स्वामी आपणांला सोडून गेल्याचे तिला खुप दुःख झाले. तिच्या शोकाला गणितच उरले नाही. तिने निश्चयच केला. जो पर्यंत स्वामींची परत भेट होत नाही तो पर्यंत अन्न-पाणी वर्ज्य केले. अन्नपाणी, वर्ज्य करून जर मरण आले तरी ते मरण स्वखुशीने पत्करण्याची ताराबाईंनी मनाची तयारी केली. प्रयाग तिर्थावरून स्वामी निघून राना-वनातून धावू लागले. त्यांच्या पाठोपाठ कृष्णा लाड-वासू दळवी धावू लागले, होताहोता दिवस मावळू लागला, अंधार पडू लागला, परंतु ज्यांच्या नयनातच सूर्य आहे. ज्यांचे नयनच सुर्य आहेत अशा स्वामींना अंधाराची कसली भिती? दळवी - लाडाला मात्र अंधारच होता तरीही त्यांना प्राणाची पर्वा नसल्याने स्वामींच्या पाठीमागे अंधारात चालतच राहिले. होता होता अंधार संपला, सूर्य उगवला, तरीही स्वामी विश्रांती न घेता चालतच राहिले. दळवी-लाडाला आता चालून भूक लागली होती. भूकेने ते व्याकूळ झाले होते. अंधार जावून आता प्रकाश पसरल्याने त्यांना थोडा धिर आला होता. एवढयात स्वामींना त्यांच्या भक्तीच्या कसोटीची परीक्षा घेण्याचा विचार आला.

रस्त्यात एका मोठ्या आडव्या /पडलेल्या नागसर्पाला उचलून बाजूला करणेस त्यांना सांगितले. लाड-दळवीना त्या नागसर्पाला दूर करण्याचे, धरुन बाजूला सोडण्याचा प्रसंग भयंकर / भयानक वाटला. परंतु स्वामींच्या सांगण्यावरून त्यांनी त्या भयंकर मोठ्या अशा नागसर्पाला भित भित उचलून बाजूला नेवून सोडले. स्वामी कृपा / स्वामीभक्तीमुळे त्या नागसर्पानेही त्यांना काही इजा / दंश केला नाही. यमाला सुध्दा रजा देणारे आपले गुरु/स्वामी आहेत असे लाड - दळवीला वाटू लागले. सह्याद्रीचा घाटमाथा, उंच उंच पर्वत शिखरे, खोलवर दऱ्या, दाट जंगले,

यातून वाघ, सिंह, हिंस्त्र श्वापदांचे येणारे आवाज/डरकाळ्या यामुळे लाड दळवीना घाबरा सुटला होता. त्यांना भिती वाटत होती. एक दिवस - एक रात्र असे आठ प्रहर पोटात काही नांही. गुरुच्या पाठोपाठ चालतांना पायात कांटे घुसत. परंतु गुरुनिष्ठे/स्वामीनिष्ठे पुढे लाड-दळवीना काहीही दिसत नव्हते, जाणवत नव्हते. तुमच्या शिवाय आमचे रक्षण कोण करणार? तुम्हीच करा. रक्षण करा, आपणच दयासागर आहात. अशा प्रकारे स्वामींना लाड दळवी विनवू लागले, भाकू लागले, प्रवासात उपवासाने कृष्णा लाड भूकेने व्याकूळ झाला होता. जवळच एक गांव दिसताच लाड स्वामींना म्हणाला ''जवळ गांव दिसत आहे. आम्हाला भूक फार लागली आहे. माधुकरी/भिक्षा मागून आणतो.'' असे म्हणत / स्वामींना विनवणी करून परवानगी मागू लागला, यावर स्वामी लाडाला म्हणाले, ''त्या गावातून माधुकरी मागून आणण्याचा विचार सोडून दे, माधुकरी मागायला जावून फुकट मार खाशील, जरा धीर धर.'' परंतु भूखेने व्याकूळ झालेल्या लाडाने स्वामींचे बोल मनावर घेतले नाहीत.

गुरुंचे वचन मोडून लाड त्या गांवात माधुकरी मागणेसाठी गेला. परंतु आदल्या दिवशीच त्या गांवात चोरी झाली होती. कालचा चोरी करणारा चोरच संन्याशाच्या वेषात भिक्षा मागायला आला आहे असे समजून त्या गांवचे गांवकरी लाडाच्या पाठीमागे चोर म्हणून पकडण्यासाठी मागे लागले. लाड पुढे गावकरी मागे असा बाका प्रसंग बघून लाड स्वामींचा धावा करीत जोरात पळू लागला. गुरुंना जोराने हाका मारू लागला ''तुमचे वचन मोडून, सांगितलेले न ऐकून माधुकरी मागायला गेलो आता प्राणावर बेतले आहे. गांवकरी पकडायला मागे लागले आहेत. आता यातून दया सागरा वाचवा.'' अशी मनोमन प्रार्थना करून लाड जोरातच पळू लागला, पळत पळत लाड स्वामींच्या जवळ आला, स्वामी म्हणू लागले,''वैऱ्याच्या हाती गळा देणार नाही,'' असे म्हणून स्वामीही लाड - दळव्या बरोबर पळू लागले, गांवकरी पळून पळून दमले व माघारी फिरले. पुढे दोन कोसांवर स्वामींनी लाड - दळव्यासह विश्रांती घेतली.

दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रवास सुरु झाला. स्वामी दळवी लाडाला म्हणाले, ''आज बंदीवास येणार पण बंदीवास जाणार/संपणार'' प्रवास करीत करीत स्वामी लाड दळवीसह एका गांवा जवळ आले. गांवा जवळ येताच त्या गांवातील लोकांना वाटले हे संन्याशाच्या वेषातील चोरच आहेत. बघता काय यांना मारुतीच्या मंदिरात कोंडा. तिघांना गांवकऱ्यांनी चोर म्हणून मारुतीच्या मंदिरात कोंडून दोन गांवकरी पहारा करू लागले. मंदिराला कुलूप असतांना कोणाला न दिसता, दृष्टिला न पडता, स्वामी गांवच्या पाटलांच्या वाड्यापुढे उभे राहिले, भिक्षा मागताच पाटलीणीने भाकरी लोणचे स्वामींच्या हातावर ठेवून पोटभर जेवण करणेस सांगितले. स्वामी परत मारुतीच्या मंदिरात आले. अर्धी भाकरी त्यांनी लाडाच्या हातावर ठेवली व अर्धी आपण खाऊ लागले. थोडी भूख शमली असे वाटली आहे. तोच वासु दळवीला वाटले आपणांला सोडून दोघेच भाकरी खात आहेत. तोच त्या गांवची पाटलींण आणखी दोन भाकरी /भाजी/लोणचे घेवून आली व स्वामीच्या

हातावर ठेवून म्हणाली, ''अगोदर तुम्हाला एक भाकरी दिली होती परंतु तिघांना एक भाकरी पुरणार नाही. या दोन भाकरी/लोणचे घ्या. स्वस्थपणे भोजन करा.'' असे म्हणून पाटलीन निघून गेली, स्वामी–लाड–दळवी आनंदाने पोटभर जेवले. निवांतपणे झोपी गेले. सात दिवसाच्या प्रवासाचा आता शीण गेला होता. रात्रभर स्वामी जागेच होते. दुसऱ्या दिवशी त्या गांवचा कडक/करडा अशी ज्याची ख्याती होती असा कोतवाल काल रात्री पकडलेल्या चोरांना पकडून त्यांचा निवाडा करण्यासाठी आला. मंदिराचे कुलुप काढताच त्याला स्वामींना चोर म्हणून कोंडलेले दिसले. तो गांवकऱ्यांना म्हणाला ''हे कोल्हापूरचे दत्तमहाराज स्वामी आहेत यांना चोर समजून कोंडणे हा गावकऱ्यांचा मूर्खपणा आहे. यांची क्षमा मागून त्वरित सोडा, नाहीतर स्वामींच्या शापाने गांवच नष्ट होईल.'' हे कोतवालाचे ऐकून गांवकरी घाबरून गेले. स्वामी – लाड – दळवीना चोरीच्या आरोपातून मुक्त करून, माफी मागून सोडून दिले. अपराधाची क्षमा मागू लागले, आठ दिवस डोंगर चढणे – उतरणे चालू होते. प्रवास चालू होता. परंतु स्वामी जरा सुध्दा थकले नव्हते. लहान मुला प्रमाणे हसत – खेळत  बाललीलेत प्रवास चालू होता. मुखावर प्रवासाचा जरा सुध्दा शिणवटा नव्हता.

प्रवास करता करता स्वामींना एके दिवशी लाड–दळवीची दया आली व म्हणाले, ''आज तुम्हाला उत्तम / सुग्रास जेवण देवू.'' हे ऐकताच लाड – दळवीना अतिशय आनंद झाला. अशा सुग्रास भोजनाचीच ते वाट बऱ्याच दिवसापासून पहात होते. प्रवासात अचानक एका गांवात येताच एक जुना भक्त महाराजांच्या दर्शनाला आला. स्वामींचे अचानक दर्शन झाल्याने तो आनंदला. त्यांने दळवी–लाड यांना प्रवासाचे प्रयोजन, इथंवर येण्याचे कारण विचारले. प्रवासाची सर्व हकीकत लाड–दळवींनी त्या जुन्या भक्तांला सांगितली. त्या भक्ताने सर्व हकीकत ऐकून घेतली व त्यांना म्हणाला, ''या गांवचा मी कुलकर्णी इनामदार आहे. या गांवात माझे घर–दार, शेतीवाडी, सुंदर मुले, मुली कुंटुंब आहे. आपण माझ्या घरी चला, पाहुणचार घ्या, पायधूळ झाडा.'' लाडाने त्या जुन्या भक्ताची विनंती स्वामींच्या कानांवर घातली. स्वामीनीही त्या जुन्या भक्ताच्या विनंतीला मान दिला व लाड–दळवींचेही श्रमपरिहार होतील या विचाराने त्या इनामदार – कुलकर्णी च्या वाड्यात आले. त्या जुन्या भक्ताने / कुलकर्ण्याने स्वामीना तेल लावून गरम पाण्याने अंघोळ घातली. तसेच लाड–दळवी यांना तेल लावून गरम पाण्याने आंघोळ घालून, स्नान घालून श्रम परिहार केले. भोजनासाठी पाट घातले. पाटा भोवती रांगोळी घातली. अगरबत्ती लावली, स्वामी–लाड–दळवी पाटावर भोजनासाठी बसले. पंचपक्वान्नाचा बेत झाला. गुरु पंगतीचा लाभ भाग्याने सर्वांना झाला. सर्वांना आनंद झाला. जेवणांनतर कुलकर्णीने स्वामींना त्यांच्या वाड्यातच विश्रांतीची / रहाणेची विनंती केली. परंतु पुढे राजापूरला रामभाऊ वैद्याकडे जाण्याचे असल्याने स्वामीनी कुलकर्णीची विनंती अमान्य केली. नाईलाजाने कुलकर्ण्याने स्वामींना राजापूरला निघण्यासाठी दुःखद मनाने निरोप दिला.

स्वामी–लाड–दळव्यासह प्रवास करीत राजापूरला आले. रामभाऊ वैद्यांच्या घरी स्वामींचे

स्वागत झाले. रामभाऊ वैद्यांच्या घरी राजापूर व आसपासच्या लोकांची गर्दी स्वामींच्या दर्शनासाठी होऊ लागली, रामभाऊ वैद्यांच्या घरी धनधान्याचा सुकाळच झाला / आला. काही दिवसांनी रामभाऊ वैद्यांचा निरोप घेऊन राजापूरहून कागलला हरिपंत शिदनेर्लीकरांच्या घरी आले. कागलला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी भोजन करून लाड-दळवीसह मिरजेला मुक्कामाला आले. कोल्हापूर सोडून प्रयाग तीर्थावरून निघून आता बरेच दिवस झाले होते. ताराबाईचे अंतःकरण आता शुध्द झाले होते. गर्वाची भावना नाहीशी झाली होती. योग्य क्षणी कोल्हापूरला जाण्याचे स्वामींनी ठरविले होते.

प्रयाग तीर्थावरून स्वामी ताराबाईला सोडून गेले होते. तेव्हांपासून तिने अन्न पाणी वर्ज्य केले होते. प्राणांत उपोषण मांडले होते. जरी मरण आले तरी प्रायश्चित म्हणून स्वीकारण्याची तयारी तिने केली होती. स्वामींच्या विरही ताराबाई बुडाली होती. ते पाहून इतर भक्त मंडळी ताराबाईना म्हणत होती, ''आज उद्या गुरु माऊली येईल दिसेल. गुरुमाऊली कृपेची सावली आहे. उगीच शोक करू नकोस. उपोषण सोड-अन्न घे, पाणी घे.'' अशा प्रकारचे सांत्वन भक्त मंडळी करीत होती. परंतु ताराबाई काही सामान्य स्त्री नव्हती. गुरुपुढे / स्वामी पुढे तिने देह हा कस्पटासमान लेखला, मानला व स्वामी जो पर्यंत घरी येत नाहीत, दर्शन होत नाही, तो पर्यंत उपोषण / निर्वाण मांडले. तिची गुरुभक्ती असामान्य होती. ताराबाईची देह त्यागाची गोष्ट ऐकून, बघून, गुरुकरिता सर्व त्यागाची, प्राणत्यागाची, उपोषणाची गोष्ट बघून इतर भक्तमंडळी अचंबित व दुःखी झाली. ही भक्तमंडळी गुरुचा /स्वामींचा शोध घेवू लागली. गुरुंचा शोध घेवू लागली. गुरुंचा तपास करू लागली.

तपास करता करता राजापूरला रामभाऊ वैद्याकडून कळले की स्वामी कागलला गेले आहेत. पत्राने स्वामी कागलला गेल्याचे ताराबाईला कळविले. पत्र वाचून ताराबाईला उपोषण चालविण्याची चेतना मिळाली. तीन दिवसाचे उपोषण तिने वाढविले. जवळ जवळ तीन आठवडे अन्न पाणी वर्ज्य, कडक उपोषण त्यामुळे ताराबाई मूर्च्छा येवून पडली. बेशुध्द झाली. मूर्च्छेतच तिने स्वामीना घरी सिंहासनावर बसलेले पाहिले. ''तुझा भक्तीचा गर्व तुझ्या प्राणावर बेतलेला आहे. आता माझ्यासाठी अन्नपाणी घे. देह रक्षण कर, एकविसाव्या दिवशी माझी भेट होईल.'' असे स्वामी बोल तिने ऐकले. दुसऱ्या दिवशी धीटपणाने स्वामींना भेटण्सासाठी कागलला हरिपंत शिदनेर्लीकरांच्या घरी गेली. हरिपंतानी सांगितले, ''स्वामी आताच वाडीस गेले.'' हरिपंत व इतर भक्तांसह ताराबाई वाडीस आली. परंतु भटजी ताराबाईला म्हणाले. ''स्वामींना आम्ही वाडीत राहण्याची विनंती केली. परंतु ती त्यांनी ऐकली नाही. आताच ते मिरजेला गेले.'' मिरजेला गेल्याचे कळताच ताराबाई इतर भक्तमंडळी सह नदीकाठी आली तर स्वामी कृष्णा नदीचा डोह पार करतांना दिसत होते. भक्तमंडळी म्हणत होती कृष्णेचा डोह खोल, भयंकर, त्यात मासे, मगरी हा डोह स्वामी कसा पार करतील, परंतु स्वामींनी दळव्याच्या हाती पादुका देताच कृष्णा नदीचे पाणी, डोह गुडघ्या इतके होवून रस्ता होऊन स्वामी नदी पलिकडे दळवी लाडासह पोहचलेले ताराबाईने

पाहिले, ताराबाईने आता विचार केला, आता स्वामी दर्शन, दुरुन तर झाले आहे. स्वामींचा तपास लागला आहे. आता दुर्दैव तरी संपले आहे. स्वामींनी मूर्च्छेत सांगितल्या प्रमाणे एकविसावे दिवशी आपल्या घरी येतील, दर्शन देतील आता मुकुटपणे कोल्हापूरला परत जाण्याचा विचार ताराबाईने केला. भक्तमंडळीसह ताराबाई कोल्हापूरला परत आली. एकविसाव्या दिवसाची प्रतिक्षा ताराबाई चिंतातुरपणे करू लागली. एकविसाव्या दिवशी ताराबाईची नजर सिंहासनाकडे गेली तर स्वामी हास्य वदनाने बसलेले होते. एका बाजूला वासू दळवी तर दुसऱ्या कृष्णा लाड हे सेवक उभे होते. सिंहासनाला त्यांनी शोभा आणली होती. हे दृश्य पाहून आपल्या नेत्राचे निरांजन करून स्वामींना ओवाळले. आपल्या जन्माचे सार्थक झाल्याचे तिला वाटले. तिला बोलण्यासाठी शब्द फुटेनात. तिचे शरीर आनंदाने कंपायमान झाले. तिने भरल्या डोळ्यांनी स्वामींना साष्टांग प्रणिपात घातला व म्हणू लागली, ''मला गर्वाने / अहंकाराने झडपले होते, जो गर्व भक्तीमार्गाला बरा नव्हता. तो गर्व आता नष्ट झाला आहे. अहंकाराची मला आता शिक्षा मिळाली आहे. तुमचा विसर/विरह जन्मोजन्मी होऊ नये हीच भिक्षा मला घाला.''

*****



स्व.रामभाऊ करंबळेकर वैद्य , राजापूर यांचे घर

# स्व. श्री रामभाऊ वैद्य (राजापूर) यांची माहिती

स्व. रामभाऊ वैद्य हे राजापूरचे  (जि. रत्नागिरी) प्रसिध्द वैद्य होते. त्यांचे नांव रामचंद्र पांडुरंग करंबेळकर . त्यांना पुराणिकही म्हणत. स्व. रामभाऊ तथा रामचंद्र पांडुरंग करंबेळकर यांना वैद्य या नांवाने संपूर्ण राजापूर पेठ ओळखत असे. मूळगांव पन्हाळे तर्फ राजापूर (कपलवाडी) . पण धोपेश्वर जवळ असलेले करंबेळकर वैद्यांना धोपेश्वरवासी म्हणत असत. करंबळेकर वैद्य अत्यंत हुषार व तल्लख बुध्दीचे व्यक्तिमत्व होते. राजापुरातील ते प्रसिध्द वैद्य होते. त्यामुळे त्यांना रामभाऊ वैद्य म्हणत. ते नाडी परीक्षा उत्तम करीत. त्यामुळे अनेक रुग्णांना त्यांच्या औषधांचा त्वरित गुण येई. तसेच रामभाऊ वैद्य हे उत्तम कीर्तनकार होते. त्यांना कीर्तन केसरी ही पदवी होती. ते स्व.नारायण रघुनाथ करंबेळकर यांच्याकडे उत्तम प्रकारे कीर्तनाची कला शिकले होते. रामभाऊ वैद्यांना २ पत्नी होत्या. एका पत्नीचे नांव इंदिरा व दुसऱ्या पत्नीचे नांव इंदुमती होते. त्यांना मूलबाळ नव्हते. करंबेळकर उर्फ पुराणिक यांच्या घराण्यात गेल्या दोन पिढ्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची उपासना चालूच होती. श्रावण वद्य दशमीला उत्सव साजरा करीत असत. नैवेद्यास पुरणपोळी असायची. दरवर्षी हा उत्सव मोठ्या प्रमाणात चालत असे.

एकदा कोल्हापूरचे कुंभार स्वामी (श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज) ताराबाईचा अभिमान नाहिसा करण्यासाठी रुसुन प्रयाग संगमा वरून निघून गेले. फिरत फिरत ते राजापूरला रामभाऊ वैद्यांच्या घरी आले. काही दिवस मुक्काम केला. या राजापूरच्या वास्तव्यात कुंभार स्वामींनी रामभाऊ वैद्य व अनेक भक्तांचा उध्दार केला. रामभाऊ वैद्यांना मुलबाळ नव्हते. १९६७ पर्यंत दरवर्षी कुंभार स्वामींची पुण्यतिथी रामभाऊ वैद्य राजापूरला मोठ्या प्रमाणात घरी साजरी करीत. रामभाऊ वैद्य हे १९६७ साली वारले. करंबेळकर वैद्य हे निष्णात वैद्य व उत्तम कीर्तनकार होते.

## प्रयाग तीर्थ संगमाची माहिती

ताराईला झालेली अभिमानबाधा दूर करणेसाठी श्री कुंभार स्वामी सर्व भक्तांसह प्रयाग संगमावर स्नानासाठी आले होते. कोल्हापूर पासून प्रयाग हे तिर्थ कोल्हापूर जोतिबा मार्गावर अंदाजे ११-१२ कि.मी. व चिखली गांवात आहे. हायवे पासून आंबेवाडी-पाडळी मार्गे चिखलीला जाता येते. श्रीक्षेत्र प्रयाग चिखली हे पंचगंगेच्या संगमावर वसलेले आहे. श्री प्रयाग क्षेत्र हे पाच नद्यांचा संगम आहे. येथे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारी कासारी नदी, पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या तुळशी, कुंभी,भोगावती या चार नद्या तर येथे गुप्त वाहणारी सरस्वती नदी असा हा पाच नद्यांचा संगम आहे. यालाच प्रयाग तीर्थ / संगम म्हणतात.

या प्रयाग तीर्थावर श्री दत्तात्रय गुरुंचे वास्तव्य स्थान व स्नानाचे स्थान आहे. माघ महिन्यात अनेक भक्त मंडळी या संगमावर स्नान करुन मुक्ती मिळवतात. आनंद मिळवतात. संगमाच्या दोन्ही बाजूला घाट आहे. श्री क्षेत्र प्रयाग हे मूळचे संगमेश्वर महादेव म्हणून ओळखले जाते.

संगमेश्वर महादेव त्यांचे जेष्ठ चिरंजीव कार्तिक स्वामी, श्री दत्तात्रय यांची मंदिरे या स्थानी आहेत. संगमेश्वर महादेव व कार्तिक स्वामीची स्थापना अगस्ती ऋषी व लोपामुद्रा यांनी येथे केली आहे. समोरच मोहनगिरी स्वामींची जिवंत समाधी आहे. येथील मंदिराची पूजा अर्चा गिरी गोसावी हे मोहनगिरी स्वामींच्या वंशातील लोक करतात.

प्रत्येक वर्षी कार्तिक पौर्णिमेला कृतिका नक्षत्रावर येथे कार्तिक स्वामींची यात्रा भरते. महाराष्ट्रातील बरेच लोक/भक्त श्री कार्तिक स्वामींच्या दर्शनाला येतात. श्री दत्तात्रय मंदिरा समोर प्राचिन असा वटवृक्ष आहे. त्या वटवृक्षाखाली वालखल्ये ऋषिंनी घोर तपश्चर्या केली होती अशी आख्यायिका आहे. इतरही मोठे मोठे वृक्ष, हिरवागार परिसर याने प्रयागतीर्थ हे अतिशय रम्य स्थान बनले आहे.



श्री कैलास पर्वत, हिमालय.

# मनोहर पादुका नृसिंहवाडी

वाडी हे नावाप्रमाणे खेडेगाव आहे. येथे ब्राम्हण पुजाऱ्यांची बरीच घरे आहेत. सर्व वसती कृष्णेच्या काठावरच आहे. ज्या कृष्णाघाटावर स्नान करावयाचे त्याच घाटावर श्री गुरुंच्या पादुकांचे मंदिर आहे. कृष्णा घाट टप्प्या-टप्प्याने चढत गेला आहे. तसेच तो प्रशस्त आहे. श्री मनोहर पादुकांच्या समोरुन कृष्णा वाहत चालली आहे. जवळच एक फर्लांग अंतरावर श्री कृष्णा- श्री पंचगंगेचा सुरेख संगम झाला आहे. हे कृष्णा पंचगंगेचे संगमस्थान नृसिंह सरस्वतींनी एक तपाएवढा काळ आपल्या वास्तव्याने पुनीत केला आहे. या संगम जळातील ६४ योगिनी त्यांच्या चरण सेवेत चूर आहेत. श्रीनृसिंह सरस्वती, श्री औदुंबरहून ते इथे आले आणि इथे १२ वर्षे राहून अनेक दीन-दलितांच्या जीवनात समाधानाचे, सुखाचे मळे फुलवून अनेकांची संकटे दूर करुन, मदांधांचा अंहकार निपटून टाकून, धर्मावरील आघात नष्ट करुन आणि भक्त भाविकांच्या श्रध्दा वाढवून ते पुढे गाणगापुरास गेले.

कृष्णेच्या पैलतीरावर औरवाड आणि गौरवाड या नावाची २ गावे आहेत. ही गावे विजापूरच्या आदिलशहाने वाडीच्या श्री दत्त पूजेसाठी इनाम दिलेली आहेत. हे पैलतीरावरील औरवाड म्हणजेच गुरुचरित्रात उल्लेखिलेले अमरापूर होय. या अमरापुरात अमरेश्वर नावाने शिवस्थान आहे. ज्याला आज आपण 'नरसोबाची वाडी' म्हणतो, ते स्थान श्रीगुरुंच्या आगमनापूर्वी अमरापुरातच समाविष्ट आहे. या अमरापुराचा आणि त्याच्या सान्निध्यातील कृष्णा-पंचगंगा- संगमाचा महिमा गुरुचरित्रात असा वर्णिला आहे :

**पंचगंगानदीतीर । प्रख्यात असे पुराणांतर ।**
**पांच नामें आहेति थोर । सांगेन ऐका एकचित्तें।।**
**शिवा भद्रा भोगावति । कुंभीनदी सरस्वती ।**
**'पंचगंगा' ऐसी ख्याति । महापातक संहारी ।।**
**ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचिया संगा ।**
**प्रयागाहूनि असे चांगा । संगमस्थान मनोहर ।।**
**अमरापुर म्हणिजे ग्राम । स्थान असे अनुपम ।**
**जैसा प्रयाग संगम । तैसे स्थान मनोहर ।।**
**वृक्ष असे औदुंबरु । प्रत्यक्ष जाणा कल्पतरु ।**
**देव असे अमरेश्वरु । तया संगमा षट्कूळीं ।।**

दुपारी बारा वाजता या मनोहर पादुकांची महापूजा होते.

संदर्भग्रंथाचे नाव - **दत्त संप्रदायाचा इतिहास**
लेखकाचे नाव - **रा. चिं. ढेरे**

## ॥ अध्याय १४ वा ॥



श्रीकृष्णा घाट, मिरज

### विषयसूची....!

१) श्री स्वामी समर्थांच्या भक्ताचे पेढे
२) श्री स्वामी भक्त कृष्णा लाडाला स्वप्नात श्री स्वामी समर्थांचे दर्शन
३) श्री स्वामी भक्त कृष्णा स्वारांची माहिती
४) कोल्हापुरातील एक सरदार व ज्योतिषी

## अध्याय १४ वा

श्री स्वामी समर्थांचा एक ब्राम्हण भक्त होता. पोटी पुत्र नसल्याने तो संसारात उदास, त्रस्त होता. श्री स्वामींना त्या भक्ताने मूल व्हावे म्हणून अनेक प्रकारे नवस केले. उपवास, व्रते केली. पुढे कांही काळानंतर श्री स्वामी समर्थांच्या कृपेने त्या भक्ताला मुलगा झाला. मुलगा झाल्याने त्या भक्ताला फार आनंद झाला. आनंदाने तो संसारात रमला. मुलाच्या आनंदाने त्याचा संसार बहारत चालला. यात तो मुलगा होण्यासाठी श्री स्वामी समर्थांना केलेले / बोललेले नवस विसरुनही गेला. पुढे कांही काळाने त्याला मुलगा होण्यासाठी श्री स्वामी समर्थांना बोललेल्या नवसाची आठवण झाली. नवसाची आठवण होताच तो ब्राम्हण भक्त बायको मुलाला घेवून अक्कलकोटला श्री स्वामी समर्थांच्या पुढे नवस फेडण्यासाठी / नवसाची पूर्तता करण्यासाठी आला. अक्कलकोटला तो भक्त नवस फेडण्यासाठी आला खरा परंतु श्री स्वामी समर्थांनी देह ठेवल्याचे कळाले, अवतार समाप्त केल्याचे कळाले. आपण नवस विसरल्याने नवस फेडायला उशीर झाला. तोपर्यंत श्री स्वामी समर्थांनी देह ठेवला. श्री स्वामी समर्थ असे पर्यंत आपण नवस फेडले असते, तर बरे झाले असते असे म्हणून तो ब्राम्हण भक्त शोक करु लागला. त्याला नवस फेडण्यासाठी उशीर झाल्याचे खूपच दु:ख झाले. श्री स्वामी समर्थांनी समाधी घेतल्याचे त्याला खुपच दु:ख झाले. ते पाहून त्या भक्ताची पत्नी त्याला म्हणाली ''स्वामी कृपेने झालेला पुत्र श्री स्वामींच्या समाधी समोर ठेवूया. समाधीवर पेढे ठेवूया म्हणजे नवस फेडले जाईल, नवसाची पूर्तता होईल.''

परंतु त्या भक्ताला त्याच्या पत्नीचे म्हणणे पटले नाही. गोड वाटले नाही. मुलगा झाल्याचे नवस फेडायला उशिर झाला हा मूर्खपणा झाला. तसेच श्री स्वामी समर्थांनी त्यांच्या कृपेने झालेला मुलगा पाहिला नाही याचे त्या भक्ताला फारच वाईट वाटले. अशा विचारातच झालेल्या अपराधाचा विचार करीतच त्या भक्ताने अक्कलकोटला मुक्काम केला. अक्कलकोटच्या मुक्कामात त्या रात्री त्या भक्ताच्या स्वप्नात श्री स्वामी समर्थ आले व त्याला सांगू लागले. ''मुलगा झाल्याच्या नवसाची मी असे पर्यंत पूर्तता झाली नाही. याचा शोक करु नकोस, दु:ख वाटून घेवू नकोस. करवीर/कोल्हापूरला ताराबाई शिर्केच्या घरी श्रीकृष्ण सरस्वती मारुतीच्या रुपात वस्ती करुन आहेत. करवीर/ कोल्हापूरला जा. श्री कृष्ण सरस्वती पुढे पेढे ठेव / त्यांना पेढे दे. म्हणजे तू मला बोललेल्या नवसाची पूर्तता होईल. नवस फेडले असे होईल.'' स्वप्नातून तो भक्त जागा झाला. स्वप्नात त्याला झालेल्या श्री स्वामी समर्थांच्या आदेशानुसार त्याने करवीर / कोल्हापरला ताराबाई शिर्के घरी हनुमान रुपाने वसत असलेल्या श्रीकृष्ण सरस्वतींच्या पुढे नवसाचे पेढे ठेवून नवस पूर्ण करण्याचे ठरविले. अक्कलकोटहून करवीर / कोल्हापूरला जाण्यासाठी सामान बांधून तो मार्ग क्रमण करु लागला. इकडे काय झाले एके दिवशी ताराबाई शिर्केंच्या घरी श्री स्वामी नेहमी प्रमाणे पंचगंगे नदीकाठी फिरायला भक्तांसह गेले नाहीत.

अंतरसाक्षीने जाणून ते भक्तांना म्हणाले ''आज फिरायला जायला नको. अक्कलकोटचा ब्राम्हण मुलगा झाल्याचे नवस फेडायला येणार आहे. नवस फेडण्यासाठी पेढे आणणार आहे सर्वांना पेढे मिळणार आहेत.'' त्या दिवशी स्वामी भक्तांसह फिरायला गेले नाहीत. अक्कलकोटचा तो ब्राम्हण भक्त नवस फेडण्यासाठी करवीर / कोल्हापूरला आला. श्री स्वामींची माहिती काढीत काढीत ताराबाई शिर्केच्या घरी आला. मनोभावाने त्याने व त्यांच्या पत्नीने स्वामींचे दर्शन घेतले. नवसाने झालेल्या मुलाला स्वामींच्या पायावर घातले. स्वामींनी त्या ब्राम्हण भक्ताकडून पेढे मागून घेतले व नवसाची पूर्तता झाल्याचे त्याला सांगितले. श्री स्वामी समर्थांची, श्री नृसिंहभान स्वामींची आज्ञा म्हणून श्री स्वामींनी त्या ब्राम्हण भक्ताला कमरेचे शेपूट दाखवून स्वामी मारुती / हनुमान रुपाने अवतरले आहेत हे दाखवून दिले. हा चमत्कार पाहून श्री स्वामी समर्थांनी त्याला अक्कलकोट येथील स्वप्नात सांगितले होते. ''मारुती / हनुमान रुपात श्रीकृष्ण सरस्वती ताराबाईच्या घरी वास करुन आहेत. त्यांच्या समोर पेढे ठेव म्हणजे मला बोललेला नवस पूर्ण होईल हे पटले.'' त्या ब्राम्हण भक्ताला नवस फिटल्याचा फार आनंद झाला. श्री स्वामी समर्थ व श्रीकृष्ण सरस्वती हे दोन नसून एकच आहेत. एकच अवतार आहे हेही त्याला पटले. श्रीकृष्ण सरस्वतींच्या दर्शनाने त्याला जीवन कृतार्थ झाल्याचे वाटू लागले. पुन्हा एकदा मुलाला श्रीकृष्ण सरस्वतींच्या पायावर घालून, उभयता साष्टांग दंडवत घालून तो ब्राम्हण भक्त स्वामींच्या आज्ञेने अक्कलकोटला आनंदाने परतू लागला.

श्री स्वामी आपल्या भक्तांना नेहमी आपल्या गुरुविषयी, श्री स्वामी समर्थांविषयी / श्री नृसिंहभान स्वामींविषयी ते अवतार असून महान आहेत असे सांगत. ते ऐकून कृष्णा लाडाने अशा महान / अवतार असलेल्या श्री समर्थांचे / श्री नृसिंहभानाचे दर्शन घडावे म्हणून स्वामींना विनंती केली. कृष्णा लाडाच्या विनंतीला स्वामींनी होकार दिला / मान दिला. पुढे कांही दिवसांनी एका रात्री कृष्णा लाडाला स्वप्न पडले. स्वप्नात कृष्णा लाडाने पाहिले की, दिव्य शरिर असलेले, अजानबाहू असेलेले, अत्यंत तेजाकिंत श्री नृसिंहभान स्वामी / श्री स्वामी समर्थ दिव्य, भव्य सिंहासनावर बसलेले आहेत. त्यांच्या उजव्या बाजुला स्वामी उभे आहेत. खुणेनेच स्वामींनी लाडाला आपले गुरु श्री नृसिंहभान स्वामींचे / श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेणेस सांगितले. बऱ्याच दिवसांपासून श्री नृसिंहभानांच्या दर्शनाची इच्छा असल्याने ती पूर्ण करुन घेणेस खुणेनेच सांगितले. स्वामींच्या खुणेने कृष्णा लाडाने श्री नृसिंहभानांचे भक्तिभावाने स्वप्नातच दर्शन घेवून बऱ्याच दिवसांची दर्शनाची इच्छा तृप्त करुन घेतली. स्वप्नातून कृष्णा लाड जागा झाला. अनेक जन्मांचे पूर्व सुकृतानेच श्री नृसिंहभान स्वामी / श्री स्वामी समर्थांचे दर्शन स्वप्नात झाले याचा त्याला आनंद झाला. वारंवार विनंती केल्यानेच स्वामींनी त्यांच्या गुरुंचे म्हणजे श्री स्वामी समर्थ / श्री नृसिंहभानांचे दर्शन स्वप्नात घडविले याचा त्याला आनंद झाला. स्वामी त्याला या पृथ्वीतलावरील कल्पवृक्षच वाटले. कल्पवृक्ष ज्याप्रमाणे सर्व इच्छा

पूर्ण करतो त्याप्रमाणे अशक्य ती श्री नृसिंहभानस्वामी दर्शनाची इच्छा स्वामींनी पूर्ण केली होती.

श्री स्वामी भक्त कृष्णा स्वाराचा आजा (आईचे वडील) दरवर्षी श्री क्षेत्र पंढरपूरला पायाने वारीला जात असे. आजाची वारी परंपरा कृष्णा स्वाराने जपली. कृष्णा स्वारही श्रीक्षेत्र पंढरपूरला पायी वारी करु लागला. परंतु पुढे कृष्णा स्वाराला अपस्माराची/फेफरे येण्याची व्याधी जडली. त्यामुळे कृष्णा स्वाराला तब्येतीमुळे पंढरपूरला वारीला जाणे जमेना. चालणे जमेना. अशक्तपणा येऊ लागला. त्याची पंढरपूरची पायी वारी चुकू लागली. याचे त्याला दुःख वाटू लागले. खंत वाटू लागली. एकदा तर प्रत्यक्ष श्री पांडुरंग कृष्णा स्वारांच्या स्वप्नात आला व म्हणू लागला, ''कृष्णा पंढरपूरला माझ्या दर्शनाला का येत नाहीस? आजाची वारी कां चालवीत नाहीस?'' कृष्णा स्वार स्वप्नातून जागा झाला. पंढरीची वारी चुकत असल्याने तो तळमळू लागला. पण काय करणार! वारीला चालत जाणे जमेना, फिट बंद होईना. वारी बंद झाली म्हणून कृष्णा स्वार तळमळू लागला. श्री पंढरीनाथ स्वप्नात आलेला व पंढरपूरची पायी वारी कां येत नाहीस म्हणाल्याचे कृष्णा स्वाराने स्वामींच्या कानावर घातले. अंतर्ज्ञानाने ही स्वप्नवार्ता स्वामींनी जाणली होती.

स्वामींनी कृष्णा स्वाराला पंढरपूरला जाण्याची परवानगी दिली. तसेच चालत जाणे अपस्माराच्या व्यथेने जमत नसल्याने त्याची वाहनाने जाण्याची सोय केली. यामुळे कृष्णा सुखावला. पंढरपूरला जाण्याची कृष्णा स्वार तयारी करु लागला. त्याच्या घरची परिस्थिती फार गरिबीची होती. प्रवासासाठी थोडेच पैसे त्याच्याजवळ होते. एवढ्यात त्याच्या आईने नेसण्यासाठी लुगडे आणण्यास सांगितले. जुने लुगडे फाटले होते. फक्त पाच रुपयेच कृष्णास्वारा जवळ होते. पंढरीला जाणे किंवा एक तर आईला लुगडे आणणे यापैकी एकच त्या पाच रुपयात घडणारे होते. स्वामीनीच कृष्णा स्वाराची परीक्षा घेण्याचे ठरविले होते. कृष्णा स्वार चिंतेत होते. परंतु स्वामींच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. त्या पाच रुपयातून आईची अब्रू झाकणेसाठी लुगडे आणले व पंढरपूरला जाण्याचे रद्द केले. हा सर्व खेळ स्वामींचा होता. त्याचा एक मित्र त्याच्या घरी आला व म्हणू लागला. ''मी व माझे कुटुंब पंढरपूरला श्री पंढरीनाथाच्या दर्शनाला निघालो आहे. आम्ही करवीर ते पंढरपूर प्रवास वाहनाने करणार आहोत. आमच्या वाहनाची सोय आहे. तूही आमच्या बरोबर पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला चल. आमच्या घरचे घोडे प्रवासासाठी / बसायला घे. पंढरपूरात घोडेही कामाला येईल. तुझीही सोबत होईल'' मित्राची ही विनंती ऐकून कृष्णा स्वाराला आनंद झाला. तसेच ''तुझ्या प्रवासाची सोय केली आहे.'' या स्वामी वचनाचा अनुभव आला. घोड्याने प्रवास करीत कृष्णा स्वार श्री क्षेत्र पंढरपूरला पोहचला. कृष्णा स्वार व त्यांचे मित्र श्री क्षेत्र पंढरीला पोहचले. श्री विठ्ठल दर्शनाच्या ओढीने श्री क्षेत्र पंढरपूर माळकरी / वारकरी / भक्त मंडळीने भरुन गेले होते. श्री विठ्ठल दर्शनासाठी खूप गर्दी झाली होती. त्यामुळे आता विठ्ठल दर्शन होणे अतिशय कठीण आहे असे कृष्णा

स्वाराला वाटू लागले. कृष्णा स्वार दीनवाणी चेहरा करुन निराश होवून मंदिराबाहेर बसला. इतक्यात एक पुजारी भेटला. कृष्णा स्वाराचा दीनवाणी चेहरा पाहून पुजाऱ्याने कृष्णा स्वाराला तडक श्री विठ्ठल दर्शनाला मंदिरात नेले. श्री विठ्ठल दर्शन कृष्णा स्वार घेवू लागला. विटेवर उभा असलेल्या विठ्ठलाच्या चरणी आपले मस्तक नम्रपणे ठेवले व वर पाहू लागला, मुखाकडे पाहू लागला. श्री विठ्ठलाचे वेगळेच दर्शन त्याला होवू लागले. अंगात पांढरा शुभ्र अंगरखा, डोक्यावर भरजरी टोपी, गळ्यात किती तरी सुंदर रत्नांच्या माळा, कपाळावर कुंकूवाचा मोठा टिळा अशा स्वरुपात श्रीकृष्ण सरस्वती रुपच दिसू लागले, दर्शन होवू लागले. त्या पुजाऱ्यास / बडव्यास कृष्णा स्वार म्हणू लागला ''हे तर माझे स्वामी श्रीकृष्ण सरस्वती आहेत. मला श्री विठ्ठलाचे दर्शन घडवा, श्री विठ्ठल मूर्ती दाखवा'' यावर तो पुजारी / कृष्णा स्वाराला म्हणाला ''तुझे चित्त थारी नाही काय? तू आंधळा आहेस काय? समोरच श्री विठ्ठल मूर्ती उभा असून, तुला दिसत नाही काय? डोळे उघडून / फोडून बघ म्हणजे तुला श्री विठ्ठल दर्शन होईल.'' यावर स्वाराने बडव्याचे / पुजाऱ्याचे ऐकून पुन्हा एकदा दर्शन घेतले. श्री विठ्ठल दर्शन झाले. आपले गुरु / स्वामीच पंढरपुरात श्री विठ्ठल रुपात उभे आहेत. श्री दत्त - श्री विठ्ठल एकच आहेत ही त्याच्या मनाची पक्की भावना झाली. आपुले गुरु / स्वामी सर्व जगात भरुन आहेत अशी त्याची श्रध्दा, भावना झाली. त्याच्या मनांतील सर्व संदेह दूर झाले आणि तो त्वरीत करवीरला श्री स्वामी दर्शनासाठी परत फिरला.

कोल्हापूरात एक वैभवशाली सरदार रहात होता. घर-दार-शेती वाडी-सुंदर प्रपंच त्याचा होता. त्याला कोणत्याही प्रकारचे दु:ख अथवा वाण नव्हती. पूर्व सुकृतामुळे त्याला साधू-संगती, सज्जनांची संगत / सहवास आवडत असे. या त्याच्या आवडीमुळे अनेक संत / सज्जन तो आपल्या घरी / वाड्यावर घेवून येई. त्यांचे आदरातिथ्य करी, सर्व प्रकारची सेवा करी, त्यांना संतुष्ट करी. या सेवेतच त्याच्या मनाला आनंद वाटे. कोल्हापुरात एकदा एक प्रसिध्द ज्योतिषी ब्राम्हण आला. त्या सरदाराच्या कानावर या ज्योतिषी ब्राम्हणाची कीर्ती गेली. त्या सरदाराने त्या जोतिषी ब्राम्हणाचे दर्शन घेवून घरी येण्याची, भोजन, विश्रांती घेण्यासाठी विनविले. त्या सरदाराच्या विनंतीला मान देवून तो ज्योतिषी ब्राम्हण वाड्यावर आला, सरदाराच्या वाड्याला भेट दिली व भोजन घेतले. भोजनानंतरच्या विश्रांतीच्या वेळी तो सरदार त्या जोतिषी ब्राम्हणास गप्पांच्या ओघात म्हणाला ''पुण्यश्लोक ताराबाई मुळे प्रत्यक्ष दत्तच करवीर नगरीला भेटला आहे. मिळाला आहे. आंध्र / कर्नाटक / द्रविड / मल्याळ / भागातील लोक या श्री दत्तांच्या / स्वामींच्या दर्शनाला येतात त्यांचे पोवाडे गातात / आरती करतात. करवीरातील जे भक्त श्री क्षेत्र नृसिंहवाडी, श्रीक्षेत्र गाणगापूरला श्री दत्तदर्शनाला जातात त्यांना श्री दत्त महाराज / प्रत्यक्ष त्रैमूर्ती म्हणतात.''मी कोल्हापूरला ताराबाईच्या घरी असताना इकडे कशाला येता?'' ''ताराबाईंच्या घरी असणारे स्वामी त्रिकाल ज्ञानी आहेत. सर्व

भक्तांची भाषा जाणतात, त्यांचे मनोरथ पूर्ण करतात. तेंव्हा अशा स्वामी दर्शनाची तुमची मनिषा / इच्छा तुम्ही पूर्ण करुन घ्यावी.'' हे सरदाराचे बोलणे ऐकून तो गर्विष्ठ ज्योतिषी ब्राम्हण मनात हसत त्या सरदाराला अहंकाराने म्हणाला ''तुम्ही म्हणता त्या मूर्खासारखे वागणाऱ्या सत्पुरुषाला / स्वामीला मी पंढरपूरात बघितले आहे. रुपयात एक पैसा एवढीच त्याची योग्यता आहे. तुम्ही भोळे आहात म्हणून तुम्हांला सोळा आणे / बंदा रुपया सत्पुरुष वाटतो. अशा सत्पुरुषाची मला किंमत नाही'' विश्रांती नंतर सायंकाळी तो सरदार नेहमीप्रमाणे ताराबाईच्या घरी स्वामी दर्शनाला गेला. जातांना तो प्रसिध्द ज्योतिषी ब्राम्हणही त्याच्या बरोबर स्वामी दर्शनाला आला. स्वामी दर्शन घेवून सरदार बाजूला झाला. तो ज्योतिषी ब्राम्हण स्वामींना नमस्कार करु लागला. एवढ्यात स्वामी त्या ज्योतिषी ब्राम्हणाला म्हणाले, ''एका पैशाची गणना एक रुपयात होत नाही. मी बंदा रुपया सत्पुरुष नाही. उगीच मला नमस्कार करु नकोस. मला नमस्कार करण्याचे कष्ट घेवू नकोस'' हे स्वामींचे अंतरसाक्षीत्वाचे / अंतर्ज्ञानाचे बोल ऐकून तो ज्योतिषी ब्राम्हण गडबडून गेला. त्याचा मीपणा गळून गेला, त्याने स्वामींची केलेली निंदा त्याच्या लक्षात आली व स्वामींना म्हणू लागला ''योगी, मुनी, सर्व सत्पुरुष, संत या सर्वांचा तू निर्माता आहेस. तुझ्या चरणापासून त्यांची सुरुवात आहे. तू चोख बंदा रुपया सत्पुरुष / परमेश्वर आहेस. माझ्या अपराधाची क्षमा कर'' स्वामींची क्षमा याचना करुन ज्या सरदारा बरोबर दर्शनाला आला होता. त्या सरदाराला म्हणाला ''तुझ्या मुळे स्वामी दर्शन झाले. स्वामी हे गुरुंचेही गुरु आहेत. ब्रम्हांडनायक आहेत. असा ब्रम्हांड नायक मला भेटविलास तुझे माझ्यावर अत्यंत उपकार आहेत.''

*****




श्री स्वामी समर्थ मठ, कृष्णाघाट, मिरज

## कृतज्ञता

त्याकाळी एकदा संध्याकाळी मिरज-पंढरपूर रेल्वे शेवटची गाडी गेल्यानंतर स्व. रामचंद्र जाधव रेल्वे चाळीतील आपल्या क्वार्टसकडे परतत होते. त्यावेळी त्यांना एक संन्याशी रेल्वे प्लॅटफॉर्मच्या एका टोकावर असलेल्या बाकड्यावर बसलेला दिसला. रामचंद्र जाधवांनी त्यांची चौकशी केली तर त्यांनी पंढरपूरला जाण्याची रेल्वे चुकली असलेने ते तेथे बसले होते. संन्याशी मराठी बोलत होते आणि तब्येत सशक्त अशी होती. भारतात संन्यस्त धर्माला प्राचीनकाळापासून मान-सन्मान प्राप्त झालेला आहे. त्यांना समाजाचा मानही मिळत आला आहे. परमेश्वराशी ऐक्य साधणे हे त्यांचे ध्येय असते. गुरुंच्या आज्ञा पालनात ते असतात. या भावूक भावनेने रामचंद्र जाधवांनी त्यांना आपल्या रेल्वे चाळीतील घरी येण्याचा आग्रह केला आणि ते या संन्याशी सत्पुरुषाने मान्य केले. त्यांचे नांव होते कृष्णबुवा.

ते कोल्हापूरच्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे अंतरंगातील शिष्य होते. त्यांच्या गुरुदेवांनी त्यांना श्रीक्षेत्र पंढरपूरला शुध्द एकादशीला प्रत्येक महिन्याची वारी करण्यास सांगितले होते.नंतरच्या काळात कृष्णाबुवा पंढरपूरला येता-जाता जाधव, पांढरे-पाटील-तुपारे यांच्याकडे येऊ-जाऊ लागले. स्नेह जुळत गेला. कृष्णाबुवांच्या बोलण्यातून त्यांच्या गुरुदेवांच्या भव्य दिव्य जीवनाचा उलगडा या परिवाराला होऊ लागला. गुरुशिष्याबद्दलचा चिरंतन संबंधाचा अध्याय सुरु झाला. त्यांच्या गुरुदेवाचे नांव श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज असले तरी त्यांचे वास्तव्य कुंभार गल्लीतील मातृवत्सल, अपूर्व शांती लाभलेल्या संत महिला पुण्यश्लोक ताराबाई शिर्के यांच्या घरी होते.

कृष्णाबुवांचे आडनाव निकम होते. सांसारीक जबाबदारीच्या जगात उतरल्यानंतर त्यांना अपास्माराची बाधा (फेफरे) झाली. ते शाहू महाराजांच्या दरबारात घोडेस्वार या पदावर नोकरी होते. घरी आई-पत्नी, संसार सुखाचा होता. परंतु त्यांना अपस्माराची (फेफरे) पिडा होती, औषधपाणी केले परंतू कांही फरक पडला नाही. अशा वेळी त्यांच्या एका मित्राने कुंभार गल्लीतील दत्ताला जा, ते तुला बरे करतील, मरणातून सोडवतील असे सांगितले. त्याप्रमाणे एके दिवशी ते कुंभार गल्लीत दत्ताला दर्शनासाठी गेले. त्यांना पाहताच महाराज म्हणाले, ''भस्म लाव, राख लाव'' प्रश्न न टाकताच महाराजांनी दिलेले उत्तर ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. ते रोज कुंभार स्वामींच्या दर्शनाला जाऊ लागले. कुंभार स्वामी कृष्णाबुवांविषयी भक्त मंडळींना म्हणत ''हे उत्तम आहे घोडे, कुलवान घोडे आहे.'' कृष्णाबुवांना आश्चर्य वाटे. त्यांचे आजोबा (आईचे वडील) हे राजदरबारात नोकरीस होते. ते माळकरी होते. त्यांची पंढरपूर वारी होती. एकदा ते पंढरपूरला आषाढी वारी दर्शनाला गेले असतांना त्यांना कोल्हापूरला कामावर हजर व्हायला कांही दिवसाचा उशीर झाला. कोल्हापूरहून परत आल्यानंतर ते पुन्हा कामावर गेले. वरिष्ठांना व आपल्या सहकाऱ्यांना भेटून पंढरपूरहून येण्यास उशीर झाला. त्यामुळे नोकरीवर हजर

होण्यास दोन-चार दिवस उशीर झाला असे सांगितले. त्यांचे सहकारी व वरिष्ठ बुचकळ्यात पडले. तुम्ही वेळेतच कामावर हजर झाला असून, हजेरी पुस्तकात तशी नोंद आहे, असे सांगून हजेरी पुस्तक दाखवले. त्यांच्या आजोबांचे डोळे भरुन आले. आपल्यासाठी विठ्ठल देव राजदरबारात आपले रुप घेऊन आले आणि त्यांना काम करावे लागले याचे वाईट वाटले. पांडुरंगाला-विठ्ठलाला आपल्यासाठी श्रमविले असे वाटून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. अशा थोर माळकरी घराण्याचा वारसा कृष्णाबुवांना लाभला होता. त्यांना कुंभार स्वामी म्हणत की, ''पंढरपूरची वारी का करीत नाहीस?'' एकदा त्यांना पंढरपूरला जायचे होते. त्यांनी कुंभारस्वामींना परवानगी मागितली. कुंभारस्वामींनी त्यांना पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला जाण्याची संमती दिली. कृष्णाबुवांनी पंढरपूरला जाण्याची तयारी केली. वाटखर्चासाठी पाच रुपये जमविले. उद्या जाणार इतक्यात त्यांच्या आईनं अंगावरले लुगडे जुने झाले आहे, लुगडे आण, असे सांगितले, यावर कृष्णाबुवांना कांही सुचेना. प्रथम पंढरपूर करावे की, आईला लुगडे आणावे. जवळ तर फक्त पाचच रुपये होते आणि या दोन्हीपैकी एकच कार्य ते करु शकत होते. ही सत्याची कसोटी होती. बुध्दीपर्यंत पोहचता येत नव्हते. एखाद्या माणसाची योग्यता आजमावण्यासाठी संत पुरुष कसोटी लावतात. अशा प्रसंगी कृष्णाबुवा अंतरंगी शांत राहिले. त्यांनी पाच रुपयाचे लुगडे आईला आणून दिले.

दुसऱ्या दिवशी कृष्णाबुवा कुंभार स्वामींच्या दर्शनाला गेले असता मेघगर्जनेहून सामर्थ्यवान पण फुलाहून कोमल मृदू आवाजत कुंभार स्वामी त्यांना म्हणाले, ''बरे केलेस पोरा'' आसमंतातील व्यापक दिव्यदृष्टीने स्वामींनी बुवांनी आईला लुगडे आणून दिल्याचे ओळखले. ते पाहून कृष्णाबुवांचे डोळे भरुन आले. त्याच रात्री त्यांचा एक मित्र त्यांच्या घरी आला व तो म्हणू लागला ''आम्ही सहकुटूंब पंढरपूरला दर्शनाला उद्या निघणार आहोत. आमच्या जाण्याची व्यवस्था झाली आहे. सोबतीला तू चल तुझ्यासाठी घोडे तयार आहे.'' अशा रितीने जरी पाच रुपये आईच्या लुगड्याला खर्च झाले असले, परिस्थिती दारिद्र्याची असली तरी त्यांच्या गुरुदेवांनी कुंभार स्वामींनी त्यांची पंढरपूरला जाण्याची सोय करुन ठेवली होती. मित्राची विनवणी ऐकून कृष्णाबुवांना परमानंद झाला. ते मित्राबरोबर पंढरपूरला गेले.

श्री क्षेत्र पंढरपूरला खूप गर्दी झाली होती. या गर्दीत त्यांना दर्शन होणे कठीण वाटले. त्यात अपस्मारीचा त्रास. काय करावे हेच कळेना. इतक्यात मंदिरातील पुजारी /बडवे आला तो त्यांना म्हणाला, ''चला बुवा पांडुरंगाच्या दर्शनाला'' असे म्हणून त्या पुजाऱ्याने /बडव्याने त्यांना दर्शनासाठी मंदिरात नेले. मंदिरात त्यांना त्या महागर्दीतून पांडुरंगाऐवजी गुरुदेव कुंभार स्वामीच दिसू लागले. अशी दिव्य अनुभूती त्यांना येत होती. कृष्णाबुवा मला पांडुरंगाचे दर्शन घडवा, असे पुजारींना / बडव्याना म्हणत होते. ते देहभान विसरुन गेले होते. तर पुजारी / बडवे व लोक कृष्णाबुवांना म्हणत होते तुला डोळे नाहीत काय? आंधळा आहेस काय? समोरच

पांडुरंग उभा आहे. मग कृष्णाबुवांना विराट स्वरुपात पांडुरंगाचे दर्शन झाले. कृष्णाबुवांची खात्री झाली. आपले गुरुदेव कुंभारस्वामी व पंढरपूरचा पांडुरंग एकच आहेत.

कुंभारस्वामी कृष्णाबुवांना वरचेवर म्हणत ''तू अंगाला राख लाव.'' एकदा भक्तांसह श्री क्षेत्र वाडी रत्नागिरीला जोतिबाच्या दर्शनाला जात असतांना कृष्णाबुवा खानदानी घराण्यातील, माळकरी घराण्यातील विठ्ठल कृपापात्र घराण्यातील म्हणून त्यांना म्हणाले, ''कुलवान घोडे'' व त्यांच्या खांद्यावर बसले. परमेश्वरी इच्छा गोंधळून टाकत असते. लवकरच त्यांचे कुटुंब निवर्तले. एकुलत्या एका मुलीचे लग्न होऊन ती अर्जुनवाडला, ता. शिरोळ येथे सासरी गेली. आपल्या गुरुदेवांच्या आज्ञेने त्यांनी अंगाला राख लावली व ते संन्यास घेऊन अलाहाबादच्या कुंभमेळ्याला निघून गेले. ते नागासाधूंच्या झुंडीत सामील झाले.

भारतात फार पुरातन काळापासून कुंभमेळे भरतात. दर सहा वर्षांनी भरणाऱ्या यात्रेला अर्ध कुंभमेळा म्हणतात. तर दर बारा वर्षांनी भरणाऱ्या धार्मिक यात्रेला हिंदू लोक कुंभमेळा म्हणतात. भारतातील हजारो साधू फक्त कुंभमेळ्यांच्या पुण्यपर्वाला झुंडीने – गटाने बाहेर पडतात. त्यांचे दर्शन संसारातील लाखो स्त्री–पुरुष घेतात. कृष्णाबुवा बारा वर्षे नागा साधूंच्या सहवासात राहिले. नागासाधूंचे मुख्य लक्षण म्हणजे हे दिगंबर अवस्थेत असतात. अंगभर भस्म चर्चन करतात. जटादाढी हे त्यांचे बाह्यस्वरुप असते.

कृष्णाबुवांच्या गुरुदेवांनी कुंभारस्वामींनी श्रावण वद्य दशमी शके १८२२ सोमवार दि. २०/८/१९०० रोजी श्रीक्षेत्र कोल्हापूरला अवतार समाप्ती केली. गुरुदेवांच्या आज्ञेने ते पंढरपूरची वारी शुध्द एकादशीला करीत, बारा वर्षाच्या पंढरपूर वारीनंतर विठ्ठलाचे – पांडुरंगाचे त्यांना दर्शन झाले होते. त्यांना ईश्वर म्हणजे सच्चिदानंद प्राप्त झाला होता. त्या आनंदाचा कधीही अंत होणार नव्हता. चंद्रभागेत त्यांनी श्रीविठ्ठलाला – पांडुरंगाला स्नान घातले होते. पांडुरंगाने त्यांना स्नान घातले होते. आज रेल्वे चुकल्याने त्यांच्या गुरुदेवांच्या भविष्यातील संकेतानुसार रामचंद्र जाधवांच्या घरी कृष्णाबुवा आले होते. रामचंद्र जाधव, यल्लाप्पा तुपारे, पाटोळे, पांढरे–पाटील यांचा भाग्योदय झाला होता.

हिमालयात कितीतरी साधु, संन्याशी, बैरागी, योगी, गोसावी राहतात. गिरीजन राहतात. पण या साऱ्यानाच ईश्वरप्राप्ती होते असे नाही. परंतु कृष्णाबुवांच्यामुळे या संसारी लोकांना ईश्वर प्राप्त झाला होता. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, कुंभारस्वामी प्राप्त झाले होते. श्रीक्षेत्र पंढरपूरला जाताना – येताना कृष्णाबुवा रामचंद्र जाधवांच्या घरी येऊ – जाऊ लागले. मुक्कामही करु लागले. सन १९४२ मध्ये आपल्या गुरुदेवांच्या कुंभार स्वामींच्या चर्मपादुका, टोप्या (हिरव्या रंगाच्या), रुद्राक्षमणी रामचंद्र जाधवांना कृष्णबुवांनी दिल्या. सन १९४५ मध्ये मिरजेतील नदीवेस पवार गल्लीतील एका अरुंद गल्लीत रामचंद्र जाधवांनी एक छोटेखानी घर घेतले. या घरात कृष्णाबुवांच्या हस्ते श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना

होऊन नैतिक अध्यात्मिक मुल्यांच्या जोपासनेचे एक कार्य चालू झाले. आयुष्याचे ध्येय आणि आयुष्याचा मार्ग दाखवण्याचे हे कार्य होते.

भुईगल्ली–पवार गल्लीत एक पुराणप्रसिध्द श्री विठ्ठल मंदिर असून ते जागृत स्थान आहे. कृष्णाबुवा त्यांच्या गुरुदेवांच्या आज्ञेने शेवटी कृष्णा नदीकाठी वास करुन राहिले. मिरजेत ते भुईगल्ली–पवार गल्लीतील विठ्ठल मंदिरात राहत. दोन प्रहरी ते पांढरेंच्या घरी भिक्षेला जात तर रात्री जाधवांच्या घरी भिक्षेला जात. वसतिस्थान मात्र विठ्ठल मंदिर होते. कधी कधी ते अर्जुनवाडला जात, तेथे त्यांचा मुक्काम सदाशिव महाराजांच्या मठात असे. ते स्नानाला नदीकाठी येत. जेथे ते स्नान करीत त्या जागेला बुवांचा पाणवठा असे नांव पडले. तेथे एक छोटे मंदिर आहे. त्यांच्या डोक्यावरच्या जटा दहा ते बारा फूट लांब होत्या. एकदा शिर्केच्या गुरुदेवांच्या समाधी मंदिरातील एका घुशीला कृष्णाबुवाने जटेच्या माराने मृतप्राय केले होते. कृष्णाबुवांनी श्री विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठलासमोरील पिंपळ वृक्षाखाली पारावर दि. ६/११/१९४७ रोजी अवतार समाप्ती केली. त्यांच्या जाधव – पांढरे – पाटील रजपूत या शिष्यांनी त्यांना कृष्णा नदीकाठी समाधी दिली. जणू एक पर्व संपले.

संदर्भ ग्रंथाचे नांव :– **कृतज्ञता**

लेखकाचे नांव :– **श्री. बजरंग झेंडे**




श्री स्वामी समर्थ मठ, कृष्णाघाट, मिरज

## सदगुरुंचे वारु श्री कृष्णास्वार

**श्रीपती तुम्ही उभे राहूनी युगा श्रमला ।**
**कृष्ण सरस्वती रुप घेऊनी सिंहासनी बसला ।।धृ।।**
**सद्‌गुरु सांगती कृष्णा स्वार जावे तू पंढरीला ।**
**रमा माधवा पाहुनी यावे ही आज्ञा तुजला ।**
**स्वयं गुरु तुम्ही विठ्ठल मग वदे यातायात कशाला ।।१।।**
**ती आज्ञा मानून प्रवासा किंचित धन जमवले ।**
**गुजराया नव्हते मातेस्तव नववस्त्रा ते खर्चले ।**
**रुखरुख ती नाशली गुरुकृपे अश्वलाभ जाहला ।।२।।**
**महिमा गात गुरुंचा आला दास स्वार पंढरीला ।**
**हा तर आमुचा श्री गुरु म्हणे मग कुठे विठ्ठल सावळा ?।**
**राऊळी रुपी श्री रुपांतर झाले चमत्कार पाहिला ।।३।।**
**जग जेठी तो जानकीजीवन द्वारकाधीश झाला ।**
**कीर्ती वाढवित द्वैत निपटीत मारुती दत्त झाला ।**
**जय जयकार करीत गुरुंचा स्वार दास ये मठीला ।**
**यत्किंचित त्यास त्रास न झाला गातो सीतासुत गुरुलीला ।**

श्री कृष्णा स्वारांचे आडनाव निकम असे होते. ते स्वत:च्या खांद्यावर श्रीकृष्ण सरस्वती महाराजांना बसवून ने आण करीत. तीच त्यांची गुरुसेवा होती, आणि म्हणूनच महाराज त्यांना स्वार म्हणून संबोधित असत. ''स्वारांना बोलवा'' ''स्वार कुठे आहेत?'' असा उल्लेख महाराजांच्या बोलण्यात वारंवार येत असे. लांब अंतरावर जाण्याच्या महाराजाच्या प्रत्येक प्रवासात श्री कृष्णास्वार होतेच.

श्री कृष्णा स्वार हे कोल्हापूर येथीलच. शिवाजी पेठेमध्ये त्यांचे घर होते. बालपणापासूनच ते सशक्त होते व तरुणपणात व्यायाम करुन त्यांनी अधिक देह प्रकृती कमावली होती. छत्रपतींच्या पदरी रिसाल्यात म्हणजे घोडदळात नोकरीला होते. त्यांना अपस्मारी (फेफरे) वारंवार त्रास देत असे. गृही त्यांच्या एक वृध्द माता व स्वरुपवान पत्नीसह दोन अपत्ये होती. मोठी एक मुलगी व लहान एक मुलगा. हा लहान मुलगा अगदी अंगावरचा असतांना तो सारखा रडत असे. औषधोपचार करुन सुध्दा ह्या मुलाचे रडणे थांबेना. त्यावेळी अशी लहान मुले रडावयास लागली की माता त्या मुलांना थोडी अफू देत. मग त्या गुंगीने मूल झोपी जाई. त्याप्रमाणे कृष्णा स्वारांच्या पत्नीने स्वत:च्या ह्या रडणाऱ्या मुलाला अफू घातली. पण ती नेहमीच्या प्रमाणा पेक्षा जास्त झाल्यामुळे झोपेतच ते मूल दगावले. एकुलता एक मुलगा आणि वंशाचा दिवा अशा प्रारब्धाच्या फटक्यात मृत्यूमुखी पडला.

त्या मुलाची उत्तरक्रिया करण्यात आली. तेंव्हा सर्वांना समजले अफूने मूल दगावले. पुत्र वियोगाचा प्रहर बसलेल्या कृष्णा स्वारांच्या त्या पत्नीला पती क्रोधाची जबरदस्त भीती वाटली. आपल्या लहान मुलीस घेऊन तिने माहेरचा रस्ता धरला. जी ती माहेरी गेली ती परत सासरी आलीच नाही. केवढा वचक तिने ह्या कृष्णा स्वारांच्या घेतला होता, हे ह्या वरुन दिसून येईल.छत्रपतींची नोकरी करुन कृष्णा स्वार घरी वृध्द मातेसह रहात असत. परत त्यांत अपस्मारी त्रास ज्यामुळे त्यांचे मन विषण्णावस्थेत गेले. अशा स्थितीत त्यांनी मग वैराग्य मठीत येऊन श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या चरणावर लोटांगण घातले. तेंव्हा महाराज त्यांना म्हणाले ''बुवा आता तुम्ही अंगावर भगवे घ्यावे!''

गुरुंच्या आज्ञेनुसार कृष्णा स्वारांनी अंगावर भगवे घेतले. ते गोसावी झाले. संसारी सुखातून ते पूर्ण विरक्त बनले. घरी मातेच्या आज्ञा, सेवेतून वैराग्य मठीत महाराजांच्या आज्ञा सेवेत रहावे ही आता कृष्णास्वारांची आयुष्याची इति कर्तव्यता झाली. बलदंड प्रकृतीचे कृष्णास्वार अपस्मारीच्या त्रासाने नंतर मग हैराण झाले. तशात त्यांची प्रकृती खालावली तरी पण त्यातून त्यांनी महाराजांची सेवा सोडली नाही.

''बाळकू (स्व. बाळकृष्णा राशिवडेकर) नंतर तूच माझा खरा वारु'' (घोडा) म्हणून महाराज बाहेर कुठेही निघाले की कृष्णा स्वारांच्या खांद्यावर आवडीने बसत व कृष्णा स्वार पण हनुमंत जसे प्रभू राम लक्ष्मणांना घेऊन डौलात जात तसे महाराजांना स्वत:च्या खांद्यावर घेऊन ते सांगतील तिथे तास न तास घेऊन जात.

महाराज बाहेर निघाले की त्यांचे भाष्य सूचक असे. भक्तांच्या मेळाव्यात त्यांचा उलगडा ज्यांचा त्यालाच होत असे. इतर भक्त ते ऐकून स्तब्धच रहात. अशाच अनेक भक्तांच्या मेळाव्यात महाराज प्रयाग संगमी निघाले असता कृष्णा स्वारांना परत महाराज उद्‌गारले ''हे बघ कृष्णा बाळकू नंतर तूच माझा खरा वारु!'' कृष्णा स्वार म्हणाले ''महाराज तुमची कृपा'' महाराज परत उद्‌गारले ''अरे पूर्वी तू विठूरायाला भुलवले होतेस! तुझे वैभव आम्हांला माहीत आहे!''

महाराजांच्या ह्या उक्तीतला अर्थ कृष्णा स्वारांच्या व्यतिरीक्त कोणत्याही भक्ताच्या लक्षात आला नाही. तेव्हा त्या पैकी एकाने ह्याचा खुलासा कृष्णा स्वारांना विचारला तेंव्हा कृष्णा स्वार म्हणाले ''माझ्या मातोश्रींचे वडील म्हणजे माझे आजोबा पूर्वी वारकरी असून ते पण छत्रपतींच्या दरबारी द्वारपाल म्हणून होते. रजा काढून ते आषाढीची पंढरीची वारी नियमित करीत असत. त्यात कधीही खंड पडला नाही. पण उतारवयात पूर्वी सारखी अंगात शक्ती राहिली नाही. त्यामुळे पंढरीच्या वारीसाठी पूर्वी पेक्षा दुप्पट वेळ लागू लागला. अशाच एका वारीच्या वेळी कोल्हापूरला परत यावयास चार दिवस अधिकच उशिर झाला. आता आपल्यावर छत्रपतींचा रोष होणार. काय करावयाचे? या चिंताग्रस्त भयभीत मन:स्थिती आपल्या सहकाऱ्यांस

विचारले ''मी वेळेवर कामावर हजर झालो नाही म्हणून माझ्यावर छत्रपती रागावले आहेत की काय?'' ते म्हणाले ''कशाबद्दल?'' आजोबा म्हणाले ''रजा संपून चार दिवस होऊन गेले, तरी मी आलो नाही, आज मी कामावर हजर होत आहे म्हणून तुला विचारतो?''

ते सहकारी म्हणाले ''तू रजा संपल्याबरोबर कामावर हजर झालास! चार दिवस झाले, तू काम पण केलेस आणि भ्रम झाल्यासारखे आज असा काय विचारतोस? कसली तुला अशी विस्मृती झाली आहे?'' तेंव्हा तो आजोबा म्हणाला ''विस्मृती ! मला नाही झाली आहे, तुम्हालाच झाली आहे.'' सहकारी म्हणाले ''सत्य असत्य एक जाणे विठ्ठल ! तुझीच ही भूल ! आम्हांला असत्य बोल बोलण्याची गरजच काय?''

सहकाऱ्यांच्या बोलण्याने आजोबा पण दिग्मूढ झाले जिवाभावाचे सहकारी असत्य आपल्याशी झाले. आपल्या गैर हजेरीत विठ्ठलाने आपली नोकरी केली. चार दिवस माझे काम ह्या पंढरीनाथाने केले. त्याला मी व्यर्थ श्रमविले ! आता मला छत्रपतींची नोकरी नको! आता मी आमरण विठूरायाची नोकरी करीन. वार्धक्याची सबब सांगून छत्रपतींच्या नोकरीचा राजीनामा दिला आणित्यांनी विठूरायाच्या भक्तित उर्वरीत आयुष्य काढले! हा सर्व वृत्तांत कृष्णा स्वार सांगत असता सर्व भक्त एकाग्र चित्ताने ऐकत होते. शेवटी कृष्णास्वार म्हणाले ''तो माझा आजोबा म्हणजे माझाच तो पूर्व जन्म असावा म्हणून महाराज म्हणाले.

**तुझे वैभव आम्हा ठावे । मजला म्हणती जातीवंत**

**भुलविला पंढरीनाथ । ऐसाच वाटे याचा अर्थ**

**तुमचे स्वमत पहा कैसे ।**

महाराज माझ्या खांद्यावर बसतात त्याचे मागील हे एक गमक आहे.'' ह्या वृत्तांतात कृष्णा स्वारांच्या बोलण्यात ''मी'' पणा आलेला होता. महाराज तेंव्हा कृष्णास्वारांना म्हणाले ''आता मला खाली उतर!'' त्याचप्रमाणे महाराजांना खाली उतरण्यात आल्यावर महाराज म्हणाले ''आज कसला हा दिवस ? पात्रं सगळी मलीन झालीत!'' कृष्णा लाड तेव्हा समोर आलेले पहाताच त्यांना उद्देशून महाराज म्हणाले ''हे प्रसिध्द वाहन ! ह्यावर आरुढावे असे वाटते. ह्याचा स्वभाव कांही जड नाही! कृष्णा लाड तेंव्हा म्हणाले ''महाराज! सुखाने बसा माझ्या खांद्यावर ! तुमची कृपा असल्यावर सहज आपण ठरविलेल्या स्थळी आरामात पोहचू''

त्या बरोबर कृष्णास्वार मनातल्या मनात वरमले. आपल्यातला ''मी'' पणा हा बरा नव्हे. महाराजांना तो आवडला नाही. म्हणून त्यांनी ही एक प्रकारची मजला शिक्षाच केली आहे. ह्याच ''मी'' पणात तारामती होत्या. त्यांना पण त्यातून जागे करण्यासाठी मग महाराजांनी सर्वच भक्तांचा त्याग प्रयाग संगमी केला; फक्त कृष्णा लाड व वासुदेव दळवी ह्यांच्या समवेत सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातून राजापूरादी ठिकाणी जाऊन २१ दिवसांनी परत कोल्हापूरला आले.

ह्या घटनेपासून भक्तांना घ्यावयाचा धडा ते घेतला. ह्यानंतर बराच कालावधी गेला. एक दिवस महाराज कृष्णा स्वारांना म्हणाले ''तुझा आजोबा वारकरी होता तेंव्हा तू पण पंढरीला जाऊन ये!'' कृष्णा स्वार म्हणाले ''महाराज! तुम्हीच साक्षात आमचे पंढरीनाथ असतांना कशाला आणखी एवढ्या दूर पंढरीला पाठविता?'' तर गुरुबंधू पण कृष्णा स्वारांना म्हणाले तुमची वृत्ती माळकऱ्यांची तेंव्हा पंढरपूरच्या वारीची निश्चिती कराच!

त्याच दिवशी कृष्णा स्वारांना स्वप्न दृष्टांत झाला कोणी एक माळकरी कृष्णास्वारांना म्हणाला ''तुम्हांला पंढरीनाथ बोलावीत आहे'' हा स्वप्नदृष्टांत श्री गुरुंची आज्ञा व पंढरीला जाण्याचे गुरुबंधूचा आग्रह हे सर्व कृष्णास्वारांनी आपल्या मातोश्रींना सांगितले. पंढरीला जाण्यासाठी त्यांनी पांच रुपये पण जमवले. तेंव्हा कृष्णा स्वारांच्या मातोश्री म्हणाल्या, ''घरात दैन्य दारिद्र्य! पोटभर अन्न खावयास मिळत नाही आणि त्यात तुला होणारा अपस्मारीचा त्रास कसा काय तू पंढरीची वारी करणार?''

तेंव्हा कृष्णा स्वार म्हणाले, ''माते, माझ्याजवळ पांच रुपये आहेत. प्रवास खर्चाला ते मी पुरवीन. फक्त तू मला जाण्याची अनुज्ञा दे.'' तेव्हा ती माता म्हणाली ''माझ्या अंगावर धड लुगडं नाही. आधी त्या पैशात कसलं तरी एक लुगडं आणून दे.'' कृष्णा स्वारांच्या पुढ्यात संकटासमोर संकट उभे राहिले. पण लागलीच त्यांनी मनाशी विचार केला.

**माते समान दैवत । शोधिता नाही त्रिभुवनात**
**पुरवू तिचा मनोरथ । जाऊ चालत पंढरीसी ।।**

जन्म दिला तिला परमेश्वराचं प्रति रुप समजणारे हे कृष्णा स्वार कोणी विद्या व्यासंगी, थोर पंडित नव्हते! शिक्षणाचं ज्ञान नसणाऱ्या ह्या कृष्णा स्वारांच्या अंगी वेदश्रुतीने गौरविलेलं एक महत्तत्व ''मातृ देवो भव!'' हे मात्र चांगलच भिनलं होतं! त्यांनी मनाचा निर्धार केला. काय लागतील कष्ट ते लागो आपुल्या पंढरीच्या वारीला; पण मातेचं दु:ख-कष्ट आधी निवारुया! ह्या पैशात आपण एक चांगले लुगडं घेऊन मातेला देऊया. मग आपण पंढरीला पायी चालत चालत जाऊन येऊया! ह्या विचारासवे त्यांनी एक चांगले लुगडं आणून मातेला दिले व वैराग्य मठीत येऊन महाराजांचा निरोप मागणार तोच महाराजच कृष्णा स्वारांना म्हणाले ''बरे केलेस पोरा! तू काय पंढरीला चालत जाऊ नकोस येथे जी आश्वशाळा आहे नां तेथे तू त्वरीत जाऊन ये!''

गुरुंची आज्ञा शिरसावंद्य करुन कृष्णा स्वार त्वरीत रिसाल्यात गेले. स्वत: ते पंढरीला पायी जाणार असल्याची वार्ता येथे सर्वश्रूत झाली होती. कृष्णा स्वारांना पहाताच एका मित्राने येऊन आपले पण हितगुज त्यांना सांगितले. तो मित्र म्हणाला, ''तू पंढरीला जाणार आहेस ना? आम्ही पण पंढरीला जाणार आहे. प्रत्येक वर्षी मी एकटाच पंढरीची वारी करत असतो. ह्या वेळेस माझ्या बायकोने पंढरीनाथाच्या दर्शनाचा अगदी आग्रहच धरल्यामुळे आम्ही शकटारोहण

करुन उद्या पंढरीला जावे म्हणतो. आमच्या माघारी एक आमची जी घोडी आहे तिची देखभाल कोण करणार? तेव्हा ती घोडी घेऊन तू पंढरीला जा. तू एकटाच आहेस, आम्ही दोघे आहोत तेंव्हा तू घोडीवर बसून आरामात पंढरीला जा!'' कृष्णा स्वारांनी त्वरीत ते मान्य केले. ह्या घटने मागचे सूत्रधार आपुले दयावंत श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजच आहेत हे त्यांच्या लक्षात आले. महाराजांच्या आज्ञेने आणि कृपेने पंढरीला जाणेसाठी एक घोडी मिळाली.

दुसऱ्या दिवशी मातेचे प्रथम चरण दर्शन घेतले. तिने पण सुखाने आशीर्वाद दिला. मग वैराग्य मठीत येऊन महाराजांच्या आशीर्वाद-आज्ञा-दर्शनासाठी येताच महाराज म्हणाले, ''स्वारा! आता जा खुशाल घोडीवर बसून! आणि ये सुखात पंढरी-राजाचं दर्शन घेऊन! तुला आता पासून कधीही अपस्मारीचा त्रास होणार नाही. जा!'' कृष्णा स्वारांचे अंत:करण भरुन आले. एका दुर्धर व्याधीतून महाराजांनी आपल्याला कायमचेच सोडवले. ह्या कृतज्ञतेने महाराजांच्या चरणावर साष्टांग प्रणिपात केला. त्यांचा व गुरुबंधूचा निरोप घेवून कृष्णा स्वार घोडीवर आरुढ झाले. महाराजांच्या नाम रुप स्मरणांत; विठूरायाच्या भजन गुंजनात पंढरीला आले पण पंढरी। भू वैकुंठ रमारमणाचे पीठ वैष्णवांनी फुलून निघालेल्या त्या भगवंताच्या दरबारात आत दर्शनाला जाणे दुरापास्त झाले. ती प्रचंड गर्दी म्हणजे जणू भगवंताच्या भक्तिचं उठलेले मोहळ! राऊळात पाय ठेवावयास जागा नाही. दर्शन आता कसे होणार ह्या चिंताग्रस्त होत निघालेल्या मनाला लागलीच ''निजबोध'' झाला! भक्तांना निजबोध बहाल करणारं श्रीकृष्णसरस्वती महाराजांच्या सारखं दुसरे दैवत कुठेही शोधून मिळणार नाही!

''ज्या सद्गुरुंनी येथेवर पाठविले आहे, तेच पुढची काळजी दूर करतील'' असा विचार महाद्वारातच कृष्णा स्वारांच्या मनात येतो ना येतो तोच त्यांच्या शेजारी आगंतुक एक पुजारी असलेला त्यांना दिसला ! आपण म्हणावयाचा ....... आगंतुक नाही तर तो पण होता अगदी क्षणा पूर्वीचा का होईना पण तो पूर्व नियोजित! कृष्णा स्वारांनी त्याला स्वत: कोल्हापूर सारख्या दूरच्या ठिकाणाहून आलेला, अपस्मारीनं बेजार झालेला व त्यातच भगवंताच्या दर्शनाला आतुर झालेला आपला मनोदय सांगितला! त्वरीत त्या पुजाऱ्याने स्वत:चा खास अधिकार वापरला म्हणावयाचं! त्याने कृष्णा स्वारांना त्या हजारोंच्या झुंडीतून कांही क्षणातच वाट काढत विठूरायांच्या चरणा जवळ आणून उभे केले व म्हणाला, ''विठोबा-विठोबा पाहिजे होताना, घ्या ह्या विठोबाचं दर्शन!''

कृष्णा स्वारांनी दर्शन घेतलं पण तिथं विठोबा कुठं होता? तिथं तर त्याला श्रीकृष्णसरस्वती महाराज दिसले. म्हणून त्यांनी गाभाऱ्यातील सर्व पुजाऱ्यांना विचारले, ''तुमचा विठोबा कुठे आहे?'' त्यावर ते बडवे म्हणाले, ''हा काय इथे उभा आहे'' तेंव्हा स्वार म्हणाले ''हे तर आमचे सदगुरु श्रीकृष्णसरस्वती महाराज! शुभ्र अंगरखा, टोपी आणि मौतिक माळा घालून सिंहासनी विराजमान झाले आहेत.''ते पुजारी म्हणू लागले, ''अरे कुठला तुझा सद्गुरु? हा तर

आहे रमावरु भरजरी पितांबर घालणाऱ्याला तू म्हणतोस अंगरखा घातलाय! रत्नजडीत किरीट कुंडलानी मंडित असणाऱ्याला म्हणतोस टोपी घातली, अठ्ठावीस युगे उभे राहून करकटी असणाऱ्या ह्या पंढरीनाथाला तू म्हणतोस ''सिंहासनाधिष्ट झालाय'' काय, भ्रमिष्ट झालास की काय तू?''

इथं आता वादविवाद कांही उपयोगाचा नाही असे ठरवून कृष्णा स्वारांनी सद्गुरु रुपी त्या देवाचे कांहीक्षण चरणावर भाळ ठेवून श्रीमुख पहातात तो तेथे सद्गुरु श्रीकृष्णसरस्वती महाराजांच्या ऐवजी करकटी श्रीविठ्ठलाचे दर्शन झाले. गुरुंच्या जवळ सर्व दैवते असतात असा कृष्णा स्वारांचा दृढ विश्वास होताच मग त्यातून हा पंढरीचा विठोबा तरी दूर तो आणि कुठे जाणार? ही सर्व करणी आपल्या सद्गुरुंचीच आहे! हे त्यांच्या लक्षात येण्याला कांही उशीर लागला नाही. विठूरायाचे दर्शन झाल्यावर कृष्णा स्वारांच्या मुखी उद्गार आले ''पंढरीराया तुम्ही मोत्यांचा हार दाखवण्यासाठी तुळशी माळा दूर केल्या वाटते. सुवर्णालंकृत किरीट कुंडलांचा साज लपवून शुभ्र अंगरखा तुम्ही घातलात. युगान युगं २८ युगे तुम्ही ह्या विटेवर कर कटावर ठेऊन उभे राहून शिणलात. तो थकवा परिहार व्हावा म्हणूनच की काय आमच्या सद्गुरु श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या रुपात क्षणभर का होईना सिंहासनावर विराजमान होऊन बसलात, बसा बसा!'' असे म्हणून श्रीविठ्ठलाचे दोन्ही जघन दोन्ही हातांनी कांही क्षण चुरत - चुरत श्री चरणावर नत मस्तक झाले. त्या पंढरीराजाचा मग निरोप विनम्र भावाने घेऊन त्यांनी कोल्हापूरचा मार्ग धरला. सद्गुरुंच्या नामरुप स्मरणांत विनासायास ते कोल्हापूर वैराग्य मठात येऊन दाखल झाले. महाराजांच्या चरणावर लोटांगण घातले व महाराजांना म्हणाले, ''महाराज तुम्ही इथेही! आणि पंढरीतही! तुम्हीच महाराज स्वांगे त्रैलोक्याला नटवले आहे! देवा, आता मला तुमच्या चरणांपासून कुठेही दूर पाठवू नका. मला तुमच्या जवळ कायमचेच ठेवा!'' महाराज म्हणाले ''अरे कृष्णा! तू माझाच स्वार आहेस! तुला दूर लोटून मी आणखी कुठलं दुसरे घोडं हुडकू! तु माझ्या जवळच रहा हं!'' पंढरीचा साक्षात्कार, महती कृष्णा स्वारांनी आपल्या गुरुबंधूना सांगितली त्यामुळे सर्व भक्तांचीच निष्ठा श्री गुरुचरणापाशी अधिक दृढ झाली. हे जग श्री गुरुमय आहे.

महाराजांनी समाधी घेतल्यावर सर्व शिष्य भक्तांची पांगापांग झाली. नंतर कोल्हापूरला दर १२ वर्षांनी येणाऱ्या हिमालयातील नंग्या गोसाव्यांच्या झुंडीतून कृष्णा स्वार हिमालयाला गेले व नंतर येणाऱ्या झुंडीतून १२ वर्षांनी कोल्हापूरला आले. ह्या नागव्या गोसाव्यांच्या बरोबर त्यांनी तीर्थयात्रा केली म्हणून कोल्हापूरातील श्रीकृष्ण सरस्वतींचे भक्त त्यांना नंगेबुवा म्हणून पण संबोधू लागले. हिमालयाच्या तीर्थयात्रेतून १२ वर्षांनी परत जेंव्हा कृष्णास्वार कोल्हापूरला आले तेंव्हा त्यांना त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी पण ओळखले नाही. ते स्वत:च्या भावाच्या घरात शिरले. स्त्रियांच्या शिवाय घरी पुरुष माणूस कोणीही नव्हते. तेंव्हा घरातील ती


भावजय स्वयंपाक घरात आलेल्या ह्या कृष्णा स्वारना पाहून भय भीतीने ओरडू लागली तेंव्हा कृष्णास्वार म्हणाले, ''अहो वहिनी मी कृष्णा! तुम्ही घाबरता कशाला? मी दुसरा तिसरा कोणी नसून तुमचाच दीर आहे! तुम्ही मला ओळखले नाही का?'' मग त्या वहिनीने स्मित आनंदाने येऊन त्या भावोजींचे कृष्णास्वाराचे चरण दर्शन घेतले.

त्यानंतर सन १९४४ पर्यंत महाराजांच्या वैराग्य मठीतच कृष्णास्वार होते. त्यांनी एकदा आपल्या नुसत्या डोक्यावरच्या जटांनी मंदिरात नासधूस करणाऱ्या घुशीला एका तडाख्यातच खलास केले होते. यावरुन त्यांच्या जटांविषयी कल्पना येईल. मंदिरात संचारलेल्या पिशाच्याच्या छाताडावर ते स्वत:चा उजवा पाय ठेवत. त्या परिणामे त्वरित ती व्यक्ती पिशाच्चबाधेतून मुक्त होत असे. त्यांचे अनुभव मिरज, अर्जुनवाड, टाकळी व चंदूर आदी ग्रामस्थांना आले आहेत. मिरजेला असतांना ते श्री गुरुचरणी विलीन झाले. त्यांच्या मुलीचे चिरंजीव नातू अजूनसुध्दा टाकळी व चंदूर गांवी आहेत. मिरजेचे आध्यात्मिक मार्गदर्शन करणारे श्री झेंडेमहाराज यांनी विशेष पुढाकार घेऊन श्री कृष्णास्वारांचे मंदिर कृष्णा घाटावर उभारले आहे. पंढरीच्या दरबारी पंढरीनाथांच्या ऐवजी सद्गुरु रुपांचे दर्शन कृष्णा स्वारांना महाराजांनी दिले ह्या वरुनच कृष्णा स्वारांची भक्ती सेवा किती श्रेष्ठ दर्जाची होती ह्याची थोडी तरी का होईना आपल्याला कल्पना येईल. त्यांचा पुण्यप्रद आदर्श आपल्याला सदैव प्रेरणादायी असाच आहे. त्यांच्या चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम

लेखक :- **श्री. बाळासाहेब शां. नाडकर्णी, कोल्हापूर**

संदर्भ :- **श्री. श्रीकृष्ण सरस्वती पुण्यतिथी विशेषांक**

**श्री नागासाधू/ हटयोगी/ श्री नवनाथ मार्गी योग्यांची योगासने**



शिवगोस्वामी आसन लोहाटीट आसन



श्री स्वामीभक्त श्री कृष्णा स्वार



श्री सदाशिव बुवांच्या मठातील श्री कृष्णा स्वारांचे भक्तासमवेत घेतलेले छायाचित्र अर्जुनवाड(शिरोळ)

## ।। अध्याय १५ वा ।।



स्व. रामनाथ शिर्के

### विषयसूची....!

१) तेलंगी ब्राम्हणाच्या पत्नीला पिशाच्च मुक्त केले
२) आळीला जीवदान
३) कृष्णा लाडाची आई
४) सहा महिन्याचा बालक रामनाथ शिर्केकडून उपदेश
५) राजापूरचा कोणी एक भक्त

# अध्याय १५ वा

तेलंगी ब्राम्हण कुटूंबातील एक स्त्रिला पिशाच्च बाधा झाली. तिच्या पतीने तिची पिशाच्च बाधा दूर करण्यासाठी देवदेवर्षी कडून बराच प्रयत्न केला. परंतु पिशाच्च बाधा दूर झाली नाही. अनेक उपाय करुन थकला व पिशाच्च बाधित पत्नीला घेवून तो श्रीक्षेत्र काशीला गेला. तेथील विद्वान अशा स्वामींनी त्याला पिशाच्च बाधा दूर करण्यासाठी श्री भगवान दत्तात्रयाची कृपा होणे आवश्यक आहे. श्री दत्तात्रेय हे श्रीक्षेत्र गाणगापूरला गुप्त रुपाने वास करुन राहतात. तेथे तुझ्या पिशाच्च बाधेने पिडीत असलेल्या स्त्रीला ने म्हणजे पिशाच्च बाधा दूर होईल. समंध बाधा दूर होईल असे सांगितले व गाणगापूरला जाण्याची आज्ञा केली. काशीच्या स्वामींच्या आज्ञाने तो तेलंगी ब्राम्हण आपल्या पत्नीला घेवून श्रीक्षेत्र गाणगापूरला आला व भगवान श्री दत्तात्रेयाची आराधना करु लागला, सेवा करु लागला. कांही दिवसा नंतर भगवान श्री दत्तात्रेयाने स्वप्नात दृष्टांत देवून त्या तेलंगी ब्राम्हणाला त्याच्या पत्नीला कोल्हापूरला कुंभार गल्लीतील स्वामींच्याकडे नेण्यास सांगितले. तेथेच पिशाच्चबाधा दूर होईल. समंध बाधा दूर होईल असे सांगितले.

तो तेलंगी ब्राम्हण शेवटी कोल्हापूरला आपल्या पिशाच्च बाधीत पत्नीला घेवून आला. तपास काढत तो कुंभार गल्लीत ताराबाईच्या घरी आला. स्वामी दर्शन घेवून तो तेलगू भाषेत आपल्या स्त्रीला झालेली पिशाच्च बाधा सांगू लागला. पिशाच्च बाधेने झालेले हाल, अवस्था सांगू लागला व नित्याच्या पांचही आरतीला स्त्रीसह हजर राहू लागला. आरती / गजराच्या वेळी त्या तेलंगी स्त्रीच्या अंगात पिशाच्च संचारु लागला. त्या स्त्रीची भाषा तेलगू असतांना मराठीत बोलू लागली. स्वामींनी त्या पिशाच्याला तू कोण आहेस या स्त्रीला का झडपिले आहेस असे विचारताच त्या पिशाच्याने त्या तेलंगी स्त्रीस का झडपिले हे मराठी भाषेत स्वामींना कथन केले. गेल्या जन्मी मला या स्त्रीने फसविले आहे. मी एक गरीब ब्राम्हण होतो. चार पैसे मिळवावेत म्हणून वेगवेगळ्या गांवी गेलो. अनुष्ठाने / व्रते सांगून सातशे रुपये गोळा केले. ते सातशे रुपये घेवून मी स्वत:च्या गांवी परत येण्यास चालत निघालो. दुपारची वेळ, पोटाला अतिशय भूख लागली. माझे गांव तर अजून खूपच लांब होते. म्हणून एका गांवात थांबलो. त्या गांवात ही ब्राम्हण स्त्री रहात होती. तिच्या घरी तिच्या पतीसंगे जेवण घ्यावे म्हणून तिच्या घरी गेलो. जेवणाची व मुक्कामाची माझी सोय तिच्या घरी होईल असे त्या ब्राम्हण स्त्रीने सांगून मला नदीवरुन स्नान करुन येणेस सांगितले.

मग मी माझे ज्या गाठोड्यात सातशे रुपये लपवून ठेवले होते ते गाठोडे ठेवून अंघोळीला गेलो. अंघोळ/स्नान करून परत आलो. येथेच्छ भोजन केल्यानंतर निघण्याच्या वेळी गाठोडे उघडले त्यात लपवून ठेवलेले सातशे रुपये आहेत का? हे बघितले तर माझ्या लक्षात आले गाठोड्यात तिर्थाटन करुन आणलेले / भिक्षा मागून आणलेले, गाठोड्यात लपवून ठेवलेले सातशे रुपये चोरीला गेले आहेत. माझे अंत:करण / मन तळमळू लागले. मी त्या ब्राम्हण स्त्रीला सहज विचारले ''माझ्या गाठोड्यातील तू रुपये घेतली आहेस काय? यावर ती म्हणाली

''तुम्हांला वाटसरु म्हणून चांगले जेवण घातले, पाहुणा म्हणून आदर केला त्याचे हे चोरीचा आळ हे फळ काय?'' तिने सातशे रुपये घेतले असल्याचे कबूल केले नाही. माझाही काही उपाय चालला नाही. परंतु मला पक्के माहिती होते माझ्या गाठोड्यात मी लपवून ठेवलेले सातशे रुपये या ब्राम्हण स्त्रीनेच घेतले होते. यावर आता स्वामीच निर्णय घेतील. त्या सातशे रुपयात माझे मन अडकले / धनात माझे मन अडकले यातच मी मरण पावलो, माझे जीवन संपले. पुढच्या जन्मात मी पिशाच्च जन्माला आलो. गेल्या जन्मात या ब्राम्हण स्त्रीने माझी केलेली फसवणूक माझ्या लक्षात होतीच. ही उपवर होताच / हिचे लग्न होताच हिचा संसार भग्न / नष्ट करण्यासाठी हिला पिशाच्च होवून मी झडपिले आहे. आता जर या स्त्रीने / हिच्या मालकाने सातशे रुपये खर्चून ब्राम्हण भोजन घातले तर हिला मी सोडून देईन, ही ब्राम्हण स्त्री पिशाच्च मुक्त होईल. पुन्हा तिला मी झडपणार नाही / त्रास देणार नाही. हे पिशाच्चाचे मराठी बोलणे ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले.

पिशाच्चाचे सर्व बोलणे ऐकून स्वामींनी आपल्याजवळ असणाऱ्या उपरण्याला फक्त गाठ मारली व पिशाच्चाला झोडपायला सुरुवात केली. तरी, पिशाच्च त्या तेलंगी स्त्रीला सोडीना, उपरण्याला जशी गाठ स्वामी मारु लागले तसतसे त्या पिशाच्चाची / भूताची पाठ फुटू लागली. त्या पिशाच्चाने आरडणे / ओरडणे थांबविले व स्वामींना शरण जाऊन म्हणू लागले ''या पिशाच्च योनित मला किती तरी वर्षे घालवावी लागली असती. या ब्राम्हण स्त्रीला मी झडपिले तिच्या मुळे मला तुमचे दर्शन झाले. या पिशाच्च योनीतून मी मुक्त होत आहे / मला या पिशाच्च योनीतून मुक्त करा. आता या ब्राम्हण स्त्रीला मी त्रास देणार नाही. मला मारु नका. मला आता सातशे रुपये नकोत, सातशे रुपये खर्चुन ब्राम्हण भोजन नको. फक्त एक आंबा द्या मी मुक्त होईन'' पिशाच्चाची विनंती स्वामींनी मान्य केली.

त्या कार्तिक महिन्यात आंबा उपलब्ध असत नसतांना सुध्दा त्या पिशाच्याला एक आंबा दिला. त्या तेलंगी ब्राह्मण स्त्रीला त्या पिशाच्याने सोडून दिले. तिच्या अंगातून निघून गेले. ती स्त्री धरणीवर समंधमुक्त/ पिशाच्चमुक्त होऊन धरणीवर पडली. कांही वेळाने ती तेलंगी ब्राम्हण स्त्री शुध्दीवर आली. स्वामी त्या स्त्रीला म्हणाले, ''आता तुझा भोग संपला आहे. पिशाच्च बाधेतून मुक्त झाली आहेस. आता नव्याने संसार सुरु कर.''

एके दिवशी पहाटेची / सकाळची भक्तांनी स्वामींची काकड आरती करुन त्यांना नेहमी प्रमाणे चौरंगावर बसविले. सकाळची बाळभूक म्हणून एक खारीक नैवेद्य म्हणून स्वामींच्या पुढे ठेवली. ती खारीक स्वामींनी तोंडात घातली, चावून चूर्ण सुध्दा केली. इतक्यात स्वामी म्हणाले ''बिचारी दाढेला सांपडली परंतु तिला वाचविले पाहिजे'' असे म्हणून स्वामींनी कृष्णा लाडाला हात पुढे करण्यास सांगितले. कृष्णाने हात पुढे केला, चावून चुरा केलेला खारकेचा चुरा स्वामींनी त्या हातावर ठेवला. कृष्णा लाडाच्या हातावरील चुऱ्यात एक जिवंत आळी सर्व भक्तांना दिसून आली. सर्व भक्तजन विस्मयचकित झाले.

कृष्णा लाडाची आई फार दुष्ट होती. मनुष्य रुपात दत्त म्हणून अवतरलेल्या स्वामींवर तिची श्रध्दा/विश्वास नव्हता. म्हणून कृष्णा लाड नेहमी स्वामींना विनंती करी ''आईची दुष्ट बुध्दी घालवा. तुमची सेवा करण्याची तिला बुध्दी द्या'' हे ऐकून स्वामी कृष्णा लाडाला म्हणाले ''थोडा धीर धर योग्य वेळ येताच तुझ्या आईची दुष्ट बुध्दी घालवून सेवेला तत्पर करतो'' पुढे कांही दिवस गेले कृष्णा लाडाच्या आईला वृध्दापकाळ आला मरणोन्मुख पडली. यमदूत न्यायला आल्याचे बघून / मरण बघून ती घाबरुन गेली व कृष्णाला म्हणाली ''या मरणाच्या यमदूता पासून सोडव, नरकाच्या मार्गा पासून सोडव'' ते ऐकून कृष्णा लाडाने स्वामींच्या काष्ठ पादुका घेवून आईच्या गळ्यात बांधल्या व आईला म्हणाला ''आता ते यमदूत पळून जातील, नरकाच्या वाटा दिसणार नाहीत. घाबरु नकोस'' असे सांगून कृष्णा लाडाची आई त्याला म्हणाली ''ऐक मुला, मला न्यायला आलेले यमदूत पळून गेले. स्वर्गाचा सुरेख रस्ता मला दिसत आहे. माझी कुबुध्दी आता गेली आहे. मानव रुपातील या तुझ्या गुरुंची / स्वामींची सेवा नित्य कर'' असे म्हणून कृष्णा लाडाच्या आईने प्राण सोडला. अंत:काळी पश्चाताप पावली तिला स्वामीमुळे मोक्ष मिळाला.

स्वामी कृष्णा लाडाला म्हणाले, ''अंत:काळी तुझ्या आईला पश्चाताप झाला आहे. तिची दुष्ट बुध्दी नाहीशी झाली आहे. माझे सानिध्य तिला लाभले आहे. आता तिला कुत्र्याच्या जन्माला घालून आपल्या जवळ ठेवू या'' मठीत पूर्वी एक कुत्री होती. तिच्या पोटी कृष्णा लाडाची आई कुत्रीच्या रुपाने जन्मली. तिचे नांव स्वामींनी कुसारी ठेवले. पुढे कुसारीच्या पोटी कुत्री जन्मली तिचे नांव स्वामींनी पगी ठेवले. पूर्व पुण्याईने पगी मठीत सेवेसाठीच जन्मली होती. स्वामींना कुत्र्याची फार आवड. पगी नांवाच्या सुंदर कुत्रीला फिरायला बरोबर घेत. तिच्यावर भूतदया दाखवित. पगी जरी कुत्री होती. तरी ती स्वामींना नेहमी प्रदक्षणा घाली. कुसारी कुत्रीची पिलीण म्हणून पगी स्वामींना फार आवडे.

एकदा सर्व भक्त मंडळीसह स्वामी वडणग्याला निघाले होते. या भक्तमंडळीत एक स्वैराचारी / दुर्वतनी भक्त होता. दुर्वतन सोड / चांगले वाग म्हणून स्वामी त्याला नेहमी उपदेश करीत. परंतु तो दुर्वतनी भक्त स्वामींचे बोल / उपदेश मनावर घेत नसे. दुर्वतनाने वागत असे. ऐकले न ऐकले असे वागत असे. स्वामींच्या खांद्यावर सहा महिन्यांचा रामनाथ बसला होता. सहा महिन्यांच्या रामनाथाला स्वामी घेवून चालत होते. खांद्यावरच्या सहा महिन्यांचा बाळ रामनाथ त्या दुर्वतनी भक्ताला म्हणाला ''स्वामींच्या / गुरुंच्या उपदेशाप्रमाणे वाग. ते काय सांगतात त्या प्रमाणे वाग. तुझे वागणे सुधार. नाही तर तुला नरकवास भोगावा लागेल. नरकवास नशिबी येईल'' स्वामींच्या खांद्यावरील रामनाथाचे बोल ऐकून तो दुर्वतनी भक्त आश्चर्यचकित झाला. जणू स्वामींनी बाल मुखातून वेदच सांगितला होता. त्याला पुरा पश्चाताप झाला व सरळ मार्गाने वागू लागला. सोबतच्या सर्व भक्तांना हा प्रकार कळला. स्वामींनी सहा महिन्याच्या रामनाथाकडून वेदच वदविल्याचे सर्वांना आश्चर्य वाटले. श्री

स्वामींना / गुरुंना वेद वदविणे कांहीच अवघड नाही असे सर्वांना वाटले / सर्वजण म्हणू लागले.

एकदा दोनप्रहरी गाढ निद्रेत असलेल्या स्वामींना / गुरुंना पाहून हरिपंत शिदनेर्लीकरच्या मनात आले. ''जगाचा व्यापार, चलनवलन जो चालवितो तोच गाढ निद्रेत कसा काय आहे?'' असा विचार / विकल्प शिदनेर्लीकराच्या मनांत आला तोच अचानक ध्वनी कानावर आला की, ''गुरुंची परीक्षा कोण घेतो काय? गुरुविषयी मनांत कोण विकल्प आणतो काय? मूर्खा पापाचा धनी होवू नकोस'' शिदनेर्लीकर हा ध्वनी ऐकून घाबरुन गेला. त्याने वासु दळव्याला घडलेला सर्व प्रकार सांगितला.

यावर वासु दळवी शिदनेर्लीकराला म्हणाला ''गुरु जरी तुला गाढ निद्रीस्थ दिसले तरी ते त्रिभुवन पालथे घालीत फिरत असतात. त्यांना कांहीही अशक्य नाही.'' एवढ्यात स्वामी शेज घरातून औदुंबराच्या झाडाखाली येवून उभे राहिले व म्हणू लागले. ''खवळलेल्या समुद्रात अनेक नावा होत्या. त्या नावे वरील अनेकजण बुडून मरण पावले. त्यातच एक माझा भाविक भक्त बुडत होता. प्रेमळ भक्त बुडत होता. त्याच्यासाठी मला तिकडे समुद्रात जाणे भाग पडले, त्याला हाताला धरुन समुद्र काठाला आणून सोडले. त्याचा जीव वाचविला'' असे म्हणून स्वामींनी ओली छाटी पिळून दावली. त्यातून समुद्राचे खारे पाणी टपटप पडू लागले. यानंतर पुढे एक महिन्यानंतर राजापूरचा कोणी एक भक्त स्वामींच्या दर्शनाला ताराबाईच्या मठी आला.

त्याने स्वामींचे मनोभावाने दर्शन घेतले व सर्वांना सांगू लागला ''महिन्यापूर्वी माझी नौका समुद्रात व्यापाराच्या निमित्ताने वावरत होती. त्यावेळी अचानक वादळ उठले. दुर्दैवी प्रसंग आमच्यावर आला. बऱ्याच नौका वाहून गेल्या. नौकावरील व्यापारी साहित्य / माणसे वाहून गेली. जिकडे तिकडे आकांत पसरला. मला सुध्दा मरणाचे भय वाटू लागले. माझी सुध्दा नौका बुडू लागली. एकदा राजापूरला आलेल्या या स्वामींचा मी धांवा करु लागलो परमेश्वर म्हणून हांका मारु लागलो. बुडता बुडता या स्वामींनी मला समुद्रात हात देवून कांठावर आणून सोडविले. माझा प्राण वाचविला. समुद्रातील वादळात माझी नौका व नौकेवरील साहित्य सर्व वाहून गेले. परंतु स्वामींनी माझे प्राण वाचविले. ज्या स्वामींनी समुद्रातील संकटात वाचविले, ज्या स्वामींनी माझा प्राण वाचविला अशा स्वामींच्या मी दर्शनाला / उपकार फेडण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी आलो आहे असे स्वामी तिन्ही जगात शोधून सापडणार नाहीत'' हे त्या गहिवरुन गेलेल्या राजापूरच्या भक्ताचे बोलणे ऐकून मग औदुंबर झाडाखाली छाटी पिळल्याचा चमत्कार लक्षात आला. तसेच स्वामींच्या गाढ निद्रेबद्दल आपण चुकीचा गैरसमज करुन घेतल्याचे शिदनेर्लीकराच्या लक्षात आले. त्यांचे डोळे भरुन आले. पश्चाताप पूर्वक अंत:करणाने त्याने स्वामींचे चरण धरले.

*****

# हिमालयातील केदारनाथ

हिमालयात जी अनेक शिवस्थाने प्रसिध्द आहेत. त्यात कैलास व केदारनाथ या दोन स्थानांना विशेष महत्व आहे. बदरीनाथही पूर्वी शैव क्षेत्र म्हणून प्रसिध्द होते. समुद्रसपाटीपासून ११७६० फूट उंचीच्या शिखरावर केदारनाथाचे स्थान आहे. केदारनाथाचे लिंग शाळुंका-पिंडी या आकाराचे असून ते स्वयंभू असल्याचे मानतात. लिंगावर तुपाचे गोळे थापून येथे पूजा केली जाते. मुख्य पुजारी रावळ असतो. मुख्य मंदिराच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर लागणारी आठ कुंडे पवित्र मानली गेली आहेत. पवाली, रुद्रकुंड, वासुकी गंगा, गौरीकुंड, उष्णकुंड, गौरीदेवी, उदककुंड, रेतकुंड, स्वर्गारोहण, महापथ इत्यादि पवित्र स्थाने याच परिसरात आहेत. बदरीकेदार, मध्यमकेदार, तुंगनाथ, रुद्रनाथ व कल्पेश्वर असे पंचकेदार याच प्रदेशात आहेत. शवारुढ कालीमूर्तीचे शक्तिपीठ एक मोठे सिध्दस्थान म्हणून गणले गेले आहे. बौध्दकाळात केदारनाथ हे एक मोठे धर्मकेंद्र होते. शंकराचार्यांनी पुन: तेथे हिंदू धर्माचे महत्व वाढविले. देवीपुराणात या स्थानाचे महत्व सांगताना म्हटले आहे-

**केदारमुदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ।**
**न योनिषु नियुज्ज्यते स गच्छेच्छाश्वतं पदम् ।।**


केदार येथील जल प्राशन केले की पुन: जन्म येत नाही. तो प्राणी इतर कोणत्याही योनीत न जन्मता शाश्वतपदाला जातो. बदरीकेदार, कैलास, मानस सरोवर, इत्यादि हिमालयीन तीर्थक्षेत्रे सर्वच यात्रेकरुंना, विशेषत: शिवोपासक नाथपंथी योग्यांना पवित्र वाटतात. अनेक सिध्दयोगी हिमालयात राहून खडतर तपस्या करुन साधना करीत. सिध्दी प्राप्त करुन घेत. नेपाळ तिबेटकडे पसलेला बौध्दधर्म, नाथपंथ, सिध्दमार्ग, या दृष्टीने तपासून पाहण्यासारखा आहे. नवनाथांपैकी अनेकांचा संबंध बदरीनाथाशी आलेला आहे. मूळचा केदारनाथ असणारा हा देव कोल्हापूरच्या महालक्ष्मीस दैत्यसंहाराच्या कार्यात मदत करण्यासाठी आला व तो तेथेच विजयानंतर स्थिरावला. ज्योतिर्लिंगाच्या रुपात निवास करणारा जोतिबा चतुर्भुज आहेत.

वाडीरत्नागिरीत केदारलिंग, केदारेश्वर व रामलिंग अशी तीन मंदिरे आहेत. रामलिंगाचे स्थान परशुरामाशी संबंधित असल्याने जवळच रेणुकामातेचे व यमाईचेही मंदिर आहे. रविवारी व पौर्णिमेस येथे मोठी यात्रा भरते. जोतिबाचा चांग भले अशा जयजयकाराने वाडीचा डोंगर दुमदुमून जातो.

संदर्भ ग्रंथाचे नाव - **नाथसंप्रदाय : उदय व स्वरुप**
लेखकाचे नाव : **प्र. न. जोशी**

# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय १६ वा ॥




**श्री ज्ञानेश्वर समाधी, आळंदी**

## विषयसूची....!

१) दादा पंडिताच्या पत्नीला भूतबाधा
२) श्रींना घेवून पंढरपूर प्रवास
३) स्वामीभक्त गोविंद यांचा आळंदी प्रवास
४) एक मजुराचे रोजचे श्री दर्शन

# अध्याय १६ वा

श्री दादा पंडित नांवाचा ब्राम्हण गृहस्थ कोल्हापूरात रहात असे. तो कुटील / शंकित मनाचा असून श्रीकृष्णगुरुंची नेहमी निंदा करीत असे. राजदरबारी काम करी त्यामुळे अमित द्रव्य सांभाळून होता. मुलबाळ नसल्याने तो नेहमी श्रीकृष्णगुरुंच्या / स्वामींच्या दर्शनाला रोज वैराग्य मठीत येई. दादा पंडित तेथील लोकांना स्वामी विषयी सांगे ''अवघे भक्त लोक केवळ मूर्ख आहेत. दत्त म्हणून स्वामींना भजता हे बरोबर नाही.'' स्वामींची निंदा ऐकून वैराग्य मठीतील जुने / वृध्द सेवक भक्तगण आपआपसात म्हणत ''दादा पंडित कसला मनुष्य जो स्वामींची निंदा करुन आपल्या पायावर कुऱ्हाड मारुन घेत आहे.'' लवकरच त्याची पहिली पत्नी मरण पावली. दादा पंडिताने दुसरे लग्न केले. लवकरच त्याच्या दुसऱ्या पत्नीला भुताने झपाटले. स्वामींची तो निंदा करतच राहिला. त्याच्या पत्नीच्या अंगात भुताचा संचार होत राहिला. स्वामींना तो मानत नसल्याने त्याने विचार केला स्वामी हे दत्त अवतार नसून साधारण मनुष्य आहे. अशा मनुष्याकडे पत्नीला नेऊन भूत बाधा / पिशाच्च बाधा दूर होणार नाही. भूतबाधेवर उपयोग होणार नाही. नृसिंहवाडीत आपले देव दत्त महाराज आहेत असे समजून पत्नीला घेऊन नृसिंहवाडीला गेला.

नृसिंहवाडीत गेल्यावर त्याच्या पत्नीच्या अंगात समंधसंचार होई / भूत येई. पत्नी क्षणात ओरडे क्षणात रडे, जमिनीवर दत्तासमोर लोळे. दादा पंडिताला ते पाहून केवढे मोठे संकट आहे असे वाटे. नृसिंहवाडीत पाच दिवस गेले. एक दिवस तो समंध / भूत दादा पंडिताला म्हणू लागले. ''पत्नीला कुंभार गल्लीत श्रीकृष्णगुरुंच्या समोर नेले पाहिजे. तरच तुझ्या पत्नीची पिशाच्चबाधा/भूतबाधेतून मुक्तता होईल अन्यथा यावर उपाय चालणार नाही.'' यावर दादा पंडित म्हणू लागला.''एवढे दत्त महाराज वाडीत समर्थ असतांना कुंभार गल्लीतच कशाला गेले पाहिजे? श्री दत्तानेच या अनाथाचा हट्ट पुरवून पत्नीची भूतबाधेपासून मुक्तता केली पाहिजे.''असा मनोनिग्रह करुन पत्नीस उगीचच पिशाच्च/भूत बाधेचे क्लेश देत बसला.परंतु कांही दिवसांनी त्याची कुदशा/वाईट दिवस संपले.त्याच्या स्वप्नात दंडकमंडलूधारी श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज आले व म्हणाले. ''तू कसला मूर्ख माणूस आहेस. उगीच हट्टाने येथे थांबून पत्नीला त्रास देत बसला आहेस. कुंभार गल्लीतील श्रीकृष्णगुरु हा माझाच अवतार आहे. त्यांच्या ठिकाणी भाव धर, श्रध्दा ठेव. त्यांची निंदा सोड अन्यथा घोर संकटांना पार नाही. वैराग्य मठीत पत्नीला ने म्हणजे तिची पिशाच्चबाधा / भूतबाधा दूर होऊन ती पूर्ववत होईल.'' स्वप्नातील दृष्टांतानी दादा पंडित जागा झाला. त्याच्या पत्नीच्या अंगातील पिशाच्च त्याला म्हणू लागले. ''मत्त होऊ नको ब्राम्हणा. कुंभार गल्लीत श्रीकृष्ण गुरु समोर मला नेल्याशिवाय तुझ्या पत्नीला मी कधीही सोडणार नाही. त्यांची निंदा सोडल्याशिवाय मी झाडाला सोडणार नाही. तुझ्या पत्नीला अखंड त्रास देत राहणार, छळत राहणार, तू काय माझे करणार आहेस? एकदा जर वैराग्यमठीत श्रीकृष्ण गुरुंच्या समोर मला नेलास तर तुझ्या पत्नीला मी सोडून जातो.'' असे

म्हणून त्याची भूतबाधीत पत्नी जमिनीवर लोळे, रडे, ओरडे, नानाप्रकारच्या चेष्टा करी. दादा पंडित खूप दुःखी झाला. त्याला वाटू लागले की श्रीकृष्णगुरुंची आपण निंदा केली, सत्पुरुषांची / श्री दत्ताची निंदा केली याचा त्याला पश्चाताप झाला. त्याच्या दुर्वासना नष्ट झाल्या. दुसरा दिवस उजडल्यावर दादा पंडित नृसिंहवाडीहून वैराग्य मठीत आला. स्वामींना/ श्रीकृष्ण गुरुंना शरण येवून म्हणू लागला, ''मला क्षमा करा. आता माझे दुजेपण गेले आहे. नेणतेपणी मी तुमची निंदा केली. मला क्षमा करा. अज्ञानाने मी अंध झालो व तुमची निंदा करण्याचे निंद्य कर्म माझ्या हातून झाले. विवेकहीनत्वामुळे हे सर्व घडले आहे. माझे सर्व अपराध पोटात घाला व माझ्या पत्नीला पिशाच्चबाधेतून / भूतबाधेतून मुक्त करा.'' करुणेचा सागर असणाऱ्या श्रीकृष्णगुरुंना दादा पंडिताची दया आली. त्याचा द्वैतभाव नाशिला. श्रीकृष्णगुरुंनी आपल्या मांडीखाली छाटी सहज घातली. तेंव्हा दादा पंडिताची पत्नी जमिनीवर गडागडा लोळू लागली. तिच्या अंगातील पिशाच्च / भूत श्रीकृष्णगुरुंना म्हणू लागले. ''सोडा, सोडा गुरुराया मी झाडास सोडून जातो.'' यावर श्रीकृष्णगुरु त्या पिशाच्चाला / भूताला म्हणाले, ''दादा पंडिताच्या पत्नीला सोडून दे / सोडून जा'' यावर ते पिशाच्च / भूत श्रीकृष्णगुरुंना म्हणाले ''मी तुमच्या दर्शनाने मुक्त झालो आहे. मुक्तीच्या इच्छेने मी इथेपर्यंत आलो आहे'' पुन्हा पुन्हा श्रीकृष्णगुरुंना नमस्कार करुन दादा पंडिताच्या पत्नीला पिशाच्च / भूत सोडून गेले. दादा पंडितही श्रीकृष्णगुरुंना म्हणू लागला ''देवा, मी अत्यंत मूढ / मूर्ख. तुझा महिमा मी जाणला नाही. मला आता क्षमा कर''

एकदा कार्तिक महिन्यात श्रीकृष्णगुरुंना श्रीक्षेत्र पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला न्यावे असे भक्तांना वाटले. श्रीकृष्णगुरुंच्या बरोबर सर्व भक्तगण / सेवकांनाही पंढरीची यात्रा घडेल. तसेच एकाच ठिकाणी (कोल्हापूरात) राहून ताराबाईला कंटाळा आला होता. कांही दिवस तरी पंढरपूरला जावे असे ताराबाईला वाटू लागले. श्रीकृष्णगुरुंनीही श्रीक्षेत्र पंढरपूरला जाण्याची अनुमती दिली. बरीच भक्तमंडळी श्रीकृष्णगुरुंच्या बरोबर पंढरीरायाचे दर्शन घेण्यासाठी, पंढरीराय बघण्यासाठी विठ्ठल विठ्ठल गर्जत पायी निघाले. कृष्णा लाड मोठा भाग्यवान. कृष्णा लाडाच्या खांद्यावर बसण्यास श्रीकृष्णगुरुंना आवडे. बसावयास उत्तम घोडे आहे म्हणून कृष्णा लाडाच्या खांद्यावर श्रीकृष्णगुरु बसले. सर्वजण चालू लागले. वाटेत रामकृष्णहरी, श्री गुरुदेव दत्त असा गजर करीत हळू हळू सर्वजण चालू लागले. इतक्यात एक सशक्त इसम आपल्या शक्तिचा गर्व बाळगून कृष्णा लाडास म्हणाला ''मी एक मोठा मल्ल आहे, तुमच्या गुरुंना, मी माझ्या खांद्यावर बसवून सहज चालेन. त्यांचे वजन फुलासारखे आहे. किंबहुना ते फुलासारखे हलके आहेत. दहा कोसा पर्यंत सहज मी त्यांना वाहून नेईन यात शंका नाही.'' श्रीकृष्णगुरुंनी त्या मल्लाचे बोल ऐकले व त्याच्या खांद्यावर आवश्य बसले पाहिजे म्हणून बसले व कौतुक / चमत्कार दाखविला. त्या मल्लाने त्यांना खांद्यावर घेवून उठू लागला तर श्रीकृष्णगुरु अतिशय जड झाले त्यांना उचलतांना तो मनांत म्हणू लागला. ''मी गर्वाने / मूर्खपणाने फुलासारखे सहज

श्रीकृष्णगुरुंना वाहून नेण्याची भाषा केली. अंगात ताटा बाळगून हे संकट ओढावून घेतले. आता मी श्रीकृष्णगुरुंना खांद्यावरुन वाहून नेले नाही तर सर्वजण मला निर्लज्ज / अभिमानी म्हणतील'' असा चिंताक्रांत तो मल्ल झाला. शेवटी गर्व सोडून गुरुचरण नमून श्रीकृष्णगुरुंची त्या मल्लाने क्षमा मागितली व म्हणू लागला, ''माझे गर्वाचे घर खाली झाले. उगीच मी खाऊन धरणीला भार झालो आहे. माझा आपण गर्व पळविला आहे. माझा अपराध पोटी घालावा'' श्रीकृष्णगुरुंना साष्टांग वंदन करुन क्षमा मागून श्रीकृष्णगुरुंना त्याने खांद्यावरुन खाली उतरविले.

कोल्हापुरात सदाचार संपन्न दत्तात्रय व्यासशास्त्री रहात होते. करवीरात ते वेदशास्त्रसंपन्न शास्त्री म्हणून प्रसिध्द होते. रोज दहा - वीस शिष्य घरी जमवून वेदांत चर्चा करीत असे. त्यांना वेद अध्ययन शिकवीत असे. त्यांना एक गोविंद नांवाचा सुमारे २५ वर्षाचा मुलगा होता. त्यानेही संस्कृत भाषेचा, ग्रंथाचा अभ्यास, वेद अध्ययन केले होते. योगवसिष्ठ, भगवद्गीता, पंचदशी भागवत व इतर ग्रंथाचा अभ्यास केला होता. तसेच गोविंद व्यास वादप्रविण असून संस्कृतातून पुराण सांगे. अद्वैतशास्त्राची त्याला आवड, लालसा होती. गोविंद व्यासाचे वेद अध्ययन त्याचे संस्कृत भाषेतून पुराण सांगणे, ग्रंथाचा गाढा अभ्यास यामुळे दत्तात्रय शास्त्री सुखी / समाधानी होते. गोविंदाचे वेदअध्ययन, संस्कृत भाषेतून पुराण सांगणे, ग्रंथाचे गाढा अभ्यास जरी असला तरी त्याचे हे सर्व ज्ञान अनुभवशून्य होते. कांही काळ गेल्यानंतर पंढरीचा एक वारकरी त्याच्या घरी पाहुणा म्हणून आला. भोजन झाल्यानंतर चर्चा चालू असतांना तो वारकरी पाहुणा गोविंदाला म्हणाला, ''निष्ठेने जो गुरु करतो त्याला ज्ञानप्राप्ती होते. एक भाव शुध्द असला तर जगात कांही न्यून नाही. सद्गुरु शिवाय चालना नाही तोवर सर्व विषयाची पोपटपंची चर्चा आहे. श्रीगुरु समर्थ ज्ञानेश्वर मला भेटले. त्यांनीच मला ज्ञान, विद्या, प्रतिष्ठा, धन, मान्यता सर्व कांही दिले. नाही तर एक मी साधा मूढ मनुष्य.'' हे त्या वारकऱ्याचा उपदेश ऐकून गोविंदाच्या मनात शंका आली. ज्ञानेश्वरांनी समाधी घेऊन तर सहाशे वर्षे झाली. ज्ञानेश्वरांच्या सारखा आता सद्गुरु मिळणे तर कठीण आहे. हा पंढरपूरचा वारकरी असत्य बोलत आहे असे गोविंदास वाटले.

तरीसुध्दा कोल्हापुरातील एखाद्या सत्पुरुषाला निष्ठेने, भावाने गुरु केल्यास ज्ञानप्राप्ती होते का? द्वैतशास्त्राच्या अभ्यासाने ज्ञान प्राप्ती होते? हे विचारावे म्हणून गोविंद व्यास वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरुंची ख्याती ऐकून आला. त्याला पाहताच श्रीकृष्णगुरु गोविंदाला म्हणाले, ''तू आळंदीला जा ज्ञानेश्वर महाराज तुझी शंका दूर करतील.'' मनातील प्रश्न विचारण्यापूर्वी श्रीकृष्णगुरुंनी दिलेले उत्तर ऐकून गोविंदाला आश्चर्य वाटले. सत्पुरुष म्हणून श्रीकृष्णगुरुंची त्याने आज्ञा मानली व त्वरीत गोविंदा आळंदीला आला. आळंदीत जाऊन राहिला. मधुकरीचा नियम केला. रोज पाच घरे मधुकरी मागू लागला त्यावर समाधान मानून राहू लागला. ज्ञानेश्वरी वाचन करु लागला. अशा रीतीने एक महिना सरला. द्वैतबुध्दी पुरी भिनल्याने, मूर्तीकडे, समाधीकडे, वृत्ती न रंगल्याने गोविंदाला कांहीच अनुभव येईना. श्रीकृष्णगुरुंनी तर आळंदीला

जा. ज्ञानेश्वर महाराज तुझ्या मनाची शंका दूर करतील, तुला न्याय देतील असे सांगितले आहे. ईश्वराने सर्व जग व्यापले आहे असे सांगितले आहे. ते खरे का? श्रीकृष्णगुरुंचे वचन कधीच असत्य असणार नाही. अशा विचाराने त्याच्या मनात काहूर माजविले. असे नाना विचार करीत गोविंदा ज्ञानेश्वरांच्या समाधी दर्शनाला आला. द्वैतज्ञानाने देवाचा व्यापकपणा मनात येवून गोविंदा मनांत विचार करु लागला. देव सगळ्या विश्वात भरला आहे तर आळंदीत काय विशेष देवाचा गौरव आहे. उगीचच आपण आळंदीला देवाच्या दर्शनाला अज्ञानाने आलो. व्यर्थ भुलविले वारकऱ्याने असे त्याला वाटू लागले. फुकटची धांवा धांव झाली असे त्याला वाटू लागले. एवढ्यात मंदिरातील द्वारपाल गोविंदाला म्हणाला ''गाभाऱ्यात जाऊन श्री ज्ञानेश्वरांच्या समाधी दर्शनाची का घाई करतोस. आरतीची वेळ आहे देव सर्वत्र भरला आहे. दारातूनच दर्शन घे'' असे म्हणून त्या द्वारपालाने त्याला समाधी दर्शनाला आत सोडले नाही.

गोविंदा निराश झाला व त्याची चूक लक्षात आली. ज्ञानेश्वरांच्या सगुण रुपाचा अपमान केल्याने द्वारपालाने आपल्याला ज्ञानेश्वरांच्या समाधी दर्शनाला गाभाऱ्यात सोडले नाही. योग्य दंड / शिक्षा मला झाली. खरे तर भक्ति ही ज्ञानाची जननी आहे. भक्तिचा मी अपमान केला. सगुणरुप सगुण भक्ती त्याच्या मनात घोळू लागली. पश्चातापाने त्याचे अंत:करण शुध्द झाले. सगुण भक्ती, न सोडण्याचा निर्धार करीत गोविंदा परत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी दर्शनाला आला. मंदिरातील तोच द्वारपाल ज्याने प्रथम: त्याला ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी दर्शनाला सोडले नव्हते तोच त्याला ज्ञानेश्वर समाधी दर्शन घेण्याविषयी विनवू लागला. ते पाहून गोविंदाच्या मनात विचार आला याच द्वारपालाने आपले मन द्वैतभावाने भरल्याने, मन अशुध्द असल्याने सोडले नाही. आता मनातील द्वैतभाव पूर्ण नष्ट झाल्याने मन शुध्द झाल्याने द्वारपाल ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीच्या दर्शनाला सोडत आहे. दर्शन घे म्हणत आहे. गोविंदाने गाभाऱ्यात जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन श्रध्देने, भक्तीने घेतले. त्यांच्या सगुण रुपाला भुलला. पुढे आठ दिवस गेले. श्री ज्ञानेश्वर महाराज गोविंदाच्या स्वप्नात आले व म्हणू लागले ''कुंभार गल्लीतील श्रीकृष्ण सरस्वतीपाशी जा ते मारुतीचा अंश अवतार आहेत. त्यांना तू शरण जा. त्यांना गुरु करुन घे'' गोविंदा स्वप्नातून जागा झाला त्याला फार आनंद / संतोष झाला.

आळंदीहून परत आल्यावर श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला कुंभार गल्लीत गोविंदा त्वरीत गेला. त्याला पाहून श्रीकृष्णगुरु म्हणाले ''आताच आळंदीहून परत आलास काय? ज्ञानेश तुला भेटले काय? द्वैतभाव व भक्ति याचे परिपूर्ण ज्ञान त्यांनी तुला दिले काय? तुम्हाला माझ्याकडे धाडिले काय? बसा बसा तुम्हांला जे पाहिजे ते देतो तुझे कार्य केले पाहिजे'' असे म्हणून श्रीकृष्णगुरुंनी गोविंदाला बसणेस सांगितले. प्रसादाची पाने वाढली, पाट घातले, रांगोळ्या घातल्या श्रीकृष्णगुरुंनी गोविंदाला पाटावर प्रसादास बसविले. आपल्या हस्ते प्रसादाचे घास भरविले व म्हणाले ''ज्ञानेश माऊली तुला प्रसन्न'' गोविंदास फार आनंद झाला. श्रीकृष्णगुरुस तो म्हणाला ''अपराधाची मला क्षमा करा मी तुमचे थोरपण ओळखले नाही. मला कुठेही थारा नाही. तुमच्या चरणी

आसरा द्या'' गोविंदाला फार समाधान वाटले. गोविंदाचे वय जरी लहान असले तरी स्वामी सेवा करुन, नित्य आरती भजन करुन संसारात सुखाने दिवस काढीत असे. वैराग्य मठीत येवून स्वामी सेवा करु लागला. गुरुकार्यात तत्पर राहू लागला, अन्य व्यवसाय त्याने सोडून दिला. श्रीकृष्णगुरुंस गोविंदा फार आवडू लागला. त्यामुळे इतर कांही गुरुबंधू गोविंदाचा द्वेष करु लागले. व्यक्ति तितक्या प्रकृती. श्रीकृष्णगुरुंनी त्याचा द्वैतभाव पळविला ते त्याला म्हणाले ''पूर्वजन्माचा तुझा सुकृत ठेवा मागे असल्याने तुला जागे केले. कांहीजण अंधारात भ्रमण करतात. त्यांच्या द्वेषाकडे वागण्याकडे लक्ष देवू नकोस सेवा कर'' पुढे इतर गुरुबंधूही गोविंदाला गुरुबंधू मानू लागले. वावगे वागणे त्यांनी सोडून दिले. गोविंदा रोज वैराग्य मठीत जाऊन श्रीकृष्णगुरुंचे दर्शन घेवू लागला. दर्शनाशिवाय अन्नाला सुध्दा स्पर्श करीत नसे. पुढे पुढे श्रीकृष्णगुरु त्याच्या स्वप्नीही येऊ लागले.

श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला एक मजूर रोज दर्शनाला येई. रोज सकाळी श्रीकृष्णगुरुंचे दर्शन घेवून कामाला जाई. त्यामुळे त्याला कामही भरपूर मिळे. अर्थप्राप्तीही चांगली होई. पोटासाठी मजुरी करुन तो त्याची बायको, संतोषाने भाजी भाकरी खात असे. एके दिवशी तो मजूर श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला गेला असता, श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''आज कामावर जाऊ नकोस, कामासाठी जाऊ नकोस, तुझे खुरपे, दोरी माझ्याकडे दे. तुझी आज वेळ बरी नाही.'' यावर तो मजुर श्रीकृष्णगुरुंना म्हणाला ''कामाशिवाय न भरे पोट म्हणून तर कष्ट करतो. कामाशिवाय घरात अन्नाची सोय नाही. आम्ही काय खावे. आज आम्हाला उपवास पडेल'' यावर श्रीकृष्णगुरु त्या मजुराला म्हणाले ''आल्या पावली घरी जा. तुला उणे कांही नाही. तुझ्या पोटाची तयारी करु भरपूर. दुसऱ्या कामावर तुझी नेमणूक केली आहे अनुभव घे'' श्रीकृष्णगुरुंचे वचन / बोल ऐकून स्वस्थचित्ताने तो मजुर घरी आला. विश्वासाने घरी परत आला.

घरात येवून भजन करु लागला. तेवढ्यात एक गडी त्या मजुराकडे निकडीने धावून आला. ''माझ्यासंगे कामावर चल. दोघांचे काम आहे'' असे तो गडी म्हणू लागला दोघे जण दुसऱ्या एका कामावर गेले. दिवसभर काम केले. काम पूर्ण केले. त्याला मजुरी म्हणून पावली मजुरी मिळाली. अन्नाची काळजी त्या मजुराची मिटली. घरी येताच त्या मजुराला वार्ता / बातमी कळली की, पहिल्या कामाच्या ठिकाणी चोरी झाली होती. त्या कामावर जे जे मजूर राजाच्या कुरणातील गवताच्या चोरी करण्याचे काम करीत होते, चोरुन गवत कापून नेत होते त्यांना पकडून राजाच्या शिपाईंनी पकडून तुरुंगात टाकले होते. त्या गवत कापण्याच्या पहिल्या कामावर हा मजूर गेला नसल्याने कारागृहात / बंदीवासात गेला नाही. श्रीकृष्णगुरुनी बुध्दी सांगून खुरपे, दोरी काढून घेवून त्या नित्य दर्शनाला येणाऱ्या मजुराला कारागृहातून वाचविले. श्रीकृष्णगुरु गरीब / श्रीमंत भेद करीत नसत. ज्यांची गुरुवर श्रध्दा / भाव त्यांचे ते रक्षण करीत.

*****

# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय १७ वा ।।



श्री विठ्ठल मूर्ती, श्रीक्षेत्र पंढरपूर

### विषयसूची....!

१) स्वामीभक्त रामभाऊच्या आईला श्री विठ्ठल दर्शन
२) म्हैसाळची शिऊबाई
३) श्रींना पगडीचा नवस

## अध्याय १७ वा

रामभाऊ पुजारी कोल्हापूरात रहात. तिन्ही त्रिकाळ तो स्वामींच्या दर्शनाला येत असे. स्वामींवर त्याची नितांत श्रध्दा होती. दृढ भक्ति होती. घरात त्यांची वृध्द आई होती. स्वामींवर मात्र तिची श्रध्दा / भक्ति नव्हती. ती रामभाऊला म्हणे स्वामींवर विश्वास / श्रध्दा ठेवू नको, त्यांची संगत करु नकोस. स्वामी देव नसून मनुष्य आहे. त्यांच्या सेवेने ना मोक्ष मिळणार ना जीवनाचे सार्थक होणार. मातेचे या विचाराने रामभाऊला फार वाईट वाटले. आपल्या या वृध्द मातेला / आईला कोणी तरी गुरु किंवा स्वामींना गुरु करावे असे त्याला वाटे. एकदा रामभाऊ मठीत दर्शनाला आला असता स्वामी म्हणाले ''मी सर्वत्र व्यापून आहे.मला तुझी आई मानत नाही, तिची श्रध्दा / विश्वास माझ्यावर नाही. या विचाराने तू मनात व्यग्र होऊ नकोस. अश्रध्द विचाराने तुझ्या आईचे मन बहकले / भरकटले आहे परंतु ते अश्रध्द विचार दूर होऊन परत ती माझ्याकडे येईल. तिच्या मनातील गजबज दूर होईल. मी स्वत: हा खेळ करणार आहे. तू उगीच गंमत बघत बस'' स्वामींचे हे गूढ बोलणे ऐकून रामभाऊ स्वस्थ बसला. पुढे कांही दिवसांनी रामभाऊची आई त्याला म्हणाली ''रामभाऊ माझा आयुष्यकाळ संपत चालला आहे. पंढरीला जाऊन त्या दीनांच्या सोयऱ्याचे दर्शन घेण्याची माझी इच्छा झाली आहे. तेंव्हा पंढरपूरला नेऊन श्री विठ्ठल दर्शन घेण्याची माझी इच्छा एवढी तू पूर्ण कर. पंढरपूरला घेवून चल'' मातेचे बोल ऐकून तो स्वामींच्या दर्शनाला आला. श्री क्षेत्र पंढरपूरला जाऊन श्री.विठ्ठल दर्शन घेण्याची आईची इच्छा त्याने स्वामींच्या कानावर घातली. स्वामींनी त्याला माघ महिन्यातील पंढरपूर वारीला आईला त्वरीत घेवून जाणेस सांगितले.

दशमी दिवशी रेल्वेने रामभाऊ आईला घेवून श्री क्षेत्र पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शनाला पोहचला. श्री विठ्ठल / श्री पांडुरंग दर्शनाला चोहो बाजूने अनेक भक्त माघ महिन्यातील वारीला श्री क्षेत्र पंढरपूरात जमा झाले होते. चंद्रभागेच्या वाळवंटात कांही वारकरी श्री राम / श्री विठ्ठल नामाचा गजर करीत होते. खांद्यावर पताका घेऊन नाचत होते तर कोठे हरि कीर्तन चालले होते. तर कोठे ज्ञानेश्वरी वाचन चालले होते. तर कांही भक्त ध्यान लावून बसले होते. तर कांही वारकरी / भक्त चंद्रभागेत स्नान करुन ओल्यानी श्री विठ्ठल दर्शनाला चालले होते. एकादशीचा दिवस तो गर्दीने भरुन गेला होता. सर्वत्र वारकरी / भक्तांची गर्दी होती. राऊळात श्री विठ्ठल दर्शनाची मोठी रीघ लागली होती. श्री क्षेत्र पंढरपूरातील वारकरी / भक्त यांची मोठी गर्दी पाहून रामभाऊच्या मनात विचार आला की एवढ्या मोठ्या गर्दीत आपल्या वृध्द आईला श्री विठ्ठल दर्शन घडणे अशक्य आहे, अवघड आहे. स्वामी कृपा करतील, श्री विठ्ठल कृपा करेल तरच कांही तरी घडेल या विचाराने आपल्या वृध्द आईला हाताला धरुन दर्शनाच्या रांगे जवळ घेवून आला, रांगेत आईला बसवून कोणाच्या तरी ओळखीने लवकर दर्शन व्हावे या हेतूने तो खटपटीला लागला. यात बराच वेळ गेला. बराच वेळ गेला हे बघून रामभाऊची वृध्द आई त्या गर्दीत घाबरुन गेली. एवढ्यात एक मनुष्य रामभाऊच्या त्या वृध्द आईजवळ आला

व म्हणू लागला. ''रामभाऊचे गुरु श्री दत्त महाराज कोल्हापूरात असतात त्यांचाच मी दास / शिष्य आहे. श्री गुरु / स्वामी आज सकाळीच श्री विठ्ठल दर्शनासाठी भक्तांसह राऊळात आले आहेत. ते तुला बोलवित आहेत. तुला खांद्यावरुन राऊळात श्री विठ्ठल दर्शनासाठी नेण्यासाठी मी आलो आहे.'' ते ऐकून रामभाऊच्या आईला आनंद झाला. ती त्या मनुष्यरुपी स्वामींच्या / गुरुंच्या खांद्यावर बसून क्षणात राऊळात पोहचली. क्षणात ती श्री पांडुरंगाचे दर्शन घेऊन परत बाहेर मूळ स्थानाला येवून पोहचली. त्या मनुष्य रुपातील स्वामींनी / गुरुंनी तिला खांद्यावरुन हळूच खाली उतरविले. खांद्यावरुन तिला वाहून नेणारा / गोरापान, शुभ्र दाढीवाला मनुष्य, गर्दीतून नाहीसा झाला. याचे रामभाऊच्या आईला आश्चर्य वाटले. रामभाऊच्या गुरुचा भक्त कसा आला? त्याने क्षणात खांद्यावर बसून श्री पांडुरंगाचे / श्री विठ्ठलाचे दर्शन क्षणात कसे घडविले, पुन्हा खांद्यावर बसवून राऊळा बाहेर क्षणात अलगद आणून सोडून तो कुठे गेला? हे सर्व तर खरे आहे का? मला भूल पडली आहे, भ्रम झाला आहे? हे कांही कळत नाही असा विचार करीत राऊळाच्या बाहेर ती रामभाऊची वाट बघत बसली.

इतक्यात रामभाऊ आईला विठ्ठल दर्शन होण्यासाठी सर्व खटपट करुन आईजवळ परत आला व म्हणाला ''एकादशीचा दिवस तशात माघ महिन्याची वारी त्यामुळे श्री विठ्ठल / श्री पांडुरंग दर्शनासाठी श्री क्षेत्र पंढरपूरात खूप / मोठी गर्दी झाली आहे. त्यामुळे तुला आज विठ्ठल दर्शन होईल असे वाटत नाही. गर्दीमुळे श्री विठ्ठल दर्शन होणे अशक्य आहे'' यावर त्याची वृध्द आई त्याला म्हणाली ''माझ्या विठ्ठल दर्शनाची तू काळजी करु नकोस. मी आत्ताच श्री विठ्ठल दर्शन घेवून राऊळातून बाहेर आली आहे. पांडुरंगाची करणी अघटित आहे. बराच उशीर तू दर्शनाच्या खटपटीला लागलास. तुला होत चाललेला वेळ बघून मी गर्दीत घाबरुन गेले. तेवढ्यात एक गोरापान, पांढरी शुभ्र दाढीवाला मनुष्य माझ्याजवळ आला व म्हणू लागला. ''गुरुबंधू राम आला नाही काय? मीही स्वामींचा सेवक / दास आहे. माझ्या खांद्यावर बसा तुम्हाला नेवून श्री पांडुरंग दर्शन / श्री विठ्ठल दर्शन घडवितो. त्याच्या खांद्यावर बसले. क्षणात त्याने मला राऊळात नेले. कांही वेळात मला विठ्ठल दर्शन घडले. विटेवर उभा असलेल्या श्री विठ्ठलाच्या चरणावर मस्तक ठेवून दर्शन घेवून मी धन्य झाले. त्यानेच मला बाहेर आणून सोडले. तुझ्या गुरुचा / स्वामीचा तो दास / सेवक / तुझा गुरुबंधू माझ्या कामाला आला. आत्ताच गर्दीत दिसेनासा झाला आहे.'' वृध्द आईचे हे बोलणे ऐकून रामभाऊ सद्‌गदित झाला. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले व तो आईला म्हणाला ''माझे स्वामी / गुरु पंढरपूरला आले असते तर मला भेटले नसते का आई? ज्याच्यावर तुझा विश्वास नव्हता, ज्याची तू निंदा करीत होतीस त्याच माझ्या स्वामीने / गुरुने भक्ताचे रुप धरुन, तुला खांद्यावर बसवून राऊळात नेवून श्री विठ्ठल दर्शन घडविले. भक्ताच्या रुपात तुला भुलविले.'' रामभाऊचे बोलणे ऐकून क्षणात घडलेल्या श्री विठ्ठल दर्शनाचे गूढ तिला उकलले. रामभाऊचे स्वामी मनुष्य नसून अवतारी असल्याची तिला साक्ष पटली आता तिने रामभाऊच्या स्वामींना / गुरुंना शरण

जाण्याचे ठरविले. स्वामी नरदेहधारी दत्तच आहेत हे तिला कळून चुकले. आणखी कांही व्रत, उपवास, साधन न करण्याचे तिने ठरविले. श्री. गुरु कृष्णाच्या दर्शनाला जाण्याचे ठरविले. आईचे बोल ऐकून स्थिती बघून रामभाऊना ''बहकले ते येईल परत'' हे स्वामींचे बोल आठवले. या बोलाचा सरळ अर्थ वृध्द आईच्या परिवर्तनातून समजून आला. पंढरपूरची वारी करुन रामभाऊ कोल्हापूरला परत आला. वृध्द आईला घेवून स्वामींच्या दर्शनाला ताराबाईंच्या घरी गेला. वृध्द आईने रामभाऊच्या स्वामींचे / गुरुंचे पाय धरले व म्हणू लागली ''माझा अन्याय क्षमा करा देवा. ज्ञानी लोकांना जेथे भ्रम पडला आहे, ज्ञानी लोकांना सुध्दा तू समजून आला नाहीस तेथे माझ्या सारख्या वृध्देला तू कसा कळणार. न कळत मी तुझी निंदा केली / अपशब्द बोलले याची मला क्षमा कर, तुझ्यासारखा स्वामी / गुरु मला मिळाला आहे. मोहपटल दूर झाले आहे. संसारात अनेक कष्ट / दु:ख भोगले आता तुझ्या पायी मला ठेव.'' अशा रितीने रामभाऊची आई जरी सुरुवातीला स्वामींची / गुरुंची निंदा करीत होती तरी तिला स्वामींनी खांद्यावरुन वाहून नेवून विठ्ठल दर्शन घडवून गोड शिक्षेने खोड मोडल्यामुळे स्वामींच्या चरणी लागली, भक्तीला लागली. वृध्द आईच्या स्वभावात झालेला भाविक बदल पाहून रामभाऊला वाटले की, विठ्ठलाने जशी दामाजीपंताची हुंडी विठू महाराच्या रुपात बादशाहजवळ वटविली तसेच श्री स्वामींनी भक्तासाठी दास बनून आईला श्री विठ्ठल दर्शन घडवून भक्ताची लाज राखली.

म्हैसाळ हे मिरजेपासून अंदाजे १५ कि.मी. वर एक खेडेगाव असून, महाराष्ट्र-कर्नाटक हद्दीवरील महाराष्ट्राचे शेवटचे गांव. या म्हैसाळ गांवात शिवूबाई नावाची स्त्री रहात होती. शिऊबाई वयात येताच / उपवर होताच तिच्या आई-वडीलांनी तिचे लग्न करुन टाकले. शिऊबाईचे लग्न पार पडताच तिला, तिच्या आई वडीलांना अतिशय आनंद झाला. पुढे कांही काळानंतर शिऊबाई सासरी असतांनाच तिचे आई-वडील वारल्याचे तिला समजले. तिला फार वाईट वाटले. हळुहळू ती आई-वडील वारल्याचे दु:खही विसरत चालली. सुखाचे दिवस तिच्या संसारात आले. तिला एक मुलगीही झाली. त्यामुळे पती-मुलीसह संसारात सुखाने रमून गेली.

परंतु ईश्वरी संकेत वेगळाच असतो. आई-वडीलांचे तिच्या वरील कृपाछत्र अगोदरच नाहीसे झाले होते. आता दैवगती ओढवून आली, काळरात्र आली यातच तिचा पती मरण पावला. दुसरे कृपाछत्रही नाहीसे झाले. आता उदर भरणाचे साधनही नाहीसे झाले. पुढे म्हैसाळ गांवातच भिक्षा मागून आपले व मुलीचे पोट भरु लागली. देवादिकांना दैवगती चुकली नाही तिथे माझी काय गती? असा मनाला उपदेश करुन शिऊबाई दिवस घालवू लागली. मुलगीही वारल्यानंतर ती कोल्हापूरला भटकत आली. तिच्या आकांक्षाची होळी झाली. तिच्या हाती झोळी आली. लाजलज्जा सोडून ती भिक्षाटन करु लागली, भिक्षा मागत फिरु लागली. ती मात्र भोळी भाबडी स्त्री होती. कोल्हापुरात आल्यावर तिच्या कानांवर श्री कृष्णगुरुंची ख्याती आली.

अशा गुरुंना शरण जाऊन जन्ममरणाचा चौऱ्याऐंशी हजार फेरा चुकवावा, असा विचार तिच्या मनाने घेतला, श्रीकृष्ण गुरुंचे दर्शन घेवून भाग्यवती होण्याचे तिच्या मनाने ठरविले व ती वैराग्य मठीत श्रीकृष्ण गुरुंच्या दर्शनासाठी आली. श्रीकृष्ण गुरुंचे तिने श्रध्देने दर्शन घेवून चरण धरले. यावर श्रीकृष्णगुरु शिऊबाईला म्हणाले ''वैराग्य मठीतच येथे बाई राहता काय?'' यावर शिऊबाई म्हणाली ''हेच इच्छून मी तुमच्या दर्शनासाठी आली आहे? हे तुम्ही अंतर्ज्ञानाने जाणले आहेच'' अशा रीतीने शिऊबाई वैराग्यमठीत श्रीकृष्णगुरु जवळ राहू लागली. स्त्री धर्माला जी सेवा करता येईल ती करु लागली. श्रीकृष्ण गुरु एकदा तिला म्हणाले ''इथं येणारी भक्त मंडळी तुला चण्याची डाळ आणून देतील तू ती ग्रहण करीत जा'' रामजी व इतर भक्त मंडळी शिऊबाईला थोडी थोडी चण्याची डाळ आणून देवू लागले. शिऊबाई ती चण्याची डाळ आनंदाने खाऊन सुखाने श्रीकृष्णस्वामींच्या जवळ राहू लागली. हळूहळू श्रीकृष्णगुरुवर तिचा दृढविश्वास बसू लागला.

कांही दिवसांनी श्रीकृष्णगुरु तिला म्हणाले ''आता तू स्मशानी वास करुन रहा. पंचगंगे नदीकाठी स्मशान वास करुन राहणे तुला योग्य आणि बरवे म्हणजे चांगले आहे'' हे श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून शिऊबाई घाबरुन गेली. यावर श्रीकृष्णगुरु तिला म्हणाले ''शिऊबाई तू घाबरु नकोस, चिंताही करु नकोस तुझ्या सोबतीला आमची कुसारी कुत्री दिली आहे. मग भय कशाचे? कुसारी सारखी मैत्रीण तुझ्या चांगल्या सोबतीला आहे. भय बाळगू नको'' प्रथमत: शिऊबाई जरी स्मशानात जाऊन रहायला घाबरुन गेली असली तरी श्रीकृष्णगुरु आपले कैवारी आहेत. श्रीकृष्णगुरु तिला म्हणालेच होते ''सोबतीला कुसारी असल्याने भय नाही. तुला एकांतवास चांगला. नामस्मरणात हयगय करु नकोस'' हे ऐकून शिऊबाई धीटपणे पंचगंगेकाठी एकांतवासात राहण्यासाठी निघाली. श्रीकृष्णगुरुंची आज्ञा मान्य करुन, त्यांना नमस्कार करुन निघाली. श्रीकृष्णगुरु कुसारी कुत्रीसही म्हणाले ''तू शिऊबाई बरोबर पंचगंगे नदीकाठी तिच्या सोबतीला जा. ती जे काय खायला देईल ते खाऊन तिच्या सोबतीला रहा'' श्रीकृष्णगुरुंची आज्ञा ऐकून कुसारीही शिऊबाईसह नदीकाठी येण्यासाठी निघाली. दोघीही पंचगंगेकाठी स्मशानभूतीत राहू लागल्या. शिऊबाई ज्या वेळी पंचगंगे नदीकाठीच्या स्मशानभूमी कडून वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरु दर्शनाला जाई. त्यावेळी कुसारीही शिऊबाई पाठीमागे श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला जाई. एक क्षणही कुसारी शिऊबाईला सोडून रहात नसे. माध्यान्हकाळी शिऊबाई जी चण्याची डाळ खाई त्यातीलच थोडी बहुत डाळ कुसारीला ती घालत असे. दूध भात खायला घातला तरी कुसारी कधी कधी खात नसे. मग ताराबाई रागावतच ती श्रीकृष्णगुरु जवळ बसत असे. मग ताराबाई श्रीकृष्णगुरुंना म्हणे ''दोन दिवस कुसारीने कांही खाल्ले नाही. दूध भाताकडे पाहिले सुध्दा नाही. मी यावर रागावले तर ती तुमच्या जवळ ती उपवाशी येवून बसली आहे'' यावर श्रीकृष्णगुरु उठून कुसारी जवळ येत व म्हणत ''उठ आता मुली दूधभात खा'' म्हणून तिला खाऊ घालीत. मग कुसारी श्रीकृष्णगुरुंच्या हातचा भात दूध खाई. कुसारीच्या रोज कांही

ना कांही तक्रारी ताराबाई श्रीकृष्णगुरु जवळ करी. अशी कुसारी शिऊबाईंनी दिलेली डाळपाणी / चन्याची डाळ आनंदाने खाऊन तिच्या सोबत पंचगंगेकाठी सोबत करुन राहिली. दिवसातून तिन्ही त्रिकाळ स्नान करुन पंचगंगेकाठी स्मशानात शिऊबाई तपश्चर्या करीत राहिली. एक एक वेळा तिच्या मनात असे विचार येत की, ''काय म्हणून श्रीकृष्णगुरुंनी मला या स्मशानात पाठविले? काम / क्रोध / मद / मत्सर हे भले भले शत्रू मी दूर केले. ऐन तारुण्यात वैधव्य पचविले. या स्मशानात शिवक्षेत्र आहे. माझे वैराग्य जागविण्यासाठीच श्रीकृष्णगुरुंनी मला या ठिकाणी पाठविले असेल का? रसरुची न घेऊ देता चन्याची प्रचिती देण्यासाठी मला या ठिकाणी पाठविले असेल काय? देह हा नश्वर असून ईश्वराची प्रचिती देण्यासाठी मला या स्थानी पाठविले असेल काय? अबला असून भय नाशून, मनोविकारांना बंदी घालून माझे भाग्य उजडविले असेल काय? धन्य माझे संचित / पूर्वपुण्य त्यामुळे ही गुरुपावले / श्रीकृष्णगुरुंची पाऊले मिळून आली असतील का?'' असे तिला वाटे. एवढी तपश्चर्या / एकांतवास / स्मशानवास तरीसुध्दा शिऊबाईचे विधीलेखन चुकेना.

एके दिवशी गंगास्नान करुन ती तपश्चर्येला बसली होती. श्रीकृष्णगुरुंच्या नामस्मरणात दंग होती. एवढ्यात कुसारीजवळ येवून तिला स्पर्श करणार एवढ्यात शिऊबाई ध्यानातून जागी झाली व तिला म्हणाली ''कुसारी हे काय करीत आहेस? चळली आहेस काय? मला स्पर्श करु नकोस. तुला मार देईन'' शिऊबाईचे हे रागाचे / गैरसमजाचे बोलणे ऐकून कुसारी रागाने तिला सोडून वैराग्यमठीत श्री कृष्णगुरुजवळ आली. थोड्या वेळाने शिऊबाईला कुसारीला टाकून बोलल्याचा पश्चाताप झाला. आज मी काय हे केले? कुसारीस टाकून बोलले. गैरसमजुतीतून बोलले असा विचार करीत ती वैराग्यमठीत श्रीकृष्णगुरुजवळ आली. तिने त्यांचे दर्शन घेतले व श्रीकृष्णगुरुंना म्हणाली ''मला कुसारी स्पर्श करेल या भीतीने मी तिला बोलले. मला गंगेकाठी सोडून कुसारी तुमच्याजवळ परत आली आहे. तिचा कांही अपराध नाही. तिची कांही चूक नाही. माझा अपराध पोटी घालून कुसारीला माझ्या सोबतीला परत पाठवा. पुन्हा मी कुसारीला कांही टाकून बोलणार नाही.'' यावर श्रीकृष्णगुरु शिऊबाईला म्हणाले ''कुसारी आता तुझ्या सोबतीला येणार नाही. तू एकटी गंगेकाठी स्मशानात जाऊन तपश्चर्या करावी'' श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून शिऊबाई गंगेकाठी येवून स्मशानभूमित राहून सिध्देश्वराजवळ राहून तपश्चर्या करु लागली. अशा रितीने गंगेकाठी स्मशानभूमित तप पूर्ण झाल्यावर कांही दिवसांनी श्रीकृष्णगुरुंनी शिऊबाईची वासना / इच्छा / अंतरीची इच्छा ओळखून तिला वैराग्यमठीत राहण्याची आज्ञा केली.

श्रीकृष्णगुरुंच्या मनी काय आहे? याचे ताराईला कळत नसे. श्रीकृष्णगुरुंचे पाय ताराईच्या घरात ठरत नव्हते. सूर्योदय होताच स्वामी बाहेर पडत. भोजनाचे सुध्दा स्थैर्य नसे. गेली वीस दिवस स्वामी घरात स्थिर नसल्याचे पाहून ताराई भक्तांना म्हणाली ''आज स्वामींना / श्रीकृष्णगुरुंना मी बाहेर सोडणार नाही त्यांच्या दर्शनासाठी येथे अपार लोक / भक्त मंडळी

येतात. स्वामी येथे नसल्याने त्यांना दर्शन होत नाही. त्यामुळे त्यांचा विरस होतो. आज वीस दिवस झाले. एक क्षणभर घरात थांबायला तयार नाहीत याला उपाय काय करावा? तुम्ही सुध्दा वैराग्य मठीत राहून स्वामींना सांभाळावे. माझ्यासाठी एवढे करा'' ताराईचे ऐकून सर्व भक्त मंडळी स्वामींच्या सोबत वैराग्य मठीत / ताराईच्या घरीच राहिली, थांबली. एवढ्यात एक मनुष्य येवून त्याने श्रीकृष्णगुरुंचे दर्शन घेतले. त्याला डोकेदुखीची वेदना होती, डोके दुखीचा त्रास होता. डोके दुखीमुळे त्याला कांही सुचत नव्हते. डोके दुखी त्याला सोसवत नव्हती. डोकेदुखीने त्याचा प्राण कासावीस होई. पुढे कांही काळाने स्वामींच्या कृपेने नवस बोलल्याने डोकेदुखीचा त्रास कमी झाला. स्वामींच्या कृपेने / नवसाने डोकेदुखीतून पूर्ण बरा झाल्यावर नवसाची पूर्तता करण्यासाठी, नवस फेडण्यासाठी तो इसम वारंवार मठीत येत राहिला. परंतु मठीत स्वामीच नसल्याने त्याला नवसाची पूर्तता / सांगता करता येईना, हे पाहून ताराई त्याला म्हणाली ''उद्या तुम्ही या. स्वामी दर्शन नक्की होईल. तुमचे नवस फेडा.'' म्हणून आज ताराईने सर्व भक्तांना स्वामींच्या संगतीत वैराग्यमठीत राहणेस सांगितले होते. स्वामींना बाहेर सोडले नव्हते.

दुसऱ्या दिवशी डोकेदुखीची यातना असणारा इसम दुसऱ्यादिवशी येऊन स्वामींना म्हणाला ''डोकेदुखीची वेदना मी भोगत आहे. डोकेदुखी दूर होताच, डोकेदुखी नाहिशी होताच तुम्हांला पगडी लेववीन असा मी नवस केला. माझी डोके दुखीची वेदना देवा तू नाहिशी केलीस. ही डोकेदुखी मला मरणाहून अधिक यातना देणारी होती. देवा तुला अर्तक्य कांही नाही. तू कृपादृष्टी केलीस म्हणून डोकेदुखी बरी झाली. नाही तर माझी काही गती चांगली नव्हती. देवा तू ज्ञानदीप आहेस. मायबाप आहेस. भक्तपाल आहेस आता माझा नवस फेडून घे.'' असे म्हणून त्या इसमाने एक सुंदर पगडी स्वामींच्या शिरावर / डोक्यावर ठेवली व आपला नवस पूर्ण केला. नवसाची पूर्तता करुन तो इसम निघून गेला.

ताराबाई भक्तांना म्हणाली''आता ती पगडी काढून बाजुला ठेवा'' यावर भक्तांनी हात जोडून ताराबाईला विनंती करुन म्हणाले ''पगडी स्वामींना नामी शोभून दिसते, सुंदर दिसते. कांही वेळ पगडी स्वामींच्या डोक्यावर असू दे. नंतर पगडी काढून ठेवू या.'' ताराबाईला भक्तांची विनंती मान्य झाली. सर्व भक्त आपआपल्या स्वकार्यात मग्न झाले. ताराबाईही आपल्या स्वकार्यात मग्न झाली. पगडी स्वामींच्या डोक्यावर उशिरा तशीच राहिली. इतक्यात तेथे एक ब्राम्हण गृहस्थ स्वामी दर्शन घेण्यासाठी आला. त्या ब्राम्हण गृहस्थाने दर्शन घेतले. त्याच्या डोक्यावरील पागोटे स्वामींनी त्याच्याकडून मागून घेतले. आपल्या डोक्यावरील सुंदर पगडी ब्राम्हणास देवून म्हणाले, ''जा जा लवकर ही पगडी घेऊन. माझी पगडी तू घाल. तुझे पागोटे मी घालतो. ताराबाईने पाहिले तर तुला पगडी नेऊ देणार नाही.'' स्वामींनी दिलेली ती सुंदर पगडी घेवून तो ब्राम्हण गृहस्थ निघून गेला व स्वामी त्याचे भले मोठे पागोटे डोक्यावर ठेवून / लेवून सिंहासनावर बसून राहिले. इतक्यात ताराबाई बाहेर आली. तिने पाहिले

स्वामींच्या डोक्यावर ती सुंदर पगडी नाही. कुंभाराच्या चक्रा सारखे गोल पागोटे आहे. यावर ती रागाने भक्तांना म्हणाली ''पगडी कोणाला दिली कळेना. पागोटे कोणाकडून मिळविले हे कळेना. मीच अगोदर पगडी काढून ठेवली असते तर बरे झाले असते. स्वामींच्या सेवकांनीच फसविले तर कोणाला काय म्हणायचे? तुमच्या डोक्यावर पागोटे दिसते आहे ते कुंभाराच्या चक्राप्रमाणे दिसते. ते बरोबर नाही. ते पागोटे फेकून द्या. भाविकभक्त जे नवस फेडून सोहाळे करतात. ज्या वस्तू अर्पण करतात त्या तुम्ही सहजपणे वाटून मोकळे होता. तुमच्या या विचित्र स्वभावाला काय म्हणू'' यावर श्रीकृष्णस्वामी ताराबाईला म्हणाले, ''अज्ञानाने तू इतरांना दोष देत आहेस. आशापाशी तुझे मन गुंतले आहे. व्यर्थ खिन्न होऊ नको'' स्वामींच्या / श्रीकृष्णगुरुंच्या मना विरुध्द वागून / बोलून त्यांना क्रोध येईल असे वागून बरे नाही असा ताराबाईच्या मनात विचार आला. ताराबाईने श्रीकृष्णगुरुंची क्षमा मागितली व म्हणू लागली ''मी अज्ञानी अबला आहे अनंता. तुझ्या कार्यात व्यत्यय आणला क्षमा कर''

*****

## श्री तिर्थक्षेत्र पंढरपूर-

नाथपंथातून विकसित झालेला वारकरी पंथ ज्या पंढरपूर क्षेत्रास वैकुंठापेक्षा मानतो ते क्षेत्र प्राचीन काळापासून अनेक सिध्द, सत्पुरुष, संत- महंत, नाथप्रमुख यांच्यासाठी प्रसिध्द आहे. शिवपार्वतीच्या संवादातूनच या प्राचीन स्थानावरील लोहदंडतीर्थाचे महात्म्य निर्माण झाले. पार्वतीची तहान भागावी म्हणून शंकरांनी त्रिशूळ मारुन हे तीर्थ निर्माण केले. चंद्रभागा, पुंडलीक महामुनी, त्याची मातृपितृभक्ती पाहून भगवंताने तेथे येणे व स्थिरावणे; या गोष्टी सर्वांनाच माहीत आहेत. शंकराचार्यांनी तर आपल्या पांडुरंगाष्टकात या स्थानाचे 'महा योगीपीठे तटे भीमरथ्याम्' असे वर्णन केले आहे. याच ठिकाणी पुंडलिकाच्या भेटीसाठी परब्रम्ह आले. येथेच गोपाळकृष्ण विठ्ठलरुपाने स्थिरावला. 'या रे या रे लहान थोर । याती भलते नारीनर । करावा विचार नलगे चिंता कोणासी' अशी नाथपंथास शोभणारी ग्वाही वारकरीपंथाने दिली.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा, बहिणाबाई ही सर्व प्रमुख वारकरी संतमालिका पंढरपूराशी निगडित असली तरी त्यांचे उगमस्थान नाथपंथात आहे. शंकराचार्य, रामानुज, मध्वाचार्य, सावतामाळी , गोराकुंभार, नरहरी सोनार, चोखामेळा, सेना न्हावी, दामाजी, कान्होपात्रा, भानुदास, चैतन्यप्रभू, पुरंदरदास, रामदास, अशा अनेक संतांना-महंतांना पंढरपूर जवळचे वाटले. विठ्ठलमंदिर, रुक्मिणी मंदिर, चंद्रभागा नदी, विविध घाट, पुंडलीकमंदिर, विष्णुपद, गोपाळपूर, पद्मावती, लखूबाई, श्रीधरस्वामींची समाधी अशा अनेक स्थानांना भेटी देऊन सर्व पंथीय समाधान पावतात.

संदर्भ ग्रंथाचे नाव - **नाथसंप्रदाय : उदय व स्वरुप**

लेखकाचे नाव : **प्र. न. जोशी**

# श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे पुजारी
# स्व. रामभाऊ मुरगुडकर

श्री कृष्ण सरस्वती महाराजांच्या पहिल्या शिष्य पंचकातील रामभाऊ मुरगुडकर हे एक प्रमुख सेवेकरी होत. त्यांचा जन्म द्विज सारस्वत घराण्यात झाला होता. त्यांचे वडिलार्जीत एक किराणा मालाचे दुकान शुक्रवार पोलिस चौकीजवळ होते. अखिल कोल्हापूर शहरात त्यांचा एक थोर व्यापारी म्हणून लौकीक होता. फारिक म्हणजे व्यापारी, फारिक हे आडनांव त्यांचे नव्हते. जमीन जुमला मुरगुड या गांवी असल्यामुळे पूर्वजा पासूनच रामभाऊंचे मुरगुडकर हे आडनांव पडले होते.

रामभाऊ हे सात्विक व धार्मिक प्रवृत्तीचे होते. आपला व्यवसाय सांभाळून धार्मिक ग्रंथाचे ते वाचन मनन करीत असत. वेदान्तात त्यांना फार गोडी होती. दारी येणाऱ्या अतिथी याचकाची ते यथायोग्य संभावना करीत असत. काम धंद्यात गुरफटून गेलेले रामभाऊ कुटुंबाने एकदा त्यांच्या हातातील कडी (पाटल्या) धान्य मोजण्याच्या शेराच्या मापात ठेवल्या होत्या. तेवढ्यात शेजारच्या एका बाईने त्यांनाच सांगून ते शेराचे माप स्वत:च्या घरातील धान्य मोजण्यासाठी नेले व कांही वेळेने ते परत होते तेथे आणून पण ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी हातात त्या पाटल्या चढवण्यासाठी त्या मापात न दिसल्यामुळे संबंधित शेजारणीला विचारण्यात आले. ''शेर नेते वेळी त्यात ती सोन्याची कडी किंवा अन्य कोणतीही वस्तू नव्हती'' असे त्या शेजारणीने सांगता, चोरीचा पाठपुरावा घेण्यासाठी रामभाऊनी अगणीत ज्योतिषी भविष्य कारांच्या घरचे उंबरठे झिजवले. हे नुकसान त्यांच्या अत्यंत जिव्हारी बसले. हताश झालेल्या रामभाऊना कोण्या एका महाभागाने सांगितले की ''कुंभार गल्लीत दत्तावतारी समर्थ श्रीकृष्ण सरस्वती महाराज हे त्रिकाळ ज्ञानी असून, त्यांची कीर्ती दिगंतात गाजत आहे ते तुला तुझ्या समस्ये विषयी निश्चित काय ते सांगतील तू त्यांच्याकडे जा!''

रामभाऊ त्वरीत शोध घेत वैराग्य मठीत येऊन महाराजांना प्रणिपात करत असतांना महाराज तारामतींना म्हणाले ''रामजी आला ! रामजी आला ! माझा पुजारी रामजी आला!'' पण काय? त्याने अशाश्वताचा ध्यास धरला पूर्व ओळख नाही अशी समजूत असणाऱ्या रामभाऊना त्यांच्या नावांचे महाराजांनी रामजी म्हणून संबोधलेले अति आनंदाचे मनोवांच्छित नामनिर्देशक पहिल्याच भेटीत उद्गारलेले हे उद्गार रामभाऊंना पण अति उल्हासित करणारे ठरले. ''रामजी अरे तूझी वस्तू तुझ्याच घरी मिळेल'' हे महाराजांनी प्रश्नाआधी उत्तर दिल्यामुळे रामभाऊची खात्री पटली की, महाराज खरोखर त्रिकाळ ज्ञानी साक्षात दत्त महाराज आहेत. रामभाऊचा दृढ विश्वास महाराजांच्यावर बसला व त्या मुळेच ते महाराजांच्या असिम कृपेला पात्र ठरले! भल्या पहाटे स्नानादि क्रिया आवरून रामभाऊ महाराजांच्या सेवेसाठी जात.

पहाटेची काकड आरती, दुपारची माध्यान्ह आरती व रात्री शेज आरती ते स्वत: करत. त्यांच्या खिशात बदाम, खारका, असायच्या. अधून-मधून महाराजांना ते खाऊ घालीत. त्रयोदशी विडा ते स्वत: करीत व जेवणानंतर दुपारी व रात्री ते महाराजांच्या मुखी देत असत. रात्री महाराज शयनगृही शेज करते झाले की, रामभाऊ स्वत:च्या घरी परतत असत. एकदा शेज गृहात महाराजांचा असाच निरोप घेत असता ''आज गृही जागृत असावे'' अशी महाराजांची त्यांना आज्ञा झाली.

त्या रात्री अजिबात निद्रा घ्यावयाची नाही असे रामभाऊनी ठरवले. मध्यरात्री रामभाऊ पलंगावर पडले असता गवाक्षातून सुवर्णाची हरवलेली ती कडी त्यांच्या अंगावर पडली. त्या बरोबर लगेच रामभाऊ उठून दार उघडून बाहेर पहातात तो त्या काळ्या भिन्न रात्री मनुष्य रुपी व्यक्ती त्यांना कोठे दिसली नाही. तेव्हा हे कृत्य महाराजांचे आहे हे रामभाऊंनी जाणले ''तू आज रात्री गृही जागृत असावे'' ह्या महाराजांच्या उक्ती बरोबरची प्रचिती आली. सुवर्णाच्या ह्या कड्या /बांगड्या कुणी नेल्या होत्या. इतके दिवस त्या कुठे होत्या? गुरुंनी मात्र सांगितल्या प्रमाणे मला माझ्या घरीच परत आणून दिल्या.

नंतरच्या पहाटे रामभाऊ नित्या प्रमाणे वैराग्य मठीत येऊन महाराजांना ही वार्ता अगदी आनंदात सांगितली. क्षुल्लक ''सुवर्णाचा ध्यास'' म्हणजेच अशाश्वताचा ध्यास लागला तसाच ध्यास महाराजांच्या बद्दल आपल्याला ध्यास लागला पाहिजे ''माझा पुजारी माझा पुजारी'' ह्या त्यांनी दिलेल्या किताबाला आपण सेवेत जागृत तत्परतेने राहिले पाहिजे असा निजबोध महाराजांच्या कृपेने रामभाऊंना झाला.

''चला आपण आज जोतिबाला जाऊया! तो केदारनाथ आपल्याला बोलवित आहे!'' असे म्हणून महाराजांनी एके दिवशी जोतिबाची वारी केली. बाळकृष्ण राशिवडेकरांच्या खांद्यावर बसून महाराजांच्यासह सर्व भक्त सेवक मंडळी निघाली रामभाऊच्या दुकाना जवळ येताच ते बाळकृष्णांना म्हणाले ''जरा थांबा! महाराजांना दुपारी मध्यान्हाची भूक लागेल थोडे लाडू बरोबर बांधून घरातून घेवून येतो!'' ''कशाला? राहू देत चला! पुढे त्याची सोय झाली आहे! शंका करण्याचे कांही कारण नाही! '' असे महाराज रामभाऊंना म्हणाले मग रामभाऊ म्हणाले की ''तुम्ही जेंव्हा आमचे सुवर्ण कंकण दिले तेंव्हाच शंकेचे मूळ उपटले गेले! आता ती शंका येईल तर कुठून ?''

मग महाराजांच्यासह सर्व सेवक वृंद पंचगंगा धरणावरून वडणगे ह्या गांवात आले. ''आता मात्र मला फार तहान लागली!'' असे महाराज म्हणता बाळकृष्ण राशिवडेकरांच्या खांद्यावरुन स्वामी उतरले. जवळच्या एका शेजाऱ्याच्या घरातून एक कळशी घेऊन तळ्यातील स्वच्छ पाणी आणावयास रामभाऊ गेले. पाणी भरुन घेत असता तळ्या जवळच एक तेजस्वी ब्राम्हण न्याहरी सोडून खात असलेला रामभाऊंना दिसला.

त्याने पृच्छा करिता रामभाऊ म्हणाले, ''आमच्या गुरुच्यासह आम्ही ज्योतिबाला दर्शनासाठी निघालो आहे. महाराजांना व आम्हा सर्वांनाच तहान लागली म्हणून पाणी आणण्यासाठी येथे आलो.'' तेंव्हा तो तेजस्वी ब्राम्हण म्हणाला ''माझ्या जवळ हे दहा लाडू आहेत महाराजांच्यासह तुम्ही सर्व सेवकांना पुरणारे आहेत. तेंव्हा हे सर्व लाडू तुम्ही घेऊन जावा!'' रामभाऊ म्हणाले ''नको नको तुम्ही नुकतेच फराळाला बसला आहांत, बसा! बसा! आम्हाला ते कांही नकोत!'' तेंव्हा तो द्विज म्हणाला ''हे पहा! ह्यातील एक लाडू जरी तुमच्या गुरुनी सेवन केला तरी मी धन्य होईन.'' तुमचे गुरु श्रीकृष्ण ह्या नांवाप्रमाणेच मोठेच आहेत. माझ्या सारख्या सुदाम्याचा आहार ते कांही त्याज्य करणार नाहीत. तुम्ही ते घेऊन जावा. माझी तुम्हांला आग्रहाची विनंती आहे.'' मग ते सर्व लाडू व पाण्याची कळशी घेऊन रामभाऊ महाराजांच्या जवळ आले. घडलेली ही हकीकत महाराजांना सांगितली,'' महाराज पण म्हणाले, ''दे दे तो लाडू दे'' त्यासाठी महाराज अगदी अधिर झाले होते.

एक लाडूचे चूर्ण करुन रामभाऊंनी महाराजांचे वदनी भरवला. पाणी दिले. महाराजांची आज्ञा होता एकेक भक्ताने एक-एक लाडू भक्षण केला. मनसोक्त पाणी सर्वजणांनी पिले. क्षुधा तृष्णा शांत होता. महाराजांनी पुढची जोतिबाची वारी पूर्ण केली. तो तेजस्वी ब्राम्हण हा खरोखरीचाच ब्राम्हण होता की, त्या शिवक्षेत्राचा धनी साक्षात अपर्णानाथ होता? ते समर्थच जाणे! कारण आपण आपल्या क्षेत्रातून श्रीकृष्ण सरस्वती महाराज ह्या कलीयुगातले समय पुरुष! भूकेने व्याकुळ होऊन पुढे जावा; हे त्या भोळ्या नाथाला कितपत रुचले? हा ही प्रश्नच नाही का/म्हणूनच महाराजांनी रामभाऊना घरातून लाडू घेण्यास मज्जाव केला होता. महाराजांच्या जवळ सूक्ष्मात सूक्ष्म घडणाऱ्या घटने मागे महत्तम अशा महाराजांच्या लीला होत असत!

एके दिवशी महाराज पहाटे नेहमीप्रमाणे लवकर उठले नाहीत. तसेच निद्रावस्थेत कांही काळ पडून राहिले. भक्तांचा जनसमुदाय काकड आरतीसाठी बराच जमला होता. प्रभात समयाची करुणाष्टके कोणी भक्त म्हणत होती. भक्तिपर स्तुती अभंग कोणी आळवित होते. शेवटी मग महाराज उठले. रामभाऊनी त्यांचे मुख हात पाय प्रोक्षाळण केले. नंतर महाराजांना चौरंगावर बसवून नेहमी प्रमाणे खारीक मुखात घातली. बी वगळून ती खारीक महाराजांनी मुखातच करकरुन चूर्ण करुन निमिषभर थांबून ते घास तोंडातच ठेऊन म्हणाले.

''अरेरे! हे काय? असे कसे घडले? गरीब बापुडे मरत आहे. तुम्ही कसे काय पाहिले नाही! त्याला आवश्य वाचवले पाहिजे.'' असे म्हणून देवबुवा (कृष्णालाडांचा) हात आपल्या हातात धरुन बारीक केलेल्या खारकेचे चूर्ण त्याच्या हातावर मुखातील घास महाराजांनी टाकला. त्या चूर्ण केलेल्या खारकेतून एक बारीक आळी सहिसलामत सुटून बाहेर पडण्यासाठी निघत असलेली सर्व सेवक भक्त जनांनी पाहिली.

सेवक भक्तजन स्वतःच्या प्राक्तन कराल कर्माच्या दाढेत सापडले, तरी त्यांना ह्या

खारकेच्या आळीप्रमाणे मी सहिसलामत सुखरुप ठेवतो असेच महाराजांनी सर्व भक्तांना सुचविले. ''सकळ जनांचा वाचा करिता सांभाळ! तुजा मोकलिल ऐसे नाही. ह्या एकनाथाच्या अभंग ओवी प्रमाणे महाराजांनी सर्व भक्तांना पटवून दिले.'' ''लक्ष चौऱ्याऐंशी योनी!....... एकच मोक्ष दानी!'' ग्रंथकर्ते मुजूमदारानी एवढ्यासाठीच महाराजांचे असे वर्णन केले आहे. कृष्णालाड श्री गुरुच्या सेवेत विनम्रपणे तत्पर असत. दररोज पंचगंगेवर स्नान करुन ते महाराजांची कौपीन छाटी स्वच्छ धुवून आणित असत. अति पुण्याई कुणाच्या पदरात पडू लागली की, नियती त्याचा पाय मागे खेचत असते. विनम्रपणे सद्गुरुंच्या सेवेत रममाण झालेल्या कृष्णा लाडांना ह्या नियतीचा फटका बसला. त्याचे चित्त थोर योग्या प्रमाणे असतांना ते एकदा अकल्पित तारुण्य मदाने ध्यानाग्र झाले हे न आवडल्यामुळे व वेळीच त्यांना सावध करण्यासाठी महाराजांनी एक विपरीत घडवले! एक मध्य रात्रीला महाराजांनी कृष्णालाड व रामभाऊना एकाच वेळी स्वप्न दृष्टांत दिला पूर्व कर्म वशात लाडाची जननी कुत्रीच्या जन्माला गेली होती ती पगी शुनी कृष्णा लाडांना म्हणाली ''अरे झोपलास काय? ऊठ आधी! तुला आत्ताच्या आत्ता गुरुनाथ कार्या निमित्त बोलवित आहेत!'' कृष्णालाड झोपेतून जागे झाले व त्यावर कांही काळ विचार करीत तसेच पडून राहिले. त्याचवेळी इकडे रामभाऊना स्वप्नात एक ब्राम्हण येऊन म्हणाला, ''अरे तुला तुझे गुरुनाथ आत्ताच्या आत्ता कार्यानिमित्त बोलवित आहेत.'' लगेच त्यांनी मध्यरात्री तशीच वैराग्य मठी गाठली. कृष्णा लाडांनी विचारले ''काय रे अजून पहाटेचा बराच अवधी असता इतक्या मध्यरात्री कसा काय आलास? बरे आलास तर का आलास? झोप आता इथे सुखाने पहाट होईपर्यंत!

रामभाऊनी आपले स्वप्न कृष्णा लाडांना सांगितले. कृष्णालाडानी पण स्वत:चे स्वप्न त्यांना सांगितले. एवढ्या मध्यरात्री आपल्याला महाराज असे काय बोलवित आहेत? पाहुया तरी चला म्हणून ते दासद्वय महाराजांच्या शयनगृहाजवळ येऊन हळूच दार उघडून पहातात तर महाराज पर्यंकावर पाय खाली सोडून दाराच्याच बाजूला त्यांच्या कडेच पहात असलेले दिसले जणू ते उभय दासांचीच वाट पहात होते. दोन्ही भक्तांनी महाराजांचे चरण वंदून ''काय महाराज? काय आज्ञा आहे?'' अशी प्रार्थना करताच महाराज लाडांना म्हणाले'' हे बघ कृष्णा आज पासून माझी कौपीन व छाटी रामजी धुवत जाऊदे! एवढे तू करशील ना रे माझ्यासाठी?'' हे शब्द ऐकताच कृष्णा लाडांना महाराजांचे ते शब्द मरणप्राय वाटू लागले ती अवस्था महाराजांनी जाणून लगेच परत कृष्णा लाडांना म्हणाले ''हे बघ खिन्न होऊ नको. माझ्यासाठी चार दिवस सेवा करु दे रामजी देईल परत तो तुला चार दिवसांनी!'' कृष्णा लाडाना महाराजांची ती आज्ञा मान्य करणे भागच होते. लाडांनी ''होकार'' देताच स्वत:ची कौपीन छाटी महाराजांनी लाडांच्या हाती देऊन ''ही दे रामजीस?'' असे ते म्हणाले जड अंत:करणाने लाडांनी ती कौपीन छाटी रामभाऊना दिली. दुधात साखर पडावी तशी ती पण सेवा रामभाऊनी अत्यंत मनोभावाने

केली. चार दिवसा नंतर गुरुंच्याच पुढ्यात रामभाऊनी कृष्णा लाडांची सेवा त्यांच्याकडे परत सुपूर्द केली. ह्या घटनेने कृष्णा लाडांनी जो धडा घ्यावयाचा तो घेतला. रामभाऊ जी पडेल ती सेवा करण्यास तत्पर असत. महाराज कोठेही निघाले तर लांबचे असो वा जवळचे अंतर असो आपल्या इच्छेनुसार कृष्णास्वार व रामभाऊ मुरगुडकर ह्यांच्या स्कंधावर आरोहण करीत असत. पंढरपूर यात्रेच्या वेळी एका घोड्याची बग्गी तारामतींनी बरोबर घेतली होती पण महाराज त्या बग्गीत दोन मिनीटे सुध्दा बसले नाहीत. संपूर्ण पंढरीची वारी कृष्णा लाड, कृष्णा स्वार व रामभाऊंनी महाराजांना स्वत:च्या खांद्यावर बसवूनच पार पडली.

''गुरुंच्या शिवाय तरणोपाय नाही!'' मनुष्य जन्माची सार्थकता सद्‌गुरुंच्या शिवाय होत नाही. ''सदगुरुकृपा'' हेच मानवी जीवनाचे अंतिम लक्ष होय. आपल्या मातेला रामभाऊंनी सद्‌गुरुचा महिमा व त्याचे मानवी जीवनातील महत्व विशद करुन सांगितले. गुरु केला पाहिजे हे त्या वृध्द मातेला वाटले पण श्री कृष्ण सरस्वती महाराज तिला पहिल्या पासूनच काही भ्रमिक कल्पनेमुळे आवडत नसत. उलट ती महाराजांची आत्ता पर्यंत निंदा करतच आली होती. कोल्हापुरात त्यावेळी अशा मताची बरीच माणसे होती. चिंतामणीला खडा म्हणणाऱ्या, कामधेनूला हाकलून लावणाऱ्या व्यक्ती मध्ये ती वृध्दा वावरत असल्यामुळे रामभाऊना ती म्हणाली ''हे बघ रामजी गुरुची थोरवी मोठी आहे परंतु तुझ्या ह्या कृष्ण सरस्वती महाराजांच्या संगतीने कदापीही मुक्ती मिळणार नाही!'' हापूस आंब्याला किड लागावी त्या प्रमाणे हे वृध्द मातेचे विचार ऐकून रामभाऊना मनोमनी वाईट वाटले. खिन्न अवस्थेत वैराग्य मठीत महाराजांच्या कडे आल्यावर त्यांना महाराज म्हणाले ''हे बघ रामजी ! सर्वत्र आम्ही व्यापून उरलो असता तुझे मन असे विषण्ण कशाला व्हायला पाहिजे? जे बहकत गेले आहे ते पुन्हा येईल ताळ्यावर ! आम्ही त्याला जबाबदार आहे त्या बद्दल मी तुला ग्वाही देतो. तू नुसती मौज पहात रहा!'' न सांगताच महाराजांनी मनातले शल्य काढून टाकलं. महाराजांच्या त्या अमृतोद्‌गारामुळे मानसिक खिन्नता दूर पळून गेली. थोड्याच दिवसात पंढरीच्या वारीचे दिवस आले होते. उभा जन्म आपण घालवला पण आयुष्यात पंढरीनाथाचे दर्शन घेतले नाही. आता तरी तो दीनांचा कैवारी भक्तांचा सोयरा! पंढरीनाथ एकदा डोळे भरुन पहावा, ही मनिषा त्या मातेने रामभाऊना बोलून दाखवली.

जन्म दायिनिची इच्छा पुरी करणे आपले कर्तव्यच आहे. आपण तिला पंढरीला घेऊन जाऊ, पण महाराजांचा ह्या बाबतीत विचार घेतला पाहिजे. म्हणून ते वैराग्य मठीत येऊन महाराजांना हा बेत सांगता रामभाऊना महाराज म्हणाले ''करा! करा! पंढरीच्या वारीची तयारी करा! आणि वृध्देला एकदा पंढरीनाथ दाखवून लवकर आणा!'' महाराजांची अशी आज्ञा होताच रामभाऊनी शकटारोहण करुन आपल्या मातेस दशमी दिवशी पंढरीला आणले. पंढरीचा वारकरी सोहळा रामभाऊनी आपल्या मातेला दाखवला. हजारो भाविकांच्या सोज्वळ स्नाने

चंद्रभागा आनंदाच्या पुराने ओसंडत होती. हजारो वारकऱ्यांच्या नामघोषाने वाळवंटातील कण आणि कण विठ्ठल रखुमाईच्या गजराने मळला जात होता. ठिक ठिकाणी मंडप उभारुन ज्ञानेश्वरींच्या पारायणात हरिभक्त जणू ज्ञान गंगेत डुबून जात होते जो सोहळा पहाण्यासाठी देव देवांची नभी दाटी होत होती. तो सोहळा पाहून धन्य झाल्याचे त्या वृध्द मातेने रामभाऊना सांगितले.

दुसऱ्या दिवशी एकादशी होती. भल्या पहाटे पासूनच विठ्ठल दर्शनासाठी लाखो वारकऱ्यांच्या रांगा लागल्या होत्या. मंदिरात जाण्यासाठी अजिबात वाव नव्हता. रामभाऊंनी एका ठिकाणी मातेस बैस म्हणून सांगितले. लवकरात लवकर सुलभ दर्शन होण्याच्या हेतुने आत जाण्यास कुठून मार्ग मिळतो का ते पाहून येतो असे मातेला सांगून रामभाऊ हरिभक्तांच्या त्या गर्दीमध्ये गुडूप/अदृश्य झाले. मनात मात्र सारखे महाराजांना आपली चिंता वहात होते. महाराज ह्या लाख लाख लोकांच्या मधून माझ्या आईला कसे दर्शन होणार? ह्या बद्दल त्यांच्या मनात सारखा महाराजांचा जप अविरत चालू होता.

रामभाऊंना येण्यास उशिर होऊ लागला. तशी ती वृध्द माता जास्तच काळजी करु लागली. घाबरुन गेलेल्या त्या अवस्थेत असता तिच्या जवळ एक व्यक्ती दत्त झाली! सुगौरवर्ण, दाढी वाढवलेली, बलदंड अशी ती व्यक्ती माऊलीला म्हणाली ''आजी बाई! चला राऊळात तुमच्या मुलाचे समर्थ गुरु कोल्हापूरचे श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज आज भल्या पहाटेच आपल्या कांही सेवक मंडळीसह येथे आले आहेत. त्यांच्याच आज्ञेने मी येथे आलो आहे. ते आता राऊळात आहेत. तुम्हांला ह्या गर्दीचा त्रास होणार नाही.'' रामभाऊच्या मातेने त्या बोलण्यास होकार दिला. एवढी गर्दी असतांना पण तिने डोळे भरुन श्री विठ्ठलाचे २८ युगे उभे असलेले प्रसन्न दर्शन घेतले. धन्यता पावलेल्या त्या मातेने परत एकदा समाधानाने पंढरीनाथाचे दर्शन घेतले. परत त्या व्यक्तीने खांद्यावर बसवून मातेला तिच्या मुळच्या स्थानावर आरामात आणून खाली उतरले. ''काय आजी, झाले न व्यवस्थित विठोबाचे दर्शन?'' ती माता म्हणाली ''हो'' मग आता मी जातो असे बोलत तिच्या पुढ्यातच ती व्यक्ती अंतर्धान पावली. तो देहधारी मनुष्य इकडे तिकडे पहाता कुठेही दिसेना. असली कसली मला भूल पडली. या विचारात ती माता असतानाच तेथे हताश झालेले रामभाऊ परत आले व तिला म्हणाले. ''अगं आई ह्या गर्दीत विठ्ठल दर्शन अगदी दुरापास्त आहे.'' ती माऊली रामभाऊना म्हणाली ''अरे असे काय म्हणतोस? कांही नाही दुरापास्त, झाले मला विठ्ठल दर्शन!'' आश्चर्यचकीत मुद्रेने रामभाऊ तिला म्हणाले, ''आं, ते कसे काय गं!'' तेव्हा ती माऊली पुत्राला सर्व इत्यंभूत हकिगत सांगती झाली. गुरुचा आज्ञांकीत म्हणून तो कोणी मनुष्य आला. त्याने स्वत:च्या खांद्यावर मला बसवून सुखरुप पणे पंढरीनाथाचे दर्शन घडवून आणले. दोन वेळा तुमचे नांव काय? असा प्रश्न विचारला असता तुमच्या मुलाच्या गुरुंचा अंकीत एवढेच

तो बोलला. मला त्याने खांद्यावरुन खाली ठेवले. नंतर तो इथल्या इथे कसा गुप्त झाला ते न कळे पण आज तो आपल्या कामास आला. त्याने माझी विठ्ठल दर्शनाची अभिलाषा मात्र पूर्ण केली.''

मातेचे हे बोल ऐकत असता रामभाऊ सद्‌गदीत झाले व तिला म्हणाले, ''अगं आई ज्याला तू निंदीत आलीस ना तेच आपले ज्ञानदेव, भक्तांना ज्ञान देणारे, भक्तांचा भार वाहणारे त्यांची चिंता हरण करणारे श्री कृष्ण सरस्वती महाराज त्यांनीच तुला खांद्यावर बसवून लाखो भक्तांच्या थव्यातून तुला आत गाभाऱ्यात नेऊन विठोबाचे दर्शन व्यवस्थित घडवून परत इथे आणून ठेऊन तुझ्या पुढ्यात गुप्तपण झाले. जर भक्तांच्या बरोबर ते इथे जर आले असते तर ते मला न भेटता राहिले असते का? आता तरी तू ती मूढ वृत्ती सोडून महाराजांना शरण जा! महाराजांच्या सारखे मायाळू ,महाराजांच्या सारखं समर्थ महाराजच!''

त्या वृध्द मातेच्या विचारात अमूलाग्र बदल झाला. रामभाऊचे म्हणणे तिला मग निर्विवाद पटले. समयोचीत लीला महाराजांनी केली. स्वत:च्या डोळ्यांनी ती पाहिल्यामुळे त्या मातेचा बुध्दीपालट झाला मग ती पुत्राला म्हणाली ''आता तुझ्या महाराजांच्याकडे मला लवकर ने! त्यांना मी शरण जाईन! मोक्षदानी असणाऱ्या साक्षात अत्रिनंदन महाराजांना मी काय मूढपणे आयुष्यभर निंदा करुन नरकात जाण्याचे कवाड उघडू पहात होते. आता मला दुसरे तिसरे कांही नको! तुझ्या महाराजांच्या चरणावर एकदा मला लवकर नेऊन घाल!''

रामभाऊंना महाराजांचे बोल तिथे आठवले ''बहुकले ते परतेल सहज!'' बहकत गेलेली ती माता योग्य वेळेवर ताळ्यावर आली. रामभाऊनी परत शकटारोहण करुन गुरुंच्या नामस्मरणात मातेला कोल्हापूरात आणली. वैराग्य मठात ती माय लेकरं श्रीगुरुंना साष्टांग प्रणिपात करती झाली. ती माता करुणा भक्तिने महाराजांना म्हणाली ''महाराज ! बुध्दीवंतानाही भ्रम पडावा अशी तुमची लीला सारी! तुमची निंदा करणाऱ्या अधमाधमात मी मूर्खपणे देवा तुम्हाला दूर्मतीने दूर्दैवाने आत्तापर्यंत निंदीत आले तू गुरुनाथ थोर आहेस! माझ्या सारख्या पामरीचा अन्याय पोटात घाला. मज दीन अबलेला पदरात घ्या'' रामभाऊंनी पण महाराजांना अत्यंत कृतज्ञतेने परत नमस्कार केला व महाराजांची परवानगी झाल्यामुळे ती माय लेकरं स्वगृही परत आली.

महाराजांच्या कृपेने रामभाऊ चांगले धनिक व्यापारी म्हणून सर्वश्रूत झाले होते. महाराजांच्या समाधी कालानंतर रामभाऊची काशी यात्रा मजेशीर झाली होती. ही यात्रा एका महाभागाने रामभाऊची संपत्ती लुटण्याच्या उद्देशानेच आखली होती. साक्षात दत्त महाराजांची त्यांची बहुमोल सेवा अंतरल्यामुळे रामभाऊ मनोमनी खिन्न झाले होते. ह्या त्यांच्या विषण्ण मन:स्थितीचा फायदा आपल्या पथ्यावर पडेल असे त्या महाभागाला वाटले. वारस म्हणून मुलगा रामभाऊना नव्हता. ह्याचे तर त्या महाभागाने भांडवल केले. काशीला गेल्यावर गंगास्नान विश्वेश्वरादी दैवतांचे यथासांग दर्शन झाल्यानंतर त्या महाभागाने आपली नखे बाहेर काढली. रामभाऊना तो

म्हणाला ''रामभाऊ अलिकडे तुम्ही बरेच उदास दिसता. तुमच्या विषण्ण अवस्थेतून परमेश्वराचे चिंतन करण्यासाठी मी एक मार्ग सुचवतो तो तुम्हांला पटतो का ते पहा. महाराजांची तुम्ही उदंड सेवा केलीत. त्यांची तुमच्यावर कृपा आहेच! तुमचे आता उतार वय झाले आहे तेंव्हा आता प्रंपचातून पूर्ण परावृत्त होऊन त्यातील लक्ष वैदीक धर्माने सांगितल्याप्रमाणे चतुर्थाश्रम म्हणजे संन्यास घेऊन परमेश्वराचे चिंतन मननात व्यग्र करा. तुमची संपत्ती, घर, अडी अडचणीची जबाबदारी मजकडे सोपवा. केवळ तुमच्या प्रेमासाठी म्हणून मी ती जबाबदारी स्वीकारीन. तेंव्हा तुमचा विचार काय तो तुम्ही ठरवा. तुमचे हित कशात आहे ते मी तुम्हाला सांगितले. महाराजांचे सेवक संन्याशीच नव्हते का तो गाणगापूरचा रामदास, वास्देव दळव्याने तर महाराजांच्यासाठी संन्यास घेतले नव्हता काय? तुम्ही घेतला तर त्यात नवल कांहीच नाही. आपल्या वैदीक धर्माने तो मार्ग आपल्या चांगल्यासाठीच सांगितला आहे. अनायासे आपण ह्या काशीसारख्या पुण्य नगरीत आलो आहोत.'' त्या महाभागाचे खळ विचार सरळमार्गी रामभाऊनी मनावर घेतले. त्यांचा होकार मिळताच एक अगदी जवळातील जवळचा मुहूर्त काढून संन्यास दीक्षेसाठी लागणारे वस्त्रं व इतर दीक्षा विधीची चीज वस्तू आणल्या. दीक्षा दिनाच्या आदल्या रात्री तर रामभाऊना झोपच येईना. रामभाऊंच्या जवळ त्या खल विचारी महाभागा बरोबर कांही इतर मंडळी पण त्या भटजीच्या वाड्यात झोपली होती त्या मध्ये एक बाल वयाचा किशोर पण झोपला होता. रामभाऊनी उभे आयुष्य महाराजांच्या सेवेत घातले. उद्या आपण सर्वसंग परित्याग करुन वैदिक धर्माच्या आज्ञेप्रमाणे संन्याशी होणार आहे असा बेत आखत आयुष्याचे रामभाऊ सिंहावलोकन करत असतांना त्या मध्यरात्रीच्या शांत वेळी तो बाल किशोर झोपेतच ''नाही! माझ्या आईला संन्यास देऊ नका! असा दोन वेळा जोरात ओरडला!''

काशीच्या त्या ब्राम्हणाच्या वाड्यात जरी तो किशोर जोरात ओरडला तरी त्याच्या ओरडणाऱ्या शब्दामुळे दुसरे कोणीही जागे झाले नाही, जागे झाले होते ते फक्त एकटे रामभाऊच! रामभाऊच्या व्यतिरिक्त तो वाडा गाढ निद्रीस्त झाला होता. जागे असणाऱ्या रामभाऊना अधिक जागे केले त्या बाल किशोरने. ह्या घटनेने रामभाऊना महाराजांनी निजबोध करुन दिला. त्यांना महाराजांच्या खांद्यावरील षण्मासाच्या बालकाने बोलून व्यसनी माणसाची केलेली कान उघडणी आठवली. त्या मागे महाराजच कारणीभूत होते. आज ह्या वाड्यात बाल किशोरला ''नाही! माझ्या आईला संन्यास देऊ नका. नका हो माझ्या आईला संन्यास देऊ नका!'' हे बोल महाराजांनीच माझ्यासाठी बोलले आहेत. रामभाऊंनी ह्या मागील सूक्ष्म त्वरितपणे जाणला व लागलीच आपला संन्याशी होण्याचा बेत बदलला.

रामभाऊ दुसऱ्या दिवशी त्या महाभागाला स्वत:चा संन्याशी होण्याचा निर्णय बदललेला सांगता तो रामभाऊना म्हणाला ''अहो! पण संन्याशाची वस्त्रे आपण मागवलीत ती काय करावयाची?'' रामभाऊ म्हणाले ''ती सर्व तुम्ही घ्या! मी कोल्हापूरला जातो.''

ह्याप्रमाणे त्या महाभागाचे कारस्थान महाराजांनी रामभाऊच्या कडून उधळून लावले. तो महाभाग रामभाऊचाच पाहुणा लाटकर ह्या आडनावाचा होता. बाळकृष्ण राशिवडेकराच्या विठाबाई राशिवडेकर यांच्या बरोबर रामभाऊचा विवाह झाला होता. त्यांना एकच कन्या झाली तिचे नांव चंद्राबाई हे होते. वयाच्या ५८ व्या वर्षी त्या निवर्तल्या. रामभाऊना मुरगुडकर हे नांव चालवणारे वासु मुरगुडकर हे एकमेव पुतणे होते पण त्यांना मुलगा नसल्याने मुरगुडकरांना वंशज असा कोणी राहिला नाही. मुलीच्या कडूनच त्यांची आता नातवंडे परतवंडे ठिकठिकाणी विखरत चालली आहेत.

सूर्यास्त झाला की, संध्या प्रकाशाचा समय हा ही थोड्याच वेळाचा असतो. नंतर तो पण संपतो. त्याप्रमाणे अनंत लीलाचा स्वामी प्रताप भानू श्रीकृष्ण सरस्वती महाराजांची समाधी घेतल्यावर त्यांच्या कांही निकटवर्ती शिष्यांनी पण आपली जीवन यात्रा लवकरच आटोपती घेतली. त्यात हे शिष्योत्तम रामभाऊ मुरगुडकर पण होते.

रामभाऊ ''माझा पुजारी, माझा पुजारी'' म्हणून महाराज अभिमानाने संबोधित असत. सुवर्ण कंकणा सारख्या अशाश्वतातून सद्गुरुपी शाश्वत परिस रामभाऊनी हस्तगत केला. तसेच त्यांनी त्याच सद्गुरुंच्या विनम्र अखंड सेवेत राहून शाश्वत चिरंतन सौख्य हस्तगत करुन जीवन धन्य केले!

लेखकाचे नाव :- **श्री बाळासाहेब शांताराम नाडकर्णी,**
कोल्हापूर



श्री स्वामीभक्त स्वर्गीय रामभाऊ पुजारी
( रामभाऊ पुजारी यांचेच आडनाव मुरगुडकर/फारिक आहे.)

# महाराजांच्या तपस्विनी शिवूबाई

**भयाण स्मशानी धाडले गुरुनी**
**शिवूबाई तर तरुणी**
**राहिली श्री गुरुंच्या चिंतनी... ।।धृ.।।**
**पती–विरहिणी आभागिनी ती**
**नैराशाचं जीणं भोगी ती**
**नसे आधार जीवन संगती**
**परि सद्‌गुरु मनिनी... ।।१।।**
**ओली करुन डाळ भक्षिती**
**त्याविण दुजा आहार घे न ती**
**सवे श्वान ते एक सोबती**
**गुरुंची आज्ञापिनी... ।।२।।**
**पावन पंचगंगेचे स्नान**
**त्रिकाल समयी निर्भय करुन**
**गुरुदर्शना आतुरतेने**
**ये वैराग्य भुवनी ... ।।३।।**
**आशापाशी मन ते उखडून**
**ज्ञान भक्ती वैराग्याची पूर्ण**
**तप:साधना ऐसी होऊन**
**भोगिले क्लेश जीवनी...।।४।।**
**पाचारुन तिज सन्निध केले**
**सेवाशेष गुरुनी घेतले**
**अबला बल समर्थची केले**
**जाहली धन्य योग तपस्विनी... ।।५।।**

शिवूबाई ह्या श्रीकृष्णसरस्वती महाराजांच्या एक थोर शिष्या होत्या. मुळच्या त्या म्हैसाळ ग्रामीच्या. विधात्याने त्यांना रुप संपन्नतेची देणगी दिली होती. ऐन तारुण्यात असताना वडीलांनी त्यांचे विवाहकौतुक मोठ्या थाटामाटात पार पडले. हा आनंदाचा सोहळा दृष्ट लागण्याजोगा झाला असावा व म्हणूनच की काय अगदी थोडक्या दिवसाच्या कालावधीत शिवूबाईचे मातापिता इहलोकीची यात्रा संपवून निघून गेले. ह्या दु:खाचा आघात सहन करीत त्या सासरी गेल्या. पतिसंगती ह्या दुखःला मागे टाकत असतांना त्यांना एका कन्यारत्नाचा लाभ झाला.

सुखाची चुणूक त्यांना अशी मिळते न मिळते तोच त्यांचे सौभाग्य काळाने हिरावून नेले. ऐन पंचविशीच्या घरात पण न गेलेल्या शिवूबाईची धारणा मात्र पाचावर येऊन बसली. पती निधनाने त्यांना सर्वस्वाला मुकावे लागले. उदरभरणाचे साधन कोणतेच न उरल्यामुळे त्यांच्यावर भिक्षाटनाची पाळी आली व त्यास त्या लोकलज्जा सोडून सामोऱ्या पण गेल्या! मात्र त्या नितीमत्तेपासून जराही ढळल्या नाहीत.

त्या अंर्तमुख बनून स्वत:वर ओढवलेल्या दारुण दु:खाची कारणमीमांसा शोधू लागल्या. देव देवांना जे कर्मभोग चुकले नाहीत मग आम्हा माणसांना ते कसे चुकवता येतील? ह्या विचारातच त्यांना परमेश्वर कृपेचा ध्यास लागला मुळात त्यांचा देहपिंड भक्ति मार्गातला होता.

त्यांच्या म्हैसाळ गावी श्रीकृष्णसरस्वती महाराज कांही काळ वास्तव्य करुन राहिले होते. महाराजांच्या लीला तेथील सर्व ग्रामस्थांना माहित असल्यामुळे साहजीकच शिवूबाईंना महाराजांच्या दर्शनाची ओढ लागली. त्यांना शरण जाऊन ते आपला उध्दार करतील. त्यांच्या कृपेनेच आपल्या चौऱ्याऐंशीचा फेरा चुकवता येईल. हा निर्धार त्यांच्या मनाने घेतला व त्यांनी कोल्हापूरचा मार्ग धरला. वैराग्य मठात येऊन त्या महाराजांना शरणांगत झाल्या. तेंव्हा महाराज त्यांना म्हणाले ''तुम्ही इथे राहणार का?'' शिवूबाई म्हणाल्या ''होय! महाराज! हीच अपेक्षा धरुन इथंवर आले तुमच्या चरणांचा तरी मला वियोग होऊ देऊ नका! तुम्हीच माझा एकमेव आधार!'' महाराजांच्या आज्ञेने त्या वैराग्य मठीत राहिल्या. स्त्री देहाला उचीत अशी सर्व सेवा त्या दिवसभर करु लागल्या. कांही दिवस गेल्यावर एकदा महाराज शिवूबाईंना म्हणाले ''तू आता आयाचित वृतीने रहा. जर कुणी डाळ दिली तर तेवढीच तू खाऊन रहात जा'' शिवूबाई ''बरं'' असे म्हणाल्या. तोच महाराज जवळ असणाऱ्या रामभाऊ मुरगुडकरांना म्हणाले, ''रामा हिला तू रोज थोडी डाळ देत जा.'' ''जशी महाराजांची आज्ञा'' असे म्हणून रामभाऊनी शिवूबाईंना रोज चण्याची डाळ देण्याचे कबूल केले. शिवूबाईपण म्हणाल्या ''जो मज आज्ञा करतो तोच सद्गुरु माझी सर्व सोय करतो. मग मी त्यांना विसंबून कशी राहू?'' रामभाऊजी डाळ आणून देतील ती डाळ भिजवून शिवूबाई खाऊ लागल्या. अशा स्थितीत थोडे दिवस गेल्यानंतर परत महाराज शिवूबाईंना म्हणाले ''शिवू, आता तू गंगातिरी स्मशानात जावून रहा.''

महाराजांचे हे उद्गार ऐकताच शिवूबाईंच्या पुढे काजवे चमकू लागले. ती त्यांची अवस्था पाहून महाराज परत धीर देत म्हणाले ''अगं घाबरु नकोस. तुझ्या बरोबर तुला ही ''कुसारी'' देतो. ती बरोबर असल्यावर तुला घाबरण्याचे कांहीच कारण उरणार नाही.''

''कुसारी'' हे त्या कुत्रीचे नांव. कृष्णा लाडांची पूर्व जन्माची ती जन्मदायिनी. तिच्या हातून बऱ्याच पापमय घटना घडल्या म्हणून तिला अंत्यघडीच्या वेळी अंत्यज दिसू लागले. पुत्राला तीने ही हकिकत सांगता ''हे तर मूर्तिमंत पाप पुढ्यात उभे राहिले'' म्हणून कृष्णा लाडांनी नेहमी स्वत: धारण करीत असलेल्या गळ्यातील महाराजांच्या पादुका काढून आईच्या गळ्यात घातल्या. तेंव्हा त्या माऊलीला अंत्यजांच्याऐवजी समस्त ''ब्रम्हवृंद'' दिसू लागला. तेंव्हा ती

माऊली उद्गारली, ''पोरा, ह्या महाराजांच्या पादुका नाहीत. भावार्णवीच्या नौका आहेत. त्यांच्या सेवेतच तू रहा. मी आता जाते.'' म्हणून त्या माऊलीने प्राण सोडला. महाराजांना कृष्णा लाड त्या माऊलीच्या उध्दाराविषयी नेहमी विनंती करीत असता महाराज म्हणाले.

**''आधी येथीच आणू पोरगी।**
**मग पाठवू मागील दारी।**
**अनायासे साधली सुगी।**
**निवास स्वर्गा होईल...।।**

''महाराजांच्या भक्ताची आई'' म्हणून तिला त्वरीत यमयातनेतूनही सुटका मिळाली आणि प्रामाणिक सेवेचे प्रतिक मानल्या जाणाऱ्या श्वान योनीत तिचा जन्म झाला. तोही पगी नावाच्या मंदिरातील कुत्रीच्या पोटी. ''आधी येथे आणू पोरगी'' हे महाराजांचे वचन त्वरीत सत्यपण झाले. ही ''कुसारी'' म्हणजेच कृष्णा लाडांची जननी म्हणून महाराजांच्या प्रत्येक भक्त ह्या कुत्रीला गोड गोड पदार्थ खाण्यास देऊन लाड करीत असत.

त्या कुसारीस हाक मारुन महाराजांनी बोलवले. ती जवळ आल्यावर महाराज तिला म्हणाले, ''हे बघ पोरी, ह्या शिवूबरोबर तू गंगातिरी स्मशानात जा. ही जे देईल ते तू सेवन करुन संतुष्ट रहा. हिला सोडून तू कोठे राहू नकोस. रात्रंदिवस हिच्या सान्निध्यात राहून हिचे तू रक्षण कर.'' महाराज शिवूबाईंना म्हणाले ''हे बघ शिवू, ही माझी कुसारी तुझ्याबरोबर असता तुला भिती काळजी करण्याचे कांहीच कारण नाही. स्मशांनातील एकांतवास पण तुला सुखद होईल.'' महाराजांची आज्ञा आणि त्यांचाच निरोप घेऊन शिवूबाईंनी पंचगंगेचा मार्ग धरला. त्यांच्या पायात पुढ्यात पुढ्यात कुसारीपण चालू लागली. शिवूबाई स्मशानात येऊन राहिल्या. दररोज त्या तिन्हीत्रिकाल गंगेचे स्नान करीत आणि महाराजांच्या दर्शनाला नेमाने येत. येता जाता कुसारी पायातून लुडबुडून चालत असायचीच. रामभाऊ मुरगुडकर त्यांना हरभऱ्याची डाळ देत. ती भिजवून दुपारी व रात्री भक्षण करीत. त्यापूर्वी त्यातील डाळीचा वाटा त्या कुसारीला देत असत. महाराजांची आज्ञा त्या कुसारीने पण अगदी तंतोतंत पाळली. ''शिवू देईल तेवढेच तू खात जा'' व ती पण तेवढेच खात असे. जर कोणी तिला क्रूध्द शब्दात बोलले तर ती रुसून बसावयाची. अशाच एका प्रसंगी तिने सलग दोन दिवस अन्नाचा एक कणपण भक्षिला नव्हता. डोळ्याच्या पापण्या उघडून पाहण्याचे त्राणपण तिच्यात उरले नव्हते तेव्हा तारामतीनी तिची अशी ही अवस्था महाराजांना सांगितली. महाराज तिच्याजवळ गेले व म्हणाले. ''पोरी उठ जरा कांही तरी सेवन कर.'' मग तिने डोळे उघडून महाराज देत असलेला पेढा अनंदाने खाल्ला. तिच कुसारी शिवूबाई देईल तेवढेच चण्याची डाळ खात असे.

कांही दिवसांनी मात्र एक विपरीत घडले. शिवूबाईच्या तपात तपाची बाजू वाढली. नेहमीप्रमाणे स्नान करुन शिवूबाई पातळ बदलत असताना लुडबुडणाऱ्या कुसारीचा स्पर्श

त्यांच्या पायाला परस्पर्शाप्रमाणे झाल्यामुळे त्या घाबरल्या. तो स्पर्श सर्पाचा नसून कुसारीचा होता हे लक्षात येताच त्या रागाने कुसारीला म्हणाली ''काय कुसारी? अशी काय चळलीस, झटके देईन बघ तुला?''

कुसारीला राग येताच तिने तेथून त्वरीत वैराग्य मठाचा मार्ग धरला. नंतर थोड्याच वेळाने शिवूबाई आल्या व नमस्कार करुन घडलेली हकीकत महाराजांना सांगितली. कुसारीचा कांहीच दोष नाही. मीच तिला घाबरले व वाईट शब्दाने बोलले. ती माझ्यावर रागावून तुमच्याकडे आली. मला क्षमा करुन परत तिला माझ्याबरोबर पाठवा.

महाराज म्हणाले ''बाई तुम्ही पहिल्यांदा चुकला ते आता भरा. ही (कुसारी) आता तुमच्या बरोबर येणार नाही. तुम्ही आता एकटेच तिकडे जावा.'' शिवूबाई महाराजांचे चरण वंदून आपल्या कर्माला दोष देत स्मशानात येऊन राहिल्या. तोच तिथे गवळ्यांची मुले आली व म्हणाली ''तुम्ही मावशीबाई इथे कशाला राहताय? आमची गुरे मोठी मारकी आहेत तुमच्या अंगावर धावून येतील.''

''हा आता नसता अनर्थ मागे लागला आणि किती कशाची झडती द्यायची आहे हे महाराजांनाच माहित आहे'' असे म्हणून शिवूबाईंनी आपला तळ तेथून हलवला. ब्राम्हणघाटावरील श्रीसिध्देश्वर महाराजांच्या मंदिरासान्निध्यात त्या येऊन राहिल्या. महाराजांनी त्यांना स्मशानात पाठवले तेव्हापासून त्यांचे मन अंतर्मुख होऊन विचार करु लागले. पंचगंगेचे हे स्मशान म्हणजे महान शिवक्षेत्र आहे. मायामोहात जखडलेल्या शरीराला इथे मुठमाती मिळते. घोर अरण्यात बसून उग्र तपश्चर्येला बसणारे तपस्वी काम क्रोध आणि माया मोहात वहात गेले. प्रारब्धात मला ऐन तारुण्यात वैधव्य प्राप्त झाले तरी माझ्या देवानं सद्गुरुरुपी परमेश्वर श्री कृष्णसरस्वती महाराजांनी वेळीच मला सावध केले. नुसत्या चण्याची ओली डाळ सेवन करण्यास सांगून षड्रस अन्नाची हाव बाळगणाऱ्या रसनेला स्वत:च्या नामामृतात रमवले. त्या षड्रस पक्वान्नाबरोबर षड्रीपूनाही त्यांनी दूर पळवले. लाडीकपणात ज्या नश्वर देहाला जतन करावं, शेवटी त्याचीपण इथे राखरांगोळी होत असलेली सदोदीत दाखवून देहावरची आसक्तीपणा त्यांनी उडवली. अबला असून, महाराजांनी मला बलवान केले. सुंदर शहर वस्तीपेक्षाही महाभयाण भयंकर अशा स्मशानातील माझे वास्तव्य सुखद केले. विवेक वैराग्याचा त्यांनी बळ देऊन मनोविकार अंकीत केले. धन्य माझे हे असे आगळे संचित म्हणून मला श्री कृष्णरस्वती महाराजांच्या रुपात साक्षात परमात्म्याची भवतारक पदकमले दिसली.

शिवूबाई महाराजांच्या अशा भक्तीप्रेमाच्या नेहमी विचारात व त्यांच्या नामरुप स्मरणात असावयाच्या. शेवटी त्यांना ह्या सद्गुरुंची आपण नेहमी सेवा करीत रहावे ही इच्छा त्यांच्या अंत:करणात बळावत निघाली व एके दिवशी महाराज, दर्शनाला त्या आल्याबरोबर उद्गारले. ''शिवू, आता किती किती असे तप करणार? बस, आता तू तूझी गंगातीरची वस्ती उठव

आणि माझ्याजवळच इथे येऊन रहा.''

शिवूबाई परत वैराग्य मठात येऊन राहिल्या आणि महाराजांच्या सेवेत रमल्या. तारामतीना पण सेवाकार्यात एक चांगला हात मिळाला. महाराजांच्या भोजन पंक्तिचा लाभ त्यांना मिळाला. बरीच वर्षे त्यांचा मुक्काम तारामतींच्या वास्तूत गेला.

त्यांची एकुलती एक मुलगी तुळसाचा विवाह ऋणमुक्तेश्वराची पूजा करणाऱ्या इंगळीकर ह्या द्विजाबरोबर झाला. नंतरचा काळ त्यांनी ऋणमुक्तेश्वर मंदिरात वस्तीसाठी म्हणून काढला. दिवसभर पडेल ती महाराजांची सेवा त्यांनी करण्यास कधीही कुचराई केली नाही.

रामभाऊ मुरगुडकर नेहमी शिवूबाईंना हरभऱ्याची डाळ देत असत म्हणून मुरगुडकर घराण्याचा त्यांचा जिव्हाळा वाढत गेला. महाराजांच्या दिनचर्येचा कार्यक्रम अगदी ठरल्यासारखा असायचा. महाराज पंचगंगेकडे फिरावयास जातांना व परत येताचा मुरगुडकरांच्या दुकानात सकाळ संध्याकाळ बसावयाचे. महाराजांच्या तो समय साधून नाष्टा म्हणून महाराजांच्यासाठी शिवूबाई मुरगुडकरांच्या घरात एका विशिष्ठ पध्दतीने हातावरच मांडे करुन ते महाराजांनी सेवन करावेत म्हणून तयार ठेवत. महाराज आले की त्यांना स्वत:च्या हातने मुखात त्या भरवीत असत. हे मांडे शिजवत असतांना स्वयंपाकघराचे दार त्या कुणीही व्यक्तीने पाहू नये म्हणून झाकून घेत असत. हेतू एवढाच की कुणाही व्यक्तीची नजर त्या करत असलेल्या मांड्यावर पडू नये. महाराजांची उदंड सेवा शिवूबाईनी केली. वार्ध्यक्यात ऋणमुक्तेश्वराच्या मंदिरात असतांना त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. मृत्यूच्या वेळी त्यांना त्यांच्या देहाला महाराजांच्या कृपेने व्याधीयातना अशा कोणत्याही प्रकारच्या झाल्या नाहीत.

मंदिरात महाराजांच्या पूजाअर्चेची सर्व व्यवस्था शिवूबाई करीत असे. सर्व पूजा अर्चेची व्यवस्था स्वत: करुन स्वत:लाच केवळ स्त्रीदेह म्हणून महाराजांची साक्षात पूजा करता येत नाही. ह्याची खंत त्यांना नेहमी वाटे. पूजेमध्ये स्त्रीदेह हा निषिध्द एवढा का मानला गेला? महाराजांच्या पूजेचा मान फक्त पुरुषानाच का? स्त्री देहाला का असू नये? एवढ्या स्त्रिया काय म्हणून वाईट गणल्या? आपण पुरुष असतो तर महाराजांची आपण पण प्रत्यक्ष सेवा केली असती. असा विचार मनात येताच शिवूबाईना महाराजा प्रत्यक्षात म्हणाले ''तथास्तू''

महाराजांच्या ह्या तपस्वीनी शिवूबाई म्हणजे आपणा सर्व भक्तांसाठी एक भक्तिमार्गदिपीकाच होय. त्या शिवूबाईच्या पवित्र स्मृतीस आमचे कोटी कोटी प्रणाम!,

लेखक :- **श्री बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, कोल्हापूर.**
संदर्भ ग्रंथ :- **श्रीकृष्ण सरस्वती लिला पुण्यतिथी**
विशेषांक १० ऑगस्ट १९९५

# // समुद्र भरला आहे //

## ॥ अध्याय १८ वा ॥



श्री स्वामींनी गौरविलेली स्व. बाळकू राशिवडेकर यांच्या घरातील
१२५ वर्षांपूर्वीची श्री अनंत/श्रीगणेश मूर्ती

## ▪ विषयसूची....!

१) स्वामीभक्त बाळकू राशिवडेकर यांचे मरण
२) निजबोध मठीची स्थापना
३) स्व. गोविंदराव करजकर

# अध्याय १८ वा

श्रीकृष्णगुरुंना / स्वामींना शुक्रवार पेठ आवडे. पंचगंगा नदीकडे फिरुन सूर्यास्ताच्या आंत परत वैराग्य मठीत येत. पंचगंगा तिरी शुक्रवार पेठेत बाळकृष्ण राशिवडेकर नावाचा इसम रहात होता. एकदा एक ज्योतिषशास्त्रनिपुण ज्योतिषी त्याच्या घरी आला. बाळकृष्ण राशिववडेकराने त्याला पत्रिका दाखविली. तो ज्योतिषी त्याला म्हणाला ''विसाव्या वर्षी मरणाचे गंडातर आहे. परंतु गुरुसेवेने, साधुसंगतीने हे मरणाचे गंडातर टळेल. हे मरणाचे जर क्कचित गंडातर टळले त्यातून तू मरणातून वाचलास तर तुला सदगुरुंचा संग घडेल'' हे ज्योतिषाने वर्तवलेले भविष्य / जातक ऐकून बाळकृष्ण राशिवडेकर घाबरुन गेला, उदास झाला, खिन्न झाला. तो मनात विचार करु लागला. हा देह केवळ अशाश्वत, क्षणभंगुर आहे. अनेक रोगांचे, पीडांचे वास्तव्य हे या देहात आहे. जीवन हे मृगजळ आहे. नुसती धावपळ चालली आहे. गुरुविना मुक्ती नाही. म्हणून करावी गुरुभक्ती. या अल्प आयुष्यातच गती मिळवावी / साधावी असे बाळकृष्णाला वाटू लागले.

कांही लोक त्याला श्रीकृष्णगुरुंची ख्याती सांगू लागले. ताराबाईच्या घरी श्रीकृष्णगुरु वास्तव्य करुन आहेत विलंब न करता तेथे जाणेस सांगितले. तर बाळकृष्णाच्या एका मित्राने त्याला कुंभार स्वामींना शरण जाण्यास सांगितले. बाळकृष्ण श्रीकृष्णगुरु / कुंभार स्वामींचे वास्तव्य स्थान शोधीत फिरु लागला. बऱ्याच लोकांना त्याने हे ताराबाईचे घर / गुरुस्थान कोठे आहे विचारले. गुरुचरण शोधीत निघाला. एके दिवशी अचानक त्याचा लाभकाळ जवळ आला. ताराबाईच्या घरी घाबरुन आला त्याने श्रीकृष्णगुरुच्या चरणकमळांचे दर्शन घेताच ते बाळकृष्णाला म्हणाले ''भ्याला, भ्याला मरणा, न भी मरणा. देह नाशाचा मानी खेद त्रिलोकी तोची मूढ'' श्री कृष्णगुरुंचे / स्वामींचे बोल ऐकून बाळकृष्ण सद्‌गदित झाला. स्वामींनी आपले भविष्य / मरणकाळ जाणले याचेही त्याला आश्चर्य वाटले. त्याने आता स्वामींचे पदकमळ / चरण न सोडण्याचा निश्चय केला. स्वामीभक्ती करु लागला. श्रीगुरुंची उपासना करु लागला. प्रपंचकार्यही विसरुन गेला. प्रपंचात लक्ष लागेना, कामधंदा सुचेना अशी अवस्था बाळकृष्णाची झाली. आळशांना कसला कामधंदा अशी लोक निंदा बाळकृष्णाला ऐकावी लागली. आईबापही बाळकृष्णाला म्हणू लागले. ''गोसाव्याचा संग धरला, निरुपयोगी पुत्र झाला, चळला, दुर्दैवी लीला. सांगितलेले ऐकत नाही. कामधंदा करीत नाही. स्वहिताचा विचार करीत नाही. केला घात पुत्राने. श्रीकृष्णगुरु / स्वामींच्या सानिध्य निरंतर / सारखा जातो.'' असे म्हणून आईबाप छळत. आईबापाचा छळ /लोकनिंदा बाळकृष्णाच्या चित्ताला जाळत होती. लोकनिंदा होत होती. परंतु बाळकृष्णाने प्रत्युत्तर दिले नाही. निंदास्तुती सम मानून तो ताराबाईच्या घरी श्रीकृष्णगुरु / स्वामींच्या दर्शनाला तिन्ही त्रिकाळ येत राहिला. जननिंदा निमूटपणे ऐकत राहिला. अंगीकृत कार्या न ढळला. त्याचा एकनिष्ठ भाव श्रीकृष्णगुरुंना / स्वामींना कळला.

प्रसन्न चित्त सदा ठेवून स्वामी सेवा करु लागला. यावर श्रीकृष्णगुरु / स्वामी म्हणू लागले ''परीक्षा झाली.'' परीक्षेत बाळकृष्ण उत्तीर्ण झाला. स्वामींना / गुरुंना बाळकृष्ण / बाळकू फार आवडे. तो नसता गुरुही बेचैन होत. एकदा श्रीकृष्णगुरु / स्वामी बाळकुला म्हणाले ''तुझ्या घराला भेट द्यावी वाटते. तुझ्या घराकडे आम्हांला न्यावे बाळकोबा'' स्वामींचे बोल ऐकून बाळकूला अतिशय आनंद झाला. वासु, कृष्णा, रामजी या समग्र शिष्यांना घेऊन स्वामी बाळकृष्णाच्या घरी आले. घरी त्याच्या आईला स्वामी म्हणाले ''आई आता व्याप सोडा, कमी करा. वृध्दपण आले आहे.'' स्वामींचे दर्शन होताच, त्यांचे बोल ऐकताच बाळकूच्या आईच्या वृत्तीत त्वरित फरक पडला, बाईचा भाव पालटला. ती आपल्या स्वकर्माला दूषण देवू लागली. उगिचच आपण स्वामीनिंदा केली असे तिला वाटू लागले. पश्चातापाने तिने मस्तक स्वामी चरणावर ठेवले व स्वामींना म्हणाली ''पुत्र माझा तुझा सेवेकरी, घ्यावा त्याला पदरी गुरुराया. कृपा करुन हेची वरदान द्यावे दुसरी मला विवंचना नाही.'' यावर स्वामी तिला म्हणाले ''बाळकूची आम्ही घेऊ सेवा. बाळकू माझा थोडे दिवस सेवा कामाला येईल. सेवेत कांही कमी जास्ती होऊन दुसरा जन्म घेईल. पुढील जन्म होईल उजवा. ब्रम्हाच्या आडवे कोण जाईल'' परंतु गुरुंचे / स्वामींचे हे गूढ बोल बाळकूच्या आईला समजले नाहीत. बाळकूची आई स्वामींना त्यांच्या घरी भोजन घेण्याची विनंती करी.बाळकूच्या घरी स्वामी भोजन घेत. सिध्द असेल ते अन्न भात, भाकर, ओली कोरडी भाजी वाढ म्हणत किंचित कांही घास मुखी घेत. तृप्ती झाली म्हणत. सोबतचा सेवकमेळाही प्रसाद घेई.

बाळकू सेवेला असता स्वामी त्याच्या खांद्यावर बसत. अबलख वारु प्रमाणे बाळकू त्यांना खांद्यावर बसवून फिरवी. एकदा अनंतचतुर्थीच्या दिवशी सकाळची वेळ साधून स्वामी बाळकृष्णाच्या / बाळकूच्या घरी आले. स्वामींना पाहून घरातील सर्वांना आनंद झाला. बाळकूच्या आईला अतिशय आनंद झाला. ''आमुचा अनंत आला'' असे तिला वाटले. तिने स्वामींना कर जोडून विनंती केली ''आमुच्या घरी भोजनास यावे'' स्वामींनी यावर होकार दिला व म्हणाले ''भोजनाला आवश्य येईन. परंतु आमची वाट पाहू नका. माझे पान वाढून ठेवा. यायला फार उशिर लागेल. तुम्ही सुखाने प्रसाद / भोजन ग्रहण करा.'' असे म्हणून स्वामी तेथून सेवकासह निघून गेले. वैराग्यमठीत आले. ताराबाईने पूजा केली. भरपूर पक्वान्ने भोजनासाठी ठेवली. भात, खीर, लाडू, मोदक, पुरणपोळ्या, विविध प्रकारच्या भाज्या वाढल्या परंतु स्वामींनी एक घासही ग्रहण केला नाही. भक्तांना / सेवकांना प्रसाद / भोजन घेणेस सांगितले. सर्वांचे भोजन होताच स्वामी बाळकूच्या घरी परत आले. बाळकूची आई स्वामींची वाट पाहतच होती. स्वामींनी प्रसाद / भोजन ग्रहण केल्याशिवाय आपण प्रसाद कसा घ्यावा या चिंतेत ती होती. पुष्कळ वेळ वाट पाहिली. शेवटी गुरुमाऊली आली. बाळकृष्ण माता / माऊली संतोषली. तिने स्वामींना अन्न / प्रसाद स्वहस्ते भरविले. तृप्ती होताच स्वामींनी ढेकर

दिली. त्यानंतर बाळकूची वृध्द माता जेवली. श्रीगुरु भक्त प्रियकर बाळकूने एक तट्टू आणले. त्याच्या पाठीवर गादी गालीचा घालून त्यावर स्वामींना बसवून स्वामींना फिरवून आणले. स्वामी तट्टूवर फिरतांना बाळकूला अतिशय आनंद झाला. त्याचे नेत्र निवाले असा बाळकू श्रीगुरुभक्त प्रियकर होता.

नंतर कांही काळ लोटला. कांही दिवस गेले. बाळकूस अतिताप आला. सेवेत खंड पडू लागला. त्याने तो कष्टी झाला. त्याचे शरीर तापाने अत्यंत क्षीण झाले. परंतु त्याने गुरुसेवा / गुरुध्यान सोडले नाही. दिवसेंदिवस तो असह्य झाला. गुरुचरण मला अंतरले आता वाचून तर काय उपयोग. गुरु विरहाने तो अत्यंत दु:खी झाला. एवढी गुरुसेवा करुन, जन्मभर गुरुंचा ध्यास घेऊन, गुरु चरणांचा अभ्यास करुन अंती त्या ज्योतिषाने सांगितलेले भविष्य / मरण आले असे मनांत म्हणून बाळकू चित्ती आठवे गुरुपावले. गुरुंचे ध्यान करु लागला. श्री स्वामी त्याची मनोव्यथा जाणून, त्याचा अंतसमय जाणून लाडाच्या खांद्यावर बसून धाऊन आले. त्याच्या अंगावर हात फिरवून म्हणाले ''सुखे व्हावे मरणाचे आधीन संतोषाने आता जा. पुढील जन्मी सेवा करुन घेऊ'' बाळकुने स्वामींना मनोभावे नमन केले. स्वामी निघून गेले. मागे बाळकूने प्राण सोडला, मरणाच्या आधिन झाला. बाळकूचे आईबाप दु:खात बुडाले, आकांत, शोक करु लागले. मुला निमित्त गुरुचरण दिसले. गुरुस्मरण ते विसरले नाहीत.

पूर्वी बाळकू राशिवडेकरने श्रीकृष्णगुरु / स्वामींच्या सेवेत असतांना नित्य सेवा होण्याकरिता गुरुंच्या पाषाण / पादुका करविल्या, कृष्णा लाड, मुरगुडकर, वासू दळवी, बाळकू राशिवडेकर स्वामीस / गुरुस विनवून त्या पाषाण पादुकाची षोडशोपचार पूजा करीत. पंचामृतस्नान रुद्राभिषेक रोज होई अशा प्रकारे बाळकू राशिवडेकराच्या घरी त्या पाषाण पादुकांची नित्य पूजा होई. कधी कधी स्वामी / श्रीकृष्णगुरु त्या पाषाण पादुकावर उभा राहून बाळकुला म्हणत ''या पाषाण पादुका जिथे स्थापन करशील तिथे मी रात्रंदिवस उभा असेन. तिथे माझा वास असेल. तिथे सर्व भक्तांच्या इच्छा, मनोरथ पूर्ण होतील. हे त्रिकाळ सत्य मान. या पाषाण पादुकांची नित्य पूजा करीत जा.'' स्वामींच्या / श्रीकृष्णगुरुंच्या आज्ञेने त्या पाषाण पादुकांची रोज पूजा / आरती बाळकू राशिवडेकर करु लागला. बाळकू राशिवडेकराच्या मृत्यूनंतर पाषाण पादुका कृष्णा लाडाच्या घरी गेल्या. कृष्णा लाडाने त्या पुढे गोविंद व्यासास दिल्या. व्यासाला जणू तो परिस सांपडला. त्याने त्या पाषाण पादुका स्थापिल्या गंगावेशीत. त्या स्थानाला निजबोधमठी म्हणतात. श्री कृष्णगुरुंच्या / स्वामींच्या वचनाप्रमाणे जे भाविकभक्त त्या पाषाणपादुकांचे दर्शन घेतात / भजतात त्यांना तेथे अनुभव येतात, साक्षात्कार आजही घडतात.

करवीरक्षेत्री गोविंदराव करजकर नांवाचा एक भक्त रहात होता. त्याची श्रीकृष्णगुरुवर / स्वामींच्या वर अतिशय भक्ती होती. नृसिंहवाडीला तो दर पौर्णिमेला श्रीदत्त दर्शनाला न चुकता

श्रध्देने जाई. एकदा गोविंदराव श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला आला असता सायंकाळ आरतीचा समय होता. भक्तजनांची वैराग्यमठीत दाटी/गर्दी झाली होती. गोविंदरावाने गुरुपदकमळी शिर ठेवून दर्शन घेतले हे पाहून स्वामी त्याला म्हणाले'' ''नृसिंहवाडीला दर पौर्णिमेला काय म्हणून तुम्ही जाता? वाडीचा दत्त व मी असे भिन्नता/भेदभाव कां मानता? तुमची अंर्तयामी भेदभावना आम्ही दूर करु'' हे स्वामींचे बोल ऐकून करजकर म्हणाला ''महाराज मी मूढ / मूर्ख आहे. आज मला तुमचे गूढ कळून आले. नृसिंहवाडीस जाऊन पौर्णिमेला दर्शन घेण्याचे कामच उरले नाही. नित्य आता तुमचे दत्तदर्शन, सर्वोत्तमा गुरुराया आता येथेच नित्य येईन. वाडीचा तू देव दयाघन'' अशा रितीने गोविंदराव करजकर श्रीकृष्णगुरुंच्या चरणी भाव धरुन त्यांच्या दर्शनाला येवू लागला. त्याचा द्वैतभाव नष्ट झाला. त्याने नृसिंहवाडीस जाणे सोडले. गंगेचे महत्व जाणून पंचगंगेत कार्तिक महिन्यात स्नान करुन श्री अंबाबाईचे दर्शन घेत असे व पुढे श्रीकृष्णगुरुंच्या/स्वामींच्या दर्शनाला तो जात असे. कार्तिक महिना पूर्ण होण्यापूर्वीच एकदा त्याची दैवगती आडवी आली. एके दिवशी गंगा स्नानाला गेला असतांना जळ/जल देवतानी / साती आसरानी त्याला झडपले. त्याला फार भीती वाटू लागली. भयभीत होऊन त्याने श्रीकृष्णगुरुकडे धाव घेतली. येवूनी गुरुपदी माथा ठेविला. श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''दृष्ट त्या नारी / जळदेवता तुला छळतात / गांजतात भिऊ नको. त्यांना आम्ही पळवू दूरी. पूर्व कर्म प्राक्तन भोगणे घरी जा'' स्वामींचे / श्रीकृष्णगुरुंचे धीराचे बोल ऐकून गोविंदराव घरी तडक निघून गेला.

त्याच्या नजरेसमोर दोन नारी / स्त्रिया भीती दाखविण्यासाठी बळेबळेच येत. हाती काठी घेवून श्रीकृष्णगुरु स्वामी त्या स्त्रियांना मारीत असत. असे दृष्य त्याला जागेपणी सारखे दिसे. क्षणाची त्याला उसंत नव्हती अशा प्रकारे सात दिवस गेले. पण घडीभर त्याला विश्रांती नाही. त्याचे संकट टाळण्यासाठी श्रीकृष्णगुरु / स्वामी त्याच्या भोवती काठी घेऊन फिरत. जागेपणी हे सर्व गोविंदराव पाही. सात दिवसानंतर छळणाऱ्या / गांजणाऱ्या जलदेवता याउपर निघून गेल्या मग तो जाहला भयमुक्त. अशा प्रकारे गोविंदराव करजकराचे अरिष्ट, संकट श्रीकृष्णगुरुनी टाळले. मग धीट होऊन, भयमुक्त होऊन गोविंदराव श्रीकृष्णगुरुंच्या / स्वामींच्या दर्शनाला हळूहळू येवू लागला. स्वामींना तो म्हणाला. ''तुम्ही माझ्यासाठी कष्टला. माझे आरिष्ट टाळला'' यावर श्रीकृष्णगुरु गोविंदाला म्हणाले ''ऐक बा गोविंदा, पातळ परडीत ठेवून, त्यावर दही, भात, लिंबू नैवेद्य ठेवून पोत लावून ती परडी तू स्नान केलेल्या जागी गंगेत सोड. आसरांना संतुष्ट कर. त्या जलदेवतांना / आसरांना / सुवासिनीना संतुष्ट कर'' श्रीकृष्णगुरुंचे बोल / वचन ऐकून गोविंदाने जावून मनोभावाने पंचगंगेत जलदेवतांना / साती आसराना परडी सोडली. साती आसराच्या त्रासातून गोविंदा मुक्त झाला. त्याला बरे वाटू लागले. तो आता तिन्ही त्रिकाळ श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला वैराग्यमठीत रोज जाऊ लागला.

साती आसराच्या त्रासाने गोविंदा बरा झाला न झाला त्याला दुसऱ्या रोगाची भावना

झाली. चंकदळ्यानी त्याचे अंग फुलले. चंदकळ्यानी अंग भरले. अहोरात्र देहाची आग होऊ लागली. पित्ताच्या गांद्या जशा उठतात तसे अंग चंकदळ्यांनी भरले. कोणा वैद्याला दाखविता त्याने त्याला महारोग झाल्याचे सांगितले. कांही औषध उपाय करता त्याला गुण येईना. कर्माचे किती भोगू भोग गोविंदा म्हणू लागला. श्रीकृष्णगुरुंना आठवू लागला. सहा महिने झाले रोग हटला नाही गोविंदालाही महारोग झाल्याचा संशय वाटला. त्याने श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला वैराग्य मठीत जाण्याचे सोडले. दिवसेंदिवस रोग बळावला. पूर्वी नृसिंहवाडीची दर पौर्णिमेला वारी गोविंदा करीत होता. वारी सोडून दिल्याने, बंद केल्याने, वाडीचा नियम मोडल्याने म्हणून हे ओढवले कर्म असे त्याची बायको मुले म्हणू लागली. वाडीचा नरहरी तुजवर कोपला असे म्हणू लागली. असा विकल्प त्याच्या बायको-मुलांनी त्याच्या मनात भरविला. त्यांचे बोल, त्यांनी भरविलेला विकल्प गोविंदाला खरा वाटला.

कुंभार गल्लीतील स्वामी आता रक्षणकर्ता न झाला सामान्य मानव असता उगिच त्यांना दत्त मानणे अयोग्य. असा विकल्प त्याला भरविल्याने तो पत्नी - मुलांसह वाडीला आला. गोविंदाची मती भुलली. चार दिवस राहता वाडीला अंगाचा दाह जास्तच वाढला. पाण्याविना मासा कसा तडफडतो तसा गोविंदा तडफडू लागला. अंगाची लाही फार होऊ लागली. बायको-मुलांची नजर चुकवून तो सरळ ताराबाईच्या घरी वैराग्यमठीत आला / पातला. श्रीकृष्णगुरुंना / स्वामींना तो म्हणाला ''मी मोठा अपराधी आहे. आधी या रोगातून करा मुक्त. पुन्हा हे चरण कधीही सोडणार नाही. देवा तुझे अनंत उपकार. त्या उपकारांचा मला विसर पडला. बायको-मुलांच्या सांगण्याने विकल्पाने माझे अंतरंग भरले. मी मोठा अपराध केला आहे. अपराध केवळ भ्रांतिजन्य परंतु मी तुझाची कृष्णनाथा'' तेंव्हा श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले ''होईल निरोगी तुझे शरीर. त्यात काय आहे?'' कृष्णगुरुंचा आशीर्वाद कानी पडताच त्याच्या शरीराचा दाह / आग किंचीत कमी झाली. गोविंदा श्रीकृष्णगुरुंना वंदन करुन गुरुमहिमा मनी आठवीत आपल्या घरी परत आला. दुसऱ्या दिवसापासून गोविंदा वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला रोज जाऊ लागला. पुढे स्वामी गोविंदाच्या हातास धरुन फिरु लागले. कधी जाती आडरानातून तर कधी रानावनातून त्याला एकट्याला घेऊन फिरु लागले. श्रीकृष्णगुरुंच्या संगतीत फिरतांना गोविंदाला शांतता लाभली.

जरी दूर फिरायला गेले तरी चालण्याचे त्याला श्रम वाटेनात. आपण महाव्याधीग्रस्त / महारोगी म्हणून दूर दूर गोविंदा चाले. परंतु श्रीकृष्णगुरु त्याचा बळेच हात धरुन संगत चालत. अन्नपाण्यावाचून श्रीकृष्णगुरु गोविंदाला रात्रंदिवस मागे घेऊन पंधरा दिवस फिरले. अन्नवाचून वाळले शरीर, गोविंदाचा नूर पालटला. चंकदळ्या नाहीशा झाल्या. पूर्वावस्था प्राप्त होऊ लागली. मग एके दिवशी हरिपंत शिदनेर्लीकरला म्हणाले ''गोविंदाच्या नांवे एक घागर पाणी ओतून टाक'' हरिपंतानी श्रीकृष्णगुरुंची आज्ञा मानून गोविंदाच्या नावे एक घागर पाणी ओतून

टाकले. मग उरला-सुरला दोष नाहिसा झाला. आठ दिवसात पूर्ववत गोविंदाचे शरीर झाले. त्याची अंगकांती उठून दिसू लागली. यावर गोविंदा श्रीकृष्णगुरुंना म्हणाला ''माझ्यासाठी तुम्हांला कष्ट, उपवास पडले, इच्छा होता नूतन ब्रम्हांड निर्माण करणारे तुम्ही आहात. मी तुम्हांला शरण आलो आहे. निरंतर वास द्या हेच मागणे हा दास मागत आहे''

*****



श्री स्वामी भक्त बाळकू राशीवडेकराला श्री स्वामींनी पूजेसाठी दिलेल्या पाषाण पादुका(निजबोध मठी, गंगावेश कोल्हापूर)

# स्व. बाळकृष्ण राशिवडेकर यांची माहिति

स्व. बाळकृष्ण राशिवडेकर (बाळकू) हे शुक्रवार पेठ कोल्हापूरात रहात. त्यांच्या आजोबांचे नाव काशिनाथ राशिवडेकर होते. ते राशिवडे गांवचे पाटील होते. शेतीवाडी, पाटीलकी ते व्यवस्थित सांभाळून होते. त्यांना वासुदेव नावाचा एक पुत्र होता. स्वर्गीय वासुदेव यांना दोन मुले १) हरी व २) बाळकृष्ण (बाळकू हे स्वामीभक्त असून ते ब्रम्हचारी होते.)

स्वर्गीय हरी यांना चार मुले व एक मुलगी होती.

**१) श्रीकृष्ण २) वामन ३) गोविंद ४) केशव ५) काशिताई**

यातील बाळकृष्ण (बाळकू) हे कुंभार स्वामींचे शिष्य होते. सन १८८० ते ८५ सालातील ही घटना आहे. बाळकू त्यावेळी अंदाजे १५ वर्षांचा असतांना त्याला एका ज्योतिषाने सांगितले की, वयाच्या विसाव्या वर्षी तुझ्यावर गंडातर आहे, मृत्यूयोग आहे. ते ऐकून मरणाला घाबरुन बाळकू कुंभार गल्लीतील ताराबाई शिर्केंच्या घरी स्वामींच्या दर्शनाला आला. त्याला पाहताच स्वामी बाळकूला म्हणाले ''मरणाला भिऊ नकोस'' स्वामींचे बोल ऐकून बाळकू आश्चर्य चकीत झाला. मरणाला घाबरुन गेलो आहे हे स्वामींनी कसे ओळखले याचे त्याला आश्चर्य वाटले. स्वामी हे थोर अंतर्ज्ञानी सत्पुरुष आहेत याची त्याला खात्री पटली.

तो दररोज आता स्वामी दर्शनाला जाऊ लागला. होईल तेवढी सेवा करु लागला. स्वामींचा तो आवडता शिष्य बनला. बाळकू शिवाय स्वामींना करमत नसे. बाळकुलाही स्वामींच्या शिवाय करमत नसे. स्वामी कधी कधी बाळकूच्या घरी जात. आपल्या शिष्यासह भोजन करीत. कधी कधी बाळकूच्या खांद्यावर बसत. बाळकूचा एकनिष्ठ भाव / सेवाभाव स्वामींना आवडला. नित्य सेवा होण्याकरिता बाळकूने पाषाण पादुका केल्या होत्या. त्या पाषाण पादुकांची पूजा बाळकू रोज करीत असे. त्या पादुकांवर उभे राहून स्वामी बाळकूला म्हणाले ''या पाषाण पादुकांची नित्य तू पूजा करीत जा. या पादुका तू जिथे स्थापन करशील तिथे मी रात्रंदिवस आहे. हे त्रिकाल सत्य मान.'' पुढे कांही काळ लोटला. विसावे वर्ष बाळकूला चालू झाले. एकदा तो तापाने आजरी पडला. ताप कमी होईना. दररोज स्वामी बाळकूला भेटायला, तब्येतीची चौकशी करायला जात. हळू हळू बाळकुचा ताप वाढतच गेला. तापाने बाळकू क्षीण झाला. कष्टी झाला. सेवेत खंड पडू लागला. श्री स्वामी नामस्मरण, श्री स्वामीचरण तो विसरला नाही. अंतसमयी स्वामी बाळकूच्या घरी आले. अंगावरुन हात फिरवून त्याला म्हणाले ''सुखाने तू मरणाच्या स्वाधीन हो. पुढील जन्मात तुझी उरलेली सेवा पूर्ण करुन घेईन'' बाळकू मरण पावला. श्री स्वामींना अत्यंत दुःख झाले. त्यांच्या आई-वडीलांना भावंडांना खूप दुःख झाले. बाळकू हा विसाव्या वर्षीच ब्रम्हचारी म्हणून वारला. त्याच्या भावंडाची घराण्याची माहिति खालील प्रमाणे :-

**१) श्रीकृष्ण :–**

हे बाळकूचे पुतणे होय. हे मयत असून, त्यांना २ मुलेव ६ मुली. स्व. श्रीकृष्ण हे राजाराम कॉलेजला नोकरी होते.

**अ) जगन्नाथ :–**

हे श्रीकृष्ण यांचे थोरले चिरंजीव. त्यांचा जन्म दि. ११/१२/१९३९ चा. त्यांनीही राजाराम कॉलेज कोल्हापूर व गव्हर्मेंट हायस्कूल बुलढाणा येथे वरच्या पदावर नोकरी केली. त्यांच्या मंडळीचे नांव सौ. मनोरमा असून गृहिणी आहेत. आजही कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला उभायता सर्व उत्सवाला हजर असतात.

**ब) अच्युत :–**

हे श्रीकृष्ण यांचे लहान चिरंजीव. हे मयत असून, त्यांना दोन मुलीच आहेत.

**२) स्व. वामन :–**

हे बाळकू राशिवडेकर यांचे पुतणे. त्यांना १) अनंत २) मोहन ३) बाळू ही तीन मुले व २ मुली आहेत.

**३) स्व. गोविंद :–**

हे बाळकू राशिवडेकर यांचे पुतणे त्यांना भालचंद्र (मयत) मुलगा व जयश्री कन्या.

**४) स्व. केशव :–**

हे ही बाळकू राशिवडेकर यांचे पुतणे. त्यांना सुहास व राजू ही दोन मुले व तीन मुली आहेत.

५) स्व. काशिताईंना कोळे कराडला येळगांवकर घराण्यात दिले होते.

शब्दांकन :– **श्री जगन्नाथ राशिवडेकर,**

कोल्हापूर

# जीवन्मुक्तगीता


अवधूतगीतेप्रमाणेच जीवनमुक्तगीता ही दत्तात्रेय-प्रणीत समजली जाते. ही गीता केवळ चोवीस श्लोकांची आहे.

**।। श्री गणेशाय नमः।।**

**वंदूनि शारदा- गजानन । प्रकट ब्रम्ह श्रीगुरुचरण ।**
**मुकुलितार्थे वाखाणीन । जीवन्मुक्तगीता ।।**
**जो सर्व भूतान्तरी स्थित । चित्स्वरुप नित्यमुक्त ।**
**प्रत्यक्चैतन्यरुप समस्त । त्या मातेंचि नमो नमः ।।**
**तिये नांव जीवन्मुक्ति । जियेची सदेहीं अनुभूति ।**
**पिंडपतनानंतर मुक्ति । श्वान-सूकर अनुभवती ।।**
**शिवस्वरुपचि असे जीव । भूतमात्रीं भरला शिव ।**
**ऐसा जयाचा अनुभव । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**सर्व भूतांतरस्थ ब्रम्ह एक । रवीपरी जगत्प्रकाशक ।**
**ऐसें अनुभवी जो सम्यक । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**जळीं चंद्र एक प्रतिबिंबतां । डोळियां दिसे तयाची बहुत ।**
**तैसी बहुत्वीं जाणे एकात्मता । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**सर्व भूतीं ब्रम्ह स्थित । एकमेव भेदरहित ।**
**आत्मदृष्ट्या ऐसें पाहत । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**क्षेत्र व्यापक गगनाहून । मी आत्मा असे क्षेत्रज्ञ ।**
**कर्ता भोक्ता मीच, जाणे । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**कर्मेंद्रियें व्यापाररहित । आणि तैसेंचि ध्यानवर्जित चित्त ।**
**करुनि आत्मनुभवीं जो स्थित । तया नांव जीवनमुक्त ।।**
**केवळ शरीरपरिरक्षणार्थ । कर्म शोकमोहादिवर्जित ।**
**शुभाशुभ परित्यजित । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**शास्त्रदिष्ट कर्में करी । कर्तृत्वाचा अहंकार न धरी ।**
**कर्म ब्रम्हस्वरुपें अंगिकारी । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**जगदीश्वर आकाशव्यापित । चिन्मय सर्वभूतसहित ।**
**ऐसे आत्मदृष्ट्या जाणत । तया नांव जीवन्मुक्त ।।**
**सर्वभूतीं अनादिवर्ती । जीव शिवस्वरुप असती ।**
**ऐसें जाणूनि निर्वैरवृत्ती । तया नांव जीवन्मुक्त ।।**

# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय १९ वा ॥



श्री निजबोध मठी कोल्हापूर येथील श्रींच्या चर्मपादूका

## विषयसूची....!

१) बाळकू राशिवडेकरांचा पुर्नजन्म
२) श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे लहान बंधू मल्लंभटजी
३) अनुष्ठान करणाऱ्या भास्कराची कथा व उपदेश

## अध्याय १९ वा

बाळकू राशिवडेकर हयात असतांना त्याची बहीण त्याच्या घरी रहात. तिची स्वामींवर नितांत श्रध्दा. ती गुरुपदी स्थिर राहिली. लग्नानंतर कांही काळाने ती गरोदर राहिली. एके दिवशी श्रीकृष्णगुरु तिच्या स्वप्नात आले व सांगू लागले. ''तुझा मृत बंधू बाळकू तुझ्या उदरी आहे. सेवा सोडून अर्ध्यात गेला. आमची सेवेची त्याला आवड आहे. बालक म्हणून जन्मून तुझ्या घरात येईल. घरी ज्या माझ्या पाषाण पादुका आहेत त्यांची तू नित्य पूजा जा करीत. पुन्हा त्याने मानवाची काया धरली आहे. तो जन्मता येऊ भेटाया या माझ्या वचनास विसरु नको.'' गुरु बोल ऐकून बाळकूच्या बहिणीला अतिशय आनंद झाला. तिला स्वामी दर्शनाचा छंदच लागला. स्वामींनी कसले डोहाळे लावलेत / कसली माया लावली याचे ती कौतुक करु लागली. पूर्वी बाळकृष्ण राशिववडेकर हयात असतांना त्याने पाषाण पादुका करविल्या होत्या. कृष्णा लाड, मुरगुडकर, वासु दळवी तसेच बाळकू राशिवडेकर गुरुस विनवीत, या पाषाण पादुकांची षोडशोपचार पूजा करुन तुला अर्पण करु. स्वामी त्या पाषाण पादुकावर उभे राहून म्हणत ''या माझ्या पाषाण पादुका शंका सोडून येथेष्ठ पुजाव्यात. पंचामृतस्नान, रुद्राभिषेक, षोडशोपचार या पाषाण पादुकांच्या केल्यास श्री दत्त तुमचे सर्व संकल्प / मागणे पुऱ्या करतील. या पादुका जेथे असतील तेथे माझा वास असेल. यात संशय न धरावा'' बाळकृष्ण / बाळकू राशिवडेकर या पाषाण पादुकांची नित्य पूजा / आरती करी. नऊ मास / महिने पूर्ण होताच बाळकूची बहिण प्रसुत / बाळंत झाली. तिला स्वामींच्या बोला प्रमाणे / वचनाप्रमाणे पुत्र / मुलगा झाला. जणू बाळकूच पोटी आला.

मुलाच्या आई वडीलांना आनंद झाला. बाळकूच्या भगिनीला मुलगा झाल्याचे समजताच श्रीकृष्णगुरु / स्वामी तिच्या सदनी / घरी आले मुलाला मांडीवर घेवून चुंबन घेवून कुरवाळून बाळकू आला म्हणू लागले. ''आम्हासाठी आला पहा. आता नफा-तोटा संपला. आता जन्म मरणाचा दुसरा मोठा बाजार नाही. संपले येणे पोटा. पोहचला वैकुंठा'' असे म्हणून त्या लहान बाळाला स्वामी उचलून घेत. उष्णोदक आणा म्हणीत त्याच्या सर्वांगाला स्वकराने तेल लावून त्याला न्हायला घालत. त्याच्या मुखात साखर घालीत झोके देत वेद गात. संसार बंधनातून मुक्त होशील म्हणत. झोके देवून वेद गाऊन त्या बाळाला स्वहस्ते झोपवून मग ताराबाईच्या घरी परत येत. परंतु स्वामींना त्या मुलाचा लळा लागला होता. कसे मूल हे गुणनिधान, कसे मूल हे पुण्यवंत, काय मुलाचे पूर्व सुकृत त्या मुलाला स्वामी जराही विसंबत नसत. नित्य नवी टोपी / अंगरखा लेववून फिरवून आणीत. भक्तांनाही मनी आनंद वाटे. वैराग्यमठीत स्वामींची पाऊले ठरेनात. अरणोदयी स्वामी ताराबाईच्या घरातून बाहेर पडून त्या मुलाकडे जात. मूल झोपी जाताच स्वामी वैराग्यमठीत परत जात. अन्नपाणीही विसरुन जात. अवघ्या वीस दिवसाचे ते बाळ / मूल आईशिवाय स्वामींजवळ न रडता राही. स्वामी त्याला दूरवर खांद्यावरुन फिरायला नेत. एका मागून एक महिने सरत गेले. बघता बघता तीन वर्षे संपली. पूर्वीचा काळ

बाळकूच्या पाठीला लागला. आयुष्यमान सरत आले. सद्गुरुनी / स्वामींनी मरणकाळ परतविला. परंतु मरण / मरणकाळ जवळ आला. अंत:काळी श्रीगुरु तारक श्रीगुरुंनी / स्वामींनी त्याला मांडीवर घेतले मुखामध्ये मुख घालून / चुंबुन बाळाला अक्षय आत्मसुख दिले. बाळाची प्राणज्योत हळूहळू वर जाऊ लागली. गुरुकडे / स्वामीकडे पहात / बघत बाळाने डोळे मिटले. सेवेसाठी पुन्हा बाळकू जन्मला. सेवा भाग पूरा केला. सेवाभाग पुरा होताच बाळकू मरण पावला. त्या बाळाच्या आई वडीलांना अतिशय दु:ख झाले. त्या दु:खी बाळाच्या आईच्या स्वप्नी श्रीकृष्णगुरु / स्वामी जाऊन म्हणाले ''देहाला असते मरण. जन्मला तो मरणार. कशासाठी शोक करतेस. मागे गेले पुढे जाणार. जे कांही दृश्य ते स्थिर नव्हे. तुझा पुत्र मुक्त जाला. शोकाने अंत:करण जाळू नको. काल चक्र हे कोण थांबवणार? मनुष्य प्राण्याला मरण आहे. तुम्ही-आम्ही एके दिवशी जाणार. गतकाळाचा शोक फुका आहे. संसार पाण्यावरील बुडबुड्या प्रमाणे आहे. पाहिला न पाहिला तो बुडबुडा वर फुटतो. म्हणून शोक आवर. परमेश्वराला शरण जा'' स्वप्नातील स्वामींचा उपदेश ऐकून तिच्या मनाचे किंचित समाधान झाले.श्रीगुरुपदी / श्री स्वामीपदी अंत:करण दृढ ठेवून, गुरुचरणी भाव ठेवून तीनेही इहयात्रा संपविली.

श्रीकृष्णगुरु शिष्यासह फिरायला जात. इंग्रजी शोळेतील विद्यार्थी भेटत. ही विद्यार्थी मुले स्वामींना वेडा समजत. एकदा ही विद्यार्थी मुले एकमेकांना म्हणाली या सत्पुरुषाची पाहू परीक्षा. एकदा स्वामी फिरायला गेले असता रस्त्यातच आंग्ल / इंग्रजी भाषेत स्वामींना प्रश्न केला. स्वामींनीही कुचेष्टेचा हेतू ओळखला. आंग्ल / इंग्रजी भाषेतच मुलांना जाब मिळाला. उणे ते अधिक करा अधिक चिन्ह स्वामींनी सांगितले. स्वामींनी दाखविलेली अधिक उणेची खूण बघून मुले विस्मयाने एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागली. त्यातील कांही मुले म्हणाली ''मित्रहो, अंध होऊ नका. फुकटच / उगीचच आपण सत्पुरुषाची निंदा केली. स्वामीं कल्पवृक्ष श्रीगुरु आहेत. माफी मागून व्हा मोकळे.'' आपल्या मित्रांचे बोल ऐकून मुले झाली चकित. स्वामी सामान्य मनुष्य नसून श्री. दत्तावतार खचितच आहेत. त्यांना मनोमन साक्ष पटली. समोरासमोर निवाडा होवून श्री. दत्तावतार स्वामींच्या पाया पडून उगीच पाठी पीडा लागायला नको म्हणून, स्वामींना वंदून पळून गेली. अशा रितीने आंग्ल शाळेत / इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या मुलांचा फजितवाडा झाला. विद्यार्थ्यांचे नास्तिकपणा दवडला.

मिरजेला कृष्णा घाटावर स्वामींचे लहान बंधू रहात. एकाचे नांव मल्लंभट जोशी (मकरंद भटजी) तर दुसऱ्या लहान भावाचे नांव वासुदेव जोशी, मल्लंभटाची सुगुणी पत्नीला जलोदर झाला. या जलोदर रोगावर मिरजेतील प्रसिध्द चिंतामणी वैद्यराजाकडून औषधे दिली. औषधोपचार केले. परंतु गुण नाही. सर्व उपाय थकले जलोदर रोग वाढतच गेला. मल्लंभटजीची पत्नी घाबरुन गेली. जणू मरणच तिला दिसू लागले. मनुष्यांचे प्रयत्न / चिंतामणी वैद्यराजाचे प्रयत्न आता वाया गेले. सगळी औषधे वाया गेली. हे पाहून मल्लंभटजींची पत्नी शोकमग्न झाली. स्वामींनी

ही गोष्ट अंतरी मनाने जाणली, ओळखली. वासू दळवी, कृष्णा लाड, धारवाडकर, परांडेकर, गोविंद व्यास, म्हादबा पटकर, रामा मांग या सेवकजनाना घेवून स्वामींनी मिरज ग्रामी गमन केले. मिरजेला गमन करण्यापूर्वी / जाण्यापूर्वी स्वामींनी व त्यांच्या सोबतच्या सेवकजनानी नृसिंहवाडीत जाऊन श्री दत्तात्रेयांचे दर्शन घेवून मिरजेच्या कृष्णा घटावरील मल्लंभटजींच्या घरी आले. मल्लंभटजींच्या घराला भेट दिली. मल्लंभटजीना वाटले आता कृष्णनाथ / स्वामी आपल्या घरी चालून आले. आता पत्नीच्या रोगाची व्याधी निदान होईल. स्वामींना मल्लंभटजी म्हणाले, ''बंधू संकटात धाऊन आलास. माझ्या पत्नीची व्याधी बघ. रोग बरा कर तिला जलोदराच्या असह्य वेदना होत आहेत. माझ्या पत्नीला जलोदरातून बरी करुन या असह्य दु:खातून सोडव. लोक तुला करुणासागर म्हणतात. दयासिंधू म्हणतात, तुला दत्तावतार म्हणतात. तू तर आमचा मोठा बंधू आहेस'' मल्लंभटजीची करुणेने केलेली प्रार्थना ऐकून, विनवणी ऐकून स्वामी घराच्या मागील दारी गेले. तेथील सिताफळाच्या झाडाची पाने तोडून आणली व मल्लंभटजीला ती पाने देवून म्हणाले, ''सिताफळीचा घेऊन पाला, पाल्याचा रस काढ. तो रस पत्नीला पाज. रस अमृतासारखा गोड आहे. त्या रसाने जलोदर निस्तेज / नाहीसा होईल. तिला गुण येईल.'' स्वामींचे / बंधूचे बोल ऐकून नि:शंक होऊन मल्लंभटजीने परसदाराच्या सिताफळाच्या पाल्याचा रस काढून आपल्या पत्नीला पाजला. आपल्या भार्येला / पत्नीला सिताफळीच्या पाल्याचे रसपान केल्याने त्यांच्या पत्नीचा जलोदर रोग निचरुन बाहेर आला. समस्त वेदनांही गेल्या. रोगाचा सत्वर निचरा झाला. बाईला सत्वर आराम वाटला.

पुन्हा नृसिंहवाडीला जावून स्नान करुन श्रीदत्ताचे दर्शन करुन कोल्हापूरला सेवकासह भजन नामस्मरण करत स्वामी परत निघाले. परत येतांना शिरोळ ग्रामात थांबले. मिरजेच्या कृष्णाघाटावर भास्कर नांवाचा ब्राम्हण अनुष्ठान करीत होता. त्याचे मनोगत जाणून त्याला भेट देऊन, त्याला चार शब्द सांगून कोल्हापूरला परत जावे म्हणून शिरोळ ग्रामातून / गांवातून सेवक मंडळीतून स्वामी गुप्त होऊन परत कृष्णाघाटावर मिरजेला आले. क्षणात स्वामी / गुरु गुप्त झालेले पाहून सोबतचे सेवक सर्व भक्त भयभयीत झाले. ताराबाईचा स्वभाव ते जाणत होते. गुरुविना परतता अनर्थ होईल. ताराबाई देईल प्राण म्हणून श्री गुरुंचे पुन:दर्शन होईपर्यंत ते परत येईपर्यंत शिरोळातच निश्चय करुन थांबले, भजन करीत नामस्मरण करीत त्याच ठिकाणी बसले. इकडे भक्तजनातून / सेवक जनातून श्रीगुरु / स्वामी गुप्त होऊन कृष्णाघाटावर अनुष्ठान करणाऱ्या भास्कर नावांच्या ब्राम्हणाच्या अनुष्ठानाच्या ठिकाणी आले. त्याच्या आदल्या दिवशीच एक तरुण संन्याशी भास्कराच्या स्वप्नात आला व म्हणाला ''करविराहून आलो आहे उद्या येवून भेट देईन'' पुढे रात्र संपली. भास्कर नित्यकर्मात / अनुष्ठानात मग्न झाला. तेथे कृष्णा घाटावर कोणी एक ब्राम्हण सुग्रास, ब्राम्हण भोजन घालीत होता. त्या ब्राम्हण भोजनाच्या ठिकाणी सोळा वर्षे वयाचा, मुखाने नारायण, नारायण म्हणणारा, काषाय वस्त्र धारण केलेला, दंडकमंडलू

घेतलेला तरुण यती भास्कराने तेथे पाहिला. पंक्तीतील कांही ब्राम्हण त्या यतीला पाहून त्याला हाकलून द्या म्हणू लागले. हाताला धरुन बाहेर काढा म्हणू लागले, त्याला भोजन देऊ नका म्हणू लागले. पंक्तीतील त्या ब्राम्हणांचा मंदाध पाहून यती त्यांना म्हणाला ''साधु साधु म्हणवून घेता. एवढा क्रोध कशाला करता? अन्नाची माझी सक्ती कुणावर नाही. पण कोप बरा नव्हे'' तेथे अनुष्ठनाला बसलेल्या भास्कराने हा प्रकार पाहिला. खुणेनेच भिक्षेविना परत निघालेल्या यतीला खुणेनेच थांबविले. अनुष्ठान संपवून भास्कराने यतीजवळ येऊन त्यांचे चरण नमिले व समाराधना कर्ता यजमानाकडे जाऊन त्याला विनविले. ''यतीस तुम्ही भोजन द्यावे, भोजनाचा खर्च मी देईन'' भास्कराच्या विनवीने यजमान लज्जीत, खजिल झाला व यतीला म्हणाला ''यतीवरा अन्याय घडला. प्रमाद पोटी घालावा. सुखाने भोजन घ्यावे. श्रीदत्ता दयाळा प्रसाद घ्या. राग सोडा'' यजमानाची विनंती ऐकून यतीवर त्या यजमानाला हसून म्हणाला ''आम्हांला कसला राग / दोष तो सोडूनच मग संन्यास वेष घेतला. सर्व विषयांचा त्याग / न्यास करुनच मग संन्यास घेतला. आम्हांला राग / दोषाचा विधीनिषेध नाही'' मग येथेच्छ भोजन होताच भास्कर व यतीवर्य एकांती बोलत बसले.

भास्कराची उत्सुकता वाढली. भास्कराने यतीवर्याना विचारले ''अल्पवयी ऐसी विरक्तता, तरुण वयात संन्यास ग्रहण कां केले?'' यावर तो तरुण यती भास्कराला म्हणाला. ''केंव्हा काळ घालील घाला याचा काय भरवसा? सत्कार्याला उशिर करणे योग्य नाही. शुभ कार्याला वेळ लावणे योग्य नाही. ईश्वर चिंतनात आयुष्य घालवावे. काया ही क्षणभंगूर आहे म्हणून संन्यास दीक्षा घेतली. मृत्यू जवळ येताच / मृत्यूची चाहूल लागताच फक्त आई-बाप अक्रोश करतील. द्रव्य जरी खूप असले तरी अंती सद्गुरु नाम बरोबर येणार'' भास्कर हा उपदेश ऐकून यतीला म्हणाला, ''तुझ्यासारखी संन्यास दीक्षा घेणे आमच्या सारख्या जीवाला अशक्य आहे. तुझी संगत घडली तर माझे अज्ञान दूर होईल'' असे म्हणून यतीला मार्ग दाखविण्यासाठी भास्कराने विनंती केली. यावर यतीवर भास्कराला म्हणाला, ''तू कोल्हापूरला ताराबाईच्या सदनी / घरी, वैराग्य मठीत येताच तुझी इच्छा पूर्ण होईल. परंतु या यती रुपाची इच्छा धरु नको. तुला सुपंथ दाखवू'' म्हणून यती गुप्त झाले. अशा प्रकारचा उपदेश भास्कराला करुन पुन्हा स्वामी शिरोळात भजन, नामस्मरण करीत बसलेल्या भक्तजनात / सेवकजनात प्रकट झाले व म्हणू लागले ''आत्ताच चला त्वरीत करवीरला, उपवाशी, ताराई वाट बघत बसली असेल'' अशा प्रकारे स्वामी आनंदाने कोल्हापूरला परत आले. पुढे भास्कर वैराग्यमठीत आला. त्याला ज्ञानप्राप्ती झाली. यतीरुप धारण करुन स्वामींनी गुरुपदेश केल्याने त्याला आनंद झाला. सद्गुरु भेटीने तो आनंदला.

*****


# जीवन्मुक्तगीता

त्वमेव आत्मा गुरुस्वरुप । चिदाकाश निर्लेप ।
गतागतभावाचा लोप। तया नांव जीवनमुक्त ।।
ज्ञानी पाहती जें अंतर्ध्यानें । तेचिं ज्ञानियांचे सोहंमन ।
चिदाकाशीं होई लीन । तया नांव जीवनमुक्त ।।
ज्ञानी पाहती जें ऊर्ध्वध्यानें । तेंचिं ज्ञानियांचे विज्ञानमन ।
तेंचि शून्य लय–विलय जाणे । तया नांव जीवनमुक्त ।।
जयाचें मन अभ्यासीं रमतें । तैसेंचि ध्यानी लय पावतें ।
जया बंध– मोक्षाचे द्वंद नसतें । तया नांव जीवनमुक्त ।।
जो आत्मस्वरुपी रमतो । प्रकृतिगुण वर्जितो ।
ब्रम्हरस आस्वदितो । तया नांव जीवन्मुक्त ।।
जो अंतरी ध्यानें प्रकाश पाही । ऐंसे जायाचे मन व्यक्त होई।
जो ‘सोऽहं हंस प्रतीतिडोही । तया नांव जीवन्मुक्त ।।
आत्मा शिवशक्तिसहित । पिंड–ब्रम्हांड मोह हृदिस्थ ।
या सर्वां चित्स्वरुप जाणत । तया नाव जीवन्मुक्त ।।
जयाचें ध्यानैकपर सोहंमन । अवस्थात्रय उल्लंघून ।
तुरीयावस्थीं रममाण । तया नांव जीवन्मुक्त ।।
सूत्री जैसे मणिगण । तैसें चिदाकाशीं सोहंज्ञान ।
ब्रम्ह निराकार निर्गुण । तया नांव जीवनमुक्त ।।
मनचि भेदाभेदकारण । म्हणूनि संकल्प विकल्प विसर्जून ।
जो मना करी उन्मन । तया नांव जीवनमुक्त ।।
जधीं दृढ होय मन । तधीं मोक्ष आयिता जाण ।
हांचि सिध्दसिध्दान्त मानी प्राज्ञ । तया नांव जीवनमुक्त ।।
मनसा श्रेष्ठ असे योगी माया संभूत सर्व त्यागी ।।
जडवत् आचरे विगतरागी । तया नांव जीवनमुक्त ।।
ऐसीं जीवन्मुक्तलक्षणें । विवरिलीं श्रीदत्तात्रेयप्रभूनें ।
तीं संकलितार्थे शारदानंदनें । महाराष्ट्रभाषेंत गुंफिलीं ।।

संदर्भ ग्रंथाचे नाव : **दत्त संप्रदायाचा इतिहास**
लेखकाचे नाव : **रा. चिं. ढेरे**

# // समुद्र भरला आहे //

## ।। अध्याय २० वा ।।



श्री आण्णाबुवा महाराज, कृष्णाघाट मिरज

## ▪ विषयसूची....!

१) मिरजेचे थोर सत्पुरुष श्री आण्णाबुवा महाराज
२) स्व. रामभाऊ फारीक/ पुजारी/ मुरगुडकर एकच व्यक्ती आहे
३) स्वामीसेवक स्व. म्हादबा पटकार
४) स्वामीसेवक स्व. वासुदेव दळवी

# अध्याय २० वा

मिरजेला कृष्णा घाटावर राहणाऱ्या आपल्या लहान बंधूच्या पत्नीचा जलोदर बरा करुन, भोजन करुन आपल्या भक्तमंडळीसह श्रीस्वामी कृष्णाघाटावरील आण्णाबुवांच्या समाधी दर्शनाला आले. मिरजग्रामी दत्तावतार आण्णामहाराज दिगंबर अशी त्यांची ख्याती होती. कृष्णातीरी आण्णाबुवांची समाधी सुंदर आहे. स्वामी भक्तांना म्हणाले ''आण्णाबुवांच्या दर्शनाची संधी चालून आली आहे दर्शन घ्या.'' आण्णाबुवांच्या सत्वर समाधी जवळ येताच गाभाऱ्यातून / समाधीतून स्पष्ट आवाज सर्व भक्तांनी ऐकला ''येथील कार्य कृष्णा संपले काय? कार्यभाग संपला का? करवीरला परत निघालास काय? तुझे चिन्मय रुप बघून अक्कलकोट स्वामींची आठवण झाली'' स्वामींनी आण्णाबुवांचे समाधीतून आलेले बोल ऐकून समाधीला वंदन करुन म्हणाले ''व्यर्थ का आण्णा करशी माझी स्तुती. आम्ही तुम्ही एकच जगती. तुझी चिन्मय मूर्ती पाहून आनंद झाला. तुझी प्रकृती उत्तम आहे काय? नको करुस माझी स्तुती. तुझी लिला काय कमी आहे.?'' असे म्हणून स्वामींनी आण्णाबुवांचा निरोप घेतला. समाधीतून आण्णाबुवा स्वामीशी बोललेले पाहून सर्व भक्तजनाना इतर सर्व लोकांना अतिशय आश्चर्य वाटले.

तारा घरी स्वामी वसती / त्रिकालपूजा, धूपारती होती. त्रिकालपूजेला / धूपारतीला अनेक भक्तजन जमत, नित्य असा आनंद सोहळा चाले. कोणी नवस फेडण्या येई. कोणी कांही इच्छा / मनोकामना धरुन येई. कोणी संकटामुळे नमत. जशी ज्यांची भावना तसे त्याला फळलाभ होई. स्वामी प्रसादाने रोग धुवून जात. कोणाला संतती कोणाला धन प्राप्ती होई. अनेकांची समंधबाधा / भूतबाधा पळून जाई. अपमृत्यू सुध्दा स्वामींनी टाळले. जनांची / लोकांची द्वैतबुध्दी / नास्तिकबुध्दी नाहीशी करुन ते परमात्मा आहेत असे पटवून देत. भक्ती मार्ग सकळांना दावित.

वैराग्यमठीत एकदा कोणी एक ब्राम्हण रामायण वाचू लागला. बरेच श्रोतेजन जमून सद्भावाने रामायण ऐकू लागले. ज्ञानी श्रोतेही मन लावून रामायण ऐकू लागले. रामभाऊ मुरगुडकरही मन लावून नित्य रामायण ऐकत असे. रामायण वाचनाच्या वेळी एके दिवशी एक मोठा वानर पुराणिका समोर बघून मुरगुडकर भयभीत झाला. हा समाचार गुरुंना / स्वामींना सांगण्यास निघाला. त्रिभुवनातील ज्या ज्ञात अशा गोष्टी स्वामींना मुरगुडकराच्या सांगण्यानेच का वानर आल्याचे थोडेच कळणार आहे?. स्वामींकडे जाऊन मुरगुडकर नमन करुन उभे राहिले तोच स्वामी फारिकाला म्हणाले ''रामायण ऐकण्या हनुमंत आला. मुरगुडकरा तो दिसला. परंतु इतरांचे नशिब खोटे'' ते ऐकून मुरगुडकर विस्मित झाला व स्वामींना म्हणाला ''माझे दैव आडवे आले हनुमानाला मी नमिले नाही. तुमच्या कृपेने मात्र हनुमानाचे दर्शन झाले'' यावर स्वामी मुरगुडकराला म्हणाले, ''पूर्व पुण्य तुझे बळकट होते. म्हणून त्या वानराचे / हनुमानाचे तुला दर्शन झाले तू भयग्रस्त कां झालास?. ते सामान्य वानर नसून श्रीरामभक्त

वायुनदंन हनुमानाचे तुला दर्शन झाले.''

रामभाऊ फारीक नावाचा एक सारस्वत ब्राम्हण करवीरात राहत होता. ब्राम्हण असून उदर पूर्तीसाठी व्यापारधंदा करीत होता. तसेच वेदांत ग्रंथ वाचीत होता. यथाशक्ती अन्नदान करीत होता. यातून सतत दत्त सेवा / नामस्मरण करीत होता. देव भक्तांचे लीला ग्रंथ, वेदांत वाचन, भजन पूजन नित्य करीत असे. एके दिवशी त्याच्या घरातून सुवर्ण अलंकार कोणी चोरुन नेला. बरेच दिवस तो सुवर्ण अलंकार शोधण्याचा त्याने बराच प्रयत्न केला. सुवर्णअलंकार चोरीला गेलेला परत मिळाला नाही. फारीकाचे सर्व प्रयत्न वृथा गेले. करवीरातील ज्योतिषी, देव देवक यानाही त्याविषयी विचारुन पाहिले परंतु सुवर्ण अलंकार परत मिळवून देण्यात सर्वच असफल झाले. त्यामुळे फारीक फार दु:खी झाला. शेजारच्या कोणीतरी मनुष्यांने श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची कीर्ती फारीकाच्या कानावर घातली व त्याला म्हणाला ''श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्याकडे जावा म्हणजे तुमची चोरीला गेलेली वस्तु / सुवर्ण अलंकार सापडेल.'' रामभाऊ फारीकाने विचार केला. प्रयत्न करता राहू नये कृपा करता सद्गुरु चोरीला गेलेला सुवर्ण अलंकार देतील. श्रीगुरुंचे कळता महिमान सांगावे तयाना वर्तमान. सुवर्ण अलंकार मिळेल याचा त्यांना लोभ दाटला. फारीक श्रीकृष्ण सरस्वतींचा शोध करीत ताराबाईच्या घरी आला.

त्याला पाहताच श्रीकृष्ण सरस्वती / श्रीकृष्णगुरु म्हणाले ''अशाश्वताचा लोभ धरला / सुवर्णअलंकाराचा परत मिळण्याचा लोभ धरला त्यामुळे मनी शोक दाटला. सुवर्णाचा लोभ तुजला पूर्वपुण्याई येई कामाला. सुवर्णअलंकार घरीच आहे. सुवर्ण अलंकार परत मिळेल. इच्छा सफल होईल. अलंकार घरीच आहे.'' यापूर्वी श्रीकृष्ण गुरुंचे कधी दर्शन नाही कधी ताराबाईच्या घरी येणे जाणे नाही, न विचारता श्रीकृष्ण गुरु मनुष्य वाटले तरी त्यांची अघटित सत्ता फारीकाने जाणली. पूर्वपुण्याईने श्रीकृष्ण गुरुंची भेट झाली. आता केवळ हे दत्त म्हणून त्यांची पूजाअर्चा नित्य करावी असे त्यांना वाटले. दैवी असेल तर चोरीला गेलेला सुवर्ण अलंकार प्राप्त होईल. आमचा आम्हांस श्रीकृष्ण गुरु परत देतील. अथवा न देतील परंतु आपल्या कुळाचा उध्दार मात्र नक्की होईल असे फरीकाला वाटू लागले. सुवर्ण अलंकाराचे झाले कारण परंतु दुर्लभ गुरु लाभला असे फारीकाला वाटू लागले. रामभाऊ फारीकाला श्रीकृष्ण गुरुंची भक्ती जडली. तिन्ही त्रिकाळ श्रीकृष्ण गुरु जवळ जावून मनोभावाने आरती करु लागला / पूजा करु लागला. कांही दिवस गेल्यावर रामभाऊ फारीकाला गुरुने सांगितले / म्हणाले ''आज मध्यरात्रीला जागा रहा भयभीत होवू नकोस. भीती सर्वथा सोड. आज थोडी प्रचिती पाहा'' रामजीने गुरुआज्ञा मानली. श्रीकृष्ण गुरु शेजघरात झोपी गेल्यावर रामभाऊ घरी परत आला. घराचे कवाड पुढे करुन जागरुकपणे नामस्मरण करत बसून राहिला. येवढ्यात कवाडाच्या / दाराच्या फटीतून सुवर्ण अलंकार / सोन्याची बांगडी त्याच्या जवळ येवून पडली. त्याने

कवाड उघडून सुवर्ण अलंकार / सोन्याची बांगडी आत कोणी टाकली पाहण्याचा प्रयत्न केला परंतु अंधारात कोणी दिसले नाही. त्याच्या मनात सुवर्ण अलंकार / सोन्याचे कंकण बघून तो आश्चर्यचकित झाला. तो मनात म्हणू लागला. हा सुवर्ण अलंकार / कंकण कोणी नेले? इतके दिवस कोठे गेले? आज कोणी परत दिले? या सर्वापुढे त्याचा विचार चालेना त्याला समजणे कठीण गेले. श्रीकृष्ण गुरुंची अतर्क्यलीला बघून तो पुन्हा चकित झाला. चोरीला गेलेला सुवर्ण अलंकार / कंकण श्रीकृष्ण गुरुने परत मिळवून दिले तर तो त्रिताप भंग कां करणार नाही? नष्ट करणार नाही? येथून पुढे श्रीकृष्ण गुरुंचा संग करण्याचा, सेवा करण्याचा त्याने विचार केला. सर्व रात्र त्याने गुरुंच्या चिंतनात घालवून प्रात:काळी श्रीकृष्ण गुरुंजवळ धावून आला. अनन्य भावे त्यांच्या चरणी लोळू लागला. गहिवरुन रडू लागला व म्हणू लागला ''माझ्या मोहाची जळूदे वासना, तुम्ही मोक्षदाणी असता समर्थ असता मी सुवर्ण अलंकार / कंकण हा नाशवंत पदार्थ मागितला. आता तुझा विसर क्षणभर न पडो, आता तुझे चरण कधीही सोडणार नाही, तुझ्या चरणाजवळ निरंतर ठेवा हेच निरंतन मागणे. या भवसागरातून तूच माझा तारक होशील, असा मला भरोसा आहे.'' तेंव्हा पासून रामभाऊ फारीक लोभांपासून मुक्त झाला. संसारातून मुक्त झाला अशी त्याच्यावर श्रीकृष्ण गुरुंची कृपा झाली.

एक गृहस्थ श्रीकृष्ण गुरुंच्या दर्शनाला आला. गुरुंनी त्या गृहस्थाला विठ्ठल भजनाचा आदेश दिला. श्रीगुरु दत्ताचा अवतार असतांना विठ्ठल भजन का सांगितले? दत्तापुढे विठ्ठल कसे म्हणावे? असे म्हणून कांही न करता स्तब्ध राहिला. पुढे रात्री तो झोपी गेला असता श्री स्वामी त्याच्या स्वप्नी आले. पंढरपूर पुंडलीकाने निर्माण केले. श्री विठ्ठलाला विठेवर उभे केले. त्या गृहस्थाने स्वप्नात विठेवर उभे असलेल्या विठ्ठलाचे व पंढरपूरचे दर्शन केले. यापूर्वी श्री विठ्ठलाचे असे दर्शन त्या गृहस्थाला झाले नव्हते. त्याच्या मनातील संशय पटल गुरुंने दूर केला. विठ्ठल आणि श्रीकृष्ण गुरु दत्त भिन्न नाहीत हे समजून आले. स्वप्नातून जागे होताच त्या गृहस्थाच्या समोर श्रीगुरु श्रीकृष्ण सरस्वती दिसले व किंचित हसून त्याला बोलले ''दर्शन झाले का विठोबाचे?'' आता त्या गृहस्थाचा श्री विठ्ठल व श्री दत्त भिन्न नाहीत हा संशयच उरला नाही.

करवीर क्षेत्री द्विमुखी मारुतीजवळ म्हादबा पटकार नांवाचा एक सात्त्विक पुरुष राहत होता. हातमागावर वस्त्रे विणण्याचा त्याचा व्यवसाय होता. पत्नीमुलासह त्याच्या घरी तो संतोषाने नांदत होता. द्वीमुखी मारुतीची सेवा / पूजा म्हादबा अत्यंत प्रेमाने करी. द्वीमुखी मारुतीच्या मंदिरात कीर्तन, पुराण अत्यंत श्रध्देने ऐकत असे. दिवसभरातील प्रपंच कर्म सारुन / आवरुन जर वेळ मिळाला तर मारुती मंदिरातील भजनात तो आपले मन रमवी. द्वीमुखी मारुतीवर त्याची अत्यंत भक्ती होती. मंदिरात कोणी कीर्तनकार आला तर तो मनोभावे कीर्तन श्रवण करी. एके दिवशी कीर्तन सुरु असतांना दुर्लभ अशा आत्म साधनाचे निरुपण कीर्तनात अवचितपणे निघाले. दुर्लभ असे आत्मसाधन गुरुविना कधीही घडणार नाही. असा विषय

आला. अनेक तपांचे डोंगर पदरी असल्याशिवाय सत्संगाची आवड असल्याशिवाय साधू संग, वैराग्य असल्याशिवाय गुरु भेटत नाहीत. असा विषय कीर्तनात आला. श्री गुरुंनी शिरी हात ठेवल्यावरच प्रत्यक्ष वैकुंठविहारी त्याचा सेवक होतो असा गुरु महिमा/महती म्हादबाने कीर्तनात ऐकली.

गुरु महती ऐकून त्याच्या चित्ताला गुरु करावे असे वाटले. परंतु सद्‌गुरु कसा मिळेल/कोण माझ्या मनाची गुरु तळमळ जाणेल? मी तर प्रपंचात असा अडकलो आहे असे त्याला घडोघडी वाटे. कांही लोकांनी त्याला करवीरी श्रीकृष्ण सरस्वती गुरु तारासदनी असती हे सांगितले. श्रीकृष्ण गुरुंचा शोध करीत तो निघाला. अवचितपणे त्याने श्रीकृष्ण गुरुंना पाहिले. पाहता क्षणी श्रीकृष्ण गुरु म्हादबाला म्हणाले ''तुझा शुध्द भाव कळाला. माझ्या जवळ रहा'' म्हादबाला गुरुंची असलेली ओढ / तळमळ श्रीकृष्ण गुरुंनी कशी जाणली याचे त्याला आश्चर्य वाटले. याने तो विस्मित झाला. म्हादबा मनात म्हणू लागला. स्वामी देव विभुती आहे. त्यांच्या कृपेने सद्‌गती मिळेल. माझी गुरु तळमळ त्यांनी कशी जाणली? द्वीमुखी हनुमानाच्या भक्तीची गुरुप्राप्ती हे फळ आहे. आता श्रीकृष्ण गुरुंजवळ नित्य वास करण्याचे त्याने ठरविले व त्याने मग दर्शनाचा नियम केला. पुढे सर्व उद्योगधंदा सोडून दिला. तारासदनी येऊ लागला. श्रीकृष्ण गुरु सेवा निष्काम करु लागला. अशा तऱ्हेने म्हादबा पटकार शिष्य झाला.

ताराबाईच्या घराजवळ वासुदेव दळवीचे निवासस्थान / घर होते. करवीर राज दरबारात रोज सेवा करुन आपला प्रपंच चालवित असे. पत्नीमुलांसह तो सुखी जीवन जगत होता. ताराबाईच्या घरी दिवसातून एकवेळ श्रीकृष्ण गुरुंच्या दर्शनाला नित्य जात असे. प्राप्त:काळी स्नान, देवता अर्चन आवरुन भोजन करुन मग तो राजदरबारी कामाला जाई. सायंकाळी घरी परतून आल्यावर श्रीकृष्ण गुरुंच्या / श्रीकृष्ण नाथांच्या दर्शनाला जाई. आत्मानआत्मा विचार चर्चा, गीता - भागवत चर्चा, सद्‌गुरु / सत्पुरुषाची सत्संग यात त्याला गोडी वाटे हीच तो इच्छा धरुन श्रीगुरुजवळ दर्शनाला येई व श्रीगुरुंस नित्य प्रार्थना करी ''आता या संसार यातना नकोत या संसार यातना सहन होईनात / सोसवेनात. या संसार यातनेतून मला सोडवा'' यावर श्रीगुरु त्याला म्हणाले ''हे कांही फुकट घडणार नाही. यासाठी आम्हांस शेंडी द्यावी लागेल. यासाठी मनाचा निश्चय करावा. घरातील सर्वांची संमती घ्यावी.'' श्रीगुरुंचे हे बोल वासुदेव दळवींना समजून आले नाहीत. यानंतर बरेच दिवस गेले. वासुदेवाला विपरीत गती आली. त्याचा क्रोध वाढत गेला. त्याच्या क्रोधाला मर्यादा राहिली नाही. घरात कांही आधिक न्यून दिसताच तो कांतेशी भांडण करी. संसारात एकक्षण सुध्दा सुख नाही म्हणे. सर्व संसार सोडीन म्हणे. पत्नीचे अल्प स्वरुप प्रमादयुक्त दिसताच त्याला अतिशय क्रोध येई. बाल, तरुण, वृध्द कांही म्हणत नसे. सगळ्या बरोबर वाद घाली. ज्या ज्या वेळी वासूदेव दळवी श्रीकृष्ण गुरुंच्या दर्शनाला ताराबाईच्या घरी अनन्यभावे दर्शनाला जाई त्यावेळी श्रीकृष्ण गुरु शेंडी लवकर द्यावी

असे त्याला म्हणीत. मनात आणलेल्या प्रत्येक विचाराला श्रीकृष्ण गुरु उत्तर देत याचा दळव्यास मोठा चमत्कार वाटे. वारंवार हे चमत्कार घडत. राजदरबारी वासूदेव दळवी काम करी. तरी त्याला आराम न वाटे. संसाराला राम राम करावा वाटे. घरी उणीव दिसता पत्नीला ते कजाग-बाई म्हणे. पत्नीशी हातघाई करीत असे. संसार नको म्हणत असे. एकदा घरी पत्नीशी वाद / भांडण करु क्रोधाने मठीत धावून आला व गुरुंना म्हणाला ''क्रोधाने माझा अंत केला आहे.'' यावर श्रीकृष्ण गुरु त्याला म्हणाले ''तुझ्या पत्नीची चूक नाही, तिला शब्दाचा बोल नाही आता शेंडी दे आम्हांला. आता तर शेंडी देशील का आम्हांला?'' श्रीकृष्ण गुरुंच्या म्हणण्याचा अर्थ वासुदेव दळव्याला कळाला. मग पूर्णार्थ कळाला. मग तात्काळ एका न्हाव्याला बोलावून मुंडण करुन मठीतच वासुदेव दळवीने चतुर्थ आश्रम संन्यास घेतला. मुंडण करुन वासुदेव दळवी संन्याशी झाल्याची वार्ता पत्नीला कळाली. वार्ता ऐकून मठीत धावून आली व श्रीकृष्ण गुरुंना वंदन करुन म्हणाली, ''माझा जन्म आता वाया गेला.'' धायमोकलून रडू लागली. पतीला परत घरी चला म्हणू लागली. ''श्रीगुरु समान तुम्हांला आम्ही मानू'' म्हणाली. यावर वासुदेव दळवी म्हणाला ''परत घरी येणे अशक्य आहे. श्रीकृष्ण गुरु एकच आता माझे गुरु. प्रपंचाला मी विन्मुख झालो आहे. तुम्ही आता श्रीकृष्ण गुरुंना शरण जा. उदरभरणाचे उत्कंठा / इच्छा ते पूर्ण करतील. माझी आशा सोडून घरी परत जा.'' यावर वासुदेव दळवीची पत्नी त्यांना म्हणाली, ''या स्थितीला तुमचा क्रोध तुम्हांला नडला. घरात लहान मुले, पत्नी असतांना तुम्ही संन्यास घेतला हे भले केले नाही. येते आता लोभ ठेवा. येथून तरी क्रोध सोडावा. श्रीगुरु सेवा नीट करा. जीवाला दुसरा छंद ठेवू नका. आमची चिंता करुन नका. राग पुरता सोडावा अखंड गुरु एकच सेवावा. जन्मदाता नारायण श्रीगुरु तोच माझे / अपत्य पोषण करेल'' असे सांगून ती घरी निघून गेली.

जो संसाराच्या मृगजळी बुडाला वासुदेव दळवी, तो श्रीकृष्ण गुरुंच्या पदकमळी रमला. श्रीकृष्ण गुरुंनी त्याला एक उपवासाचे व्रत सांगितले. वचना सरशी क्षुधाशांती झाली. गुरु आज्ञेप्रमाणे त्याजिले मग जेवण. फक्त डाळ मात्र खाणे ऐशी तीन वर्षे लोटली. तीन वर्षे खाता डाळ वासुदेवाचे बळ किंचीतही घटले नाही. पुढे एकदा डाळ निवडतांना श्रीकृष्ण गुरु वासुदेवाच्या जवळ आले व म्हणाले, ''भोजने तुझे चित असून आजपर्यंत डाळ भक्षलीस, डाळ खाण्या उतावीळ तू माझा कसला भक्त?'' मग वासुदेवाने डाळ खाण्याला सोडले. पुढे कांही दिवस झाडपाला आणून एक वेळ भक्षण करु लागला. झाडापाला खाता खाता अशीही तीन वर्षे निघून गेली. मग श्रीकृष्ण गुरुंना त्याच्याविषयी कृपा उपजली. गुरु परीक्षेत उतरला गुरुंना किव आली. मग म्हणाले, ''जेव बा जेव बापा'' तेंव्हापासून वासुदेव दळवी नित्य भिक्षेस जाऊ लागला. षड्रस अन्न श्रीगुरु कृपेने मिळू लागले. एकदा संत एकनाथकृत भावार्थ रामायण वाचन करीत असता वासुदेव दळवीचे मन शंकित झाले. श्रीराम जय राम जय जय राम हा त्रयोदशाक्षरी

मंत्र भावार्थ रामायणात कुठे आढळेना. वासुदेवाचे मन संशयीत झाले. त्याचे मनीची कल्पना / शंका ओळखून श्रीकृष्ण गुरु त्यांचेजवळ आले व म्हणाले ''राम मंत्राविना हा ग्रंथ नाही तुला राम मंत्र भावार्थ रामायण ग्रंथात दाखवितो'' श्रीकृष्ण गुरुंने भावार्थ रामायण ग्रंथाची पाने भराभर उलटली त्यातील एक पान वासुदेवाचे हातात दिले. जटायू अंतकाळी तो श्रीराम जय राम जय जय राम जपीत होता. तो मंत्र वाचून वासुदेवाला अतिशय चमत्कार वाटला. अशा रीतीने श्रीकृष्ण गुरुंनी वासुदेवाची शंका निरसून टाकली. केवळ विचार मनात येताच श्रीकृष्ण गुरु ते विचार ओळखत.

*****



श्री दत्त दिगंबर महासाधु आण्णाबुवा महाराज यांची समाधी, कृष्णाघाट, मिरज

# श्री दत्त दिगंबर आण्णाबुवा महाराज–मिरज

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळ्याच्या पायथ्या खालील मंडपाळे गांवच्या विश्वंभरपंत कुलकर्णी यांच्या पोटी श्री आण्णाबुवांचा जन्म झाला. आण्णाबुवांच्या आईचे नांव अनुसया होते. विश्वभंरपंत हे वंशपरंपरागत मंडपाळ्याचे कुलकर्णी असून सदाचारी ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण होते. आण्णाबुवा लहानपणी अत्यंत खेळकर, खोडकर होते. लौकिक विद्येला डावलून शाळा डावलून सदा बाहेर भटकावे, खेळावे, तपोवनी एकान्त भोगावा अशा तऱ्हेने वागत. शाळेत मुळी लक्षच नाही. उठल्या सुटल्या शाळेबाहेरच उनाडत राहून, फिरत राहून त्यांची वृत्ती छंदी फंदी, स्वच्छंदी बनली होती. मुंजीचे वय होताच त्यांच्या आई–वडीलांनी त्यांच्या मुंजीचा विचार केला. मुंजीचा संस्कार होऊन आण्णाबुवांचा चंचल स्वभाव, चंचल बुध्दी दूर होऊन स्थिर बुध्दी येईल असाही त्यांनी विचार केला. परंतु आण्णाबुवा मुंजीलाच तयार होईनात. आई–वडीलांनी त्यांची पुष्कळ समजूत घातली. नातेवाईकांनी प्रयत्न केले. परंतु आण्णाबुवांनी मुंजीला ठाम नकार दिला व सांगितले. ''आपणच साक्षात परब्रह्म आहोत'' आण्णाबुवांनी ती जानवी, लंगोटी, मौंजी, दंड ही मुंजीची सारी उपकरणे, साहित्य फेकून दिले. व्रतबंधाला जमलेले सर्व उपाध्ये, वैदीक मंडळी, आप्तेष्ट यांना हे सर्व न मानवल्यामुळे मंडपा बाहेर पडले. परंतु आई वडिलांनी कशीतरी त्यांची मुंज पार पाडली.

लक्ष एकीकडे तर चालणे दुसरीकडेच, चालतांना स्वत:चीच बोलणे, अकारण मोठ्याने हसणे, अबोलच राहणे, स्वच्छ, अस्वच्छ जागा न बघता कोठेही बसणे, हे त्यांचे लोकबाह्य वागणे बघून गावकरी, घरचे लोक त्यांना वेडाच समजू लागले. रानावनातून हिंडावे, अन्नपाणी वर्ज्य करावे, रात्रंदिवस विचार करु नये यामुळे त्यांचे आई–वडील काळजीत पडले. श्री नृसिंहवाडीला जावून श्री दत्तात्रयाची सेवा करावी, तसे दत्ताला साकडे घालावे म्हणजे आण्णाबुवाचे वेडेपण व वेडाचार कमी होईल असा त्यांनी विचार केला व आण्णाबुवाला घेवून ते श्री नृसिंहवाडीला येवून राहिले. श्रीदत्त दर्शन, सेवा सुरु झाली. श्रीनृसिंहवाडीतील लोकही आण्णाबुवांना वेडाच समजत होते. संगमावर स्नान करणे, श्रींचे पादतीर्थ घेणे, अंगारा लावून घेणे, प्रदक्षणा घालणे हा आण्णाबुवाना जुलूमच वाटे. यासाठी आई–वडीलांना फारच कष्ट पडत. कांही महिन्यानंतरच्या सेवेनंतरही आण्णाबुवाच्या वेडेपणात कांहीही बदल झाला नाही. वेडेचार कमी न होता वाढतच चालले. आपला मुलगा जन्मत: वेडा आहे असे आण्णाबुवांच्या आई–वडीलांना कधीच वाटले नाही. श्री दत्तात्रयांच्या सेवेने तो निवळेल, शांत होईल. त्याचे वेड कमी होईल. वेडेचार कमी होतील अशा विचाराने त्यांनी श्री दत्तात्रेयाची सेवा चालूच ठेवली. कांही महिन्यानंतर श्री भगवान दत्तात्रेयांनी आण्णाबुवांच्या आईवडीलांना स्वप्नात दर्शन देवून दृष्टांत देवून, सांगितले ''तुम्हा उभयतांच्या सेवेने मी प्रसन्न झालो आहे. दत्तात्रयाच्या रुपाने मीच

तुमच्या पोटी अवतार घेतला आहे. आईबापाच्या नात्याने तुम्ही कृतार्थ झाला आहात. या अवतारातील माझे बालपण आता संपले आहे. हा अवतारी दत्त तुम्हासोबत घरी कधीच राहणार नाही. गृहस्थाश्रमी होणार नाही. जगद्उध्दाराचे कार्य करील. नृसिंहवाडीतच त्याला एकट्याला ठेवून तुम्ही गावी जावा. त्याची मी स्वत: काळजी घेईन.'' या दत्तात्रेयाच्या दृष्टांताने उभयतांना आनंदही झाला व आण्णाबुवांला सोडून जाण्याचे दु:खही झाले. एके दिवशी आण्णाबुवाला श्रीनृसिंहवाडीला श्री दत्तात्रेयाच्या सेवेला सोडून मोठ्या जड अंत:करणाने विश्वंभरपंत व अनुसया मातेने श्री नृसिंहवाडीचा निरोप घेवून मंडपाळेला परत फिरले.

पोटाला अन्न मिळो न मिळो, वस्त्र मिळो न मिळो दिवसेंदिवस आण्णाबुवा वैराग्यशाली बनत चालले. वाडीत विवस्त्र हिंडू लागले. अशा विरक्त आण्णाबुवाला कांही खट्याळ वाडीकर दुष्ट, ऐदी, ऐतखाऊ, म्हणू लागली. मारपीटही करु लागली. एकदा तर त्यांनी हिरव्यागार मिरच्या आण्णाबुवांना खावविल्या, खायला बळेच लावल्या. याचा आण्णाबुवांना खूपच त्रास झाला. त्याच रात्री भगवान श्री दत्तात्रेयांनी ज्या ज्या वाडीकरांनी आण्णाबुवाना हिरव्या मिरच्या चारल्या, त्रास दिला त्यांना झोपेतच काठीने बदडून काढले.

पुढे कांही चमत्कार दाखवून श्री आण्णाबुवा मिरजेजवळील म्हैसाळ गांवात आले. संत एकनाथांच्या वंशात जन्मलेल्या केशव मोरेश्वर कुलकर्णी यांच्या घरी आण्णाबुवा चालून गेले. त्यांच्यावर अनुग्रह केला. केशव कुलकर्णी, म्हैसाळ यांनी ''श्रीगुरु कथामृत'' पुस्तकात श्री आण्णाबुवांची महती गायली आहे.

माधवराव पंडित, रामकृष्ण दिवाण, भास्कर पंत जोगळेकर, उत्तुरकर, करजगार व इतर अनेक भक्त मंडळी म्हैसाळला होऊन गेली. म्हैसाळला असतांना आसपासच्या बेडग वगैरे गांवात भक्त मंडळीकडे आण्णाबुवा जात असत.

म्हैसाळहून ते मिरजेला आले ते चमत्कार करुनच. बापू शिंदेच्या विहीरीत आण्णाबुवांनी पोहायला उडी टाकली. परंतु बराच उशिरा ते वर आलेच नाही. गावकरी घाबरुन गेले. गांवातले पटाईत पोहणारे, पाणबुडे यांनी सारी विहीर पोहून काढली आण्णाबुवा जिवंत सापडावेत निदान त्यांचे प्रेत तरी सापडावे. परंतु सर्वांची निराशा झाली.

गावकरी गांवात परतु लागले. मिरजेहून म्हैसाळला येणाऱ्या एका गृहस्थाने गावकऱ्यांना विचारले काय घडले आहे? यावर गावकरी म्हणाले आण्णाबुवा विहीरीत बुडला आहे. यावर तो इसम म्हणला ''आण्णाबुवा स्वारी खुशाल मिरजेत वावरत आहे मी पाहिले आहे. एका तेलीणीच्या दुकानात मजेत बोलत बसले आहेत.'' ते ऐकून म्हैसाळ गावच्या लोकांना आनंदही झाला व विस्मयही वाटला.

आण्णाबुवांचा जन्म जरी ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण कुळात झाला असला तरी, त्यांना कर्मकांड आवडत नसे. सारे विश्व हे आपलेच आहे. ''अहं ब्रम्हास्मि'' असे त्यांना वाटे.

**मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।**
**अलौकिक नोहावे । लोकाप्रती ।।१७१।।**
**तेच सतक्रियाची लावावी । तेचि एकी प्रशंसावी ।**
**नैष्कर्मीही दावावी । आचरोनी ।। १७४ ।।**
**तया लोक संग्रहालागी । वर्तता कर्मसंगी ।**
**तो कर्मबंध अंगी । वाजेल ना ।। १७५ ।।**

**– ज्ञानेश्वरी**

वरील अभंग उक्तीप्रमाणे आण्णबुवांचे जीवन होते. मिरजेत प्रकट झाल्यावरही पोटापुरते मागून खाणे, अखंड फिरत राहणे, सर्व लोकस्तरातून भगवद्भक्ती रुजविणे हे त्यांचे जीवन होते. शनिवार पेठेतील गंगाबाई तेलीणीच्या झोपडीवजा घरात ते रहात. गंगाबाई तेलीणीची आण्णाबुवांवर अत्यंत श्रध्दा होती. त्यांना ती आपले गुरु मानत असे. तिच्या घरी रेड्या वर बसून आण्णाबुवा तेलाचा घाणा हाकत. त्यांची वृत्ती लहान मुलांप्रमाणे होती. खोडकर होती. त्यांना गाणे बजावण्याचा नाद होता. टाळ मृदंगाच्या साथीने चाललेले भगवद् भजन त्यांना फार आवडे. संगीत / गायन हा तर त्यांचा जीवप्राण. वृत्तीशून्य होऊन, बेहोष होऊन ते भजनात, गायनात, यल्लमाच्या जगापुढे नाचत. गंगाबाई तेलीणीच्या घराच्या आसपास सतारी बनविणाऱ्या कसबी सतारमेकरांची दुकाने, कलावंताची घरे, करजगार लोकांची घरे, शिकलगारांची घरे होती.

आजही या भागाला सतारमेकर गल्ली म्हणतात. गाणे बजावणेत नामांकीत असे अनेक सतारीये, गायक, वादक मिरज ही संगीताची पंढरी असल्याने येत. या मोठ्या नामवंत लोकांची आण्णाबुवांना आयतीच संगत लाभे. त्यांची बैठक या गायक / वादक लोकांच्यात असे. त्याकाळी साहेबजान नांवाची गाणारी प्रसिध्द नायकीण होती. आण्णाबुवा तिचे गायन अत्यंत आवडीने ऐकत. प्रसंगी बेहोश होऊन लहान मुलांप्रमाणे नाचत. बाळा सानी म्हणून एक प्रसिध्द नायकीण होती. तिच्या ओसरीवर अंथरलेल्या गाद्या-गिरद्यावर बसून तनमन विसरुन तिचे गायन ऐकत, आण्णाबुवांना लहानपणा पासूनच गाणं ऐकण्याचा / बजावण्याचा नाद असल्याने मिरजेत त्यांची रोजची उठबस सतारमेकरांच्या / तंतुवाद्यकारांच्या घरात वाढत गेली. ती उठबस इतकी वाढली की, आण्णाबुवा त्यांच्या घरातल्या, नात्यातला वाटू लागला. आपला वाटू लागला. त्यामुळे ते आण्णाबुवाला हाताखाली राबणारा पोरगाच वाटू लागला. सतारीची भोके पाडणाऱ्या सामत्याच्या वादया ओढ, सुऱ्या, कातऱ्यांना धार लावताना दोऱ्या ओढ, सतारीसाठी करवतीने लाकडे काप, घणाचे घणावर घाव घाल अशी बारीकसारीक कामे ते करुन घेत तर आण्णाबुवा अत्यंत खुषीने ही कामे करीत. अशा या आपुलकीमुळे आण्णाबुवा सतारमेकरांच्या पंगतीलाच घरच्या सारखे बसून जेवीत. गंगाबाई तेलीणीचा घाणा हाकत. तर

शिकलगारांच्या कामात मदत करीत. गांवभर मोकळ्या मनाने फिरत.

गांवोगांव कधी कधी सांगली / इचलकरंजी / नृसिंहवाडी / कुरुंदवाड या गांवीही जात. ते वृत्तीने जगन्मित्र होते. संत होते, अवतारी होते. परंतु जगाला ते वेडेच वाटत. अशा मिरजेत सुध्दा त्यावेळी त्यांना देव मानणारा / श्रध्दा ठेवणारा जनभाव होता. त्यात प्रामुख्याने गणेश पांडुरंग वाटवे, यशवंतराव पटवर्धन, केशवदास, गद्रे, सितारामदास, गजानन हरिबा गुरव, गुंडभट जोशी, मेलीकट्टीआण्णा, अहमदसाहेब सतारमेकर, रामचंद्र वाटवे, राघू दिक्षीत. गंगूनाना दामले, भाऊराव सोवनी, वासुदेवराव टाकळीकर, वे.शा.सं. बंडभट केळकर, वे.शा.सं. केशवभट पाटणकर, वामनराव वाटवे. शिवरामबापू गोरे, टोणपी मास्तर इत्यादी मिरजेतील सर्व लोक आण्णाबुवांना त्यांच्या अलौकिक जीवनाने दिपून जाऊन श्रीदत्त अवतार मानू लागले. त्यांचा वावर सर्व स्तरातील घरातून अनिर्बंध प्रेमपूर्वक होता. ते लीलावतारी संत होते.

संताचा अवतार जगाच्या कल्याणासाठी असतो. जग हे त्यांचे कार्यक्षेत्र असते. मंडपाळ्याला जरी आण्णाबुवा जन्मले तरी त्यांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मिरज / म्हैसाळ दिसून येते. अशा या महासाधू आण्णाबुवांनी आपला देह मिरजेत आषाढ शुध्द ४ शके १७९४ (दि. ९/६/१८७२) मंगळवार रोजी शनिवार पेठेतील गंगाबाई तेलीणीच्या घरी देह ठेवला. निर्वाण झालेली गंगाबाई तेलीणीची जागा कै. बाळाराम पुरुषोत्तम शेठजी यांनी विकत घेवून आसपासच्या तेली, शिकलगार, सतारमेकर, कलावंत यांना पर्यायी जागा, घरे बांधून देवून मिरजेचे संस्थानिक श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांच्या सहाय्याने आण्णाबुवांच्या पादुका स्थापन करुन त्यांचे टोलेजंग सुंदर मंदिर बांधले. या मंदिराची सर्व व्यवस्था आण्णाबुवांची पुण्यातिथी, पुण्यतिथीतील सात दिवसातील भजन / कीर्तन / प्रवचन व्यवस्था व शेवटच्या दिवशी (आषाढ शुध्द चतुर्थी) होणारा महाप्रसादाची व्यवस्था आता श्री विजयभाई शहा व त्यांचे लहान बंधू सुभाषभाई, जवाहरभाई, दिलीपभाई शहा व त्यांचा परिवार अत्यंत आनंदाने करीत असतो. रोज या मंदिरात सकाळ पासून रात्रीच्या आरती पर्यंत भक्तांची वर्दळ असते. पूजेची व्यवस्था आता रघू गुरुजींच्या नंतर अनंत गुरुजी पाहतात.


मिरजेतील या आण्णाबुवांच्या मंदिरात दर पौर्णिमेला – पौर्णिमा ते पंचमी पर्यंत सायंकाळी श्री दत्त अवतार श्री म्हादबा पाटील महाराज येवून सर्व भक्तांना दर्शन देत. त्यांनी वटसावित्री पौर्णिमा, रविवार दि. ६/६/१९८२ ला समाधी घेतली. त्यांची समाधी नृसिंहवाडी येथे आहे.

महासाधू आण्णाबुवांची समाधी मिरजेतील कृष्णा घाटावर आहे. हे समाधी मंदिर छोटे होते. अलिकडेच मिरजेतील श्री बाळासाहेब नरगुंदे सराफ यांनी या जुन्या समाधी मंदिराचा जिर्णोध्दार करुन दुमजली मंदिर उभा केले आहे. पूर्वी कै. धोंडिराम आंबी समाधीची पूजा अर्चा करीत. आता त्यांचे चिरंजीव श्री दत्तात्रय आंबी हे आण्णाबुवा समाधी मंदिराची पूजा अर्चा / व्यवस्था पाहतात. या कृष्णाघाट पवित्र भूमित महासाधू, आण्णाबुवा, रघुनाथ

निरंजन, राऊळबुवा, रामदासीबुवा, कृष्णाबुवा इत्यादी संताच्या समाध्या आहेत. श्रावण महिन्यातील शेवटच्या गुरुवारी श्री. आण्णाबुवाचा भंडारा (महाप्रसाद) मोठ्या प्रमाणात घातला जातो.

संदर्भ ग्रंथ :- **श्री दत्त दिगंबर आण्णाबुवा महाराज**

लेखक :- **वि. गो. साठ्ये, मिरज**



।। श्री गुरु परंपरा ।।

# सद्गुरुंचे थोर सुपूत्र – श्री म्हादबा कोष्टी

महाराजांच्या पहिल्या शिषोत्तम पंचकातील श्री लाड, दळवी, मुरगुडकर, रामदास यांच्यानंतर श्री म्हादबा कोष्टी हे पाचवे भक्त होते. श्री महादेव पटकार हे त्यांचे नांव असून, म्हादबाच नावाने ते सर्वश्रुत होते. वस्त्र विणणे हा त्यांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय होता. त्यांचे रहाते घर कोल्हापूर मध्येच जुना बुधवार पेठेत होते. द्विमुखी हनुमान मंदिर सन्निध होते. बालपणा पासूनच त्यांची बलभीम मारुतीरायावर अपरंपार श्रध्दा होती. जवळच असणाऱ्या हनुमान मंदिरात ते सेवाभाग उरकत असत.

ह्या हनुमान मंदिरात नेहमी पुराण वाचन चालत असे. म्हादबा संसारी असून धार्मिक प्रवृत्तीचे होते. भजन, कीर्तन, पुराण श्रवणाचा त्यांना विशेष छंद होता. म्हादबा पुराण श्रवण करत असता, एकदा निरुपण निघाले. ती थोरवी होती श्री गुरुंची! सद्गुरुंचा महिमा, त्यांचे आपल्या जीवनात असलेली उपयुक्तता सांगण्यात आली. पुर्व पुण्य पदरी असेल तरच साधुसंताचा सहवास मनुष्य प्राण्याला मिळतो. तो सहवास मिळाला की, मनुष्याला वैराग्य प्राप्त होते. वैराग्य प्राप्त झाले की, गुरुंच्या कृपेला तो मनुष्य प्राप्त होतो. दुर्लभ असणारे अध्यात्म साधन गुरुंच्या शिवाय मिळूच शकत नाही. एकदा सद्गुरुंनी त्या साधकाचा हात धरला की, वैकुंठीचा नाथ सुध्दा त्याचा सेवक होतो !

सद्गुरुंचा असा महिमा ऐकल्यावर म्हादबांना गुरुंचा ध्यास लागला. ऐन तारुण्य व प्रपंचाच्या उंबरठ्यावर असतानाच ते सावध झाले. तरी पण गेलेले आयुष्य श्री गुरुंच्या सेवा कृपेशिवाय व्यर्थ दवडले ह्याची त्यांना खंत वाटू लागली. आता इथून पुढे तरी आपण आपले आयुष्य सदगुरुंच्या सेवा सानिध्यात घालवू या. असा त्यांनी दृढनिश्चय केला. पण असा सद्गुरु आपल्याला मिळणार तरी कोठे? हा ध्यास, ही चिंता बळावतच चालली. शेवटी एका महाभागाने त्यांना सांगितले. ''कुंभार गल्लीत तारामती सदनात एक दिव्य विभुती आहे. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज या नावाने साक्षात दत्तगुरुंनीच तो अवतार धारण केलेला आहे. गुरु पाहिजे! गुरु पाहिजे! म्हणतोस ना! जा आणि त्यांनाच गुरु करुन घे! तुझ्या मनाची तळमळ शांत होईल'' हा सल्ला म्हादबांना पटला. त्यांनी त्वरीत तारामती सदनी धाव घेतली. मार्गामध्येच त्यांना समोर येऊन महाराजांनी म्हादबांना दर्शन दिले ''काय पटकार बाबा? माझ्याजवळ रहाणार आहेस होय तू! रहा माझ्याजवळ!'' महाराजांच्या मायेच्या प्रेमळ उद्गारांनी म्हादबांचे हृदय भरुन आले. त्यांनी त्याच प्रेमभरात महाराजांच्या चरणाला दृढ मिठी मारली. आपले मनोगत महाराजांनी जाणले, खरोखरच महाराज हे थोर अंतरसाक्षी देव विभुती आहेत अशी त्यांची खात्री झाली. अपरंपार श्रध्दा महाराजांच्या चरणांवर जडली. त्यांच्या सेवाकार्यात त्यांनी स्वत:चे जीवन वाहण्याचा दृढ संकल्प केला व तो पुढे पूर्णत्वास पण नेला.

महाराजांनी हनुमंतरुपात कांही भक्तांना दर्शन दिले होते. निमिषार्धात महापुच्छपण दाखविले

होते. म्हादबांनीपण पाहिलेले होते. बालपणापासून जोपासलेली अंजनिय भक्ती सफल झाल्याबद्दल म्हादबांना धन्यता वाटत होती. हनुमंताचा अंश तेच आपले श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज! आपल्या सानिध्यात महाराजांनी स्वत:ला ठेवले ह्या समाधानात त्यांची भक्तीसेवा चालू होती.

द्विमुखी मारुती मंदिरात रामायणाचा कथाभाग ऐकला की, सीतामाईच्या शोधासाठी हनुमंताने विशाल रुप धारण करुन महासागर पार केला आणि रावणाच्या लंकेत प्रवेश केला. हनुमंताचे ते रुप खरोखर अणू पासून ब्रम्हांडा एवढे असे विराट होते की, त्या हनुमंताची सावली संपूर्ण महासागरावर पडली होती. आवड धरुन लक्षपूर्वक ऐकणाऱ्या ह्या म्हादबांच्या मनात पुराणिक बुवांचे ते शब्द सारखे कानात घुमू लागले. ते सारखा विचार करु लागले की, हनुमंतानी किती विशाल रुप धारण केले असेल बरं! दिवसभरातील सर्व काल त्यांचा ह्याच विचारात गेला. जेवून रात्री विछान्यावर पडले तरी तोच विचार मनात होता. महासागरावर सावली पडावी म्हणजे मारुतीरायांनी किती विशाल रुप धरले असेल!

रात्र झोपेत संपून गेली पण दुसऱ्या दिवशीच पहिल्या प्रभात समयी म्हादबांना स्वप्न दृष्टांत झाला. ध्यास लागलेल्या म्हादबांना हनुमंतरायांनी दर्शन दिले. साक्षात भगवंताच्या दर्शनासाठी ऋषिमुनी तपश्चर्या करत. कैक तपस्व्यांची तपश्चर्या मार्गातच भ्रष्ट झाली, साक्षात नव्हेच पण स्वप्नात देखील भगवंताचे दर्शन दुरापास्त आहे. त्याला पण भक्ती तपश्चर्येचे बळ असावे लागते. ते बळ निश्चितच म्हादबांच्या ठायी होते. त्यांच्या प्रेमळ भक्तीचा लळा म्हणजेच स्वप्न दृष्टांती मारुतीरायांनी दर्शन दिले.

चारी क्षितीजांनी प्रशांत महासागर वेढला होता! कांही क्षणातच त्या सागरावर झाकण घालावे तसे किंवा विशाल नभाला छत घालावे तसे, विशाल छातीचा, बलदंड भीमरुप मारुती! उजव्या हाताने खांद्यावर मागे ठेवलेली गदा, असा महाकाय हनुमंत म्हादबांच्या कडे स्मितपणे गगनात संचार करीत पाहू लागले.

स्वत:च्या आराध्य देवतेने कांही क्षणापुरते जरी म्हादबांना दर्शन दिले तरी त्यांनी हात जोडून नमस्कार करण्याचे भान राहिले नाही, उलट म्हादबांची भीतीने गाळण उडाली! भीतीने त्यांचा एवढा थरकाप उडाला की, साक्षात हनुमंतरायाच्या विशाल देहरुपाविषयी कोणतीही शंका उरली नसतांना त्यांना मात्र स्वत:च्या स्वप्नातील लघुशंकेचा महापूर जागृत अवस्थेत येवूनही रोखता आला नाही. हनुमंत दर्शनाने त्यांच्या मनाची तळमळ शांत झाली होती. मी महाराजांच्या जवळ व महाराज माझ्या जवळ हे त्यांच्या भक्ती जीवनाचे सूत्र आता झाले होते.

दीपावलीच्या दिवशी नृसिंह सरस्वती महाराजांनी आठ वेगवेगळ्या स्थानांच्या, वेगवेगळ्या भक्तांच्या घरी एकाच वेळी भिक्षा मागितली होती. त्याच सद्गुरुंनी ह्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज रुपात कोल्हापुरातील वैराग्य मठ हे कायमचे स्थान सोडता नृसिंह वाडीला एक महिनाभर प्रत्यक्ष प्रगट होऊन अनेकांच्या भूत समंध बाधा नाशिल्या होत्या. तेंव्हा तेथे एकटे महाराजच

नव्हते तर त्यांच्या बरोबर त्यांचा अनेक शिष्य परिवार होता. त्या समुदायामध्ये श्री म्हादबा पण होते.

महाराजांचे तीन त्रिकाळ दर्शन व सेवा करुन आपला कापड विणकामाचा व्यवसाय ते केवळ घरप्रपंच म्हणून ते करीत. हातमागावर बसले तरी महाराजांचे नामस्मरण त्यांच्या मनात. महाराज समाधिस्त झाल्यावर त्यांचे विरक्त असणारे मन अधिक विरक्त झाले. एकांतात आता जप करावासा वाटू लागला. हनुमंताच्या भक्तीने वेडा झालेल्या साधकाने राम! राम! ह्या व्यतिरिक्त कोणता जप करावयाचा? राम! राम! म्हणत लुटारु वाल्याचा महर्षी वाल्मिकी झाला ते पटत असतांना सुध्दा ''राम'' ह्या दोन अक्षरात कांही उणेपणा आहे असे त्यांना वाटू लागले. तेंव्हा चर्चा करीत असता त्यांचे गुरु बंधू श्री नामदेव महाराज चव्हाण त्यांना म्हणाले, ''मग तू ''श्री राम! श्री राम!'' म्हणत जा.

''श्री राम!'' हा शब्द ऐकतांना रुखरुखणारी उणिवता भरुन निघाल्यासारखे त्यांना वाटले. श्री नामदेव महाराजांनी दिलेला सल्ला त्यांना पटला. घर प्रपंचाला त्यांनी राजीनामा दिला. एकांतवासाठी त्यांनी कोल्हापूरातील ब्रम्हपुरीतील भुयार निश्चित केले. ह्या भुयारात बसण्यापुरतीच जागा निश्चित करुन तेथेच अनुष्ठानाला सुरुवात केली पण!

हे भुयार म्हणजे इतिहास प्रसिध्द कोल्हापूर ते पन्हाळा या मार्गाची ती एक चोरवाट पंचगंगा नदीखालून गेली आहे. इथे म्हादबा नी ''श्री राम!'' नामाचा जप चालू केला. परेच्याही पलीकडे धाव घेऊ पहाणारी म्हादबांची वाणी वैखरी मध्यमेतून पश्यंतीत विराजमान झाली होती.

म्हादबा श्री रामाच्या नाम जपात भुयारामध्ये येथे निमग्न झाले होते. तेंव्हा त्यांच्या साध्वी पत्नी ते घरात आले नाहीत, ''आज येतील! उद्या येतील! महाराजांच्या भक्ती प्रेमाचे वेड आहे. कुणातरी गुरु बंधूच्या समवेत नृसिंहवाडी वगैरे कोणत्यातरी ठिकाणी गेले असतील, ह्या विचारात चार दिवस वाट पाहून झाल्यावर, त्या साध्वी पत्नीने गुरु बंधू नामदेव महाराज चव्हाण यांच्याकडे खुशाली विचारली.''

नामदेव महाराजांनी त्यांचा व स्वत:चा संवाद झालेला सांगितला. ''या चार दिवसांत माझी पण त्यांच्याशी भेट झाली नाही. येईल तो, कुठेतरी असणार. मी आणखी त्याचा शोध घेईन'' त्या साध्वी घरी निघून गेल्या. त्यांना अभिवचन दिल्याप्रमाणे नामदेव महाराज म्हादबाच्या शोधासाठी बाहेर पडले. जप करण्यास कोणकोणती ठिकाणे योग्य आहेत तिथे म्हादबा असणार म्हणून नामदेव महाराजांनी देवगिरी बुवांचा मठ, कात्यायनी, वडणगे, वगैरे एकांत असणारी देवदेवळे पाहिली. पण म्हादबांचा कांही शोध लागला नाही. मग एके दिवशी या विचारात असतांना ब्रम्हपूरी वरील ह्या भुयाराजवळ रस्त्याच्या कडेला असतांना ''श्री राम'' श्री राम असा अस्पष्ट आवाज त्यांना ऐकू आला. ते भुयारात गेले, तेथे म्हादबा शांतपणे श्री रामाच्या नामस्मरणात तल्लीन झालेले दिसले.

डास, किड्यांनी तर म्हादबांना फोडून काढले होते. ''म्हादबा'' ही एक हाक मारुन त्यांना

समाधीतून उठवणे हे एक घोर पाप होईल असा त्यांनी विचार केला. तो पर्यंत नामदेव महाराजांना पण डासांनी चावले. नामदेवांनी तसाच म्हादबांच्या घराचा रस्ता धरला. त्या साध्वींना नामदेवांनी म्हादबाच्या शोधाचा समग्र वृतांत सांगितला.

''म्हादबा आता घरी  येणे कठीण आहे. त्यांची आता थोर योगी तापसी प्रमाणे श्री रामांच्या नाम साधनेत समाधी लागली आहे. मी ती समाधी भंग करण्याचे पातक कांही केले नाही. तुम्ही पण करु नका अशी तुम्हांला विनंती आहे. तुम्ही त्यांचे दर्शन घेण्यास जरुर जावा. पण त्याला समाधीतून उठवू नका. तपश्चर्येचे बळ त्याला आपल्याच श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी दिले आहे. ती त्यांची तपश्चर्या पूर्ण झाली की आपण होवूनच तो बाहेर येईल, मात्र आता त्याचे घर प्रपंचात लक्ष लागणे कठीण आहे असे दिसते.''

श्री नामदेव महाराजांचा हा सल्ला त्या साध्वींनी ऐकला. रोज त्या म्हादबांचे दर्शन घेऊन परत घरी येत. त्यांची पण मानसिक स्थिती शोकाकुल अशी होऊन बसली.

आठ पंधरा दिवसातून कधीतरी एकदा ह्या भुयारातून ते बाहेर येत. भिक्षाटन करण्यासाठी ते गांवात फिरत. प्रथम नामदेव महाराजांच्या मठीतून निजबोध वैराग्य मठीत जाऊन श्रीकृष्ण सरस्वती महाराजांचे दर्शन घेऊन, मग मोजकीच घरे भिक्षा मागून ते परत स्वस्थानी भुयाराकडे परतत असत. भिक्षा मागून आणलेले भाकरीचे चतकोर तुकडे शिळे होऊन लाकडासारखे टणक झाले तरी त्यांचे सेवन ''अन्न हे पूर्णब्रम्ह'' ह्या विचारानेच करत. त्या भिक्षेतील एखादाही कण खाण्यास योग्य नाही म्हणून त्याचा ते कधीही अव्हेर करत नसत. शेगांवच्या श्री गजानन महाराजांच्या प्रमाणे त्यांनी अन्नातील परब्रम्हाला मान दिला.

अंगावरचे कपडे फाटून गेले. शेवटी एक लंगोटी उरली. दिवस, रात्र, पहाट, सायंकाळ त्यांना एकच झाली. अनुष्ठान मांडल्यापासून मच्छर, माशा, किड्यांनी त्यांना फोडून काढले. नखशिखान्त त्यांचे सर्वांग चावलेल्या किड्यांच्या फोडांनी भरुन गेले होते. पण त्यांनी एका मुंगीला किंवा डास, किड्याला मारले नाही. सद्‌गुरुंच्या श्रध्देमुळे त्यांची अशी मनोवृत्ती बनत गेली.

अलिकडे बरेच दिवस झाले म्हादबा कोठे दिसले नाही. आपण त्यांची भेट घेतली पाहिजे! हा एक विचार करुन व्यासादिक शोध काढत त्या भुयाराजवळ आले. आत जाऊन त्यांनी म्हादबांना पाहिले तर ते ''श्री राम'' नामांच्या सुक्ष्म आवाजात ध्यानमग्न असल्याचे दिसले. डोळ्यांची तेवढी जागा सोडली तर त्यांना नखशिखान्त डास किड्यांनी फोडून काढले होते. शेजारी खाण्याच्या वस्तू पदार्थांचा ढीग पडला होता.

श्री रामाचा शांत वाणीत चाललेला जप शेवटी थांबवण्यात आला. श्री व्यासांनी हळूच म्हादबांना हाक मारुन उठविले. गुरुबंधूना पहाताच म्हादबांना अत्यानंद झाला. ''चला, आपण बाहेर जाऊन बसू!'' म्हणून म्हादबांना भुयाराबाहेर आणून बसविले व म्हणाले, ''आज मोठ्या भाग्याचा दिवस, तुमच्या रुपात श्रीकृष्ण सरस्वती महाराज मला भेटावयास आले.''

व्यास म्हणाले, ''कसली यातना आणि कसली वेदना ही तर सगळी गुरुरायांची प्रेरणा! ह्यापण मुंगी, माशी, मच्छरादी किड्यांमध्ये सृष्टी व्यापून राहिलेले आपलेच महाराज आहेत. अनंत जन्मीचे सुकृत पदरी होते म्हणून या सूक्ष्मत्तम जीवांची संगत परमभाग्याने लाभली.''

**सुखदाता कोण कोणास ।**

**देहसुख बंधन कोणास ।**

**सोडणे आस । ह्या सर्वांची ।**

मीपणाच्या बंधनात ते सर्व जग गुरफटले आहे. तिथे मोक्ष दुरापास्त आहे. ह्या मोक्ष प्राप्तीसाठी साधू सज्जनांप्रमाणे आपण आपले मन भगवत् चिंतनात रमवले पाहिजे. असे मग रंगले की ते देहाच्या सुख दु:खाच्या पलिकडे जाते. शत्रूजन निष्कपट होतात. व्याघ्र सर्पादिकांचीही बुध्दी पालटली जाते. असे रक्षण कवच सद्गुरु घालतात. तिथे मग मच्छर मक्षिकांचा काय पाड लागणार? अनुभवाशिवाय या गोष्टी समजू शकायच्या नाहीत. गंगेला गंगा एका ओंजळ (अर्घ्य) अर्पावी. ज्याचे त्यालाच सांगावे तसे तुम्हालाच तुमचे हे सारे निवेदन करतो. आज तुम्ही महाराजांचे दास पण महाराज म्हणूनच तुमचे मला दर्शन झाले. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज रुपातच नटून आल्यासारखे मला वाटत आहे. आत्मस्तुती म्हणून नव्हे पण आपल्याच गुरु बंधूना मार्गदर्शन व्हावे, ही सद्गुरुंची प्रेरणा म्हणून म्हादबा हे बोलत होते.

म्हादबांचे हे भाषण एकाग्र चित्ताने ऐकता सर्व गुरु बंधू आश्चर्यचकित झाले. श्री व्यास म्हणाले, ''म्हादबा, तुम्ही श्री गुरुंचे सुपूत्र आहात. तुमचे हे अनुष्ठानही दिव्य आहे. तुमच्या सारखा जेष्ठ गुरु बंधू आम्हांला लाभला ही महाराजांची आमच्यावर थोर कृपा होय! आम्ही महाराजांचे सेवक शिष्य म्हणवून घेतो, पण आमचे सर्वांचे हे घडे रिकामे आहेत. तुमचाच मार्ग थोर तपस्वी, सिध्द पौरुषत्वाकडे नेणारा आहे. शरदचंद्राप्रमाणे शांत शीतल तेजस्विता तुमच्या दर्शनात मिळते. तेंव्हा आता एक आमची विनंती मान्य करा. तुमच्या भोजन सहवासाचा आम्हांला स्वाद द्या!'' म्हादबा म्हणाले ''तुमच्या रुपातच महाराज मेजवानी देत आहेत मला!'' प्रसाद व भोजनानंतर श्री व्यास म्हणाले, ''म्हादबा,आता तुमचे महाराजांचे अनुष्ठान सुखे चालू द्यावे, आम्ही जातो संसार कुपाते - जन्माची झडती द्यावया!''

श्री म्हादबाचा निरोप घेऊन व्यासादीक गुरु बंधू आपल्या मार्गाला लागले. इकडे परत म्हादबा आपल्या अनुष्ठानावर जाऊन बसले. जरी, म्हादबाचा निरोप घेऊन निघाले तरी, त्या सर्व गुरु बंधूच्या मनात म्हादबांचा विषय घर करुन बसला होता. एवढे डास चावले तरी म्हादबा त्यांच्याकडे प्रेमळ दृष्टीने पाहतात. भुयारातील डास म्हादबांनी स्वत:च्या रक्तावर पोसले होते. ''भूत प्राण्यावर दया'' हे संतांचे स्पष्ट लक्षण म्हादबांच्या ठायी दिसून येत होते. इथे श्री म्हादबांनी श्री रामाच्या नामस्मरणात किती काळ कंठला हे समजणे कठीण झाले. कारण कांही कालावधीसाठी म्हादबांनी हे स्थान सोडले. महाराजांनी त्यांना सिध्दावस्थेत मात्र निश्चितच नेले होते. त्यांचे

चिरंजीव व कै. डॉ. जनार्दन चव्हाण (श्री नामदेव महाराजांचे चिरंजीव) यांची भेट झाली होती. त्यानुसार डॉक्टर साहेबांनी मला सांगितलेला हा वृत्तांत असा की, स्वत: डॉ. जनार्दन चव्हाण हे मिरजेला मिशन हॉस्पिटल कडून निघाले होते. जवळच्याच एका फुटपाथावर एक संन्याशी महाराज बसले होते. त्यांच्या जवळ पुढ्यात श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा फोटो दिसला. डॉ. साहेब महाराजांचा फोटो पाहताच तेथे तसेच थबकून विचार करु लागले की, ह्या संन्याशाच्या जवळ महाराजांचा फोटो कसा काय?

हा संन्याशी महाराजांच्या जवळ बसून त्यांना ते म्हणते झाले ''महाराज तुम्ही कोण कुठून आलात?'' तेंव्हा ते संन्याशी म्हणाले, ''आम्ही संन्याशी तिर्थ यात्रा करत सारखे फिरत असतो. एका गांवात तीनदिवसा उपर आम्ही राहत नसतो.'' डॉक्टरसाहेब परत विचारते झाले ''बरं आमच्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा फोटो तुमच्याजवळ कसा काय?'' तेंव्हा ते महाराज म्हणाले, ''श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज आमच्या गुरुंचे गुरु!''

डॉक्टरसाहेबांना अधिकच जिव्हाळा वाटल्यामुळे परत त्यांनी विचारले, ''तुमचे गुरु कोण? त्यांचे नांव काय?'' तेंव्हा संन्याशी महाराज उद्‌गारले, ''माझे वडील तेच माझे गुरु!'' महादेव हे त्यांचे नांव पण ''म्हादबा'' ह्या नांवानेच ते संबोधले जात. पण आपण एवढे सखोल कशाबद्दल विचारता? ''म्हादबा कोष्टी हे आपले पिताजी काय?'' डॉक्टरसाहेबांनी हा प्रश्न विचारताच संन्याशी महाराज पण त्वरित होय म्हणाले. मग डॉक्टरसाहेबांनी स्वत:चा परिचय सांगितला. एक नामदेव महाराजांचे चिरंजीव व एक म्हादबा कोष्टींचे चिरंजीव । दोघे गुरु बंधू । क्षणात दोघांच्या हृदयात आपुलकीचा स्नेह उफाळला । डॉक्टरसाहेबांच्या आग्रहामुळे नजिकच्या हॉटेलात त्यांनी प्रेमाने नाष्टा, चहा पान उरकले, एवढ्या मुदतीत डॉक्टरसाहेबांनी विचारली म्हणून म्हादबांची विशेष माहिती त्यांच्या या सुपूत्रांनी निवेदन केली, ती अशी तो काळ इंग्रजी आमदानीतला होता. म्हादबांना जिवंत समाधी घ्यावयाची होती. परंतु त्यावेळच्या इंग्रजी कायद्याप्रमाणे ती आत्महत्या ठरत असल्याने जिवंत समाधी घेण्यास परवानगी कलेक्टर साहेबाने नाकारली. म्हादबांचे मूळ गांव दक्षिण सातारा जिल्ह्यात (सध्याचा सांगली जिल्हा) कृष्णाकाठी होते. एक शुभदिवस ठरवून कृष्णा नदीच्या डोहात जलसमाधी घेण्याचे श्री म्हादबांनी निश्‍चित केले.

ठरलेल्या दिवशी कांही भाविक मंडळी जमली होती. विशेष ह्या गोष्टीचा डांगोरा मुद्यामच त्यांनी केला नाही. का तर याही प्रसांगाला इंग्रजी सरकार मज्जाव करील. श्री म्हादबांनी मग सर्वांचा अखेरचा प्रेमाचा निरोप घेतला व कृष्णानदीवर चालत चालत मध्यावर गेल्यानंतर परत सर्वजणांस तिथून नमस्कार करीत कृष्णा डोहात बुडू लागले. पोटापर्यंतचा भाग पाण्यात बुडाला असतांना तेथे त्यांचा एक मुलगा ''बाबा! बाबा!'' म्हणत धावत काठावर आला.

''का रे, काय झालं ओरडायला'' असे म्हादबांनी विचारता ''तुम्ही गेल्यावर मला कोण?''

असे अश्रुपूर्ण नेत्रांनी भरलेल्या सद्‌गदीत स्वरात विचारता, ''आता ते तुझे बाबा'' उजवा हात तिरकस आकाशाकडे निर्देश केला. तेंव्हा त्यांच्या चिरंजीवानी तिकडे पाहता शोकाकूल स्थितीत असतांना त्रयमुर्ती दत्तगुरु दिसले. कांही क्षण त्याने दत्तगुरुंचे दर्शन घेतले. नंतरच्या क्षणाला कृष्णाडोहात शेवटचा नमस्कार करुन कृष्णा नदीच्या डोहात प्रवेश केला. गुरुंच्या भक्तीसेवेतला देह म्हादबांनी कृष्णागंगेला अर्पण केला.

हा मुलगा म्हणजेच डॉक्टरसाहेबांच्या बरोबर बोलणारे म्हादबांचे चिरंजीव त्यांनाही दत्तगुरुंचा अनुग्रह झाला. तीस वर्षांपूर्वीचा हा संवाद. आज ते म्हादबांचे चिरंजीव निश्चितच शतसंवत्सरी केंव्हाच पार केलेले असावेत. ज्या कृष्णा डोहात म्हादबांनी देह विसर्जन केला ते ठिकाण, गांवाचे नांव डॉक्टरसाहेब पण पंचाहत्तरी ओलांडून गेलेल्या वार्धक्याच्या विस्मृतीने आठवू शकले नाहीत. दत्तगुरुंच्या अनुग्रह लाभलेला साधक हा सिध्दच होता. त्याप्रमाणे म्हादबा व त्यांचे संन्यास घेतलेले चिरंजीव सिध्दावस्थेला पोहोचलेले.

महाराजांनी स्वत:च्या एका कृपाकटाक्षाणे उत्तरप्रदेशातून आलेल्या योग्याभ्यासियांना अंतिम सिध्दी दिली होती. म्हादबांना पण महाराजांनी सिध्द केले होते. पाण्यावरुन चालत जाऊन डोहामध्ये देह समर्पण करणे म्हणजे स्वत:हून जल समाधी घेणे ही कांही सामान्य बाब नव्हे. ज्या डोहात त्यांनी देह समर्पण केला तेथे पोहण्यात निष्णात असलेल्या लोकांनी नदीतला तळगाळ शोधून पाहिला पण म्हादबा कोणालाही मिळाले नाहीत.

महाराजांनी स्वत:च्या पादुका कृष्णा लाडांच्या हाती दिल्या. आपल्या मागून येण्यास त्यांनी सागितले स्वत: ते नृसिंहवाडीला कृष्णा नदीत उतरुन पाण्यावरुन चालत पुढे गेले. त्यांच्या आज्ञेने त्यांच्या पादुका घेऊन कृष्णा लाड व वासुदेव दळवी त्यांच्या पाठोपाठ पाण्यावरुन चालत गेले. त्याच महाराजांचे म्हादबा हे पण तेवढेच लाडके शिष्य तपसिध्दीचे फळ म्हणून महाराजांनी त्यांना पण असेच सिध्दच करुन सोडले. अग्नीतून चालणे, आहे त्या स्थानीच अंतर्धान पावणे, पाण्यावरुन चालणे ह्या सारख्या सिध्दी प्राप्त असणारे कैक योगी अजुनही आहेत. स्वत: जनसमाजाचा उपद्रव नको म्हणून दूरच रहात असतात. ह्या विद्येवर जगांत प्रतिष्ठा मिळविण्यासाठी ह्या सिध्द पुरुषांचा अट्टहास नसतो. सिध्द झाले तरी त्यांचे भगवत चिंतन कमी झालेले नसते.

विधात्याने घालून दिलेली आयुष्याची मर्यादा संपली की, एक क्षण ह्या जगात जगण्यासाठी ते राजी नसतात. देहविषयी ते अनासक्त असतात. मृत्यूला थोपवून धरण्याची त्यांची हिंमत असते. अशी त्यांना दिव्य शक्ती प्राप्त झालेली असते. १४०० वर्षे ह्या शक्तीवर योगीराज चांगदेव जगले होते. होडीतून गंगा नदी पार करत असतांना एका जिज्ञासूने श्री रामकृष्ण परमहंसांना विचारले, ''आपण पाण्यावरुन सहज चालत जाऊ शकत असतांना ह्या होडीत कसे काय बसलात? परमहंस उद्‌गारले, ''हे पहा आपले काम चार पैशात होत असतांना विनाकारण

एका रुपया कशाला खर्च केला पाहिजे.?'' सिध्दी प्राप्त विभुती अशी शक्ती अनाठायी वापरत नसतात. म्हादबांना लाभलेल्या दिव्य शक्तीचा त्यांच्या गुरु बंधूनाही सुगावा लागला नाही. मोठेपण मिळवण्यासाठी ते कधी धडपडले नाहीत. सद्गुरुंचे ध्यान व श्री रामाचे नाम त्यांचे अव्याहतपणे चालत असे. महाराजांच्या नामस्मरणात कापड विणणारे म्हादबा म्हणजे महाराजांचे संत कबीरच होय. कमालाप्रमाणे त्यांच्या सुपुत्राने त्यांना धन्य केले. श्रीरामाचा जप करणारा साधक हा श्रीरामापेक्षा हनुमंताला अधिक प्रिय असतो. आपले श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज साक्षात हनुमंताचा अंश आहेत. हनुमंतानी श्री रामाला जसे हृदय मंदिरात कोंडले, तसेच श्री म्हादबांनी महाराजांना हृदय मंदिरातच कोंडले होते. बालपणापासून द्वेष, मत्सरादी पासून दूर असलेले प्रेमळ शुध्द अंत:करणाचे म्हादबा महाराजांच्या आसिम कृपेला पात्र ठरले. म्हादबा हे वेदशास्त्रात पारंगत असणारे कोणी पंडित नव्हते, पण पंडितालाही आचरता येणार नाही असा मार्ग म्हादबांनी आचरला, तो केवळ महाराजांच्या कृपेवर. ह्याच त्यांच्या श्रध्दा कृपेवर डास, कृमी, किड्यांचा तप साधनेत देहाला होणारा दंश दाह शमवला. त्या सूक्ष्मतम उपद्रवी किड्यांमध्येही त्यांनी सद्गुरुंची प्रतिमा पाहिली. देही असून विदेही झालेले म्हादबा म्हणजे गुरुबंधूनी व्यासांनी गौरवलेले खरोखरीचे सद्गुरुंचे थोर सुपुत्र होय. त्यांच्या चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम।

**श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी**

कोल्हापूर.



# श्री वासुदेव दळवी ऊर्फ वास्देवराव

श्री कृष्णा लाड व वासुदेव दळवी म्हणजे श्रीकृष्ण सरस्वती महाराजांचे जय विजयच होय! वासुदेव दळवीना महाराजांचे सर्व भक्त वास्देवराव म्हणूनच संबोधीत असत. कुंभार गल्लीत वैरागमठी जवळच त्यांचे घर होते. ते छत्रपतींच्या पदरी नोकरीस होते. घरात सुशिल पत्नी व लहान मुले होती.

प्रात:काळी स्नान, संध्या, पूजा, अर्चा यथासांग करुन ते नोकरीला जात. सायंकाळी ते परतल्यावर श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनास जात असत. आत्मानात्मा चर्चा करावी. गीता भागवताचा अभ्यास करावा सत्पुरुषाच्या संगतीत वेळ घालवावा हेच त्यांनी स्वत:चे जीवीत कार्य ठरवून घेतले होते. ''हे संसार पाश मला नको तुम्ही तुमच्या प्रमाणे मलाही समर्थ करा!'' अशी प्रार्थना ते महाराजांना करीत, तेंव्हा महाराज वास्देरावांना म्हणत ''हे कांही सहजासहजी घडणे नाही. सर्वाचा आधी विचार घे ''आणि कांही विचार येताच महाराज त्याचे उत्तर आधीच सांगून मोकळे होत. वास्देवरावाना त्याचा फार मोठा अचंबा वाटे.

संसारात तर नेहमी पत्नी बरोबर स्वत:च्या शीघ्र कोपी स्वभावामुळे नेहमी झगडे उडत असत, अशावेळी महाराज ''ती निर्दोष आहे तुझा प्रमादच तुला बाधतो आहे'' असे म्हणत. क्रोधाने ते वाद घालू लागले की अबाल वृध्द हे विचारात न घेता मनसोक्त वाद घालत असत. तरी पण त्यांची महाराजांच्या चरणावर अपार निष्ठा होती. प्रत्येक वेळी महाराज त्यांना म्हणत, ''वासु शेंडी दे किरे! वासु शेंडी केंव्हा देणार''? वास्देवरावांना ह्यातला कांहीच अर्थ समजत नसे.

एकदा वास्देवरावानी एक काम आपल्या पत्नीस सांगून ते बाहेर गेले. नेमके तेच काम त्या परकामामुळे विसरुन गेल्या. बाहेरुन वास्देवराव येताच पत्नीच्या ते काम लक्षात आले. त्यांनी लगेच वास्देवरावांची क्षमा मागितली. वास्देवरावांचा क्रोध अनावर होऊ पहात होता. त्यांच्या पत्नींनी त्यांना करुणा भाकली, ''तुम्ही सह्रदय व्हा. तुमच्या कोपामुळे सर्वांगास कापरे भरते, तुमच्या पायी माय बाप मी सोडून आले. तुम्ही सर्वस्व आहात, एवढा अपराध पोटी घाला'' ह्या केविलवाण्या शब्दाने वास्देवरावांचा क्रोध उतरण्या ऐवजी अधिकच चढला व ते पत्नीला म्हणाले, ''तू नष्ट अबला आहेस. आता मला तुझा संसारच नको!'' त्या कलहात भडकून घेतलेल्या मनास शांत करण्यासाठी वैराग्यमठीत महाराजांच्या चरणाकडे त्यांनी धाव घेतली. नमस्कार करीत ते महाराजांना म्हणाले, ''मी अज्ञान राशी महाराज! तुम्हीच आता मला सांभाळा'' महाराज त्यांना म्हणाले, ''आता तरी वासु शेंडी दे'' त्या बरोबर महाराजांच्या उक्तीतला अर्थ समजला. लगेच एका नाभिकास बोलावून केश मुंडण करुन चतुर्थाश्रम स्विकारला. महाराजांनी दिलेले भगवे परिधान करुन वास्देवराव गोसावी झाले. ही वार्ता

त्यांच्या पत्नीस समजताच त्यांनी येऊन महाराजांना नमस्कार करीत.

''आपण घरी चलावे, भर्तु संबंध सोडून मी तुम्हाला गुरुप्रमाणे समजीन'' तेंव्हा वास्देवराव म्हणाले, ''आता हे घडणे अशक्य श्रीकृष्ण सरस्वती महाराज हा एकच माझा गुरु तोच आम्हाला तारक. आता मी प्रपंचाला विन्मुख झालो. मजला आता तूं माते समानच आहेस. इथून पुढं तू सुखी रहा. उदर भरण्याची चिंता ह्या सद्‌गुरुला शरण येता करावी लागणार नाही. ह्यावर तुझ्या मनात येईल ते तू अनुसर!'' पती विन्मुख होणाऱ्या त्या साध्वीवर जणू ते आभाळच कोसळले होते. ह्यावर ती पती देवास म्हणाली. ''हे तुम्ही बरे केलंत नाही. घरी लहान मुले आहेत ह्याचा तरी कांही विचार करायला नको होता कां? केवळ तुम्ही तुमच्या क्रोधाच्या आहारी गेला. आता तरी तो क्रोध सोडा व श्री गुरुंची नीट सेवा करा । ज्याने जन्म दिला तोच नारायण अपत्य पोषण करुन वाढवेल आमची चिंता करु नका. दुजा कोणता छंद मनाला लावून घेऊ नका. श्री गुरुंची सुखे सेवा करा, येते लोभ ठेवा.'' असे म्हणून त्या साध्वीने पती परमेश्वराबरोबर परम मायेची पाखर घालण्यासाठी अश्रू पुरातून मार्ग काढत घरी गेली. महाराजांचे बरोबर वास्देवराव दळवी, कृष्णा लाड, अगदी सावली सारखे असत. मग महाराज गल्ली बोळात असो व पंचगंगा/कोटीतीर्थावर असो. जरा सुध्दा त्यांना विसंबून काळ घालवीत नसत. देहाने सेवेत व मनाने चिंतन मननात ते महाराजांशी रमून गेले होते.

एकदा विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी वास्देवराव व कृष्णा लाड ह्या दोनच प्रियोत्तम शिष्यांना घेऊन महाराजांनी तारामतीसह सर्व भक्तांना सोडून प्रयाग तिर्थावरुन डोळ्या समोरुन हां हां म्हणता निघून गेले. शोध शोधून ते कुणालाही मिळाले नाहीत. महाराजांनी मात्र ह्या दोघांना घेऊन विशाल सह्याद्रीतून विशाल प्रवास आरंभीला. महाराजांच्या पायात चर्म पादुका होत्या. शिष्य द्वय मात्र अनवाणीच होते. नभात सूर्य नारायणाचा अविरत प्रवास तसा श्री गुरुंचा अविरत प्रवास अरण्यातून होत होता. सृष्टी देवतेच्या रम्य रुपाबरोबरच अति भयानक रुपे अवलोकीत हे त्रयमूर्ती न भूतो न भविष्यता अशा निबीड अरण्यातून अनेक प्रकारची साप, अजगर, वराह, व्याघ्रासारखा क्रूर, हिंस्त्र पशु डोळ्यासमोरुन ह्या त्रयमूर्तींना बघून पळत होती, पण ह्या क्रूर श्वापदांना पाहून वास्देवराव मात्र घाबरल्यावर.

**श्री गुरु म्हणती भ्याला वासू । वाटे तयास होऊ गतासू**

**आम्ही जरी जळली असू । निमिषाध्र्ये नासू काळासही**

कृष्णा लाडानी पण वास्देवरावाना धीर देत सांगितले. सर्व भक्तांना मागे टाकून आपल्या कडून महाराज सेवा करुन घेत आहेत.

**त्रिलोकी कठिण सेवा धर्म । त्याचे आम्हास दावी वर्म**

**सोडी आता भुकेचा काम । विचार सूक्ष्म करी ।**

सहा दिवस असा अन्नाचा एकही कण न भक्षिता भुकेचा वडवानल नुसत्या पाण्यानं कसातरी शांतवीत चालला होता. महाराजांनी आपल्या दोन्ही हातानी दोन्ही शिष्यांच्या पाठीवरुन आपला करुणाकर फिरवीत. ''माझी मुले भुकेने दीन झाली आहेत'' म्हणून जवळच्या झाडाचा पाला त्यांना खाण्यास दिला. नंतर पुढे गेल्यावर प्रथमच त्यांना एक गांव लागले. मग वास्देवराव जरा आनंदाच्या भरात महाराजांना म्हणाले, ''महाराज तिथे जाऊन जरा माधुकरी आणतो.'' महाराज म्हणाले, ''तिथं जाता लोक बडवून काढतील परत'' वास्देवराव महाराजांना म्हणाले, ''महाराज मी माधुकरी जाऊन आणतोच.''

असे म्हणत महाराजांची अनुमती न घेताच त्या गांवात वास्देवराव गेले. तेथील शेतकरी लोकांनी त्यांना हेरले. चार दिवसापूर्वी ह्यानेच आपल्या गांवात चोरी केली. परत भोंदू गोसावी वेषात आला आहे. पकडा त्याला आणि ठोका बेदम ! असे ऐकताच वास्देवरावांनी मनात श्रीगुरुंचा धावा चालू केला. भुकेलेल्या आतड्यांना भीतीचा गोळा उठला. शुधेने गरगरा फिरणाऱ्या डोळ्यांनी कांही क्षणातच श्री गुरुंचे चरण गाठले. तसे गांवकरी पण त्याच्या मागे लागले. अंर्तज्ञानी महाराजांना कापऱ्या आवाजात वास्देवरावांनी घडलेली हकीकत कशीतरी सांगून होते न होते तोच महाराज उभय शिष्यास म्हणाले ''पळा! पळा! नको म्हणता वासू गेला परिणाम त्याचा दिसे हा!'' ही त्रयमूर्ती पुढे पळाली.

त्यागांवच्या शेतकरी मंडळींना कांही केल्या ती सापडली नाहीत. दोन योजने दूर गेल्यावर महाराजांना दया आली उभय सेवकास महाराज म्हणाले ''आता येथे विश्रांती घ्या. उदईक बंदी खचित येणार. अशक्य करु त्याचा स्वीकार मुक्त झाला पुढे आहार आठ प्रहर संपता.'' परत दुसऱ्या दिवशी प्रवास चालू झाला. एका गांवा समीप येता हेच ते चोर म्हणून ह्या त्रयमूर्तींना त्या गावकऱ्यांनी सायंकाळच्या सुमारास पकडून हनुमान मंदिरात कैद करुन त्यांच्यावर देखरेखीसाठी दोन पहारेकरी बसवले. उदईक ह्यांचा निवाडा करु म्हणून ते सर्व गांवकरी आपापल्या घरी गेले. महाराजांनी वास्देववराव व कृष्णा लाडांना सांगितले ''आता मला बघा हं'' असे म्हणत त्या दोन्ही पहारेकऱ्यांच्या डोळ्यापुढून महाराज बाहेर पडले ते थेट जवळच असणाऱ्या गांवकामगार पाटलांच्या घरी जाऊन त्याच्या गृहधनिनीस म्हणाले, ''आम्हाला भाजी भाकरी द्या!'' ''तुम्ही कोठील कोण? इथे का? देते भाजी भाकर ! बसा इथे!'' महाराज म्हणाले, ''मारुती मंदिरामध्ये आमचे दोन भक्त उपवाशी आहेत. तिथेच मी घेऊन जातो.'' त्या बाईनी एक मोठी भाकर त्यावर भाजी घालून दिली व महाराज मंदिराकडे निघाले. भक्तासाठी भगवंताने भक्ती पोटी भिक्षा मागितली व ते घेऊन परत त्याच पहारेकाऱ्यांच्या उघड्या डोळ्यासमोरुन आत आले. मंदिरात येताना व जातांना डोळ्यात तेल घालून पहारा करणाऱ्या पहारेकऱ्यांना महाराज दिसलेच नाहीत. ती भाकरी महाराजांनी कृष्णा लाडांच्या हाती दिली. त्यांनी देहा प्रमाणे खोडी

न केली तरच विशेष थोड्याच वेळात ती पाटलांची गृहधनिन आली व महाराजांना म्हणाली, ''तुम्ही तिघे असून मी एकच भाकरी दिली. आपणाला ती तिघांना कशी पुरेल? म्हणून मी आणखी दोन आणल्या!'' मग महाराजांनी त्या उभयतांना शिष्यास दिल्या थोडे क्षुधाशमन झाले व मग दोन्ही सेवक शांतपणे सुखी शयनावले. सद्‌गुरु मात्र अहोरात्र जागेच होते.

दुसऱ्या दिवशी कोतवाल आला. त्याच्यापुढे न्याय निवाडा शिक्षा होणार होती. त्या कोतवालाने महाराजांना पहाताच हा तर करवीर क्षेत्रीचा दत्त गुरु! आधी त्यांना मुक्त करा! म्हणून त्याने महाराजांची क्षमा, अपराध मागत चरणावर डोके ठेवले. त्यांना महराज आशीर्वाद देत पुढच्या प्रवासाला लागले. ''आज आपल्याला पोटभर भोजन मिळणार,'' असे महाराज उभय शिष्यास म्हणत चालत असता एक गृहस्थ थोड्याच वेळात भेटला. त्याने महाराजांसह वास्देवराव व कृष्णा लाडांना ओळखले तो नजीक असणाऱ्या गांवचा इनामदार होता. त्याने त्या त्रयमुर्तीना घरी नेऊन प्राथमिक न्याहरी नंतर जाई जुई चंदन सुवासिक तेलानी प्रथम श्री गुरुंना व नंतर त्या शिष्य द्वयास उष्णोदकाने अभ्यंग स्नान करवीले. धूप दीप आरती करुन मिष्ट पक्वान्नाचे सुग्रास भोजन करविले. रात्री परत श्रीगुरुसह त्या प्रियोत्तम शिष्यांना सुवासिक तेल मर्दनाने प्रवास थकव्याने शिणवलेली त्यांची देहकाया सुशोभित बिछाना सज्ज करुन शयनी सुखावली. अशीच चार दिवस आग्रही भक्ती सेवा इनामदाराने श्रीगुरुसह शिष्यांची केली. असलेली पुण्याई पदरी जोडून त्या इनामदाराने पाचव्या दिवशी एका शकटा रोहणी श्रीगुरु शिष्यांचा पुढील राजापूरचा प्रवास सुख-सौखे विनासायास करविला.

राजापूरचा प्रवास करुन महाराज २१ दिवसांनी कोल्हापूरला परत आले. ह्या प्रवासाने कृष्णा लाड व वास्देरावांची आध्यात्मिक बैठक दृढ होण्यास बरीच कारणीभूत ठरली. गुरुंच्यावरची निष्ठा अधिकच बळकट झाली. तरी, वास्देरावांचा देह स्वभावाचा क्रोध त्यांना कांही सुटत नव्हता. वाघा सारखे हिंस्त्र क्रूर श्वापद सर्कशीतील त्याच्या शिक्षका व्यतिरीक्त कुणालाही नमत नाहीत वास्देवराव तसेच होते. महाराजांच्या शिवाय ते कोणत्याही देव देवतेस जुमानत नव्हते. एकदा भिक्षेसाठी दुपारची बरीच फेरी करुनसुध्दा मिष्ठान्न भिक्षा मिळाली नाही. तेंव्हा ह्या वास्देवरावांनी जगदंबा आई अंबाबाई अन्नपूर्णेस एवढ्या शिव्या हासडल्या, अशी तिची वाक् पूजा केली की, तिनं स्वत:च राज सिंहासन सोडून एका सुंदर प्रौढेच्या रुपात श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समोर वैराग्य मठीत येऊन क्रोधात उद्‌गारली ''अरे गोसावड्या! तुझी कारटी आवर! वेळीच त्यांना पायबंद घाल नाही तर पुढची गती बरी नव्हे!'' महाराज तिच्याजवळ जाऊन समजावणी काढत तिची हनुवटी धरुन म्हणाले ''अगं शिवप्रिये धर्जोटी मांडीवर हगली मुतली तरी ती आपलीच मुले आहेत ना! नको का त्यांना हृदयाशी धराय? कशाला त्यांच्यावर एवढी रागावतेस? माझी मुले ती तुझीच आहेत त्यांच्या हातून

प्रमाद घडला तरी ती सन्मार्गाची आहेत. आम्ही त्यांना आवरतो पण तू जगाची माता त्यांना तू क्षमा करणार नाहीस का''? त्या साक्षात जगदंबेचे ''आईपण'' ती वत्सल माया ह्या गुरुमावलीच्या बोलासवे जागी झाली ! आणि मग ती जगन्माय श्रीगुरुंना म्हणाली ''अहा रे गुरुराया तू त्यांना असा सांभाळतोस असे तू त्यांचे लाड करतोस म्हणूनच त्यांचा चेव वाढतो आहे, पण त्यांच्या ह्या मिजासपणाला वेळीच लगाम घातला पाहिजे. नाहीतर पुढची गती बरी नव्हे! तू त्यांचा पाठीराखा ! तूच त्यांना सांभाळ'' येते मी म्हणून त्या जगदंबा आई भवानीने महाराजांचा निरोप घेत माघारी निघून गेली.

महाराजांनी मग वास्देवरावांना उपवास करण्यास सांगितले. फक्त चन्याची डाळ खाऊन वास्देवरावानी उपवास सुरु केला. असेच एकदा ते चण्याची डाळ निवडत असता महाराज माघारी डोकावत येऊन म्हणाले ''काय ते माझ्या भक्ताचे मन अजून भोजनातच! शरीर रक्षणासाठी म्हणून डाळ भक्षिली आता पर्यंत, बरं!'' असे म्हणत महाराज निघून गेले. वास्देवरावांना श्रीगुरुंच्या उक्तीतला अर्थ त्वरीत उमगला. त्या क्षणापासून त्यांनी मग ती चण्याची डाळही भक्षण करण्याची सोडली. नुसते तीर्थ जल प्राशन व झाडपाला खावून त्यांनी साडे तीन वर्षे एक प्रकारची तपश्चर्याच केली. उदार मेरु श्री गुरुराणा अखेर त्या वास्देवरावांच्या तपश्चर्येवर द्रवला, त्यांना करुणा आली. त्यांनी त्यांच्या पाठीवरुन हात फिरवीत म्हटले! ''वासू आता उपवास बंद कर आणि जेवीत जा हं!'' मग वास्देवराव भिक्षेला जाऊ लागले मिष्ठान्न भिक्षा तरतऱ्हेची मिळू लागली. ती भिक्षा आणून श्री गुरुच्यापुढे आणून पहिला घास स्वत:च्या हातानी महाराजांना भरवू लागले.

हरिपंत शिदनेर्लीकर हा गृहस्थ वास्देवरावांचा मनस्वी द्वेष करीत असे व कृष्णा लाड पण त्याला परिपूर्ण ओळखत होते. एकदा त्याने मिष्ठान्न पंचपक्वान्नाचे भोजन प्रयोजन केले व महाराजांना त्याचे आमंत्रण दिले. महाराजांचे जवळचे शिष्य म्हणून त्यांनी वास्देवराव व कृष्णा लाडांना पण आमंत्रण दिले. दोघांनी ते नाकारत, ''तुझा तू श्रीगुरुंच्या पंक्तीचा लाभ घे'' असे सांगितले. हरिपंत हा पुरा निंदक यांच्या घरी अन्नच काय पण एक घोट पाणी सुध्दा पिऊ नये असे वास्देवराव म्हणाले, नियोजन केलेला हरिपंत महाराजांना नेण्यास वैराग्य मठीत आला. वास्देवरावाने आणलेली भिक्षा स्वकरे महाराजांना मुखात भरवत होते. जवळ आलेल्या हरिपंतास महाराज म्हणाले ''शुद्रानी आम्हांस भ्रष्ट केले सोवळे ब्राम्हण आणा व जेवण घाला!'' महाराजांच्या या कृती शब्दातील अर्थ त्याला उमगला. एका शब्दासाठी ज्यांनी वैयक्तिक स्वार्थ प्रापंचिक सुखी संसार त्यागून महाराजांच्या सेवाव्रतात जीवन वाहिले, त्यांचा द्वेष आपण करत आलो हे गुरुना आवडले नाही. त्या क्षणापासून लाड व वासुदेवरावाशी हरिपंत प्रेमाने वागू लागला. एका शनिवारी अमावस्येच्या मध्यरात्री सांगितलेले सेवाकार्य करुन आल्यावर प्रसंगोचित

अशी भीती कृष्णा लाडाना वाटत होती. तेंव्हा वास्देवराव लाडांना म्हणाले.

''चंचल होऊ नको कृष्णा । सेवीत जाई गुरु चरणा । त्राता ऐसा तुजला मिळेना । धुंडीता त्रिभुवना माझारी ।। असे म्हणून त्यांना धैर्य दिले. एकनाथ कृत भावार्थ रामायण नेहमी वास्देवराव वाचत असत. कांही पारायणे पण त्यांनी केली होती. एवढ्या मोठ्या ग्रंथात त्यांना त्रयोदशाक्षरी मंत्र कांही सापडेना. त्यांनी कुणालाही विचारले नव्हते. त्यांच्या मनातील विचारांची खळबळ चालू असता तेथे श्री गुरु आले व म्हणाले, ''अरे वासू । राम मंत्राविना हा ग्रंथ नाही. आम्ही तुला दाखवून देतो.''असे म्हणत तो ग्रंथ महाराजांनी उचलला. एक दोन क्षण आतील भराभर पाने चाळली व एका पानावर न पहाता हे वाच म्हणून सांगितले. तो जटायू मृत्यूचा वृतांत असून त्याच्या मृत्यूच्यावेळी जे शब्द त्याने काढले होते तोच त्रयोदशाक्षरी मंत्र होता.

**श्री राम जय राम जय जय राम ।**

वडणगे गावाजवळील पिंपळ वृक्षासमीप तेथे गेल्यावर महाराज वास्देरावांना म्हणाले ''हे तुमचे स्थान.'' वाडी रत्नीगिरीला त्यांचे देहावसान झाले. श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या सानिध्य सौख्याचा लाभ वास्देवरावांना जवळ जवळ ४० वर्षे मिळाला. संसारातील वैराग्य वास्देवरावांना महाराजांच्या कृपेबरोबर वैराग्याच्या शिखरावर घेऊन गेला. कृष्णा लाड हे श्रीकृष्ण सरस्वती महाराजांचे कौस्तुभ होते. तर वास्देवराव दळवी हे कोहिनूर होते.

लेखक : **श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, कोल्हापूर**



श्री स्वामीभक्त स्व.वासुदेव दळवी

## ।। अध्याय २१ वा ।।



स्व. आरळेकरांचे श्री विठ्ठल दर्शन

### विषयसूची....!

१) नृसिंहवाडीचा ऐश्वर्य संपन्न पुजारी
२) कोल्हापुरातील एक वृध्देचा- पडवळाचा वेल
३) कोल्हापुरातील एक तरुणी- तिचा पती नास्तिक
४) स्व. आरळेकराचे श्री पंढरपूर श्री विठ्ठल दर्शन

# अध्याय २१ वा

वाडीचा एक पुजारी ऐश्वर्य संपन्न असता घरी उदास होवून संसारी घर त्यागुनी तीर्थयात्रा करीत असे. उदासवृत्तीने राहात असे. एकदा फिरत फिरत तो करवीरला आला. श्रीकृष्ण सरस्वतींचा महिमा त्याला कळाला. त्यांचे दर्शन घ्यावे म्हणून ताराबाईचे सदन शोधीत आला. श्रीकृष्ण गुरुचरणी त्याने मस्तक ठेवले नम्रपणे स्त्रोत्रे गायली. यावर स्वामी त्यास म्हणाले, ''आता भ्रमंती पुरे, मालखेड, आजरा नको फिरती. दरबारास नसे वाण चित्ती ठेवावे समाधान भोजन चालून येईल. स्वस्थ रहा कमी न दरबारी'' पुजाऱ्याने श्रीकृष्ण गुरुंची ही वाणी ऐकली व मनात म्हणाला ''मी मनात जे चिंतले त्याचे उत्तर श्रीगुरुंने दिले'' परंतु त्याची बुध्दी चंचल झाली कांही विचार सुचेना विचाराला स्थिरत्व येईना. मी तर येथे परस्थ पुढील सर्व कांही गैर शिस्त मनाने तो उद्विग्न झाला. श्री महालक्ष्मीचे दर्शन घ्यावे. महालक्ष्मीला हात जोडावे म्हणून श्री महालक्ष्मी मंदिरात आला. श्री महालक्ष्मी दर्शन घेवून सर्व कार्यभार आटोपून तो गरुड मंडपात स्वस्थ निद्रावश झाला. निद्रामग्न असतांना त्याच्या स्वप्नात सुवासिनीच्या स्वरुपात श्री आंबा माता येवून म्हणाली, ''सर्व खोट्या कल्पना सोडून दे. श्रीकृष्ण सरस्वती तुझे समर्थ रक्षक आहेत. तुझे हिताहित जाणतात. करवीरातच वस्ती कर'' स्वप्न पाहून वाडीचा ब्राम्हण जागा झाला. जागृत होवून चहुकडे पाहू लागला. जगदंबनेच त्याला भेट दिली हे त्यांने जाणले. श्री जगदंबा / श्री महालक्ष्मीचा त्याला सल्ला मिळाला असे वाटले.

दुसऱ्या दिवशी तो वैराग्य मठीत श्रीकृष्ण गुरुंच्या दर्शनाला परत आला. त्याला पाहून श्रीकृष्ण गुरु धैर्य देवून म्हणाले ''अंबाबाईने पिळला कान व्यर्थ का आता करशी चिंता सर्व सोय तुझी होईल. आता तर पारायण करशील?'' ऐकून त्याचा विश्वास बसला. श्रीकृष्ण गुरुंचे वचन ऐकून तो श्री अंबाबाईच्या मंदिरात आला व तेथील दत्त मंदिरात बसला. इतक्यात श्रीगुरुने प्रेरणा दिलेला एक मनुष्य येवून त्या ब्राम्हणाला म्हणाला, ''आपले जन्मस्थान कोठे आहे? काय व्यवसाय आपण करता?'' यावर वाडीकर ब्राम्हणाने आपली स्वकथा त्या इसमाला सांगितली. यावर तो इसम वाडीकर ब्राम्हणाला म्हणाला, ''भले ब्राम्हण दिसता. तुमचे आता वृध्दपण झाले आहे. आता तीर्थाटन बंद करा. वस्तीस तुम्हांला दत्त मंदिर देईन तसेच गुरुचरित्र पोथी वाचणेस देईन स्वस्थ चित्ताने गुरुचरित्र पठण करावे. गुरुचरित्र मनोभावे सांगावे.'' त्या मनुष्याचे ऐकून वाडीकर ब्राम्हण पुजारी आश्चर्यचकित झाला. श्रीकृष्ण गुरुंचे अद्भुत कार्य त्याने जाणून गुरुचरित्र पारायणाचा / पठणाचा संकल्प मनी केला. दुसऱ्या दिवशी नित्यक्रम आवरुन वाडीचा ब्राम्हण श्री अंबाबाई मंदिरातील दत्त मंदिरात आला व त्याने गुरुचरित्र पारायण सुरु केले. दिवस पर्यंत गुरुचरित्र वाचन चालले होते. इतक्यात मयूरपंत नांवाचा भक्त त्यांच्याकडे आला. तो त्यांना म्हणाला, ''श्रीकृष्ण गुरुने प्रेरणा दिली. म्हणून मी आलो आहे. माझे गुरु श्रीकृष्ण सरस्वती आहेत. रात्री स्वप्नी येवून त्यांनी सांगितले की, जो

ब्राम्हण अंबाबाई मंदिरात गुरुचरित्र पोथी वाचन करीत आहे, त्याला रोज प्रेमाने भोजन घालावे म्हणजे तुझे दारिद्र्य धुवून जाईल''असे म्हणून मयूरपंताने वाडीच्या पुजारी ब्राम्हणाला भोजनासाठी घरी येण्याची विनंती केली. यावर तो वाडीकर ब्राम्हण पुजारी मयूरपंतांना म्हणाला ''तुझे तुला दारिद्र्य भरपूर आहे. तुझी परिस्थिती गरीबीची आहे. तुझ्याकडे भोजनाला येण्याचा उगीच आग्रह धरु नको. श्रीकृष्ण गुरुंचा स्वप्नीचा निरोप मानून इथंवर तू आलास यातच मी संतुष्ट आहे.'' यावर त्या वाडीकर पुजारी ब्राम्हणाला तो म्हणाला'' तुम्ही माझ्याकडे भोजनासाठी अवश्य यावयाला पाहिजे नाहीतर मी उपाशी राहिन. श्रीकृष्ण सरस्वती दत्त गुरु जी कांही ओली कोरडी भिक्षा देतील ती आपण आवडीने खावू'' मयूरपंताचा दृढ निश्चय बघून वाडीकर ब्राम्हण पुजारी भोजना गेला. मयूरपंताचे दारिद्र्य बघून वाडीकर ब्राम्हणाला त्याचे दु:ख झाले. त्याची मुलेबाळे उपाशी पाहून श्रीकृष्ण गुरुंने आपल्याला मयूरपंताकडे भोजनास का पाठविले? याचे त्याला दु:ख झाले. दुसऱ्या दिवशी पासून गुरुचरित्र वाचन ऐकावयाला नारीनर जमू लागले. धन धान्य जमू लागले. कोणी उत्तम फळे आणून देत कोणी तांदूळ, पैसे देत. अशा रितीने धन्य धान्य, फळे, पैसे मयूरपंताना बोलावून वाडीकर ब्राम्हण देवू लागला. अशा तऱ्हेने गुरुचरित्राचा चातुर्मास निर्विघ्नपणे पूर्ण झाला.

गुरुचरित्र पठणाच्या समाप्तीस १०० रु. दक्षिणा वाडीकर ब्राम्हणास प्राप्त झाली. ती सर्व त्याने मयूरपंताना दिली. मयूरपंत सधन झाला. त्याला श्रीकृष्ण गुरुने सधन करुन टाकले. इकडे वाडीकर पुजारी ब्राम्हण श्री सद्गुरुंना शरण येवून सभावे उभा राहिला. यावर श्रीकृष्ण गुरुंनी त्याला आज्ञा केली. ''स्वग्रामाला / वाडीला जावे. भगवद् भजन अहर्निशी करुन सुख प्राप्त करावे'' श्रीकृष्ण गुरुंची आज्ञा होताच श्रीगुरु चिंतन करीत तो वाडीचा ब्राम्हण पुजारी वाडीस निघून गेला.

एक वृध्दा करवीरी राही. उपजीविकेचे साधन म्हणून पडवळाचा वेल तिने घरी लावला होता. त्या वेलीला भरपूर पडवळे लागत. एकदा श्रीकृष्णा गुरु / स्वामी तिच्या घरी गेले. त्यांनी पडवळाचा वेल उपटून टाकून चालू लागले. पडवळाच्या वेलावर म्हातारीची उपजीविका असल्यामुळे रागाने शिव्या देवू लागली. शिव्या देत स्वामींच्या पाठीमागे लागली. शिव्या देत जशी पाठी लागली तशी स्वामींची बटु मूर्ती पुढे धावू लागली. शिव्या देवून देवून ती वृध्दा थकली. क्षणात स्वामी गुप्त झाले. तोंडाळ वृध्दा स्वामींना शिव्या देत होती. स्वामीने माझे वाटोळे केले म्हणत होती. पडवळाचा वेल स्वामीने उपटून टाकल्यामुळे आता पडवळे कुठली असे म्हणून डोक्याला हात लावून बसली. आसपासचे लोक तिला म्हणू लागले. ''स्वामींनी तुझे वाटोळे केले नाही. स्वामींना शिव्या देवू नको'' कांही दिवसाने तिचे पूर्वसुकृत जागे झाले. तिच्यात परिवर्तन झाले. ती स्वामींच्या दर्शनाला वैराग्य मठीत आली. तिने स्वामींना साष्टांग दंडवत घालून म्हणू लागली. ''क्षमा करा म्हातारीला उपजीविकेसाठी पडवळाचा वेल जपला.

तुम्हांला शिव्या दिल्याचा पश्चाताप झाला.'' यावर स्वामी तिला दयेने म्हणाले, ''घरी जा पडवळाचा वेल बघ जा'' ती वृध्दा लगबगीने घरी गेली वेलावर तिने दृष्टी टाकली तो काय आश्चर्य. खुडलेल्या/उपटलेल्या पडवळाच्या वेलाच्या ठिकाणी अनेक अंकुर फुटले होते. ते पाहून त्या वृध्देचे नेत्र अश्रुंनी डबडबले. पुढे तो पडवळाचा वेल गगनाकडे वाढत गेला. पडवळे लटकली ते पाहून त्या वृध्देस अतिशय आनंद झाला.

करवीरात स्वामींचे महिमान / महती ऐकून एका तरुणी म्हणे घ्यावे दर्शन स्वामींचे. परंतु तिच्या पतीच्या अंगी नास्तिकपण असल्यामुळे दर्शनाला जाऊ देत नसे. एकदा पर्वणी चालून आली. पर्वणीनिमित्त पंचगंगा स्नान करावे तेंव्हा सद्‌गुरु / स्वामी भेटतील असे तिला वाटले. स्वामी दर्शनाची ती चिंतन करु लागली. तिची चिंता जाणून स्वामी त्या दिवशी पंचगंगातीरी जावून बसले. इतर स्त्रिया संगे ती तरुणी पर्वणीनिमित्त पंचगंगा स्नान करण्यासाठी आली. अकस्मात श्रीगुरु कृष्णमूर्ती पाहिली. तिने गुरुचरणी मस्तक ठेवले. अशारीतीने बऱ्याच दिवसाची श्रीगुरु दर्शनाची तिची इच्छा पूर्ण झाली. तिला अतिशय आनंद झाला. तिला पाहून श्रीकृष्ण गुरु म्हणाले ''आपला पती हाच देव मान त्याच्या सेवेत सर्व सुख आहे. तुझ्या नशिबी एक कन्या आहे. मी सांगितलेले चित्ती ठेव'' तिला जा म्हणून स्वामी गुप्त झाले. कोण माझे भाग्य म्हणून त्या तरुणीच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळू लागले. स्वामी दर्शनाचा लाभ होता सर्व स्थायीभाव, हाव ती विसरली व संतुष्ट झाली. सुखाने संसार करु लागली.

आरळेकर नावाचा सधन गृहस्थ करवीरात राहत होता. त्याला दोन पत्नी होत्या. त्याला पुत्र कन्या होत्या. साधू संतापायी त्याला आदर होता. घरी कांही न्यून नव्हते. साधुसंतांपायी धन खर्चत असल्याने कांही लोक त्याची मूर्ख म्हणून निंदा करीत. धर्माकारणे / वित्त / धन खर्चता त्याची बायका मुले त्याच्या नांवाने ओरडत / रडत. धर्मकर्मी / वित्तव्यय होऊ नये म्हणून त्याच्या घरी मेव्हणाच बलवान झाला. थोडेफार धन / द्रव्य खर्चाला आरळेकरांना देत असे. जो कांही थोडाफार पैसा हाती पडे तो आरळेकर दानधर्मात खर्च करीत असे. दोन वेळा भोजन घालून दरमहा किंचित धन त्याचा मेव्हणा त्याला देत असे. त्यातच दानधर्म करुन चित्ती समाधान मानून आरळेकर दैवाला दोष देवू लागला. अशाही परिस्थितीत श्री गुरुवरती विश्वास ठेवून श्रीगुरुंच्या दर्शनास तो नित्य येत असे. अशा तऱ्हेने पाच वर्षे लोटली. सुख गेले शून्यात.


एकदा पंढरीला वारीला जाणारे लोक पाहून त्याला पंढरीला जावून विठ्ठल दर्शन घ्यावे वाटले. वैराग्य मठीत येवून स्वामींना पंढरपूरला जाण्याची आज्ञा मागितली. परंतु स्वामींनी आज्ञा दिली नाही.तरीही तो पंढरपूरला निघाला मिरजेपर्यंत चालत पोहचला. पुढे चालत जाण्यास त्याच्या अंगात त्राण उरला नाही. प्रवासाने पाय दुखू लागले. तरीही नामस्मरण करीत तो पंढरपूरला निघाला. रस्त्यात त्याला एक बैलगाडीवान भेटला त्याने आपणहून आरळेकरला विचारले ''कोण आपण कुठले? जाणे कोठे?'' त्यावर आरळेकर त्या बैलगाडीवानाला

म्हणाला ''मला कोणाचा आधार नाही पंढरी जाणेचा आहे विचार. पायी आलो इथवर शरीर आता थकले''यावर तो गाडीवान आरळेकरांना म्हणाला, ''मीही निघालो विठ्ठल दर्शनाला. तुमची माझी एकच भावना न कांही याचना माझ्या बैलगाडीत बसा. मीही विठ्ठल मूर्ती पाहाया पंढरपूरला निघालो आहे.'' बैलगाडीवानाची विनंती ऐकून आरळेकर बैलगाडीत बैसला व सुखाने त्याच्या संगती श्रीक्षेत्र पंढरपूरला नामस्मरण, भजन करीत पोहचला. एकादशीचा दिवस तो. बैलगाडीवान व आरळेकर यांनी मनसोक्त विठ्ठल दर्शन केले. परतीच्या प्रवासात एकही पैसा आरळेकराच्या खिशात उरला नाही. उलट बैलगाडीवानानेच त्याला धीर देत त्याचा सर्व खर्च केला. हळू हळू तो करवीरला आला. आरळेकराने बैलगाडीवानाला त्याच्या घराकडे येण्याची विनंती केली. परंतु त्यांने ती मान्य केली नाही. ''मी केलेली वाट खर्ची येथेच आणून द्या'' असे आरळेकराना सांगून तो बैलगाडीवान करवीराच्या वेशीवरच थांबला. कोणाचेही कष्ट फुकट घेवू नये. थोडेफार जे जवळ असेल ते देवून थोडे का होईना परत करावे असा विचार करुन आरळेकर द्रव्य / धन घेवून परत त्या बैलगाडीवाल्याला कांही पैसे देणेसाठी गेला. बैलगाडीवाला जेथे थांबला होता तेथे आरळेकर आला. तेथे बैलगाडीवाला दिसेना. तेथे चार चौघांना विचारले पण बैलगाडीवानाचा थांगपत्ता लागेना. बैलगाडीवानाचा शोध घेण्यात रात्र झाली. बैलगाडीवान आरळेकरांना फसवून गेला असे त्याला वाटले. बैलगाडीवान हा सामान्य मनुष्य नसून देव अवतारी असावा असे वाटले. अशा विचारातच आरळेकराला झोप आली. झोपेतच श्रीकृष्ण गुरु स्वप्नात आले व म्हणाले ''गाडीवानाचा शोध तू करु नकोस. गाडीवान घरी गेला तुझा श्रीक्षेत्र पंढरपूरला जावून श्री विठ्ठल दर्शन घेणेचा निर्धार पूर्ण करणेसाठी मीच गाडीवान झालो. गाडीवानाला पैसे / द्रव्य देणेचा विचार सोडून दे जसा ज्याचा भाव चरणी घेता धाव'' असे म्हणून श्रीकृष्णगुरु गुप्त झाले.

*****



# षट्-चक्र दर्शन आणि कुंडलिनी जागृती




रक्तवर्णी मूलाधारचक्र, पीतवर्णी स्वाधिष्ठानचक्र
नीलवर्णी मणिपूरचक्र, पिंगटवर्णी अनाहतचक्र
धूम्रवर्णी विशुद्धचक्र, विद्युद्वर्णी अग्निचक्र
शुद्धस्फटिकवर्णी सहस्रदलचक्र व ऊर्ध्वगामी कुंडलिनी

## ।। अध्याय २२ वा ।।



श्री नृसिंह सरस्वती दत्त महाराज, नृसिंहवाडी

### ▪ विषयसूची....!

१) रामा मांगाच्या खांद्यावर श्री स्वामी बसले
२) शिरोळच्या यमाताईची बाकी चुकती
३) शिरोळचा बाबाजी (बुवाजी) पाटील व कुटवाडकर पाटील
४) बावड्याचे सोंगी भजन
५) कोल्हापुरातील बायजाई कदम

## अध्याय २२ वा

राम जन्मला मांग जातीत. गुरुपदी चित्त ठेवी अभंग. नीच जातीत जन्म घेतला असला तरी श्रीगुरुभक्तीची आवड त्याला होती. श्रीकृष्णगुरु त्याला सोबत घेऊन फिरत. कोणी भक्त श्रीकृष्ण गुरुंना उचलून खांद्यावर घेत तेंव्हा रामाला खंत वाटे. माझी अधम जात असल्यामुळे, नीच कुळ असल्यामुळे, जातीचा विटाळ धरत असल्यामुळे श्रीकृष्णगुरुंना खांद्यावर बसवून / घेवून फिरण्याची इच्छा त्याला अशक्य वाटे. श्रीकृष्णगुरु आपल्याला कसे जवळ करतील. अशी खळबळ त्याच्या मनात उठे. रात्रंदिवस या खळबळीने रामा मांग झुरतसे. एकदा श्रीकृष्णगुरु रामा मांगाला बोलले ''गंगा चालली भरुन. गंगा स्पर्शे अंग, यातीकुळ पावन करुन घे. आम्हांला घोडा आणून दे. तुझे इच्छित पूर्ण होईल. मनोरथ पूर्ण होईल. पाहाया जाऊ कृष्णाबाई'' श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून रामा मांगाने द्रव्य खर्चून घोडा घेवून आला. गुरु त्यावर बसुनी आनंदाने फिरायला जात. पुढे कांही काळ लोटला. वासु दळवी, धारवाडकर, कृष्णा लाड, परांडेकर, गोविंद व्यास, म्हादबा पटकार, रामा मांग या सर्व सेवकजनाबरोबर घोड्यावर बसून श्रीकृष्णगुरु नृसिंहवाडीला निघाले. वाडी जवळ येताच घोड्यावरुन श्रीकृष्णगुरु खाली उतरले व रामा मांगाला बोलले ''तुझ्या स्कंधी आम्ही बसू मला खांद्यावर घे.'' श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून रामा मांग त्यांचे चरण नमन करुन म्हणाला ''हेची इच्छा मी केली'' असे म्हणून मग खांदा खाली करुन श्रीकृष्णगुरुंना खांद्यावर बसविले. भजन करीत, श्रीराम कृष्ण, गोविंद माधव म्हणीत भक्त/ सेवक मंडळीसह श्रीकृष्णगुरु वाडीत पोहचले. अशा रितीने रामा मांगाचा श्रीकृष्णगुरुंना खांद्यावर घेवून फिरण्याचा छंद श्रीकृष्णगुरुंनी पूर्ण केला.

नृसिंहवाडीत स्नान करुन श्रीदत्त दर्शन घेऊन आनंदाने भजन करीत शिरोळ गांवात आले. एका ठिकाणी श्रीकृष्णगुरु सेवकजनात बसलेले असतांना इतक्यात कोणी ब्राम्हण स्त्री शिरावर कुंभ घेऊन सत्वर घराकडे निघालेली श्रीकृष्णगुरुंनी पाहिली व तिला म्हणाले, ''यमाताई बाकी करीतो चुकती. तुझ्यासाठी करुनी घाई आलो.'' असे म्हणून श्रीकृष्णगुरुंनी तिच्या ओटीत नारळ घातला पुढे नवमास पूर्ण झाले. उत्तम पुत्र रत्न यमुताईला झाले. अशा तऱ्हेने यमाताईवर गुरुकृपा झाली. शिरोळहून श्रीकृष्णगुरु मिरजेच्या कृष्णाघाटावर वास्तव्य करुन राहिलेल्या आपल्या लहान बंधूच्या / मल्लंभटजीच्या भेटीला आले. मिरजेला कृष्णाघाटावर श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला अनेक भक्त/ लोक दर्शनाला येऊ लागले. कोणी म्हणती व्याधी भंग करा. त्यातीलच एक स्त्री म्हणाली ''गुरुराया, स्त्री जन्म माझा वाया गेला. येऊ द्यावी कांही दया. पुत्र एक पोटी द्या.'' यावर श्रीकृष्णगुरु तिला म्हणाले, ''दुसऱ्या घरचा दिवा, घरी आणून लावा. दोष देऊ नका देवा. मुलाचा ठेवा तुम्हांला प्राप्त नाही'' पुढे त्या स्त्रीने अनेक उपाय केले. यश न आले. मग घेतला पुत्र दत्तक अशा तऱ्हेने श्रीकृष्णगुरुंचे बोल / वचन सत्य झाले.

बाबाजी पाटील नावाचा इसम शिरोळ गांवात रहात असे. त्याचा मेव्हणा शेतीवाडी, उद्योग सांभाळून कुटवाड गांवी रहात असे. तो कुटवाड गांवचा पाटील होता. पुढे त्याला काळ विषम

आला, त्याला वाईट दिवस आले. बाबाजी पाटलांच्या या मेव्हण्यावर कपटी लोकांनी नजर ठेवून खोटा आरोप लादून, त्याला दोषी ठरविले. खोटे दोषजाल पसरले. वैऱ्यांनी वेळ साधली. वरिष्ठ अधिकऱ्याने संशयाने कुटवाडच्या पाटलाला कारागृहात / तुरुंगात टाकले. मग बाबाजींची बहिण सांगू लागली रडून बाबाजी ते नीट ऐकून बहिणीला म्हणाला ''मेव्हण्याचे संकट हरण श्रीकृष्णगुरुच करतील'' म्हणून बाबाजी पाटील कोल्हापुरला वैराग्य मठीत आला व स्वामींना म्हणाला, ''मेव्हण्याचे संकट दूर करा. मुक्त होऊन माघारा येताच शत रुपये खर्चीन मी. मेव्हणा माझा नव्हे कपटी, परि पडला संकटी. अंगा व्यर्थ आली अपकीर्ती, निर्दोष होता मुक्त, खर्चिन शत रुपये अन्नदान प्रीत्यर्थ'' अशा प्रकारे प्रार्थना करुन नवस करुन बाबाजी पाटील शिरोळला परत आला. पुढे विशेष प्रयत्न करुनही भाकेचे रुपये पण खर्चुन सर्वस्व पणाला लावूनसुध्दा अपार द्रव्य खर्चुनही न्यायालयी यश आले नाही. न्यायाधिशाने खुटवाडकर पाटलाचा मोठा दोष धरुन पांच वर्षे कारावास शिक्षा दिली / केली. ही आलेली मोठी आपत्ती पाहून बाबाजी पाटील मग घाबरा होऊन सत्वर ताराघरा आला. श्रीकृष्णगुरुंनी त्याच्याकडे पाहिले सुध्दा नाही. यामुळे तो गलबलून गेला व विनवू लागला ''कृपा येवू द्या गुरुराया'' यावर श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले ''सरकारात भरली खंडणी. आम्ही लावली असती कारणी. दूष्ट तुझी विचार सरणी. कृष्णास आधी वाटणी देवून बघ. मेव्हणा तुझा सुटून येईल.'' बाबाजी पाटलास श्रीकृष्णबोल समजून आले. तो श्रीकृष्णगुरुंना म्हणाला, ''देवा मला भूल पडली. एक वेळ क्षमा करावी.'' मग पश्चाताप पावून, शत रुपये जमवून समराधना/अन्नदान करुन श्रीकृष्णगुरुंच्या आज्ञेने न्यायालयाच्या कामी लागला. मग एक हेतुवादी धूर्त वकील देवून, रुपये खर्चून मेव्हण्याची सुटका बाबाजी पाटलाने केली. गुरु बोलाची सत्यता पटली. बाबाजी पाटील व त्यांचे मेव्हणे खुटवाडकर पाटील कोल्हापूरला वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला आले व आनंदले.

कोल्हापूरला कसबा बावडा उपनगर असून तेथे छत्रपतींचा राजवाडा आहे. तेथेच लाईन बाजार नांवाचा भाग आहे. तेथील लोक सोंगी भजन करीत. निरनिराळी सोंगे सजवीत. करवीर वासियांना हे सोंगी भजन आवडे. सोंगी भजन बघण्यास मोठी गर्दी होत असे. श्रीकृष्णगुरुंची कीर्ती ऐकून त्यांची परीक्षा घेण्याचे त्या सोंगी भजनवाल्यानी ठरविले. संन्याशी, साधूंची सोंगे नटवून एका सायंकाळी वैराग्य मठीत हे सोंगी भजनवाले आले. श्रीकृष्णगुरुंची परीक्षा घेण्याचे सोंगी भजनवाल्याने ठरविले होते. पण त्यांचा बेत श्रीकृष्णगुरुंनी आधिच जाणला होता / ओळखला होता. कुटील हेतुचे लोक त्यांना चालत नसत. श्रीकृष्णगुरु भक्तांना आधिच म्हणाले ''उद्या गंमत करु तयार रहा. धडधाकट साधु दर्शनास येणार आहेत. त्यांना औदुंबरखालती न्यावे. दार लावून त्यांचा समाचार घ्यावा'' सायंकाळच्या आरतीचा गजर झाला. श्रीकृष्णगुरुंची सोंगाड्यावर नजर होती. खोटे ते संन्याशी, साधू नजरेला नजर लावत नव्हते. आरती समाप्त झाली. गर्दीचा ओसर होताच श्रीकृष्णगुरु त्यांना म्हणाले, ''आत चला लवकर'' त्यांना ते वाटले खरोखर ते सर्व खोटे संन्याशी, साधू आत गेले. आत जय्यत तयारी होती. त्या खोट्या

संन्याशी / साधूंच्या अंगावर धडधाकट हात पडले. भरपूर मार बसला. त्यांच्या अंगाचा माराने खुळखुळा झाला. अंगावरच्या माळा तोडून ते श्रीकृष्णगुरुंची क्षमा याचना करु लागले. दार उघडून श्रीकृष्णगुरु आत आले. गुरु चरणी भोंदू लोळू लागले. आमचे खोटे सोंग आंम्हाला बाधले. यातून सोडवा म्हणू लागले. श्रीकृष्णगुरुंच्या आज्ञेने मार थांबला. प्रत्येक जण भांबावला. कपड्यांची शुध्दी कोणाला राहिली नाही. लज्जा रक्षण कसेतरी झाले ''सत्पुरुषाची परीक्षा बरी नव्हे. फुका पासरी मेलो असतो. संशय आमुचा दूर पळविला'' असे म्हणून त्या खोट्या संन्याशी, साधूनी श्रीकृष्णगुरुंची पायी श्री दत्त म्हणून लोटांगण घातले व निघून गेले.

कोल्हापूरात पंचमुखी चावी शेजारी बायजाई कदम नांवाची स्त्री राहात असे. तिची श्रीस्वामींच्यावर अत्यंत निष्ठा, भक्ती होती. ती दिवसभर श्रीस्वामींच्या सहवासात असे. बायजाईच्या मुलाचे नाव गणपती होते. एका सराफी दुकानात गणपती राबत असे. पुढे त्या सराफी दुकानाच्या मालकाचा गणपतीने विश्वास संपादन करुन, प्रेम संपादन करुन त्याने सराफी दुकान स्वतंत्रपणे थाटले. गणपतीला सराफी धंद्यात श्रीस्वामी कृपेने भरपूर यश मिळत गेले. आता गणपतीला लग्नासाठी मुली सांगून येवू लागल्या. त्याला सुयश, सुवेळ श्रीस्वामी कृपेने आली. बायजाई आपला पुत्र गणपतीच्या लग्नाचा विचार करु लागली. सांगून आलेल्या मुलीमध्ये बायजाईला जाधवांची कमळा बरी वाटली. ही गोष्ट बायजाईने श्रीस्वामींच्या कानावर घातली. एकदा बायजाई जाधवांच्या कमळाला घेऊन श्रीस्वामींच्या दर्शनाला व वधू म्हणून गणपतीला कमळा शोभते का? हे विचारण्यासाठी श्री शिर्केंच्या घरी आली. श्रीस्वामींनी कमळाला निरखून म्हणाले, ''गणपतीला ही कमळा नवरी/ वधू शोभते'' व लक्ष्मीकांत पुत्रकांत म्हणून कमळाच्या मस्तकावर अक्षता टाकल्या. श्री गणपतीनेही हा श्रीस्वामींचा आशिर्वाद समजून घेतला व पुढे लवकरच गणपती कमळाचा विवाह झाला. लवकरच गणपतीची स्वत:च्या व्यवसायात भरभराट झाली. त्याने बायजाईच्या इच्छेखातर नृसिंहवाडीला ऊन-वारा-पाऊस यापासून भक्तांचे संरक्षण होण्यासाठी मोठा सभामंडप बांधून दिला. बायजाई दिवसभर श्रीस्वामी सानिध्यात असे. रात्री धुपारती झाल्यानंतर ताराईच्या घरी प्रसाद घेऊन घरी जाई. बायजाईवर श्रीस्वामींची कृपा होती. तिच्या घरी धन/समृध्दी आली, सकस जमीन आली. अशा रितीने बायजाई कदमचे घराणे श्रीस्वामींनी सुखी केले. श्रीस्वामींना भजन आवडे. गणपती भक्तगण जमवून दर एकादशीला भजन करी. आजही भजनाची ही परंपरा गणपतीची नातवंडे व पुढील पिढी चालवते. अशा तऱ्हेने श्रीस्वामी कृपेने बायजाई कदमने पुण्यमंदिर उभा केले.

*****

# यमुताई कुलकर्णी यांची माहिती

स्व. यमुताई अंतोबा कुलकर्णी यांचे माहेर शिरोळ. त्यांचा कोल्हापुरला जोशींच्या घरी विवाह. त्यांना बरेच दिवस मूल नव्हते. एकदा स्वामी शिरोळकडून मिरजेला भावाकडे निघाले असता त्यांनी यमुताईला पाहिले व म्हणाले ''यमुताई इकडे ये. तुझी बाकी चुकती करतो.'' यमुताई डोक्यावर पाण्याची घागर घेवून निघाली होती. तिने घागर खाली ठेवली. कुंभार स्वामीनी यमुताईंच्या ओट्यात नारळ घातला पुढे त्यांना मुलगा झाला. ब्राम्हणपुरीत भोजनपात्र मंदिराजवळील घरात हा प्रसंग घडला. त्या मुलाचे नांव खंडू ठेवणेत आले. मिरजकर तिकटी जवळ जोशी वाडा हे त्यांचे कोल्हापुरातील स्थान होते. पुढे हा मुलगा मोठा होवून वारला.

# स्व. बाबाजी (बुवाजी) पाटील शिरोळ यांची माहिती

स्व. बुवाजी पाटील हे शिरोळला रहात होते. त्यांच्या बहिणीचे नांव येसुबाई हे होते. त्यांना कुटवाडाला स्व. भाऊसो पाटील यांना दिले होते. स्व. भाऊसो पाटील यांचे पुतणे कुटवाडचे गांव कामगार पाटलू पाटील होते. त्यांचे पूर्ण नांव स्व. दादासाहेब पांडुरंग पाटील. त्यांनाच पाटलू पाटील म्हणत. त्यांना दोन पत्नी होत्या. पहिली पत्नी शिपूर (ता. मिरज) येथील सूर्यवंशी / पाटील घराण्यातील होती. दुसरी पत्नी शिरोली (जि. कोल्हापूर) येथील पाटील घराण्यातील होती.

स्व. पाटलू पाटील यांना एक भाऊ होता. त्यांचे नांव स्व. हिंदुराव पांडुरंग पाटील होय.

स्व. पाटलू पाटील यांना तीन बहीणी होत्या.

**१) गंगूबाई –** यांचे लग्न शिरदवाड (इचलकरंजी) येथील स्व. बाळा पाटील यांचे बरोबर झाले होते. स्व. बाळा रघुनाथ पाटील, शिरदवाड हे छ. शाहू महाराज, छ. राजाराम महाराज यांच्या जवळचे मित्र होते.

**२) चंद्राबाई –** यांचे लग्न शिरोलीच्या स्व. गोविंद पाटील यांच्या बरोबर झाले होते.

**३) विठाबाई –** यांचे लग्न शिरोलीच्या स्व. महादेव पाटील यांच्या बरोबर झाले होते.

स्व. बुवाजी पाटील यांची बहिण येसुबाई यांचे कुटवाडच्या स्व. भाऊसो पाटील यांच्या बरोबर लग्न झाले होते. ते स्व. पाटलू पाटील यांचे चुलते होते. त्याकाळी मिरजेत एका मोठ्या श्रीमंत घराण्यावर दरोडा पडला. दरोडेखोरांनी लुटलेला पैसा अडका, सोने / नाणे घेवून कुटवाडकडे पोबारा केला. त्यामुळे मिरज संस्थान व ब्रिटीश पोलिस दलाने कुटवाड गांवाला वेढा दिला. तसेच गांव कामगार पाटील यांची दरोडेखोरांना फूस आहे अशी अफवा त्यांच्या वितुष्टांनी पसरविल्याने स्व.पाटलू पाटील यांना अटक करुन तुरुंगात टाकले. स्व. पाटलू पाटील हे आपल्या चुलत्यांच्या बरोबर एकत्रित रहात होते. त्यामुळे सर्व कुटवाडकर पाटील काळजीत पडले. स्व. बुवाजी पाटलाच्या कानावर बहिणीने घराण्यावर आलेला नामुष्कीचा प्रसंग रडून

कानांवर घातला. स्व. बुवाजी पाटलाने बहिणीला धीर दिला. प्रसंग तर मोठा बाका आलेला. कुटवाडच्या पाटील घराण्यातील त्यांचा मेव्हणा, त्यांचा पुतण्या व इतर कर्तबगार माणसं तुरुंगात गेलेली. शिरोळच्या यमाताईला कोल्हापूरच्या कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या कृपेने मुलगा झालेला बुवाजींना माहित होता. म्हणून स्व. बुवाजी पाटील बहिणीला घेवून कोल्हापूरला कुंभार गल्लीतील ताराबाईंच्या घरी श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला गेले. स्व. बुवाजीनी श्री दत्त महाराजांच्या कानांवर आपल्या बहिणीवर आलेल्या संकटाची माहिती घातली. कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांनी स्व. बुवाजी पाटलाला शंभर रुपये खर्चून गोर गरीबांना अन्नदान कर म्हणजे कुटवाडकर पाटलांची सुटका तुरुंगातून होईल व बहिणीवरचे संकट दूर होईल असे सांगितले. स्व. बुवाजी पाटलानेही तसा नवस बोलून शंभर रुपये बाजूला काढून ठेवले. भाग बांधून ठेवला.

पुढे कोर्ट खटला चालू राहिला. नवस फेडणेसाठी भाकेचे बांधून ठेवलेले शंभर रुपयेही खर्च केले. अफाट पैसा खर्च केला. परंतु यश आले नाही. यात पाटलू पाटील यांना पाच वर्षांची तुरुंगवासाची न्यायाधिशानी शिक्षा सुनावली. स्व. बुवाजी पाटलांची बहिण रडत शिरोळच्या स्व. बुवाजी पाटलाकडे आली. स्व. बुवाजी पाटलाने तिला धीर दिला व तिला कोल्हापूरला कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराज यांचेकडे ते घेवून गेले. स्व. बुवाजी पाटलाला श्री दत्त महाराज म्हणाले, ''बुवाजी, कुटवाडकर पाटलांची तुरुंगातून सुटका होण्यासाठी गोर गरिबांना शंभर रुपये खर्च करुन अन्नदान करतो म्हणून नवस बोललास. नवसाचे शंभर रुपये जे भाग बांधून ठेवले होते तेही कोर्ट कामासाठी खर्चून टाकलास. सरकार जमा केलास. तेच जर शंभर रुपये खर्चून गोर गरिबांना अन्नदान केले असतेस तर आजचा प्रसंग आला नसता. तुझी बुध्दी बरोबर नाही.'' श्री दत्त महाराजांच्याकडे झालेल्या अपराधाची क्षमा मागून शंभर रुपये जमवून त्यांने गोर गरिबांना अन्नदान केले. पुढे एक धूर्त, हेतुवादी, हुशार वकील स्व. बुवाजीने कोर्ट कामासाठी नेमला. पुढे खटला पुन्हा चालला. श्री दत्त महाराजांच्या कृपेने कुटवाडकर पाटील निर्दोष सुटला. पुढे पुन्हा स्व. बुवाजी पाटील, स्व. पाटलू पाटील व इतर कुटवाडकर पाटील यांना कोल्हापूरला श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला घेवून गेले. अशा रीतीने कोल्हापूरच्या कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या कृपेने स्व. बुवाजी पाटील यांचा मेव्हणा व त्यांचा पुतण्या, गांव कामगार पाटील, स्व. पाटलू पाटील हे कोर्टातून निर्दोष सुटले व त्यांना झालेली तुरुंगवासाची शिक्षा चुकली.

स्व. पाटलू पाटील यांना दोन मुले १) गणपतराव व २) राजाराम. गणपतराव यांना एक मुलगा बाळासाहेब सध्या हयात आहेत. राजाराम यांना एक मुलगा सुधीर सध्या हयात आहेत.

**१. स्व. बुवाजी पाटील यांना एक मुलगा स्व. बाळाजी**

**२. स्व. बाळाजी पाटील यांना दोन मुले**

**१) स्व. आण्णासाहेब २) स्व. लालासाहेब**

**३. स्व. आण्णासाहेब यांना तीन मुले**

**१) स्व. दत्ताजीराव २) श्री शंकरराव ३) श्री गजानन**

**४. स्व. लालासाहेब यांना दोन मुले**

**१) फत्तेसिंहराव २) स्व शिवाजीराव**

**५. स्व. फत्तेसिंहराव यांना एक मुलगा श्री लक्ष्मणराव**

**६. स्व. शिवाजीराव यांना तीन मुले**

**१) श्री अमर पाटील (सध्या शिरोळचे नगराध्यक्ष आहेत)**

**२) श्री प्रतापराव पाटील**

**३) वीरसेन पाटील (मयत)**

शब्दांकन :- **श्री प्रकाश पाटील,** अर्जुनवाड
- **श्री बाजीरावनाना ढवळे,** अर्जुनवाड

# स्व. बायजाई कदम यांची माहिती

स्व. बायजाई पांडुरंग कदम या पंचमुखी चावीजवळ म्हणजे श्री अंबाबाई मंदिराच्या दक्षिणेला जवळच रहात. त्या रोज श्री अंबाबाई मंदिरात जात. श्रध्दा भावनेने मंदिरात काम करुन दर्शन करुन कुंभार गल्लीतील शिर्केच्या घरी श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला येत. दिवसभर श्री स्वामींच्या सहवासात, ताराईच्या सहवासात वेळ घालवित, सेवा करीत. दोनप्रहरचे जेवण, रात्री धुपारती आटोपून प्रसाद घेवून त्या आपल्या घरी परत येत. दुसऱ्या दिवशी त्या पुन्हा ताराईच्या घरी जात. अशी बरीच वर्षे त्यांनी ताराईच्या घरी श्री दत्त मठीत व्यतीत करुन सेवा करुन घालवली. त्यांना गणपती (गणेश) नांवाचा एकच मुलगा होता. दुसऱ्यांच्या सराफी दुकानात तो काम करुन अर्थाजन करीत असे. कष्टाळू स्वभाव, प्रामाणिकपणा, सचोटी, सराफी धंद्यातील ज्ञान यामुळे गणपतीचा मालक त्याच्यावर खुष झाला. गणपतीने आपल्या दुकान मालकाचा विश्वास संपादन, प्रेम संपादन करुन स्वत:चा सराफी व्यवसाय सुरु केला. श्री कुंभार स्वामींच्या आशीर्वादाने गणपतीचे सराफी दुकान, सराफी धंदा लवकरच नांवा रुपाला आला. गणपतीची आर्थिक परिस्थिती सुधारली. बायजाईने आता गणपतीच्या लग्नाचा विचार चालविला.

कोल्हापूरातीलच जाधव कुटुंबातील कमळा नांवाची मुलगी बायजाईला पसंत पडली. बायजाई व गणपती यांची पूर्ण श्रध्दा कुंभार स्वामींच्यावर होती. बायजाई जाधवांच्या कमळाला घेवून ताराईच्या घरी म्हणजे श्री दत्त मठीत आली. कमळाला तिने श्री स्वामींना दाखवून ''ही मुलगी गणपतीला करायची आहे असे सांगितले. गणपतीला ही मुलगी शोभते का?'' श्री स्वामींनी कमळाकडे निरखून पाहिले व कमळाच्या डोक्यावर अक्षता टाकून म्हणाले, ''आम्ही त्याचे लग्न लावले. गोकुळ नांदेल जा घरी'' बायजाईला हा शुभ शकुन वाटला. बायजाईने

गणपतीला श्री स्वामींचा वृत्तांत व आशीर्वाद सांगितला. संसार सुखाचा होईल सांगितले. पुढे सर्व जुळून आले. गणपती व कमळाचे लग्न श्री स्वामींच्या कृपेने चांगल्या प्रकारे पार पडले. बायजाईवर व गणपतीवर श्री स्वामींची कृपा होती. त्यांच्या कृपेने गणपती सधन झाला. समृध्द झाला. शेतीवाडी, जमीन त्याने घेतली. त्याला श्रीमंती प्राप्त झाली. एकदा गणपती बायजाईला घेवून नृसिंहवाडीला गेला असता बायजाईने गणपतीला येणाऱ्या भक्त लोकांसाठी मंडप बांधणेस सांगितले. जेणे करुन त्यांना उन्हांचा त्रास होणार नाही. त्याने आईच्या आज्ञेला मान देवून मंडप बांधला. अशा तऱ्हेने कुंभार स्वामीने बायजाईचे घराणे सुखी, समृध्दी केले. स्वामींना भजनाची आवड. गणपती दर एकादशीला सर्वांना घेवून भजनसेवा करु लागला. पुढील पिढीनेही हा नियम चालविला. बायजाई नेहमी प्रमाणे श्री अंबाबाई मंदिरात दर्शनाला / सेवेला गेली असतांना हृदयविकाराचा झटका येवून त्या श्री स्वामी चरणी लीन झाल्या. त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ७० वर्षांचे असावे. बायजाई पांडुरंग कदम यांना एकच मुलगा. त्यांचे नांव गणपती (गणेश) पांडुरंग कदम, गणपती कदमांच्या पत्नीचे नांव कमळाबाई. गणपती (गणेश) व कमळाबाईना तीन सद्गुणी मुले झाली. त्यांची नांवे पुढील प्रमाणे

१.रामराव गणेश कदम २.नारायण गणेश कदम ३.शंकरराव गणेश कदम. नारायण गणेश कदम यांना तीन मुले **१) मुरलीधर कदम २) जयंत कदम ३) रमेश कदम.** नारायणराव कदमांचे चिरंजीव मुरलीधर नारायण कदम यांना स्व. माईसाहेब शिर्के यांची दोन नंबरची मुलगी मालुताई दिली होती. अशा प्रकारे ताराई शिर्के व बायजाई कदम यांचे नाते कायमपणे दृढ होत गेले.

शब्दांकन :- **श्री. प्रताप माने,कोल्हापूर**



स्व. दादासाहेब पांडुरंग पाटील उर्फ पाटलू पाटील, कुटवाड (ता. :- शिरोळ)



स्व. गणेश उर्फ गणपती पांडुरंग कदम, कोल्हापूर



स्व.कमळाबाई गणेश कदम, कोल्हापूर

# // समुद्र भरला आहे //

## ।। अध्याय २३ वा ।।



श्री सद्‌गुरु रांगोळी महाराज, मालवण

- **विषयसूची....!**

  १) स्व. रामकृष्ण कामत- चंद्रबाई मंगळसूत्र तुटले
  
  २) विशाळगडाच्या जहागिरदाराला अपत्य प्राप्ती
  
  ३) स्व. दत्तोबा करजगाराला टूक टूक मंत्र दिला
  
  ४) सदू -म्हादू- करणी उलटली

## अध्याय २३ वा

कोल्हापूरात रामकृष्ण कामत, दत्तोबा करजगार, कृष्णा लाड हे तिघे मित्र शुक्रवार पेठेत रहात. तिघेही भाविक स्वभावाचे होते. कुठल्याही मंदिरात भजन, कीर्तन असले की, ते तिघेही श्रवण करण्यास मिळून जात. कीर्तनात गुरु महती श्रवण करुन त्यांना गुरुविना जीवन व्यर्थ वाटू लागले. गुरुसाठी त्यांनी वैराग्य मठीत धाव घेतली. सिंहासनावर विराजमान असलेल्या श्रीकृष्ण गुरु त्यांना उद्देशून म्हणाले ''रामकृष्ण तू व्यापार कर. दत्तोबा तू यंत्र कर'' मनांतील प्रश्न श्रीकृष्ण गुरुनी न सांगता ओळखल्याने ते दोघे म्हणू लागले. ''अंतर्ज्ञानी आमुचे हे गुरु'' तसेच अनेकांच्या फंदात न पडता श्रीकृष्णगुरुंनी सांगितलेला धंदा त्यांनी करण्याचे ठरविले. रामकृष्ण कामतला श्री छत्रपती शाहूंचे कंत्राट मिळाले. राधानगरीचा मक्ता मिळाला. मोदीखान्यात धान्य पुरवू लागला. ऊर्जित अवस्था प्राप्त झाली. घोडागाडीत बसू लागला. रामकृष्ण कामतच्या पत्नीचे नांव चंद्राबाई होते. श्री रेणुकादेवीचा संचार तिला होई. अंबील प्रसाद घरी होई. श्रीकृष्णगुरु कधी कधी त्यांच्या घरी जाऊन आंबीलीचा प्रसाद प्राशन करीत. एकदा रामकृष्ण कामत भागीदारासह सोळांकुरला कामानिमित्त गेला होता. कंत्राटाच्या कामामुळे त्याच्याजवळ पैसा होता. हे ओळखून भागिदाराने गैबी मार्गे खिंडीत येताच त्याला लुटण्याचा बेत केला. भागिदाराने खिंडीत येताच रामकृष्ण कामतावर जंबीया उगारला. रामकृष्णाच्या प्राणावर प्रसंग बेतला. तो ऐनवेळी सुविचारी बनला. भागीदाराला पैसा देऊन मोकळा झाला.

इकडे पंचगंगेकाठी श्रीकृष्णगुरु सेवक वर्गासह फिरायला गेले होते. रामकृष्ण पत्नी चंद्राबाई श्रीकृष्णगुरुंना नमस्कार करण्यासाठी आली. तिने त्यांना नमस्कार करताच श्रीकृष्णगुरु तिला म्हणाले, ''मंगळसूत्र तुटले चंद्रे'' श्रीकृष्णगुरुंची वाणी ऐकून चंद्राने घाबरुन त्यांचे चरण धरले. मंगळसूत्र सतीचे वाण. श्रीकृष्णगुरुंची वाणी ऐकून तिला प्राण जातो की काय असे वाटले. ती घामेजून गेली. तिने श्रीकृष्णगुरुंचे पाय घट्ट धरले व पाय / चरण न सोडण्याचा निर्धार केला. असा प्रकार घडला बराच वेळ गेला. श्रीकृष्णगुरुंना तिचा कळवळा आला व ते म्हणाले, ''त्याला सोडविला जा.'' म्हणून गुरुंनी चंद्राबाईला कुंकू लावला. रामकृष्ण कामत घरी आला नंतर त्याने चंद्राला सारा वृत्तांत सांगितला. मग तो वृत्तांत ऐकून चंद्राला श्रीकृष्णगुरुनी प्राणांत संकटातून पतीला वाचविले हे कळून चुकले. तेंव्हापासून रामकृष्ण व चंद्रा या पती–पत्नीची श्रीकृष्णगुरु वरील श्रध्दा वाढली. पुत्र नसल्याने ते विव्हल होते हे श्रीकृष्णगुरुंनी ओळखून चंद्रास कडदोरा दिला. पुढे तिला पुत्र झाला. तो कडदोरा तिने मुलाच्या कमरेला बांधला. मुलाचे नांव त्यांनी श्रीधर ठेवले. मनुष्याच्या हाती पैसा येता विवेक चळतो / विवेक नष्ट होतो. मनुष्य चुका करतो. स्वस्त्रिशी नेक राहत नाही. रामकृष्ण पैशामुळे वहात गेला. एका स्त्रीच्या नादी लागला. त्यांचा मुलगा श्रीधर मुखी खडे घालून फोडू लागला. तापात बडबडू लागला. एकदा श्रीकृष्णगुरु चंद्राच्या घरी गेले. त्यांनी श्रीधराचे खाली डोके वर पाय केले.

त्याला पाठकुळीला घेऊन पंचगंगेत नेऊन बुडविले. मोळे ठोकले उंबऱ्यावर – ''रांड माघारी जाईल'' असे श्रीकृष्णगुरु म्हणाले, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे श्रीधरचा आजार कमी झाला. त्याला आराम वाटू लागला. पुढे थोडा त्रास झाला. चंद्राने श्रीकृष्णगुरुंना त्रास झाल्याचे सांगितले. यावर श्रीकृष्णगुरुनी खिडकीत मोळे ठोकून करणीचा पुरा बंदोबस्त केला. अशी श्रीकृष्णगुरुंची रामचंद्र – चंद्रा यांच्यावर कृपा झाली. त्यांचा पुत्र श्रीधर मोठा होताच त्याचे लग्न झाले. परंतु श्रीधर संसारात रमला नाही. पुढे त्याने पत्नी मुलाला न सांगता संन्यास घेतला.

ताराईचे गर्व हरण / अभिमान दूर करण्यासाठी श्रीकृष्णगुरु आपल्या सर्व सेवकजनासह प्रयागतीर्थावर आले. तेथून दळवी – लाडासह ताराईला सोडून निघाले. दळवी – लाडासह सह्याद्री माथ्यावर विहरत. भक्तांची सत्व परीक्षा घेत राजापूरला वास्तव्य करुन रहिले. प्रथम ते दळवी लाडासह मलकापूरला आले. विशाळगडचा जहागिरदार मलकापूरला वास्तव्य करुन रहात होता. त्यांना स्वामी ठायी आदर होता. जहागिदाराच्या राजवाड्यात श्रीकृष्णगुरु दळवी लाडासह गेले. ते देवघरात षोडशोपचार पूजा करीत होते. पूजा / आरती होताच त्यांनी मागे पाहिले. त्यांच्या मागे श्रीकृष्णगुरु दळवी – लाडांसह उभे होते. जहागिरदारांना आश्चर्य वाटले. त्यांनी गुरुंना आसन दिले. आसनावर गुरुंना बसवून त्यांची मनोभावे पूजा केली. जहागिरदाराचा शुध्द भाव गुरुंना आवडला. त्यांच्या अंतरीचा उदासपणा जाणून गुरुंनी त्यांना कडदोरा काढून दिला. प्रसाद म्हणून जहागिरदारानी कडदोरा स्वीकारला. जहागिरदार जरी होता जहागिरी उपभोगण्यास त्यांना वारस नव्हता. कडदोऱ्याचा प्रसाद प्राणा पलिकडे तो कडदोरा जपून ठेवला आहे. अद्यापी देवघरात जपून / पुजून ठेवलेला कडदोरा कोणीही पाहू शकतो. एका दिलेल्या कडदोऱ्याने जहागिरदाराला पुत्र दिला. तर दुसऱ्या कडदोऱ्याने जन्मलेल्या चंद्राच्या श्रीधराला संन्याशी बनविला. श्रीकृष्णगुरुंचा खेळ न कळे कुणाला. विधीलेखन तेच जाणती.

रामकृष्ण कामत, कृष्णा लाड या दोघांचा मित्र दत्तोबा करजगार हा मुळताच कुशल कारागीर होता. एकदा मित्रासह दर्शनाला आला असतांना श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले ''टूक टूक जर करशील भरभराट तुझी होईल. करवीरी नांव गाजेल'' श्रीकृष्णगुरुंची वाणी, आशीर्वाद समजून दत्तोबा करजगाराने यंत्र सहाय्याने धंदा थाटला. थाटलेला धंदा करवीरी आश्चर्याचा विषय झाला. त्याची राजदरबारी वार्ता कळली. छत्रपती शाहू राजाने कौशल्य पाहून इच्छित धन दिले. फाळा माफ करुन उद्योगाला हातभार लावला. गिरणीचा धंदा उत्तम चालला. त्याला विपुल पैसाही मिळाला. संतती, संपत्तीस वाण राहिली नाही. लोकांत मान / सन्मान मिळू लागला. त्याने कोल्हापूरची यंत्र उद्योगाने शान वाढविली. श्रीकृष्णगुरुंनी त्याला दिलेल्या ''टूक टूक'' मंत्र कामी आला. अशा तऱ्हेने श्रीकृष्णगुरुंनी करजगारावर कृपा केली.

सदूची श्रीकृष्णगुरुवर भक्ती होती. सदू न्हावी असून वैद्यीकाचे ज्ञानही त्याला होते. बऱ्याच दिवसापासून सदू श्रीकृष्णगुरुंच्या नित्य दर्शनाला वैराग्य मठीत येई. श्रीगुरुनाथच त्याला तारक

वाटत. जगाच्या घडामोडी ज्याला कळतात ते श्रीकृष्णगुरु सदूला म्हणाले ''माझी नाडी पहा. तातडीने सांग नाडी काय म्हणते.'' यावर सदू कांही बोलला नाही. परंतु भक्तांचा लळा पाळणाऱ्या श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून त्याला आनंद वाटला. एकदा नेहमीप्रमाणे सदू दर्शनाला आला असता श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''आज रात्री तू झोपू नको.'' श्रीकृष्णगुरु बोलावर विश्वास ठेवून तो त्वरीत घरी परत आला. रात्रभर जागा राहिला. पुढे त्याला चमत्कार दिसला. कोणी एक त्याचा वैरी दीर्घद्वेषाने मूठ मारल्याचे दिसून आले. त्याला मरण आले असे वाटले. परंतू रक्षणकर्ते श्रीकृष्णगुरु होते. अर्ध रात्र संपली होती. त्याच्या कानावर धों धों ध्वनी आला. तेंव्हा श्रीकृष्णगुरुंना तो आठवू लागला. त्यांचे नामस्मरण करु लागला. ते सबळ रक्षणकर्ते असल्याने कालत्रयी कांहीही घडणार नाही असे त्याला वाटले. सदूच्या मित्रांनी कपटयुक्ती करुनी मांत्रिका करवी मुठ मारली. परंतु दुसऱ्याच्या मुखाला काळे लावतांना आपलेच होते वाटोळे. सदूच्या मित्राने मूठ मारतांना मांत्रिकाला सदूचे नांव न सांगता चुकून म्हादू सांगितले. म्हादू हे त्याच्या मित्राचे मुलाचे नांव होते. अपरात्री मांत्रिकाने म्हादूच्या नावाने मूठ मारली. त्यात सदूच्या मित्राचा / वैऱ्याचा म्हादू नांवाचा पुत्र / मुलगा वारला. काळरात्र आली होती. सर्वत्र आक्रोश सुरु झाला. म्हादू वारला. मित्राला भेटण्यासाठी सकाळी सदू त्याच्या घरी निघाला. घराबाहेरच सदूच्या कानावर शब्द पडले. ''सदोबाची वेळ बरी मी केलेली करणी उलटली. सदूचे नांव मांत्रिकाला सांगण्या ऐवजी आपल्या मुलाचे नांव म्हादू सांगितले.'' हे मित्राचे बोलणे ऐकून सदूला जो आपल्या प्राणावर उठला तो मित्र नव्हे, आप्त नव्हे, कसाईच वाटला. असा विचार करीतच घरी परतला. करणी उलटण्याचा खेळ श्रीकृष्णगुरुंनीच करुन दाखविला असे सदूला वाटले. श्रीकृष्णगुरुंचे नामस्मरण त्रिकाळ दर्शन, रक्षण करते असे त्याला वाटले.

*****



स्व. विशाळगडकर प्रतिनिधी जहागीरदार यांचा मलकापूर येथील राजवाडा

# स्व. दत्तोबा करजगार (चव्हाण) यांची माहिती

स्व. दत्तोबा करजगार हे मूळ मिरजेचे. शनिवार पेठेतील महासाधू श्री दत्तावतार आण्णाबुवा यांच्या मिरजेतील मंदिराजवळ सतारमेकरगल्ली लगत करजगार लोकांची वस्ती, गल्ली पूर्वी होती. करजगार हा समाज कुशल कारागीर असा आहे. या समाजाला सोमवंशी क्षत्रिय म्हणले जाते. शुक्रवार पेठ, पोलिस चौकीजवळ जिरगे वाड्याच्या आसपास दत्तोबा करजगार, रामकृष्ण कामत, कृष्णा लाड हे मित्र रहात. या तिघांची घनिष्ठ मैत्री होती. कृष्णा लाड हे थोर सत्पुरुष बाबू जमाल पीर यांच्या आज्ञेने कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्याकडे जावू लागले होते. ते पाहून कृष्णा लाडाप्रमाणेच आपलेही कल्याण व्हावे या हेतूने दत्तोबा करजगार, रामकृष्ण कामत हे कृष्णा लाडांच्या बरोबर दर्शनाला ताराई शिर्केंच्या घरी गेले. तिघांनी श्री दत्त महाराजांचे दर्शन घेता स्वामींनी रामकृष्ण कामतला व्यापार धंदा करण्याचा आदेश / मंत्र दिला तर दत्तोबा करजगाराना ''टूक टूक'' मंत्राचा आदेश दिला. श्री दत्त महाराजांनी आपल्या मनातील विचार ओळखल्याचे त्यांना आश्चर्य वाटले. दत्तोबा करजगार रोज त्यांच्या दर्शनाला / सेवेला ताराईच्या घरी जाऊ लागला.

पुढे दत्तोबाचा भाग्यकाळ जवळ आला. श्री दत्त महाराजांनी त्यांना ''टूकटूक'' मंत्र दिला होता. म्हणजे वेगवेगळी मशिनरी तयार करणे, बसविणे इत्यादि त्याप्रमाणे त्यांनी आपल्या घरी कोल्हापुरातील पहिली ''पिठाची गिरणी'' चालू केली. हा नवा विषय सर्व कोल्हापुरात प्रसिध्द झाला. जो तो पिठाची गिरणी पहायला येवू लागला. दत्तोबांचे कौतुक करु लागला. पुढे त्यांनी पोहे तयार करण्याचे यंत्र / मशिन बनविले. मशिनरी / यंत्र या विषयात ते इतके कुशल कारगीर होते की, ते घड्याळाची निर्मिती / दुरुस्ती करु लागले. आपल्या राज्यातील या कुशल कारागीराची दखल घेवून एके दिवशी छत्रपती शाहू महाराज त्यांच्या घरी आले. पिठाची गिरणी मशिन, पोहे तयार करण्याचे मशिन, घड्याळ निर्मिती व इतर सामुग्री पाहून छ. शाहू महाराज आश्चर्यचकित झाले. त्यांनी दत्तोबा करजगारांना ''यंत्रमहर्षी'' ही पदवी देवून कारखान्यासाठी मोफत जागा देवून साराही (कर) माफ करुन त्यांचा गौरव केला. राजवाड्यावर परदेशातून नवीन वस्तू मशिनरी आल्यास त्या पहायला छ. शाहू महाराज त्यांना मुद्दाम आदराने बोलावून घेत. वस्तुची / मशिनरीची कांही दुरुस्ती असेल तर राजवाड्यावर दत्तोबा करजगाराना छ. शाहू महाराज बोलावून घेत. स्वर्गीय दत्तोबा करजगारांच्या घरी ज्यावेळी छत्रपती शाहू महाराज आले होते व ज्या खुर्चीत बसले होते ती खुर्ची दत्तोबा करजगार कुटुंबीयानी जीवापाड जपून ठेवली आहे. पुढे ''यंत्रमहर्षी'' दत्तोबा करजगाराना श्री दत्त महाराजांच्या कृपेने ऊर्जितावस्था प्राप्त झाली. भरपूर पैसा / धन, मान मरातब, समाजामध्ये मिळाला. आर्य क्षत्रिय समाजाचे ते कांही काळ पदाधिकारी (सेक्रेटरी) होते. परंतु वेळ अभावी त्यांनी त्या पदाचा दि. २३/५/

१९२८ रोजी राजीनामा दिला. सन १९२९ मध्ये त्यांनी आयर्विन म्युझियम लगत शेतकी शाळेचे बांधकाम पूर्ण केले. कोल्हापूर जिल्हा अधिकारी कार्यालय, पंचगंगेवरील शिवाजी पूल यातही त्यांचा हातभार होता. शाहूपुरी व सिव्हिल स्टेशन भागातील पिण्याच्या पाण्याची लाईन सुध्दा टाकण्याचे काम त्यांनी पूर्णत्वास नेले. अशा रितीने कुंभार गल्लीतील दत्त महाराजांनी त्यांना दिलेला ''टूकटूक'' मंत्र यशस्वी झाला. देशभरात त्यांनी कोल्हापूर नगरीचे नांव उज्वल केले. स्व. दत्तोबा करजगार व त्यांच्या धर्मपत्नी राधाबाई यांना दोन मुले पोटी जन्मली. त्यांची नांवे १)बळवंत व २) शंकर होय

बळवंत यांच्या पत्नीचे नांव वत्सला होते. बळवंत यांना मुले नव्हती.

तसेच स्व. दत्तोबा करजगार यांना चार मुली होत्या.

१) कमळाबाई २) गंगुबाई ३) अंबुताई ४) यामिनी

सर्व मुली गृहस्थी असून, त्यांचा संसार सुखाचा होता.


स्व. दत्तोबा करजगार यांच्या दुसऱ्या मुलांचे नांव शंकरराव होय. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नांव लीलाबाई होते. त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव शांताबाई होते. अल्प वयातच दोघीही वारल्या. शंकरराव यांच्या दुसऱ्या पत्नीचे नांव इंदिरा होय. त्या पुणे येथील नामदेवराव सोमवंशी यांच्या कन्या होत. स्व. शंकरराव व इंदिरा यांच्या पोटी खालील अपत्यांचा जन्म झाला.

१) विमल २) सरोजिनी ३) मालन या प्रमाणे तीन मुली तर ४) शरद ५) रमेश ही दोन मुले.

स्वर्गीय दत्तोबा करजगार यांनी ते हयात असतानाच चव्हाण हे आडनांव लावले आहे.

दत्तोबा चव्हाण (करजगार) यांचे चिरंजीव शंकरराव यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. शरद शं. चव्हाण हे उच्च शिक्षित असून, त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केलेले आहे. पुणे व कोल्हापूर येथे उच्च पदावर त्यांनी इंजिनिअर म्हणून काम केले आहे. सध्या ते सेवानिवृत्त असून, त्यांचे वय ७० असून त्यांच्या सुविद्य पत्नीचे नांव सौ. शोभा असून त्या नागपूर येथील विनायक तांबट यांच्या एकुलत्या एक कन्या आहेत. त्या उच्च शिक्षित असून, त्यांचे शिक्षण बी. एस.सी. व पी.जी. झाले आहे. त्यांनी कोल्हापूर येथील कॉलेज मधून लेक्चरर म्हणून काम करुन २८ वर्षाच्या दीर्घ सेवेनंतर नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचे वय आता ६५ आहे. उभयतांना तीन मुली आहेत. श्री. शरद शं. चव्हाण हे कोल्हापूर येथील देवकर पाणंद भागात राहतात. स्व. शंकरराव चव्हाण यांचे दुसरे चिरंजीव रमेश हे दहा वर्षापूर्वी निधन पावले आहेत.

शब्दांकन :- **श्री. शरद चव्हाण, कोल्हापूर**




स्व.दत्तोबा करजगार (चव्हाण)
यांचे तरुणपणातील छायाचित्र



स्व.दत्तोबा करजगार (चव्हाण)
यांचे वृध्दपणातील छायाचित्र



पीठाची गिरणी



स्व. दत्तोबा करजगार यांनी तयार केलेले पोहे तयार करण्याचे
मशिन व तांदूळ साळी सडण्याचे मशिन



छत्रपती शाहू महाराज स्व. दत्तोबा करजगार यांच्या घरी आले व
ज्या खुर्चीत ते विराजमान झाले त्या खुर्चीचे छायाचित्र.

## ।। अध्याय २४ वा ।।



**श्री दत्तावतार श्री माणिकप्रभू स्वामी महाराज,**
**माणिकनगर (हुमणाबाद)**

### ▪ विषयसूची....!

१) श्री दत्त अवतार श्री माणिक प्रभू यांची समाधी वार्ता
२) स्व. केशव गोखले- राजापूर (जि. रत्नागिरी) येथील शिक्षक
३) राधाबाई- श्रीकृष्ण व्यास मरण फेरा चुकविला
४) जानकीबाई मुलीच्या लग्नाच्या काळजीतून मुक्त

# अध्याय २४ वा

श्रीकृष्णगुरुना नित्य आंघोळ आवडे. पाण्याचे घंगाळ पुढे घेवून मुलासारखे खेळ सारखे करीत. आंघोळीसाठी ताराबाई विनवून थकतसे. एकदा एके दिवशी स्नान उरकून बसले. नेहमीप्रमाणे बाळ भुकेचे घास ताराईने भरविले. पुढे भक्तमंडळी दर्शनास येवू लागली. आनंदाने परमार्थ चर्चा चालली. श्रीकृष्णगुरु चर्चा चालू असतांना अकस्मात म्हणाले ''आंघोळ घाला'' भक्त मंडळी म्हणाली ''आत्ताच ऊरकून / करुन बसला. आंघोळ पुन्हा कां? कशाला?'' यावर श्रीकृष्णगुरु म्हणाले ''माणिक गेले'' श्रीकृष्णगुरुंच्या बोलण्याचा उलगडा झाला. माणिकनगरी माणिक प्रभूनी देह ठेवला. भक्तांना श्रीकृष्णगुरुंच्या पुन्हा केलेल्या आंघोळीचा हेतू कळला. श्रीकृष्णगुरु विश्वातील वृत्त जाणत.

केशव गोखले नांवाचे शिक्षक राजापूरला रहात असत. ते पुरते भाविक होते. एकदा राजापूरला श्रीकृष्णगुरुंना समक्ष पाहिले असता त्यांच्या मनाला श्रीकृष्णगुरु थोर सत्पुरुष वाटले. त्यांच्या मनाला सत्पुरुषाची साक्ष पटल्याने ते श्रीकृष्णगुरुंचे भजन / पूजन / दर्शन नित्य करीत असत. शिक्षक असल्याने कुठल्या गांवाला बदली झाल्यास ते करवीरला येवून श्रीकृष्णगुरुंचे मनोभावाने दर्शन घेत. श्रीकृष्णगुरुंची ख्याती सर्वांना सांगून ते त्यांना म्हणत ''गुरुंचा मनीभाव पुरता ठेवा. संसारी सुखरुप व्हाल. संसारातील सर्व व्यथा सहजपणे गुरु दूर करतील.'' कांही काळानंतर श्रीकृष्णगुरुंच्या कृपेने केशव गोखले मुख्याध्यापक झाला. ते संसारात सतत निरपेक्ष पणे व्यवसायात / नोकरीत अति दक्ष असत. आप्तांना गुरुमहिमा सांगे आप्तेष्टांना मदत करी. सर्वांना योग्य मान देई गुरु महती आपल्या सर्वांना पटवीत. आपल्या सर्व परिवारास श्रीकृष्णगुरुंचे भक्त केले. बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले. या उक्ती प्रमाणे लोक त्यांना मानू लागले. त्यांनी धार्मिक वाचन लेखन केले. सर्व भक्तांना सुशिक्षित बनविले. अनेकांना आर्थिक सहाय्य केले. त्यातील कांही वैद्य / डॉक्टर, वकिल, प्रशासक झाले. केशव आप्पा मुळे भाग्य उदेले असे ते आजही म्हणतात. श्रीकृष्णगुरु परंपरा आजही केशव गोखलेंचा भक्त परिवार चालविती.

करवीरात राधाबाई नांवाची स्त्री रोज वैराग्य मठीत येवून श्रीकृष्णगुरुंना भाली/ कपाळी कुंकू लावून नित्य दर्शन घेई. कितीही घाई असो तिचा दर्शनाचा नियम चुकला नाही. देह हे आत्म्याचे आवरण असून, देहाला आजारीपण येते. राधापती कृष्णा या आजारीपणातून चुकला नाही. आजारीपणाने राधापती कृष्णाला घेरले. पतीसेवा हाच स्त्रीधर्म जाणून आपल्या पतीची / कृष्णाची आजारीपणातील शुश्रूषा करुन श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाचा नित्य नियम साधीत. अशा प्रकारे कांही दिवस गेल्यानंतर राधाबाई पती कृष्णाचा आजार बळावला. नेहमी प्रमाणे राधाबाई श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला सामोरी आली. श्रीकृष्णगुरुंना कुंकू लावण्या पुढे गेली. गुरुमाऊली मागे सरकली. कपाळी कुंकू लावून न घेता म्हणाली ''आलंय जा, आलंय जा'' हा प्रकार पाहून राधाबाईच्या मनाचा उदासपणा वाढला. आलंय जा याचा बोध न होता, अंगारा, तीर्थ घेऊन ती घरी परतली. त्या दिवशी रात्री राधाबाई पती कृष्णाचा आजार बळावला. तत्क्षणी

वैद्य बोलविला. वैद्य म्हणाला ''औषध उपाय आता थकले, देवावर हवाला ठेवा'' राधाबाईने पतीच्या तोंडी श्रीकृष्णगुरुंचे तीर्थ घालून, अंगारा सर्वांगाला लावून नामस्मरण सुरु केले. पहाटे पहाटे राधाबाई निद्रावश झाली. निद्रेत तिने स्वप्न पाहिले. स्वप्नात श्रीकृष्णगुरु येऊन म्हणाले ''तुझे मन पाहिले पाठीराखा मी आहे.'' एवढ्यात पतीची बडबड कानी पडून राधाबाई जागी झाली. तिचे पती कृष्ण तिला सांगू लागले. ''स्वप्नात काळीकभिन्न माणसे आली. वरती ओढून नेऊ लागली. ती माणसे यमदूत वाटली. विपरीत गती वाटली. एवढ्यात दंडधारी संन्याशी आला. यमदूतावर दंड उगारला. त्याला अगोदर सोडा म्हणाला. झटदिशी यमदूतानी मला खाली टाकले, वरुन खाली पडतांना मला जागृत अवस्था आली. मरता मरता वाचलो. मला वाटले पण दंडधारी संन्याशी कोण? हे मला कळले नाही'' आपल्या पतीचे बोल ऐकून राधेला आनंद झाला. स्वप्नात आलेले श्रीकृष्णगुरु संन्याशी झाला. यम सैन्याला श्रीगुरुंनी पळवून सौभाग्यदान देऊन ऋणी केले हे राधाबाईने मनोमन जाणले. दुसऱ्या दिवशी श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला अधीर होवून वैराग्य मठीत आली. श्रीकृष्णगुरु तिला पाहून म्हणाले ''आलं होतं गेलं गेलं'' आलंय गेलंय याचा अर्थ, मरण आलं गेलं असा राधाबाईला कळला. पाठीवर हात फिरवून श्रीकृष्णगुरुंनी राधाबाईचा कुंकूवाने मळवट भरला. राधेला बोलण्या शब्द फुटला नाही. श्रीगुरुंच्या चरणी अश्रुंचा अभिषेक तिने केला. श्रध्देने श्रीकृष्णगुरुंना भजता केवळ सौभाग्यदान दिले नाही तर काळाला हां हां म्हणता पळविले. तेंव्हापासून श्रीकृष्णगुरु व्यासांचे दैवत झाले. कृष्ण - राधा नित्य दर्शनाला येत. पिढ्या पिढ्यांवर श्रीकृष्णगुरुंनी व्यासावर कृपा केली.

करवीरात जानकीबाई नांवाची एक स्त्री होती. तिला एक सुंदर कन्या होती. कन्या उपवर होताच तिला वर कुठे शोधवा? तिचे लग्न कसे होईल या विचाराने ती आपल्या मुलीला घेवून वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला आली. त्या अवचित समयाला एक श्रीमंत स्त्री येवून श्रीकृष्णगुरुंना नमस्कार करु लागली. इतक्यात श्रीकृष्णगुरुंनी जानकीबाईच्या मुलीचा हात धरुन त्या श्रीमंत बाईला म्हणाले ''ही गृहलक्ष्मी तुज समोर आहे. तिला सून करुन घे'' दरिद्री - जानकीबाई श्रीकृष्णगुरुंचे बोल ऐकून विचार करु लागली की, हे कसे घडून येईल. गुरुंच्या दर्शनाला आलेली बाई तर श्रीमंत आहे. फुटकी कवडी माझ्या जवळ नाही. आकाशाला कधी हात लागतो काय? एवढ्यात ती श्रीमंत बाई जानकीबाईला म्हणाली ''श्रीगुरुंचे वचन ऐकले. सद्गुरुंचे शब्द मला आज्ञा प्रमाण. मी कांही हुंडा मागत नाही. तुझी कन्या माझ्या पुत्राला दे. तिला मी सून करुन घेतली.'' पुढे सर्व गुण जमून आले. शुभ मुहूर्तावर दरिद्री जानकीबाईच्या मुलीचा विवाह त्या श्रीमंत बाईच्या मुला बरोबर थाटामाटात झाला. जानकीबाई मुलीच्या विवाहाच्या लग्नाच्या चिंतेतून श्रीकृष्णगुरुंच्या कृपेने मुक्त झाली. गगनाला जरी हात लागत नसला तरी गुरुकृपा जयावर होते त्याच्यासाठी गगनच खाली येते अशी गुरुसत्ता अघटित आहे.

*****

# श्री माणिकप्रभू चरित्र

कर्नाटक राज्यातील गुलबर्गा, बसव कल्याण, बिदर (बेदर) या तीन इतिहास प्रसिध्द शहरामधील त्रिकोणाकृती क्षेत्र व्यापून गुलबर्ग्याचे पूर्व दिशेस पसरत गेलेल्या एका डोंगराळ प्रदेशास दरी किंवा दरीपट्टी म्हणतात. या डोंगराळ प्रदेशाचा रंग लाल असून, पाण्याची विपुलता भरपूर असल्याने हा भाग सुपीक चांगला सृष्टीसौंदर्याने व्यापलेला आहे. श्री खंडोबाने मणिमल्ल राक्षसाशी प्रचंड युध्द करुन त्याला जिंकले ते मैलार क्षेत्र येथेच आहे. दुसरी अनेक तीर्थक्षेत्रे या भागात आहेत. श्री गुरु चरित्रात या भागास / प्रदेशास मणिगिरी म्हणटले आहे तर पौराणिक कालात या भागाला मणिचूल म्हंटले आहे. या भागातील / प्रदेशातील लोकांची भाषा ही मराठी, कानडी, तेलगू आहे तर राजभाषा म्हणून उर्दु होती. मणिचूल पर्वत हा अनेक प्रकारच्या नरत्नांची खाण होवून बसला आहे. प्राचिन काळात पुलकेशी, चालुक्य, कलचुरी इत्यादी राज्यघराण्यानी या भागात राज्य केले. आपले साम्राज्य उभे केले. छत्रपती राजाराम महाराज यांचे शूर सरदार चंद्रसेन जाधव व त्यांचा पुत्र रामचंद्र जाधव यांच्या राजघराण्याने यशस्वी कारकीर्द साधली. चंद्रसेन जाधव, रामचंद्र जाधव हे करवीर संस्थानचे सेनापती, धनाजी जाधव यांच्या वंशातले थोर योध्दे, सेनापती, सरदार होते.

आज जे हुमणाबाद आहे ते राजा चंद्रसेन जाधवांनी वसवले असून, हुमणाबाद नगरीचे मूळ नांव हे ''जयसिंग पेठ'' असून ''जयसिंगराव'' हा किताब छ. राजाराम महाराजांनी शूर सेनापती धनाजी जाधवांना दिला होता. या धनाजी जाधवांच्या नांवाने, किताबाने ''जयसिंग पेठ'' वसवली होती. कल्याणच्या बिज्जल राजाच्या पदरीच महात्मा बसवेश्वर होऊन गेले. ते अत्यंत विद्वान शिवभक्त, कीर्तीवान, प्रभावशाली थोर सत्पुरुष श्री शंकराचा अवतार / शिव अवतार होऊन गेले ते या भागातच.

फार प्राचीन काळी थोर सत्पुरुष सदानंद स्वामी, त्यांचे शिष्य पूर्णानंद स्वामी, शिवराम स्वामी हे या भागातच कल्याणीला होवून गेले. अलंप्रभू, बक्कप्रभू असे अनेक लिंगायत धर्मातील थोर पुरुष या भागात बसव कल्याणीला होवून गेले. या अनेक नररत्नांचा बसव कल्याण / कल्याणी भाग जन्मभूमी, कर्मभूमी होती.

एकोणिसाव्या शतकातच एक नररत्न या पूण्यवान भूमीवर जन्माला आले. त्यांचे नांव श्री माणिक प्रभू होय. त्यांच्या वडिलांचे नांव मनोहर नाईक तर आईचे नांव बयमां असे होते. त्यांना बयादेवी सुध्दा म्हणले जायचे. श्री माणिक प्रभूंचा जन्म शके १७३९ मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशी मंगळवार दि. २२/१२/१८१७ रोजी लाडवंती या त्यांच्या आजोळी झाला.

मनोहर नाईक हे देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन शाखेचे एक सुखवस्तू ब्राम्हण होते. त्यांचे मूळ गांव निजामशाहीतील कल्याण / कल्याणी जवळचे ''हरकूड'' हे होते. मनोहर नाईकाचे

वाडवडील आपले खेडेगांव ''हरकूड'' सोडून व्यापार धंद्यासाठी बसव कल्याणला येवून राहिले होते. कल्याणास त्यांना ''हरकूड'' या आडनांवानेच ओळखत. त्यांच्या पूर्वजांचा व्यवसाय हा सराफी / सावकरीचा होता म्हणून त्यांना नाईक म्हणत. मनोहर नाईकांचे घराणे अत्यंत ईश्वरभक्त, सदाचारी, सात्विक, देशभक्त होते. त्यांच्या वडिलांचे नांव नृसिंह नाईक तर आजोबांचे नांव केशव नाईक होते. बिदर / बेदर जवळील झरणी नृसिंह हे त्यांचे उपास्य दैवत होते तर श्री खंडोबा त्यांचे कुलदैवत होते. मनोहर नाईकांच्या आईचे नांव बचंम्मा होते. त्या राम उपासक / हनुमान उपासक होत्या.

मनोहर नाईक व बयादेवी यांना शके १७३५ इ.स. १८१३ मध्ये पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले होते. बचंम्मा (आई) या हनुमान भक्त असल्याने मनोहर नाईकांनी या मुलाचे नांव श्री हनुमंत ठेवले होते. हेच श्री माणिक प्रभूंचे थोरले बंधु होय. यांना हणमंतरावदादा ऊर्फ दादामहाराज म्हणले जाई. मनोहर नाईक व श्री बयादेवी यांना तिसरा पुत्र प्राप्त झाला शके १७४९ सर्वजीत नाम सवंत्सर पौष शुक्ल त्रयोदशी, सोमवार इ.स.१८२७ या दिवशी. या पुत्राचे नाव नृसिंह ठेवण्यात आले. या तीन पुत्राशिवाय मनोहर नाईकांना चिमणाबाई नावाची मुलगी होती. मनोहर नाईकांच्या सर्व कुटुंबीयांना माणिक प्रभूंच्या जन्माने परमावधीचा आनंद झाला होता. त्यांचा जन्म बच्चंमाच्या माहेरी म्हणजे वडिलांच्या आजोळी लाडवंती येथे झाला होता. बालकाचे जातक पाहून मनोहर नाईक आश्चर्याने आनंदीत झाले होते. घरातील सर्वजण या बाळाला ''रत्न्या'' म्हणत. आपल्या कुळात हे एक अद्वितीय रत्न जन्माला आले आहे असे सर्वांना वाटे विशिष्ठ हेतुस्तव ईश्वरी संकेताने या सात्विक संपत्तीच्या साधारण घराण्यात / घरात प्रभूनेच जन्म घेतला होता. श्री दत्तात्रेयाने जन्म घेतला होता. एका सामान्य कुळात जन्म झालेला, स्वत: निस्संग निर्विकार, अनिकेत व अंकिंचन राहून त्यावेळच्या सर्व सामान्यांना आपल्याकडे प्रेमभावाने जवळ करतो, लाखो लोकांना अन्न, वस्त्र, निवारा धन देवून संतुष्ट करतो. सर्व जनांचे इप्सित / इच्छा / मनोकामना पूर्ण करुन कल्पद्रुम मानला जातो. म्हणूनच माणिक प्रभू अवतार गणला गेला / जातो.

तसेच जगाला आदर्शभूत ठरणारे एक तत्व स्वत: आचरणात आणून त्या मताची त्यांनी स्थापना केली. हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, जैन, लिंगायत इत्यादी अनेक धर्मांच्या लोकांना एकाच ठिकाणी प्रेम भावाने त्यांनी आणले. यामुळे सर्व लोक प्रभुना ''प्रभुखे प्रभू साक्षात'' ''पिरान पिर दस्तगीर'' ''नानक सोही माणिक'' ''धन्य प्रभू'' म्हणू लागले. अशा रितीने माणिक प्रभूंचे प्रभुत्व लहानपणापासूनच प्रकट झाले. त्यांच्या दिव्यत्वाच्या ज्योतीचा प्रकाशाने बसव कल्याण व आसपासचा भाग दिपून गेला.

मनोहर नाईक व त्यांची आई बच्चंमाच्या निधनानंतर बयाबाई आपली तीन मुले हणमंतरावदादा, माणिक प्रभू, श्री नृसिंह व मुलगी चिमणाबाई यांना घेवून त्यांच्या थोरल्या

भावांचे घरी राहू लागल्या. त्यांचे भाऊ बसव कल्याण नबाबाचे पदरी नोकरी होते. श्री माणिक प्रभुंच्या बालपणी बसव कल्याण / कल्याणी हे गांव नबाबाची जहागिर गांव होते / राजधानीचे गांव / शहर होते. श्रीमंत गांव होते. सोन्याचा धूर निघत होता. कल्याण गांवात गोसावी लोकांचा मठ, हे गोसावी लोक अत्यंत श्रीमंत होते. नबाबांचा किल्ला, सदानंद स्वामींचा मठ, बसवेश्वरांचा मठ व अनेक मोठे वाडे, बंगले यांचा समावेश कल्याण नगरीत होता. कल्याण नगरीत श्री माणिक प्रभू सर्वत्र फिरत असत. कल्याणी जवळ असलेल्या डोंगर, टेकड्या, तलाव, जंगले, आंब्याच्या बागा. हिरवीगार वनराई यातून स्वच्छंदपणे श्री प्रभू फिरत रहात. प्रभुंचे बहुतेक बालपण कल्याणसच गेले. श्री माणिकप्रभूंचे शिक्षण त्या वेळच्या कोणत्याही शाळेत झाले नाही. त्यांचा व्रतबंध / मुंज मनोहर नाईक यांनी करुन त्यांना गायत्री मंत्राचा उपदेश दिला. अक्षर ओळख, वाचनही त्यांनीच प्रभुना शिकवले. बालपणाच्या अनेक लीलावरुन ते अवतारी आहेत. अशी सर्वांची खात्री झाली होती. अगदी लहानपणापासून प्रभुंचा एक अलौकिक दिव्य पुरुष म्हणून लौकिक पसरला होता.

बालपणी प्रभु कधी शाळेत गेले नाहीत. इतर मुलां सारखे पुस्तक, पोथी पाठ करीत बसले नाहीत. सवंगडी जमवून खेळत बसणे, रानावनात एकटयाने फिरणे, देवस्थाने फिरणे, ध्यान लावणे, स्वच्छंदी जगणे.  याप्रमाणे ते वेळ घालवित. कधी लंगोटी लावीत तर कधी अंगाला राख फासत, कधी अंगावर कपडे तर कधी दिगंबर. प्रभुंच्या या स्वच्छंदी व स्वैर वर्तनाने, वागण्याने लोक त्यांना वेडा म्हणू लागले. वेडा भाऊ म्हणून हाकही मारु लागले. कधी कधी हा वेडा भाऊ मोठ मोठ्या लोकांत उदात्त गोष्टी बोले तर बहुतेक काळ लहान मुलांच्या खेळात घालवी. त्यांच्या संगतीत लहान मुलांना अतिशय आनंद होई. प्रभुंच्या बोलण्यात व वागण्यात एक प्रकारचा आकर्षक भाव आनंद होता. श्री प्रभु लहानपणी कोणत्याही शाळेत गेले नाहीत, शिकले नाहीत. तरी हिंदी, मराठी, कन्नड, तेलंगी, उर्दू, फारशी, अरबी, व्रजभाषा इत्यादि अनेक भाषावर त्यांचे प्रभुत्व होते. या भाषेत त्यांनी कांही पदे केली आहेत. अध्यात्मिक ज्ञानसंपन्नता त्यांच्यामध्ये वास करीत होती. त्यांच्या वैराग्याची व औदार्याची ख्याती सर्वत्र पसरली होती. ते लोकविलक्षण महात्मा, संत, गुरु म्हणून ख्याती पावले होते.

लौकिक अर्थाने कोणत्याही गुरुंचे गुरुत्व श्री माणिक प्रभुना लाभले नव्हते. ते कोणत्याही गुरुंचे शिष्य नव्हते. तरीही विश्वाचे गुरुपद प्रभुंना प्राप्त झाले होते. गुरु सार्वभौम ही पदवी त्यांना लाभली होती. विश्वाचे गुरुपद त्यांना लाभले होते. याचे बीज त्यांच्या बालपणाच्या कार्यातून दिसून येते. प्रभूंच्या बाललीला निसर्गाशी तादात्म पावण्याची त्यांची तदाकार वृत्ती, निसर्गापासून ज्ञान प्राप्त करुन घेण्याची विद्या, वृत्ती तर प्रभूंना पूर्ण अवगत होती. निर्मल निर्झर, झरे, सुंदर लता, डौलदार वृक्ष यांच्या सानिध्यात रमलेल्या पशु-पक्षींच्या अंत:करणाची भाषा, आत्म्याची भाषा प्रभुंना अवगत होती. त्यामुळे त्यांना उत्तम ज्ञान प्राप्त झाले होते. त्यामुळे ते निरतशयानंदात

सदैव रममाण असत. अत्यंत बालवयातच त्यांना ज्ञान, योग सामर्थ्य, वैराग्य प्राप्त झाले होते. अवधूता सारख्या नित्यमुक्त देव दत्तात्रेयाने पृथ्वी, वायू, आकाश, पाणी, अग्नी, चंद्र, सूर्य, कपोत पक्षी, अजगर, समुद्र, पतंग, मधुकर, हत्ती, मध-हरण करणारा मनुष्य, हरीण, मासा, पिंगळा, कुर्रपक्षी, बालक, कुमारी, बाण तयार करणारा कारागीर, साप, कोळी, कुंभारीण, माशी या चोवीस गुरुंच्या वर्तन क्रमावर बारीक लक्ष ठेवून ज्ञान मिळविले. त्याच प्रमाणे श्री प्रभुंनी पंचमहाभूते, सूर्य, चंद्र, पशु, पक्षी, मनुष्यप्राणी यांच्या अंत:रंगात शिरुन बोध, ज्ञान मिळविले व ते ज्ञानसंपन्न, प्रज्ञावान विश्वगुरु झाले ते बालपणीच.

गोविंदा गवळी, माळीणीला अपत्य प्राप्ती, भिमाबाई आप्पाराव जमादार (हैद्राबाद) यांना अपत्य प्राप्ती, पांढऱ्या विंचवाची गोष्ट, दगडांचे देव, प्रभुंचे धोतर, पागाटे बंधन, उनाड मुलाचा खोडकरपणा, काळंभट, भालचंद्र दीक्षित यांच्या हळीखेड मधील चमत्कार व वरील सर्व चमत्कार प्रभु कल्याणीस असतानाच घडले. प्रभूंच्या आवडत्या पट्टशिष्यामध्ये कल्याणचे लोकच अधिक होते. बालपणापर्यंतच श्री प्रभूंचा संबंध कल्याणसच जास्त होता. जगाचे कल्याण करण्यासाठी श्री प्रभूंनी कल्याण सोडले. परंतु कल्याणने प्रभूंना सोडले नाही. श्री प्रभू वियोगाने कल्याणच्या लोकांना अतिशय दु:ख झाले. कुलकर्णी, आळीतील आपले मामा बळवंतराव आप्पाराव कुलकर्णी यांच्या घराजवळच्या मारुतीच्या देवळाजवळच्या कट्ट्यावर श्री प्रभू नेहमी बसत या ठिकाणी श्री प्रभूंनी अनेक लिला केल्या. या ठिकाणीच श्री प्रभूंची गादी कल्याणला स्थापन झाली आहे. लहानपणी / बालपणी श्री माणिक प्रभूंच्या तोंडी प्रभू हा शब्द सतत / नेहमी असे. हा प्रभू शब्दच माणिक नांवापुढे जोडला गेला व आदराने नांव श्री माणिक प्रभू घेतले जावू लागले.

कल्याणीला श्री माणिक प्रभूंचा जन्म झाला. कल्याणीला श्री प्रभू लहानाचे मोठे झाले. बालवयातील त्यांचे सवंगडी, अबाल वृध्द यांचे प्रभू साक्षात देव बनून पूज्य झाले. प्रभूंचे सवंगडी / खेळगडी त्यांचे पुढे शिष्य बनून राहिले. घरची सर्व नाईक मंडळी, आप्त स्वकीय त्यांना देव दत्तात्रेय मानीत. सर्व चमत्कार, लीला या वयाच्या पंचवीसाच्या आतच घडल्या होत्या. आसपासच्या खेड्यातून, भागातून लोकांचा ओघ प्रभू दर्शनाला कल्याणीला येवू लागला होता. जमाव जमू लागला होता. कल्याण आता ''नित्यश्री नित्यमंगल'' उल्हासाने नांदत होते. अशाच एके वेळी श्री प्रभू एकाएकी गुप्त झाले. प्रभू कुठे गेले? कां गेले? कधी परत येणार? हे कोणालाच समजले नाही. श्री माणिक प्रभू कल्याण पासून तीन कोस मंठाळ गांवाजवळील चंडकापूर हद्दीतील अमृतकुंडावर प्रकट झाले. या अमृतकुंडालाच अंबीलकुंड म्हणतात. हे प्राचिन तीर्थ आहे. उन्हाळा - पावसाळा हे कुंड पाण्याने भरलेले असते. येथे हेमांड पंथी कलाकुसरीचे श्री शंकराचे जागृत प्राचीन स्थान आहे. ही तपोभूमी आहे. तक्की सोमण्णाचे (शिवमंदिर), सीतेची न्हाणी या अंबीलकुंडापासून जवळच आहेत. श्री प्रभूंचा वास या निर्जन

स्थळी सहा महिने होता. येथुनच श्री प्रभूंचे जगउध्दाराचे कार्य सुरु झाले. येथे अनेक लीला / चमत्कार त्यांनी केल्या अंबीलकुंडाचे महात्म्ये श्री प्रभूंच्या मुळे वाढले. लोकांची वर्दळ वाढली, लोकांनी गजबजून गेले. जंगलात, निर्जन स्थळी मंगल वाद्ये वाजू लागली. भोजनाच्या पंक्तीवर पंक्ती उठू लागल्या. श्री प्रभूंच्या जयजयकाराचा ध्वनी गर्जू लागला. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, ज्ञानी लोकांच्या झुंडीच्या झुंडी श्री प्रभुंच्या दर्शनाला अंबीलतीर्थावर येवू लागल्या. अंबीलकुंडालाच ''बूत्तीयात्रा'' (काल्याचा प्रसाद) सुरु झाली. हे अरण्य आनंदाचे आनंदवन बनले ''नित्यश्री नित्य मंगल'' हे प्रभुसानिध्य राहिले. घरच्या व कल्याणच्या लोकांच्या आग्रहाने श्री प्रभू सहा महिन्यानंतर कल्याणीला परत गेले. परंतु श्री प्रभूंचे वास्तव्य पुढे कायमपणे कल्याणीस झाले नाही. पुढे बारा वर्षे श्री प्रभूंचा संचार या मणिचूल पर्वतावरील निर्जन स्थानी, जंगलात, मंदिरात झाला. श्री प्रभूंजवळ चिमणाजी नांवाचा शिष्य असे. झोळी व सटका ते सतत बरोबर घेत.

मणिचूल पर्वता प्रमाणेच मैलार हे अति प्राचीन क्षेत्र आहे. खंडोबाचे मुख्य क्षेत्र आहे. इकडील लोक मैलारला दक्षिण काशी समजतात. श्री प्रभु या क्षेत्री आल्यावर ''नित्यश्री नित्यमंगल'' सुरु झाले. हजारो लोक दर्शनाला येवू लागले. खारका, सुपाऱ्या, नारळ, पेढे, बर्फी हार यांचे ढीग श्री समोर पडू लागले. द्रव्यही अगणित जमू लागले. नाच, गाणे, पुराण, कथा, कीर्तन यांनी श्री प्रभुंचा दरबार भरु लागला. नित्य नवा रंग. खंडोबा यात्रा पार पडली. येथेच व्यंकम्मला श्री प्रभु गुरु गाठ पडले.

मैलारहून, भालकी, चिटगोपी अशा ठिकाणी प्रभुनी निवास करुन तेथील लोकांचा उध्दार केला. प्रभूंचा लौकिक वाढत होता, प्रसिध्दी वाढत होती. या वाढत्या लोकगर्दीला आळा घालण्यासाठी श्री प्रभूंनी तीर्थाटन करण्याचे ठरविले. तुळजापूर-पंढरपूर-गिरनार-प्रयाग-काशी-गया-हरिद्वार-गंगोत्री-बद्रीनाथ-केदारनाथ-माहूर-व्यंकटगिरी (तिरुपती)-कोल्हापूर-नृसिंहवाडी-मुधोळ-शेवटी गाणगापूर करुन शारीरिक कष्ट सहन करुन, लोकांना भगवद् भजनी लावून, कल्याण करुन ते परत कल्याणास अचानक प्रकट झाले. कांही दिवस कल्याणास राहून मणिचूल पर्वतावरील शेष स्थळी त्यांनी तीर्थाटन सुरु केले. गोट्टगोट्टीचे भयंकर अरण्य, करकनळ्ळीची बक्कप्रभूंची समाधी, रेकुळगी, केतकीसंगम अशा स्थळांना भेटी दिल्या. केतगीसंगमी श्री प्रभूंची गादी स्थापन झाली. न्यायक्कल करुन त्यांचे कुलदैवत झरणीनृसिंह बिदरजवळ आले. बिदर-राजुरी-भालकी-मंगलगी-कल्याण करुन हुमणाबादला आले. सर्वेश्वरांच्या देवळा जवळील दोन बेलाच्या झाडांच्या सावलीत प्रभु निवांत बसून राहिले.

कल्याणच्या पूर्वेस पांच कोस (मैलावर) अंतरावर हुमणाबाद आहे. हुमणाबाद गांवाच्या पश्चिमेस एका मैलावर गुरुगंगा व विरजा दोन लहान नद्यांचा संगम आहे. या संगमावरच श्री प्रभुंनी माणिकनगरची स्थापना केली. शके १७६७ इ.स. १८४५ साली श्री प्रभुनी माणिकनगरची

स्थापना केली. यापूर्वी श्री प्रभू या ठिकाणी बऱ्याच वेळा येवून गेले होते. त्यांना हा नद्यांचा संगम, भाग बरा वाटल्याने त्यांनी येथेच कायम वसतिस्थान करण्याचे ठरविले. हुमणाबाद (जयसिंगनगर) गडवंती, धुमणसूर या तिन्ही गांवच्या सीमा येथे मिळतात तेथे माणिकनगर वसले. श्री प्रभू हुमणाबाद जवळील संगमावर आत्ताचे (माणिकनगर) येथे येऊन राहिले त्यावेळेची परस्थिती बेबंदशाहीची होती. चोर, दरोडेखोर व पापवृत्तीच्या लोकांचा हा अड्डा होता. खून, हत्या, दारिद्र याने हा भाग अपवित्र बनला होता. परंतु भरपूर पाणी, स्वच्छ हवा, सुंदर निसर्ग यामुळे श्री प्रभू श्री सर्वेश्वरांच्या (महादेवाच्या) देवळाजवळील दोन बेलाच्या झाडांच्या सावलीत एका दगडाच्या कट्ट्यावर बसून राहिले. या कट्ट्याला ''प्रभू कट्टा'' म्हणतात. अशा रीतीने माणिकनगर स्थापन झाले. श्री प्रभू या स्थळी येऊन बसल्यानंतर थोड्याच दिवसांत विलक्षण शोभा आली. श्री प्रभूंच्या दर्शनासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या. हुमणाबाद व आसपासच्या भागातून मोठमोठे व्यापारी, नायब, अमीन, नवाब, लोक दर्शनांस येऊ लागले. सर्वेश्वराचे / महादेव मंदिराची स्वच्छता झाली. दुकानदारांची दुकाने लागली चोहीकडे यात्रेचे स्वरुप आले. सर्वेश्वराची पूजा, अर्चा, अभिषेक चालू झाले. बेलाखालील दगडी कट्टयावर प्रभू बसू लागले. दरबार भरू लागला. त्याठिकाणी ''नित्यश्री नित्यमंगल'' सतत चालू झाले. प्रभूंच्या अवतार कार्यातील अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे पतित उध्दार तेथून चालू झाला. श्री प्रभुच्या आई बयादेवी, भाऊ हणमंत दादा, नृसिंहतात्या, व्यंकम्मा व इतर अनेक लोक कल्याणहून हुमणाबादला आले. मोठ्या थाटाने माणिकनगराची स्थापना झाली. आदिभौतिक, आदिदैविक, अध्यात्मिकवास ज्या देव श्री दत्तात्रयामध्ये आहे. त्यांच्या गादीची स्थापना श्री अवधूत योगी माणिकप्रभुंनी केली. अवधुत दत्तात्रय हे स्वतः श्री माणिकप्रभु हेच होत. पुढे या माणिकनगरचा कायापालट, व्यवस्था, श्री प्रभुंच्या दोन्ही बंधूनी केला.

काशिपासून रामेश्वरपर्यंत प्रभूंची कीर्ती पसरली होती. हजारो लोक श्री प्रभूंच्या नित्य दर्शनाला येत व आपल्या परीने संतुष्ट होऊन जात. लोकांचे अंतरंग ओळखून श्री प्रभू त्यांचे ईप्सित/इच्छा पूर्ण करीत. श्री प्रभू सर्वकाळ आत्मरूपात निमग्न राहून आत्मानंदात डुलत रहात असत. आपल्या भक्तावरील सर्व संकटाचे ओझे आपल्या शिरावर घेऊन त्यांना निर्भयता देत असत. हिंदू, मुसलमान, शीख, लिंगायत, जैन इतर सर्व धर्माचे लोक श्री प्रभूंच्या दर्शनाला प्रेमभावाने येत. गरीब, श्रीमंत, श्रेष्ठ, कनिष्ठ, लहान, थोर, बालक, वयोवृध्द या सर्वांशी श्री प्रभु आत्मभावाने, प्रेमभावाने वागत व त्यांचे चित्त आकर्षित करून त्यांना आनंद देत. अशा प्रकारे आपल्या भक्तांना त्यांच्या आवडीच्या मार्गाने नेऊन , त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा उत्कर्ष करून त्यांचा उध्दार केला. श्री प्रभू हे उदारमतवादी होते. ते मूर्तीमंत, परमपवित्र, श्रेष्ठ ज्ञानावतार होते. हिंदू, मुसलमान, शीख, जैन, लिंगायत, ख्रिचन, बौध्द व इतर धर्मातील ज्ञान त्यांना प्राप्त झाले होते. ते सर्वोत्तम ज्ञान आपल्या अनुयायींना, शिष्यांना व्हावे या हेतुने त्यांनी

''सकलमत'' स्थापित संप्रदायाची'' स्थापना केली. मुसलमान लोक त्यांना ''महबूब सुबहानी'' म्हणतात व पूजा करतात. श्री दत्तावतार श्री माणिकप्रभुनी मार्गशीर्ष शुक्ल एकादशी शके १७८७ मंगळवार दिनांक २९ नोव्हेबर १८६५ रोजी माणिकनगर (हुमनाबाद) येथे समाधी घेतली.

संदर्भ ग्रंथाचे नांव :- **श्री माणिकप्रभु चरित्र**
लेखक :- **गणेश रघुनाथ कुलकर्णी**



श्री दत्तावतार श्री माणिकप्रभु मंदिर, माणिकनगर (हुमणाबाद)

# श्री केशव बापूजी गोखले ऊर्फ आप्पासाहेब गोखले यांच्याबाबतची माहिती

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अनेक भक्तगण व शिष्य होऊन गेले. त्यापैकी श्री केशव बापूजी गोखले यांचा नामनिर्देश करणे आवश्यक आहे. श्री आप्पासाहेब राजापूर येथे गंगेचे अवतरण झाल्यानंतर दर्शनासाठी गेले असता त्यांना समुद्र किनारी कृष्ण सरस्वती महाराजांनी प्रत्यक्ष दर्शन दिले व अर्धे केळ सोलून केळाचा प्रसाद दिला. श्रीकृष्ण सरस्वती यांच्या अध्यात्मिक शक्तीचा त्यांचेवर एवढा प्रभाव पडला की, त्या क्षणापासून श्री आप्पासाहेब हे त्यांचे निस्सीम भक्त तर झालेच तसेच त्यांनी कुटुंबातील व आप्तेष्टांपैकी सर्वजणांना कोल्हापूरला श्री महाराजांच्या दर्शनासाठी जाण्याबाबत आग्रह केला.

श्री आप्पासाहेब हे उच्च शिक्षीत होते व सरकारी शाळेमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. त्या काळी ब्रिटीश जमाना असल्याने सरकारी शाळेतील मुख्याध्यापकास कलेक्टरचा दर्जा होता. त्यामुळे प्रत्येक सरकारी कार्यक्रमास त्यांना निमंत्रण दिले जायचे. श्री आप्पासाहेब यांची महाराजांविषयी निस्सीम श्रध्दा असल्याने स्वत:चा फोटो कधी काढायची वेळ झाल्यास ते महाराजांचा फोटो जवळ ठेवून सदर फोटो आपल्या फोटोमध्ये येईल असे पहावयाचे. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केले व अनेक विद्यार्थ्यांना सर्व प्रकारे मदत करुन उच्च विद्या विभूषित करुन अनेकांचे संसार मार्गी लावले. पुण्यातील त्यांच्या वास्तव्यात सतपुरुष केशवराव देशमुख बऱ्याचदा आप्पासाहेबांच्या घरी येत असत. त्यांनी महाराजांची एकनिष्ठपणे बरीच सेवा व त्यांच्या सांगण्यानुसार साधना केल्याने त्यांना वाचासिध्दी प्राप्त झाल्याबाबतचा अनुभव अनेक निकटवर्तियांना यावयाचा. त्यापैकी खालील दोन प्रसंग या ठिकाणी देत आहोत.

आप्पासाहेबांना गुरुस्थानी मानणारे एक निकटवर्ती श्री केशव थेटे यांना लागोपाठ मुली होत होत्या त्यामुळे ते नाराज होते. त्याबाबत श्री आप्पासाहेब यांचेकडे त्यांनी मुलाच्या प्राप्तीसाठी आशीर्वाद मिळावा म्हणून विनंती केली. त्यावर त्यांनी आता तीन मुलीनंतर तुला मुलगाच होईल व त्याचे नांवू केशव ठेव असे सांगितले. त्यानुसार श्री थेटे यांना मुलगा झाला व त्याचे नांव त्यांनी केशव असेच ठेवले. श्री केशव हे अद्याप हयात असून त्यांचे वय ९२ इतके आहे. आप्पासाहेबांच्या मार्गदर्शनामुळे अनेक निकटवर्तीय महाराजांच्या दर्शनास कोल्हापूरात यावयाचे. असाच एक निकटवर्तीय गोकुळ अष्टमीला मठात आला असताना त्यांनी महाराजांच्या चांदीच्या पादुका मिळाव्यात अशी आप्पासाहेबांजवळ इच्छा व्यक्त केली. त्यावर आप्पासाहेब यांनी दोन दिवस थांब असा सल्ला दिला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे खरोखरच दोन दिवसांनी एक भक्त महाराजांच्या आशीर्वादामुळे काम झाल्याने नवस फेडण्यासाठी चांदीच्या

पादुका घेवून मठात आला व त्याच चांदीच्या सुबक पादुका सदर निकटवर्तीयास मिळाल्याने त्याची मनोकामना पूर्ण झाली. आप्पासाहेबांचे एक भक्त सरकारी नोकरीत होते त्यांना त्यांचे वरिष्ठ वारंवार जाती विषयक पाणउतारा करीत असत. असेच एकदा वरिष्ठांनी सदर भक्ताचा कार्यालयीन वेळेत बराच अपमान केल्याने उद्विग्न मन:स्थितीत ते आप्पासाहेबांच्या भेटीस आले. तेंव्हा श्री आप्पासाहेब यांनी रामभाऊ, तुमची मन:स्थिती आज बरी नसल्याबाबातचे कारण विचारले. त्यावर त्यांनी कार्यालयातील प्रसंग सांगितला. त्यावर आप्पासाहेब यांनी चार महिन्यात तुझ्या वरिष्ठांची बदली होईल व त्याचे जागी तूच बसशील असे सांगितले. त्यानुसार संबंधित त्रास देणाऱ्या वरिष्ठांची बदली होऊन त्यांचे जागी संबंधित भक्ताची बढती मिळून नेमणूक झाली.

त्यांच्या पुण्यातील वास्तव्यात ते दर शनिवारी घरात असतील तेवढी सुटी नाणी घेऊन टांगा करुन मिनर्व्हा टाकीज, सध्याची पुण्यातील भाजी मंडई येथे जात असत. त्यांचेबरोबर त्यांना मानणारे निकटवर्तीय श्री नारायण खरे हे बरोबर असत. श्री आप्पासाहेब यांचा टांगा आलेला पाहताच तेथे बसलेले भिकारी मोठ्याने कर्णाचा अवतार आला असे म्हणून टांग्याकडे धाव घेत. संबंधित भिकाऱ्यांना सुटी नाणी ते दान करीत.

श्री आप्पासाहेब यांचा कालखंड १८७१ ते १९३९ असा होता. ते दि. १८.०९.१९२९ रोजी वयाच्या ५५ व्या वर्षी सेवा निवृत्त झाले. वर वर्णन केल्याप्रमाणे श्री आप्पासाहेब हे निष्ठावान, दानशूर व अध्यात्मात प्रगती केलेले एक साधक होते. असे दिसून येईल. त्यांच्या प्रेरणेने श्री महाराजांना गुरुस्थानी मानून येणारे त्यांचे आप्तस्वकीय व निकटवर्तीय अद्यापही दोन पिढ्या तरी सदर वारसा चालवित आहेत हेच आप्पासाहेबांच्या श्रध्देचे व निष्ठेचे फळ आहे हे म्हणणे वावगे ठरणार नाही. स्व. केशवआप्पा गोखले यांनादोन मुले १) श्रीकृष्ण २) शशिकांत

शब्दांकन :- **श्री. दीपक नारायण खरे**



वांगीबोळ कोल्हापूर येथील व्यास वाड्यातील श्री दत्त पादूका

# श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे सद्शिष्य परमपूज्य आप्पासाहेब गोखले यांच्या आठवणी

मी सर्वप्रथम आप्पासाहेबांना बघितले तेंव्हा लहान होते. शाळेत ५ वीत शिकत होते. वडील श्री रामचंद्र गणेश थेटे यांचेबरोबर शनिवारात वाड्यात मी आप्पासाहेबांचा आशीर्वाद घ्यायला गेले होते. घरी प्रवेश केल्यावर श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या मोठा फोटो लक्ष वेधून घ्यायचा. आप्पासाहेबांचा पोशाष – काळा कोट, पांढरे उपरणे, स्वच्छ परिटघडीचे पांढरे धोतर. त्यांच्या कोटाच्या खिशात साखळीचे घड्याळ असे. कांही दिवस आमचे वडिल जळगांव मुक्कामी होते. त्यांचा परिचय तेथील प्राचार्य आप्पासाहेब गोखले यांच्याशी नोकरीनिमित्त झाला. परिचयाचे रुपांतर नंतर गुरुशिष्यात अशा संबंधात झाले. कांही दिवसांनी निवृत्त झाल्यानंतर आप्पासाहेब पुण्याला शनिवारपेठेत थेटे वाड्यात स्थायिक झाले. आमचे वडिल सुध्दा पुण्याला शनिवार पेठेतच पुरंदरे वाड्यात रहायला आले. आम्हा सर्वांना आप्पासाहेबांचा सहवास हाकेच्या अंतरावर आल्यामुळे आनंद झाला. आप्पासाहेबांचा सत्संग असल्याने आमच्या घरात गुरुवारी व शनिवारी आरत्या. भजने होत. आप्पासाहेबांमुळे सत्पुरुष केशवराव देशमुख आमच्या घरी आले होते हे भाग्यच.

आप्पासाहेबांमुळे आमचे वडील कोल्हापुरात श्रीकृष्ण सरस्वती महाराज मठात दर्शन घ्यायला जायचे. गोकुळ अष्टमीच्या उत्सवात आवर्जून हजेरी लावायचे. एकदा असेच आप्पासाहेबांच्या बरोबर कोल्हापुरात मठात मुक्कामी असताना आमच्या वडिलांनी चांदीच्या पादुकांचा प्रसाद मिळावा अशी इच्छा आप्पासाहेबांजवळ व्यक्त केली. त्यावर दोन दिवस थांबा असा आप्पासाहेबांनी सल्ला दिला. खरोखरच दोन दिवसांनी एक भक्त काही महत्वाचे काम झाल्याने नवसाच्या चांदीच्या पादुका मठात अर्पण करावयास आला. त्याच चांदीच्या सुबक पादुका नंतर माझ्या वडिलांना प्रसाद म्हणून प्राप्त झाल्या. तो आंनद वेगळाच.

**आप्पासाहेबांच्या काही आठवणी –**

१) दर एकादशीला आप्पासाहेब टांगा करुन मिनर्व्हा टॉकिज (सध्याची महात्मा फुले भाजी मंडई) येथे टांग्याने जात. आमचे वडील व नारायण खरे हे देखील बरोबर असत. पिशवी भरुन सुट्या पैशाची नाणी ते तेथे येईल त्याला दान करीत.

२) त्यांना पेन्शन ज्या दिवशी मिळत असे तेंव्हा परिचितांना किटलीतून चहा देत असत व लहान मुलांना पैसे वाटीत असत.

३) आमच्या आईस लागोपाठ ३ मुली झाल्या म्हणून नाराज असे. त्यावेळच्या परिस्थितीत ते साहजिक होते. आमच्या वडिलांतर्फे हा विषय आप्पासाहेबांच्या कानावर घातला. आप्पासाहेबांनी आशीर्वादपर आश्वासक असे सांगितले की आता मुलगाच होईल. त्याचे नांव केशव ठेवा. खरोखरच आमच्या घरी आमचा धाकटा भाऊ जन्माला आला – केशव रामचंद्र

थेटे. सत्पुरुषांचा आशीर्वाद सत्य झाला.

४) आमचे वडिल आप्पासाहेबांची एक आठवण नेहमी सांगायचे की राजापुरात गंगा प्रकट झाली म्हणून आप्पासाहेब जेंव्हा दर्शनाला गेले होते तेंव्हा प्रत्यक्ष श्रीकृष्ण सरस्वती यांनी दर्शन दिले. केळाचा प्रसाद दिला. अर्धे केळ सोलून हे केळ खा म्हणून सांगितले.

५) आम्ही शाळेत असतांना आप्पासाहेबांचा आशीर्वाद घेऊन पुढे शाळेत जायचो त्यावेळेस ते आम्हाला बशीत वेगळे काढून ठेवलेले ब्रेड व बटाटा भाजी प्रथम द्यायचे. त्याची चव अजूनही जिभेवर इतकी वर्षे उलटून गेल्यावरही रेंगाळत आहे.

शब्दांकन – **श्रीमती वासंती शरदचंद्र मरकळे**
(पूर्वाश्रमीच्या सिंधू रामचंद्र थेटे)



स्व.केशव बापूजी गोखले उर्फ आप्पा गोखले(प्राचार्य)

# स्व. श्रीकृष्ण व्यास-राधाबाई व्यास यांची माहिती

कोल्हापूरला श्री महालक्ष्मी मंदिराजवळ वांगी बोळ नावाची गल्ली आहे. या वांगी बोळात व्यास वाडा आहे. त्या वाड्याभोवती व आसपास पूर्वी बरीच झाडी / झाडोरा होता. तसेच तेथे एक पिंपळाचा एक मोठा वृक्ष होता. त्या वाड्यात एक व्यास दांपत्य रहात होते. स्व. व्यास हे दशग्रंथी वैदीक ब्राम्हण होते. त्यांच्याकडे बरीच मुले वेद विद्या शिकायला येत. त्या पिंपळाच्या झाडाखाली/वृक्षाखाली बसून ते मुलांना वेद अध्ययन शिकवत असत. त्यांचा रोजचा कार्यक्रम म्हणजे सकाळी लवकर स्नान संध्या आवरणे, वैश्वदेवाला नैवेद्य दाखवून बाहेर काकबली ठेवणे, घरी आलेल्या अतिथिंना भोजन देणे, मधुकरी मागायला आलेल्यांना मधुकरी वाढणे, असा होता. ते वेद शास्त्र संपन्न दशग्रंथी ब्राम्हण होते.

एके दिवशी मुले पिंपळाच्या झाडाखाली वेद अध्ययन करीत बसली होती. त्यावेळेला व्यास शास्त्री घरात काही कामानिमित्त गेले होते. मुले वेद पठणात गुंग होते. इतक्यात त्यांच्या कानावर जोराचा आवाज आला ''अरे तू चुकलास, पाठ बरोबर होत नाही.'' ते ऐकून मुले घाबरली. गुरुजी / शास्त्री तर समोर नाहीत, झालेली चुक कोण सांगत आहे? गोंधळ उडून गेला. इतक्यात गोंधळ ऐकून शास्त्री बाहेर झाडाखाली आले. झालेला सर्व प्रकार / गोंधळ त्यांच्या लक्षात आला. त्यांनीही जोरात आरोळी दिली /आव्हान दिले ''वेदातील चूक सांगणारा तू कोण आहेस? तू समोर ये.'' तेव्हां त्या पिंपळाच्या झाडातून आवाज आला की ''मी ब्रम्हराक्षस आहे. या पिंपळाच्या झाडावर माझे बऱ्याच काळापासून वास्तव्य आहे. आता माझ्या उध्दाराची वेळ आली आहे. तुला एक आता रहस्य सांगतो.

तुझ्याकडे रोज दोन प्रहरी भिक्षा मागायला येणाऱ्यांना तू ओळखत नाहीस. ते प्रत्यक्ष श्री भगवान दत्तात्रय आहेत. ते उद्या नेहमीप्रमाणे दोन प्रहरी भिक्षा मागायला आले की त्यांचे पाय तू घट्ट धर. तुला संतती नाही. तू संतती माग. तसेच माझ्या उध्दाराची गोष्ट सांग म्हणजे दोघांचेही काम होऊन जाईल. विसरू नको, भिऊ नको.'' ब्रम्हराक्षसाची ही वाणी ऐकून व्यास शास्त्रींना आनंद झाला. दुसऱ्या दिवशी दोन प्रहरी व्यास शास्त्रींच्या वाड्यासमोर देव अतिथी श्री दत्तात्रेय पिंपळाखाली भिक्षेला येऊन उभे राहिले. व्यास शास्त्रींना अतिशय आनंद झाला. व्यास शास्त्रींनी त्यांना भिक्षा घातली व पाय घट्ट धरून प्रत्यक्ष दत्तात्रयांचे दर्शन मागितले. पाय सोडलेच नाहीत व म्हणाले ''तुम्ही प्रत्यक्ष दत्तप्रभु आहात. मला दर्शन द्या. दर्शन देत नाही तोपर्यंत आपले पाय मी सोडणार नाही'' श्री दत्त महाराज श्री व्यास शास्त्रींच्या श्रध्देला, भावनेला, तपाला प्रसन्न झाले व त्यांनी व्यास शास्त्रींना प्रत्यक्ष दर्शन देवून म्हणाले '' तुला संतती होईल. तुझा वंश वाढेल. परंतु आठव्या पिढ्यांपर्यंत एकच पुत्र होईल, जन्मेल. नवव्या पिढीत वंश विस्तार होईल. नवव्या

पिढीतच त्या पिंपळावरील ब्रम्हराक्षसाचा उध्दार होईल व ते पिंपळाचे झाड उन्मळून पडेल. पिंपळाचे झाड उन्मळून पडल्यावर त्याच्या बुडक्यात श्री दत्त पादुका मिळतील. त्या पादुकांचे श्रध्देने रोज पूजा अर्चा करा म्हणजे तुमचा वंश वाढेल. संतती / संपती कायम प्राप्त होईल. पुन्हा तुम्हाला माझे नवव्या पिढीत दर्शन होईल.'' असे सांगून असा आशीर्वाद देऊन ते श्री दत्त स्वरुपातील अतिथी तेथेच अंतर्धान पावले. व्यास शास्त्रींच्या नवव्या पिढीपासून वंश विस्तार वाढत गेला. नवव्या पिढीत तो पिंपळाचा वृक्ष उन्मळून पडला. तेथे श्री दत्त पादुका सापडल्या त्या श्री दत्तपादुकांची वांगी बोळात व्यास वाड्यात स्थापना करण्यात आली. त्या पादुकांची रोज पूजा-अर्चा, अभिषेक  चालू आहे. ही व्यवस्था दिलीप व्यास यांच्याकडे आहे.  पुन्हा तुम्हांला '' मी नवव्या पिढीत दर्शन देईन, भेटीन '' असा आशीर्वाद श्री दत्त गुरुंनी फार पूर्वी व्यास शास्त्रींना दिला होता. या नवव्या पिढीतील व्यास शास्त्री म्हणजेच कृष्णभंट दत्तंभट व्यासशास्त्री. त्यांच्या पत्नींचे नाव राधाबाई. या श्रीकृष्ण - राधाबाई दांपत्याला श्री दत्त महाराजांनी श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या रुपात दर्शन दिले, सेवा करून घेतली, आलंय गेलयं अध्याय घडवला श्री कुंभार स्वामी व्यासांचे दैवत झाले.

**||श्री ||**


**कृष्णंभट दत्तंभट व्यास (वंशावळ)**

- ५ मुले
  - राम
    - १ मुलगी
  - लक्ष्मण
    - महादेव
      - ६ मुली: शशी, पुष्पा, प्रभा, सुधा, रजनी, नंदा
      - २मुले: दत्तात्रय, भानुदास
  - नागेश
    - नरहर
      - १ मुलगा: भालचंद्र
        - २ मुली: तेजस्विनी, अमृता
      - ३ मुली: विद्या, रेखा, शैला
  - अनंत
    - ----
  - गोपाळ
    - दत्तात्रय,दिगंबर,श्रीपाद,कुंदा
- ५ मुली

शब्दांकन :- **श्री. भालचंद्र  नरहर व्यास, कोल्हापूर**

# समुद्र भरला आहे

## ॥ अध्याय २५ वा ॥



**श्री कुंभार स्वामींनी स्व. बाळकू राशिवडेकराला दिलेल्या पाषाण पादूका**

### विषयसूची....!

१) श्री व्यास मठीची स्थापना
२) मिठारी गल्लीतील जनाबाई चोपडे/मुक्ताबाई कपडेकर ताईची सेवा
३) कोल्हापुरातील काळे सावकराना मुले
४) स्व. रखुमाई पुरेकारांचे लग्न
५) कोळ्याचा संत कुशाप्पा

## अध्याय २५ वा

श्रीकृष्ण सरस्वती गुरुंनी आठवण म्हणून ज्यांना वस्तू दिल्या भाग्यवान भक्त ते रामभाऊ राशिवडेकर, वासू दळवी, मुरगुडकर, कृष्णा लाड, व्यास, नामदेव हे भाग्यवान भक्त होत. श्रीकृष्णगुरु कोणास उपरणे देती, कोणास चर्म पादुका, कोणास पाषाण पादुकाही मिळती. टोपी, अंगरखा वस्तू ज्यांना ज्या वस्तू मिळाल्या त्या पुढे त्यांनी त्या प्राणा पलिकडे जपल्या. श्रींचा प्रसाद म्हणून देव्हारी पुजल्या. पूर्वी बाळकू राशिवडेकरने श्रीकृष्णगुरुंच्या पाषाण पादुका तयार केल्या होत्या त्या पाषाण पादुकावर कधीकधी ते पाय ठेवून उभे राहून म्हणत ''या पादुका जेथे असतील तेथे आमुचा वास असेल. जी वांच्छा / इच्छा असेल ती पाषाण पादुकाच्या पूजेने पूर्ण होतील.'' बाळकू या पाषाण पादुकांची नित्य पूजा / आरती करी. पुढे त्या पाषाण पादुका कृष्णा लाडाला मिळाल्या. कृष्णा लाडाने त्या श्रीकृष्णगुरुचा दास गोविंद व्यासास दिल्या. व्यासाला स्वर्ग हाती लागल्याचे वाटले. त्याला आनंद वाटला. त्या पाषाण पादुका गंगावेशीत सत्यशोधक समाजाच्या लगत निवांत ठिकाणी स्थापन कराव्या. सर्वांना दर्शन घडेल असा विचार व्यासाच्या मनात आला. सर्व भक्तांचा विचार घेतला. श्री शाहू महाराज यांचेकडून जागा मागून घेण्यासाठी सर्व भक्त मंडळी राजवाड्यावर निघाली. नामदेवाने पादुका शिरी घेतल्या. वर्दीशिवाय सर्व भक्त मंडळी राजवाड्यात आली. राज भेटीसाठी परवाना लागे. ते भाविकांच्या / भक्तांच्या लक्षात आले नाही.

सर्वजण राजवाड्याच्या आगाशीत गेले आणि गमतीदार प्रकार झाला. त्यावेळी श्री शाहू राजा बागेत हिंडत होते. त्यांच्या ते नजरेत भरले. म्हैसकर फौजदाराला विचारले, ''वर्दीविना हे लोक राजवाड्यात कसे आले?'' कडक शिस्तप्रिय म्हैसकर फौजदार होता. फार करडा होता. त्याने शिटी फुंकली. शिटी फुंकता शिपाई हजर झाले. शिपायांना तो म्हणाला, ''पहाता काय, सर्वांना धरा'' शिपाई हुकूमाचे ताबेदार ते धावले भक्तांच्या अंगावर. मोकळे होते ते झाले पसार. नामदेव मात्र डोक्यावर पादुका घेवून तिथेच थांबला. काठीसह म्हैसकर फौजदार जवळ आला. नामा थरथर कापू लागला. नामा म्हैसकरांना म्हणाला ''काठी घ्या बाजुला तुम्हांला सर्व सांगतो. माझ्या शिरावर श्रीकृष्णनाथांच्या पादुका आहेत. त्या करवीराला तारणाऱ्या आहेत. या श्रींच्या पादुका स्थापना करण्यासाठी जागा मागण्यासाठी आम्ही आलो आहेत'' दुरुन शाहू राजे पाहत होते. श्रीशाहू राजाने पुन्हा म्हैसकर फौजदारांला काय प्रकार आहे विचारले. म्हैसकर फौजदाराने श्री शाहू राजांना सर्व सांगितले. वहाणा बाजूला ठेवून श्री शाहू राजे झटकन उठले. पादुकावर माथा ठेवला. पूजा करण्याचा आदेश दिला. राजवाड्यात पादुकांची पूजा झाली. श्री शाहू राजे नामाला म्हणाले ''तुम्हां भक्तांना कष्ट झाले. श्री भक्तांची जागा मागण्याची मागणी मी मान्य केली. तुमच्या मागणीला संमती देवून धन्य झालो आहे. गुरु पादुकांना जागा देण्याची गुरुसेवा घडली हे माझे भाग्य'' अशा रीतीने गंगावेशीत व्यास मठी भक्तासाठी स्थापन झाली. निजबोध मठी स्थापन झाली.

वैराग्य मठीच्या लगत मिठारी गल्लीत जनाबाई चोपडे नावाची स्त्री रहात असे एकदा श्रीकृष्ण गुरु तिच्या घरी गेले. जनाबाई सून मंजुळा श्रीकृष्णगुरुंच्या पाया पडतांना ते त्रिवार म्हणाले ''बेटा, बेटा'' पुढे मंजुळास मुलगा झाला. त्याचे नांव दत्तात्रय ठेवले. गुरुप्रसाद मिळाला म्हणून मंजुळाच्या सासू सासऱ्यांना आनंद झाला. पुढे दत्तात्रयाचे कपडेकराच्या मुक्ताशी लग्न झाले. दोघे श्रीगुरु चरणी भाव ठेवून सुखाने संसार करु लागले. मुक्ताबाईस श्रीकृष्णगुरुंची भक्ती जडली. ती संसारात विशेष रमली नाही. सर्व काळ गुरुसेवेत घालवू लागली. मुक्ताबाईला सर्व ताई ताई म्हणीत. वैराग्य मठीत राऊतमामा फुले आणीत. ताई उत्तम पूजा बांधीत / करीत. उत्तम पूजा पाहून वैराग्य मठीत येणाऱ्या भक्तांना आनंद होई. शहाऐंशी वर्षाची मुक्ताई गुरुसेवा करतांना पाहून सर्व भक्त मंडळींना आनंद होई. जशी ज्याला आवड तशी ती श्रीकृष्णगुरु पुरवीत. मुक्ताई गुरुसेवेची इच्छा धरी ती गुरुसेवेची इच्छा अशा प्रकारे श्रीकृष्णगुरुंनी पूर्ण केली.

कोल्हापूरात रखुमाई पुरेकर, जातीची कुंभार स्त्री चार इयत्ता शिकलेली होती. जरी चार इयत्ता शिकली असली तरी सुलभ ग्रंथार्थ सांगतसे. एकदा रखुमाईचा पिता आपल्या आप्तांना / पाहुण्यांना घेऊन वैराग्य मठीत श्रीगुरु दर्शनाला आला. त्याच्या आप्ताच्या कडेवर तीन वर्षाचा मुलगा पाहुन श्रीकृष्णगुरु म्हणाले ''कडेवरील मुलगा रखुमाईचा पती हा'' त्या कडेवरच्या मुलाला व रखुमाईला जवळ उभा करुन श्रीकृष्णगुरुंनी अक्षता उधळून दिल्या व लग्न झाले म्हणाले. रखुमाईचा पिता तसेच त्याचे आप्त / नातेवाईक भाविक होते. ''श्रीकृष्णगुरुंनी ११ वर्षाच्या रखुमाई व कडेवरील ३ वर्षाचे मूल यांचे लग्न लावले आहे तर तसेच करु'' असे सर्वजण म्हणू लागले. अकरा वर्षाची रखुमाई पुरेकर आपल्या तीन वर्षाच्या पतीबरोबर नांदायला तांबव्याला सासरी गेली. आपल्या पतीला ती मुला सारखी जपतसे. लहान असलेला तिचा पती तिला आई म्हणून हांक मारी. पुढे असा विचित्र काळ लोटला.

पुढे तिचा पती सज्ञान झाला. दोघांचे लग्न श्रीकृष्णगुरुंच्या कृपेने कसे घडून आले. हे तिच्या सासऱ्यांने तिच्या पतीला सांगितले. त्यावर तिच्या पतीचा विश्वास बसला. पुढे रखुमाईचा संसार सुरळीत चालला. कुठलाही व्यत्यय न येता रखुमाईला आठ अपत्ये झाली. संसार सुखाचा झाला. आजही रखुमाईचे नातेवाईक ही घडलेली सत्य घटना सांगतात. तांबवे गांवात कुशाप्पा नांवाचा वारकरी होता. तो अधिकारी होता. तो पंढरपूरची पंधरवड्याची पायी वारी करीत असे. त्याने एकदा श्रीकृष्णगुरुंना रखुमाई जवळ नमस्कार सांगितला. एकदा रखुमाई पुरेकर कोल्हापूरला माहेरी आली असतांना श्रीकृष्णगुरुंना कुशाप्पाचा नमस्कार सांगण्यासाठी ताराबाईच्या घरी निघाली. एवढ्यात वाटेतच भेटून श्रीकृष्णगुरु रखुमाईला त्रिवार म्हणाले ''कुशाप्पाचा नमस्कार पोहचला. कुशाप्पाला कुशल सांगणे'' अशा रीतीने कुशाप्पा श्रीकृष्णगुरुच्या कृपेला पात्र ठरला.

*****

# स्व. मुक्ताबाई दत्तात्रय चोपडे (ताई) यांची माहिती

कुंभार गल्ली जवळच मिठारी गल्ली, पाटलांची गल्ली (जिरगे बोळ) आहे. या गल्लीत स्व. जनाबाई चोपडे रहात असत. त्या नामदेव शिंपी समाजातील असून त्यांची व त्यांच्या पतीची श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज (कुंभार स्वामी) यांच्यावर खूप श्रध्दा होती. बरेच दिवस त्यांच्या मुलाला/सुनेला मूल नव्हते. त्यांच्या मुलाचे नाव दत्तात्रय व सुनेचे नाव मंजुळा होते. एकदा श्री स्वामी जनाबाई चोपडेंच्या घरी गेले. जनाबाईची सून मंजुळा ही श्री स्वामींच्या पाया पडताच श्री स्वामी तीन वेळा बेटा, बेटा, बेटा म्हणाले. पुढे श्री कुंभार स्वामींच्या कृपेने मंजुळेला मुलगा झाला. या मुलाचे नाव त्यांनी दत्तात्रेय ठेवले. पुढे दत्तात्रय कर्ता झाल्यावर त्याच गल्लीतील कपडेकरांच्या मुक्ताबाईबरोबर श्री कुंभार स्वामींनी लग्न लावून दिले. सुखाचा संसार चालू होता. परंतु दत्तात्रय कपडेकर हे अल्पआयुष्यी ठरले. स्वर्गीय दत्तात्रय कपडेकरांच्या मृत्यूनंतर मुक्ताबाईंनी आपले सर्व आयुष्य श्री कुंभार स्वामींच्या सेवेला वाहून घेतले. कोल्हापूरातील कुंभार गल्लीतील श्री शिर्के यांच्या घरातील श्री स्वामींच्या समाधीची हार फुलांने पुजा बांधणे, मठीची स्वच्छता राखणे, वेळेवर आरती करणे, उत्सवाची व्यवस्था बघणे इत्यादी कामे त्यांनी अखेर पर्यंत केले. त्यांनी वयाच्या ९६ व्या वर्षी अंदाजे १९८० साली देह ठेवला. स्व. मुक्ताबाईंना यांना एक भाऊ होता. त्यांचे नाव स्वर्गीय धोंडिराम एकनाथ कपडेकर होते. स्व. मुक्ताबाई या शिर्केच्या घरी दिवसभर श्री स्वामी सेवा करून रात्री आपल्या या भावाकडे रहात असत.

स्व. धोंडिराम कपडेकर यांना चार मुले व तीन मुली होत्या. मुलांची नावे पुढीलप्रमाणे.

१) **स्व. सुभाष :–** हे स्वर्गीय धोंडिराम कपडेकर यांचे क्रमांक एकचे थोरले चिरंजीव. ते अंदाजे इ.सन २००० साली कोल्हापूर मुक्कामी वारले.

२) **दिगंबर :–** हे स्वर्गीय धोंडिराम कपडेकरांचे क्रमांक दोनचे चिरंजीव. याना दत्तात्रयही म्हंटले जाते. श्री कुंभार स्वामींच्या दृष्टांताने स्वर्गीय मुक्ताबाई यांनी दत्तक घेतले. ते व्यवसायाने डॉक्टर असून कळंब्याला रहातात. श्री दिगंबर यांचे वय अंदाजे ७० वर्षे असून त्यांना एक मुलगा असून त्यांचे नाव ध्रुवराज आहे. तर मुलींचे नावे १) मनिषा व तृप्ती आहे.

३) **मुकुंद :–** हे स्वर्गीय धोंडिराम कपडेकरांचे क्रमांक तीनचे चिरंजीव . ते एक सुखस्त गृहस्थ असून त्यांचे वय अंदाजे ६२ वर्षे आहे.

४) **हर्षराज :–** हे स्व. धोंडिराम कपडेकरांचे क्रमांक चारचे चिरंजीव यांचा व्हिनस सिनेमा टॉकीजवळ श्री राधाकृष्ण मंदिराजवळ कोल्हापूर लिथो प्रेस आहे. त्यांचे वय अंदाजे ५५ वर्षे आहे . त्यांच्या पत्नीचे नाव मंजिरी असून त्या महाराष्ट्रात पाककला तज्ञ म्हणून प्रसिध्द आहेत. परमपूज्य मुक्ताई या वयाच्या ९६ व्या वर्षी अंदाजे १९८० साली वारल्या .

शब्दांकन :– **श्री हर्षराज कपडेकर, कोल्हापूर**

# श्रीसंत सद्गुरु प.पू. घाडगेनाथ महाराज

सातारा जिल्ह्यात कराडला पवित्र कृष्णा कोयना नदीचा पवित्र संगम झाला आहे. या संगमाला प्रीतीसंगम म्हणतात. या संगमाच्या पश्चिमेला वाल्मिक वांग नदीच्या काठी कोळे नांवाचे गांव आहे. कोळे गांवाला लागून कुठरे नांवाची वाडी आहे. या कुठरे गांवात / वाडीत महादजी घाडगे व कोयनाबाई या पती पत्नीच्या पोटी भक्त श्रेष्ठ घाडगेनाथ महाराजांच्या जन्म शके १६७८ घातानाम संवत्सर (इ.स. १७५६) साली झाला. त्यांचे पाळण्यातील नांव विठ्ठल होते. त्यांच्या पाठीवर दोन भाऊ जन्मले त्यांची नांवे नायकू व निनू अशी होती. विठ्ठल व त्यांची भावंडे वयाने मोठी होताच त्यांची लग्ने झाली. लग्नकार्याला खर्च फार झाला त्यामुळे विठ्ठल यांना कोळेकर देशपांडे यांच्याकडे घरी नोकरी करणे भाग पडले. कोळेकर देशपांडे वतनदार देशपांडे असल्याने कुळाकडील / रयतेकडील सारा वसूल करण्याचे काम विठ्ठल यांनाकरणे भाग पडे. ते काम त्यांनी इमाने / इतबारे पार पाडले. कोळेकर देशपांडे हे जरी सारा वसुलीने खूष झाले तरी सारा वसूल कामात गोर गरिब लोकांना त्रास होत असे. दमदाटी, अन्याय करावा लागे. याचा विठ्ठल यांना पश्चाताप झाला व ती नोकरी त्यांनी सोडली. घरी शेती करुन प्रपंच चालवू लागले. त्यांच्या पत्नी रक्माबाई यांनीही संसार व्यवस्थित चालविला. लवकरच विठ्ठल यांचे आई वडिल वारले. वडिलार्जीत पूर्वीचे कर्ज, लग्नात झालेल्या कर्जाचा भार, शेतातील उत्पन्न कमी त्यातच कोळ्यातील नामजोशी सावकारानी त्यांना कर्ज वसुलीसाठी तगादा लावला.

पैसे परत करणे अवघड होते, व्याज, मुद्दल परत करणे अवघड होते. ''परंतु आता पैसे नाहीत सोय होताच तुमचे पैसे परत करतो'' असे नामजोशी सावकाराला सांगून सुध्दा त्याने अन्नपाण्यावाचून विठ्ठल यांना डांबून ठेवले. कुठरे गांवच्या बापू पाटील यांनी विठ्ठल यांना जामीन राहून नामजोशी सावकाराला सांगून सुध्दा त्याने अन्नपाण्यावाचून विठ्ठल यांना डांबून ठेवले. कुठरे गांवच्या बापू पाटील यांनी विठ्ठल यांना जामीन राहून नामजोशी सावकराच्या सावकारी पाशातून सोडविले. पुढेही नामजोशी सावकाराने विठ्ठल यांना कर्ज वसुलीसाठी तगादा लावला, त्रास दिला. ऋण व हत्या यांच्यापासून मुक्तता नाही असा विचार करुन कसेही करुन नामजोशी सावकाराचे कर्ज फेडण्याचा निश्चय विठ्ठल यांनी केला. त्यांच्या वडिलांचे (महादजी घाडगे) यांचे एक मित्र सुभाना काकडा हे त्यावेळी कोल्हापूर दरबारात कामाला होते. या सुभाना काकडा यांच्याकडे विठ्ठल कोल्हापूरला गेले व त्यांच्या कानावर सर्व हकीकत घातली. सुभाना काकडा यांच्या प्रयत्नाने विठ्ठल यांना त्यांची घोडेस्वारी पाहून श्रीमंत छत्रपतींनी त्यांना रिसालदाराची नोकरी दिली. मोठमोठा पराक्रम गाजवून, राजनिष्ठायुक्त सर्वोत्कृष्ठ सेवा करुन, कोल्हापूर राजदरबारी विठ्ठल यांनी आठ वर्षे नोकरी केली. नोकरीत मिळालेले पैसे घेवून ते गांवी आले. नामजोशी सावकार व इतरांची देणी / कर्ज देवून / फेडून ते मोकळे झाले. तरीसुध्दा त्यांना सावकारांचा त्रास / तगादा चालू राहिला. त्यातच त्यांचे बंधू नायकू व नानू

यांच्या कर्जाचा तगादा त्यांच्या मागे लागला. फेडलेले कर्ज माझ्या पुन्हा मागे लागते या विचारांनी ते उद्विग्न झाले. पुन्हा ते कोल्हापूरला नोकरीवर गेले. सर्व कर्ज फेडल्याशिवाय गांवाला तोंड दाखवायचे नाही असा त्यांनी निश्चयच केला.

एकदा कोल्हापूर छत्रपतींची स्वारी सोलापूर प्रांती गेली. त्यावेळी परत येते वेळी छत्रपतींनी श्रीक्षेत्र पंढरपूरला मुक्काम केला. तो दिवस होता कार्तिक शुध्द एकादशी. छत्रपतींनी व सर्वांनी चंद्रभागेचे स्नान करुन श्री विठ्ठल दर्शन घेतले. सर्वांना आनंद झाला. सायंकाळी विठ्ठल घाडगे हे मित्रासह पंढरपूरात वाळवंटात फिरु लागले. जिकडे तिकडे टाळ मृदंगाचा गजर, ज्ञानदेव तुकारामाचा गजर, पुंडलिका वरदे हरि विठ्ठल गजर, तसेच दामाजीपंताचे कर्ज फेडण्यासाठी श्री विठ्ठल महार झाला. नृसिंह मेहत्याची हुंडी वटवली, कबीराचे शेले विणून बाजारात विकले, मीराबाईसाठी विठ्ठलाने विष प्यायले, अशा अनेक गोष्टी विठ्ठल यांनी बोधले यांच्या कीर्तनात ऐकल्या. पंढरपूरचा श्री पांडुरंग / विठ्ठल भक्ता विषयी दयाळू आहे. जर असा दयाळू पांडुरंग / श्री विठ्ठल मला सर्व कर्जमुक्त करेल तर अनवाणी पायी दर्शनाला येण्याचा नवस श्री विठ्ठल दर्शनाच्या वेळी करुन पुन्हा एकदा नमस्कार करुन नवस करीत आहेत तोच भक्तवत्सल रुक्मीणीकांत श्री विठ्ठल मूर्तीने त्यांच्या नवसाला मान हलविल्याचे श्री विठ्ठल यांनी पाहिले. श्री विठ्ठल यांना फार आश्चर्य वाटले. कारण श्री विठ्ठल मूर्ती पाषाणाची असून माझी विनंती, नवस ऐकून मान हालली याचा फार विठ्ठल यांना आनंद झाला. त्यांचे मन सद्‌गदित झाले. आनंदाने भरुन आले. लवकरच ते कोल्हापूरला परतले.

पुढे अथणीच्या सारा वसुली कामात रिसालदार विठ्ठल घाडगे यांने शौर्य दाखवून, इतर लढाईच्या प्रसंगी शौर्य दाखविल्याने कोल्हापूर छत्रपतींनी त्यांचा सत्कार केला पगार, द्रव्य, धन बक्षीस दिले. लवकरच विठ्ठल घाडगे यांनी कोल्हापूर राजदरबारातील छत्रपतींची रिसालदाराची नोकरी सोडली. गांवी आल्यावर त्यांनी आपले, आपल्या भावांचे नोकरीतील आलेल्या पैशातून सर्व प्रकारचे कर्ज फेडले. कोणाचे तिळभर सुध्दा कर्ज राहिले नाही. त्यांना व त्यांच्या मंडळी रुक्मिणी यांना खूप आनंद झाला. पंढरपूरचा पांडूरंग / विठ्ठल मोठे दयाळू आहेत. त्यांनी माझे संकटात रक्षण केले. कर्जमुक्त केले. आता पंढरपूरास अनवाणी चालत जावून श्री दर्शन घेण्याचा, नवस फेडण्याचा निश्चय विठ्ठल घाडगे यांनी केला. विठ्ठल घाडगे आता अनवाणी चालत चालत पंढरपूरला आले. चंद्रभागेत स्नान करुन श्री विठ्ठल दर्शन घेवून आनंदाने कर्जमुक्तीचा नवस फेडला. आप्पाजी बडवे घरी राहून नैवेद्य तयार करुन श्री विठ्ठलाला दाखवून परत कोळ्याला आले. विठ्ठल घाडगे कोळ्याला परत आले परंतु ते पूर्ण विरक्त झाले.

एकदा विठ्ठल घाडगे श्रीक्षेत्र पंढरपूरला श्री विठ्ठल दर्शन घेवून परत कोळ्याला येत असतांना भाळवणी-पिलीव मार्गावर धुळेदेव ओढ्याजवळ श्री सद्‌गुरु गोदडनाथ महाराजांची त्यांच्यावर गुरुकृपा झाली. ती कार्तिक शुध्द एकादशीची वारी होती. विठ्ठल घाडगेनी श्री गोदडनाथ महाराजांच्या पायांना मिठ्ठी घातली व आपले सर्वस्व जिवन त्यांच्या चरणी अर्पण

केले. श्री गोदडनाथांनी / गोदडशहानी विठ्ठल घाडगेना विठ्ठल भक्ती, दर दशमीला पंढरपूर मुक्काम, एकादशी व्रताचा नियम दिला. विठ्ठल घाडगे वारीस जाईपर्यंत शेतधंदा करीत. पंचमी दिवशी पताका घेवून श्रीक्षेत्र पंढरपूर वारीस निघत. पंढरपूरची दर महिन्याची वारी करीत असतांना महापूर व इतर अनेक अडचणी येत राहिल्या परंतु त्यांनी वारी चुकविली नाही. विठ्ठल घाडगे एक थोर सत्पुरुष, संत अवतारी विभुती होऊन गेली. सर्व समाजाला भगवद् भजनी लावले. संत विठ्ठल घाडगे यांनी पाऊणशे वर्षे पायी अनवाणी पंढरपूरची वारी केली. पंढरीनाथ सखा करुन घरी आणून ठेवला. कोळे गांवला दुसरी पंढरी बनविली. आपण समाधी घेवून आपला पट्टशिष्य कुशाबाला आपला ध्वज / पताका / वारी दिली.

अश्विन वद्य शके १७८६ (सन १८६४) रोजी श्री संत घाडगेश्वरांनी समाधी कोळे येथे घेतली.





ह.भ.प.श्री घाडगेनाथ महाराज व ह.भ.प.श्री कुशाप्पा/कुशाबा महाराज समाधी, कोळे (ता.:- कराड)

# श्रीसंत कृष्णनाथ / कुशाबा / कुशाप्पा

कोळे येथील दरीआप्पा व संताई या भाविक दांपत्याच्या पोटी कुशाबाचा जन्म झाला. दरिआप्पा वाणी व्यापार उदीम करीत. त्यांच्या मोठ्या मुलाचे नांव कुशाबा ऊर्फ कृष्णनाथ होय. धाकट्या मुलाचे नांव शिवलिंग होते. दरिआप्पा वृध्द झाल्यामुळे कुशाबा व्यापार उदीम करुन घर चालवू लागला. लवकरच वडील वारले. परिस्थिती बिकट झाली. चरितार्थ चालविणे कुशाबाला अवघड जाऊ लागले. एकदा कुशाबा ढेबेवाडीच्या बाजारास गेले होते. त्या दिवशी मंगळवार होता. ढेबेवाडीला जातांना मानेवाडीच्या म्हसोबाला नवस बोलला ''म्हसोबा राया, तू जर देव असशील मला कुठे तरी चाकरी लागू दे, स्वतः व्यापार करण्यास जवळ भांडवल नाही. मला जर नोकरी लागली तर नैवेद्य नारळ अर्पण करीन'' म्हसोबाला नवस बोलल्या प्रमाणे ढेबेवाडीच्या बाजाराहून परत आल्यावर कुशाबाला कल्याणी वाणी नांवाच्या शेतकऱ्याकडे बैलांवर नोकरी / चाकरी मिळाली. दरमहा दोन रुपये पगार मिळू लागला. प्रपंच्यापुरते पैसे मिळू लागले. कुशाबाला आनंद झाला पुढे त्याने मानेवाडीला जावून म्हसोबाचा नवस फेडला. कल्याणी वाणी बैलावरुन व्यापार करीत असे. या व्यापाऱ्याच्या निमित्ताने कुशाबा सोलापूरला गेला. येतांना बैलासह पंढरपूरात मुक्काम केला. दुसरे दिवशी चंद्रभागा स्नान करुन त्याने राऊळात जावून श्री पांडुरंगाचे / श्री विठ्ठलाचे मनोभावे दर्शन घेतले. त्याला फार समाधान वाटले. बाकीच्या सहकाऱ्यांनी पुढे मुक्काम वाढविण्यास नकार दिला.

जवळ दसरा आला होता. कुशाबाच्या मनांत पंढरपूरात मुक्काम करुन पांडुरंगाचे नित्य दर्शन घ्यावे अशी इच्छा होती. त्याला पंढरपूर सोडून निघवत नव्हते. परंतु इलाज नव्हता. कुशाबा कोळ्याला परत जातेवेळी राऊळात आला व पांडुरंगाला म्हणाला ''आपल्याला सोडून निघवत नाही परंतू चाकरी / नोकरी मुळे परत फिरावे लागत आहे'' त्याला हुंदका भरुन आला, डोळे अश्रूने भरुन गेले. त्यावेळी असा एक चमत्कार झाला. मोरासारखे श्री पांडुरंगाच्या अंगाला सहस्त्र डोळे त्याला दिसले. त्याला अतिशय विस्मय वाटला व आनंदही झाला ''तुझ्या दर्शनाची माझ्या मनाला जशी ओढ आहे तशी तुझ्या मनाला माझी ओढ राहू दे. पुढील दसऱ्याला तुझ्या दर्शनाला यायला मिळू दे.'' अशी विनंती भावपूर्वक करुन कोळ्याला परत आला. पुढे कोळ्याला आल्यावर कल्याणी वाण्याकडील बैलावरील नोकरी कुशाबाने सोडून दिली व मीठाचा व्यापार चालू केला. चार पाच माणसांचे कुटुंब चार पाच महिने चालवून मूळ भांडवल चार रुपये शिल्लक असल्याचे पाहून त्याला आश्र्चर्य वाटले. ही पांडुरंगाचीच कृपा आहे असे त्याला वाटू लागले. दसरा जवळ आला होता. दसऱ्याला कुशाबाने पंढरपूरला पायी जाण्याचे ठरविले. कोळे गांवातील विठ्ठल घाडगेबुवा दर एकादशीला पंढरपूरला अनवाणी वारी करतात हे कुशाबाला माहित होते. त्यांच्या बरोबर पंढरपूरला पायी जाण्याचे कुशाबाने ठरविले. विठ्ठल घाडगे नियमाप्रमाणे पंचमीला पंढरपूरला पायी वारीला निघाले. कुशाबाची त्यांची गाठ पडली

नाही. मागोमाग कुशाबा पंढरपूरला पायी गेला. रत्नजडित पोषाख केलेली पांडुरंगाची मूर्ती पाहून त्याला परमावधीचा आनंद झाला. घाडगेबुवांची त्यांची पंढरपूरात गाठ पडली. कोळ्याला परत येतांना घाडगेनाथा बरोबरच कुशाबाा परत आला. परंतु दोघात कांही संभाषण झाले नाही. पुढे पुढे कुशाबा दर पंधरावड्याच्या पायी वारीला पंढरपूरला घाडगेश्वराबरोबर जाऊ लागला. आल्यावर खेडोपाडी बाजार करुन मीठ विकून पोट भरु लागला. प्रपंच चालवू लागला. घाडगेश्वरांनी मुद्दाम कुशाबाचे अंत:करण पाहिले, सत्वपरीक्षा घेतली परंतु कुशाबा कधी खिन्न झाला नाही. नाराज झाला नाही. पावसाळ्यात तर कुशाबाचे फार हाल होत. तथापि, कुशाबानी घाडगेश्वराची वारीची संगत सोडली नाही, सेवा सोडली नाही. अहोरात्र घाडगेश्वरांच्या सोबत कुशाबा असे. पंढरपूरच्या वारीहून कोळ्याला परत आल्यावर घाडगेश्वरांच्या शेतीचा व्याप, मळा सांभाळत. यातून वेळ मिळाल्यास आसपासच्या खेड्यात जाऊन मीठ विकून प्रपंच चालवीत, गरीबीच्या संसाराचे कुशाबाला कधी दु:ख झाले नाही. सर्वकाळ घाडगेश्वराच्या सेवेत आनंदाने देह झिजवला.

एकदा घाडगेश्वरानी कुशाबाचे दारिद्र्य दूर करण्यासाठी खिशातला चांदीच्या रुपयांचा बटवा वारीत रस्त्यात टाकला. कुशाबा रुपये उचलतो का? पाहिले. परंतु त्या रुपयाकडे कुशाबाने पाहिले नाही, स्पर्शही केला नाही. त्यामुळे घाडगेश्वर प्रसन्न झाले. पायी वारीस जातांना घाडगेश्वरांच्या पायात काटा मोडून/घुसून तो खालून वर आला घाडगेश्वर त्यामुळे जमिनीवरच बसले. घाडगेश्वर खाली का बसले हे पाहण्याकरिता कुशाबा पळतच त्यांच्याजवळ आला. त्याने हळूच कांटा काढला. घाडगेश्वरांच्या पायातून रक्ताची धार चालू झाली. कुशाबाला फार वाईट वाटले. तो रडू लागला. घाडगेश्वरांना पाठीवर पाठकुळी घेवून दोघांचे सामान डोक्यावर घेवून वाटचाल केली. त्या दिवशी करवडी गांवी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी घाडगेश्वराना पाठकुळी घेवून घाट पार करुन दशमीला पंढरपूर नियमाप्रमाणे गाठले. तेंव्हापासून घाडगेश्वरांची पूर्ण मर्जी कुशाबावर बसली. दोघे मिळून आता पंढरपूरची वारी पायी करु लागले. कुशाबावर पुत्रवत प्रेम केले, माया केली.

एकदा पंढरपूरला पायी वारीला गेले असतांना घाडगेश्वरांना मुक्कामाच्या ठिकाणी सोडून कुशाबा राऊळात गेला. पांडुरंगाचे / श्री विठ्ठलांचे मनसोक्त निवांत दर्शन घेतले. पांडुरंगाचा पोषाख, अलंकार यांनी तो दिपून गेला. श्री विठ्ठल दर्शनानंतर कुशाबा मुक्कामाच्या ठिकाणी परत आला. त्यावेळी घाडगेश्वर त्याला म्हणाले ‘‘कुशा, तू कोठे गेला होतास?’’ कुशाबा म्हणाला ‘‘राऊळात देव दर्शनाला’’ यावर घाडगेश्वर त्याला म्हणाले ‘‘अरे तू तिकडे कशाला राऊळात गेलास ? तू बाहेर गेल्यापासून पांडुरंग येथे येवून या वेळेपर्यंत बोलत बसले होते. मग तू तिथे राऊळात जाऊन काय केलेस? देव येथे आले होते. देव रेशिम काठी धोतर नेसलेले आहेत. डोक्याला केशरी पिवळी जर्द पागोटे घातले आहे. अंगात भरजरीचा पोषाख आहे.

अंगावर शालजोडी आहे. गळ्यात मोत्यांच्या, तुळशीच्या माळा आहेत. कपाळी केशरी गंध, कस्तुरी तिलक आहे. कानांत गुलाबाची फुले आहेत. असा देवांनी आज पोषाख केला होता. तू येताच देव पांडुरंग उठून गेले.'' हे सर्व वर्णन ऐकून कुशाबाला आश्चर्य वाटले. तो घाडगेश्वरांना म्हणाला ''बुवा आपण म्हणता असाच पोषाख आज पांडुरंगाच्या देवाच्या अंगावर आहे. त्यात जरा सुध्दा फरक नाही. आपण देव पाहून देव झाला. देवाजवळ देव बोलत बसले हे सत्य आहे. आपणच साक्षात माझे देव, पांडुरंग आहात मी आपणास सोडून यापुढे कुठेही जाणार नाही. राऊळात सुध्दा'' पुढे कुशाबाने घाडगेश्वरांना देव मानूनच गुरुसेवा केली. झोप येईपर्यंत ध्यान केले. त्यांच्या चरणाखेरीज दुसरे कांही पाहिले नाही.

एकदा पंढरपूरच्या पायी वारीला घाडगेश्वर बरोबर कुशाबा गेला होता. दशमी दिवशी पंढरपूरातील एका बडव्यास स्वप्नात दृष्टांत झाला. पांडुरंग तो बडव्यास स्वप्नात म्हणाला ''कोळ्याचा घाडगा नामक वारकरी दर पंधरावड्याला पंढरपूरला येतो. त्याची दशमीची वारी आहे. त्याची फार सेवा झाली आहे. आम्हांला त्याच्या गांवी / घरी जावे वाटते. आंम्हाला कोळ्याला त्वरीत घालवा नाही तर आमचे आम्ही जावू''. तो बडवे पुजारी स्वप्नातून जागा झाला. त्याला फार आश्चर्य वाटले. दशमीला घाडगेश्वराला त्याने स्वप्नातील दृष्टांत सांगितला. बडवे पुजाऱ्या जवळील श्री पांडुरंगाची, श्री रुक्मिणीची प्राचीन मूर्ती कोळ्याला परत जातांना घाडगेश्वरांजवळ बडव्याने दिल्या. घाडगेश्वर, कुशाबा, केदारबा सुतार यांनी श्री विठ्ठल मूर्ती घोड्यावर घालून कोळ्याला आणून घाडगेश्वराच्या घरात स्थापन केली. घराचे मंदिर झाले. अद्याप सिंहासनी त्याच मूर्ती आहेत. पुढे कुशाबाचे लहान बंधू शिवलींग / शिवबा हे श्री विठ्ठल रुक्मिणीची पूजा करु लागले. अशा तऱ्हेने रुक्मिणीकांत पांडुरंग घाडगेश्वरांची भक्ती पाहून श्रीगुरु गोदडनाथ कृपेने घाडगेश्वरांच्या घरी येवून राहिला. कोळे हे प्रति पंढरपूर, दुसरे पंढरपूरच वसले. भक्तजनांच्या उध्दारासाठी साक्षात वैकुंठवासी पांडुरंग कोळ्याला आनंदाने, अहोरात्र कटी कर ठेवून उभा राहिला.

घाडगेश्वरांनी कोळे ते पंढरपूर पंचमीला निघून दशमीला पोहचण्याची पायी वारी केली. पुढे पुढे घोड्यावर बसून वारी चालू ठेवली. वयाच्या शंभरीनंतर डोलीतून वारी केली परंतु वारी चालू ठेवली. त्यांच्या धर्मपत्नी रुक्माबाईनी शके १७८४ वैशाख शुध्द पंचमी (इ.स. १८३२) रोजी देह ठेवला. घाडगेश्वर कोळ्याहून पंढरपूर वारीला निघाले होते. घाडगेश्वर मधूनच परत फिरले नाहीत. तर घाडगेश्वरांनी शके १७८६ अश्विन वद्य षष्ठी भृगूवारी (इ.स. १८६४) ला समाधी घेतली. कोळ्याला कुशाबानी पूर्वीच समाधीगृह बांधून ठेवले होते. घाडगेश्वराचे समाधी मंदिर झाले. घाडगेश्वरानां एकून १०८ वर्षे आयुष्य लाभले. त्यांनी पाऊनशे वर्षे पंढरीची वारी केली. पंढरीनाथ सखा करुन त्यांनी कोळ्याला घरी आणून ठेवला. दुसरी पंढरी निर्माण झाली. तिन्ही लोकांत वारकरी संप्रदायाचा झेंडा फडकविला. गोदडनाथांनी सांगितलेली दशमी /

एकादशी व्रत कुशाबाने पुढे चालविले. कुशाबा जातीने वाणी असून, वाणी कुळांचा उध्दार केला. घाडगेश्वरांच्या नांवाचा झेंडा त्रिभुवनात लावला. घाडगेश्वरांच्या सेवेत कुशाबाने अंतर दिले नाही. घाडगेश्वरांनी दिलेली कोळे ते पंढरपूर वारी निष्ठेने चालविली. महापूर येवो, पायाला नारु होवो वारी चुकली नाही. कर्जतला जावून गोदडनाथाचे दर्शन चुकले नाही. कोळ्याच्या मठातील महाप्रसाद/भंडारा कुशाबांनी सुरु ठेवला. घाडगेश्वरांची एक निष्ठतेने सेवा केली. लंगोटी घालून अंगावर घोंगडी पांघरुन रात्रंदिवस घाडगेश्वरांची सेवा केली. पोटाला पोटभर भाकरी खाल्ली नाही. परंतु घाडगेश्वरांची सेवा, त्यांचा संसार याचा विचार कुशाबानी केला. दर दशमीस पांडुरंग दर्शन यात अंतर दिले नाही. घाडगेश्वरांच्या इच्छेनुसार पंढरीची वारी केली. आपल्या संसारावर पाणी ओतले. घाडगेश्वरांच्या चरणावर चित्त अर्पण करुन कुशाबा / कृष्णानाथ तृप्त झाले. स्वत: कोंडा खाऊन उत्तम शिधा सामुग्री भंडाऱ्यास ठेवली. घाडगेश्वरांचा संसार कुशाबानी बारकाव्याने केला. कुशाबा / कृष्णनाथ देव, गुरु आणि शिष्य यांचा त्रिवेणी संगम होय. घाडगेश्वरांनी समाधी घेतली त्यानंतर कुशाबा / कृष्णानाथ पंढरीस वारीला जाऊ लागला. घाडगेश्वरांची त्यांनी कीर्ती वाढविली. घाडगेश्वरांची वारी असे लोकांना ते सांगत. कुशाबाची गुरु सेवा पूर्णत्वास पोहचल्याने, पंढरपूर दशमी / एकादशी व्रत पांडुरंगाला पोहचल्याने त्याला आधिकार प्राप्त झाला. कुशाबा / कुशाप्पा / कृष्णनाथ हे एकच नाव असून, त्यांनी कोळ्याला शके १८१२ (इ.स. १८९०) अश्विन शुध्द चतुर्थी रोजी घाडगेश्वरांच्या जवळ समाधी घेतली.

संदर्भ ग्रंथ : **श्रीसंत सद्‌गुरु प. पू. घाडगेनाथ महाराज चरित्र**
ग्रंथ प्रकाशक : **महादेव गौरीहर वाणी, मठाधिपती**
श्रीसंत घाडगेनाथ मंदिर कोळे, ता. कराड (सातारा)



# निजबोधमठी आणि राजर्षी शाहू छत्रपती

सोमवार दि. २० ऑगस्ट १९०० साली म्हणजेच श्रावण वद्य दशमी शके १८२२ इ. रोजी कुंभार गल्लीतील श्रीमती ताराबाई शिर्के यांचे घरी श्री समर्थ कृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधीस्त झाल्यावर श्री गुरुदेवांच्या नित्य सेवेत असणाऱ्या शिष्यगणांच्या मनावर फार मोठा आघात झाला. त्यांच्या त्या काळातील अवस्थेचे वर्णन श्री गुरुदेवांचे चरित्रकार कै. गणेश नारायण मुजूमदार करतांना लिहीतात ''दिसो लागले दीन । बालक जैसे जननी विहीन । वारंवार कंठ ये दाटून । गिळेग्रास न अन्नाचा ।।'' श्री गुरुदेवांच्या सत् संगतीत लाभलेल्या प्रेमाला पारखे झालेले सेवकजन शोक सागरात डुबून गेले होते. शोक निर्भर अवस्थेमध्ये ग्लानी आली असताना चमत्कार घडला. ग्लानीमध्ये घडलेल्या दृष्टांताचे वर्णन करतांना चरित्रकार लिहीतात सिंहासने बैसला श्रीकृष्ण । सतेज शांत शोभायमान । शिष्यास म्हणे हाकारुन । व्हा सावधान दु:ख का ।। शोक का फुका मनी न माय । आम्ही गेलोसे वाटते काय । डोळे उघडा फेडा संशय । नाही तिळमात्र असत्य ।। नव्हे स्वप्न हे पूर्ण जागृती । नव्हे मूर्च्छा नाही भ्रांती ।। व्यर्थ का चळली ऐसी मती । तुम्हासंगती कृष्ण सदा ।। समाधिस्त झाल्यावर प्रथमच श्री गुरुदेवांनी सदेह दर्शन देवून निष्ठावान सेवका बरोबर कृष्णा सदोदीत राहिल यांची ग्वाही दिली. त्यामुळे शिष्यवृंदाना धीर मिळाला.''

श्री गुरुदेव असतांना शिष्यवृंदाचा कुंभार गल्लीतील वैराग्यमठी मध्ये म्हणजेच आताच्या समाधी स्थानी वावर होता. त्या जागेमध्ये श्री ताराबाई शिर्के यांच्या परिवाराचा संसारही चालू होता. अशा परिस्थितीमध्ये श्री गुरुदेवांच्या पश्चात त्याठिकाणी राहणे सेवक वर्गाला अडचणीचे वाटू लागले. त्यामुळे हे सर्व लोक पंचगंगेच्या काठी राजगुरु सिध्देश्वर मंदिरासमोर बसू लागले. परंतु त्याठिकाणी लोकांचा त्रास होऊ लागल्यामुळे नंतर ते सर्वेशाच्या घाटावर बसू लागले. असा दिनक्रम कांही दिवस चालू असतांना व्यासांना पुन्हा श्री गुरुदेवांनी दृष्टांत दिला. ''अरे व्यर्थ का घाबरता? दुसरी मठी निर्माण करा. गंगावेशीत खंदकाजवळ जागा मिळणार आहे. करवीर संस्थानच्या अधिपतीकडून तुम्हांला जागा मिळणार आहे. तेंव्हा सर्व संशय सोडून त्वरीत कामाला लागा.'' तरी सुध्दा एक वैराग्य मठी असतांना गुरुदेव निजबोध शाखा का निर्माण करा म्हणतात याबाबत सेवकांच्या मनामध्ये संदेह निर्माण झाला. पुन्हा श्री गुरुदेवांना स्पष्ट करावे लागले. ''अरे निजबोध मठी निर्माण करुन अखंड वीणा चालवा व हरिनामाची अखंड गंगा वाहू द्या.'' कै. व्यासांची श्री गुरुदेवांच्या ठायी प्रगाढ निष्ठा होती. श्री गुरुदेवांनी दृष्टांत दिल्यानुसार सर्व कांही घडून येणार याची त्यांना मनोमन खात्री होती. परंतु हे एकट्या दुकट्या व्यक्तीचे काम नव्हे. म्हणून त्यांनी २५ तीस सेवकांना बोलावून घेऊन श्री गुरुदेवांच्या दृष्टांतातील विचार सर्वासमोर विषद केला. पाच पंचवीस मंडळी एकत्र जमली की मत मतांतरे

होणारच. तसेच घडले. कांही सेवकांना करवीर नरेशाना भेटण्याचा विचार आवडला परंतु कांही सेवकांना तो आवडला नाही. त्यांनी फाटे फोडण्यास सुरुवात केली. हे राजे लोक लहरी असतात त्यांना भेटून कांहीही फायदा होणार नाही. उलट अपमानीत होऊन परत यावे लागेल. वगैरे वगैरे परंतु व्यास आपल्या विचारांशी पक्के होते. ते म्हणाले ''आम्ही अपमानासी भिऊन । न थांबवू कदा राजदर्शन । घडेल जैसे विधी लेकन । श्री गुरु प्रेरणा यावरी ।।''

कुंभाराचा एक युवक प्रपंचकार्य साधून व्यासांच्या जवळ येऊन बसत असे. व्यासांनी आपणांस शिष्य म्हणून स्वीकारावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. आपली इच्छा त्यांनी व्यासांना बोलूनही दाखवली होती. तेंव्हा व्यास म्हणाले ''शेवटी कृष्ण देवची गुरुवर । मी तरी अनाधिकारी पामर । आत्ताची कासया बोलावा विचार । धरावा धीर अल्पसा ।। आणि म्हणाले ''हे बघ श्री गुरुदेवांनी आपल्यावर फार मोठी कामगिरी सोपविली आहे. गुरु आज्ञेची पूर्तता करणेसाठी तुम्हा सर्वाच्या सहकार्याची गरज लागणार आहे.'' त्यावर त्या कुंभार युवकाने गुरु सेवेसाठी मी कोणतीही झिज सोसणेस तयार असल्याचे व्यासांना सांगितले. परंतु राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्या दर्शनाला जाण्यासाठी म्हणावा तसा प्रतिसाद सेवक वर्गाकडून मिळत नव्हता. त्याला कारणेही तशीच होती. सन १९०० साली हिंदूस्थानावर ब्रिटीशांचा अंम्मल असला तरी कोल्हापूर संस्थान स्वतंत्ररित्या राज्यकारभार करत होते. येथे राजेशाही होती. तथापि, संस्थानच्या स्वतंत्र मंत्रीमंडळामार्फत राज्यशकट चालविला जात होता. न्याय व्यवस्था पहाणेसाठी उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ या संस्थानामध्ये होते. अशा एक स्वतंत्र संस्थानच्या अधिपत्यांना भेटून मठीसाठी जागेची मागणी करण्याचा धीर सर्वसामान्य सेवकांना होत नव्हता.

तथापि, व्यासांची गुरुदेवांच्या वचनावर पूर्ण निष्ठा होती. त्यांनी धीर सोडला नाही. कुंभाराच्या युवकाची पूर्ण साथ होती. तो व्यासाना म्हणाला ''हे सर्व कार्य स्वत: श्री गुरुदेवच करणार आहेत. असे मलाही आता वाटू लागले आहे. श्री गुरुदेवांच्या वचनाप्रमाणे वागुया. सर्व कांही सुरळीत होईल. तेंव्हा कालापव्यय न करता त्वरीत कामाला लागूया.'' व्यासानाही ते पटले. त्यांनी आणखी दोघा सेवकांना राजांच्या दर्शनाला जाण्यासाठी तयार केले आणि हे चौघेजण कोल्हापूर येथील राजवाड्यावर राजर्षि शाहू छत्रपती महाराजांना भेटावयास गेले. तिथे त्यांना प्रथम द्वार रक्षकानी अडविले. रक्षक म्हणाले महाराज राजवाड्यामध्ये आहेत. परंतु इथं आंत जाण्यासाठी कुणालाही असा प्रवेश मिळत नसतो. इथं वशिला पाहिजे किंवा एखादा सरदाराची ओळख असेल तर ते तुम्हांला महाराजांची भेट घडवून आणतील. या लोकांचे कोण ओळखीचे असणार? श्री गुरुदेवांच्या नित्य संगतीत रममाण होणारी ही मंडळी राजवाड्यातील सरदारांची ओळख करुन घेण्याच्या झमेल्यांत कशाला पडतील हो. व्यास सोबतच्या कुंभार युवकाला म्हणाले ''ही गुरुलीला आहे. आपण थोडा वेळ वाट पाहून भवितव्यता आजमाऊया आणि रक्षकांना म्हणाले ''आम्ही इथं थोडा वेळ थांबले तर चालेल कां.?'' त्यावर रक्षक

म्हणाले ''आपण भली मंडळी दिसता पाहिजे तेवढा वेळ थांबा. हे बघा आम्ही पडलो पोटार्थी नोकर, हुकूमाचे ताबेदार. तुम्हांला प्रतिबंध करु नये असे आम्हांला मनापासून वाटते व पण वाटून उपयोग काय, इथले अधिकारी क्षणाक्षणाला आज्ञा सोडत असतात, कुणाचे ऐकावे हेच आम्हांला कांही वेळ कळत नाही.'' व्यास म्हणाले ''खरे आहे तुमचे, पण आम्हांला तरी राजांचे दर्शन घेण्याचा उपद्व्याप करण्याची काय गरज होती. आमच्या गुरुदेवांच्या आज्ञेवरुन इथं आम्हांला यावे लागले.'' असे त्यांचे संभाषण चालू असतांना खुद्द राजर्षी छत्रपती शाहू महाराजच कारभारी मंडळी बरोबर बोलत बोलत बाहेर येताना दिसले. व्यासांना हा शुभशकून वाटला. झालेही तसेच, महाराजांचे लक्ष या सेवक मंडळीकडे गेले, महाराज स्वत: त्यांच्याजवळ गेले व म्हणाले ''इकडं का येणं केलंत. आम्हांला कांही साकडं घालणार आहात काय? जे काय असेल ते संकोच न करता उघड बोला'' तेंव्हा कुंभाराचा युवक व्यासांच्या कानात हळूच पुटपुटला व्यासजी जागेची मागणी महाराजांच्या कानी घाला. त्यावर व्यासांनी आपली पोतडी उघडली. प्रसादाचा लाडू बाहेर काढून त्याचा एक तुकडा प्रथम आपल्या तोंडात टाकला व राहिलेला लाडू महाराजांच्या हातात दिला.

व्यास महाराजांच्या हातात लाडू देतांना महाराज व्यासांच्याकडे बघून हसले व म्हणाले ''असले कसले हे विचित्र वागणे तुमचे, आमच्यासाठी म्हणून तुम्ही लाडू आणलात परंतु प्रथम तुम्हीच भक्षण केलात.'' त्यावर व्यास नम्रपणे म्हणाले ''महाराज आपण थोर पुरुष आहात आपल्या हाती प्रजेचे भवितव्य आहे. तथापि, आपणांस हितशत्रूही अनेक असू शकतात. प्रसाद देण्याच्या निमित्ताने आपणांवर विष प्रयोगही होऊ शकतो म्हणून प्रसादाचा तुकडा आम्ही प्रथम भक्षण केला.'' महाराजांच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा उमटली. महाराज म्हणाले ''ब्राम्हणा तू चतुर दिसतोस. बोल तुला काय पाहिजे? आम्हाला जे करता येणे शक्य आहे ते आम्ही आवश्य करू'' व्यास म्हणाले ''महाराज तुम्हांला कुंभार गल्लीतील दत्तावतार कुंभार स्वामी आपणांस माहित आहेतच. तसेच त्यांनी समाधी घेतल्याचेही आपणांस ठावे आहे. आपण त्यांचे दर्शन घेऊन पुज्य भावना व्यक्त केली आहे. म्हणूनच मी श्री गुरुदेवांच्या प्रेरणेने आपल्याकडे याचना करणेसाठी आलो आहे. गंगावेशीत शिवदेवालयाजवळ खंदक आहे. तेथील कांही जागा आम्हांला पाहिजे आहे. आम्ही त्याठिकाणी भाविकांसाठी मठ बांधण्याचा संकल्प केला आहे. मठी उभारणी करुन, त्याठिकाणी गुरुदेवांच्या पादुकांची प्राणप्रतिष्ठा करुन भजन किर्तनाचे कार्यक्रम चालू ठेवण्याचा तसेच अखंड वीणा चालविण्याचा आमचा मानस आहे. गुरुदेव असतांना आम्ही श्रीमती ताराबाई शिर्क्यांच्या घरी गुरुदेवांची सेवा करत होतो. आता त्याठिकाणी जायला आम्हांला संकोच वाटतो. कारण ताराबाईंच्या नांदत्या घरामध्ये त्यांचा परिवार आहे. त्यांचा संसार आहे. त्यांना आमचा त्रास होण्याचा संभव आहे. म्हणून आमची मागणी मान्य करावी अशी आमची नम्र प्रार्थना आहे.'' व्यासांचा शुध्द हेतू लक्षात घेऊन महाराज म्हणाले

''तुमच्या मागणीमध्ये तुमचा वैयक्तिक कुठलाही स्वार्थ आहे असे आम्हांला दिसत नाही. तथापि, आम्ही प्रत्यक्ष जागेवर येऊन पहाणी करु व मगच आपली मागणी मान्य करु.'' मग व्यास धिटाई दाखवून म्हणाले ''महाराज मला क्षमा करा. आपण थोर आहात कार्यबाहुल्यामुळे आमुच्या मागणीचा विसर तरी पडणार नाही ना?'' यावर शाहू महाराज म्हणाले ''अरे, नाही नाही विसर कसा पडेल? अगदी उद्याच येतो, हुशार ब्राम्हणा, निर्धास्तपणे घरी जा,'' हे ऐकून कुंभार युवक व्यासांना म्हणाला ''महाराज जेवढे आपणांसी बोलले तेवढे स्पष्टपणे इतराशी बोलत नाहीत, त्यावरुन आपले काम नक्की होणार असे वाटू लागले आहे.''

दुसऱ्या दिवशी सांगितलेल्या वेळेवर छत्रपती शाहू महाराज गंगावेशीत हजर. गुरु किंकरांना बोलावून घेतले व म्हणाले ''तुम्हांला हवी असलेली जागा आधी आंम्हाला दाखवा.'' व्यासांनी खंदकाची जागा दाखविली. महाराजांनी जागेची पाहणी केली आणि म्हणाले ''अरे ब्राम्हणा ही जागा तर पडिक दिसते. शिवाय ही जागा तर खुद्द आमच्या मालकीची असल्यामुळे तुम्हांला खुणा करुन देतो. व्यासानी साठ हात लांब व चाळीस हात रुंद जागा मिळाल्यास आपला कार्यभाग होईल असे सांगितले.'' महाराजांनी त्यानुसार जागेची आखणी करुन दिली. व्यासानी महाराजांना हात जोडून विनवणी केली की हे स्थान चिरंतन व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्यादृष्टीने आम्हांला लेखदान करुन उपकृत करावे त्यावर महाराज म्हणाले ''उद्या तुम्ही वाड्यावर या. आमचा लेख तुम्हाला प्राप्त होईल.'' दुसऱ्या दिवशी व्यास वाड्यावर गेले. महाराज वाड्यावर नव्हते त्यामुळे भेट होऊ शकली नाही. पुन्हा दोन तीन वेळेला गेले तरीही भेट होऊ शकली नाही. तरी सुध्दा व्यास अजिबात विचलीत झाले नाहीत की त्यांनी धीरही सोडला नाही. दिवस जात राहिले तरी व्यास शांत होते.

तद्नंतर चमत्कार घडला, ''अतर्क्य ईश्वराचे विंदान । शाहूराज यांचे नंदन । नाम सप्ताह दोघेजण । भगवद् भजन आरंभिती सर्व सुखमयी निरोगी वरिष्ठा । अखिल समृध्दीकाळी हरिनिष्ठा । विव्दता विजिताभीमान चेष्टा । क्वचित दृष्टीपथा येतसे ।।'' ईश्वरीलीला खरोखर अगाध असते राज वैभवात, सुख समृध्दीच्या काळी, उच्चविद्याविभूषीत राजपुत्रानी हरिनाम भजनाचा सप्ताह सुरु करणे हे दुर्मिळ दृष्य म्हणजे राजपुत्रामधील सुसंस्कृत मनाचा परिपाकच होय. असो, राजवाड्यावर दररोज नित्य नवीन भजनाचा कार्यक्रम होत असे. एका रात्री कुंभार गल्लीतील भजनी मंडळाला भजनासाठी वाड्यावरुन बोलावणे आले. व्यासासह भजनी मंडळी वाड्यावर गेली. भजनाला रंग चढू लागल्यावर राजर्षी शाहू राया अवचीत त्याठिकाणी आले. त्यांना भजनात गोडी वाटू लागली. भजन ऐकत बसले. अगदी तल्लीन झाले आणि म्हणाले ''चित्ता वाटले समाधान । विसरुनी गेला अवघा शीण । शांतपणे म्यां ऐकीले भजन । हरिनामे मन मोहिले ।। भजनाचा कार्यक्रम संपेपर्यंत महाराज बसून होते. भजनाचा कार्यक्रम संपल्यावर महाराज भजनी मंडळींना म्हणाले'' ''आज आम्ही प्रसन्न झालो आहोत, तुमच्या आवडीचे जे काय

असेल ते मागा, आपला मनोरथ आम्ही पूर्ण करु'' त्यावर भजनी मंडळीनी महाराजांना सांगितले की, ''महाराज आमुच्या व्यास महाराजांची इच्छा पूर्ण करा'' व्यासांना पाहून महाराज म्हणाले ''तुमची मागणी मी विसरलो नाही. त्याची मला पूर्ण जाणीव आहे. हे बघ नि:स्वार्थी जनाना देवच वश असतो. तुझा हेतू वाया जाणार नाही. त्याबद्दल तू मुळीसुध्दा शंका घेऊ नको, उद्या तुम्ही वाड्यावर या आमुची मुद्रिका घालून आम्ही तुम्हांला लेखन पत्रिका प्रदान करु.'' दुसरे दिवशी सकाळी व्यास दोघा जनाना बरोबर घेऊन वाड्यावर गेले. द्वारपालानी हात जोडून व्यासाना नमस्कार केला व म्हणाले ''आत जा. महाराज आपली वाट पहात आहेत.'' सेवक मंडळी आत गेली. महाराज हातात कागद घेऊन बागेत फेरफटका मारत होते. व्यास दिसल्यावर त्यांच्याकडे बघून हसले व म्हणाले ''या या मंडळी मी तुमचीच वाट पहात होतो. ही तुमची सनद आता वेळ दवडू नका. ही सनद घ्या व कामाला लागा. प्रथम तुम्ही नगरपालिकेमध्ये जा तिथे ही सनद दाखवा, आमची लेखी आज्ञा असल्यामुळे तुम्हांला जागेचा ताबा मिळण्यास कांही अडचण येणार नाही.'' शाहू रायांची भाव विभोर मुद्रा काय सांगुनी गेली. ''जाशील निघुनी तू तैसा मी। उद्याचा सर्व विचार निकामी। केले धन्य मज मागुनी भूमी । आता स्वकर्मी रत व्हावे ।। राव मी मत्संगतीचे जन । लोभी स्वार्थ परायण । सारे तोंड पूजेपण निपुण । पूर्ण समजून असे मी । अवघड परंतु यांचा त्याग। आम्हा पाहिजे चर्तुविध नग । धूर्त पण मात्र तदतरंग । जाणाया सांग पाहिजे ।। ऐशिया संगती सत्कर्म स्मृती । होणार कैसी आम्हाप्रती । क्षणिक तुज मन होता संगती । संतोष चित्ती न समाये ।। ''

व्यास व इतर सेवक नंतर नगर पालिकेमध्ये जाऊन संबंधित अधिकाऱ्यांना भेटले व सनद दाखवून सर्व हकीकत कथन केली. त्यांची हकीकत ऐकून तो अधिकारी रागाने लालबुंद झाला आणि त्यांना म्हणाला ''निलर्ज नि:संगानो तुमची सोंगे मी सर्व जाणून आहे. जनोध्दाराचे सोंग घेता काय? चला चालायला लागा. फुकट जागा मिळविणे म्हणजे काय खेळ वाटला तुम्हाला? तुमच्या सारखी भुरटी दररोज या नगरीत रिकामी फिरत असतात. आमचा राजा भोळा सांब म्हणून फसला, भलतेसलते मला खपणार नाही. प्रथम येथून चालते व्हा.'' या अधिकाऱ्याला लोभाची हाव सुटली असल्याचे तत्क्षणीच व्यासांच्या लक्षात आले. ते एवढेच म्हणाले ''ठीक आहे आम्ही जातो. पण लक्षात ठेव तू राजाचा नोकर आहेस. त्यांच्या आज्ञेचा अवमान करुन तू हे बरोबर करत नाहीस.'' सेवक मंडळी निमुटपणे निघून गेल्यावर मात्र त्या अधिकाऱ्याला घाम फुटला. आपण कुठल्या भ्रमांत व का असे बोललो असेन बरे। न जाणो ते लोक परत महाराजांना भेटले तर आपली नोकरी जाईल. रात्रभर त्याला झोप लागली नाही. सकाळी उठून तो गंगावेशीत जाऊन तेथील हालहवाला बघून आला. परंतू तेथील वातावरण शांत होते. व्यासांची भुमिका अशी होती की, ''आज न घडले घडेल उद्या। स्पर्श करु नका संशय मद्या। संकटे चुकली नसती देवाला । यत्नावरी द्या भर बहू ।। थोर मनाचा परि हा राव।

घरी त्या ठावा गुरुप्रभाव । अधिकारी हा हीन स्वभाव । आशेस ठाव दिधला ।। आम्हा का दिधली विजोड जोडी ऐका गुरुची शिकवण थोडी । हर्षविषादी समता गाठी । कदा न सोडी साधक । त्यामुळे व्यास शांत होते. त्यांनी पुढे कांहीही कृती केली नाही. अधिकारी मनातून पूर्ण घाबरला होता. कांही दिवसा नंतर पुन्हा एकदा गंगावेशीत फेरफटका मारुन आला. जागेची पहाणी केली. परंतू त्या भागातील कोणीही त्याच्याशी बोलले नाहीत. अधिकाऱ्याच्या मनातील भिती कमी झाल्यावर पंधरा दिवसांनी तो चार नोकरांना घेऊन पुन्हा गंगावेशीत गेला व्यासांना बोलावून घेतले त्यांच्या समक्ष जागेची मोजणी केली श्री गुरुदेवांच्या नांवे दानपत्र लिहिले. विद्यमान व्यवस्थापक म्हणून व्यासांचे नांव घातले व सही शिक्क्यासह दानपत्र व्यासांच्याकडे सुपूर्द केले. व्यासांनी नारळ व केळ प्रसाद म्हणून त्या अधिकाऱ्यास दिला. त्यानेही नंतर पाच रुपये व्यासांचे हाती देत अपमानास्पद दिलेल्या वागणुकीची क्षमा मागितली व व्यासांचा निरोप घेऊन निघून गेला.

कदापी होणार नाही. असे वाटणारे काम श्री गुरुंच्या इच्छेमुळे अनायासे सफल झाले हीच श्रींची इच्छा. जागा ताब्यात मिळाल्यावर देणग्यांचा ओघ सुरु झाला. एका सेवकाने तर चारशे रुपये दिले. कुंभार मंडळीनी स्वत: राबून योगदान केले. अशारितीने सेवकांच्या परिश्रमातून ''निजबोध मठी'' उभी राहिली. व्यासांनी सर्वस्व पणाला लावून मठीची उभारणी केली असल्यामुळे नंतर निजबोध मठीला भाविक व्यासमठी म्हणून संबोधू लागले. राजर्षी शाहूरायांनी मठीसाठी जागा देणे ही घटना साधीच अगदीच किरकोळ. यापूर्वी महाराजांनी अनेक एकर जमिनी देणगी खातर दिल्या असतील. तरी सुध्दा या किरकोळ घटनेला अनन्य साधारण महत्व आहे. एक स्वतंत्र संस्थानीक अधिपती साठ हात लांब व चाळीस हात रुंद क्षेत्रफळाची जागा देण्यासाठी जातीने जागेवर हजर राहून स्वत: खुणा करुन जागा देतात या घटने मागील कार्यकारण भाव जाणून घ्यायचा असेल तर श्री गुरुदेवांची सिंहासनाधिष्ठीत प्रतिमा नजरेसमोर आणून तिचे बारकाईने निरीक्षण केल्यास वस्तूस्थिती स्पष्ट होईल. ज्या सिंहासनावर श्री गुरुदेव बसले आहेत ते सिंहासन राजर्षी शाहूरायांचे आहे व श्री गुरुदेवांच्या गळ्यातील मोत्यांच्या माळाही राजर्षी शाहू रायांच्या आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी आपली स्वत:ची गादी व आपले स्वत:चे अलंकार श्री गुरुदेवांना प्रदान करुन, करवीर संस्थानचे राजवैभवच श्री गुरुदेवांच्या चरणी समर्पीत केले होते. त्यामुळेच ते शेवट पर्यंत अबाधित राहिले. इंग्रजांनी भले हिंदुस्थानावर राज्य केले असेल त्यांना करवीर संस्थानवर शेवटपर्यंत राज्य करता आले नाही. ही वस्तूस्थिती आहे. हा इतिहास आहे आणि म्हणूनच मठीसाठी किरकोळ जागा देण्याचे कामही राजर्षी शाहू रायांना बहुमोल काम वाटते. त्यामुळेच त्यांनी ''माझ्याकडे जागेची मागणी करुन मला धन्य केलेत'' असे भावपूर्ण उद्‌गार व्यासांचे जवळ काढले होते.

लेखक:- **श्रीकृष्णपादपंकजरज**

# स्व. रुक्मिणी पुरेकर (कुंभार) यांची माहिती

एकदा स्व. सखाराम कुंभार, तांबवे (ता. कराड) हे कोल्हापूरला आपले नातलग पुरेकर, यांच्याकडे सह कुटूंब भेटायला आले. पाहुणचारा नंतर एकेदिवशी स्व. पुरेकर हे आपल्या तांबव्याच्या सखाराम कुंभार यांना सहकुटुंब व आपल्या परिवाराला घेवून कुंभार गल्लीतील ताराबाई शिर्के यांच्या घरी वास करुन असलेल्या श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला घेवून गेले. पुरेकर व कुंभार कुटुंबातील सर्वांनी श्री दत्त महाराजांचे मनोभावाने श्रध्देने दर्शन घेतले एवढ्यात श्री दत्त महाराज उठले त्यांनी पुरेकरांची ११ वर्षांची मुलगी रुक्मिणीला जवळ बोलविले. तसेच स्व. पुरेकरांचे तांबव्याचे नातेवाईक स्व. सखाराम कुंभार व त्यांच्या पत्नीला जवळ बोलिविले. सखाराम कुंभार यांच्या पत्नीच्या काखेत तीन वर्षाचे मूल होते. त्याचे नांव दत्तोबा. श्री दत्त महाराजांनी रुक्मिणी पुरेकराचा हात त्या सखाराम कुंभाराच्या तीन वर्षाच्या मुलाच्या हातात दिला व रुक्मिणीला म्हणाले ''रखुमाईचा पती हा'' स्व. दत्तोबा व स्व. रखुमाई यांना जवळ उभा करुन त्यांच्यावर अक्षता उधळल्या व म्हणाले ''लग्न झाले'' अशा तऱ्हेने काखेतील तीन वर्षाचा मुलगा व रखुमाई पुरेकर यांचे लग्न लावले. पाहुण्यांना आश्चर्य वाटले. विस्मय वाटला. रखुमाईचे वडील तसेच त्यांचे आप्त स्व. सखाराम कुंभार हे सर्वच भाविक होते. सर्वजण श्री दत्त महाराजांना म्हणाले, '' आपण लग्न लावले आहे. अक्षता उधळल्या आहेत तर तसेच करु.''

त्याकाळच्या परिस्थितीनुसार रखुमाई लग्ना नंतर तांबव्याला नांदायला गेली. त्यावेळी तिचे वय केवळ अकरा वर्षांचे होते. चौथी शिकलेली होती. तांबव्याला आपल्या सासरी ती घरकामे करु लागली. कुलाचार, देवधर्म चालवू लागली. लवकरच तीची सासू वारली. त्यामुळे त्या तीन वर्षाच्या पतीला काखेत घेवून फिरणे, लहान मुलाला ज्या गोष्टी करणे आवश्यक त्या ती करु लागली. ते तीन वर्षाचे मुल जरी नात्याने पती असले तरी ते रखुमाईला आईच म्हणत असे. असा दहा-पंधरा वर्षाचा विचित्र काळ लोटला. आता दत्तोबा मोठा झाला. सखाराम कुंभार व त्यांच्या कुटूंबातील सर्वांनी दत्तोबाला कोल्हापूरच्या कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांनी त्यांचे व रखुमाईचे लग्न कसे केले / लावले सांगितले. तसेच रखुमाई ही आई नसून पत्नी आहे हेही सांगितले. दत्तोबा हा भाविक / श्रध्दाळू असल्याने त्यालाही पटले. त्याचा विश्वास बसला. पुढे दत्तोबाने रखुमाई बरोबर सुखाचा संसार केला.

**दत्तोबा व रखुमाईला चार मुले व एक मुलगी झाली.**

मुलांची नांव :- १) शंकर कुंभार २) पांडुरंग कुंभार ३) गणपती कुंभार ४) रामचंद्र कुंभार

मुलीचे नांव :- काशिबाई

दत्तोबा व रखुमाई यांची चार मुले व एक मुलगी मयत आहेत. आता नातेवाईकेची नांवे व

वंश खालीलप्रमाणे

१) **स्व. शंकर कुंभार :–** यांच्या पत्नीचे नांव तुळसाबाई (कोल्हापूर) यांना तीन मुले. त्यांची नांवे खालील प्रमाणे

अ) सदाशिव – पत्नी सुभद्रा (हयात) ब) दीनानाथ पत्नी सिंधूताई (हयात) क) ज्ञानदेव पत्नी पार्वती (हयात). तर सदाशिव, दीनानाथ, ज्ञानदेव हे सर्व मयत.

२) **स्व. पांडुरंग कुंभार :–** यांच्या पत्नीचे नांव यशोदा (हयात) यांना दोन मुले अ) अशोक ब) सचिन (दोघेही हयात).

३) **स्व. गणपती कुंभार :–** यांच्या पत्नीचे नांव गंगुबाई (हयात) यांना दोन मुले अ) हणमंत (मयत) ब) रमेश (हयात)

४) **स्व. रामचंद्र कुंभार :–** यांच्या पत्नीचे नांव लक्ष्मीबाई (मयत) यांना एक मुलगा चंद्रकांत (मयत).

स्व. रखुमाई कुंभार यांना कोल्हापूरातील कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांचा आशिर्वाद / सहवास लाभला होता. त्या भाविक / श्रध्दाळू होत्या. त्या काळातील त्या चौथी उत्तीर्ण होत्या. त्यांना उत्तम प्रकारे लिहता / वाचता येत होते. त्यांच्या भाग्याने त्यांना तांबवे / कोळे परिसरातील थोर हरिभक्त वारकरी कुशाप्पा भेटले. कुशाप्पा हे श्री विठ्ठलभक्त असून निष्ठावंत वारकरी होते. ते कोळ्याच्या घाडगेनाथ महाराजांचे शिष्य होते. दर दशमीला ते श्री क्षेत्र पंढरपूरची पायी वारी करीत. त्यांना आत्मज्ञानाचा अधिकार प्राप्त झाला होता. एकदा रखुमाई कुंभार कुशाप्पा / कुशाबाचे दर्शन घेवून कोल्हापूरला माहेरी निघाल्या होत्या. त्यावेळी रखुमाईजवळ ''श्री दत्त महाराजांना नमस्कार सांग'' असा निरोप दिला. रखुमाई कोल्हापूरला माहेरी आली. कुंभार गल्लीतील दत्त महाराजांच्या दर्शनाला ती निघाली असता रस्त्यातच श्री दत्त महाराज तिला भेटले व तीला त्यावेळी म्हणाले ''कुशाप्पाचा नमस्कार पोहचला. सर्व कुशल सांग''

स्व. रखुमाई यांचा संसार श्री दत्त महाराजांच्या कृपेने सुखाचा / चांगला झाला. त्यांनी गुरुकृपा मिळविली असे आजही त्यांचे वंशज सांगतात. त्यांचे धार्मिक वाचन खूप होते. त्या इ.स. १९६७ कोयना भूकंपाच्या आसपास वारल्या.

शब्दांकन :– **श्रीमती सुभद्रा कुंभार / तांबवे**



लोकराजा राजर्षि छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर




निजबोध मठी / व्यास मठी, गंगावेश कोल्हापूर



श्री स्वामी भक्त स्व. गोविंद दत्तात्रय व्यास, (व्यासमठी संस्थापक)



श्री स्वामीभक्त स्व. बाळकू राशिवडेकरला पूजेसाठी दिलेल्या पाषाण पादुका



स्व. मुक्ताबाई दत्तात्रय चोपडे (ताई) कोल्हापूर यांचे छायाचित्र



स्व. रुक्मिणीबाई पुरेकर (कुंभार) तांबवे यांचे छायाचित्र

/ समुद्र भरला आहे /

## ।। अध्याय २६ वा ।।



श्री गुरुद्वादशी पालखी उत्सव, कोल्हापूर

## ▪ विषयसूची....!

१) स्व. रामनाथ शिर्के- हिरा परशराम माने विवाह
२) स्व. स्वामी सेवक राऊतमामा
३) उत्तुरचे स्व. बाळ धुमे यांनी गुरुद्वादशी उत्सव सुरु केला
४) स्व. काळे सावकर - दर पौर्णिमेची पालखी सुरु

## अध्याय २६ वा

शुक्रवार पेठ श्रीकृष्णगुरुंना आवडत असे. या पेठेतूनच ते पंचगंगा स्नानाला नित्य जात. एकदा त्यांच्या मनाला वाटले आतल्या वाटेने जावू या. जैन स्वामींच्या मठालगत दौलती माने राहत. श्रीकृष्णगुरु करवीरात प्रसिध्द होते. एकदा ते दौलती मानेंच्या घरी गेले. दौलती मानेच्या घरातील सर्वांनी श्रीकृष्णगुरुंचे दर्शन घेतले. त्यात दौलती पुत्र परशुराम होता. त्यानेही मनोभावाने श्री स्वामींचे दर्शन घेतले. श्री स्वामींनी त्याच्या मस्तकावर हात ठेवून म्हणाले, ''हे आमुचे.'' यावेळी परशुराम लहान होता. पुढे नामांकित पैलवान झाला. श्री शाहूंच्या पैलवानास चित करुन त्याने नोकरी बक्षीसीने मिळविली. पुढे परशुराम संसारी झाला. सुंदर मुले-मुली त्याला झाली. त्याच्या खोपटात स्वर्ग उतरला. रामनाथाची पहिली पत्नी लक्ष्मी कैलासी गेली / मरण पावली. बहिण, चुलती, कोणी स्त्री घरची राहिली नाही. रामनाथाला दुसऱ्या लग्नासंबंधी विचारले तर परत संसाराची उपाधी, व्याधी नको म्हणत. परंतु वैराग्य मठात येणारी थोर भक्त मंडळी रामनाथाला म्हणत. ''आमुचा विचार ध्यानी घ्यावा. तुम्ही सुखाने संसार करावा.'' रामनाथानी या थोर भक्त मंडळीचा विचार मान्य केला. दुसऱ्या लग्नासाठी संमती दिली. दुसऱ्या लग्नाच्या कांही दिवस अगोदर / रामनाथांना स्वप्न पडले. एक सुंदर मुलगी दुधाचा पेला घेवून उभी आहे. त्या सुंदर मुलीच्या पाठीमागे लक्ष्मी दिसत आहे. रामनाथ लक्ष्मीला म्हणाले'' ''पेला तू दे गे.'' यावर लक्ष्मी म्हणाली ''ती सुंदर मुलगी तीच मी'' पुढे श्रीकृष्णगुरुंनी पाटील भक्त भाविकांना स्वप्नात सांगितले ''नदीकडे सुरेख साज आहे. साज त्वरित पटवून आणा'' हे पाटील भक्त भाविकांने रामनाथाना सांगता त्यानाही आपल्याला पडलेले स्वप्न आठविले. अशा तऱ्हेने सर्वांना मान्यता देवून रामनाथ चतुर्भूज झाला. परशुराम कन्या हिरा रामनाथाला दिली. परशुरामाला लहानपणी मस्तकावर हात ठेवून ''हे आमुचे'' म्हणलेले श्री स्वामीबोल खरे झाले. दुर्बळाची कन्या समर्थांनी करुन हिरा शिर्केच्या कुळात आली. रामनाथाला सीता शोभली अशा तऱ्हेने दौलती मानेंचे कुळ उध्दरिले.

कोल्हापूरला रंकाळा तलाव सुंदर आहे. रंकाळा तलाव जवळ संध्यामठ गल्ली आहे. तेथे रामा भैरु राऊताचे घर आहे. फुलेवाडीतून पाण्याचा पाट वाही. राऊत या पाटावर पाटकऱ्यांचे काम चोख करी. ऊस. भात, जोंधळे पिकत असे. सर्व शेतकरी राऊताच्या कामावर खुष असत. तो एकदा कामात गुंतला असता / पिकांना पाणी देत असतांना खवीसाने दावा साधला. खवीसाने त्याला पछाडले. अंगात संचार करुन खवीस सूड घेई, त्रास देई. यावर राऊताने बरेच उपाय केले. सर्व उपाय असफल झाले. श्रीकृष्णगुरुंचे नांव कळले. भाग्य म्हणूनी दर्शना आला. सोबत आणलेला सुवर्ण फुलांचा तुरा / गुच्छ श्रीकृष्णगुरुंना देवून म्हणाला ''खवीस मला त्रास देतो आहे. यावर तुम्ही कांही तरी उतारा सांगा'' यावर श्रीकृष्णगुरु राऊताला म्हणाले ''माझ्यासाठी

फुले आणीत जा. खवीसाच्या आम्ही पाठी लागू. पुण्य तुझ्या गाठी आहे. निर्धाराने सेवा करीत जा'' श्रीकृष्णगुरुंच्या आज्ञेने राऊत पूजेस्तव फुले आणू लागला. अंगचा खवीस जाऊ लागला. संसाराचा विसर पडला. घर कायमचे सोडले. वैराग्य मठीत राहिला. अहोरात्र सेवा करु लागला. वडिलधारी घरचा झाला. सर्वजण राऊताला राऊतमामा म्हणू लागले. रामनाथाचे लग्न ठरले. पुढे होवून सर्व त्याने केले. परशुराम माने कन्या हिराला वधू ठरविले. गृहलक्ष्मी हिरा – सीतामाई म्हणून शिर्के कुळात ताराबाईच्या घरी आली. रामनाथाची बारा पंधरा वर्षे सुखात गेली. चार अपत्ये घरी रांगू लागली. राऊताने त्यांना कडी – खांदी खेळविले. रामनाथाना परम संतोष झाला. सुखाचा काळ अल्प ठराला. रामनाथ हृदय विकाराने गेला. घरचा आधार स्तंभ गेला. श्री सेवेत सीतामाईनी दु:ख विसरले. राऊतमामा माईस म्हातारी म्हणे. पगार तिच्या हातावर देई. सीतामाई मामाना मुलापरी सांभाळी. आनंदात काळ लोटला. राऊतमामा सेवानिवृत्त झाला. दिगंबरा दिगंबरा म्हणत राऊतमामा मंदिरात सुख:दुख विसरला. एक दिवस राऊतमामांनी देह ठेवला. देवा घरी गेला. भजन करीत राऊत मामाला नेले. वैराग्यमठीचा दुसरा आधारस्तंभ गेला. सर्वांना तो जाणवू लागला. काळाचा पडदा पडला. देव माणूस देवाघरी गेला. फुलेवाडी दत्त मंदिरा समोर राऊतमामांच्या अस्थीवर सुंदर चौथरा बांधला आहे. फुलेवाडीतील दत्त मंदिर बांधण्याला राऊत मामांनी प्रेरणा दिली होती. आजही फुलेवाडीचे गांवकरी राऊतमामाचे उपकार मानतात.

ऊत्तरला बाळ धुमे रहात असे. दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला श्री दत्त दर्शनाला जाण्याचा त्याचा नियम होता. तो दत्त भक्तीत सदा रमतसे. वाडीस जाण्याच्या अगोदर / वैराग्य मठीत येवून श्रीकृष्णगुरुंचे दर्शन बाळ धुमे घेत असे बरेच दिवस हा नियम त्याने चालविला. एकदा गुरुद्वादशीला वाडीला जाऊन श्री दत्त दर्शन घेण्याचे बाळ धुमेने ठरविले. नेहमीप्रमाणे पूजा, अभिषेक, इतर खर्चासाठी पैसे घेवून वाडीला निघाला. नेहमी प्रमाणे श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला वैराग्य मठीत आला. मनोभावाने त्यांनी गुरुंना वंदून दर्शन घेतले. यावर श्रीगुरु त्याला म्हणाले ''गुरुद्वादशी इथे साजरी करु'' श्रीगुरु बोलाचा त्याने अंगिकर / स्वीकार केला. गुरु द्वादशी उत्सवाला दत्तोबाची मान्यता मिळाली. सर्व भक्तांना आनंद झाला. उत्सवाची तयारी सुरु झाली. सरदार पाटणकरानी घोडा दिला. अबदागिरी, सनई, चौघडा दिला. उत्सवाचा सर्वांना ओढा लागला. गुरुद्वाशीचा दिवस उगविला. श्रीकृष्णगुरुंना घोड्यावर बसविले. त्यांच्यावर अब्दागिरी धरली. त्यांच्या पुढे वीणा, मृदंग, घेवून टाळकरी चालू लागले. सनई – चौघडा वाजू लागले. थाटात मिरवणूक निघाली. पंचगंगेच्या घाटावर आली. श्रीकृष्णगुरुंना स्नान घालून मिरवणूक परतली. भक्तांच्या डोळ्याचे पारणे फिटले. श्रीकृष्णगुरुंनी जरी देह ठेवला तरी गुरुद्वादशी उत्सव नियम पुढे चालला आहे. गुरुद्वादशीला पालखी मिरवणुक निघते.

करवीरात काळे सावकर रहात असे. धनधान्य, पैसा त्याच्याकडे भरपूर होता. परंतु समंधाने / भूतबाधेने त्याला जर्जर केल्याने मनाने उदास, बेचैन झाला होता. एकदा तारासदनी वैराग्य मठीत आला. ''समंध बाधेतून / भूत बाधेतून मुक्त झाल्यास, आपली प्रतिमा पालखीतून मिरवेन'' अशा प्रकारचे नवस त्याने श्रीकृष्णगुरुंच्या समाधी पुढे केला. पुढे काळे सावकर समंध बाधेतून / भूतबाधेतून मुक्त झाला. प्रतिमा पालखीतून मिरवण्याचा, प्रदक्षणा करण्याचा मानस त्याने रामनाथाला सांगितला. पालखी प्रदक्षणेला रामनाथाचा होकार मिळाला. तेथून दर पौर्णिमेला श्रींची प्रतिमा पालखीत ठेवून पालखी प्रदक्षणा / मिरवणुकीचा नेम चालू झाला आहे.

*****



स्व.राऊतमामा फुलेवाडी/कोल्हापूर




फुलेवाडी येथील स्व.राऊतमामा यांची समाधी

# स्व. दौलती माने यांची माहिती

स्व. दौलती माने हे कोल्हापुरातील शुक्रवार पेठेतील जैन मठाजवळ रहात. ते अतिशय कष्टाळू गरीब धार्मिक असे होते. कोल्हापुरातील थोर दत्तावतारी सत्पुरुष कुंभार गल्लीतील दत्त महाराज हे रोज पंचगंगेला आपल्या शिष्यासह स्नानाला जात. पंचगंगा घाटावर जाण्याचा रस्ता या शुक्रवार पेठेतूनच जातो. सायंकाळी फिरायलाही आपल्या शिष्यासह कुंभार गल्लीतील दत्त महाराज, पंचगंगेकाठी घाटावर जात. एकदा आपल्या शिष्यासह पंचगंगेतीरी फिरायला निघाले असता मुख्य रस्ता सोडून ते जैन स्वामींच्या मठालगत/जवळ रहात असलेल्या दौलती मानेच्या घरी गेले. कोल्हापूरात कुंभार गल्लीतील दत्त महाराज हे दत्तावतारी थोर सत्पुरुष म्हणून सर्वत्र प्रसिध्द होते. आपल्या घरी कुंभार स्वामी / दत्त महाराज आले म्हणून दौलती मानेना खूप आनंद झाला. त्यांनी स्वामींना बसण्यासाठी घोंगडे अंथरले. आपल्या पत्नीला / मुलां / मुलींना कुंभार स्वामींना नमस्कार करणेस सांगितले. सर्वांनी कुंभार स्वामींचे भक्तिने दर्शन घेतले. त्यात दौलती मानेंचा मुलगा परशुराम चरण दर्शन घेत असतांना कुंभार स्वामींनी त्याच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद दिला व म्हणाले ''हे आमुचे'' परशुराम आपला आहे असे म्हणाले.

पुढे दौलती मानेंचा पुत्र परशुराम वयाने मोठा झाला. तालमीत जाऊ लागला. मोठा नामांकीत पहिलवान झाला.

छ. शाहू महाराजांच्या पैलवानास चितपट केले व नांव मिळविले. छ. शाहू महाराजांनी या नामांकीत पैलवानाची किंमत ओळखून कुस्ती परंपरा जपण्यासाठी नोकरी दिली. कांही वर्षांनी पै. परशुराम माने यांचे लग्न राधाबाई यांचे बरोबर झाले. त्यांचे माहेर ठिकपुर्ली होते.

परशुराम माने व राधाबाई माने यांना एकंदर पाच अपत्ये झाली. सर्वात थोरल्या हौसाबाई, हिराबाई, नारायण, गजानन, यशवंत अशी दोन बहिणी व तीन भावंडे सुंदर अशी जन्मली. तो काळ इंग्रज सत्ता विरुध्दाचा, स्वातंत्र चळवळीचा, म. गांधीचा प्रभाव असलेला. पहाटे पहाटे प्रभात फेऱ्या निघत. स्वातंत्र्याची गाणी म्हणली जात. ही सर्वच भावंडे सुंदर, देखणी, सुस्वभावी, सर्वसामान्यांच्यात मिळून मिसळून वागणारी, गोड स्वभावाची होती.

कुंभार गल्लीत दत्त महाराज मठीतील रामनाथ शिर्के यांची प्रथम पत्नी लक्ष्मीबाई वारल्या. रामनाथ शिर्केच्या घरात / मठीत आता कोणीच बाई माणूस राहिले नाही. त्यामुळे मठीत येणारी जाणारी भक्त मंडळी पाटील वगैरे हे रामनाथ शिर्केना दुसरे लग्न करुन घरची / मठीची व्यवस्था उत्तम चालविण्यासाठी विनंती करु लागले. परंतु रामनाथ शिर्केना प्रपंच्याची साखळी परत नको होती. होता होईता श्री दत्त महाराज यांची सेवा करण्याचे ठरविले व दुसऱ्या लग्नाला नकार दिला. पुढे कांही दिवस गेले. रामनाथ शिर्केना एक विस्मयजनक स्वप्न पडले. रात्री झोपेत असतांना त्यांची प्रथम पत्नी स्वर्गवासी लक्ष्मी एक सुंदर मुलीला घेवून आली आहे. तिच्या हातात दुधाचा पेला आहे. ती दुधाचा पेला रामनाथाना द्यायला जाताच ते लक्ष्मीला म्हणाले ''पेला तू दे गे''

यावर लक्ष्मी पुढे येवून म्हणाली ''ती सुंदर तरुणी मीच आहे.'' स्वप्नातून रामनाथ जागे झाले. स्वप्नाचे ते नवल विचार करु लागले.

लवकरच मठीत येणाऱ्या पाटील नांवाच्या भक्ताच्या स्वप्नात रात्री महाराज गेले व पाटील यांना म्हणाले ''नदीकडे सुरेख साज आहे तो पटवून आणा व रामनाथांना द्या'' या स्वप्नाने पाटलांनाही आश्चर्य, विस्मय वाटला. त्यांनी हे स्वप्न रामनाथांच्या कानावर घातले. यापूर्वी रामनाथांना पडलेले स्वप्न व आता पाटलांना पडलेले स्वप्न याचा सर्वांनी विचार केला. रामनाथांनी दुसऱ्या लग्नाला संमती दिली. नदीकडील जैन स्वामींच्या मठाजवळ राहणाऱ्या परशुराम माने यांची सुंदर, सुलक्षणी मुलगी हिरा यांचेबरोबर रामनाथांचे लग्न झाले. हे लग्न राऊतमामा, पाटील व इतर भक्त मंडळींनी पुढे होवून केले. लग्ननानंतर शिर्केच्या घरातील त्यांचे नांव सीता ठेवणेत आले. त्या पुढे माईसाहेब शिर्के म्हणून प्रसिध्द पावल्या. अशा रीतीने कुंभार स्वामी / श्री दत्त महाराज ज्या वेळी दौलती मानेच्या घरी गेले होते. त्यावेळी दौलती मानेंचा वयाने लहान असलेला मुलगा परशुराम पाया पडला त्यावेळी स्वामी त्याला पाहून म्हणाले होते ''हे आमुचे'' अशा तऱ्हेने परशुराम पुढे मोठा झाला. नामांकीत पैलवान झाला. छ. शाहू महाराजांच्या पठ्याला चित्त करुन नोकरी मिळविली. पुढे राधाबाई यांच्याशी लग्न झाले. पुढे त्यांना दोन मुली, तीन मुले झाली. त्यातील हिराचे लग्न रामनाथ शिर्के यांच्या बरोबर होऊन त्या कुंभार स्वामींच्या घरात आल्या त्यांच्या घरच्या झाल्या. बारा पंधरा वर्षे, रामनाथ – सीतामाईंचा संसार सुखाचा झाला. त्यांना तीन मुली तारामती – लिलाताई – मालुताई व वसंतराव (बाळासाहेब) अशी चार सुंदर सुस्वभावी गोड अशी अपत्ये झाली. रामनाथ लवकरच हृदय विकाराने वारले. मुख्य आधार स्तंभच गेला. या धक्यातून सीतामाई सावरल्या. आपल्या मुली व मुलगा बाळासाहेब यांच्या सहकार्याने कुंभार स्वामींची / श्री दत्त महाराजांची पूजा अर्चा, भजन, उत्सव अतिशय व्यवस्थित चालविली. सीतामाई यांनी एक व्रतस्थ तपस्व्याप्रमाणे कुंभार स्वामींची सेवा चालविली, केली. परशुराम दौलती माने यांच्या धर्मपत्नीचे नांव राधाबाई. यांचे मूळ पुरुष म्हसवडचे, ताराबाई व छ. शाहू महाराज यांच्या वारणेच्या तहानंतर मूळ पुरुष कोल्हापूरला स्थायिक झाले. परशुराम व राधाबाई माने त्यांच्या पोटी पाच सुंदर मुलांचा जन्म झाला. त्यांची माहिती खालील प्रमाणे.

**१) स्व.हौशाक्का :–**

यांचा जन्म १९०४ चा. परशुराम यांची सर्वात मोठी मुलगी. पहिल्या महिला स्वातंत्र्य सैनिक. यांचा विवाह पाटील, सोलापूर यांच्या बरोबर झाला. त्यांना एक मुलगा झाला. त्या मुलाचे नांव नंदकुमार पाटील होय. हौशाक्का या १९४० साली स्वर्गवासी झाल्या. लहान नंदकुमारचे पालन पोषण–संगोपन स्व. माईसाहेब शिर्के यांनी मावशी या नात्याने संगोपन केले व आईची माया दिली. बरीच वर्षे स्व. नंदाकाका यांनी श्री दत्त मठीत सेवा केली. त्यांचे लग्न

सन १९७५ साली सुनंदा यांच्या बरोबर झाले. त्यांना एक मुलगा आहे. त्याचे नाव प्रसाद आहे. त्यांच्या मुलींची नांवे अंबाई, अरुणा, अंबिका, नंदाकाका हे दि. १४/२/२०१८ ला स्वर्गवासी झाले.

**२) स्व.हिरा :–**

यांचा जन्म सन १९०७ मध्ये झाला. त्यांनाच माई म्हंटले जाई. त्यांचा विवाह श्री कुंभार गल्लीतील दत्त महाराजांच्या भविष्य वाणी प्रमाणे रामनाथ शिर्के यांच्या बरोबर झाला. हिरा यांची आत्या शिक्षिका असल्यामुळे त्यांचे शिक्षण व्हर्नाकुलम फायनल (७ वी. सेंटर) इतके त्या काळात झाले होते. त्यांनाच प.पू. माईसाहेब शिर्के म्हंटले जाते. लग्नानंतर हिरा हे नांव सीतामाई झाले. रामनाथ व सीतामाई यांना तीन मुली व एक मुलगा पोटी जन्मले त्यांची माहिती खालील प्रमाणे

**१) तारामती –**

सर्वात मोठी मुलगी लग्नानंतरचे नांव मंदाकिनी – मंदाकिनी शंकरराव भोसले, कोल्हापूर

**२) मालुताई –**

दोन नंबरची मुलगी. लग्नानंतरचे नांव नलिनी मुरलीधर कदम, कोल्हापूर

**३) लीलाताई –**

सर्वात लहान मुलगी. लग्नानंतरचे नांव लीलाताई मधुकर नाईक, कोल्हापूर

**४) वसंतराव ऊर्फ बाळासाहेब –**

यांनाच बाळासाहेब म्हंटले जाई. यांचा जन्म १९२८ ला झाला. स्व. बाळासाहेब संगिताचे उत्तम जाणकार, उत्तम भजन म्हणणारे राजबिंडे पुरुष होते. मोठ्या मनाचे, औदार्याचे, सालस, प्रेमळ होते. त्यांना दि. १९/११/१९९० ला देवाज्ञा झाली.

**३) नारायण :– जन्म १९०९ सालचा.**

परशुराम माने यांचे हे तीन नंबरचे चिरंजीव होय. तो काळ स्वातंत्र्य चळवळीचा. हौशाक्का, हिराई यांच्या बरोबरच नारायणाने प्रभात फेरी, चले जावच्या घोषणा देणे लहानपणापासूनच सुरुवात केली. त्यांच्यावर थोर स्वातंत्र्य सैनिक, देशभक्त क्रांतीसिंह नाना पाटील यांचा जबरदस्त प्रभाव होता. नारायणरावानी पत्री सरकार मध्ये भाग घेतला. स्वातंत्र्य चळवळी चालविल्या. कामगारांचा लढा उभारला. ते साताऱ्याला स्थायिक झाले. १९२४ साली बेळगांवला म. गांधी अध्यक्ष, असताना काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनला कोल्हापूरातून जे लोक गेले त्यात हौशाक्का व नारायणराव यांचा सहभाग होता. तेथून स्वातंत्र्य चळवळीत भाग. १९३० पासून मिठाचा सत्याग्रहात या दोघांचा सहभाग. स्त्री असल्यामुळे हौशाक्कांना सोडून दिले.

त्यावेळी नारायणरावांनी ६ महिने कळंबा जेलला शिक्षा भोगली. या चळवळीला आर्थिक पाठबळ स्व. रामनाथ शिर्के यांचे होते.

स्वातंत्र्य सैनिक दत्तोबा तांबट, भाई माधवराव बागल यांच्या बरोबर नारायणरावांनी स्वातंत्र्य चळवळीत काम केले. भाई माधवराव बागल यांच्या प्रजा परिषदेमध्ये मोठे काम केले. त्यानंतर त्यांनी काँग्रेस, सत्य शोधक चळवळीतही काम केले. संयुक्त महाराष्ट्र समितीतही काम केले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सत्याग्रहात त्यांना १९ वेळा तुरुंगवास शिक्षा झाली. दिल्ली ते कारवारच्या तुरुंगात नारायणरावांनी दिवस काढले. पुढे त्यांनी क्रांतीसिंह नाना पाटलांचे डाव्या विचारसरणीने काम चालविले. नारायणराव मानेंचे लग्न १९३२ ला झाले. नारायणरावांच्या पत्नीचे नांव शांताबाई. त्या देगांव (सातारा) गांवच्या घाडगेंच्या घराण्यातील. घाडगेंच्या त्या एकुलत्या एक कन्या असल्यामुळे नारायणराव माने साताऱ्यालाच स्थायिक झाले. त्यांना तीन अपत्ये. मोठ्या चिरंजीवाचे नांव प्रभाकर तर दोन नंबरचे चिरंजीव किरण आणि तीन स्व. उषाताई नावाची मुलगी. श्री प्रभाकर हे सिव्हिल इंजिनियर आहेत. नुकतेच ते कार्यकारी अभियंता, महा. जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे येथून वर्ग – १ अधिकारी म्हणून निवृत्त झाले आहेत. नारायणराव माने दि. १२/८/१९८० स्वर्गवासी झाले.

**४) गजानन :–**

परशुराम माने यांचे हे दोन नंबरचे चिरंजीव. ते कोल्हापूरला स्थायिक झाले. हे उत्तम गायक होते. सरोजिनी या त्यांच्या पत्नी.

**५) यशवंतराव :–**

यांचा जन्म १९१६ चा. परशुराम यांचे सर्वात लहान चिरंजीव यांना शहाणे मामाही म्हणत. ते उत्तम भजन म्हणत. ते नाटकातही काम करीत. दररोज श्री दत्त मठीत रात्री भजनाच्या वेळी हजर असत. मठीतील सर्व कामात त्यांचा हातभार असे. शेवटपर्यंत माईसाहेब व शहाणेमामा यांचा बहीण भाऊ हा धागा कायम दृढ राहिला. ते दि. १७/१०/२०१३ रोजी वारले.

**त्यांना दोन – मुले १) प्रताप व २) स्व. बंडू ३) सीमंतिनी मुलगी**

श्री प्रताप यशवंतराव माने हे टेलिफोन खात्यात कार्यरत होते. नुकतेच ते सेवानिवृत झाले आहेत. यशवंतराव (शहाणेमामा) यांच्या धर्मपत्नीचे नांव शकुंतला आहे.

शब्दांकन :– **श्री. किरण माने, सातारा**
**श्री. प्रताप माने, कोल्हापूर**



स्व.परशुराम दौलती माने, कोल्हापूर



स्व.रामनाथ दत्तात्रय शिर्के, कोल्हापूर



स्व.सीतामाई रामनाथ शिर्के, कोल्हापूर

# स्व. रामा भैरु राऊत यांची माहिती

स्व. रामा भैरु राऊत हे कोल्हापूरला संध्यामठ गल्ली, शिवाजी पेठ येथे रहात होते. ते फुलेवाडी येथील सोसायटीत पाटकरी म्हणून नोकरीला होते. रंकाळा तलावाचे पाणी शेतीला दिले जाई. भात, जोंधळा, ऊस, शेंग हे पिके प्रामुख्याने शेतकरी घेत असत. राऊतमामा हे सर्व शेतकऱ्यांना वेळेवर पाणी देत. वशीला त्यांच्याजवळ चालत नसे. शेतकऱ्यांची निकडीची गरज बघून शेतीला पाणी पुरवठा मामा प्रामाणिकपणे करीत असत. त्यामुळे गोरगरीब शेतकरी त्यांच्यावर खुष असत. रात्रं दिवस ते वेळेनुसार पाटकऱ्याचे काम करीत. रात्री सुध्दा पाणी पाळीला ते स्वत: पाणी देण्यासाठी फिरत. अशाच एक रात्री एका समंधाने / भूताने त्यांना पछाडले. ते भूत / समंध त्यांना त्रास देवू लागले. ती भूतबाधा / समंधबाधा दूर व्हावी, त्या बाधेतून मुक्त व्हावे म्हणून त्यांनी बरेच प्रयत्न केले. अनेक मांत्रिकाच्या पायऱ्या झिजवल्या. परंतु त्यांना गुण आला नाही. त्यांची पिशाच्चबाधा / भूतबाधा / समंधबाधा दूर झाली नाही. फुलेवाडीतील कोणी तरी त्यांना कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्याकडे जाणेस सांगितले. सुवर्ण पुष्पांचा गुच्छ / फुले घेवून ते कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या दर्शनासाठी पिशाच्च बाधेतून / समंधबाधेतून मुक्त होण्यासाठी गेले.

सुवर्णपुष्पांचा गुच्छ / तुरा त्यांनी श्री दत्त महाराजांना दिला व चरणावर फुले वाहून आपली समंधबाधेची / पिशाच्चबाधेची व्यथा त्यांना सांगितली. श्री दत्त महाराजांनी राऊतमामांना आशीर्वाद दिला ''त्या समंधाच्या पाठीमागे मी लागतो, समंधबाधा दूर करतो तू दररोज पूजेला फुले आणीत जा. पूर्व सुकृताने तू मठीत सेवा करीत जा'' असे सांगितले. त्या दिवसा पासून राऊतमामा श्री दत्त महाराजांसाठी दररोज फुले आणू लागले. ही घटना अंदाजे इ.स. १८८० ते १८९० साली घडलेली असावी.

राऊतमामा दररोज फुले आणू लागले. मठीत जी पडतील ती कामे करु लागले. मठातील झाडलोट दिवाबत्ती करु लागले. श्री दत्त महाराजांच्या कृपेने ते समंधबाधेतून / पिशाच्चबाधेतून पूर्ण मुक्त झाले. आता श्री राऊतमामांनी श्री दत्त महाराजांची सेवा पत्करली व सेवाधारी झाले. सर्वजण त्यांना आता ''मामा'' म्हणू लागले. सर्वांचे ते लाडके / आदरणीय झाले. फुलेवाडीतील सोसायटीतील पाटकऱ्याची नोकरी सुरु होती. आता त्यांनी घरदाराचा प्रपंचाचा त्याग केला व मठीतच ते राहू लागले. रंकाळ्या जवळील राजघाटा जवळ त्यांनी एक फुलांची सुंदर बाग तयार केली. तेथील फुले ते श्री दत्त महाराजांच्या सेवेसाठी आणू लागले. शिर्केंच्या घराण्यातील सर्वांना ते आदरणीय मामा ठरले. वडिलधारी ठरले. स्व. रामनाथांची पहिली पत्नी लक्ष्मीबाई वारल्यानंतर स्व. रामनाथांचे दुसरे लग्न स्व. राऊतमामांनी पुढे होऊन केले. स्व. रामनाथ शिर्केंच्या मार्गदर्शनाखाली राऊतमामा मठीतील कामकाज, उत्सव वगैरे पार पाडू लागले. स्व. रामनाथ यांना मंदाकिनी, मालू, लिला या मुली व वसंतराव ऊर्फ बाळासाहेब ही चार मुले

झाली. पुढे लवकरच रामनाथ अचानकपणे हार्ट अटॅकने / हृदयविकाराने मरण पावले (मृत्यू दि. १९३४) संकट कोसळले. मठीची पूजा अर्चा, उत्सव, चार लहान मुले हे सारे चित्र त्यांच्या समोर उभे राहिले. सीतामाईंच्या साथीला त्यांच्या आई राधाबाई आल्या. स्व. रामनाथांच्या मृत्यूनंतर राऊतमामा मठीतील सर्व व्यवस्था काळजीपूर्वक पाहू लागले. फुलेवाडीतील सोसायटीत त्यांची पाटकऱ्यांची नोकरी प्रामाणिकपणे चालू होती. आता राऊतमामा घरदार / प्रपंच / आप्त यांच्या पासून पूर्ण आलिप्त झाले होते. श्री दत्त महाराजांची सेवा एकनिष्ठपणे करणे सुरु होते. पगाराचे मिळणारे पैसे ते स्व. माईसाहेबांच्या हातावर ठेवीत.

एकदा अशी घटना घडली की, श्री दत्त महाराजांचा पुण्यतिथी उत्सव जवळ आला. उत्सवाची काहीच तयारी नाही. धन धान्याचा पत्ता नाही. पैशाचा पत्ता नाही. स्व. माईसाहेब यांना काळजी लागून राहिली. त्यांनी ही काळजी मठीतील वडिलधारी राऊतमामांच्या कानावर घातली. राऊतमामा माईना म्हणाले, ''उत्सव श्री दत्त महाराजांचा आहे ते दयाळू आहेत. ते कांही तरी करतील काळजी करु नका'' माईना मामांच्या बोलण्याने थोडा धीर आला. दुसऱ्या दिवशीच फुलेवाडीतून सात आठ बैलगाडीतून उत्सवासाठी लागणारे धान्य व साहित्य आले. पुढे उत्सव मोठ्या आनंदाने पार पडला. स्व. राऊतमामा हे मठीतच वारले. त्यांचा (मृत्यू दि. २५/ ११/१९५५) त्यांचा सर्व विधी स्व. माईसाहेबांच्या देखरेखीखाली स्व. बाळासाहेब शिर्के यांनी केला. फुलेवाडीतील सोसायटी इमारती समोरील श्री दत्त मंदिर हे राऊतमामांच्या प्रेरणेने उभे राहिले आहे. या मंदिरासमोर एका कट्ट्यावर पूज्यनिय राऊतमामांच्या पादुका त्यांचे एक भक्त माजी आमदार, मंत्री स्व. श्रीपतरावदादा बोंद्रे यांनी स्थापन केल्या आहेत.

शब्दांकन :- **श्री. विनायक गणपती राऊत (नातू)**
**( राऊतमामांच्या चुलत भावाचा नातू )**



रंकाळा तलाव, कोल्हापूर

# स्व. बळवंतराव धुमे (उत्तूर) यांची माहिती

स्व. बळवंतराव आण्णाजी धुमे हे मूळ उत्तूरचे राहणारे. मुमेवाडी, चव्हाणवाडी, पेंढारवाडी, दगडी शिपूर, अर्दाळ, हालेवाडी, उत्तूर येथे त्यांची १३० एकर जमीन होती. त्यांच्या पत्नीचे नांव राधाबाई होते. स्व. बळवंतराव शेतीवाडी, घरदार, प्रपंच सांभाळून साऱ्या उपाध्या बाजुला सारुन स्वस्थ चित्ताने दर पौर्णिमेला ते नृसिंहवाडीला श्री दत्तात्रेयाच्या दर्शनाला जात. ते धार्मिक व श्रध्दावान होते. दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला श्री दत्तात्रयाच्या दर्शनाला जाण्यापूर्वी ते कोल्हापूरला येत. त्याकाळात कोल्हापुरात कुंभार गल्लीत ताराबाई शिर्केच्या घरी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज वास करुन होते. त्यानाच कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराज म्हणत. कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांचे दर्शन प्रथम घेवूनच मग स्व. बळवंतराव धुमे नसिंहवाडीला श्री दत्त दर्शनाला जात. बरीच वर्षे हा नियम स्व. बळवंतरावानी चालविला होता. एकदा गुरुद्वादशिला नृसिंहवाडीला श्री दत्त दर्शनाला नेहमी प्रमाणे जाण्यासाठी बळवंतराव आदल्या दिवशी कोल्हापूरला आले व कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या दर्शनासाठी गेले. त्यांनी श्री कुंभार स्वामीचे मनोभावाने दर्शन घेतले. दर्शन घेताच श्री कुंभार स्वामी बळवंतरावाना म्हणाले ''गुरुद्वादशी इथे साजरी करु'' स्व. बळवंतरावांनी गुरु बोलाचा अंगिकार केला. श्री स्वामींच्या आज्ञेने स्व. दत्तोबा शिर्केंची मान्यता घेतली. त्याकाळच्या सर्व भक्तमंडळीच्या कानांवर गुरुद्वादशी उत्सव सुरु करण्याचा मनोदय घातला. सर्व भक्तांना आनंद झाला.

उत्सवाची तयारी सुरु झाली. गुरुद्वादशी उत्सवाचा सर्वांना ओढा लागला, उत्सुकता लागली. कोल्हापुरातील एक नामांकित सरदार पाटणकर यांनी श्री स्वामींना बसण्यासाठी घोडा दिला. अबदागिरी, सनई, चौघडा दिला. गुरुद्वादशी दिवस उगवला. श्री स्वामींना घोड्यावर बसवून मस्तकावर अबदागिरी धरुन पुढे टाळ, मृदंग, टाळकरी, सनई चौघडा असा थाट करुन मिरवणूक पंचगंगा घाटावर आली. श्री गुरुंना, श्री स्वामींना गुरुद्वादशीला गंगास्नान घालून मिरवणूक पुण्यश्लोक ताराईच्या घरी परतली. भक्तांचे डोळ्याचे पारणे फिटले. त्यांना गुरुद्वादशी उत्सवाचा फार आनंद झाला. सर्वांना महाप्रसादाचा लाभ झाला. स्वतः बाळ धुमेने सोबत आणलेले सर्व पैसे ते इथेच श्री स्वामींच्या गुरुद्वादशी उत्सवाला आनंदाने खर्च केले. तेंव्हापासून कोल्हापुरात कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांचा गुरुद्वादशी उत्सव सुरु झाला. श्री कुंभार स्वामींनी दि. २०/८/१९०० रोजी समाधी घेतली परंतू स्व. बळवंतराव धुमेच्या मुळे सुरु झालेला गुरुद्वादशी उत्सव प्रथा आजही सुरु आहे. या दिवशी पालखी मिरवणूक निघते. सनई चौघडा, टाळ, मृदंग, भजन यासह श्रींची पालखी पंचगंगा घाटावर दोन प्रहरी येते. गंगेच्या पाण्याने श्रींच्या पादुकांना स्नान घालून आरती केली जाते, पालखी दोन प्रहरी परत पुण्यश्लोक ताराबाईंच्या मठीत येते. आरती होते. सर्व भक्तमंडळीना महाप्रसाद वाटप केले जाते.

स्व. बळवंतराव व स्व. राधाबाई बळवंतराव धुमे यांना दोन मुलीच होत्या. थोरल्या मुलीचे

नांव येसुबाई. त्यांचे सासरचे नांव येसुबाई अनंत कुलकर्णी बेकनाळकर तर लहान मुलीचे नांव सोनाबाई त्यांचे सासरचे नांव लक्ष्मीबाई नारायण कामत, कोल्हापूर. स्व. बळवंतराव यांना मुलगा नव्हता. त्यांचे लहान बंधु व्यंकाजी आण्णाजी धुमे यांचे पुत्र स्व. गणपतराव व्यंकाजीराव धुमे हे होय. स्व. गणपतराव धुमे यांना खालील प्रमाणे ५ मुले ही सर्व मुले उच्च विद्याविभूषित.

**१) मोहनराव :–**

हे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये अधिकारी म्हणून मिरजेला होते. त्यांच्या पत्नीचे नांव मृणाल. त्यांच्या मुलाचे नांव :– श्री अनुप ऊर्फ बळवंत धुमे

त्यांच्या मुलीचे नांव :– अनघा मोहन धुमे

सासरचे नांव :– सौ. तन्वी अमित गर्दे, मिरज

सुनेचे नाव :– सौ. अस्मिता अनूप धुमे

स्व. मोहनराव हे स्व. बळवंतराव धुमे यांना दत्तक गेले होते. मोहनराव हे दि. २६/७/२०१४ रोजी स्वर्गवासी झाले. स्व. मोहनराव यांना स्व. राधाबाई बळवंतराव धुमे यांनी दत्तक घेतले. हे धुमे कुटूंबीय मिरजेत राहतात. स्व. मोहनराव हे सौ. शारदा गणपतराव धुमे यांचे पुत्र. सौ. शारदा यांचे माहेरचे नांव ताई गणपतराव बेकनाळकर असे होते.

**२) श्री सुभाष धुमे :–**

गडहिंग्लजला स्थाईक झालेले असून, ते वार्ताहर म्हणून काम करतात.

**३) श्री विजयराव धुमे :–**

हे गडहिंग्लज जवळ उत्तूर या मूळ गांवी रहात असून, शेतीवाडी पाहतात.

**४) श्री श्रीकांत धुमे :–**

हे कोल्हापूरला स्थाईक झाले असून, बँक ऑफ बडोदा मध्ये वरच्या पदावर कार्यरत होते. सध्या सेवानिवृत्त.

**५) श्री राजेंद्र धुमे :–** हे स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये अधिकारी असून कोल्हापूर येथे स्थायिक झाले आहेत.

शब्दांकन – **श्री अनुप धुमे, मिरज**



डावीकडून बसलेले स्व.बळवंतराव धुमे,सौ.राधाबाई बळवंतराव धुमे मांडीवर कुमारी प्रेमलता,
पाठीमागे उभे स्व.गणपतराव धुमे व सौ.शारदा गणपतराव धुमे (उत्तूर)



श्री गुरुव्दादशी पालखी उत्सव सोहळा, कोल्हापूर

# ॥ अध्याय २७ वा ॥



श्री नामदेव महाराज, कोल्हापूर

## विषयसूची....!

१) धारवाडला जन्मलेले श्री नामदेव महाराज चव्हाण
२) कोल्हापुरातील स्व. व्यंकटेश ऐतवडेकर यांच्या पहिल्या पत्नीचे निधन
३) नांदणीचे स्व. बापू कुलकर्णी व
स्व. गणपत कुलकर्णी – विस्कटले जुळले
४) नांदणीतील गोपाळ सोनाराच्या
चुलत भावाची कारागृहातून सुटका
५) कुन्नूरचा दत्तोबा मोकाशी – विहिरीस पाणी आले
६) महेकराचा एकच धंदा दुसऱ्यांची निंदा करणे
७) साठीच्या केदारी कबूरकरला मूल झाले
८) महादेव भटाचा दमा गेला

## अध्याय २७ वा

नामा जन्मला धारवाडला. त्याला दत्त भक्तीची आवड होती. माय - पित्याला नामा देवतुल्य मानीत असे. नामाचे बालपण मजेत गेले पण दैव कुणाला सुटले आहे. मरण हे सर्वांना आहे. नामाची माता लहानपणीच स्वर्गवासी झाली. पुढे पित्याने पालन-पोषण केले. थोडे फार शिक्षण दिले. नामाचे मन दत्त भजनी रमत असे. अल्प वयीच नामाने धारवाड सोडले. करवीरात त्याची आत्या होती. तिच्या घरी आला. नामाच्या आत्याला अपत्य नव्हते. तिला नामाचा लळा लागला. परदेशी मूल म्हणून पुढे आत्याने त्याचे लग्न केले. आत्याने त्याला सांगितले. ''कुंभार गल्लीत मनुष्य रुपाने / देहाने वाडीचा प्रत्यक्ष दत्त अवतरला आहे. त्यांच्या दर्शनाला जा.'' आत्याचे शब्द कानी पडताच नामाला वाटले जणू चिंतामणीच सांपडला. नामा गुरु दर्शना अधीर झाला. कुंभार गल्लीत जाऊन वैराग्य मठीतील श्रीकृष्णगुरुंचे त्याने भक्ती भावाने दर्शन घेतले. अशा तऱ्हेने कानडी देशाचा / धारवाडचा नामा श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला नित्य येवू लागला. दर्शनाला आला असता एके दिवशी श्रीकृष्णगुरु नामाला म्हणाले, ''वाडीस आमचे घरी जावे एकदा'' श्रीकृष्णगुरुंची आज्ञा मानून पत्नीसवे नामा नृसिंहवाडीला आला. पुजाऱ्याच्या घरी राहून रोज श्री दत्ताच्या आरतीला जाऊ लागला. एकदा नामाला वाटले चण्याचा नैवेद्य दत्ताला अर्पावा. फुटाण्याची सुंदर डाळ, साखर मिसळून चूर्ण केले. त्यात लवंग घातली. नैवेद्याची वाटी पुजाऱ्याच्या पुढे ठेवून नैवेद्य अर्पण करण्यास विनवणी केली.

पुजारी म्हणाला, ''आम्ही सोवळ्यात आहे. चण्याच्या नैवेद्याला शिवता ओवळे होईल. इथले नियम धर्म वेगळे. नैवेद्य मान्य न होई. चण्याचा नैवेद्य इथे चालणार नाही.'' नामा निराश झाला. श्रीगुरु कोपलेच असे त्याला वाटले. इतक्यात नामाला आठ वर्षाचा बालक दिसला. त्याला पाहून नामाला आनंद झाला. त्याला वाटले हा आठ वर्षाचा बालक आपले नैवेद्याचे काम करणार. त्याने त्या बालकाला जवळ बोलविले. ती नैवेद्याची वाटी त्या बालकाच्या हातात दिली. त्या बालकाने ती वाटी सहज गाभाऱ्यात ठेवली. वाटी गाभ्याऱ्यात ठेवण्याची गोष्ट इतकी सहज घडली की, कोणाच्या लक्षातच आले नाही. पुढे आरती सुरु झाली. नामाचे लक्ष मात्र वाटीवर, पुजारी आरती करता, सहज त्याचा हात खाली येता किंचित वाटीस लागता चूर्ण पडले पादुकांवर. नामदेवाने ते पाहिले. माझा शुध्द भाव पाहून चण्याच्या नैवेद्याचा अंगिकार केला असे त्याला वाटले. तो गहिंवरुन गेला व म्हणू लागला ''श्रीगुरु आपपर भाव मानत नाहीत.''

वाडीच्या वास्तव्यात नामाचा मित्र त्याला भेटला का आलास म्हणून विचारु लागला ते ऐकून नामा मित्राला म्हणाला ''करवीरच्या कुंभार गल्लीत वैराग्य मठीतील श्रीकृष्णगुरुंचा मी सेवक आहे. त्यांच्या आज्ञेने वाडीला श्री दत्त दर्शनाला आलो आहे.'' यावर नामाचा मित्र

त्याला म्हणाला ''कालपर्यंत तुमचे दयासागर गुरुवर सेवकासह येथेच होते. दत्तमंदिराच्या मागील ओवरीत लाड, दळवी, रामदास, महादेवशास्त्री, म्हादबा कोष्टी यांच्यासह एक महिना वास्तव्यास होते. श्रीगुरु कालच करवीरी गेले.'' नामा मित्रास म्हणाला ''तू असत्य बोलतोस. करवीरीच श्रीगुरु नित्य वास्तव्यास असतात. श्रीगुरु एक महिना वाडीला होते ही नुसती अफवा आहे. कांही आहे का पुरावा? इथे येईपर्यंत श्रीगुरुंची सेवा केली. हे सारे अशक्य आहे.'' यावर नामाचा मित्र नामाला म्हणाला ''कशासाठी व्यर्थ असत्य बोलू? माझा मित्र विठ्ठलभट कोडणीकरकडे चल. भरपूर पुरावा देतो. त्यालाच सर्व विचारावे म्हणजे श्रीगुरुनी केलेला चमत्कार तो सांगेल'' नामा मित्रा सोबत विठ्ठल भट्ट कोडणीकरांच्या घरी निघाले एवढ्यात कोडणीकर समोरच आला. नामाने विठ्ठलभट्ट कोडणीकराला विचारता तो नामाला म्हणाला ''श्रीगुरु एक महिना वाडीत होते. माझ्या पत्नीला समंधबाधा होती. समंध जाच करीत होता. तुमच्या गुरुची केवढी कृपा पत्नीचा समंध त्यांनी काढला. त्यांचे अनंत उपकार माझ्यावर झाले.'' ते ऐकून नामा चकीत झाला. श्रीगुरुंचे हे अद्‌भुत कर्म त्याला वाटले, कोल्हापूर सोडले नाही. मग वाडीला केंव्हा आले. जो अनंतरुपे धरतो त्याला हे चमत्कार सर्व साधारण आहेत. भक्तांची दुःखे हरण करण्यासाठी हा गुरु अवतार. पुढे श्रीकृष्णगुरु सानिध्य नामा कायम राहिला. श्रीकृष्णगुरुंचा समाधी पर्वकाळ साधला. तोच एक दीर्घायुषी निसीम्म भक्त झाला.

कोल्हापूरात व्यंकटेश ऐतवडेकर नांवाचा इसम रहात होता. श्रीगुरुवर त्याचा विश्वास होता. नित्य येवून तो श्रीगुरुंना नमस्कार करी / दर्शन घेई. पुढे तो संसार दुःखात सापडला. त्याची पहिली पत्नी आजारी पडली. खिन्नपणे वैराग्यमठीत श्रीकृष्णगुरु जवळ येवून बसला. त्याचे संकट श्रीगुरुनी अंतरी / मनी जाणून त्याच्या डोक्यावरचा रुमाल उलटा - सुलटा केला. व्यंकटेश ऐतवडेकर घरी आल्यावर डोक्यावरचा रुमाल उलटा - सुलटा केला याचा अर्थ कळाला. पहिल्या पत्नीचा देहांत झाला. पुढे त्याने दुसरे लग्न केले. संसाराचा गाडा पुन्हा चालवू लागला. वंशवेल पुढे वाढला. अशा रीतीने श्रीगुरुंनी व्यंकटेशाला सुखी केले.

नांदणी हे श्रीकृष्णगुरुंचे जन्मगांव होते. एकदा या नांदणी गांवचा बापू कुलकर्णी, वडील बंधू गणपती व आईसह तारा सदनात वैराग्यमठीत श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला आला. श्रीकृष्णगुरुंचे त्यांनी दर्शन घेताच श्रीकृष्णगुरु त्यांना म्हणाले, ''विस्कटले, विस्कटले'' श्रीगुरुंच्या या बोलाचा अर्थबोध कुणाला झाला नाही. बापू / गणपती कुलकर्णी दोघे बंधू दर्शन घेऊन तिथेच थांबले. पुन्हा दर्शन घेऊन जाऊ लागले. तोच श्रीगुरु म्हणाले, ''जुळले, जुळले'' परंतु याचा उलगडा झाला नाही. बापू कुलकर्णी आपल्या वडिल बंधू गणपती, आईसह परत नांदणीला परतला. नांदणीत परत येताच भाऊबंदाशी उत्पन्नाच्या बाबीवरुन चालू असलेले वाद आपआपसात मिटल्याचे कळले. अशा तऱ्हेने श्रीकृष्णगुरु ''विस्कटले, विस्कटले, जुळले, जुळले'' म्हणण्याचा प्रत्यय कुलकर्णी बंधूना आला.

नांदणीत गोपाळ सोनार नांवाचा इसम रहात होता. त्याचा चुलत बंधू तुरुंगात शिक्षा भोगत होता. शिक्षेचे काम निकालात निघणार होते. तत्पुर्वी गोपाळ सोनार वैराग्य मठीत दर्शनाला आला. दर्शन घेवून तो श्रीकृष्णगुरुंना म्हणाला ''भावावर प्रसंग बाका आला आहे.'' यावर श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''साखळ्या काढून टाका'' श्रीगुरुंच्या कृपेने गोपाळ सोनाराचा भाऊ निर्दोष सुटला. कुन्नूरचा दत्तोबा मोकाशी यांची शेती होती. शेतात उत्तम विहीर असावी विहीर खोदण्याच्या कामाला लागला. परंतु विहिर खोद खोदली पाणी लागेना. पाण्याचा प्रश्नी मनी धरुन दत्तोबा मोकाशी श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला वैराग्य मठीत श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला आला. नारळ श्रीगुरुजवळ / समोर ठेवून पाण्यासाठी विनवू लागला. इतक्यात टिचकी वाजवून श्रीकृष्णगुरु म्हणाले, ''पाणी पाणी आले वरती'' जवळच्या भक्तांनी पाण्याचा प्रश्न कोणाच्या मनात आहे त्यांनी पुढे यावे सांगितले. दत्तोबा मोकाशी पुढे आला. गुरु चरणांना आनंदाने मिठी घातली. पुढे रयताने विहीरीच्या पाण्याची कळशी आणली. दत्तोबाने श्रीगुरु कृपेने लागलेल्या विहीरीच्या पाण्याने श्रीगुरु चरणावर ओतून पूजा केली. आजही दत्तोबाचा नातू सुखकारण श्रीगुरु माऊलीची पूजा करतो.

महेकराचा एकच धंदा आप्तेष्टाची स्वजनांची निंदा करणे, ताराबाईला हे आवडत नसे. ताराबाई त्याला एकदा म्हणाली ''निंदा करणे पाप आहे असा दुर्मद स्वभाव सोड'' यावर त्याला ताराबाईचा क्रोध आला. तो ताराबाईला म्हणाला ''तू करु नकोस बोध. तुझा कारभार तू शोध उपदेश करण्याची तुझी पात्रता नाही.'' ताराबाईचा अपमान करुन रागाने बोलून आपल्या घरी चालता झाला. वाटेत महेकराने भयंकर सर्प पाहिला. तेणे तो घाबरा झाला. घाबरुन परत श्रीगुरुंच्या दर्शनाला आला. श्रीगुरु त्याला म्हणाले, ''तू मनाचा खोटा आहेस आत भय कां वाटते? व्यर्थ स्वत:ला मोठा म्हणवतोस. अहंकाराच्या वाटा का तुडवतोस? योग्य तेच तुला प्रायश्चित दिले आहे.'' यावर महेकराला पश्चाताप झाला. ताराबाईने त्याला परनिंदा योग्य नाही. निंदा करु नकोस हे म्हणलेले पटले. त्याने गुरु क्षमा मागीतली व श्रीगुरुंना म्हणाला, ''मी पूर्ण अपराधी आहे. एक वेळ क्षमा करुन माझा अपराध विसरावा'' भक्तांचा अपमान करताच श्रीगुरु त्याचा कान धरीत. भक्तांचा मान वाढविणाऱ्यांना भक्त महती पटवित.

साठीचा केदारी कबूरकर नांवाचा एक वृध्द भक्त होता. श्रीगुरुंना तो नेहमी विनवी ''माझ्यावर कृपा करावी. कृपाकरुन माझा कुलोध्दार होईल असा एक पुत्र द्यावा.'' यावर श्रीकृष्णगुरु कबूरकराला म्हणाले, ''दुसरे झाड आणूनी लावीता, फळे गोड येतील. पहिल्या पत्नीकडून मुलाची आस सोडावी, प्राक्तनही आडवे येणार नाही.'' मग कबूरकरानी दुसरी पत्नी केली. तिला सुलक्षणी मुले/मुली झाल्या. अशा तऱ्हेने साठ वर्षाच्या वयाला कबूरकराला श्रीगुरु कृपेने मुले झाली तो सुखावला. महादेवभट रायबागकर नांवाचा इसम कोल्हापूरात रहात असे. त्याला श्वासाचा रोग होता. दम्याने तो पीडित होता. दम्याने त्याला जर्जर केले होते. पुढे

महादेवभट नृसिंहवाडीला सेवेसाठी आला. सहा महिने श्री दत्त सेवा वाडीत त्याने केली. वाडीत त्याला श्री दत्ताचा दृष्टांत झाला. श्री दत्ताने त्याला निरोप दिला. ताराबाईच्या सदनी / वैराग्य मठीत आला. श्रीकृष्णगुरुंच्या सेवेत रमला. दमा हळू हळू घटत गेला. दमा नाहीसा झाला. पूर्ववत निरोगी झाला. निरोगी झाल्यावर महादेवभट आपल्या गांवी गेला.

परगांवचा एक भक्त श्रकृष्णगुरुंची ख्याती ऐकून श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनाला वैराग्यमठीत आला. त्याने दर्शन घेताच श्रीगुरुं त्याला म्हणाले, ''शिव शिव म्हण'' तो भाविक भक्त शिव दत्त असा जप करायचा. शिवलिंगाचा शिव जपाचा द्वेष करायचा. पुढे मनाने दत्त दत्त जपू लागला. त्याने एकदा स्वप्नात शिवयुक्त घंटानाद ऐकला. मग त्याला सम्यक ज्ञान झाले. सर्व समान मानू लागला. करु लागला दत्त स्मरण. त्याची तळमळ शांत झाली. श्रीगुरु जे बोलत, जे त्यांच्याबोलाचे आचरण करतात त्यांनाच संपूर्ण ज्ञान निष्पत्ती होते.

*****



श्री नामदेव महाराज मठी, कोल्हापूर

# श्री नामदेव महाराज कोल्हापूर

प. पू. नामदेवमहाराजांचा जन्म मदीहाळ - धारवाडला इ.स. १८४१ रोजी सकाळी झाला. त्यांच्या वडिलांचे नांव व्यंकोबा तर आईचे नांव लक्ष्मीबाई होते.

प. पू. नामदेवमहाराजांचे मुळ गांव नागपूर जवळील उमराशी तालुक्यात होते. त्यांच्या आजोबांचे नांव निंबाजी होते तर आजींचे नांव भिमाबाई होते. निंबाजपंत हे अत्यंत शूर असून ते नागपूरकर भोसले यांच्या दरबारात सेवेला होते. पुढे निंबाजीपंताचे कुटूंब कोल्हापूर संस्थानात येवून स्थायिक झाले. नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर शिरोळ तालुक्यातील दत्तवाड गांवी स्थायिक झाले. दत्तवाडला असतांना निंबाजीपंत - भिमाबाई हे दर पौर्णिमेला नृसिंहवाडीस श्री दत्त दर्शनाला न चुकता जात. अशा रीतीने श्री दत्तात्रेय सेवा नामदेव महाराजांच्या घराण्यात चालून आली. एकदा कृष्णा नदीला महापूर आला. या महापूरात दत्तवाड गांवचे मोठे नुकसान झाले. तसेच या महापूरात नामदेव महाराजांचे आजोबा निंबाजीपंत वाहून गेले. या दु:खद घटनेने नामदेव महाराजांचे वडिल व्यंकोबा यांनी आपल्या सर्व परिवार दत्तवाड गांवाहून आपले आजोळ हल्याळ (जि.कारवार) गांवी हलविला. त्यांनी इंग्रजी सैन्यात नोकरी केली व धारवाडला स्थायिक झाले. सैन्यातून/फलटणीतून सेवानिवृत्त होताच त्यांनी बांधकाम कंत्राट घेवून उदरनिर्वाह चालू केला. या बांधकाम व्यवसायात त्यांनी जम बसवून बऱ्यापैकी पैसा - अडका कमविला. त्यांना एकंदर पांच मुली व एक मुलगा अशी संतती होती. धारवाड जवळ कलादगीला त्यांनी घर बांधले व तेथे राहू लागले.

नामदेव महाराज चार वर्षाचे असतांना त्यांच्या आई लक्ष्मीबाई वारल्या व मातृछाया हरपली. त्यांची मोठी बहिण धारवाडला मदीहाळ भागात रहात असे. त्यांचे नांव भागुबाई होते. त्यांनी नामदेव महाराजांना धारवाडला आपल्या घरी आणले. भागुबाईच्या घरी श्री दत्तमंदिर होते. या दत्त मंदिरात श्री शिव अवतार शिवचिदंबर महास्वामी मुरगोड यांचे शिष्य श्री दास राजाराम महाराज, श्री बोटे स्वामी असे अनेक सत्पुरुष येत असत. अशा थोर सत्पुरुषांचा आशीर्वाद, सहवास नामदेव महाराजांना लाभला. नामदेव महाराजांचे शिक्षण कानडी माध्यमातून चौथी पर्यंत झाले. शालेय शिक्षणाकडे त्यांचा ओढा नव्हता. वयाच्या ११-१२ व्या वर्षी त्यांनी शिक्षणाला राम राम ठोकला. त्यांच्या बहिणीचे मालकही बांधकाम व्यवसायात कार्यरत होते. त्यांना काही कामे कोल्हापुरला मिळाल्याने ते कोल्हापुरला येवून स्थायिक झाले. बांधकाम व्यवसायात चांगला जम बसला. नामदेव महाराजांच्या लहान बहिणीचे लग्न कोल्हापुरात झाले. त्यांना कोल्हापुरला दिले. नामेदव महाराज पंधरा वर्षांचे असतांना त्यांचे वडील व्यंकोबा कलादगीला वारले. त्यामुळे नामदेव महाराज अतिशय दु:खी झाले.

वडिलांच्या निधनानंतर नामदेव महाराज कलादगीला रहात होते. एकदा कलादगीच्या

जंगलात ते गेले असतांना त्यांना एक थोर सत्पुरुष श्री नागलिंगय्या शिवयोगी यांचे दर्शन झाले. त्यांनी नामदेव महाराजांना जवळ बोलावून सांगितले. ''तुला प्रत्यक्ष दत्तदर्शन करवीरला होईल.'' करवीर / कोल्हापूरला नामदेव महाराजांची मोठी बहिण स्थायिक झाली होती. त्यांचे पती बांधकाम व्यवसायात अग्रगण्य कंत्राटदार म्हणून कोल्हापूरात प्रसिध्द होते. ७०-८० एकर जमीन, सावकारी धंदा, सोने - नाणे त्यांच्या बहिणीकडे होते. परंतु त्यांना मूल नव्हते. पसारा बराच मोठा होता. त्यांच्या बहिणीने/ भागुबाईने नामदेव महाराजांना सर्व कुटुंबासह हल्याळहून कोल्हापूरला आणले. नामदेव महाराज १८-१९ वर्षांचे असतांना त्यांचा दत्तकविधी पूर्ण करुन त्यांना दत्तक घेतले. वयाच्या २२-२३ व्या वर्षी नामदेव महाराजांचे लग्न बेळगांवच्या जगताप घराण्यातील गंगाबाई यांच्याशी झाले. नामदेव महाराज त्यावेळी शुक्रवार पेठेतील कद्रे गल्ली येथे आज श्रकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पादुका स्थापन केल्या आहेत तेथे रहात. नामदेव महाराजांना त्यांच्या बहिणीने कुंभार गल्लीत जावून मानव रुपाने अवतरलेल्या व ताराईच्या घरी वास्तव्य करुन राहिलेल्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनाला जात जा असे वारंवार सांगितले होते.

श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज रोजच या शुक्रवार पेठेतून पंचगंगेला स्नानासाठी आपल्या शिष्यासह जात. एकदा घराच्या कट्ट्यावर बसलेल्या नामदेव महाराजांच्या जवळ येवून थांबले व कानडीत म्हणू लागले ''श्री नागलिंगय्या स्वामींनी सांगितलेले तू विसरला काय? मलाच दत्त महाराज म्हणतात. आता तू आमचा'' नामदेवाला सांगितलेले बोल आठवले. नामदेव महाराज विस्मय चकित झाले. त्यांना कलादगीच्या जंगलात थोर सत्पुरुष श्री नागलिंगय्या स्वामींचे बोल आठवले. त्यांचे पूर्व सुकृत भाग्याला आले. भाग्य उदय पावले. मन आनंदाने भरुन गेले. दुसऱ्या दिवशी ते कुंभार गल्लीतील ताराईच्या घरी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दर्शनाला गेले. असंख्य भक्त दर्शनाच्या रांगेत उभे होते. एवढ्यात श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची दृष्टी नामदेव महाराजांच्याकडे गेली. ते म्हणाले, ''नाम्या आला, नाम्या आला'' त्यांनी खुणेने नामदेव महाराजांना बोलावून चरण दर्शन घेणेस सांगितले. श्री चरणांचे नामदेव महाराज दर्शन घेताच श्रीकृष्णगुरु नामदेव महाराजांना म्हणाले ''माझ्या गळाला लागलास आता कुठे जाशील?'' इतरांना ते म्हणाले, ''पंढरीचा नामदेव म्हणतात तो हाच बरं का'' या अशा प्रकारच्या पहिल्या श्रीगुरु दर्शनाने नामदेव महाराज अतिशय आनंदून गेले. त्यांच्या विचाराला नवीनच वळण लागले. त्यांनी श्रीकृष्ण सरस्वतींना त्या दिवसापासून तन मन धन वाहिले. श्रीकृष्णगुरुंच्याकडे ते रोज जाऊ - येवू लागले. सकाळी आरतीला, दुपारी फिरायला, रात्री आरतीला नामदेव महाराज श्रीकृष्णगुरु सोबत राहू लागले. त्यांची सेवा करु लागले. प्रपंचातील त्यांचे लक्ष कमी होवून त्यांना आत्म उध्दाराची ओढ लागली.

श्रीकृष्ण सरस्वतींनी त्यांना अनेक चमत्कार अनुभवयास दिले. त्यांची हर घडीला सत्वपरीक्षा

घेतली. संसार लुटायला लावला. परंतू नामदेव महाराजांना त्यांच्या सगुण भक्तीचे एक वेडच लागले. श्रीकृष्ण सरस्वतींचे ते अंतरंगातील शिष्य बनले. त्यांच्या कृपेने त्यांना समाधी सुखापासून ते आत्म कल्याणाच्या अनेक गोष्टी प्राप्त झाल्या. श्रीकृष्ण सरस्वतींनी आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी गाणगापूरला असलेल्या नामदेव महाराजांना स्वप्नात दृष्टांत देवून बोलावून घेतले व त्यांच्या मस्तकावर अशिर्वादाने कृपाहात ठेवून म्हणाले ''नाम्या, तुझ्याकडे बाहेरची कामे दिली आहेत. वृक्ष वाढव . नित्य पुरणपोळी चुकणार नाही'' असे म्हणून श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी नामदेव महाराजांच्या अंगावर देह टाकून पंचप्राण अनंतात विलीन करुन अवतार संपविला. तो दिवस म्हणजे श्रावण वद्य दशमी शके १८२२ (२० ऑगस्ट १९००) होय. त्यांची समाधी पापाच्या तिकटीजवळील कुंभार गल्लीतील ताराई शिर्केंच्या घरी आहे. आता त्या कुंभार गल्लीला श्री दत्त महाराज गल्ली म्हणतात. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या निर्याणा नंतर नामदेव महाराजांना खूप दु:ख झाले. गुरु बद्दलचे अलोट प्रेम, नम्रता, साधेपणा, आज्ञाधारकपणा या गुणांनी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचा नाममहिमा साऱ्या भारतभर पसरविला. प.पू. नामदेव महाराजांना गुरुतुल्य देवतुल्य मानणारा वर्ग आज भारतभर पसरला आहे. त्यांनी २८ ऑक्टोबर १९७१ रोजी रात्री साडेबाराला अवतार समाप्ती केली. त्यांचे निर्वाण झाले. त्यावेळी त्यांचे वय अंदाजे १२५ वर्षे असावे. श्रीकृष्णगुरुंचे ते सर्वात दीर्घायुषी शिष्य ठरले.

संदर्भ ग्रंथ - **प.पू. नामदेव महाराज चरित्र सुगंध,**
लेखक :- **स्व. वि. य. ऊर्फ नाना गद्रे**



स्व.बापूराव आबाजी कुलकर्णी यांचा नांदणी येथील वाडा

# ''विस्कटले – विस्कटले व जुळले – जुळले'' ची कथा

नांदणी येथील रहिवासी कै. बापूराव आबाजी कुलकर्णी वय वर्षे ९० यांनी स्वत: ही हकीकत सांगितली व ती हकीकत डॉ. श्री अशोक श्रीपाद जोशी यांनी १९७३ साली स्व. बाळ रामनाथ शिर्के रा. कोल्हापूर यांचेकडे पोथी मध्ये लिहीण्यासांठी दिली. ती हकीकत खालील प्रमाणे – १८९६ मध्ये मुनसिफ कोर्ट, शिरोळ येथे दावा चालू होता. उपरोक्त दाव्यामध्ये गणेश आबाजी कुलकर्णी व बापूराव आबाजी कुलकर्णी हे वादी होते. त्यांचे विरुध्द आबाजी नरहर कुलकर्णी (वडिल) व खंडो दत्तात्रय कुलकर्णी यांची नांवे प्रतिवादी म्हणून होती. सदरचा दावा चालू होता. तेंव्हा स्वत: बापूराव बंधू गणेश व त्यांची आई श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या दर्शनास गेले होते. दर्शन घेतल्यावर महाराज ''विस्कटले – विस्कटले'' असे म्हणाले. तिघांनी दर्शन घेतल्यावर थोडा वेळ मठीमध्ये बसले. घरी परत जात असतांना पुन्हा दर्शन घेतले. तेंव्हा महाराज म्हणाले ''जुळले – जुळले''

गांवी परत आल्यानंतर उत्पन्नाचा वाद आपआपसात मिटला होता. या सर्व प्रकरणामध्ये स्व. फाटक गुरुजींनी तडजोड केली होती. त्यानंतरच ''विस्कटले – विस्कटले व जुळले – जुळले'' चा अर्थ कळाला. स्व . बापूराव आबाजी कुलकर्णी यांना एक चिरंजीव स्व. संभाजीराव, स्व. संभाजीरावांना तीन अपत्ये. थोरला श्री राजेश सध्या हे अमेरिकेत स्थायिक असून, त्यांची मुले उच्चविद्याविभूषित आहेत. दोन नंबरचे चिरंजीव श्री संजीव हे आपल्या मुलांसह उच्चविद्याविभूषित आहेत. तिसरी कन्या ही सौ. संगिता जयप्रकाश मराठे ही पुण्यात स्थायिक असून, तिचे पती हे नेव्हीमध्ये उच्च पदावर आहेत. त्यांचा मुलगा हा सुध्दा उच्चविद्या विभूषित आहे. सर्वात महत्वाचे हे जरी बाहेर उद्योगाच्या निमित्ताने असले तरी, नांदणीत शेती व घर असलेने नांदणीशी नाळ ही कायम जोडलेली आहे.

शब्दांकन :– **श्री. मुकुंद जोशी, नांदणी**

## स्वर्गीय आत्माराम सोनार, नांदणी यांची माहिती

आत्माराम सोनाराला तीन मुले. एक गोपाळ दुसरा दत्तोबा व आणखी एक तिसरा भाऊ पैलवान होता. असे सोनार कुटुंब होते. हे तिघेही महाराजांचे मित्र होते. त्यांच्यासह मारुतीच्या देवळाजवळील कट्ट्यावर खेळायचे. असा नित्य क्रम असे. गोपाळ सोनाराचे बंधू दत्तोबा हे स्वामींचे अतिप्रिय मित्र होते. गोपाळरावांचे वडील आत्माराम हे मूशी मध्ये सोने आटवीत असतांना महाराज अकस्मात तेथे गेले व निरीक्षण केले. आटविलेली गोळी गार करण्यासाठी एका पात्रात उपडी केली. गोळी क्षणार्धात गार झाली. महाराजांनी ती गोळी उचलून तोंडात टाकली व घराकडे पलायन केले. आत्मराम सोनार हा प्रकार फक्त बघत राहिले. या सर्व प्रकाराचा राग आला होता. पण शांत होवून मनात विचार केला व त्यांना गिऱ्हाईकांचा जिन्नस कसा द्यायचा ही चिंता लागली होती. मनात राग न धरता हा सर्व प्रकार महाराजांचे घरी जाऊन सांगितला. महाराजांच्या आई वडिलांनी महाराजांच्या वर लक्ष ठेवले. महाराजांचे ऊदरी वैश्वनर असलेने पुढे आठ दहा दिवसांनी महाराज पुन्हा आत्माराम सोनारांचे घरी आले. सोनारांचे जवळ बसले. सोनारांनी स्वागत केले. मनात विचार केला गतगोष्टीचा शोक फुका. आता निश्चिंत राहणे हेच योग्य. महाराजांच्या पाठीवर प्रेमाने हात फिरविला. ''बाळा तुला काय हवे.'' तेवढ्यात चमत्कार झाला. महाराजांनी मुखातून ती सोन्याची गोळी काढून ''घ्या तुमची ठेव. मला काय याचा उपयोग. मला त्याचा उपयोग नाही'' असे म्हणत महाराज आपले घरी निघून गेले. आत्माराम सोनार महाराजांचे घरी गेले. झालेला सर्व प्रकार कथन केला ''माझी ठेव मला परत मिळाली. मी धन्य झालो.'' आत्माराम सोनार महाराजांच्या आई वडिलांना म्हणाले ही ''साक्षात भगवत स्वरुपात लाभलेली ही अमूल्य ठेव आपणच सांभाळा'' या प्रकाराने दोन्ही मुले संतुष्ट झाली. आज आत्माराम सोनाराना धरुन पाच पिढ्या सुवर्ण कारागिरीत तरबेज आहेत. श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या कृपेने आत्मराम – दत्तोबा – भाऊसाहेब (रघुनाथ) – सुभाष व सुभाष यांची दोन मुले एक अवधूत व दुसरा अमृत. सुभाष यांचे एक दुकान व अवधूतचे एक दुकान आणि अमृत हा नोकरी सांभाळून एक छोटेखानी दुकान अशी यांची तीन दुकाने आहेत.

## गोपाळ सोनारांच्या बंधूची माहिती

आत्माराम सोनारांना तीन मुले एक गोपाळ दुसरा दत्तोबा व आणखी एक तिसरा भाऊ पैलवान होता. असे सोनार कुटुंब होते. ही तिघेही महाराजांचे मित्र होते. हे तीनही भाऊ श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या समकालीन होते. त्यापैकी गोपाळ सोनारांचे पैलवान असणारे बंधू हे नेहमी अन्यायाविरुध्द कायम लढत असत. कांही विचित्र माणसे दंडुकशाही करत तर कांही भ्रष्टपणा करीत असत. अशा माणसांना भाऊ पैलवान प्रथम समजाऊन सांगत. पुन्हा असेच वागणे झाले दोन हात करण्याची तयारी पैलवानांची असायची. अशी झटपट करीत असतांना

पैलवानांच्या अंगलट एक गोष्ट आली. पैलवानांना अटक झाली. कोर्ट कचेरी व पोलिस यांचे दावे सुरु झाले. तेंव्हा गोपाळ सोनार महाराजांच्या दर्शनासाठी गेले व सर्व कथानक श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या कानी घातले. केवळ महाराजांच्या दर्शनाने गोपाळ सोनारांच्या पैलवान बंधूची सुटका झाली.

शब्दांकन :- **श्री. मुंकुंद जोशी, नांदणी**



स्व.दत्तोबा मोकाशी, कुन्नूर ता. चिकोडी यांचे छायाचित्र

# स्व. दत्तोबा मोकाशी (कुन्नूर) यांची माहिती

निपाणी जवळ कुन्नूर (ता. चिकोडी, जि. बेळगांव) येथे दत्तात्रय भाऊभट्ट जोशी नांवाचे एक श्रध्दाळू शेतकरी रहात होते. त्यांनाच वतना वरुन मोकाशी म्हणले जाई. त्यांच्या पत्नीचे नांव यशोदा होते. बागायत शेती करणेसाठी त्यांनी विहिर खोदायला चालू केले. विहीर ९० फूट खोदली, तरी पाण्याचा मागमुस नाही. काळा तंड दगड त्यामुळे दत्तोबा मोकाशी नाराज झाले. परंतु विहीर फोडण्याचे काम चालू ठेवले. कोणाच्या तरी सांगण्या वरुन पाण्याचा प्रश्न विचारणेसाठी, पाणी लागण्यासाठी दत्तोबा मोकाशी पहाटेच लवकर उठून कोल्हापूरचा मार्ग चालू लागले. चालत चालत ते कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांना भेटण्यासाठी पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंच्या घरी आले. दोनप्रहरची आरतीची वेळ होती. कुंभार स्वामींची भक्तमंडळी आरतीसाठी थांबली होती. त्यावेळी ताराबाईचे घर कडीपाटाचे दुमजली होते. श्री दत्त महाराज खाली आरतीसाठी जिना उतरुन येवू लागले. जिना उतरुन येत, ते ''पाणी, पाणी, वरती आले'' असे म्हणतच आले. आरतीला थांबलेल्या लोकांना आश्चर्यच वाटले ''पाण्याचा प्रश्न कोणाच्या मनात आहे? त्याने पुढे यावे'' असे भक्तमंडळीनी पुकारा केला. त्या गर्दीतच असलेल्या दत्तोबा मोकाशीलाही श्री दत्त महाराजांच्या दिव्य दृष्टीचे आश्चर्य वाटले. त्यांचे डोळे पाण्याने भरुन आले. दत्तोबा मोकाशी पुढे आले. त्यांनी श्री दत्त महाराजांच्या पायांना मिठी घातली. आनंदून दर्शन घेतले. त्यांचा पाण्याचा प्रश्न श्री दत्त महाराजांच्या कृपेने सुटला होता. सर्व भक्तांना आश्चर्य वाटले. आनंद वाटला.

त्याच दिवशी सायंकाळी दत्तोबा मोकाशीच्या कुन्नूर येथील विहिरीला भरपूर पाणी लागले. दत्तोबा मोकाशी दुसऱ्या दिवशी कुन्नूरला परत गेले. कुळाबरोबर विहिरीचे लागलेले पाणी कळशीतून घेवून कुंभार गल्लीत ताराबाई शिर्केंच्या घरी परत आले. श्री दत्त महाराजांचे दर्शन घेवून विहिरीच्या पाण्याने पाद्यपूजन केले. अशा तऱ्हेने कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या कृपेने कुन्नूरच्या दत्तोबा मोकाशीच्या विहिरीला भरपूर पाणी लागले. पुढे शेती भरपूर पिकू लागली. फुलू लागली. ते घराणे सुखी झाले. यानंतर स्व. दत्तोबा यांची श्री दत्त महाराजांच्या वरील श्रध्दा वाढतच गेली. ते नियमितपणे त्यांच्या दर्शनाला येत राहिले. स्व. दत्तोबा मोकाशी यांच्या धर्म पत्नीचे नांव यशोदा होते. स्व. दत्तोबा मोकाशी यांना एकूण तीन मुले १) कृष्णाजी २) विष्णू ३) गणेश व एक मुलगी. यापैकी कृष्णाजी यांचा वंश खालील प्रमाणे :-

**१) कृष्णाजी :-**

हे दत्तोबा मोकाशी यांचे सर्वात मोठे चिरंजीव. वडिलांना शेती कामात मदत करीत. त्यांच्या पत्नीचे नांव राधाबाई. हलाखीची परिस्थिती, तरीसुध्दा कृष्णाजी गांवाच्या सुखदु:खात भाग घेवून मदत करीत. एक चांगली व्यक्ती म्हणून समाजात मानमरातब.

**कृष्णाजी व राधाबाई यांना तीन मुले होती.**

**१) डॉ. नारायणराव :-**

हे जुन्या काळातील वैद्यकीय व्यवसायातील तज्ञ डॉक्टर होते. दुसऱ्या महायुध्दात त्यांनी मिलीटरीत डॉक्टर म्हणून सेवा केली / नोकरी केली. सेवानिवृत्त झालेवर ते बेनाडीला स्थायिक झाले. दवाखाना सुरु ठेवला. त्यांच्या पत्नीचे नांव इंदिरा.

**२) विष्णूपंत :-**

हे कुन्नूरलाच स्थायिक झाले. वडिलार्जीत शेती व किराणा मालाचे दुकान चालवू लागले. हे ब्रम्हचारी होते.

**३) वामनराव :-**

हे कोल्हापूरला स्थायिक झाले. हेही सुरुवातीला वडिलार्जित शेती करीत. यांचेही किराणा मालाचे दुकान होते. उसाच्या घाण्याला लागणारी मशिनरी तयार करणे, काईली तयार करणे, त्या भाड्याने देणे हाही व्यवसाय केला. परंतु आर्थिक परिस्थिती बेताचीच राहिली. पुढे वामनरावानी निपाणीतील स्व. आप्पासाहेब हिरकुडी यांच्याबरोबर मालवाहतुकीचा/ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय सुरु केला. त्यानंतर त्यांनी दोन वर्षांनी कोल्हापूरातील स्व. दत्तोबा भोसले यांचा MHL १००१ ट्रक घेवून ट्रान्सपोर्टचा व्यवसाय सुरु केला. लवकरच हाही व्यवसाय संपुष्टात आला. आर्थिक परिस्थिती अजुनही बेताचीच होती. धंद्याच्या निमित्ताने नशिब उजडण्यासाठी वामनराव सन १९६० साली कुन्नूरहून कोल्हापूरला आले. धंद्यात भरपूर यश नाही. वाढता संसार. आर्थिक ओढाताण यामुळे घरात शांती नाही. सुख नाही. त्रासाची बाजू सतत. त्यामुळे वामनरावाच्या धर्मपत्नी शांताबाई या एकदा खरी कॉर्नरला वास्तव्याला असणाऱ्या कुंभार स्वामींचे अंतरंगातील शिष्य कोडोलीकर गुरुजी (मामा) यांच्याकडे गेल्या. त्यांनी मामांच्या कानांवर घरची सर्व परिस्थिती घातली. यावर कोडोलीकर मामा शांताबाईना म्हणाले ''ज्याचं तुम्ही खाता त्यांची तुम्ही कांहीच सेवा करीत नाही.'' दत्तोबा मोकाशी नंतर कुंभार गल्लीतील दत्त महाराजांच्या दर्शनाला कोणी जात नव्हते. याची कोडोलीकर मामानी शांताबाईना आठवण करुन देवून कुंभार स्वामींची पोथी वाचणेस सांगितले. कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला जाणेस सांगितले. तेंव्हा पासून स्व. दत्तोबा मोकाशी यांची खंडीत झालेली कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराज स्वामींची सेवा पुन्हा सुरु झाली. मोकाशी परिवार आता पुन्हा श्री स्वामी दर्शनाला कुंभार गल्लीतील ताराबाई शिर्केच्या घरी जाऊ लागला.

सन १९७३ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. तळी, तलाव, विहीरी आटल्या. कुन्नूरच्या दत्तोबा मोकाशीनी खोदलेल्या विहीरीचेही पाणी पूर्ण कमी झाले. विहीरीत घोटाभर पाणीच राहिले. वामनराव मोकाशीच्या विहीरीचे पाणी गेले. शेतीचे काय करायचे ? जनावरांना पाणी कुठले आणायचे? गावकरी लोकांनी आता पाण्यासाठी कुठे जायचे? हा प्रश्न त्यांना

भेडसावू लागला. एके दिवशी कुंभार गल्लीत श्री दत्त महाराजांच्या ते दर्शनाला गेले. श्रध्दापूर्वक त्यांनी श्री स्वामींचे दर्शन घेतले. ही हकीकत / पाण्याचा प्रश्न पुण्यश्लोक माईसाहेब शिर्के यांच्या कानावर घातला. प. पू. माईसाहेब शिर्केनी त्यांना एक प्रसादाचा नारळ दिला व म्हणाल्या ''विहीरीत ज्या ठिकाणी झरा आहे तेथे हा नारळ फोडून पार मारा'' वामनरावांनी प. पू. माईसाहेबांच्या आज्ञेनुसार विहीरीत झऱ्याजवळ नारळ फोडून पार मारली. काय आश्चर्य ! पुन्हा एकदा विहीरीला पाणी भरपूर लागले. आजही विहीर पाण्याने तुडूंब भरुन आहे. अशा तऱ्हेने कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांनी कुन्नूरच्या दत्तोबा मोकाशीचे घराणे पुन्हा एकदा सुखी केले. वामनराव व शांताबाई यांना एकूण तीन मुले त्यांची माहिती खालील प्रमाणे –

**१) श्री अच्युत :–**

हे Civil Diploma आहेत. त्यांनी सन १९९८ पर्यंत ट्रान्सपोर्ट धंदा केला. आता पूर्णपणे शेती करतात. सर्व शेती बागायत असून ते प्रगतीशील शेतकरी आहेत. त्यांच्या पत्नीचे नांव अनुराधा.

**२) श्री माधव :–**

हे पौरोहित्य करतात. त्यांचे शिक्षण Diploma in printing. त्यांच्या पत्नीचे नांव मीरा.

**३) डॉ. श्री मुकूंद :–**

हे आयुर्वेद MD असून, कोल्हापूरात दवाखाना चालवितात. त्यांच्या पत्नीचे नांव राधिका असून, त्याही डॉक्टर आहेत.

वामनराव मोकाशी यांच्यावर कुंभार स्वामींच्या अंतरंगातील शिष्य स्व. कोडोलीकर मामा कोल्हापूर व बाबामहाराज जत्राटकर (निपाणी जवळ, ता. चिकोडी) यांची पूर्ण कृपा आहे. बाबामहाराज व बाबामहाराज यांचे चिरंजीव ह.भ.प.श्री गोपाळकृष्ण जत्राटकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ४३ वर्षे श्री क्षेत्र पंढरपूरला आजही श्री पांडुरंगाची महापूजा, पाद्यपूजा मोकाशी कुटूंब करीत आहे. स्व. दत्तोबा मोकाशी हे बेनाडीचे मूळ जोशी. त्यांना एकूण तीन मुले. यापैकी कृष्णाजी मोकाशींचा वंश वरील प्रमाणे वाढला आहे. पुढील पिढी सुध्दा श्री स्वामी सेवेत श्रध्देने कार्यरत आहे. तर स्व. दत्तोबा यांचे दोन पुत्र विष्णू व गणेश हे संसारी असून त्यांचा वंश विस्तार वाढलेला नाही.

शब्दांकन :– **श्री अच्युत मोकाशी, कोल्हापूर**

## ।। अध्याय २८ वा ।।



काळाची पाऊले

**विषयसूची....!**

१) स्व. हरिपंत शिदनेर्लीकरला पडलेले स्वप्न.
तारांईची तीन जन्माची पुण्याई

२) पुण्यश्लोक तारांईचे महानिर्वाण

# अध्याय २८ वा

एकदा कांही कामानिमित्त हरिपंत शिदनेर्लीकर कागलहून - करवीरी आला. कुंभार गल्लीत एक सत्पुरुष राहतात असे त्याच्या कानावर आले. त्यांची करणी अद्‌भूत आहे. लोक त्यांना दत्त म्हणतात. हेही त्याच्या कांनावर आले. हे ऐकून हरिपंत सुखावला. एका सायंकाळी कुंभार गल्लीतील दत्ताला हरिपंत दर्शनाला गेला. त्याने गुरुपदकमळी मस्तक ठेवले. त्याची वृत्ती पालटली. पुढे तो कागल सोडून करवीरीच राहिला. गुरुलीला पाहू लागला. भक्त म्हणून श्रीगुरुजवळ राहू लागला. एकदा त्याने खंडोबाच्या देवालयात अनुष्ठान सुरु केले उजेड येण्यासाठी एकच खिडकी होती. एक मांजर / बोका त्या एकुलत्या एक खिडकीत हरिपंताच्या अनुष्ठानाच्या वेळी / वाचण्याच्या वेळी येऊन बसे. त्यामुळे एके दिवशी हरिपंताने त्या मांजराला / बोक्याला धरुन त्याच्या तोंडावर क्रोधाने मारले. ताडण केले. दुसऱ्या दिवशी सकाळी शिदनेर्लीकर श्रीगुरुंच्या दर्शनाला आला त्यावेळी श्रीगुरुंनी हरिपंताला व जवळच्या सेवकांना सुजलेला गाल दाखविला व हरिपंताने गालावर मारले / गालाला ताडण केले असे म्हणू लागले. हरिपंताला श्रीगुरु म्हणाले ''कसले तुझे अनुष्ठान, काय करिशी मंत्रपठण, उच्छंखल झाले तुझे मन म्हणून मुखावर मारले, गालिप्रदान केले.'' हरिपंताच्या लक्षात आले आपण अनुष्ठानाच्या वेळी मांजराला / बोक्याला मारले होते / ताडण केले होते. हरिपंत सद्‌गदित झाला. आपल्या हातून अनुचित घडले असे त्याला वाटले.

श्रीकृष्णगुरु हे केवळ मनुष्य नसून प्रत्यक्ष श्री विठ्ठल वैकुंठराणा, श्री दत्तावतार आहेत याची त्याला खात्री झाली. तो चकीत झाला. त्याचा दृढविश्वास वाढला. अशा या योगेश्वराला ताराचे घर त्याला बरे वाटेना. जैसा उकिरड्यावर हिरा पडला आहे असे त्याला वाटू लागले. श्रीकृष्णगुरुंना दुसरीकडे न्यावे असे त्याला वाटू लागले. सर्व सेवकवृदांत हरिपंत धूर्त होता. रामदास, वेणीमाधव या ब्राम्हण सेवकाचे मन वळवून अनुष्ठान मांडून श्रीकृष्णगुरुंना दुसरीकडे वास्तव्याला नेण्याचे हरिपंताने ठरविले. हरिपंत रामदास, वेणीमाधवाला म्हणाला ''तुम्ही नुसते नावाला ब्राम्हण आहात. श्रीगुरु अन्नाला ताराघरी पडला आहे. यास एक उपाय आहे. तिघेजण आपण अनुष्ठान करुन श्रीगुरुंना दुसरीकडे नेऊ या'' रामदास, वेणीमाधव उभयतांना हरिपंताचे म्हणणे मान्य झाले. तिघानी अनुष्ठान मांडले. पुढे चवदा दिवस गेले. एका सकाळी वेणीमाधव दर्शनाला आला असता त्याला स्वामी म्हणाले, ''माझी सत्य वाणी ऐक. पंढरीचा विठ्ठल भगवान याला एक आणा कर्ज झाले. अर्धी अजून बाकी आहे. अनुष्ठान, उपवास, यांनी विठ्ठलाचे कर्ज कदापि फिटणार नाही. हे मनांत ठेव/लक्षात घे.'' श्रीकृष्णगुरुंचे बोल वेणी माधवाला समजले नाहीत. त्याच रात्री श्रीकृष्णगुरुंनी नवल केले. रात्री हरिपंत, रामदास निद्रीस्त असतांना दोघांनी अद्‌भूत स्वप्न पाहिले. त्यांना गुरुंचे हृदयगत समजले. हनुमानासम बलाढ्य वानर ताराबाईने खांबाला दोराने बांधला आहे. ताराबाई त्या वानरा जवळ उभा राहून म्हणत

आहे. ''माझे अगाध तप आहे तीन जन्मांची ही पुण्याई आहे. या पुण्याईने हा हनुमंत बांधला आहे.'' स्वप्न पाहून रामदास, हरिपंत जागे झाले एकमेकांशी स्वप्न सांगू लागले. शेवटी स्वप्न अर्थ समजला. एकच स्वप्न दोघांना पडले होते. गुरुंची सत्ता त्यांना अगाध वाटली. सकाळी वेणीमाधव येताच त्याला दोघांना पडलेले एकच स्वप्न सांगितले. यावर वेणी माधव त्यांना म्हणाला ''आज सकाळी श्रीगुरुंच्या दर्शनाला गेलो असता पंढरीच्या विठ्ठलाला एक आणा कर्ज झाले आहे. अर्धे फिटले अर्धे बाकी आहे. व्रत अनुष्ठान, उपवास यानी पांडुरंगाचे / विठ्ठलाचे कर्ज फिटणार नाही. त्रिलोकीसाक्षी सदगुरुनाथ ताराबाईच्या घरीच निश्चित राहतील. ताराबाईच्या तीन तपाचे कर्ज त्यांच्यावर आहे. तुमचे अनुष्ठान पुरे. श्रीगुरु हे स्थान / घर कधीही सोडणार नाहीत. पांडुरंगाचे कर्ज फिटले नाही. अर्धी बाकी राहिली आहे. ताराबाईचे अजून देणे आहे. मग ते दुसरीकडे कसे वास्तव्यास जातील. माफी मागून व्हा मोकळे'' हरिपंत, रामदास यांना विषाद वाटला. सर्वांना हे स्वप्न कळाले. ताराबाईचे महत्व कळाले.

श्रीकृष्णगुरुंनी तिचे सत्त्व घेतले पण तिने तत्त्व सोडले नाही. श्रीगुरुंच्या सत्त्व परीक्षेत उतरली. मायपित्याची सेवा केली. विठ्ठलमाऊली बघण्या आली. सेवेत खंड येता पुंडलिकाने वीट फेकली. भक्त वत्सल विठ्ठल त्या विटेवर उभा राहिला. पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरीत आला. पुंडलिक कारणमात्र झाला. पुंडलिका सारखी कष्टप्रद सेवा ताराबाईंनी केली. श्री दत्तमाऊली करवीरी आली / राहिली. ताराबाई भाग्यशाली श्रीकृष्णगुरु तिच्या घरी वस्ती करुन राहिले. श्रीकृष्णगुरुंनी सर्व प्रकारे ताराबाईची परीक्षा घेतली. ताराबाई परीक्षेत उतरली. श्रीकृष्णगुरु तिला आई म्हणीत. काय तपाचरण म्हणावे? योग्यांना जो दुर्लक्ष तो ताराबाईने केला सुलभ करवीर वासी दर्शन लाभ घेतात. ताराबाईचे अनंत उपकार मानतात.

नेहमी देवाजवळ भक्त मागणे मागतात. देव भक्तांच्या इच्छा पुरवितात. परंतु इथे नेमके उलटे घडले. श्रीकृष्णगुरु नेहमी ताराईस म्हणत. ''हवे ते माग देतो, मागशील ते वरदान देतो'' यावर ताराई श्रीकृष्णगुरुंना म्हणे ''तुम्हीच माझी त्रिलोकातील संपत्ती, कशाची वाण, कमी नाही. मला तुमच्या शिवाय कांही नको, तुम्हीच माझी संपत्ती. तुम्हीच माझे देवदत्त'' श्रीकृष्णगुरुंना ताराई रोजी न्हाऊ घाले. नित्य नवी कपडे घाली. मुखी दहीभात, खिचडी भरवे. अशा प्रकाराने ताराईने बरेच दिवस श्रीकृष्णगुरुंची सेवा केली. पुढे कांही काळ लोटला. ताराईस देहाचा भरवसा उरला नाही. श्रीकृष्णगुरुंना पदर पसरुन ताराईने एक मागणे मागितले ''तुमचे अगोदर मी जावे. तुमची वस्ती अखंड माझ्या घरी व्हावी. वंशपरंपरेने तुमची चाकरी व्हावी. मग माझा सुखाने प्राण जाईल.'' ताराईची पदर पसरुन मागितलेली मागणी ऐकून श्रीकृष्णगुरु सद्गतीत झाले. त्यांच्या डोळ्यात आसवे आली व ताराईस म्हणाले, ''हे तू काय मागणे मागितलीस? लोकांची कोडी सोडवीताना मलाच हे कोडे पडले आहे'' अखेर भरल्या डोळ्यांनी श्रीकृष्णगुरुंनी ताराईची मागणी मान्य करुन तिला ''तथास्तु'' म्हटले. ताराईचा अंतकाळ जवळ आला होता. श्रीकृष्णगुरु नेहमी

प्रमाणे फिरायला गेले होते. याच समयाला नेमका घात झाला. ताराई मरण पावली. श्रीकृष्णगुरु त्या वेळी राशिवडेकरांच्या घरी होते. त्यांना ही ताराईच्या मरणाची दु:खद वार्ता कळली. तेथून दु:खी श्रीकृष्णगुरुंना चालता येईना. भक्तांनी / सेवकांनी श्रीकृष्णगुरुंना धरुन आणले. वैराग्य मठीत ताराईच्या सदनी येताच ते म्हणाले ''कुठे गेली माझी माता?'' सर्व भक्तजन / सेवक स्तब्ध राहिले. हळूवार त्यांनी श्रीकृष्णगुरुंना ताराईचा मृतदेह दाखविला. ताराईचा मृतदेह बघून श्रीकृष्णगुरुंचे भान उडाले. ताराईच्या गळ्यात मान टाकून रडू लागले. म्हणू लागले, ''तू पुढे जाणार / मरणार हे मला तू कां सांगितले नाहीस? आई शिवाय मी आता कसा राहू? आता मला जवळ बसवून, आई म्हणून कोण जेवू / न्हाऊ घालेल? आता पुढे माझाही प्राण लवकरच जाईल. लौकरच, आई तुझ्याजवळ येईन'' जो सर्वांचे अश्रू पुसून टाकी तेच श्रीकृष्णगुरु दु:ख सागरात बुडून गेले. मग हलकल्लोळ माजला. कांही वेळ गेला.

दु:खाचा ओसर कमी झाला. श्रीकृष्णगुरुंच्या आदेशाने ताराईचा मृतदेह खांबाला टेकून बसविला. श्रीकृष्णगुरुंनी ताराईला कुंकू लावला, ताराईची आरती करुन ताराईच्या प्रेतासमोर / मृत देहासमोर साखरेचा खडा धरला. प्रेताने / मृतदेहाने साखरेचा खडा स्वहस्ते मुखात घातला / खाल्ला. ज्यांनी हा प्रकार पाहिला त्या सर्व भक्त जनाना प्रेतात जीव भरला / आला असे वाटले. सर्वजण विस्मीत झाले. त्यांना वाटले ताराईचा मरणकाळ चुकला. परंतु मरण काळ कधीच चुकत नाही. श्रीकृष्णगुरुंच्या कृपेने ताराईच्या देहात चेतना / जीव आला. श्रीकृष्णगुरु मुर्ती ताराईने डोळे भरुन पाहिली. दृष्टादृष्ट पुन्हा नाही झाली. श्रीगुरु म्हणती ''आई गेली.'' पुढे ताराईची अंतयात्रा निघाली. अंतयात्रे सोबत श्रीकृष्णगुरु चालत होते. ताराईचा मुलगा दत्तोबाला अधून मधून धीर देत होते. अंतयात्रा पंचगंगा घाटावर आली. श्रीकृष्णगुरुंनी जागा शोधली, आपल्या उपरण्याने ती जागा झाडली व भक्तांना म्हणाले, ''इथे ठेवा मम आईला'' यथायोग्य ताराईच्या मृतदेहावर आग्निसंस्कार झाला. भक्तगण, जनसमुदाय माघारी फिरला. दिन विपरीत वाटला. पुढे श्रीकृष्णगुरु ताराईच्या मरणाने / निधनाने खिन्न झाले. दु:खी झाले. स्मशानात दीप / दिवा ठेवा म्हणत. आठवणी सरशी पंचगंगेच्या काठी स्मशानात जात व दीप /दिवा टक लावून पहात. त्यांचे डोळे अश्रुनी भरुन जात. श्रीकृष्णगुरु ताराईस आई म्हणीत. अगाध तिची पुण्याई.

*****

# महाराजांचे शुकमुनी
## ।।श्री वेणी माधव।।

सातारा जिल्ह्यातील वेणे ह्या गांवी एक द्विज दांपत्य रहात होते. त्यांना मूले बाळे झाली तरी ती जगत नव्हती, हा आपला दैव दोष आहे म्हणून त्या उभयतांनी कुल स्वामी श्री ज्योतिर्लिंगाला प्रार्थना केली. नवस ही बोलला की, ''देवा आता जी आम्हाला मूलं होतील ती दीर्घायुषी होऊ देत त्यातील पहिले मूल जे होईल ते मी तुझ्या चरणावर वाहिन पण देवा हा आमचा दैव दोष तुझ्या कृपेने दूर होऊदे!'' भोळा दक्षिण केदारनाथ हाके सरशी त्या द्विज दांपत्यांना पावला. त्यांना एक सुलक्षणी पुत्र झाला त्याचे नांव माधव ठेवण्यात आले.

आई वडीलांचे अनुपमैय वात्सल्य ! त्या वात्सल्याच्या पायी त्यांनी बोललेला केदारनाथचा नवस पुढे पुढे ढकलत नेला. लोभस बाळ माधवाला वय वर्ष आठवे लागले. तेंव्हा त्याच्या पित्याला अचानक तापाने सताऊन सोडले ह्या देह तापाचे कारण आपण न फेडलेला कुलस्वामी ज्योतिर्लिंगाचा नवसच आहे हे त्याने ओळखले '' देह ताप माझा दूर होऊ दे, मी तुझ्या नवस पूर्तिला विना विलंब येतो.'' अशी परत केदारनाथाला प्रार्थना केली. त्या प्रार्थने सरशी त्याचा देहताप दूर झाला व मग माधवासह ते द्विज दांपत्य वाडी रत्नागिरीला येऊन दाखल झाले.

कुलदैवताची त्यांनी प्रथम माफी मागितली. बाल माधवाचे व्रतबंध कार्य तेथेच त्यांनी उरकले. हा लोभस सद्गुणी पुत्र आता देवाला वहायचा. त्याच्या वियोगाने ह्या माय पित्यांचे अंत:करण तिळ तिळ तुटत होते. एकीकडे ही वत्सल ममता तर दुसरीकडे त्यांची नवस पूर्तता ! ह्या दोन्ही विचारात त्या माय पित्यांची कांही दिवस पूर्ण निद्रा उडाली आणि एके दिवशी वज्रासारखे मन घट्ट करुन ते उभयता माधवाला घेऊन मंदिरात केदारनाथा समोर येऊन ते प्रार्थित झाले. ''देवा तू आमुचा कुलस्वामी! माझ्या कुळाला लागलेला दोष, आम्ही केलेल्या नवसाला त्वरीत उभा राहून तू दूर केलास. तुझ्या कृपेने माझा उध्दार झाला. हाके सरशी मला तू सद्गुणी पुत्र दिलास! नवस फेडण्यासाठी माझ्या कडूनच दिरंगाई झाली ह्या बद्दल देवा आम्हांला तू क्षमा कर! आज तुझा हा गुणी बाळ तुझा तुलाच अर्पण करीत आहे! त्याचा सांभाळ तूच कर! येतो आम्ही, आम्हाला क्षमा कर आमच्या वर दया कर!'' अशी करुणा केदारनाथाला भाकून वात्सल्य प्रेमाला आवर घालीत ते उभय माता पिता माधवाला तेथेच सोडून आपल्या वेणे गांवी निघून गेली.

ह्या घटनेचा अष्टवर्षीच्या गुणी बाळ माधवावर खोल परिणाम झाला त्याला जाणकार बुध्दिप्राप्त होत चालली होती. सुख दु:खाचे जीवना अंती येणारे नैराश्य बालपणीच गुणी माधवाने ओळखले. ''जगी ह्या कोण कुणाचे नाही! हा माया मोहाच्या जंजाळातील सामान्य सिध्दांत वेळीच त्याने ओळखला. परमेश्वराची आसिम कृपा हेच मनुष्याच्या जीवनाचे यथार्थ ध्येय होय! मानवी जीवनाचे साफल्य सृष्टीनियत्वाच्या प्रत्यक्ष दर्शनातच आहे तो परमेश्वर

सद्गुरुप असतो. आपला कुलस्वामी श्री केदारनाथाजवळ ते सर्व ऐश्वर्य आहे अशी त्याची श्रध्दा बाल वयातूनच वाढीस लागली.'' मायपित्यांच्या सेवेचे भाग्य लाभले नाही. तरी, चिलया श्रावण बाळा परी ह्या बाळ माधवांचे सामंजस्य होते. बाळध्रुव प्रल्हादाप्रमाणे त्याची अनंत कोटी ब्रह्मांडविनायकांच्या चरणाचा शोध वेध घेत निघाली होती.

''भिक्षांदेही'' म्हणून माधुकरी मागावी केदारनाथाच्या मंदिरी शयन करावे यातच अध्यायना शिवाय माधवला ज्योतिष शास्त्राची आवड लागली. पंचांग उघडून बसला की येणारे भाविक त्याला ज्योतिष विचारु लागले. परमेश्वराच्या कृपेमुळे त्याचे भविष्य तंतोतंत खरे ठरु लागले. त्यामुळे त्याची ख्याती उत्तरोत्तर वाढतच जाऊ लागली. त्यांचे कानी केदार नावाचे शब्द पडू लागले आणि थोड्या कालावधीतच केदारनाथाचा माधवाला आदेश झाला ''अरे माधवा! जा कोल्हापूरला! तुझा सद्गुरु तुझी वाट पाहत आहे. जा जा आता इथं कशाला राहतोस?'' ती कुलदैवतेची आज्ञा मान्य करणे भागच होते. ह्यावेळी माधवांनी ऐन तरुणात पदार्पण केले होते. त्यांनी कोल्हापूरचा मार्ग धरला.

शुक्रवार धर्मशाळे जवळील श्री हनुमान मंदिरा जवळ श्री कृष्ण सरस्वती महाराज दळवी, लाड, रामदास आदी कांही भक्ता समवेत उभे होते. त्यावेळी द्रविड प्रांताचा (मद्रासी) ब्राम्हण पंचगंगेचे स्नान करुन श्री महालक्ष्मीच्या दर्शनास निघाला होता. वेदपारंगात तो ब्राम्हण मूळ दत्त भक्तच होता. त्या द्विजाने महाराजांची दिव्य मूर्ती, अलौकीक तेज पाहून एका व्यक्तिस हळूच खुणेने विचारले ''हे कोण'' तो मनुष्य म्हणाला ''आमच्या कोल्हापूरचे हे दत्तावतारी श्रीकृष्ण सरस्वती महाराज आहेत'' त्या द्विजाने मनी विचार केला आपण परत जाऊन आणखी एकदा पंचगंगेचे स्नान करु, परंतु ह्या दिव्य विभूतीचे प्रथम दर्शन घेऊ! असे म्हणत त्याने महाराजांचे चरणी येऊन नतमस्तक झाला महाराज त्याला त्याच्या द्रविड भाषेत म्हणाले ''काय भटजी बुवा? परत जाऊन कशाला स्नान केले पाहिजे तुमचे सोवळे कांही बिघडले नाही!'' स्वत:च्या माय बोलीतील त्या द्विजाने हे महाराजांचे शब्द ऐकून होताच त्या शिवाय ''इंदुकोळी तेजकिरण'' हे दत्तात्रेयांचे संस्कृतमधील करुणाष्टक म्हणत असतांना महाराजांच्या चरण दर्शनाच्या विचारात पुढील स्त्रोत्र म्हणण्याचे विसरुन गेला. त्या स्त्रोत्राची पण आठवण महाराजांनी पुढील चरण म्हणून त्याला करुन दिली. त्याप्रमाणे ते स्त्रोत्र त्याने म्हणून पूर्ण केले. परंतु ह्या महाराजांच्या अलौकीक अंतर्साक्षी सामर्थ्याने त्याची मती अधिकच गुंग होऊन गेली इथेच माझे पठण पूर्ण झाले. म्हणून महाराजांच्या भक्ति प्रेमाच्या लहरी अधिकाधीक त्याच्या अंतरात उसळून गेल्या!

ही घटना पहाणाऱ्या अनेक जणांच्या समुहात वेणी माधव हे एक होते. ''कुलस्वामी केदारनाथाने सांगितलेला सद्गुरु हा तर नसेल ना?'' ह्या विचारात माधव असतानाच ''काय भटजी बुवा? तुम्ही आणि कुठे सद्गुरु पहाता जी? खूण कळली नाही काय तुमच्या केदारनाथाची?'' ह्या वचनाने वेणी माधवाच्याकडे महाराजांनी टाकलेला तो पहिलाच कृपा कटाक्ष! वेणी माधवांच्या ऐहीक व पारमार्थिक उन्नतीला हा प्रसंग कारणीभूत ठरला. विनम्रपणे वेणी माधवांनी

येऊन श्री गुरुंना प्रणिपात केला. महाराजांनी त्यांना उठवून हृदयाशी धरले, माय पित्यांच्या प्रेमाला पोरका झालेल्या माधवांना आईचे वात्सल्य व पित्याची माया महाराजांनी त्यांना मारलेल्या मिठीत प्रथमच अनुभवण्यास मिळाली. माधवांच्या मनाला वाटणारा एकाकीपणा कुठल्या कुठे दूर पळाला. एक मोठा आधार भवार्णवीचे तारु श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज स्वत:ला मिळाल्या बद्दल माधवाना विशेष धन्यता वाटू लागली. महाराज त्यांना ''वेण्या'' अशा लडीवाळपणानेच नेहमी संबोधित असत. वेणी माधवांनी प्रथम श्री महालक्ष्मीचे मंदिरात वस्ती केली. प्रभाती पंचगंगेचे स्नान, दुपारची माधुकरी झाली तर संपूर्ण दिवस माधव महाराजांच्या मिळेल त्या सेवा कार्यात रममाण झालेले असत.

वेणी माधवांच्यावर श्रीकृष्ण सरस्वती महाराजांचे विशेष प्रेम होते. केदारनाथाचे तर त्यांच्यावर कुलदैवत म्हणून प्रेम होते. महाराज एकदा वेणी माधवांना म्हणाले ''अरे वेणी! जा डोंगरावर तुला तुझा कुलस्वामी जोतिबा बोलवितो आहे'' जोतिबाला गेल्यावर माधवाला जोतिबा म्हणाला ''अरे तुला तुझा सद्‌गुरु बोलवीत आहे. जा त्याच्याकडे कोल्हापूरला !'' ह्या येरझारी मुळे वेणी माधव मनो-मनी वैतागलेले, श्री गुरु आणि जोतिबा ह्यांनी मांडलेल्या या खेळातून आपण दूर कोठेतरी जाऊया म्हणून त्यांनी आई म्हसाई महिषासूर मर्दिनीकडे निवांत निवाऱ्यासाठी धाव घेतली.

विशाल सह्याद्री पर्वतातील घनघोर अरण्यांनी वेष्ठीलेली म्हसाईची ती सात पठारे, ह्या पठारावर महिषासूराला जगदंबेने ठार मारला. महिषासूराला मारले म्हणून तिला ''म्हसाई'' म्हणतात. ह्या विषयी सप्तशती व देवी पुराण प्रसिध्दच आहे. रेड्याचे खुर व महिषासूराची लांब लचक पद चिन्हे ठिक ठिकाणी येथील दगडात उमटलेली अजून ही दिसतात. एक म्हसाईचे मंदिरा व्यतिरीक्त येथे दुसरी कोणतीही वास्तू नाही. ह्या मंदिराच्या बरोबर मागे चार-पांच फुटाला लागून खोल ३५० फूटांचा कडा आहे. खाली दळवीवाडी म्हणून एक छोटेसे गांव आहे. कोल्हापूर घुंगर ही एस.टी.बस वहातूक सध्या तेथून चालू असते.

ह्या भागात पूर्वी दाट अरण्य व्याघ्रवरदी हिंस्त्रश्वापदांनी परिपूर्ण होता. निर्मनुष्य वस्तीच्या ह्या आरोग्य वेष्ठीत पठारावर वेणी माधव जगदंबेच्या मंदिरात येऊन राहिले. श्रीकृष्ण सरस्वती महाराज व श्री जोतिबा ह्या दोघांच्या वर एक प्रकारे रुसवा धरुन जगदंबेच्या कुशीत माधवांनी ठाण मांडला होता. ना जवळ गादी ना बिछाना, ना जवळ पोटा पाण्याची सामुग्री येथे येऊन माधव उघड्यावर निवांत झोपी गेले. तरी ते महिषासूरमर्दिनीच्या कृपा छायेत होते.

प्रातःकाली उठून पहातात तो त्यांना त्यांच्या उशाजवळ डाळ, तांदूळ, गुळ पिठादि वस्तू दिसल्या. विसरुन जाण्या जोगे येथे कोणीही आले नसतांना ही शिधा सामुग्री कशी काय? हा जगदंबेचाच त्यांनी प्रसाद मानला. स्नान, संध्या, पूजाविधी आटपून त्यांनी त्या अन्नाचे ओदण करुन नैवेद्य जगदंबेच्या पुढ्यात ठेवला. तेथूनच त्यांनी श्री गुरु व केदारनाथांना दाखवला व मग पंचारती म्हणन तो नैवेद्य प्रसाद भक्षण केला! असा पहिलादिवस गेला. दुसऱ्या तिसऱ्या चौथ्या

दिवशी आणि असेच पुढे आठ दिवस गेले. रोजच्या रोज सकाळी उठून पाहिले तर त्यांच्याजवळ तशीच अन्न सामुग्री असावयाची ! अन्न सामुग्री मिळाली तरी जंगलात जाऊन लाकूड, काट्या कुट्या जमवून ते शिजवण्याचा फारच त्रास माधवाना होत असे. अशा त्रासात वेणी माधवांनी जगदंबेच्या पुढ्यातच मग शब्द पुटपुटले, ''रोजच्या रोज अशी शिधासामुग्री कशाला कोण देत असते? तयार जेवण दिले तर काय कुठे बिघडणार आहे? की काय विशेष सायास पडणार आहे ते घ्यायला?''ह्या उद्‌गारलेल्या वाक्याबरोबर त्यांची मनिषा पण पूर्ण झाली! लगेच दुसऱ्या दिवशी शिधा सामुग्री ऐवजी तयार जेवणाचे पान! पुरी बासुंदी, खिर, लाडू, जिलेबी रोज हरतऱ्हेचे मिष्ठान्न पक्वान्नाचे भोजन तयार ठेवलेले असावयाचे वेणी माधव पण आरती गाऊन नैवेद्य दाखवून झाल्यानंतर तो जगदंबेचा प्रसाद मोठ्या श्रध्देने सेवन करु लागले!

अशा मिष्ठ भोजनाच्या मेजवानीत आणली कांही दिवस गेले, मग त्यांना तेथेच जगदंबेच्या सानिध्य निजबोध झाला. अशा निर्मनुष्य अरण्यात रोजच्या रोज मला ही त्रिपुर सुंदरी जगमाय मिष्ठ भोजन जेऊ खाऊ घालते, ह्याचे कारण काय? काय एवढी माझ्याकडे योग्यता आहे म्हणून ह्या जगदंबनेने त्रिभुवनाचा व्याप सांभाळत एकाकी पडलेल्या निर्मनुष्य वनात तिने माझ्या जेवणा खाण्याचे लाड विशेष प्रमाणात करावेत? काय एवढी माझ्यात विशेष योग्यता आहे. याचे उत्तर

**''या देवी सर्वभुतेषु बुध्दीरुपेण संस्थिता ।**
**नमस्तस्ये । नमस्तस्ये । नमस्तस्ये नमो नमः''**

अशी तिची थोरवी आहे. त्याच जगनमाय त्रिपुर सुंदरीने वेणी माधवाच्या बुध्दीना पटवून दिले की ''श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज साक्षात परब्रम्ह ! अनुसयात्रि संभूत दत्तात्रेय'' हे या कलियुगाचे समयपुरुष आहेत. त्यांच्या सेवेचा शिष्यत्वाचा दुर्लभ महालाभ आपल्याला महत भाग्याने झाला आहे. म्हणून आपले लाड या जगदंबेने केले आहे. ह्या विचारात त्याचे नयन काठोकाठ भरले.! जगदंबेच्या पुढ्यात श्री गुरुंच्या प्रेमाची अश्रुगंगा भडभडून वाहू लागली.! त्या अश्रुगंगेच्या पुरात जगदंबेला शेवटचा एक साष्टांग प्रणिपात केला व विनम्रपणे त्यांच्या मुखात शब्द उमटले. ''आई ! आजपर्यंत ह्या जंगलात सांभाळलेस! मनात इच्छा होईल तो पदार्थ तू मला जेवू खाऊ घातलीस ! आता मी जातो गुरुमाऊलीच्या सेवेला ! तूच मला शक्ती सामर्थ्य दे!'' जगदंबेला निरोप देत माधवाने ते म्हसाई पठार सोडले. स्थळ काळाचा मनात विचार नाही. परत त्याच घनघोर अरण्यात त्याने महाराजांचे चिंतन मनन करत कोल्हापूर गाठले.

माधव म्हसाईला गेले व सुखरुप आले. सह्याद्री पर्वतातील त्या घनघोर व्याघ्र, वराहादी श्वापदाने विंचू इंगळ्या व हजारो प्रकारच्या सर्व नागाने भरलेल्या त्या अरण्यातून जाताना वा येताना ह्या वेळी माधवांच्या वाटेला एकसुध्दा किरडू फिरकले नाही. हा श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या प्रेमाचा आणि भक्तीचिंतनाचा प्रभाव आहे. वेणी माधवाच्या मनाला महाराजांच्या दर्शनाच्या ध्यास लागला होता. महाराजांच्या चिंतन मननांत निघालेल्या माधवाची भिती, वाघ, डुकरांना वाटत होती. हे मुक्ति नंतर महाराजांनीच इतर भक्तांना सांगितले. जेव्हा माधवाने वैराग्य

मठीत पाऊल ठेवले तेव्हा महाराज घाई गडबडीत इतर भक्तांना माधवाविषयी उद्गारले ''पकडा ! पकडा ! ह्या सावजाला आधी पकडा आणि बांधून ठेवा!''

**व्याघ्रादिकासी पळवी । वनी जिव्हेचे भोग अनुभवी ।**
**तोचि येथे आला गोसावी । ब्रम्हरसचनी दाऊ यासी ।**

नमस्कार करीत असलेल्या वेणी माधवांना महाराजांनी मग आपल्या हाती धरून उठवले.

त्यांना दृढ मिठी मारून आत एकांती नेले. कानात महाराजांनी मंत्रदीक्षा दिली. दीक्षा मिळाली. त्याच क्षणाला माधवांच्या जीवनांचे सार्थक झाले. ''महाराज! तुमच्या चरणाजवळ मला ठेवा!'' हे कळकळीची विनंती माधवानी महाराजांना करता त्या विनम्र भावाचा मंदस्मितपणे स्वीकार केला. वेणी माधव कधी महाराजांच्या जवळ तर कधी जोतिबाच्या डोंगरावर असत. असेच ते एकदा जोतिबाला असताना महाराजांच्याकडे एक परगांवचे जोडपे पुत्रअभिलाषाने दर्शनासाठी आले व त्यानी त्यांना पुत्रप्राप्ती विषयी गाऱ्हाणे घातले. यापुर्वी कुंभार गल्लीतील महाराज त्यांना म्हणाले होते,''तुमच्या नशिबी संतान नाही!'' सर्व समर्थ ज्ञानी परमात्म्याच्या मुखातून निघालेल्या त्या शब्दाने ते जोडपे निराश, मनाने प्रारब्धाला दोष देत महाराजाला परत साष्टांग दंडवत घालून बाहेर पडले. कुलदैवत ज्योतिर्लिंग केदारनाथाला मग ते जोडपे डोंगरावर आले. यथासांग देव दर्शन पूजा झाल्यावर त्यांनी ज्योतिष विशारद या वेणी माधवांचा लौकिक ऐकून भेट घेतली. पुत्र प्राप्तीची मनिषा त्यांनी वेणी माधवांना सांगितली. स्थिर केलेली पंचागावरची नजर काढून पोथी पंचाग गुंडाळत माधव त्यांना म्हणाले '' चला आपण कोल्हापूरला जाऊया. माझे गुरु परम दयाळू आहेत. तुम्हांला जरूर पुत्ररत्न देतील''.

ते तिघेजण कोल्हापूरला वैराग्य मठीत श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या दर्शनास आले. दर्शन घेऊन वेणी माधव श्रीगुरुंना म्हणाले ''महाराज!'' ह्यांना मूल बाळ नाही. तुम्ही त्यांना एक पुत्र रत्न द्या ना!'' माधवांनी! लाडक्या शिष्याने केलेली ती मागणी अमान्य महाराज तरी कसे करतील? ''भक्ताधीन व भक्ताभिमानी'' ही ब्रिदावळी महाराजांची होती. लगेच महाराजांनी एक श्रीफळ एका भक्ताकडे मागून घेऊन त्या जोडप्यांना देत म्हणाले ''त्याने (वेणी माधवाने) दिले ते आम्ही दिले! त्या सत्त्य केले पाहिजे.'' श्रीफळाचा प्रसाद त्या पत्नीने ओट्यात घेतला. हर्षीभरीत झालेल्या मनाने श्रध्दायुक्त अंत:करणाने महाराजांच्या चरणावर परत साष्टांग नमस्कार घातला! महाराजांचा व वेणी माधवांचा निरोप घेऊन ते जोडपे प्रफुल्लीत होऊन स्वग्रामी निघून गेले. दुसऱ्या वर्षी त्यांना सुलक्षणीय पुत्र रत्नाचा लाभ झाला. जीवन नैराश्य वाटपास आलेले हे वेणी माधव परिपूर्ण विरक्त बाळ ब्रम्हचारी व महाराजांनी गौरविलेले शुकमुनी होते.''शुकमुनी'' महाराजांनी गौरविले तरी नियतीचा त्यावर विश्वास बसावयाला नको का? म्हणून त्यांची कसोटी झाली मग त्यांच्यावर काम विचाराचं वावटळ सोडण्यात आलं! त्यातून ते श्री गुरुकृपेने सहीसलामत सुटले हे त्यांचे गुपित महाराजांच्या समाधी काला नंतर गुरुबंधू श्री व्यासांच्या जवळ पंचगंगेवर गुरुच्या आठवणी सांगतांना कथीले.

व्यास माधवांना म्हणाले ज्या काम विकाराने ब्रम्हदेव अडला हरिहरांची फजिती उडवली, पराशर वसिष्ट विश्वामित्राची तपः निष्ठांना ह्या कामाचे चटके सोसवले नाही. त्या विकारात जर तू काय विपरीत केला असल्यास वावगे ते काय असणार? वृंदेसाठी स्मशानवासी ! वैकुंठनाथ हे का नेणसी आणू नको लाज मानसी । सांग आम्हासी गुरुलीला ।। मग वेणी माधवांनी आपली दिव्य अशी श्रीकृष्णसरस्वतीलीला सांगण्यास सुरुवात केली! माझे मन नेहमी महाराजांच्या विषयातच दंग असे. डोंगरावर असतांना अशा विषयात नको तो विषय डोकावला. संसार सुखाची ओढ मला लागी तेंव्हा मनोमनीच मी महाराजांना म्हणालो. ''महाराज आयुष्यभर मी कडकडीत ब्रम्हचर्य पाळतच आलो आज विषय सुखाची तळमळ मनाला का लागली? बारावा शनी आला की पराक्रमी मंगळ आपला प्रताप दाखवतो आहे राहू केतूचा माझ्या दैवाचा विचित्र खेळ चालू झाला आहे. शुभस्थानीचा दयाळ माझी अशी आबाळ का करतो आहे.'' अशा विचारांच्या भिरमिटीत कुल दैवत श्री ज्योतिर्लिंगाकडे धाव घेतली.

दरबारात येऊन माधवांनी श्री केदारनाथाला प्रार्थीत म्हटले ''जय ज्योतिर्लिंगा मदन दहना गिरीजा कांता ! छान केलेस तू ! नसती ही चिंता माझ्या मागे लावून चित्त चाळवलास ! तुझे चित्त चळले, लागलास तू भिल्लीणी पाठीमागे वेडा झालास त्या मोहिनीसाठी! पण तुम्ही पडला महादेव ! थोरामोठ्यांच्या ह्या तुमच्या गोष्टी थोर मोठ्या कीर्तीमानच! त्यामुळे कधी तुमची अपकीर्ती झाली आहे की काय? पण मी पडलो पामर, मानव! आता माझं मन हे भकत निघालय, त्याला आता मी काय करु? दिली असतीस मला एकादी सुंदर गृहिणी? पहिल्यांदाच विवाहबंधनी पडलो असतो तर माझ्या किर्तीची अशीच झाली का असती हानी ! आता ह्याला मी काय करु? ''

**संन्यासी ही मुंडूनी मूंडा । त्यांचा ही हीन सरे गडबड गुंडा ।**
**जिंकू न शकले या काम गुंडा । स्वपदी धोंडा मारिती ।।**
**जन्मापासून आरण्यवासी । निजकर्मी निरत तपोराशी ।**
**ऐशासही कामवासना विवशी । क्षणात ग्रासी अनुभवहा ।।**
**राख माखिली वाढविल्या जठा । हाती सर्वदा सोटा लोटा ।**
**रुद्राक्ष माळा चिलीम चिमटा । अबला चिमटा काढीतीपरी ।।**

असा हा काम ! देवा तू निर्माणच मुळी कां केलास ! देवदेवांनाही ज्याने जुमानले नाही. मग माझ्या सारख्याची राखरांगोळी जर त्याने केली तर त्यात नवल ते काय? ह्याच्या तावडीतून आता मला माझ्या सदगुरुंच्या शिवाय दुसरे सोडवणार तरी कोण? असे म्हणून मग दक्षिण केदारनाथांचा निरोप घेऊन करवीरच्या मार्गास माधव लागले. गुरुच्या समर्थ शक्तीचा प्रसाद, कामविकारात होणारे शिलभ्रष्ट आणि त्यातच डोळ्यापुढे शुकमूनीचा आदर्श ! ह्या विचारात पदक्रमणा महाराजांच्या कडे माधवांची चालली होती.

**विधी निळकंठ मुनीमंडळ । स्ववरा त्या करी न लागता काळ ।**
**त्रिलोकी घालिती धुमाकूळ । तो काम समुळ दवडी गुरु ।।**
**स्वये गुरुदेव ममपूर्ण काम । नारी तर तेथे अवघे सम ।**
**मार सुंदर रुप मनी विश्राम । आम्हांस सुगम झाला ।।**
**भूत प्रेत पिशाच्यवाया । हरवले जेणे महासमंधा ।**
**ती काय माझीया कामक्रोधा । सहज अवरोध न करील ।**

अशा श्रध्देत पदक्रमणा करीत असता पावला, पावला पुढे महाराज वेणी माधवांना दिसू लागले. त्यांच्या पुढे माधवांचे ममत्व कुठल्याकुठे लयास गेले; आणि अशा अवस्थेत त्याच्या कानात शब्द आले ''काय रे? पाहिजे तुला स्त्री सुख?'' हे शब्द उच्चारणारी व्यक्ती मात्र जवळ कोणी नव्हती ! लागलीच ह्या मागील सुत्रधार माधवांनी ओळखले.

**स्पर्शेची कामिनी काम। गोकुळीचा कान्हा पुरुषोत्तम ।**
**क्षण न लागता पावयी शल्य। कृष्ण गुरु तो भवतारक ।।**

आणि मग ह्या भवतारक श्रीकृष्ण गुरुंचे वैराग्य मठीत येऊन साष्टांग दंडवत घालता महाराज माधवांना म्हणाले ''काय वेणी? झाले का नाही मनातले वादळ शांत?'' माधव म्हणाले ''देवा तुम्ही मार्गातच मला शांत केले, आता दृढ विश्वासाच मानसिक शारिरीक बळ मला द्या?'' महाराज म्हणाले, ''असे ते बळ तुझ्या जवळ आहेच, म्हणून तर इथंवर तू टिकलास शुक मुनीप्रमाणे तुही धन्य झालास! जा, जा, आता ती येणार नाही! जा, जा'' महाराजांच्या सर्व भक्त वर्गात ''वेणी माधवांचे चित्त चळले. आता तो पूर्वीसारखा राहिला नाही असे वारे त्यावेळी एका लबाड भक्ताने उठवले व त्याने गुरुबंधू नामदेव महाराज चव्हाण यांना सांगितले.''

**कराया अवगूण कारण नाश । झाडाया शिष्य मनोमन दोष ।**
**श्रीगुरु योजिती उपाय निरंकुश । शरणांगतास रक्षीतो ।।**
**कोणाचा क्रोध कोणाचा काम । अशा इच्छा वासना संभ्रम ।**
**परस्पर करवू नी शिष्य संभ्रम । उपदेशे शम पावविती ।**

वेणी माधवांनी कांही तरी विपरीत केले आहे हा संभ्रम नामदेवांच्या मनात घर करुन राहिला. ह्याचा छडा लावण्यासाठी ते जोतिबाच्या डोंगरावर वेणी माधवांच्याकडे आले. नामदेव व माधव ह्या दोन्ही गुरु बंधूची एकमेकांवर अपरंपार जिव्हाळ्याची प्रिती ! कोल्हापूरात पुष्कळ वेळा वेणी माधवांची वस्ती नामदेवांच्या घरी असे. ''वेणी माधव बिघडला आहे'' म्हणून जेंव्हा नामदेव त्यांच्याकडे निघाले तेंव्हा दोन वेगवेगळ्या प्रकारचे विचार मंथन नामदेवांच्या मनी चालू होते.

१) वेणी माधव ''बिघडला'' आहे तो आडरानी गेला आहे. ह्यावर नामदेवांचा विश्वासच बसेना ! माधवचा पाठीराखा श्री गुरुनाथ आहेत. आजन्म कडकडीत ब्रम्हचर्य पाळून श्री गुरुंची प्राणपणाने सेवा केली. काम विकारात त्याची नाचक्की महाराज होऊच कशी देतील? आली

असेल एखादी सुंदर ललना आपला कांहीतरी प्रश्न विचारायला ! झाले असेल देह स्वभावाने मन विचलीत म्हणजे कांही त्यांच्या आचरणाला लांच्छन थोडेच बसणार आहे? देहा अचरणाने माधव घसरला असेल तरच दोष त्याला लागेल त्याची निंदा गौरव तेच माझी निंदा गौरव ! आपण त्याचे नांव राखू. त्याचे नांव मी तरी काय राखणारा? श्री गुरुच आमची नांवे सांभाळणार ! एरव्ही मी काष्ठाचा पुतळा ! सूत्र चालक श्री गुरु आमची जन समाजात कशी अवकाळा करु देतील? आमच्या आमच्यातील बंधुभाव दृढ करुन नको असलेल्याचा त्याग श्री गुरुच करीत आहेत त्यांचेच प्रेरणेने ''मी'' माधवाकडे निघालो आहे.

२) ''मी'' कांही ब्राम्हण नव्हे पण ह्या दशग्रंथी ब्राम्हणास चांगलाच उपदेश करुन ताळ्यावर आणीन. त्यांच्यापेक्षा मी उभा जन्म पवित्रपणे निष्कलंक काढलेला ! ह्या वाजवी प्रतिष्ठेचा ताठा नामदेवांच्या मनात भरला. कुठे ते विचार करु लागले की, प्रपंचातला माझा कमलपत्रा परी स्त्री संबंध मत्सर, दुर्बुध्दी, अहंतादीक मी बाजुला ठेवलेले कौतुक माधवाला दावीन ! हरी मायेची विपरीत ही कामासक्ती पण त्यागिलेली असे माझे गुरु भक्तातील श्रेष्ठत्व सांगून ह्या चुकलेल्या गुरुदासांस मार्गावर आणण्याचा बोध करीन.

अशा दोन्ही प्रवृत्तीचे विचार नामदेवांच्या मनी घोळत होते. माधवांनी उर्मी जिरवून कामाचा घाव वर्मी न पडू दिला होता तरी बांधवांना उपदेश करण्यात नामदेवांना धन्यता वाटत होती. डोंगरावर प्रथम नामदेव जोतिबाच्या दर्शनास आले. विनम्रपणे हात जोडून स्तुती सुमनांचा वर्षाव करीत म्हणाले, ''जय श्री केदारनाथा तुझे आज परमदर्शन झाले! परी देवा तू इथे एकलाच असा उभा का? कुठे सोडलीस ती माय अंबिका ! का तिच्यावर तू रुसलास? का ती गेली माहेरी निघून! तिच्याशिवाय तुला धीर कसा काय बरे निघतो? तिच्याबरोबर सारीपाठ परत तू खेळू नकोस ! आयुधासह तिच्याबरोबर तू हरशील ! मदन दहना कोपाविष्ठ होशील, परत ती भिल्लीण रुपात येईल. इथून तुला नेण्याची परत ती खटपट करीत ! पण देवा तुला सांगून ठेवतो की, तू कांही केल्या इथून कुठे जाऊ नकोस. असो, नाथा ! मित्राच्या प्रेमाने आजवर येथे येणे झाले. तो माधव तुझाच पुत्र श्री गुरुंचा परम शिष्य सेवक असतांना तो कामविकारआसक्त का झाला? का त्याचे तू रक्षण केले नाहीस? त्याची ही काम मदेची आपदा, हे दक्षिण केदारी! तुझ्या कृपादृष्टीने तूच दूर कर'' अशी करुणा भाकीत परत एकवार नमस्कार करुन नामदेव वेणी माधवांच्या घरी प्रवेशीले.

अलिंगनानेच माधवांनी नामदेवांचे आदरपूर्वक स्वागत केले. दोन श्रीकृष्ण सरस्वतीचे प्रियोत्तम शिष्यसेवक एकत्रीत आले. एक होते अभिमान मदाने गर्विष्ठ तर एक होते काम विचारातून पूर्ण निवृत्त ! दोघांचा कळवळा करणारे श्री गुरु दोघांनाही सारखेच होते. गुरु-शुक्राचा संयोग भालचंद्राच्या शिखरी झाला होता व हा योग पण श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनीच घडवला होता ! नामदेवांना अलिंगन देत माधव म्हणाले,''आज माझा दिवाळी दसरा! अरे गुरुंच्या प्रियोत्तम देवा नामदेवा, तुझ्या रुपानेच मला श्री गुरुराया भेटावयास आला.''

**गुरुभक्त गुरु समचिमान्य । तुझ्या झाली दर्शन धन्य ।**
**हाराय माझे दुरीत दैन्य । गुरुंनी धाडूनी दीधले ।।**

असे म्हणत माधवांनी नामदेवांना सरबत करुन दिले. ''आज स्वत: पाक सिध्द करुन मी तुला मिष्ठ भोजन देतो.'' असे माधव म्हणतांना नामदेवांनी विषयाला हात घातला. ते म्हणाले, ''माधवा ! काय ऐकतो मी तुझ्या विषयी हे!'' असे म्हणता माधव नामदेवांना म्हणाले.

''अरे मनानं माझ्या गळ्याला लावला होता फास, विवेक शक्ती पावली होती ऱ्हास; असा जेंव्हा माझा माझ्या हाती होत होता नाश तेंव्हा धाऊन आला श्रीगुरुनाथ ! आणि वाचवले त्याने मला'' ह्या सर्व अनार्थातून ! बालपणी मी माता पित्यापासून पोरका झालो. ह्या रवळनाथाने मला सांभाळले, पुढे माझा उध्दार श्रीकृष्ण गुरुंनी केला.

**अध्यायना विण झालो गणक । होणारा सारीखे मम बोल सम्यव ।**
**कृष्ण गुरुनी केले कौतूक । येती लोक बहू पुसावया ।।**

''अध्ययनाविण जरी गणक झालो'' तरी पुढे महाराजांनी मला अध्ययनात गोडी लावली व मग कांही देव पठण ग्रंथाचे अध्ययन केले! जरी तू मला दशग्रंथी ब्राम्हण झालो म्हणालास सदाचारी, गुरुभक्तीत निपुण झाला म्हणालास तरी पहा क्षणात कसा होत बनलो! सुविचार उरला नाही. पातक पंकात लोळत राहिलो असतो निंदक म्हणून जगात ठरलो असतो. पण श्री गुरु सखा पाठीशी उभा होता. त्याने मला सावरले, मरणाहून निंद्य असे अपकीर्तिचे जिणे वाट्यास आले असते. विधी हरीहर, तपस्वी मुनी देहस्वभावाने जरी ते कामासक्त झाले तरी त्यांचा तो आदर्श मी डोळ्यापुढे ठेवावा हे उचित नव्हे. भगांकित झालेला तो इंद्र लांछनास्पद तो चंद्रादी पुराणातील हा आधार स्वार्थ काम विकारापायी घेणे योग्य नव्हे. ही सदगुरुचीच स्फूर्ती होती.

नामदेवा! अविचाराला न थारा देता गुरुची सेवा ध्याना व्यतिरिक्त एक घडी ही व्यर्थ घालवू नये. अष्टौप्रहर सद्गुरुंचा ध्यास लागला की मनाची सारी चंचलता सुटती, जनसहवासाला ते मन कंटाळले. मग त्याची चेष्टा कोण कशाला करेल? ही सर्व गुरुसेवेची लक्षणे नामदेवा तू आत्मसात केलेली दिसतात. मग माझ्यासारख्या पामराने तुला आणखी काय सांगावे! माझ्या मनाचे चंचलपण मोडून पापक्षालन करण्यासाठीचे तुझे आगमन हे मला श्री गुरुतुल्य दर्शनच आहे! दारुण, मोह ममता शमवून उत्कट भावाचा सत्संग होऊन गुरु चरणाचे प्रेमवर्धन होत जावे असे तुझे आज मला दर्शन झाले. ह्या भाष्यावर नामदेव मनोमनी वरमले. जो पहिलाच जागृत सावधान आपल्या अध्यात्म मार्गात आहे. त्याला आता मी आणखीन काय जागे करणार? त्या इसमाने माधवा विषयी एकाचे दोन करुन सांगितले ते मी पण खरे मानून मूर्खपणाने मन दूषित करुन घेतले. विवेकाने सावरलेले काम गुण माधव मन मोकळेपणाने मजशी बोलून गेला. मी मात्र मन कवडा ठरलो गेलो. असे नामदेव मनी विचार करीत असता पाकसिध्दी झाली. आरती नैवेद्य श्री गुरुनाथ व केदारनाथांना दाखवून भोजन उभयतांनी उरकले.

माधव नामदेवांना म्हणाले ''मार्ग चालून फार श्रमला असशील तेंव्हा आता ह्या शय्येवर

सुखाने विश्रांती निद्रा कर! म्हणून गादी अंथरली. मन निकोप झालेले नामदेवांचे तेच मन परत परम शंकेने भरले. काय मायेचा प्रभाव पहा ! क्षणापूर्वीचे विचार परत नामदेवांनी बदलले.''

**मद्यपी जैसा क्षणेसावध । श्रणात पुनश्च धुंद ।**
**अहंभावना उतरेना उन्माद । निजकर्म बंध सुटेना ।।**

''ह्या गादीवर माधव म्हणतो सुखाने विश्रांती निद्रा कर पण ही गादी शय्या त्या विकारात भ्रष्ट तर झाली आहे ना मग ह्या गादीवर कसली विश्रांती करावयाची; उगाचच ह्याच्या मी घरी आलो.'' अशी शंका नामदेवांच्या मनात आली, पण उघडपणे माधवाना ही कळू द्यावयाची नव्हती. म्हणून शेवटी या गादीवर नामदेव आडवे झाले. नामदेवाच्या मनातील ह्या विचारांची पुसट कल्पना धूर्तपणे माधवनी मनोमनी ओळखलीच! त्यांनी त्याच स्थितीत महाराजांना प्रार्थित म्हणाले ''माझ्या संशयी पातकाने तुमचा थोर भक्त कुतर्काने शंकित झाला. याचा समज आता देवा मी कसा काढू? हे गुरु माऊली! तुझे मी लेकरु तूच माझा सांभाळ कर!'' अश्रुपूर्ण नेत्रांनी माधवांनी महाराजांच्यावर मनोमनीच सर्व भार सोपवला.!

माधवांच्या गादीवर नामदेवांना थोडी झोप येताच महाराजांचे रम्य मन मोहक सुशांत दर्शन झाले! जागृतावस्थे प्रमाणे नामदेव माधवाला म्हणाले ''महाराज कुठे आहेत?'' माधव त्यांना म्हणाले ''अर्धवट निद्रामोहाने तुला ग्रासले आहे. तेंव्हा आता सुखाने झोप.'' परत नामदेव झोपी गेले. परत निद्रेत डोळ्यापुढे तेच महाराजांचे दर्शन हे नामदेवांनी सांगता माधव म्हणाले ''माझी शय्या गादी चांगली आहे. तू सुखाने निद्रा कर." जरी माधव असे बोलले तरी घडी भराने नामदेव जागेच होत, परत निद्रा कर, परत निद्रेत तेच महाराजांचे रम्य दर्शन! ह्यातच संपूर्ण रजनी निघून गेली व सर्वात शेवटी महाराज अशाच निद्रा स्वप्न दृष्टांनी नामदेवांना खडसावत म्हणाले. ''नामदेवा ! आता तरी तू अविचार सोड ! अहंता मत्सर पोषक असा अविवेक करु नको । वेणी माधव हा कोणी क्षुल्लक मानव नव्हे। एकविद माझा भक्त सेवक आहे. माझा तो शुकमुनी आहे. फुकट आता नसती उठाठेव न करता सरळ आपला गांव गाठ!''

ह्या स्वप्नी दृष्टांतातून खडबडून नामदेवांना जागे होताच माधव त्यांना म्हणाले ''माझ्या भ्रष्ट शय्येवर नामदेव तुला फार यातना झाली असेल ना रे!'' तेंव्हा नामदेव त्यांना खाली मान घालत म्हणाले ''बस्स बस्स, माधवा जास्त मला खजिल करु नकोस महाराजांनी अंगिकारलेला तू थोर सेवक आहेस. मी मात्र व्यर्थ अहंकार पोसून मोठा अपराधी बनलो. ज्या इच्छेने विकल्प उद्‌भवला त्याने देहाला कष्ट ताप झाला. त्या गर्वाने व्याप झाला. गुरुंनी तुला हाती धरले आहे. त्यातील वर्म न जाणता तुला बोध करण्यासाठी मुर्खपणे मी येथेवर आलो. ही अक्षम्यहिन करणी माझ्या हातून घडली. तेंव्हा हे माधवा तू मला क्षमा कर!'' असे विनम्र होऊन नामदेव माधवाच्या चरणी नमस्कार करण्यास झुकला न झुकला तोच माधवानी त्वरीत त्याला धरुन उठवून म्हणाले ''व्यर्थ कशाला माझी स्तुती करतोस. इतरांना न उमगणारी ही सर्व गुरुंची करणी आहे!''

मग माधवांचा नामया घेऊनिया निरोप ''करवीरा आला श्री गुरु समीप । स्वामी म्हणती जा

बसा निर्व्याप । पराशी ताप देऊ नये असे हे भक्त शिरोमणी श्री वेणी माधवांचे देहावसान १९१८ च्या सुमारास जोतिबाच्या डोंगरावर झाले.।'' आठरापुराणे लिहीणारे महर्षी व्यासपुत्र शुकमुनीचा ब्रम्हचर्य निष्ठतेसाठी त्या पुराणानी जयघोष केला आहे तर ह्या कलीयुगातील वेणी माधवासारख्या श्रेष्ठ भक्ताला समय पुराण पुरुष श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी आधुनिक ''शुकमुनीच्या पदाला पोहचवून गौरविले आहे.'' भल्याभल्यांची थट्टा उडवून त्यांना ज्याने बट्टा लावला. जिथे तपोराशी ढळले त्या नियतीत काम विकाराने वेणी माधवांना पण सोडले नाही. त्यांची पण अशीच थट्टा उडवून बट्टा लावण्याचा प्रयत्न केला पण वेणी माधव निष्कलंक राहिले. त्याचे कारण त्यांची विवेक बुध्दी अविरत सदगुरुंच्या चरण सेवेशी रत झाली होती आणि म्हणूनच त्या सदगुरु श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी ''आधुनिक शुकमुनी म्हणून गौरवले''

विनयशील स्वभाव व उत्कट प्रेमभक्तीने श्री वेणी माधव कुलदैवत श्री केदारनाथ सद्गुरु श्रीकृष्ण सरस्वती महाराज व जन जननी महिषासूर मर्दिनी ह्या तिन्हीही दैवतांच्या असिम कृपेला भूषणावह होऊन आदरणीय आदर्श झाले आहेत.

संदर्भ ग्रंथ :- **श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज**
पुण्यतिथी विशेषांक दि. ३/९/१९९१
लेखक :- **श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, कोल्हापूर**



श्री स्वामीभक्त वेणीमाधव यांची समाधी, गायमुख जोतिबा डोंगर

# श्री वेणीमाधव यांच्या समाधीची माहिती

श्री वेणी माधव यांची समाधी श्री जोतिबा डोंगर गायमुखाजवळ आहे. आमची जमीन गायमुखालगत आहे. आम्ही गेली ५० ते ६० वर्षापासून गायमुखाजवळील जी समाधी पाहतो आहे त्या व्यतिरिक्त दुसरी समाधी नाही. आमच्या मते ती समाधी वेणीमाधव स्वामी यांचीच असावी समाधीजवळ मल्लिकार्जुन देवालय असून ते सुध्दा प्राचीन आहे. त्या शेजारी अपुऱ्या अवस्थेत गणपती मंदिर होते. गणपती मंदिर प्राचीन असून त्याचा जिर्णोध्दार आम्ही स्वखुशीने केलेला आहे. समाधीशेजारील जमिनीचे गेल्या २० वर्षापूर्वी बुलडोझरने सपाटीकरण केले आहे. सपाटीकरण चालू असताना त्यावेळेस समाधी शेजारी एक मोठा नाग निघाला होता. त्या नागास बुलडोझरने जखम झाल्याने तो मेला. बुलडोझर हा पैजारवाडीचा ड्रायव्हर चालवत होता. त्याचे नाव हिरवे होते. तो व्यसनी होता. दारुच्या नशेतच तो बुलडोझर चालवत होता. त्यातूनच त्या मोठ्या नागसर्पाचा मृत्यु ओढवला. पण माहित नाही त्या हिरवे ड्रायव्हरला पश्चाताप झाला. त्याने दारुचे व्यसन सोडून दिले व ते सत्पुरुष बनले.


**शब्दांकन :- श्री सुरेश विष्णू बुणे, श्री गजानन बुणे, श्री दिलीप बुणे (जोतिबा डोंगर)**

श्री वेणी माधव स्वामी यांचेबद्दल मला संपूर्ण माहिती नाही. परंतु श्री कडेगांवकर महाराज यांनी श्री जोतिबा डोंगरावर श्री दत्त मंदिर शेजारी अकरा दिवस अनुष्ठान अंदाजे ५० वर्षापुर्वी केले होते. अकरा दिवस श्री कडेगांवकर महाराज अनुष्ठानासह डोंगराला प्रदक्षिणा घालित असत. एकदा अनुष्ठान चालु असताना, प्रदक्षणा घालित असताना, गायमुखाजवळ आले असताना, त्या समाधीमधून ध्वनी येत होता असे श्री कडेगांवकर महाराजांनी आम्हाला प्रत्यक्ष सांगितले होते.

शब्दांकन :- **श्री आनंदा कृष्णा सातर्डेकर**
(वय अंदाजे ८५ वर्षे) जोतिबा डोंगर

# समुद्र भरला आहे

## ।। अध्याय २९ वा ।।



स्व. रविंद्र मिस्त्री, कोल्हापूर यांच्या कुंचल्यातून चितारलेले तैलचित्र

- **विषयसूची....!**


१) श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज
यांचा समाधी सोहळा

# अध्याय २९ वा

ताराई गुरुंना सोडून गेली. श्रीकृष्णगुरुना क्षणभर चैन पडेना. उदासपणे वावरु लागले. गोकुळ अष्टमीला भक्तांना घेवून भजनाचा आनंद श्रीकृष्णगुरु लुटीत. श्रीकृष्णाचा गजर करुन फुले उधळीत / टाकीत. परंतू या वर्षीच्या गोकूळ अष्टमीच्या उत्सवाला विचित्र प्रकार असा घडला की, श्रीकृष्ण जन्मपर भजन/अभंग चालू असतानाच श्रीकृष्णगुरुंनी आपले सिंहासन सोडले व श्रीकृष्ण जन्मा आधीच पाळण्यावर फुले उधळून दिली. भक्तांना हा प्रकार गुढ वाटला. जन्मा आधीच फुले उधळण्याची श्रीकृष्णगुरुंना का घाई झाली. त्यांना कसली ओढ लागली हे गुढ तेच जाणीत. परंतु यापूर्वी असे कधी घडले नव्हते. श्रीकृष्णगुरुंच्या मनात काय बसले/दडले आहे याची सर्वांना हुरहूर लागली. सूज्ञ भक्त मनात चरकले. पुढे कांही मास/महिने लोटले. श्रीकृष्णगुरुंना संग्रहणीने/पोटदुखीने ग्रासले दोन आठवडे झोपून राहिले. सिंहासनावर आरुढले नाहीत. अन्नावरील वासना उडाली गुढ अशी बोलणी सुरु झाली. तापाने शरीर फणफणू लागले. पलंगावर स्थिरपणे रहात नसत. मधून मधून इकडे तिकडे फिरत भक्तांना उपदेश करीत. सदोदीत नामस्मरण करा. नामस्मरणाने अंगी देवपण येईल असे म्हणीत. अंहभावाने घाटे वैद्य मंदिरात येवून म्हणाला ''हां हां म्हणता गुरुंच्या ज्वराला पळवू. गुरुंना मी तपासतो'' अंगास हात लावण्यापूर्वीच श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''वैद्यपणाची थोरवी मिरवू नको. चूर्णा मात्रा तुझी इतरांना लागू पडेल मला नाही. मीपणाने कार्य नासते.''

आंग्ल वैद्य/डॉक्टर श्रीकृष्णगुरु जवळ आला व नळी/टेथेस्कोप लावून ताप पहातो म्हणाला. यावर श्रीकृष्णगुरु त्याला म्हणाले, ''टेथोस्कोप नळीला यम भितो कां? तो यमराजा आहे. नुसती सुई टोचून यमास जाचणी होणार आहे का? एक औषध देण्यात समाधान. मला कशाचीच जरुरी नाही.'' भयंकर ताप येवून श्रीकृष्णगुरुंना गुंगी येई तर क्षणात अंग थंडगार होई. हाताची नाडी लागेना. भक्तांना बोलण्याचा धीर होईना. भक्तांच्या भावना जाणून श्रीकृष्णगुरु त्यांना म्हणाले. ''आता खेळ दोन घडीचा'' ते ऐकून ''कांही शब्द द्या. धीराचे बोल द्या'' यावर श्रीकृष्णगुरु भक्तांना म्हणाले, ''देह हा पंचमहाभूतांचे घर आहे. देह नश्वर आहे विवेक विचाराने स्थिर रहा, वागा. श्रध्देने माझी आठवण ठेवा. मी तुमच्या पाठीशी उभा आहे. तुम्हाला आशीर्वाद आहे.'' दिवसें दिवस श्रीकृष्णगुरुंची प्रकृती क्षीण झाली. गोकुळअष्टमी आली. रात्रंदिवस भक्त जागत होते. श्रमाची पर्वा कुणाला होती ? दत्तोबा, लाड, व्यास, धनवडे, रामभाऊ, परांडेकर, बायजा ही मंडळी रात्रंदिवस श्रीकृष्णगुरुंच्या सेवेत होती. नामा मात्र गाणगापुरास होता. सर्व भक्तांना काळजी वाटत होती. रात्रंदिवस श्रीकृष्णगुरुंजवळ भक्तमंडळी खडी होती. त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागत होती. धावत होती. अष्टमीच्या आधि दोन दिवस श्रीकृष्ण गुरु नामाच्या स्वप्नात गेले व कोल्हापूरास लवकर ये म्हणू लागले. नामा उतावीळपणे कोल्हापुरला आला. प्रत्यक्ष प्रकार पाहून

श्रीकृष्णगुरु अशक्त झालेले पाहून नामाचा ऊर भरुन आला. त्याच्या नेत्रातून / डोळ्यातून अश्रू वाहू लागले. सर्व भक्त नामाला म्हणाले, ''श्रीकृष्णगुरु जवळ आज तूच बस. आम्ही निद्रा टाळू शकत नाही'' सर्व जण गाढ झोपी गेले. श्रीकृष्णगुरुंची प्रकृति ढासळू लागली. नामाला मेरु पर्वत विरघळू लागला आहे असे वाटू लागले. काळ कसा आला आहे असे त्याला वाटू लागले. जागृतपणे पहारा करु लागला. श्रावण वद्य रात्री नवमी पहाटे चारचा सुमार, दशमी, घंटानाद रुपाने महालक्ष्मी श्रीकृष्णगुरुंना भेटण्यास आली. श्रीकृष्णगुरुंनी नामाला अडखळत हाक मारली व म्हणाले, ''कापूर लावून आता मला ओवाळ'' विश्व ज्याच्या वदनी त्या श्रीकृष्णगुरुंचे क्षीण शब्द, क्षीणवाणी ऐकून नामाचे हृदय दु:खाने फाटून गेले. त्याला कांही सुचेना. नामाने कापूर आरती लावली. गुरुमुर्तीस ओवाळली. नामाने गुरुमुर्ती नयनी साठविली. त्या क्षणी ज्योतित ज्योत विलीन झाली.

हा प्रकार पाहून नामाने हंबरडा फोडला. जवळचा भक्तवृंद जागा झाला. सर्व म्हणू लागले कसली काळझोप लागली. श्रीकृष्णगुरुंनी ताराईस दिलेला शब्द खरा केला. तिच्या वचना प्रमाणे तुम्ही जगला. आता आम्हांला प्रेमपान्हा कुठला? निराधार आम्ही झालो. ताराई गेली. दत्तमूर्ती अदृश्य झाली. कसली विपरीत गती आली. समाधीस परवानगी मागितली. ताराईची इच्छा राजा छ. शाहूना सांगितली. शाहू छत्रपतींनी ताराईची इच्छा मान्य केली, समाधी बांधणेस मान्यता दिली. ताराईने आपल्या इच्छाबळाने सिंहासन आधीच तयार केले होते. त्या सिंहानाखाली खोदून पुढे पाठीमागे पाट ठेवून श्रीकृष्णगुरु देहाला पद्मासन घालून बसवून, मीठ, कापूराने गाभारा भरला. सिंहासन मीठ कापूराने झाकून टाकले. भक्तगण शोकसागरात बुडाले. लौकिकदृष्ट्या श्रीकृष्णगुरु अंर्तधान पावले. परंतू जसा ज्यांचा भाव तसे त्याला श्रीकृष्ण पावू लागले. पांडुरंगाने पुन्हा अवतार घेतला तो ज्ञानेश्वर महाराजांच्या रुपाने. आत्मा अमर आहे. सत्पुरुष देहाचा त्याग करतात. श्रीपाद श्रीवल्लभ कुरवपूरी, श्रीनृसिंह सरस्वती करंजनगरी (कारंजा), श्री माणिकप्रभू माणिकनगरी (हुमणाबाद), श्री नृसिंहभान अक्ककलकोटी, श्री श्रीकृष्ण सरस्वती करवीरी अवतार घेवून राहिले.

*****

## श्री जोतिबा डोंगर-

वाडी रत्नागिरीवर (जोतिबाच्या डोंगरावर) व त्याच्या परिसरात पुष्करतीर्थ, कुशावर्ततीर्थ, विशालतीर्थ, अमृततीर्थ, मुक्तितीर्थ, चोपडाईचे तीर्थ, देवतीर्थ, कर्पूरतीर्थ, मंडूक तीर्थ, अशी अनेक पुण्यप्रद तीर्थे आहेत. केदारेश्वर, चर्पट, अंबिका, जोतिबा, कालभैरव, यमाई, नंदिकेश्वर, जमदग्नी, अष्टभैरव, गणेश, हनुमान, महालक्ष्मी, नवकोट कात्यायनी, योगिनी इत्यादि देवदेवतांनी या परिसरात वास्तव्य केले आहे. सर्व जातिजमातींच्या लोकांना या जोतिबाचे आकर्षण वाटते. प्रत्यक्ष जमदग्नींनी जोतिबांना नाथपंथाची दीक्षा दिल्याचे सांगितले जाते. नाथपंथीय गोसावी गुरव हेच या स्थानाचे पुजारी आहेत. याच जोतिबांनी गावोगाव भैरवदेवाची स्थापना केल्याचे सांगतात. रत्नासुरास मारुन लोकरक्षण करणाऱ्या या देवाचा गजर 'चांगभले' असा आहे. नावजी पाटील हा जोतिबाचा एकनिष्ठ भक्त होऊन गेला. मुळचा केदारनाथ असणारा हा देव कोल्हापूरच्या महालक्ष्मीस दैत्यसंहाराच्या कार्यात मदत करण्यासाठी आला व तो तेथेच विजयानंतर स्थिरावला. ज्योतिर्लिंगाच्या रुपात निवास करणारा जोतिबा चतुर्भूज आहे. हातात खड्ग, डमरु व त्रिशूळ ही शिवाची आयुधे आहेत. अश्व हे त्याचे वाहन आहे. रवळनाथ, खंडोबा यांच्याप्रमाणेच जोतिबा लोकमानसावर प्रभाव ठेवून आहे. हिमालयातील प्रसिध्द केदारनाथच दक्षिणेत लोकरक्षणासाठी जोतिबा बनला.



# // समुद्र भरला आहे //

## ।। अध्याय ३० वा ।।



**श्री कृष्णाबुवा यांची समाधी, कृष्णाघाट, मिरज**

### विषयसूची....!

१) श्री कृष्णा स्वार/ कृष्णाबुवा यांचे लिखाण एक संशोधन

२) महाराष्ट्रातील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची मंदिरे


# अध्याय ३० वा

## श्री कृष्णा स्वार / कृष्णाबुवा यांचे लिखाण एक संशोधन

मिरजेला पवार गल्ली, नदीवेस येथे स्व. आक्काताई जाधवांच्या घरी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची मठी आहे. श्री कृष्णा स्वार हे मिरजेला असतांना पवार गल्लीतील श्री विठ्ठल मंदिरात मुक्काम करीत व स्व. जाधवांच्या घरी भिक्षेला जात. श्री स्वामींच्याकडून त्यांना प्राप्त झालेली टोपी, चर्म पादुका, या श्री कृष्णा स्वार / कृष्णा बुवा यांनी या प्रसाद म्हणून जाधव कुटुंबीयांना दिल्या. तसेच श्री कृष्णा स्वारांच्या हस्तलिखीत वह्या, रुद्राक्षाच्या माळा, कमंडलू इत्यादी वस्तू जाधव कुटुंबीयांना दिल्या. श्री कृष्णाबुवांनी बरेच लिखाण केलेले दिसून येते. त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. त्यांनी संत साहित्याचे बरेच पुर्नलेखन केलेले दिसून येते.

श्री कृष्णा स्वारांनी आपल्या लेखनांत श्री स्वामींचा जन्म, श्री दत्ताचे पद, ताराईची माहिती, श्री स्वामींचे चमत्कार, गुरुद्वादशी, गोकुळ अष्टमी, हनुमान जयंती इत्यादी उत्सव, ताराईचे निर्वाण, श्री स्वामी समाधी दिन वर्णन व त्यांच्या शिष्यांची माहिती दिली आहे. तसेच त्यांनी नागा साधूंच्या झुंडीतून भारत भ्रमण केले होते त्याचे वर्णन केले आहे. अजूनही त्यांच्या अप्रकाशित लेखनावर संशोधन होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री कृष्णा स्वार / कृष्णा बुवा यांचे लिखाण बोरुने केले असून त्यांचे हस्ताक्षर वळणदार व सुंदर आहे.


८- ॥१०॥ सप्रेमभावधरूनीगुरूवं
दनाचा॥ ऐसाधरीनियमतोसु
खिहोत्रिवाचा॥ राधेयकृष्णसु
५ तदासदिगंबराचा॥ सेवेसि
तप्ररुभासुविनीतसाचा॥

॥११॥ दिनार्तिनाशकगुरूकरवी
रवासी॥ श्रीकृष्णदत्तअवधु
तनमोनयासी॥ श्रीगुरुदेव
दत्तप्रसंन्न॥ शाके १८६० सन
१९३८ ॥

दत्ताचे पद-

चला सख्यानो करवीरक्षेत्रीकुंभारगलीला -
कृष्णसरस्वतीप्रभुतेथेंअवतरला ॥ ध्रु॰ ॥
पिताअत्रिमाताअनुसयाभुषणसकळाला ॥
शंख चक्र चारी वेद होते बरोबरीला ॥ १ ॥
राजापासुनी रंकापर्यंतजगहाउध्दरिला ॥
ब्रम्हाविष्णुपुर्णमहेश्वरदत्तआपण झाला ॥
भक्तजनाचाउध्दार करुनीअवदुंबरीराहिला ॥ २ ॥

त्रैलोक्याचाआदिपतीहालीनकसाझाला ॥
बाळपणीसंन्यासजगताधारवीला ॥
शुश्रूषनाकरी धेनुची दंड हाति धरीला ॥
लक्ष्मी म्हणे ठाव चरणी देईअवकेला ॥ ३ ॥
चला सख्यानो करवीर क्षेत्रीकुंभारगलीला ॥
कृष्णसरस्वती प्रभुतेथेंअवतरला ॥
श्रीगुरुदेवदत्त महाराज प्रसन्न ॥

सेन्यासन्यायाया॥तोपरमानंदरूपिमिळे॥४१॥
ऐसेआश्रमआहेतचार॥ज्याआश्रमीजो
आचार॥ऐशाकर्मेवर्तेजोनर॥तोपावेप
रमपदगुरूचरण॥४२॥कृष्णापंचगंगा
संनीधान॥नृसिंहवाडीक्षेत्रपुण्यस्थान॥
याठीकाणीग्रंथनिरमाण॥दत्तप्रसादेजा
हलापुर्ण॥४३॥श्रीमद्गुरूदिगंबर॥साच्चि

उ-
दानंदज्ञानसागर॥सर्वअरिष्टपासुनस
र्वेश्वर॥ग्रंथरक्षणकरोसततु॥४३॥
ॐबीजंसोहंशक्ति॥श्रीगुरूभ्योनमः
१ ऐकाउत्तरआध्यायाचीकथा॥श्रोतावक्ता
होयसावचित॥बहुतपुराणीजुनाटक
था॥श्रोतेजनीपरीसावी॥४४॥करबि

र क्षेत्र महापवित्र स्थान॥ तेथें राजा बाबासा
हेब महा राजआण॥ त्यावेळी तेथें साधू होते
दोन॥ पुर्णसिध्द रामागिरीवचिं नामणी॥
८० ॥४५॥ त्याणी तारा बाई आई सराक॥ ठवु
घे शादि त्का रबाळ घे म्हणुन॥ त्यांचे प्रसा
देक रुन श्री गुरु॥ दत्त महाराज कृष्णा सरस्व

ती॥ हे कोल्हापुरी आंबाबाई चे मंदिरी॥४६॥
रामाचे बोवरीमध्ये दुःसकाळी आले॥ बरो
बर एक कोडी ब्राम्हण होता॥ च्यार दोन ठी
१० का जाऊन येऊन होते॥ दोनप्रहरी कुंभार
गल्लीस तारा बाई चे घरी आले॥४७॥ आ
णी आमाला जेवायास वाढा॥ आई जेवाया
स वाढा असे बोलु न॥ येश्वर प्रमाणे प्रे

म करील सर्वदा ।। तारा बाई आई भोळ्याव
विच्यारी भाग्यवान ।। ज्ञान वैराग्य भक्ति
युक्त आस्या होत्या ।। ४९ ।। आईच्या कृपे
११ करून जगाचा उध्दार जाहला ।। कोणाचे अ
ज्ञान कोणाचे पाप समुळ गेले ।। कोणाचे
कुष्ठ व कोणाचे महारोग गेले ।। कोणाची
भूत बाधा कोणाचा अपस्मार ।। ५० ।।

५० कोणाचे पोट शुळ व कोणाचे मास शुळ बरे झाले
सद्गुरू दत्त महाराजानी बरे केले ।। कोणा पुत्र दि
ले कोणा धन धान्य व सर्व दुःख दूर केले ।। ५१ ।।
११ तारा बाई आई स्वां बाच्या असा नेम असे की ।।
श्री गुरूदत्त महाराज भक्त हे रूना फिरून आले
म्हणजे ।। वैराग्य मठात आले बरोबर आई पाहि
ले दर्शन करिल ।। ५२ ।। व प्रेमाने चरणरज म

स्नकासल्गावे॥आंतनेऊनचवरंगावरबैसवा
वे॥उसमपाण्यानेश्रीगुरूचेपायधुवावे॥
आपणतीर्थघेऊनसर्वशिष्यमंडळीनेघ्या
वे॥श्रीगुरूदत्तमहाराजासकुंकूवआष्टगंध
वआत्तरलावावे॥५३॥आणिनीरंजव
कापुरआरतीनेवोवाळावेनित्यपारय-

३- श्रीगुरूदत्तमहाराजकृष्णासरस्वतीयांची
आरतीदुपारतीपांचवेळहोतआसे॥
सद्गुरूदत्तमहाराजयाचेयेथेंउच्छसर्व
१२ होत॥५४॥श्रीगुरूद्वादशीवदत्तजयं
ती आणि रामनोमीगोकुळआष्टमी॥
हानमंतजयंती सर्वउच्छावहोत॥

दर पौर्णिमेस पालखी फिरून मठांत येत ॥५५॥
तारा बाई आई च्या घरी दत्त महाराज ५ पना
स वर्षे राहिले होते ॥ श्रीगुरु महाराज आपले
वयाचे सद्गुरु षष्ठ वर्षे झाल्यावर समाधी
योगधारण केला ॥ आई गुरु दत्ताजवळ का
य मागीतले ॥५६॥ आपले आगी दूर जावी
हेच आपल्या पुरे आहे त्या बरोबर ॥

(३. श्रीगुनी पुर्ण करू असे बोलले आणिक ॥ काही
दिवसाने तारा बाई आई थंड त्याप्याने ॥
आठ दाहा दिवस आजारी होत्या ॥५७॥
१२ त्या नंतर राजगुरू बारा दिवसा बारावाज
ता आई च्या प्राण गेला त्या वेळी ॥ श्रीगुरु
दत्त महाराज कृष्णा सरस्वती ॥ हे आत

पलंगावर नीजलेले होते ॥५८॥ त्यावे
ळी आम्ही सर्व शिष्यमंडळी जवळ होतो॥
त्यांचा मुलगा दत्तोबा व नातु रामनाथ हे ज
वळ होते॥ एक दम आरडा ओरड होऊन
गेली॥५९॥ त्यावेळी श्रीगुरू दत्त महारा
ज कृष्णसरस्वती॥ मोठ्या प्रेमाने जवळ
येऊन आईस बाहेर सिंव्हासनाजवळ॥

उ- घेऊन चला असे श्रीगुरू दत्त बोलीले॥६०॥
सिंव्हासनाजवळ दक्षिण मुख करून बैसवी
ल्यावर॥ श्रीगुरूंनी जो आद्भुत चमत्कार केला
१४ तो असा की॥ आईचे पाय लांब करा असे बो
लुन॥ ताराबाई आईच्या मांडिवर हात ठेवला
त्यावेळी मी जवळ होतो॥६१॥ सद्गुरू दत्त
महाराजाकडे व आईकडे पाहु लागलो॥

तो त्याबरोबर आईचा प्राण येऊन डोकेस
रळके आणि डोके उघडरूई कडेसिकडेन पाह
ला ॥ समोर पाहु लागल्या ॥ ६२ ॥ श्रीगुरूदत्त
पुढे येऊन बैसले व आईकडे पाहात पाह
त आपल्या स्वरूपी मिळविले ॥ हा आत्म
अनुभव दाविला ॥ त्यावेळी आई समोठ
सर्वी मग्न झाल्या ॥ ६३ ॥ व ब्रम्हानंदाने पुर्ण
पणे मोक्ष पावल्या ॥ त्यावेळी श्रीगुरूदत्त ॥ ६३

उ उठून बाजूस झाले त्याबरोबर आईचा
प्राण गेला व पुर्व बाजूचे मुख पश्चिम बाजू
स पडले ॥ श्रीगुरूदत्त बोलले की आई मेली
॥ ६४ ॥ चाला आता घेऊन जाऊ स्मशाना
३५ स नदीकडे ॥ आईसाहेबांच्या घाटावर
तारा बाई आई समोठ्या समारंभाने दिंड्या
पताका सर्व शिष्यमंडळी व श्रीगुरूदत्त ॥ ६५

जाऊन स्मशानयात्रा पुर्ण कीरीे परत आल्या
वर श्रीगुरू दत्तास भक्ता वांचुचैन पडेना
से झाले ॥ आई सपुर्णपणे सायुज्य मुक्ती
देवून ॥ श्रीगुरू दत्तमहाराजांनी ॥ आनंत
भक्त उद्धारिले ॥ ६६ ॥ त्यानंतर श्रीगुरू
दत्तमहाराज कृष्णासरस्वतीहे दोनतीन
वर्षानीसुद्धा निजधामास जाणे बरू लागले

७- आम्हास मिळजे स जाणे आहे आसे वरचे
वर बोलत होते ॥ ताराबाई आईसाहेबा
याची समाधियोग कथाभाग जो कोणी ॥
१६ ६७ ॥ ऐके व वाचे त्यास मोक्ष वैकुंठ होय
आणि सर्व पापापासुन मुक्त होय ॥ अज्ञान
दु:ख भवभय पळुनी जाय निशेष सत्य
सत्य ॥ श्रीगुरुदेव दत्त दत्त ॥ ६८ ॥

उ. आधी मध्ये लिहीला आहे सो आसा की करलु
म अ करलुम आन्यला करलुम ॥ याचपुढे
समाधियोग असि प्रसिम पाइण्याचे आइ
१७ कण्यांत ॥ आज्ञा नाही ॥ जाणे व न जाणे त्या
च्याई च्छे व होसे ॥ ६९ ॥ चार सा दिवस
थंडी ताप आमांशु झाले मुळे आषधउपाय
जाकर धन वडे आणि वाटवे गाउ बीळव

बाबासुणे राज वैद्य हाजर होसे ॥ त्याणी समर्था
ची नाडीपरिक्षा करून म्हणारे श्रीगुरु द्त्त
महाराज हे स ध्या काळी साहा वाजला आसी
ल आसे बोलुन इंग्रजीत ॥ ७० ॥ उत्तम मात्रा
देणे चे व रवि दोन प्रहरी राके एक लास्या
ने देणे चे सांगितले ॥ त्याप्रमाणे रात्री त्या
चा प्रयोग असा झाला की ॥ श्रीगुरु दत्त

उ- पलंगावरुउठ बैसले आणि मला बोलले उद्या
आम्ही जाणार॥ नरसोबाच्या वाडीस जाणे
आहे॥७१॥ असे बोलुन समाधियोगपद्मा
१८ सन बैसले मला बोलले की कोणास हालवा
वो नैदी॥ पहाटेस आंबाबाई वाईच्या धाघी
वरो बहु प्रयाण केले॥७२॥ त्या वेळी शिष्य
मंडळी कृष्णा स्वार गोसावी॥ राम भाऊ बा

यजाबाई कदम॥ लोराजी बाबा वाजल्या श्री
गुरुदत्तानी असा चमत्कार केला की॥ श्रीगु
रु कृष्ण सरस्वती पलंगावर नीजले होते॥७३॥
एक दंम उठुन बैसले आणि आपले मस्तका
भोवते हात फिरवुन॥ हुसारे से करुन आक
स दिला पकवी लेपक बीलेरास बोलले॥
त्यी वेळी मी जवळ होतो कृष्णाबुवा वलास

७- गावकर भउजी असे हाक मारून ॥७४॥
बोलले की आम्ही चार दिवसानी मिरजेस
जाणार आहो ॥ श्री कृष्णातीरी घाटावर आ
११ म्हा सांभाळा ॥ बरे आई हाल लाऊ देऊन
का ॥ आम्ही निजलोकास भर असे बो
लून स्वरूपी नीमग्न जाहले ॥७५॥
श्रावण वद्य १० रोज सोमवार शाके १८२२ ॥

सन १९०१ ॥ रोजी श्री गुरु देव दत्त महाराज
कृष्णा सरस्वती यानी समाधि योगधारन करू
न पहाटेस योगारूढ झाले ॥ त्यावेळी छत्र
पति शाहु महाराज हाजर होते त्याना समम
जने बरोबर ते मोठा राहु नजर आले ॥
॥७६॥ श्री गुरुची समाधी येथेच व्हावी
ऐसे कळविले ॥ त्याबरोबर हुकूम देऊ

७ नसरकारपरलगेले ॥आम्ही सर्वी शिष्यमंडळी
नीसिंव्हासनाचे खालीउत्तमपव्याभाजि
वविठानीबाटुनघेतले व रामरसभस्मका
२० पुरवगेरभरूनउत्तमकेले ॥ व्यावेळीको
काचा भुरासीरु वाद्रिक्र व पंडित ब्राम्हपुस्त
क आलेहोते ॥७७॥ करवीरवासीयांसकास
फारदुःखझाले स्वर्गास विमाने येऊन

देवगंधर्वकींनर येऊनपुष्पवृष्टी केली ॥
श्रीगुरुदत्तमहाराजं पंचामृतस्नान झाल्या
वर॥षोडशउपचारे पुजाकरून ॥ भगवी
छाटी वटोपीपांढरासदरा ॥७८॥ आनं
रेशुकाबकेवडारव सवगेरे लाऊनपे
च्यारत्नी केली ॥ व सर्वांनी साष्टांगनमस्का
र केले व वरचेवर नमो नारायण आसा

उ- गजर करीतव श्रीगुरुदेवदत्त महाराज
कीजयअसे वारंवार उच्चारीत ॥७९॥
त्याचेकी श्रीगुरुचा भक्त देव बुवावनामें
२९ देव ॥ जवळ येऊन पाहातात तो एक बो
ठ रवाली वाकडा झालाआहे ॥ असे बो
लल्या बरोबर श्रीगुरुनी तो बोट वरुसा
वरुन घेतला ॥ ८० ॥ असा अद्भुत च
मत्कार करुदावीला ॥ श्रीगुरुने ॥

श्लोक ॥ संदर्शनमनुष्यंगः संलापः पर
मलप ॥ आगागसंग कैवल्य महो मज्जन
संगती ॥ टिका ॥ साधुचें जे दर्शन ॥ तेंचि
परमअनुष्टान ॥ साधुसी जें भाषण ॥ तप
श्चर्यापूर्ण पूर्णत्वे ॥ ८१ ॥ साधुचें चरण
स्पर्शन ॥ कैवल्य त्यापुढें तृण ॥ अगाध
साधुचे चरण ॥ जेणे पावन महा दोषी ॥

उ. सज्जनासी आलिंगन ॥ तेणे सर्वांगपावन ॥
देह [illegible]होय चैतन्य घन ॥ कृपा सज्जन
जै करितील ॥ ८२ ॥ श्रीगुरुदेव दत्त प्र०
२२ श्रीगुरुदेवदत्त महाराजांचे राकनीह भक्त
झाले त्याच्या अनुभवविचार कथा गुह्य कि
तीले आहे ते येथे लीली वाचा व्यक्त अनुभ
व घ्या ॥ सत्य सत्य ॥ ८३ ॥ उत्तरार्ध ॥

उ. वाचाजीवरुग ॥ फौडिले प्रांगप्रपंच्याचा ॥
सद्गुरु हा अनाथ माउली ॥ कृपेची साउली
केली आम्ही ॥ ८३ ॥ ज्ञानदेव म्हणे सद्गुरु चरणी
२७ दास ॥ तेणे साधनास आण काही ॥ ८४ ॥
श्रीगुरुदेवदत्त महाराज कृष्ण सरस्वती ॥
शके १८६४ सन १९४२ रोज मंगळवार
करवीर पंचगंगा तीरे गुरुघरे मठात
कृष्णाबुवा [illegible]र आधार्थ समाप्त:

केशव रावगोरवई ब्राम्हण भक्त होते व त्याना
भास्कर पुढे हेड मास्तर झाले ॥ यांचे चरीत्र कथा
भाग श्रीगुरूजीनी त्याना प्रत्यक्ष दर्शन देऊन
सांगितले तुला एक पुत्र दिला आहे व कोटी
धनाधिकेक ॥१०० शंभर रूपये दरमाही व
कलहोते दत्तरूपे करून पुढे त्याना ७००सा
रूपाय वर हेड मास्तर ची जागा दिली ॥ ८४

5 त्याणी बकुंठ वासी श्रीगुरू दत्त महाराजा
करि दरमा ३०० तीनसे रूपेयाची मणी आर्डर क
रीत ॥ सर्व शिष्यमंडळीस धनही देऊन मोठ्या
२२ प्रेमान ॥ हे फार भाग्यवान होते व त्यांचा बायको
चा श्रीगुरू दत्तचरणी पुर्ण विश्वास असत व
बायकोस ६० वयमान होऊन अखंड सौभाग्य मरण
आले व पुढे दोन वर्षांनी भास्कर ही कीर्ती क
रून मोठे ज्ञानी होते ॥ ८५ ॥

वदुसरे भक्त रामणाकु कोल्हापूरात रामा
उर्फ मराठे वराक निष्ठ भक्त होते ॥ त्याणा समे
संमदाची बाधा होती ॥ त्यामुळे श्रीगुरू कडे
आले आणि हास्य ओठु नउभे राहिले लेखां द
स महाराज काय बोलले लक्ष्मणा ले आमची
नौकरी केली काय ॥ ८६ ॥ मीरा कलुर्ण
भावाने आपकी सेवा करीन ॥ गुरू महाराज
करिती फुले आणावी आरती दुपारती रागा


उ- सतत सेवा सुरू आहे ॥ त्यांचे वय ८५ पंच्यांशी
त्यापुढे श्रीगुरू दत्त शेवा केले मुळे लोव मे
संमधगेला सेवा सुरू आहे ॥ तीसरे भक्त प
२३ र शाराम माने हे … होते ॥ त्यावेळी
दत्त महाराज यांचे घरी आले त्यावेळी त्यांची
आई बोलली ॥ दत्त महाराज आले आहेत ॥ ५
श्रीगुरू ने मस्तकावर ठेवला त्याची रजुण


अनुभव हा की त्याचे पोटी कन्यारत्न झाले ते श्रीगुरुदत्त यांचे शिष्य रामनाथ शीरडे यांचे बरोबर विवाह झाला ॥ त्यामुळे गुरुकृपेने पुत्र धन देवूनी आपत्कपाय दारप धीले ॥ ८७ ॥
४ भक्त आंबा बाई ची झाडी बायजा बाई कदम ॥ श्रीगुरु दत्त महाराजांची रात्रंदीवस भक्ति भाव करीत असे की देव कानाच करये न पडले

उ. त्या बरोबर फीट येऊन प्राण गेला व यमान ७०
होते त्यांना एक पुत्र व नातू आहेत ॥ ५ पाचवे
भक्त देवकुबा ची शिष्य शंकर भाटे रे इनामदार जे
२४ सध्या हयात आहेत ॥ त्यांच्यावर दत्त महाराजांची
पूर्ण कृपा आहे ॥ ८७ ॥ त्यांचे घरी दत्त महाराजांची
पुजा व नंदादीप हाम श आहे एक श्रीगुरुनेच चमत्कार केला की त्यांचा मुलगा गुरुदेव १५ सोळा वर्षांचा असताना कृष्णा गंगा नदीला गेले असता करे म

पाण्यात बुडाल्याने दत्त सद्गुरूने त्याला साऱ्याकां
बाहेर काढला आणि आपण गुप्त झाले ॥ ८८ ॥
शंकर व अनुसूयाला नंद झाला ॥ ६ साली कथा
श्रीगुरूचे भक्त व शिष्य वडोद्याला राहत स्वामि
महाराज ॥ हे लागवाई राणी साहेबास ने हमी
दत्तमहाराजांचे दर्शनास कुंभार गल्लीत जावे
सर्व इच्छापूर्ण होईल ॥ ८२ ॥ गुरुकृपेने त्याना
१२. कन्यारत्न बीबीमहाराज झाले व दर गुरुवार

३- शनीवार बीबीमहाराज दररोज येत असत प्रेमा
ने श्रीगुरू दत्तमहाराजांस त्यांनी एक दुपेटा
व सिदामान २० बिस्मुल्लीचे व दान दक्षणा
दावीस रूपये व तीर्थ अंगारा घेऊन त्या
२५ मुके करवीर वासी लोक बहुत येत आहेत
व दरबारी लोक सुद्धा जरूर येतात श्री
गुरूची पुजा पाठ करीतात ॥ १० ॥ ७ ॥ कृपा
श्रीगुरूदेव दत्तमहाराज यांचे आवडते शिष्य-


कृष्णा बुवा स्वार वनागे गोसावी ॥ यांची उत्तर
आर्धीलफाहु उत्तम कथा चमत्कार दिल्हा आहे :-
लुआमचा गोसावी आहे सरउछ कारांच्य उदेश
कोकणव संन्यास दिल्हा व पुढे तीर्थयात्रा क
णे सपाटवी केन ६३॥ पंढरी यात्रा आकेहीव
देहु जेजुरी गाणगापुर महाबळेश्वर पै
ठण जनार्दन घृष्णेश्वर जगनाथ रामेश्वर


७- गोकर्ण द्वारका भेट द्वारका जुनागड नरसिंमे
हताब दत्तगिरनार काठेवाड जोधारपुरी
मारवाड न६२॥ ईग्लांज कराची चिमासाहेब
महाराजांची समाधी सिंध देशाक कमनचेरफ
२६ गड मुक्तेश्वर ज्वालामुखी मानखंड बद्रिनारायण
बद्रिकेदार नेपाळ आवळीयाबुवा भीमाशंकर मा
ची झाडी रुद्राक्षाचे आगार पुष्कळ रुद्राक्ष
आणीले न६३ ८

# गोरखचिंचेखालील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, कोल्हापूर
# (श्री रामचंद्र घोरपडे यांचे खाजगी मंदिर)

आमचे पणजोबा स्व. रावजी रामजी मुधोळकर घोरपडे हे दर गुरुवार- दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला पायी चालत जात असत. काही वर्षानंतर एके दिवशी पादुकांचे दर्शन घेऊन, भोजन करुन थोडी वामकुक्षी करत असताना, त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात श्री दत्त प्रभु म्हणाले, ''रावजी तु आता माझ्याकडे येऊ नकोस, मीच तुझ्याकडे येईन. तु निर्धास्तपणे घरी जा.'' काही कालावधी नंतर एके दिवशी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज आमचे घराशेजारी असणाऱ्या गोरक्षवृक्षाच्या जाड मुळीवर बसलेले दिसले. बटु वेशधारी बघुन, कोण, कुठून आलास? वगैरे चौकशी केल्यावर मी वाडीचा कृष्णा आहे. अक्कलकोटावरुन आलो आहे असे सांगितले. त्यानंतर अधूनमधून महाराज यायचे, आमच्या घराजवळ बसायचे, शेतात फिरायचे, राहण्यास, मुक्कामास महिना-महिना रहायचे. आमक्या या ठिकाणी खोदा, पाणी लागेल असे सांगितले. त्या जागी विहिर काढल्यावर भरपूर पाणी लागले. त्यावर बारा एकर जमीन भिजू लागली.

स्व. रावजी मुधोळकर यांना मुळबाळ नव्हते. कृष्ण सरस्वती दत्त महाराज रावजींना म्हणाले, ''तू दुसरे घर कर म्हणजे तुला मुल होईल.'' महाराजांच्या आदेशानुसार त्यांनी दुसरे लग्न केले. लवकरच त्यांना मुलगा झाला. दत्त कृपेने मुलगा झाला म्हणून त्याचे नाव दत्तात्रेय ठेवले.

एके दिवशी महाराजांनी आमचे कडील घरगडी शिदबाला म्हणाले,''तू जुन्या पुलावरील दगडी कारखान्यात जा, त्या मुल्लापठाणला सांग मला पादुका पाहिजेत आणि तू पादुका घेऊन ये.'' शिदबा ने पैशाचा विषय काढल्यावर त्याला पुन्हा महाराज म्हणाले,''मी पादुका मागितल्या आहेत असे त्याला सांग तो पादुका तुला देईल.'' त्यानुसार शिदबाने दगडी कारखान्यात जाऊन तेथील मालकाला पादुका मागितल्या. शिदबाचे ऐकून त्या दगडी कारखान्याच्या मालकाला काहीतरी आठवले व खूप आनंद झाला. त्याने पूर्वीच तयार करुन ठेवलेल्या पादुका स्वखर्चाने बैलगाडीतून वाजत गाजत आमच्या घरी पोहोच केल्या. त्याचे कारण की, त्या कारखानदाराला पुर्वीच दृष्टांत देऊन पादुका करणेबद्दल महाराजांनी सांगितलेले होते. त्यानुसार पादुका तयार करुन तो कोण व कधी पादुका नेण्यासाठी येतो याची वाटच पाहत होता. असो सदर पादुकांना दुधाचा अभिषेक करुन त्यांची स्थापना गोरक्षवृक्षा शेजारी स्वत: महाराजांनी केली. त्या पादुकावर पाय ठेवून दही भात खाल्ला व या ठिकाणी नृसिंहवाडी आहे असे सांगितले. त्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य करुन सर्वांना जेवण केले. त्यानंतर महाराज प्रत्येक दत्त जयंतीला पुरणपोळीचे जेवण करण्यास सांगत. सदर पादुकांच्या ठिकाणी छोटे खाणी मंदिर व हॉल बांधला. श्री दत्त महाराजांनी या ठिकाणी पादुका स्थापन केल्यापासून भजन-पूजन, प्रसाद, महाप्रसाद चालू

व्यवस्थित चालू आहे. स्व. रावजी यांचे नंतर स्व. दत्ताजीराव, मग गणपतराव व त्यांच्या नंतर मी स्वत: रामचंद्र व माझे कुटुंबीय आम्ही जमेल तशी श्री दत्त महाराजांची सेवा करीत आहोत.

या मंदिरात पूर्वी बाबू जमाल फकिर महाराजांना भेटण्यास येत असत. तसेच अलिकडच्या काळातील शंकर महाराज (माळकर तिकटी वरील) चिले महाराज नेहमी महाराजांशी गप्पा मारणेस येत असत. तसेच बरेच साधुसंत (अंर्तज्ञानी) दर्शनास येतात.

वरील सर्व माहिती वाडवडिलांच्याकडून ऐकीव माहिती वरुन दिली आहे. माझ्यावर श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त प्रभूंचे अनंत उपकार आहेत ते शब्दांत सांगू शकत नाही..

शब्दांकन :- **श्री रामचंद्र गणपतराव घोरपडे**
**घर नं. २९७४, सी–वॉर्ड** ''गोरक्ष छाया'',
जैन बोर्डिंग समोर, कोल्हापूर



श्री मुधोळकर–घोरपडे यांचे
श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मंदिर,
कोल्हापूर



या गोरक्षचिंचेच्या भव्य वृक्षााखाली
श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी श्री
पादुकांची स्थापना केली आहे. तसेच ते या
गोरक्षचिंचे खाली येवून बसत असत.

# श्री रांगोळी महाराज स्थापित मालवण येथील श्री स्वामी मंदिर

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालडीगाव हे कालावली खाडीच्या दोन्ही बाजूंनी बसलेले छोटेखानी गाव. माड, पोफळीच्या, केळींच्या बागा, आंबा, फणस, काजूंची झाडे यामुळे हा भाग आजही रमणीय वाटतो. या गावात रामशेठ बाबाजी बावडेकर व विष्णूशेठ बाबाजी बावडेकर हे दोन बंधू सराफीचा व्यवसाय करीत होते. लहान असतानाच माता-पित्यांचे त्यांचे छत्र हरपले. जिद्दीने दोन्ही भाऊ पुन्हा उभे राहिले. मालडी येथील सराफीचा व्यवसाय कमी झाल्याने ते बावडा संस्थानात सराफी व्यवसायासाठी आले. बावडा काय किंवा मालडी काय सगळीकडे व्यवसायाची परिस्थिती सारखीच होती. आपण चांगले कलाकार असूनही आपल्याला काम नाही ही या दोन्ही भावांची खंत होती. त्यावेळी बावडा संस्थानात पंडित नावाचे संस्थानिक कारभार करीत होते. त्यांनी त्यांची भेट घेतली. श्री पंडित संस्थानिकांनी श्री छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे श्री रामशेठ बावडेकर यांच्या कामाची/कलेची शिफारस केली. त्या शिफारसपत्रावरुन राजर्षी शाहू महाराजांनी त्या दोन्ही भावांना आपल्या रत्नशाळेत रत्नपारखी म्हणून नोकरी दिली. त्याच बरोबर पालखी, घोडे यांचाही मान दिला. लवकरच दोन्ही बंधूंचा लग्न सोहळाही पार पडला. रामशेठ यांच्या पत्नीचे नाव सिताबाई तर विष्णुशेठ यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई होते. रामशेठ आणि सिताबाई यांना मुले नव्हती. मात्र विष्णूशेठना शिवराम, वामनराव ही दोन मुले व जनाबाई, वेणूबाई, कानूबाई अशा तीन मुली झाल्या. रामशेठ अपत्यहीन असले तरी विष्णूशेठची मुले ही आपलीच मुले आहेत असे समजून त्यांनी त्यांचे पालन पोषण, कौतुक, लाड केले.

विष्णूपंतांचा मुलगा शिवराम यांच्यावर काकी सिताबाईचा विशेष जीव होता. शिवराम लहानपणापासून घरभर रांगोळ्या घालून घर-अंगण सजवायचा. कधीकधी शिवराम एकटाच बसून ध्यानस्थ बसून राहायचा. शिवराम शाळेत जायचा पण शाळेत त्याचे लक्ष अभ्यासाकडे नसायचेच. सारे लक्ष चित्रकलेकडे असायचे. शाळेत इतर विषय शिकवण्यापेक्षा चित्रकला हाच विषय त्यांना आवडायचा. जसा-जसा शिवराम मोठा व्हायला लागला, तसा-तसा शिवराम आपल्या तंद्रीतच राहू लागला. त्यामुळे त्याच्या आई-वडिलांना व काकींना त्याच्याविषयी चिंता वाटू लागली. या मुलाचे आता पुढे कसे होणार हा प्रश्न भेडसावू लागला.

कुणीतरी सिताबाईंना सांगितले की, कुंभारगल्लीत श्रीकृष्ण सरस्वती नावाचे साधुपुरुष आहेत. त्यांच्याकडे शिवरामला घेऊन जा म्हणजे शिवराम व्यवस्थित मार्गाला लागेल. त्यांच्या घरापासून कुंभार गल्ली जवळच होती. सिताबाई शिवरामला बरोबर घेऊन कुंभारगल्लीतील श्रीकृष्ण सरस्वतींच्या मठाकडे गेली. त्यावेळी ताराबाईच्या घरात उंचच उंच वाढलेल्या औदुंबराच्या झाडावर श्रीकृष्ण सरस्वती चढून बसले होते. शिवरामला पाहताच श्रीकृष्ण सरस्वती झाडावरुन खाली उतरले आणि आपल्या आसनावर बसले. सिताबाईने शिवरामला श्रीकृष्ण सरस्वतींच्या पायावर घातले. श्रीकृष्ण सरस्वतींनी शिवरामच्या चेहऱ्यावरुन हात फिरवले आणि त्याच्या

कानात काहीतरी सांगितले आणि आपल्या अंगावरील भगवी शाल शिवरामच्या खांद्यावर पांघरली. तसेच बंद मुठीतून एक वस्तू आणून ती शिवरामच्या भगव्या फडक्यात बांधून तो फडका त्यांनी शिवरामच्या गळ्यात बांधला व सिताबाईंना सांगून टाकले ''आजपासून हा मुलगा आमचा झाला. तू त्याला घरी घेऊन जा. योग्यवेळी तो इथे येईल. '' श्रीकृष्ण सरस्वतींनी त्यांना श्रीस्वामी समर्थांनी जे आत्मलिंग दिले होते. ते आत्मलिंग फडक्यात बांधून त्यांनी शिवरामच्या गळ्यात बांधले होते. शिवरामने ती वस्तू आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्याजवळ बाळगली होती. छत्रपती शाहूमहाराजांच्या पदरी नोकरी असतानाच शिवरामने आपला रांगोळीचा छंद जोपासला होता. इचलकरंजीच्या लवेकर घराण्यातील गंगूबाईशी शिवरामचा विवाह झाला. शिवराम पंतांना तीन मुले झाली. शामराव, बाबूराव आणि द्वारकाबाई. श्रीकृष्ण सरस्वतींच्या मठीत गेल्यापासून हळूहळू ते पूर्ण विरक्त होत चालले होते. स्वामींच्या समाधीनंतर आता त्यांचे वास्तव्य मठीतच होवू लागले. शिवरामपंत आता तर शाहू महाराजांच्या रत्नशाळेकडे जाईनासे झाले. कोल्हापूरात कोठे काही कार्यक्रम असला की शिवरामपंतांना रांगोळी घालण्यासाठी निमंत्रणे येवू लागली. महालक्ष्मीच्या मंदिराच्या प्रांगणात, श्रीकृष्ण सरस्वतींच्या पालखीपुढे अशि काही रांगोळी शिवरामपंत घालीत की पाहणारा आश्चर्यचकीत होऊन जाई. छत्रपती शाहू महाराजांची मुलगी राधाबाई यांच्या विवाह प्रसंगी वरातीत, रस्त्यावर सुमारे दीड मैल अंतराची दीर्घ अशी रांगोळी शिवरामपंतानी घातली. या रांगोळीवर बेहद्द खुश होऊन छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या हातातील सोन्याचे कडे काढून शिवरामपंत बावडेकरांच्या हातात घातले. आणि शिवरामपंतांचे 'रांगोळी महाराज'' असे नाभाभिधान करुन अत्यंत श्रध्देने आणि भक्तीभावाने त्यांना नमस्कार केला.

रायाजी हिंदळेकर व राजाराम अंब्रे यांचे मालवणच्या सोमवारपेठेत दुकान होते. दुकानासाठी रायाजी हिंदळेकर कोल्हापूरहून माल खरेदी करण्याचे काम करीत. रायाजी कोल्हापूरला गेले की तेथील कुंभारगल्लीतील श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या मठात दर्शनासाठी जात. त्यामुळे रायाजींची व रांगोळी महाराजांची दाट ओळख झाली. रायाजींशी ओळख झाल्यानंतर श्री रांगोळी महाराज मालवणला त्यांच्याकडे वरचेवर जावू लागले. रांगोळी महाराजांच्या मालवणातील ओळखी वाढत चालल्या होत्या. आता रांगोळी महाराज विरक्त अशा संन्यासाचे जीवन जगत होते. रांगोळी महाराजांनी मालवणला राहण्याचा निश्चय केला होता. रायाजी हिंदळेकर व नारायणराव धुरी यांची तर महाराजांनी मालवणला राहावे अशी तीव्र इच्छा होती. रायाजी त्यावेळी अंब्रे यांच्या माडीवर राहात असत. रायाजी ब्रम्हचारी होते. मालवणला रांगोळी महाराज कायम वास्तव्याला आले. ही बातमी समजल्याने रायाजी हारखून गेले. तेथे माडीवर रांगोळी महाराजांनी श्री स्वामी समर्थ अक्कलकोट, आपले गुरु श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या तसबिरींची स्थापना केली. आजही या तसबिरी आश्रमात आहेत. हेच

मालवणमधील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे मंदिर आहे.

मालवणमध्ये श्री रांगोळी महाराजांचे अनेक वर्षे वास्तव्य होते. सन १९२४ सालापासून रांगोळी महाराजांचा मालवणशी संबंध होता. परंतु १९३३ सालापर्यंत ते मालवणला येऊन–जाऊन असत. १९३३ ते १९४७ या काळात म्हणजेच देहावसान होईपर्यंत ते मालवण सोडून कोठेही गेले नाहीत. मालवणवर त्यांचे विलक्षण प्रेम होते. अंब्रे यांच्या माडीवरच मठात त्यांचे वास्तव्य असे. अनेकांचा त्यांनी उद्धार केला. वयाच्या ८०व्या वर्षी वैशाख शुद्ध त्रयोदशी ५ मे १९४७ रोजी त्यांनी आपली अवतार समाप्ती केली.

महाराजांच्या निधनानंतर श्री बाबासाहेब अंब्रे आणि त्यांच्या पत्नी सौ. तारा यांनी स्थानिक लोकांच्या सहकार्याने एक ट्रस्ट स्थापन करुन भव्य असा मठ म्हणजेच आश्रम मालवणला उभारला आहे. बुधवार दि. २८ एप्रिल १९९९ वैशाख शुध्द त्रयोदशीला प. पू. डॉ. शशिकांत चिटणीस महाराज यांच्या हस्ते रांगोळी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

संदर्भ ग्रंथाचे नाव : **श्री स्वामीभक्त श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे शिष्य सद्‌गुरु श्री रांगोळी महाराज**

लेखकाचे नाव : **श्रीकांत देसाई**



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठ/श्री रांगोळी महाराज मठ, मालवण

# ॥ श्री गुरु– स्मृती ॥
## श्री गुरुसेवा भक्तपरिवार बडोदा

श्रीमत् ब्रम्हचारी (बालानंद स्वामी) यांचा जन्म फाल्गुन वद्य ४ इ. स. १८७२ रोजी भोर येथे झाला. श्रींचे पूर्ण नाव मोरेश्वर बाळकृष्ण होनप होते. भोरच्या एका जहागिरदार कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते. जहागिरीबाबत भावकीमध्ये वितुष्ट आल्याने त्यांच्या आईने भोर हे गाव कायमचे सोडले व बडोद्यास राहावयास आल्या. त्यावेळी श्रींचे वय अंदाजे ८ ते १० वर्षे असावे. श्रींचे घराणे देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हणांचे होते. त्यांची आई त्यांना बाळू म्हणे.

बाळूची आई बाळूला घेऊन बडोद्यातील भुतडीझापा परिसरात राहु लागल्या. गरीबीमुळे आई कोणाकडे तरी स्वयपांकपाणी करी आणि बाळू माधुकरी मागून व वार लावून अभ्यास करु लागला. बाळू हा अतिशय हुशार विद्यार्थी होता. उर्दू, पर्शियन, गुजराती, मराठी इत्यादी भाषेत बाळू प्रविण होता. बाळूचे शिक्षण इंग्रजी पाचवी–सहावी पर्यंत झाले होते. बाळू यांना आपण श्री ब्रम्हचारी महाराज (बालानंद) श्री म्हणून येथून उल्लेख करुया. श्रींनी शाळेत असताना बापूराव कोराण्णे या गायन मास्तरांच्याकडे संगीत शिक्षणाचा उत्तम अभ्यास केला होता. शास्त्रीय गायनात नावारुपाला आलेले पंडित भास्करबुवा बखले हे श्रींचे मित्र होते.

शाळा सोडल्यानंतर श्रींनी बडोदा सोडून आपल्या आईला घेऊन ते गाणगापूरला आले. तेथे आल्यावर स्नान, पूजा, अनुष्ठान वगैरे कार्यक्रम यथाविधी सुरु झाले. श्रीनृसिंह सरस्वती दत्त महाराजांच्या पादुका हेच त्यांचे दैवत झाले. त्यावेळी त्यांचे वय अंदाजे १८ वर्षांचे असावे. मंदिरातील एक पूजारी श्री वेदमूर्ती देवणभट्टजी श्रीकल्लेश्वर देवस्थानात राहात असत. श्री त्यांच्याकडेच राहू लागले. त्यांना त्यांच्या श्रीनृसिंह सरस्वती दत्त महाराज यांच्या सेवाकार्यात श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज दररोज त्यांना मदत करु लागले. देवण्णभट्ट स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांच्याजवळ राहात असलेल्या श्री ब्रम्हचारी स्वामी महाराजांच्यावर देवसेवेची कामगिरी येवून पडली. अशा प्रकारे बरेच दिवस गेले. सेवा, अनुष्ठान वगैरे चालू असताना श्रीनृसिंह सरस्वती दत्त महाराज/ श्रीदत्त प्रभू यांचा त्यांना आदेश झाला. तुझे या क्षेत्रीचे सेवा–कर्तव्य पूर्ण झाले आहे. ''आता तू श्री क्षेत्र कोल्हापूर येथे जा व तेथे कुंभार स्वामी या नावाने प्रसिध्द असलेले यति श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे दर्शन घे. ते महान साधु तुला तुझा पुढचा मार्ग दाखवतील. त्यांच्या आज्ञेचे पालन करावे व त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे जिवन व्यतित करावे. जरुर पडेल तेव्हा इथे ये, आम्ही सदैव येथे आहोतच.पण आता तू इथे न थांबता कोल्हापूरला निघून जा.''

श्री ब्रम्हचारी स्वामींनी लहानपणी शाळा सोडल्यावर आईस बरोबर घेऊन श्रीक्षेत्र गाणगापूर

येथे दत्त सेवे करीता गेले. काही वर्षे सेवा, उपासना केल्यावर श्री दत्तगुरुंनी त्यांना कोल्हापूर निवासी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज स्वामी यांच्याकडे जाण्याची आज्ञा केली. श्रींनी (बाळूने) व त्यांच्या आईनी श्री दत्तप्रभूंची आज्ञा शिरोधार्य मानून गाणगापूर सोडले व कोल्हापूरला आले. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज स्वामींनी त्यांना सेवेत ठेवून घेतले. काही वर्षे सेवा व उपासना झाल्यावर त्यांना योगमार्ग व उपासनेसाठी ईश्वर इच्छेने शिनोर निवासी श्री सच्चिदानंद स्वामींच्याकडे पाठविले. श्री सच्चिदानंद स्वामींनी त्यांना आतूर संन्यास दिला. श्री सच्चिदानंद स्वामींनी योग्य ते शिक्षण देवून त्यांना गुजरात/बडोदा भागात ईश्वरी कार्य करण्यास पाठविले. श्री सच्चिदानंद स्वामी हे श्री स्वामी समर्थांचे शिष्य होते. श्री टेंबे स्वामी महाराज व श्री गांडा महाराज व श्री रंगावधूत स्वामी महाराज यांच्या कार्याप्रमाणेच श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज यांनी गुजरात  व इतर भागात श्री दत्त संप्रदाय वाढविला, रुजविला, दत्त भक्तांना प्रेम देवून मार्गदर्शन केले. आजही त्यांचा भक्तपरिवार महाराष्ट्र/ कर्नाटक/गुजरात इत्यादी भागात विखुरलेला आहे. श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज यांनी चैत्र वद्य त्रयोदशी बुधवार दिनांक २० एप्रिल १९५५  (श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी)रोजी समाधी घेतली.

सन १९६२ साला पासून श्रींचे एक निस्सीम भक्त साळुंखे हे श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज यांच्यासाठी घर बांधून देण्यासाठी खटपट करु लागले. पीरामीतर, कला भवनच्या मागे बडोदा येथे एक घर घेण्यात येवून एक ट्रस्ट करण्यात आला व घराची चांगली दुरुस्ती करण्यात येवून या घराला गुरुसेवा हे नाव देण्यात आले. हेच श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज यांचे बडोदा येथील मंदिर / मठी/आश्रम आहे.


श्रींच्या निर्वाण समयी पुढील २१ भक्त मंडळी हजर होती १) भारतीबुवा २) काशिबाई ३) तेंडूलकर मास्तर ४) वैद्यराज दादा हर्डीकर ५) वैद्यराज दत्तोपंत देव ६) निळकंठ कृष्ण लेले ७) भैय्यासाहेब दशपुत्रे ८) राजाभाऊ कावळे ९) लालजी एकबोटे १०) हरिश्चंद्र खाडे ११) शंकरराव संत १२) काका कानिटकर १३) पद्माकरराव पुरोहित १४) विष्णुपंत संत १५) रमणलाल जामदार १६) रानडे मास्तर १७) सुप्पा १८) सौ. कानिटकर १९) सौ. संत वहिनी २०) द्वारका कानिटकर २१) कानिटकरांच्या सुनबाई वरील सर्व भक्त मंडळींनी व गुरुसेवा भक्त परिवार बडोदा यांनी श्री ब्रम्हचारी स्वामी महाराजांचे कार्य/ उत्सव/ गाणगापूर/ कोल्हापूर येथील सर्व धार्मिक कार्यक्रम सुरळीत चालू ठेवले होते/आहेत. आत्ता सध्या श्री गुरुसेवा आश्रमाची/ मंदिराची व्यवस्था/श्री स्वामींनी आखून दिलेले धार्मिक कार्यक्रम श्री सदानंद खाडे, श्री किशोर लेले व इतर भक्तमंडळी पहात असतात.

संदर्भ ग्रंथांचे नाव - **श्री गुरु-स्मृती**

लेखकाचे नाव- **निलकंठ कृष्ण लेले, बडोदा**



श्री गुरु दरबार- श्री गुरुस्मृती मठी, बडोदा



श्री सच्चिदानंद स्वामी महाराज व श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज, बडोदा

# मिरज येथील पवार गल्ली भुईबोळ येथील
# श्री जाधव यांच्या श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीची माहिती

स्वर्गीय रामचंद्र सखाराम जाधव यांचा जन्म कामठी (जि. सातारा) येथे १८८९ साली झाला. त्यांच्या आईचे नाव मुक्ताबाई व वडिलांचे नाव सखाराम होते. त्यांचे वडिल शेती करत. १८९७ साली आलेल्या प्लेगाच्या साथीमध्ये/ व पडलेल्या मोठ्या दुष्काळात त्यांचे वडिल सखाराम जाधव मरण पावले. संपूर्ण कामठी गावच स्थलांतरीत झाले. स्व. रामचंद्र जाधव हे आपल्या आई, दोन बहिणी व भाऊ यांना घेवून कामठी गाव सोडले. पानमळ्याचीवाडी, आंबेदरे इत्यादी गावे फिरत फिरत कोरेगाव रेल्वेस्टेशनवर येवून उदरनिर्वाह करु लागले. त्यांची आई मोलमजूरी करी, त्यांचा भाऊ मारुती हा एका मारवाड्याच्या कापड दुकानात काम करी. लवकरच अविवाहीत मारुतीही वारला. स्व. रामचंद्र हे कोरेगाव रेल्वेस्टेशनवर स्टेशनमास्तराची किरकोळ कामे करीत असत. स्टेशनमास्तरची त्यांच्यावर मर्जी बसली व त्यांनी १९०७ साली स्व. रामचंद्र जाधवना रेल्वेमध्ये नोकरी लावली. सन १९१० मध्ये त्यांची बदली मिरज रेल्वेस्टेशन येथे झाली. गदग, अळनावर इत्यादी ठिकाणीही त्यांची बदली झाली. शेवटी ते मिरज रेल्वेस्टेशन येथेच बदलीवर कायमपणे राहिले.


मिरज स्टेशनच्या व पंढरपूर रेल्वेस्टेशनच्या दक्षिण बाजूस खोल्यांची जी रेल्वे चाळ होती. तेथे स्व. रामचंद्र जाधवांचे वास्तव्य होते. तसेच त्यांच्या शेजारी स्व. यल्लाप्पा तुपारे (उद्योगपती विश्वासराव चौगुले, गोवा यांच्या आईचे वडिल), शंकरराव पांढरे, स्व. भिमाण्णा विजापूरे, स्व. ताराबाई पाटोळे इत्यादी रेल्वे कर्मचारी शेजारी राहात असत. स्व. रामचंद्र जाधव यांना दोन मुले त्यांची नावे स्व. यशवंत व दत्तात्रय होते. दोघेही रेल्वेत नोकरी होते. कोल्हापूरचे श्री नामदेव महाराज चव्हाण व श्री कृष्णाबुवा स्वार हे श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे शिष्य असून त्यांचे सन १९४० च्या आसपास पासून स्व. रामचंद्र जाधव यांच्या घरी जाणे-येणे होते. श्री कृष्णाबुवा यांनी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या चर्मपादुका व टोप्या स्व. रामचंद्र जाधव यांच्या थोरल्या सुनबाई स्व. आक्काताई जाधव यांच्याकडे अंदाजे सन १९४० ला पुजेसाठी दिल्या. अंदाजे १९४४ साली स्व. रामचंद्र जाधव यांनी पवार गल्ली, विठ्ठल मंदिराजवळील भुयाच्या बोळात एक जुने घर विकत घेऊन श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची प्रतिमा, चर्मपादुका, श्रींच्या टोप्या यांची पूजा चालू केली. पुढे श्री नामदेव महाराज चव्हाण व श्रीकृष्ण बुवा यांचे येणे-जाणे सातत्याने स्व. रामचंद्र जाधव यांच्या घरी चालू होते. अशा रितीने श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे कार्य स्व. रामचंद्र जाधव यांच्या घरातून/ मठीतून सुरु झाले.

ते आजतागायत सुरु आहे. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची जयंती/ पुण्यतिथी आजही मोठ्या प्रमाणात स्व. रामचंद्र जाधवांच्या मठीत मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येते.

शब्दांकन- **श्री प्रल्हाद जाधव, मिरज**



श्री स्वामींच्या चर्मपादूका



श्री स्वामींची टोपी श्री जाधव मठी, मिरज

# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, मिरज

मी सर्वसाधारण श्री गणेश चतुर्थी १९७५ सालापासून कुंभार गल्लीतील श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला नियमीतपणे जावू लागलो. स्व. आक्काताई जाधव व स्व. लक्ष्मीबाई झेंडे यांच्यामुळेच मी अध्यात्मिक मार्गात आलो. प. पू. माईसाहेब शिर्के, कोल्हापूर यांचेकडून श्री दत्त महाराजांचा फोटो घेऊन पडक्या घरातच गादी स्थापन करुन श्री सेवा चालू केली. परंतु हळूहळू श्री दत्त महाराजांच्या दर्शनाला/आरतीला लोकांची गर्दी वाढू लागली. नवीन जागा घेऊन श्रींची मठी बांधावी असे वाटत होते. तथापि आर्थिक अडचणीमुळे ते घडणे शक्य वाटत नव्हते. परंतु ते दत्त महाराजांच्या कृपेने ते शक्य झाले. सन १९८० च्या दरम्यान प. पू. माईसाहेबांनी श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा मोठा फोटो दिला. याच दरम्यान दगड, विटा, मातीत तीन खोल्या बांधण्यात आल्या. वरच्या मजल्यावर एक खोली, माळवद, पत्रा अशी एक इमारत बांधली. या इमारतीस '' श्री दत्त मठी'' नाव देवून श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, श्री स्वामी समर्थ, श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्री शिवचिदंबर, मुरगोड यांच्या मोठ्या तसबीरींची स्थापना प. पू. माईसाहेब शिर्के, प. पू. रमेश महाराज कुलकर्णी, अक्कोळ, स्व. बाळासाहेब शिर्के यांच्या हस्ते करण्यात आली. वास्तुशांती व महाप्रसाद करण्यात आला. सायंकाळी स्व. बाळासाहेब शिर्के यांची हरिभजन झाले. अशा रितीने श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे/ गुरुदेवांचे जग उद्धाराचे कार्य या छोट्याशा श्री दत्त मठीतून सुरु झाले.

दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढतच चालली. त्यामुळे नवीन मठी बांधण्याचे ठरविण्यात आले. याच दरम्यान आम्हाला लगत असलेली स्व. मारुती बेडगे, स्व. किसन बेडगे यांची जागा विकत घेण्याचे ठरविण्यात आले. ही जागा मिळवून देण्याबाबत श्री धोंडिराम केशव म्हेत्रे, श्री सावंता म्हेत्रे या बंधुंनी विशेष प्रयत्न केले. किंबहुना त्यांच्या प्रयत्नामुळेच ही जागा आम्हाला मिळाली. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. आता श्री गुरु देवांचे कार्य जोमाने सुरु झाले. सर्व भक्तांचा समावेश असावा या दृष्टीकोनातून ॲड. कोतवालसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ई. ५९३ दि. २९/६/१९८५ अन्वये हा सार्वजनिक ट्रस्ट स्थापन करण्यात आला.

दरम्यानच्या काळात स्व. बाळासाहेब शिर्के यांनी मला बडोद्याच्या श्री ब्रम्हचारी स्वामी महाराज यांचे चरित्र ''श्री गुरु स्मृती'' वाचायला दिले. श्री ब्रम्हचारी स्वामीजी हे श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे अंतरंगातील शिष्य होते. त्यांचे चरित्र वाचून मी अत्यंत प्रभावीत झालो. मिरजेतील एक सद्‌गृहस्थ श्री शिवरुद्र बसरगे काका हे टेलिफोन खात्यातून सेवानिवृत्त होवून बडोद्याला स्थायिक झाले होते. त्यांना तीन मुले. श्री प्रमोद हे मिरजेला वास्तव्य करुन आहेत, डॉ. श्री नरेंद्र बसरगे हे कोल्हापूरला वास्तव्य करुन आहेत तर डॉ. श्री महेश हे बडोद्याला वास्तव्य करुन आहेत. डॉ. श्री महेश बसरगे यांचे लग्न बडोदा मुक्कामी दि. २१/११/१९९२ रोजी होते. या लग्नासाठी मी श्री प्रमोद बसरगे यांच्या बरोबर प. पू. रमेश महाराज कुलकर्णी, अक्कोळ,

ॲड. श्री कोतवालसाहेब, ॲड. श्री आप्पा कुडचे, श्री चंद्रकांत कुरणे, श्री सावंता म्हेत्रे यांच्यासह लग्नासाठी बडोद्याला गेलो. लग्न झाल्यानंतर श्री सोरटी सोमनाथ, श्री द्वारका, श्री बेट द्वारका, गिरनार, गरुडेश्वर, नारेश्वर इतर महत्वाची तिर्थक्षेत्र पाहिली. तसेच बडोद्याला पिरामित्तर रोडवरील श्री ब्रम्हचारी स्वामींची मठी पाहिली. मला अतिशय आनंद झाला. बडोद्याहून मिरजेला परत आलो ते एका नवीन मठी बांधण्याच्या संकल्पानेच. श्री जयसिंगराव मोरे कोल्हापूरातील नामांकित आर्किटेक्ट इंजिनिअर आहेत. त्यांचा माझा परिचय डॉ. श्री शिरढोणे यांच्यामुळे झाला होता. मी मोरे साहेबांना भेटलो. नवीन मठीची त्यांना कल्पना दिली. तळमजल्यावर श्री दत्त मंदिर, दुसरा मजला बाहेर गावाहून येणाऱ्या भक्तांसाठी निवासस्थान, तिसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांना राहण्याची सोय अशी इमारत रचना त्यांनी सांगितली व इमारतीचा आराखडा, नकाशे बनविण्यास सांगितले.

प्रत्यक्ष लवकरच कामाची सुरुवात झाली. सुरु होवून दिनांक ३/८/१९९५ रोजी या नवीन तीन मजली श्री दत्त मठीचे उद्‌घाटन, वास्तूशांती झाली. या निमित्त श्री ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह ठेवण्यात आला. भजन, किर्तन, प्रवचन व इतर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले. हा सर्व कार्यक्रम प. पू. रमेश महाराज कुलकर्णी, अक्कोळकर, प. पू. रामराय केळकर महाराज (दादा), प. पू. सुरेशपंत बाळेकुंद्रीकर, प. पू. श्री प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, प. पू. गोविंद महाराज कुलकर्णी, प. पू. केशवराव गोखले, प.पू. श्री चंद्रशेखर केळकर महाराज, प. पू. श्री गुरुनाथ कोटणीस महाराज, श्री महेश शिर्के यांच्या उपस्थितीने व आशीर्वादाने उद्‌घाटन सोहळा सुंदर रितीने पार पडला.

शब्दांकन : **श्री झेंडे महाराज, मिरज**




श्री श्रीकृष्ण सरस्वती
दत्त महाराज मठी, मिरज

# श्री बहादूरवाडी (जि. कोल्हापूर) येथील
# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या मठाची माहिती

श्री रमानंद सरस्वती महाराज उर्फ रमाकांत नेसरीकर यांचा जन्म सोमवार दि. ९/१२/१९३५ रोजी शहापूर जि. बेळगाव येथे झाला. त्यांच्या मातेचे नाव अनुसया, वडिलांचे नाव हणमंत. रमाकांता यांचे आजोबा हरिपंत नेसरीकर हे अत्यंत सद्‌वर्तनी व मोठे निष्ठावंत होते. दत्तभक्त होते. त्यांच्या या प्रखर दत्तभक्तीचा प्रभाव त्यांच्या पुढील पिढ्यांवरही पडल्यावाचून राहिला नाही. त्यांच्या दत्तभक्तीमुळे संपूर्ण नेसरीकर घराण्याला एक प्रकारचा उजाळा मिळाला. वास्तविक पाहिले तर रमाकांताचे कुलदैवत मार्मा-गोवा येथील सप्तकोटेश्वर महादेव हे आहे. परंतु हरिपंतांच्या दत्तोपासनेचा असा काही प्रभाव पडला की त्यांच्या पुढील पिढीतील वंशजांनी दत्ताचीच भक्ती व उपासना ओघानेच स्वीकृत केली व आजही तीच उपासना सातत्याने चालू आहे. रमाकांताच्या नेसरीकर घराण्याचे ज्ञात असलेले मूळ पुरुष अनंत दिवेकर हे होत. ते दिवाडगाव (गोवे) येथे राहात असत. पुढे या घराण्यातील कर्ता पुरुष नेसरी येथे आला व तेव्हापासून त्यांना नेसरीकर या नावाने संबोधण्यात येते.

रमाकांताची मातोश्री अनसूया या शहापूरचे विठ्ठलराव सराफ यांच्या कन्या होत. नेसरीकर हे देशस्थ यजुर्वेदी शाखेचे सारस्वत ब्राम्हण होते. त्यांचे गोत्र अत्री. वयाच्या जवळजवळ सहाव्या वर्षापासून रमाकांताला एक प्रकारच्या व्याधीने पछाडले होते. त्या बालवयात रमाकांताला वारंवार मेंदूचे, झटके येऊन तो बेशुध्द होई. त्यामुळे घरातील मंडळींना त्याच्या बद्दल काळजी वाटे. त्यांनी स्थानिक डॉक्टर व वैद्य यांना रमाकांताला दाखवून पुष्कळ औषधोपचार करुन पाहिले, परंतु गुण म्हणून काही दिसेना. मेंदूचा झटका येण्यापूर्वी रमाकांताच्या मनात कसल्यातरी भीतीचा संचार होत असे. कधी कधी डोळ्यासमोर उग्र व भेसूर अशी मूर्ती दिसावी, अंगाला कंप यावा व बेशुध्द होऊन निपचीत पडावे. कधी कधी त्या उग्र व भव्य मूर्तीने आपले तेज:पूंज डोळे विस्फारुन त्याच्याकडे एकसारखी नजर भिडवावी व त्यामुळे रमाकांताच्या अंगात भीतीने कापरे भरावे व शेवटी तो बेशुध्द व्हावा. असे प्रकार वारंवार घडत. तो बेशुध्द होऊन कुठे व केव्हा पडेल याचा नेम नव्हता. असे अनिष्ट प्रकार वारंवार होऊ लागले. लोकांना वाटे हा मुलगा वेडा आहे. कोणी म्हणत याला फेफरे आले, अनेकांनी त्याला पिसा, पिसा म्हणून चिडविण्यास कमी केले नाही. अशा रीतीने लोक रमाकांताकडे एक खुळा व वेडा मुलगा म्हणून पाहू लागले. त्याचा परिणाम आईबापांच्या मनावर होणे अपरिहार्य होते. त्यांच्या मनाला हे पाहून फार दु:ख होई. रमाकांताच्या व्याधीवर अनेक वैद्यकीय उपाय करुनही जेव्हा गुण म्हणून येईना तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला विजापूर येथील त्याचे चुलते शांताराम नेसरीकर यांच्याकडे पाठविले. हेतू असा की हवापालट झाल्याने तरी रमाकांताला बरे वाटावे. शांताराम

हे तेथे जिल्हा बोर्डात लिपिक म्हणून नोकरी करीत.यावेळी रमाकांताचे वय नऊ वर्षांचे असावे. शांताराम काकाने सुध्दा रमाकांताची प्रकृती सुधारावी म्हणून अनेक उपाय करुन पाहिले परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. शेवटी त्यांच्या शांताराम काकांनी त्यांना परत बेळगावला घरीआणून सोडले. यानंतर रमाकांतांना बेळगावहून त्यांना सोलापूरच्या काकांच्याकडे पाठविण्यात आले. त्यांना तेथे सुध्दा त्यांच्या तब्येतीत फरक पडला नाही. सोलापूरहून रमाकांत पुन्हा बेळगावला आले. कांही काळ बेळगावला दुर्गाबाई विडीकर यांच्याकडे राहू लागले. त्यांचीं सेवा करु लागले. दुर्गा आजी या दि. १५ ऑगस्ट १९४८ रोजी स्वर्गवासी झाल्या. रमाकांतावर या दु:खाचा आघात झाला. त्यांना अगदी उदासपणे वाटू लागले. त्यांचे चित्त कोणत्याही कामात लागेना. तरीपण ते बेळगाव येथील त्यांच्या ''ओगले ग्लास'' दुकानात जाऊन बसत. त्यावेळी त्यांच्या नजीकच श्री पंतनाथ महाराज यांचे वास्तव्य होते. हुबळीचे प्रख्यात स्वामी सिध्दारुढ स्वामी यांचे बंधू सिध्दावधूत महाराजांचे चिरंजीव म्हणजेच पंतनाथ महाराज हे होत. लवकरच या पंतनाथ महाराजांची श्री रमाकांतांवर कृपा झाली. पंथनाथ महाराज हे थोर संत व त्रिकाल ज्ञानी योगी पुरुष होते. त्यांच्या पहिल्या भेटी पासून रमाकांताच्या मनातील संकोच, भिती नाहीशी झाली. श्री पंतनाथ महाराजांनी त्यांच्या मागील जन्मातील सत्कर्मे व मागील जन्मातील पुर्वसंचित या विषयीची संपूर्ण माहिती रमाकांतांना दिली. मागील जन्माचे गुह्य उकलून दाखविले. नंतर पुढे श्री रमाकांत हे वडिलांच्या आज्ञेप्रमाणे निपाणीला आले. त्यावेळी त्यांचे वय २२-२३ वर्षांचे होते. रमाकांतांनी निपाणीचे दुकान सरासरी पाच वर्षे चालविले. निपाणीत त्यांनी भारत टूथ पावडर, सुवर्णकांती गंध, मसाल्याचा बाप या लोक उपयोगी वस्तू तयार करुन विकण्याचा उद्योग केला. त्यांचे शिक्षण कसेबसे सहावी पर्यंत झाले असले तरी या उद्योगात त्यांना बऱ्यापैकी यश मिळाले होते. यात त्यांना स्व. विष्णू रामचंद्र आमले यांनी मार्गदर्शन केले होते. तथापि त्यांच्या मनाने मी आता एकाकी आहे. जग आपले नाही व आपण जागाचे नाही ही दारुण दशा भावी जीवनाबद्दल नाउमेद करु लागली. दिवसेंदिवस ते वैफल्यग्रस्त होऊ लागले. सन १९५९ सालापर्यंत त्यांचे जवळचे मनोहर काका यांच्या बरोबर ते नरसोबावाडीला दर्शनाला गेले. तेथेच त्यांना श्री दत्त महाराजांनी अकल्पीत दृष्टांत दिला. या दृष्टांताचा/ स्वप्नाचा अर्थबोध रमाकांतांना लवकरच झाला. पुढे लवकरच श्रीं गंगावेशीतील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या मठीत आले व नामस्मरणाची सेवा करु लागले. तसेच ते कुंभार गल्लीतील ताराई शिर्के यांच्या मठीत जाऊ लागले. लवकरच त्यांची गाठ कोल्हापूर येथील प. पू. श्रीखंडे महाराज, प. पू. चिले महाराज यांच्याशी पडून त्यांचा परमार्थाचा मार्ग सुखकर झाला. त्यांनी अत्यंत कडक असे मौन व्रत धारण करुन माधुकरी मागून फक्त पाच घास भक्षण करुन ते उच्च कोटीतील सत्पुरुष बनले. त्यांना दत्त पदाचा उच्च लाभ झाला. त्यांनी पुष्कळ तिर्थाटन केले. कोल्हापूरातील स्वर्गीय शंकरराव भोसले हे रमानंद सरस्वती महाराजांचे अनुग्रहीत

शिष्य होते. त्यांची बहिण बहादूरवाडीला दिली होती. त्यांचे नाव अनसूयाबाई आनंदराव घोरपडे होते. स्व. अनसूयाबाई या सुध्दा श्री रमानंद सरस्वती यांच्या शिष्या होत्या. त्यांनी बहादूरवाडीतील आपल्या मालकीच्या जागेत काही जागा श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या मठाकरीता प. पू. श्री रमानंद सरस्वती महाराज यांना दिली. या ठिकाणीच श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा मठ उभा आहे.

श्री रमानंद सरस्वती स्वामी महाराज यांनी दि. १७ फेब्रुवारी १९९५ रोजी समाधी घेतली आहे. या मठाची व्यवस्था प. पू. आत्मानंद महाराज पाहातात.

संदर्भ ग्रंथ – **श्री सद्गुरु प. पू. श्री रमानंद सरस्वती जीवन दर्शन**

लेखकाचे नाव – **द. बा. महाजन, यवतमाळ**



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, बहादूरवाडी

# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी,
# म्हैसाळ स्टेशन (विजयनगर)

मिरजेतील नदीवेस पाटील गल्लीतील श्री दत्त मठीची जागा ही कमी पडू लागली. सन १९७५ पासून मिरजेत श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची जयंती, पुण्यतिथी पवार गल्ली येथील स्व. आक्काताई जाधव यांच्या घरी होत असे. या उत्सवाला आता मी सामूदायिक स्वरुप दिले. या पुर्वी हे उत्सव घरगुती स्वरुपाचे होते. त्याकाळी मी व मिरजेतील सर्व स्वामीभक्त कोल्हापूरला सकाळी जात असू व कुंभार गल्लीतील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीतील उत्सवात भाग घेऊन प्रसाद घेऊन सायंकाळी परत मिरजेला येत असू. हे उत्सव त्यावेळी स्व. बाळासाहेब शिर्के व स्व. माईसाहेब शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असत.

स्व. आक्काताई जाधव यांची मठी म्हणजे त्यांचे ते राहाते घर होते. जागा अपुरी होती. जाणे येणे बोळवजा रस्ता होता. त्यामुळे उत्सवात गर्दीमुळे पावसाळ्यात फार हाल होई. वाहने लावायला जागाही नव्हती. त्यामुळे सर्वांच्या विचाराने श्रींची जयंती, पुण्यतिथी माझ्या मठीकडे नेण्यात आली. परंतु मिरज हे छोटे शहर असल्याने, रस्ते लहान असल्याने महाप्रसादास आमची श्री दत्त मठी कमी पडू लागली. रस्त्यावरच टेबल, खुर्चीवर प्रसादाची सोय करावी लागे. त्यामुळे रहदारीला अडथळा होई. श्री महाप्रसादाला वाढत चाललेल्या गर्दीचा विचार करुन मिरजेपासून जवळपास एखादी मोठी जागा घेऊन नवीनच मठी/मंदिर बांधावे तसेच महाप्रसादाची सोय, निवांत राहाण्याची सोय करावी असे विचार माझ्या मनात येवू लागले.

त्यावेळी मी मिरजेतच वॉटर वर्क्सला नोकरीला होतो. कार्यालय सुटल्यानंतर मी आमचे मित्र श्री विलासराव घोरपडे यांच्या मिरज हायस्कूल जवळील औषध दुकानात जाऊन बसत असे. सौ. सुनंदा विलास घोरपडे यांचे माहेर म्हैसाळ होते. एखाद्या रविवारी मी श्री विलास घोरपडे यांच्या बरोबर म्हैसाळला येवू-जावू लागलो. त्यांच्या सासऱ्यांचे नाव स्व. बाळू तुका घोरपडे होते. कधी-कधी म्हैसाळला मुक्कामही करु लागलो. श्री विलासराव घोरपडे यांचे मेव्हणे श्री तानाजी बाळू घोरपडे यांचा माझा ऋणानुबंध वाढत गेला. वरचेवर माझे म्हैसाळला जाणे-येणे घडू लागल्यामुळे मला म्हैसाळ गाव चांगले वाटू लागले. म्हैसाळ येथे जागा घेऊन नवीनच श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे मंदिर बांधावे, मठी बांधावी असा विचार माझ्या मनात येऊ लागला. सदरचा विचार स्व. बाळू तुका घोरपडे यांच्या कानावर घातला. त्यांनीही इतर त्यांच्या मित्रांच्या कानांवर विचार घातला. परंतु म्हैसाळ गावात मठी बांधण्याचा योग आला नाही. परंतु मी प्रयत्न सोडले नाहीत.

दरम्यानच्या काळात सन १९८० च्या आसपास जुन्या श्री दत्त मठीचे रंगकाम चालू होते. माझे मित्र स्व. श्रीशैल्य शिंदगी यांनी श्री शंकर ढवळे पेंटर यांना माझ्याकडे पाठवले. श्री दत्त

मठीचे रंगकाम चालू झाले. दिवसेंदिवस श्री शंकर ढवळे व माझा परिचय वाढत चालला. ते म्हैसाळ स्टेशन येथे त्यांचे सासरे स्व. धोंडीराम गणू शिंदे यांच्याकडे राहात होते. एके दिवशी म्हैसाळला मठी बांधण्याचा विचार मी श्री शंकर ढवळेंच्या कानावर घातला व मठीसाठी जागा बघणेस सांगितले. जवळच म्हैसाळ स्टेशनला एक जागा विक्रीसाठी निघल्याचे त्यांनी मला सांगितले. मिरज म्हैसाळ स्टेशन हे अंतर रेल्वे लाईनने पाच किलोमीटर तर बेडग आडव्या रस्त्याने सात किलोमीटर होते. एके दिवशी श्री शंकर ढवळेंच्या बरोबर सदरची म्हैसाळ स्टेशन वरील जागा मंदिरासाठी बघण्यासाठी गेलो. सदरची जागा साडे सहा गुंठे असून जागा चौक चांगली होती. मला ती निवांत जागा पसंत पडली. ते साल १९८२ असावे. त्याकाळी म्हैसाळ स्टेशन अगदी खेडेगाव होते. वस्ती तर फारच विरळ. रेल्वे लाईनचा पूर्वेला शेतमजूर, बाहेरुन आलेल्या मजूरांची पाले/ छपरे/ झोपड्या तर रेल्वे स्टेशनच्या पुर्वेला मळेकऱ्यांची रानातील साधी घरे होती. एक शाळेची साधी इमारत होती. बेळगाव-तासगाव हा कच्चा रस्ता होता. ही जागा स्व. घेवारी अण्णा, स्व. शंकरराव कांबळे, स्व. बाळू तुका घोरपडे व इतर भक्तमंडळींशी चर्चा करुन श्री स्वामी कार्यासाठी विकत घेण्याचे ठरले. सदरची जागा स्व. गुंडाप्पा गणू शिंदे, स्व. बंडू गणू शिंदे, श्री. रामू गणू शिंदे यांची होती. प्रती गुंठा २ हजार रुपये प्रमाणे जागेची किंमत रुपये १२ हजार ठरविण्यात आली. दिनांक २१/११/१९८५ रोजी जागेची खरेदी करण्यात आली. लवकरच त्या ठिकाणी श्री अजय भोकरे इंजिनिअर, मिरज यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराचे/ मठीचे काम पूर्ण करण्यात आले. दिनांक २०/८/१९८६ रोजी या मंदिरात श्रीकृष्ण सरस्वती, श्री स्वामी समर्थ, श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्री शिवचिदंबर महास्वामी यांच्या तैलचित्रांची स्थापना करण्यात आली. ही तैलचित्रे मुंबईचे प्रसिध्द पेंटर स्व. मारुती दळवी यांनी तयार केलेली आहेत. सदर मंदिरासाठी त्याकाळी १ लाख ३० हजार रुपये खर्च आला. सदर मंदिराच्या व्यवस्थापनासाठी ए १४८३/१९८९ हा सार्वजनिक न्यास (ट्रस्ट) स्थापन करण्यात आला. आता म्हैसाळ येथून श्री गुरुदेवांचे जग उद्धाराचे कार्य सुरु झाले.

न्यास नोंदणी क्रमांक ए१४८३/१९८९ द्वारा म्हैसाळ स्टेशन येथे खालील प्रमाणे मंदिरे बांधण्यात आली. त्यांची उद्घाटने खालील प्रमाणे तारखांना झाली.

१) श्री गणेश मंदिर/ शिव मंदिर/ हनुमान मंदिर दि. १८/६/१९९८

२) श्री साई समर्थ विठ्ठल मंदिर दि. २१/२/२००३

३) श्री शेगाव संत श्री गजानन महाराज मंदिर दि. २/९/२०१३

४) श्री राम मंदिर दि. २८/२/२०१६

तसेच स्वामी भक्तांसाठी भक्तनिवास, सार्वजनिक वाचनालय, दवाखाना, प्राथमिक शाळा, मंगल कार्यालय ही सार्वजनिक कामेही वरील न्यासाद्वारे करण्यात आली.

म्हैसाळ स्टेशन (विजयनगर) येथील मंदिरात/ मठीत खालील उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करुन महाप्रसाद केला जातो.

१) श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, कोल्हापूर यांची जयंती/ पुण्यतिथी
२) श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट यांची पुण्यतिथी
३) शेगाव संत श्री गजानन महाराज प्रकटदिन/ पुण्यतिथी
४) श्री साईबाबा पुण्यतिथी (दसरा)
५) श्री राम नवमी
६) श्री हनुमान जयंती
७) आषाढी/ कार्तिकी एकादशी

म्हैसाळ स्टेशन (विजयनगर) येथील श्री मंदिर परिसर/ मठी परिसर हे आता पर्यटन केंद्र होत चालले आहे. कर्नाटकातून पंढरपूरला पायी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांची राहाण्याची, चहा-नाष्ट्याची सोय वरील न्यासामार्फत मोफत करण्यात येते.



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, विजयनगर (म्हैसाळ स्टेशन)



श्री साई समर्थ विठ्ठल मंदिर, म्हैसाळ स्टेशन (विजयनगर)

# सांगली येथील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीची माहिती

सन १९६६ ते १९७२ मी स्व. रतनचंद खेमचंद शहा व श्री इंद्रकुमार शहा यांच्या अशोक मेडीकल, मिरज येथे नोकरीस होतो. या औषध दुकानातच श्री राजाराम दत्तोबा घाटगे हेही नोकरीस होते. त्यामुळे त्यांचा माझा चांगला परिचय होता, मैत्री होती. पुढे सन १९७३ ला सरकारी नोकरीत मी लागलो. त्यामुळे श्री राजाराम घाटगे यांच्यागडे जाणे-येणे कमी झाले तथापि संबंध मैत्रीपूर्ण होते.

सन १९७५ साली श्री राजाराम घाटगे यांचे सासरे स्व. बाबूराव सुर्यवंशी व स्व. मातोश्री लक्ष्मीबाई बाबूराव सुर्यवंशी यांचा माझा परिचय झाला. स्व. बाबूराव सुर्यवंशी हे त्यावेळी अत्यंत अडचणीत होते. त्यांच्याकडे मी व राजाराम घाटगे वरचेवर जाऊ येवू लागलो, परिचय वाढत चालला. त्यांना घेऊन मी कोल्हापूरला श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधी मंदिरात जाऊ लागलो. हळूहळू श्री दत्त महाराजांच्या कृपेने त्यांची परिस्थिती बदलत चालली. स्व. बाबूराव सुर्यवंशी व स्व. मातोश्री लक्ष्मीबाई सुर्यवंशी आता अडचणीतून बाहेर पडत चालले. त्यांनी मला मुलगाच मानले व आपत्यवत माझ्यावर माया केली. वखारभागातील त्यांच्या घरी सन १९७५ साली प. पू. माईसाहेब शिर्के यांच्या हस्ते श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या तसबीरीची स्थापना करुन सांगलीत श्री स्वामी कार्य सुरु झाले. स्व. बाबूराव म्हणजेच सुर्यवंशी दादांचे घर आता श्री दत्त मठी झाले. हे स्थान सांगली गावाबाहेर जुना बुधगाव रोड वखारभाग पांजरपोळ जमीनीजवळ, गावाच्या एका बाजूला होते. सांगलीतील व आसपाच्या खेडेगावातील लोक आता या श्री दत्त महाराज मठीत दर्शनाला येऊ लागले. त्यांच्या मनोकामना श्री स्वामी कृपेने पूर्ण होऊ लागल्या. आता श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांची जयंती/ पुण्यतिथी दोन्ही उत्सव मोठ्या प्रमाणात स्व. सुर्यवंशी दादांच्या श्री दत्त मठीत मोठ्या प्रमाणात होऊ लागले, महाप्रसाद होऊ लागला.

सन १९८०-८२ या दरम्यान याच घराचे रुपांतर श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीत झाले. सुंदर स्लॅबची इमारत झाली. प. पू. रमेश महाराज कुलर्णी, प. पू. गोविंद महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते या मठीचे उद्‌घाटन झाले. महाप्रसाद घालण्यात आला.

प. पू. बाबूराव सुर्यवंशी हे दि. ३१/५/२००९ रोजी स्वर्गवासी झाले. तर मातोश्री लक्ष्मीबाई बाबूराव सुर्यवंशी दि. ३/२/२००९ रोजी स्वर्गवासी झाल्या. या पुण्यवान जोडप्याने श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे पूजन-अर्चन, नामस्मरण आयुष्याच्या शेवटपर्यंत केले. त्यांनी स्वामींना आपले केले. श्री स्वामी महाराजांचा मार्ग अनेकांना दाखवून ते स्वामी चरणी विलीन झाले.

तथापि वखार भागातील ही दत्त मठीची जागा कमी पडत चालली. उत्सवाला जागा कमी पडत चालली. पावसाळ्यातील पुण्यतिथी कार्यक्रमाला फार हाल होई. तसेच स्व. मातोश्री लक्ष्मीबाईच्या या घरात त्यांची नांदती कुटुंबे राहात असत. त्यामुळे नवीन स्वरुपातील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे मंदिर/मठी उभा करणे आवश्यक होते. प. पू. बाबूराव सुर्यवंशीदादा  व मातोश्री लक्ष्मीबाई सुर्यवंशी यांचे थोरले चिरंजीव श्री मोहन बाबूराव सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांनी सांगली कर्नाळ रोडवर मोठी जागा विकत घेऊन श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे सुंदर/ प्रशस्त मंदिर बांधले आहे/ मठी बांधली आहे. सदर मंदिराचे/ मठीचे उद्घाटन नुकतेच दिनांक २९/८/ २०१८ रोजी प. पू. श्री चंद्रशेखर केळकर आण्णा व श्री महेश शिर्के यांच्या हस्ते झाले. या ठिकाणी मंदिर/ मठी स्वतंत्र असून राहण्यास स्वतंत्र बंगला आहे.

शब्दांकन- **श्री झेंडे महाराज, सांगली**




श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, वखारभाग सांगली



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, कर्नाळ रोड, सांगली

# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी/ श्री स्वामी समर्थ मठी कृष्णाघाट मिरज

मिरज येथे श्री कृष्णा घाटावर श्री कृष्णाबुवा स्वार यांची समाधी आहे. त्यांनी ६/११/१९४७ साली समाधी घेतली. सदरची समाधी मिरज वॉटर वर्क्सच्या कपाऊंडला लागून स्व. धोंडीराम आंबी यांच्या रानात आहे. कालमान परिस्थितीमुळे ती समाधी गावाच्या बाहेर होती. स्व. रामचंद्र जाधव यांच्या निधनानंतर या समाधीकडे दुर्लक्ष होत गेले, समाधी बुजून गेली. त्यावर एक बाभळीचे झाडही पडले. लोकांनी त्या बाजूला उकरंडे केले. एके दिवशी मला पडलेल्या स्वप्नातील दृष्टांताप्रमाणे सदर समाधी जागेचा मी शोध घेण्याचे ठरविले. ते साल अंदाजे १९७४ होते. त्यावेळी मी मिरज वॉटर वर्क्सला नोकरीला असल्याने श्री कृष्णाघाटवरील सर्वच कर्मचारी माझ्या ओळखीचे मित्र होते. स्व. आक्काताई जाधव, स्व. मुकुंदराव गोरे, स्व. दत्तू मोरे, स्व. गजानन मोरे, स्व. धोंडीराम आंबी यांना वरचे वर माहिती विचारुन समाधी स्थळ शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु लवकर यश आले नाही. यात बरेच दिवस गेले. एक दिवस या समाधीचा शोध पुढे लागला. स्व. धोंडीराम आंबी व त्यांच्या मातोश्री, श्री सुरेश गोरे, श्री श्रीरंग इंगळे, स्व. काशीराम शिष्टे, स्व. बापू शिष्टे या सर्वांच्या प्रयत्नाने श्री कृष्णाबुवा स्वार यांची समाधीची जागा शोधण्यात आली. समाधीवर ''श्रीकृष्णाबुवा दि. ६/११/१९४७'' असा उल्लेख आढळून आला. सदरची समाधी ही वॉटर वर्क्सच्या कपाऊंडला लागून असून जवळच श्री रामदासीबुवा गाडगीळ, श्री रघुनाथ निरंजन, श्री रावळबुवा यांची जागृतस्थाने आहेत. जवळच मिरजेचे महासाधु आण्णाबुवा यांचीही समाधी आहे. श्रीकृष्णाबुवांची समाधी सापडल्यामुळे मला अतिशय आनंद झाला. मी रोज श्री कृष्णाघाटावर पूजेला जावू लागलो. समाधीची जागा आता स्वच्छ करण्यात आली. लवकरच तेथे कट्टा बांधण्याचे ठरवून मी चार ट्रक दगडही आणून टाकला. परंतु ६/१९७७ ला माझी बदली कोल्हापूर पाटबंधारे विभागात झाल्याने माझे श्रीकृष्णाघाटावरील श्री कृष्णाबुवा समाधीकडे येणे-जाणे कमी झाले. तथापि तेथील श्री सुरेश गोरे, श्री शंकर आंबी व इतर स्वामीभक्त समाधीची पूजा, अर्चा करु लागले. दिवसेंदिवस माझा कृष्णाघाटाशी संपर्क तुटत चालला. तसेच समाधीवर कट्टा बांधण्याचे कामही आर्थिक अडचणीमुळे राहून गेले. श्री कृष्णाघाटावरील लोकवस्ती आता वाढत चालली होती. माझे शालेय मित्र श्री आण्णासाहेब कुरणे, मिरज यांनी श्री कृष्णाघाटावर स्व. धोंडीराम आंबी व स्व. मुकुंदराव दत्तू गोरे यांच्या जमीनीचे प्लॉट पाडले. श्री कृष्णाबुवा स्वार यांची समाधी श्री कृष्णाघाटावरील रि. स. नं. ५९३/३ मध्ये स्व. धोंडीराम आंबी यांच्या जागेत/शेतात होती. त्यामुळे मठीतील सर्व भक्तांशी, श्री आण्णासाहेब कुरणे, श्री रमेश घोरपडे यांच्याशी चर्चा करुन स्व. धोंडीराम आंबी

यांच्याकडून २ गुंठे जागा खरेदी केली. तर स्व. मुकुंद दत्तू गोरे व बंधू यांच्याकडून २/६/१९८७ रोजी २ गुंठे जागा खरेदी करण्यात आली. या जागेवरच आता स्वामी समर्थ मठाची स्थापना करण्यात आली. या मठात श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज व श्री स्वामी समर्थ महाराज , अक्कलकोट यांच्या सुंदर तैलचित्रांची स्थापना करण्यात आली. सदरची तैलचित्रे ही स्व. मारुती दळवी, मुंबई यांनी तयार केलेली आहेत. या जागेतच स्व. बबीबाई लुंकड वाचनालय व बालवाडीची इमारत आहे. या मठाची व्यवस्था श्री सुरेश गोरे, श्री मारुती आलदर, श्री कृष्णा दत्तू गोरे, श्री मनोहर कदम, श्री जालंदर गायकवाड व अनेक स्वामी भक्त बघतात. या मठात दरवर्षी दत्त जयंतीचा उत्सव मोठ्या प्रमाणात करणेत येतो. महाप्रसादही मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. महाप्रसादाची व्यवस्था श्री शिवाजीराव जाधव, श्रीं बेळगावी साहेब, डॉ. श्री म्हेत्रे, श्री मुन्ना भोजमालपाणी, श्री सन्नकेसाहेब, श्री चंद्रकांत हुलवान, श्री दिलीप केसरखाने, श्री वड्ड बंधू, श्री शंकर कवठेकर व इतर अनेक भक्त मंडळी बघतात.

शब्दांकन - **श्री झेंडे महाराज, सांगली-मिरज-म्हैसाळ**




श्री स्वामी समर्थ मठ, कृष्णाघाट मिरज



श्री स्वामी समर्थ मठ, कृष्णाघाट मिरज
मंदिरातील श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त
महाराज व श्री स्वामी समर्थ यांची तैलचित्रे

# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, नेरळ, कर्जत

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे रायगड जिल्ह्यात ज्ञात असलेले तीन मठ स्थापन आहेत. पैकी एक मठ आपटा येथे श्री कारखानीस यांनी श्री नामदेव महाराजांचा मठ व श्री श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराजांचा मठ स्थापन केला आहे.

दि. २५/१०/१९९५ रोजी नेरळ येथे श्री माधवसरस्वती स्वामी महाराजांनी मेघदूत सोसायटी येथे श्री श्रीकृष्ण सरस्वती सेवा मंडळ यांचे द्वारा ५.५ गुंठे प्लॉट घेतला. तेथे सरकारी परवानग्या व इतर कारणांनी मठ स्थापन करणेस उशीर होत होता. त्यामुळे श्री माधवसरस्वतींनी कर्जत येथे बद्रीनाथ अपार्टमेंट येथे पहिल्या मजल्यावर एक ब्लॉक श्रीकृष्ण सरस्वती सेवा मंडळाला विकत घेण्याची प्रेरणा दिली. त्यानुसार ब्लॉक विकत घेऊन तेथे श्रीकृष्ण सरस्वती स्वामीमहाराजांची साधना दि. ५/४/२००० गुढीपाडव्याच्या दिवशी सुरु करण्यात आली.

यथावकाश दि. ३०/७/२००२ रोजी नेरळ प्लॉटची कागदपत्र पूर्तता व परवानग्या प्राप्त झाल्यावर नेरळ येथे स्वतंत्र मठ बांधण्यात आला. हा मठ १००० चौ. फूटांचे ध्यानमंदिर व आजूबाजूला बाग अशा स्वरुपात असून नेरळ स्टेशनपासून (मध्य रेल्वे) १० मिनिटांचे अंतरावर आहे. येथे प्रत्येक शनिवारी सामुहिक साधना होते. तसेच कर्जत येथे प्रत्येक चौथ्या शनिवारी समुहिक साधना केली जाते. श्रीकृष्ण सरस्वती स्वामी जयंती, कर्जत वर्धापन दिन (गुडीपाडवा), श्री माधवसरस्वती जयंती, गुरुपौर्णिमा, दत्तजयंती असे उत्सव साजरे केले जातात.

श्री माधव सरस्वती (श्री माधव टिकेकर) हे मूळ कोल्हापूरचे असून त्यांचे सी. ए. पर्यंतचे शिक्षण मुंबई येथे झाले. त्यांची कर्मभूमी मुंबई राहिली व त्यांचे निवासस्थान देवनार येथे श्रीदत्तगुरु सोसायटीमध्ये स्वत:चे घर असे आहे. श्री माधव सरस्वतींनी ४ मे २००१ रोजी देह ठेवला. श्री माधव सरस्वतींनी आम्हा सर्वांना श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराजांचा अनुग्रह दिलेला आहे व कुंडलिनी शक्ती जागृत असा अनुग्रह दिलेला आहे.

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या कै. गणेश नारायण मुजुमदार लिखित पोथीचे पारायणही सामुहिक साधनेत व वैयक्तिक साधनेत केले जाते.

**श्री श्रीकृष्ण सरस्वती सेवा मंडळ**

कर्जत पत्ता -
बद्रीनाथ अपार्टमेंट
पहिला मजला, शिवाजीनगर
दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड
पिन - ४१०२०१

नेरळ पत्ता-
मेघदूत को-ऑप हौ. सो.
प्लॉट नं. १४, दगडी बंगल्यासमोर
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
पिन - ४१०१०१

संपर्क - श्री अविनाश पु. वैद्य



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज सेवा मंडळ मठीतील, कर्जत येथील छायाचित्रे.



श्री श्रीकृष्ण सरस्वती सेवा मंडळ, नेरळ (पू.) येथील मठीतील तसबिरी.




श्री श्रीकृष्ण सरस्वती सेवा मंडळ, नेरळ (पू.)

# श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मंदिर
## साईहरिक्षेत्र, आपटा फाटा, कर्नाळा, जि. रायगड

मुंबई गोवा महामार्गावर आपटा फाटा येथून अर्धा किलोमीटर अंतरावर, पाताळगंगानदीच्या तीरावर सुंदर आणि पवित्र असे साईहरिक्षेत्र वसले आहे. १९८२ सालापासून उर्जितावस्थेत आलेल्या या क्षेत्रात श्री दत्तगुरु, श्री हनुमान, श्री स्वामी समर्थ, श्री शिर्डी साईबाबा, श्री गजानन महाराज, श्रीकृष्ण सरस्वती महाराज, श्री नामदेव महाराज, श्री द्वारकाधीश यांची मंदिरे असून मुंबई, पनवेल, ठाणे परिसरातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. श्री दत्तजयंती, श्रीस्वामी समर्थ प्रकटदिन, गुरुपौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, श्री रामनवमी, श्री महाशिवरात्री असे अनेक उत्सव साईहरिक्षेत्री उत्साहात साजरे होतात.

श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांचे परमभक्त आणि माझे गुरु स्व. परमपूज्य नाना महाराज परांजपे आणि बदलापूर येथील थोर कृष्णभक्त स्व. लीलाताई कर्वे यांच्या प्रेरणेतून आणि आशिर्वादातून हे क्षेत्र उभे राहिले. आज हे क्षेत्र असंख्य भक्तांना शांत व निसर्गरम्य वातावरण ईश्वरदर्शनातून मन:शांती देणारे क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस येत आहे.

या साईहरिक्षेत्राशी माझा ऋणानुबंध जडला तो १९८२ साली जेव्हा मी माझे गुरु परमपूज्य नाना महाराज परांजपे मला प्रथम साईहरिक्षेत्री घेऊन गेले. त्या दिवसापासून आज पर्यंत साईहरिक्षेत्री भगवंताने माझ्या सारख्या एका सामान्य भक्ताच्या हातून जी सेवा करवून घेतली ती केवळ सद्गुरुंचे आशीर्वाद आणि पूर्वजन्मीची पुण्याई म्हणूनच.

साईहरिक्षेत्रात १९८३ साली श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांचे मंदिर परमपूज्य नाना महाराज यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेतून परमपूज्य नाना महाराजांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी समर्थ विश्वकल्याण केंद्र न्यासामार्फत स्थापन झाले. त्यापूर्वी साईहरिक्षेत्राचे मूळ मालक श्री हरिभाऊ मुणगेकरांनी श्रीदत्त मंदिराजी स्थापना केली होती.

माझे गुरु परमपूज्य नाना महाराज हे मूळ शिवोपासक. एक दिवस नाना महाराजांच्या स्वप्नात श्री अक्कलकोट स्वामी समर्थ आले व त्यांना म्हणाले, '' अरे मी शिव काही वेगळे नाही'' त्यानंतर परमपूज्य नाना महाराजांनी श्री स्वामी समर्थ जप सुरु केला. श्री स्वामी समर्थांनी स्वप्न दृष्टान्तात परमपूज्य नाना महाराजांना आशीर्वाद देऊन आज पासून दोन वर्षांनी तुला एक व्यक्ती भेटेल व ती तुला मार्गदर्शन करेल असे सांगून परमपूज्य नामदेव महाराजांचा फोटो दाखविला. त्यानंतर दोनच वर्षांनी परमपूज्य नामदेव महाराजांशी परमपूज्य नाना महाराजांची कुर्ला, मुंबई येथे भेट झाली. परपमूज्य नाना महाराजांचे गुरु परमपूज्य नामदेव महाराज यांनी १९७१ साली वयाच्या १३० व्या वर्षी कोल्हापूर येथे आपला देह ठेवला. परमपूज्य नामदेव

महाराज हे श्रीकृष्ण सरस्वती महारारजांचे अत्यंत आवडते शिष्य होते. १९०० साली श्रावण वद्य दशमीस श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी परमपूज्य नामदेव महाराजांच्या मांडीवर मस्तक ठेवून आपला अवतार संपवला. परमपूज्य नाना महाराजांची श्री नामदेव महाराजांशी झालेली भेट ही स्वामी समर्थांच्या वरील दृष्टांतानुससार झाली. परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती महाराजांनी परमपूज्य श्री नामदेव महाराजांना आपला अवतार संपवताना असे सांगितले की, नाम्या या कार्याची वेल तू वाढव. माझे कार्य पुढे चालू ठेव. त्यानुसार श्री नामदेव महाराजांनी परमपूज्य नाना महाराज परांजपे आणि परमपूज्य नानासाहेब गद्रे या शिष्यांमार्फत आपले कार्य चालू ठेवले.

१९८३ साली श्री स्वामी समर्थ मंदिराची साईहरिक्षेत्री उभारणी झाल्यानंतर १९८७ चे सुमारास मी साईहरिक्षेत्री अर्धा एकर जमीन घेतली. उद्देश हाच की स्वामींच्या सान्निध्यात भविष्यात एखादी वास्तु बांधता यावी. नाना महाराजांची इच्छा होती की श्रीस्वामी समर्थांची गुरुपरंपरा साईहरिक्षेत्री यावी म्हणजेच श्री श्रीकृष्ण सरस्वती महाराज, नाना महाराजांचे गुरु प. पूज्य नामदेव महाराज यांची मंदिरेही साईहरि क्षेत्री निर्माण व्हावीत. एक दिवस स्वामी समर्थ मंदिराच्या सभामंडपात मी व नाना महाराज दोघेच असताना नाना महाराजांनी ही इच्छा मला बोलून दाखवली, मी नाना महाराजांना भेटलो, नाना तुमचे आशीर्वाद आणि स्वामींनी सामर्थ्य दिलं तर काहीच अशक्य नाही. परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या काळ्या पाषाणातील पादुका फार पूर्वीपासूनच परमपूज्य नामदेव महाराजांनी बनवून घेतल्या होत्या. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज ज्योतीबाच्या डोंगरावर गुरुंच्या शोधात हिंडत असत त्यामुळे त्यावेळी त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ज्योतिबाच्या डोंगरावरील काळ्या पाषाणात परमपूज्य नामदेव महाराजांनी आपल्या गुरुंच्या पादुका बनवून घेतल्या होत्या. गोव्याचे सुप्रसिध्द उद्योगपती श्री. चौगुले यांनी या पादुकांची गोव्यात श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे मंदिर बांधून स्थापना करावी अशी पूज्य नामदेव महाराजांची इच्छा होती. परंतु नामदेव महाराजांच्या हयातीत त्यांची इच्छा पूर्ण होऊन शकली नाही याची खंत परमपूज्य नाना महाराजांना होती. १९७० मध्ये नामदेव महाराजांनी देह ठेवल्यानंतर या पादुका २७ वर्षे कोल्हापूरात मठीत होत्या.

नाना महाराजांची इच्छा पूर्ण करण्यास भगवंताने लवकरच संधी उपलब्ध करुन दिली. मी साईहरिक्षेत्री १९८७ मध्ये जी छोटीशी जमीन घेतली होती, त्या जमिनीवर एक छोटेखानी मंदिर बांधून तिथे आपण श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पादुकांची स्थापना करु शकू असे मी नाना महाराजांना सुचवताच त्यांना विलक्षण आनंद झाला. पूर्वी गाईचा गोठा होता तिथे आम्ही मातीची एक झोपडी बांधली होती व तिला मृण्मयी असं नाव दिलं होत. ती झोपडी पाडून तिथे हे छोटेखानी मंदिर उभारण्याचे ठरले. नाना महाराजांच्या हस्ते भूमीपूजन पायाभरणी झाली. कमीतकमी खर्चात मंदिर बांधायचं होत कारण कोणाकडून आर्थिक सहाय्य न घेण्याचा माझा संकल्प होता. अर्ध्या भिंती व त्यावर छतासाठी लोखंडी सांगाडा आणि त्यावर कौलं

घालायची असे ठरले. त्यानुसार मंदिराचे बांधकाम कंत्राटदाराने सुरु केले. दरम्यान परमपूज्य नाना महाराजांनी कोल्हापूरहून पादुका साईहरिक्षेत्री आणावयाचे ठरवले. १९८८ च्या मध्यास पादुका आणण्यासाठी मी, पूज्य नाना महाराज व स्वामीभक्त श्री सोपान मंत्री सुमो गाडी घेऊन कोल्हापूरी दाखल झालो. कोल्हापूरचे परमपूज्य काटकर महाराज, नाना महाराजांचे गुरुबंधु नानासाहेब गद्रे आदिंच्या उपस्थितीत गंगावेश मठीतून पादुका हलवण्याचा प्रयत्न सुरु झाला. २०० किलो वजनाच्या पादुका उचलण्यासाठी ८ कोल्हापुरी पैलवान आले. तरीही पादुका काही हलेनात. नाना महाराजांनी श्री श्रीकृष्ण सरस्वती महाराजांना प्रार्थना केली. महाराज आता आणखी परीक्षा पाहू नका. फुलासाारखे हलके व्हा आणि काय चमत्कार, ४ पैलवानांनी लीलया त्या पादुका उचलल्या आणि सुमोत ठेवल्या. पादुकांचे कोल्हापूर येथून समारंभपूर्वक प्रस्थान झाले. वाटेत खूप अद्‌भूत अनुभव आले. धो-धो कोसळणारा पाऊस, खराब रस्ते यामुळे आम्हाला आपटा फाटा येथे पोहोचण्यास पहाटेचे ३.४५ वाजले. अशा रीतीने ब्राम्हमुहूर्तावर श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या पादुकांचे साईहरि क्षेत्री आगमन झाले. मंदिराचे काम अपूर्ण असल्याने पादुका शेजारीच असलेल्या कुटीत तात्पुरत्या ठेवण्यात आल्या व त्यांचे नित्यपूजन सुरु झाले. या काळात सतत एक चमत्कार घडत होता. एक भला मोठा नाग पादुकां भोवती वेटोळे घालून आपल्या फण्याची छाया पादुकांवर धरत असे. त्यामुळे पुढे मंदिरात पादुकांची स्थापना झाल्यावर पादुकांवर एक पितळी नाग व शिवलिंग ठेवावे असे परमपूज्य नाना महाराजांनी सुचवले.

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या मंदिराचे काम डिसेंबर १९८९ च्या सुमारास पूर्ण होत आलं होतं. पण खिडक्या तयार झाल्या नव्हत्या. तरीही १२ डिसेंबरला दत्त जयंतीच्या दिवशी पादुकांची प्रतिष्ठापना ठरल्याप्रमाणे करण्यात आली. प्राणप्रतिष्ठापनेचे पौरोहित्य वेदशास्त्री श्रीरंग जुन्नरकर गुरुजी यांनी केले. यावेळी परमपूज्य श्री नानासाहेब गद्रे यांनी मातीने भरलेली एक पिशवी माझ्याकडे दिली व म्हणाले, या पिशवीतील मातीला श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा पदस्पर्श झाला आहे. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे पाय जिथे जिथे भूमिला स्पर्श करीत त्या भूमीवरील सद्‌गुरुंच्या स्पर्शाने पावन झालेली त्यांच्या पावलांखालची माती परमपूज्य नामदेव महाराज जमा करु साठवत असत. ही पवित्र माती श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पादुकांखाली ठेवण्यात यावी अशी नामदेव महाराजांची इच्छा होती. तेव्हा आता ही माती श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पादुकांखाली स्थापन करुया. इतरही पवित्र पादुका साईहरिक्षेत्री संगमरवरी सिंहासनावर विराजमान झाल्या. नाना महाराजांचे एक स्वप्न अशा रितीने पूर्ण झाले.

नाना महाराजांच्या मनात आता श्री नामदेव महाराजांचे मंदिर साईहरिक्षेत्री व्हावे अशी इच्छा प्रबळ होऊन लागली. तशी इच्छा त्यांनी माझ्याकडे प्रकट केली. श्री श्रीकृष्ण सरस्वती

दत्त महाराजांच्या मंदिरा शेजारील जागा रिकामी होती. त्या जागेवरच श्री नामदेव महाराजांचे मंदिर बांधण्याचे ठरले आणि लगेचच मंदिराचे बांधकाम सुरु झाले. श्री श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या मंदिराच्या धर्तीवर पण थोडे छोटेखानी बांधण्याचे ठरले. १९९४ च्या दत्तजयंतीला प्राणप्रतिष्ठा करावयाची होती. परमपूज्य नाना महाराजांनी ज्योतिबाच्या डोंगरावरील काळ्या पाषाणात श्री नामदेव महाराजांच्या पादुका घडवून घेतल्या होत्या. त्या कोल्हापूरला होत्या. त्या पादुकांची मंदिरात प्रतिष्ठापना करण्याचे निश्‍चित झाले आणि पादुका कोल्हापूरवरुन समारंभपूर्वक आणण्यात आल्या. दत्त जयंतीच्या एक दिवस आधी कोल्हापूरचे शंकराचार्य अचानक साईहरिक्षेत्री आले. पूज्य लीलाताई कर्वे व पूज्य नाना महाराजही आदल्या दिवशीच आले होते. त्यांची शंकराचार्यांबरोबर भेट झाली. चर्चा झाली. साईहरिक्षेत्री उभी राहिलेली विविध मंदिरे पाहून शंकराचार्यांनीही आनंद व्यक्त केला. शंकराचार्यांनी मंदिराच्या वास्तूला भेट दिली आणि मला व माझ्या पत्नीला आशीर्वाद दिले. १७ डिसेंबर १९९४ रोजी दत्तजयंतीचे दिवशी पूज्य लीलाताई कर्वे व पूज्य नाना महाराज यांच्या साक्षीने श्री नामदेव महाराजांच्या पादुका साईहरिक्षेत्री विराजमान झाल्या. गुरुमंदिर असं या वास्तुचे नामकरण करण्यात आले. यावेळी नाना महाराजांनी त्यांची गुरुपरंपरा साईहरिक्षेत्रात आणण्यासाठी माझ्या सारख्या सामान्य भक्ताच्या हातून जे प्रयत्न झाले त्याबद्दल एक प्रासादिक भगवी छाटी मला दिली. स्वत:च्या गळ्यातील पुष्पहार माझ्या गळ्यात घातला व म्हणाले, अजितने ही दोन्ही मंदिर बांधण्याची माझी इच्छा पूर्ण केली म्हणून माझ्या गुरुंनी १९६६ साली जशी शक्तिरुप छाटी मला दिली तशी ही शक्तिरुप छाटी आज मी अजितला प्रदान करत आहे. असं म्हणून माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेवून दीर्घ ओंकारोच्चार केला. परमपूज्य लीलाताईंनीही मला आशीर्वाद दिला. माझ्या जीवनातील हा सर्वोच्च आनंदाचा क्षण होता. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. गुरुंची इच्छा पूर्ण करु शकल्याचे समाधान लाभले होते.

दोन्ही गुरुमंदिर बांधल्यानंतर मी त्यावरच स्वामीत्व सोडून ती नाना महाराजांनी स्थापन केलेल्या श्रीस्वामी समर्त विश्‍वकल्याण केंद्राला अर्पण करावीत अशी इच्छा नाना महाराजांनी व्यक्त केली आण पूर्वी त्यांना मी तसं वचनही दिलं होत. त्या प्रमाणे ही दोन्ही मी परमपूज्य नाना महाराजांच्या इच्छेनुसार श्री स्वामी समर्थ विश्‍व कल्याण केंद्राला दि. २१ जुलै २००५ रोजी अर्पण केली व गुरुंची इच्छा पूर्ण केली.

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या मंदिरातील पादुकांच्या प्राणप्रतिष्ठापने नंतर येणाऱ्या प्रत्येक पौर्णिमेला मंदिरात गायत्री हवन करण्यास मी प्रारंभ केला. सलग १२१ हवनांचा संकल्प २००० साली पूर्ण झाला. श्री दत्त जयंती व गुरुपौर्णिमा उत्सवाबरोबरच माघ वद्य पंचमीस महाराजांचा जन्मदिवस तसेच श्रावण वद्य दशमीस त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. त्रिपुरारी पौर्णिमेस प्रतिवर्षी प्रतिवर्षी तुलसी विवाह संपन्न होतो. श्री नामदेव महाराजांच्या मंदिरात गुढी

पाडव्यास त्यांचा जन्मदिवस आणि कुष्माण्ड नवमीस त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. परमपूज्य नामदेव महाराजांचे अनुग्रही आणि परमपूज्य नाना महाराजांचे गुरुबंधू परमपूज्य स्व. नानासाहेब गद्रे यांच्या पुणे येथील शिष्य परिवारातील भक्तगण, पूज्य श्री दुर्वे काका यांच्यासह या उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

**पूर्वपीठिका**

परमपूज्य नाना महाराजांशी माझी भेट १९८२ साली झाली. त्यांच्या भेटीनंतर अवघ्या पंधरा दिवसातच श्री अक्कलकोट स्वामी समर्थांनी मला स्वप्नात दर्शन दिले, त्यांच्या चरणी मस्तक ठेवताच माझे शरीर फुलासारखे हलके झाल्याची विलक्षण अनुभूती मला आली. त्यानंतर थोड्याच दिवसात मला स्वप्नामध्ये दादर येथील श्री स्वामी समर्थ मठात मी गेलो आहे आणि तिथे लावलेल्या स्वामी समर्थांच्या प्रत्येक फोटोत मला नाना महाराजच दिसत आहेत असे जाणवले. त्या दिवसापासून परमपूज्य नाना महाराज आपल्यासाठी स्वामी समर्थ आहेत असे जाणून त्या दिवसापासून मी परमपूज्य नाना महाराजांना गुरुस्थानी मानले. परमपूज्य नाना महाराजांचा सहवास मला पस्तीस वर्षे लाभला. नाना महाराजांचे श्री स्वामी समर्थांशी संभाषण होत असे आणि त्यानुसार ते भक्तांना मार्गदर्शन करीत असत. नाना महाराजांनी २०१३ साली देह ठेवला.

१९८४ साली नाना महाराजांनी मला आदेश दिला. आजपासून तू भगवान गोपाल कृष्णाची आराधना कर. तो योगेश्वर आहे, तो तुला ऐश्वर्य देईल आणि तुझ्या हातून कार्य करुन घेईल. त्या दिवसापासून मी कृष्ण आराधना करु लागलो. समोर श्री स्वामी समर्थांचा फोटो असला तरी नमस्कार करताना माझ्या मुखातून कृष्ण असेच शब्द निघत. पुढे तीनच वर्षांनी माझी बदलापूरच्या थोर कृष्णभक्त परमपूज्य लीलाताई कर्वे यांची भेट झाली. त्यांच्या रुपात साक्षात कृष्ण परमात्मा मला भेटला, माझ्या सोबत वावरला आणि माझ्या सारख्या एक नोकरदार भक्ताच्या हातून साईहरिक्षेत्री एक प्रसादतुल्य असे श्रीद्वारकाधीश मंदिर उभे राहिले. परमपूज्य नाना महाराज आणि परमपूज्य लीलाताई कर्वे यांच्या कृपेमुळे जे कार्य हातून घडलं त्यामुळे माझे अवघे जीवन धन्य झाले. परमपूज्य लीलाताई या आम्हा सर्व भक्तांसाठी एक वात्सल्यसिंधु आईच होत्या. त्यांच्याशी श्रीकृष्ण परमात्मा बोलत असे व त्यानुसार आम्हाला त्यांचे मार्गदर्शन लाभे. असंख्य भक्तांना याचे आश्चर्यकारक अनुभव आले. २००३ साली परमपूज्य ताईंनी ध्यानसमाधीत इहलोकीची यात्रा संपवली.

गुरुंनी धन्य मज केले.

शब्दांकन : **श्री अजित कारखानीस, मुंबई**



श्री स्वामी समर्थ मंदिर, साईहरिक्षेत्र, आपटा फाटा, कर्नाळा



श्री स्वामी समर्थ मूर्ती



मृण्मयी- श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मंदिर, कर्नाळा



श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची तसबीर



श्री नामदेव महाराज मंदिर, साईहरिक्षेत्र आपटा फाटा, कर्नाळा



श्री नामदेव महाराजांचे तैलचित्र

# ❊ नम्र निवेदन ❊

सदर ग्रंथाचा विषय हा १०० वर्षांपूर्वीचा आहे. श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या अंतरंगातील शिष्य, भक्त व इतर व्यक्ती यांची अधिकाधिक माहिती गोळा करुन त्या माहितीचा समावेश या ग्रंथातील अध्यायात करण्यात आलेला आहे. तथापि खालील अध्यायातील काही शिष्य, भक्त, व्यक्ती यांची माहिती मिळालेली नाही. त्यामुळे त्यांच्या विषयाच्या माहितीचा समावेश या ग्रंथातील अध्यायात करण्यात आलेला नाही. तरी कृपया खालील अध्यायातील श्री स्वामीभक्त, शिष्य, व्यक्ती व त्यांची घराणी यांची माहिती मिळाल्यास/उपलब्ध झाल्यास कृपया कळवावे, म्हणजे पुढील सुधारीत आवृत्तीत सदरच्या माहितीचा समावेश करुन ग्रंथ परिपूर्ण करणेत येईल.

| अनु. | अध्याय क्रमांक | माहिती न मिळालेले शिष्य/ स्वामीभक्त/ व्यक्ती |
|---|---|---|
| १ | अध्याय क्रमांक ४ | १ स्व. आबाजीपंत कुलकर्णी, जांभळी<br>२ गोविंदाला मुलगा झाला. |
| २ | अध्याय क्रमांक ५ | १ स्वामीभक्त फडणीस, कोल्हापूर |
| ३ | अध्याय क्रमांक ६ | १ स्वामीभक्त विष्णुपंत<br>२ स्वामीभक्त रमाबाई<br>३ स्वामीभक्त सरसुभे राजाराम खंडेराव व त्यांचा मित्र सरवीर पुणेकर |
| ४ | अध्याय क्रमांक ७ | १ स्वामीभक्त हरिपंत शिदनेर्लीकर |
| ५ | अध्याय क्रमांक ८ | १ स्वामीभक्त विष्णु धारवाडकर<br>२ स्वामीभक्त दत्ता धारवाडकर<br>३ स्वामीभक्त विष्णुपंत चित्रकार<br>४ स्वामीभक्त कृष्णा लाड |
| ६ | अध्याय क्रमांक ९ | १ स्वामीभक्त आळत्याची येसूबाई<br>२ स्वामीभक्त वेणीमाधव |
| ७ | अध्याय क्रमांक १० | १ स्वामीभक्त मुरगुडकर, गोविंद व्यास, महादबा पटकर, रामभाऊ फारीक<br>२ स्वामीभक्त गाणगापूरचा रामदास<br>३ स्वामीभक्त ऐतवड्याचा देवगोंडा |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | अध्याय क्रमांक ११ | १ | स्वामीभक्त विष्णुपंत व त्यांची बहिण अन्नपूर्णा |
| ९ | अध्याय क्रमांक १२ | १ | स्वामीभक्त पोटशुळ्या कुलकर्णी इनामदार |
| | | २ | स्वामीभक्त महादेव भट्ट, अक्कलकोट |
| १० | अध्याय क्रमांक १३ | १ | स्वामीभक्त कुलकर्णी इनामदार |
| ११ | अध्याय क्रमांक १६ | १ | स्वामीभक्त दादा पंडित व गोविंद दत्तात्रय व्यास |
| १२ | अध्याय क्रमांक १७ | १ | स्वामीभक्त रामभाऊ पुजारी |
| | | २ | स्वामीभक्त म्हैसाळची शिऊबाई |
| १३ | अध्याय क्रमांक १८ | १ | स्वामीभक्त गोविंदराव करजकर |
| १४ | अध्याय क्रमांक १९ | १ | स्वामीभक्त भास्कर |
| १५ | अध्याय क्रमांक २० | १ | स्वामीभक्त रामभाऊ फारीक, महादबा पटकार, वासुदेव दळवी |
| १६ | अध्याय क्रमांक २१ | १ | स्वामीभक्त आरळेकर |
| १७ | अध्याय क्रमांक २२ | १ | स्वामीभक्त रामा मांग |
| १८ | अध्याय क्रमांक २३ | १ | स्वामीभक्त रामचंद्र कामत |
| | | २ | स्वामीभक्त विशाळगडचा जहागिरदार (प्रतिनिधी) |
| १९ | अध्याय क्रमांक २४ | १ | स्वामीभक्त जानकीबाई |
| २० | अध्याय क्रमांक २५ | १ | स्वामीभक्त व्यास, रामभाऊ राशिवडेकर |
| २१ | अध्याय क्रमांक २६ | १ | स्वामीभक्त काळे सावकार |
| २२ | अध्याय क्रमांक २७ | १ | स्वामीभक्त व्यंकटेश ऐतवडेकर, महेकर, केदारी कबुरकर, महादेवभट रायबागकर |
| २३ | अध्याय क्रमांक २९ | १ | स्वामीभक्त घाटे वैद्य, परांडेकर |

श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या संदर्भातील पहिल्यांदाच उलगडा होणारी अशी नवनवीन माहिती या ग्रंथात श्री स्वामीभक्तांच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. ही अत्यावश्यक माहिती सर्वांग परिपूर्णतेने साध्या सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तथापि, वरील अध्यायात दर्शविलेल्या स्वामीभक्तांची पूर्ण माहिती मिळालेली नाही/ मिळत नाही त्यामुळे त्यांच्या पूर्ण माहितीचा समावेश सदर ग्रंथात करण्यात आलेला नाही. तरी कृपया वरील स्वामीभक्तांची आणखी कांही माहिती उपलब्ध झाल्यास श्री झेंडेमहाराज, म्हैसाळ यांना कळवावी ही विनंती.